।। पूर्ण परमात्मने नमः ।।

# जगण्याचा मार्ग

**(Way of living)**

लेखक : संत रामपाल दास
श्री रामदेवानंदजी महाराज यांचे शिष्य

जीव हमारी जाति है, मानव (Mankind) धर्म हमारा।
हिन्दू, मुस्लिम, सिक्ख, ईसाई, धर्म नहीं कोई न्यारा।।

## अवश्य पहा

जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज
यांचे मंगलमय प्रवचन





**धर्मार्थ मूल्य = 20 रुपये**


प्रकाशक :- प्रचार प्रसार समिती तथा सर्व संगत
सत्लोक आश्रम, हिसार-टोहाना रोड, बरवाला.
जिल्हा-हिसार (राज्य-हरियाणा) भारत.

मुद्रक :- कबीर प्रिंटर्स
C-117, सैक्टर-3, बवाना इन्डस्ट्रियल ऐरिया, नई दिल्ली.



**संपर्क : 8222880541, 8222880542, 8222880543,
8222880544, 8222880545**

**E-mail: jagatgururampalji@yahoo.com**
**Visit us at : www.jagatgururampalji.org**

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | भूमिका | I-II |
| 2. | दोन शब्द | 1 |
| 3. | मानवी जीवनाविषयी सर्वसाधारण समजुती | 4 |
| 4. | कथा मार्कण्डेय ऋषि आणि अप्सरा यांचा संवाद | 11 |
| 5. | आज बंधू निवांत आहे | 16 |
| 6. | भक्ति न केल्याने होणाऱ्या नुकसानाचे अन्य विवरण | 20 |
| 7. | भक्ति न केल्याने अती दुःख होईल | 23 |
| 8. | भक्ति मार्गावरील प्रवास | 24 |
| 9. | विवाह कसा करावा | 24 |
| 10. | प्रेम प्रसंग कसा असतो ? | 26 |
| 11. | भगवान शिव जींनी आपल्या पत्नीचा त्याग केला | 26 |
| 12. | कृतघ्न पुत्र | 29 |
| 13. | निपुत्रीकांनो सावधान | 30 |
| 14. | अज्ञानी लोक विवाहात नाचतात | 30 |
| 15. | संतांची शिकवण | 30 |
| 16. | विवाहा नंतरचा प्रवास | 32 |
| 17. | विशेष मंथन | 35 |
| 18. | चरित्र्यवानाची कथा | 37 |
| 19. | संगतीचा प्रभाव आणि परमात्मावरील विश्वास | 38 |
| 20. | परमेश्वर कबिरजी कडून काशी क्षेत्री भोजनप्रसाद | 41 |
| | ● त्या भंडाऱ्यात आणखी एक चमत्कार झाला | 44 |
| 21. | हरलाल जाटाची कथा | 46 |
| 22. | तंबाखू सेवण करणे महापाप आहे | 48 |
| 23. | तंबाखूच्या उत्पतीची कथा | 48 |
| 24. | तंबाखू विषयी अन्य विचार | 52 |
| 25. | घोडे आणि गाढव सुद्धा तंबाखूचा तिरस्कार करतात | 53 |
| 26. | नशा नाश करते | 54 |

| | | |
|---|---|---|
| 27. | आई वडिलांची सेवा व आदर करणे हे परम कर्तव्य आहे | 58 |
| 28. | वडील मुलांची प्रत्येक चुक पोटात घालतात | 59 |
| 29. | सत्संग ऐकल्याने घरातील भांडणतंटे समाप्त होतात | 65 |
| 30. | पुहलो बाईचा सल्ला | 67 |
| 31. | वर्तमानातील काही सत्य कथा | 75 |
| | ● भक्त सुरेश दासच्या उध्वस्त कुटुंबाला सावरले | 75 |
| | ● सत्संग न श्रवण केल्यामुळे सर्वनाश झाला | 77 |
| | ● सत्संगात जाण्यामुळे मोठ्यातील मोठे संकट टळते | 78 |
| | ● मीराबाईना विषाने मारण्याचा व्यर्थ प्रयत्न | 80 |
| | ● मीराबाईना सद्गुरुच्या चरणी आश्रय मिळाला | 80 |
| | ● चोर कधी श्रीमंत होत नाही | 87 |
| | ● सांसारिक धामधुमीतच भक्ति करावी लागेल | 89 |
| | ● चौधरी जीता जाटाला ज्ञान झाले | 91 |
| | ● वैश्येचा उद्धार | 94 |
| | ● रंका-बंकाची गोष्ट | 96 |
| | ● कबीरजी कडून शिष्यांची परीक्षा | 98 |
| | ● खुनी हाथीद्वारे कबीर परमात्माला मारण्याची कुचेष्ठा | 104 |
| 32. | दीक्षा घेतल्यानंतर | 105 |
| 33. | परमात्माला काहीही अशक्य नाही | 106 |
| 34. | एक लेवा एक देवा दूतं | 110 |
| 35. | कथनी आणि करणीतील अंतर घातक आहे | 111 |
| 36. | सत्संगानेच भक्तिची वाट मिळाली | 112 |
| 37. | पंडित मणिराम कथाकाराची गोष्ट | 119 |
| 38. | राजा परीक्षिताचा उद्धार | 121 |
| 39. | पंडीताची व्याख्या | 123 |
| 40. | सुदामाजी पंडीत होते | 123 |
| 41. | अध्याय अनुराग सागर चा सारांश | 125 |
| | ● भक्ताचा स्वभाव कसा असावा? | 130 |
| | ● मन पाप-पुण्य कसे करवून घेते | 135 |
| | ● भक्ताचे १६ गुण (आभूषण) | 136 |

- कालाचा जीव सत्‌गुरु ज्ञान मानत नाही 138
- हंस (भक्त) लक्षण 139
- ज्ञानी म्हणजेच सत्संगीचे लक्षणे 139
- भक्त पारमार्थि असला पाहिजे 139

42. दीक्षा घेऊन नामस्मरण करणे अनिवार्य आहे 141
- दश मुकामी रेखता 144
- भक्त जती आणि सती असला पाहिजे 146

43. गरुड बोध अध्यायाचा सारांश 154
44. अध्यान हनुमान बोध चा सारांश 167
45. आम्ही कालाच्या जाळ्यात कसे अडकलो? 178
46. परमेश्वर कबीर जींची कालासोबत चर्चा 178
- काल निरंजनाने कबीरजींकडून तीन युगांमध्ये कमी जीव घेऊन जाण्याचे वचन घेतो 181

47. तेरा गाड्या भरुन कागद लिहिणे 187
48. कलयुग वर्तमानात किती कालावधी पूर्ण केला आहे? 191
49. गुरु विना मोक्ष नाही 191
50. पूर्ण गुरुच्या शब्दांच्या शक्तिने भक्ति होत असते 193
51. वासुदेवाची परिभाषा 200
52. गीतानुसार ''भक्ति कोणत्या प्रभुची करावी'' 206
53. पूजा आणि साधना मधील फरक 219
54. ऋषि दुर्वासांची कारगुजारी 224
55. सृष्टि रचना 231
- जीवात्मे कालच्या महाभयंकर जाळ्यात कसे फसले? 234
- श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी, श्री शिवजी यांची उत्पत्ती 238
- काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित 239
- ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा 241
- आपला पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तिसाठी बह्माचे प्रयत्न 243
- माता (दुर्गा) कडून ब्रह्माला शाप 244
- विष्णुंचे आपले पिता (काल/ब्रह्माच्या) प्राप्तीसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे 245

- परब्रह्मच्या सात संख ब्रह्माण्डांची स्थापना 251
- पवित्र अथर्ववेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 253
- पवित्र ऋग्वेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 257
- पवित्र श्रीमददेवी महापुराणामध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण 262
- पवित्र शिव महापुराणामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 264
- पवित्र श्रीमद्भगवत गीतामधील सृष्टिरचनेने प्रमाण 264
- पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टिरचनेचे प्रमाण 268
- पूज्य कबीर परमेश्वर (कविर् देव) यांच्या अमृतवाणीमधील सृष्टिरचनाचे प्रमाण 269
- आदरणीय गरीबदास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये 272
- आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टिरचनेचा संकेत 278
- अन्य संतांद्वारे सृष्टिरचनेची दंतकथा 281

56. भक्ति मर्यादा 283
- नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक माहिती 283
- कर्म काण्डा विषयी सत्य कथा 290

57. शास्त्रानुकूल भक्तिने भक्तांचे झालेले लाभ 295
- उध्वस्त परिवार एकत्र झाला 295
- मूत्रपिंड बरे होणे आणि सैतानाला माणसात आणणे 296
- भुते आणि आजारांनी त्रासलेल्या कुटुंबाला सुखी केले 299
- भक्त सतीशची आत्मकथा 300
- भक्त बहिद खान ची आत्मकथा 302
- भक्तमती तारा कट्टा यांच्यावर असीम कृपा झाली 303
- गुरुकृपेचा महिमा 303
- ११००० व्होल्टज तारेपासून सुटका 305
- भक्त दीपक दास यांच्या कुटुंबाची आत्म कथा 307
- परमेश्वराची असीम कृपा 310


❑❑❑

# भूमिका

जगण्याचा मार्ग हे पुस्तक घरोघरी संग्रही ठेवण्याच्या योग्यतेचे आहे. ते वाचून त्यानुसार आचरण केल्यास इहलोकी तसेच परलोकी देखिल सुखी राहाल. पापापासून आपली मुक्ती होईल आणि घराघरातील कलह संपतील. मुले-सुना आपल्या मातापित्यांची आपुलकीने सेवा करतील. घरामध्ये परमात्माचे अस्तित्व जाणवेल. भूत-पिशाच्च, भैरव, पितर-हडळ इत्यादी वाईट मृतात्मे त्या कुटुंबाच्या आसपास सुद्धा येणार नाहीत. देवता त्या कुटुंबाचे रक्षण करीत असतात. हे पुस्तक वाचून जो भक्त यातून अनुग्रह घेऊन आखून दिलेल्या मर्यादेत साधना करून जीवन व्यतीत करेल, त्या भक्ताचा अकाली मृत्यू होणार नाही.

हे पुस्तक वाचल्याने विखुरलेले परिवार एकत्र येतील. ज्या कुटुंबात हे पुस्तक बाळगले जाईल तेथे ते वाचले जाईल, त्यामुळे नशा आपोआप सुटेल कारण ह्या पुस्तकात दिलेले दृष्टांत हे आत्म्याला स्पर्शून जातात. दारू, तंबाखू तसेच अन्य नशा आणणाऱ्या वस्तूंबद्दल इतका तिरस्कार निर्माण होईल की त्याचे नाव घेतल्याबरोबर भीती वाटायला लागेल. सर्व कुटुंब सुखी जीवन जगू लागेल. जीवनाचा प्रवास सोपा होऊन जाईल कारण जीवनाचा मार्ग निष्कंटक होत जातो.

या पुस्तकामध्ये, पूर्ण परमात्मा कोण आहे? त्याचे नाव काय आहे? त्याची भक्ति कशी आहे? याबाबतची माहिती मिळेल. मानवी जीवन सफल होऊन जाईल. कुटुंबात कोणत्याही तऱ्हेच्या विकृति राहणार नाहीत. परमात्माची आपल्यावर सदैव कृपा राहील. जगण्याचा मार्ग प्रशस्त झाल्याने त्यावरील प्रवास सोपा होईल. जो हे पुस्तक आपल्या घरात बाळगणार नाही, त्याला जीवनाचा उत्तम मार्ग न गवसल्यामुळे संसाररुपी अरण्यात भरकटून आपले अमूल्य जीवन वाया घालवेल. त्यामुळे परमात्माच्या घरी गेल्यावर पश्चात्तापाशिवाय काहीही हाती लागणार नाही. त्यावेळेला उत्तम मार्ग न मिळाल्यामुळे आपले आयुष्य वाया गेल्याचे तुम्हाला जाणवेल. मग तुम्ही परमात्माची परत एकदा करूणा भाकाल, हे प्रभु! मला परत एकदा मानवाचा जन्म दे. मी खऱ्या मनाने प्रामाणिकपणे तुझी भक्ति करीन. जीवनाचा खरा मार्ग शोधण्यासाठी मी कीर्तन श्रवण करीन. आयुष्यभर तुझीच भक्ति करीन. स्वतःचे कल्याण करून घेईन. त्या परमात्माच्या दरबारात (कार्यालयात) आपल्या पूर्वजन्माची फिल्म चालवली जाईल ज्यामध्ये आपण प्रत्येक वेळी जेंव्हा-जेंव्हा मानव जन्म प्राप्त झाला होता, आपण हेच म्हटले होते की मला परत एकदा मानवाचा जन्म दे, मी कोणाचीही निंदा करणार नाही. आयुष्यभर तुझीच भक्ति करीन. माझ्या घरातील कामाचे सुद्धा निर्वाहन करीन. पुर्ण सदगुरूंकडून अनुग्रह घेऊन स्वतःचे कल्याण करून घेईन. या मानव जन्मात जी चूक केली, ती पुन्हा करणार नाही.

मग परमात्मा म्हणतो इतके दिवस स्वतःची फसवणूक करून आपले जीवन वाया घालवलेस आणि आता पापांचा गाडा भरून माझ्याकडे आला आहेस, आणि आता मला देखिल फसवू पाहतोस. चल नरकात. पुन्हा चौऱ्यांशी लक्ष योनींचा फेरा तुझ्या मागे आहे आता. जेव्हा केव्हा मानव (स्त्री-पुरुष) जन्म प्राप्त होईल, तेव्हा संतांच्या हरीकीर्तनाचे श्रवण करून आपले कल्याण करून घे.

भक्तजनहो आपणा सर्वांना विनंती आहे की हे पवित्र पुस्तक वाचल्यावर आपल्या एकशे एक (१०१) पिढ्यातील लोक तसेच परलोकात सुखी होतील. त्या परमात्माची आज्ञा समजून हे पुस्तक संपूर्ण कुटुंबाने वाचावे. एकाने वाचून इतरांनी श्रवण करावे किंवा एका पेक्षा

अधिक पुस्तके घेऊन वेगवेगळे पण रोज वाचावे. यातील प्रत्येक प्रकरण हे सत्य मानावे. ते गमतीचा भाग समजू नये. हे कोणाच्या सांगोवांगीवरून लिहिलेले पुस्तक नाही, तर परमात्माचे सेवक रामपाल दास यांनी मानवाचे कल्याण होण्याच्या दृष्टिने लिहिलेले हे हृदगत आहे. त्याचा लाभ घ्यावा.

।। सत साहेब।।

लेखक

दासानुदास रामपाल दास
स्वामी रामदेवानंदजी यांचे पुत्र/शिष्य,
सतलोक आश्रम, बरवाला
जिल्हा-हिसार, हरियाणा (भारत)

# दोन शब्द

प्राण्याच्या जीवनाची सुरवात त्यांच्या जन्मापासूनच होते. त्याचा मार्ग ठरलेला असतो. येथे या पवित्र पुस्तकात मानवी जीवनाच्या प्रवासाचे विस्तारपूर्वक वर्णन केले आहे. मोक्ष प्राप्ति हेच स्त्री किंवा पुरुष म्हणजेच मानव जातीचे अंतिम ध्येय आहे. त्या मार्गात पाप तसेच पुण्य कर्माचे खड्डे तसेच काटे आहेत. तुम्हाला आश्चर्य वाटेल पाप कर्मे तापदायक असतात, तर पुण्य कर्माचे सुखदायक असतात. त्यांना अडथळे म्हणणे उचित नाही. याचे थोडक्यात वर्णन :–

पाप रुपी खड्डे व काटे :– परमात्माची शास्त्रानुसार साधना करून मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठी मानव जन्म प्राप्त होत असतो. पाप कर्माचा ताप भक्तित बाधा आणतो. उदाहरणार्थ पापकर्मामुळे आपल्या शरीरात रोग होणे, पशुधनाची तसेच पिकाची हानी होणे इत्यादी. त्यामुळे कर्जबाजारी होते. कर्जबाजारी मनुष्य रात्रंदिवस काळजीतच असतो. तो भक्ति करूच शकत नाही. परम सतगुरुंकडून सतगुरु अनुग्रह प्राप्त झाल्यावर परमेश्वर त्याचे वरील सर्व ताप नाहीसे करतो. तेव्हा भक्ताची आपल्या भक्तिवरील श्रद्धा वाढीस लागते. परमात्मावरील विश्वास वाढतो आणि दृढ होतो. परंतु भक्त परमात्माप्रती पूर्ण समर्पित असला पाहिजे. जशी पतिव्रता स्त्री ही कितीही सुंदर असली तरीही कामपूर्ती (Sexual Satisfabtion) साठी आपल्या पतीशिवाय अन्य कोणाचाही विचार करू शकत नाही तिचा पती तिच्यासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देतो. तिच्यावर विशेषत्वाने प्रेम करतो. त्याच प्रकारे अनुग्रह घेतल्यानंतर आत्म्याचे परमात्माशी एकरूपता होते. गुरू आत्म्याचे विवाह परमात्माशी करतात. जर ती मानवी शरीर धारण करणारी आत्मा आपल्या पती परमेश्वरा प्रती ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपल्या पतीशी पूर्णपणे समर्पित असेल म्हणजेच पुर्ण परमात्माशिवाय अन्य कोणत्याही देवतेकडून मनोकामना पूर्ण होण्याची इच्छा धरत नाही तर मग पती परमेश्वर तिच्या जीवनातील सर्व पापरुपी कर्मांचा भार आपल्या अंगावर उचलतो. अशा आत्म्याचा जीवन प्रवास सुकर व सुखकर होतो. त्याला ध्येयापर्यंत सहज पोहोचता येते. त्या आत्म्यासाठी परमात्मा काय करतो? संत गरीबदास जींनी परमेश्वर कबीर जी यांच्याकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाचे वर्णन असे केले आहे :–

गरीब, पतिव्रता जमीं पर, ज्यों–ज्यों धरि है पाँवै।
समर्थ झाड़ू देत है, ना काँटा लग जावै।।

**कबीर परमेश्वर जी म्हणतात की :–**

कबीर, साधक के लक्षण कहूँ, रहै ज्यों पतिव्रता नारी।
कह कबीर परमात्मा को, लगै आत्मा प्यारी।।
पतिव्रता के भक्ति पथ को, आप साफ करे करतार।
आन उपासना त्याग दे, सो पतिव्रता पार।।

**भक्ति केल्याने पाप नष्ट होतात जे भक्तिच्या रस्त्यात अडथळे बनत असतात.**

कबीर, जब ही सत्यनाम हृदय धरो, भयो पाप को नाश।
जैसे चिंगारी अग्नि की, पड़ै पुराने घास।।

त्यासाठी गुरुकडून अनुग्रह घेऊन प्रत्येक स्त्री–पुरुष व तीन वर्षांवरील मुले (तीन वर्षांनंतर) तरुण–वृद्धांनी भक्ति करणे आवश्यक आहे.

❖ पुण्य देखिल भक्ति मार्गात एक बाधा आहे :–

पूर्व जन्मीच्या पुण्यामुळे घरात धनसंपत्ती असते. सर्व सुखसोयी असतात. कोणतेही राजपद प्राप्त झाल्यावर ते भक्तिमधील एक बाधा असते. ते सुख आपल्याला परमात्मा पासून शेकडो कोस (कित्येक किलोमीटर) दूर नेते. असे सुख देखिल जगण्याच्या मार्गातील एक अडथळा असतो. परमात्माला प्राप्त करण्याचा मार्ग अजूनच लांब करतो.

कबीर, सुख के माथे पत्थर पड़ो, नाम हृदय से जावै।
बलिहारी वा दुख के, जो पल–पल नाम रटावै।।

एखाद्या धनिक आणि राजपदावरील व्यक्तिला परमात्माची कथा ऐकवण्याचा प्रयत्न करून पहा. त्याला त्याची अजिबात आवड असणार नाही. दुसरीकडे पापकर्माची फळे भोगत असलेल्या व्यक्तिला परमात्माची कथा ऐकवा. त्याला सांगा की परमात्मा सगळे कष्ट दूर करतो. तू परमात्माची भक्ति कर. ती बघ, आपल्या गावातील अमुक व्यक्ति त्या संतांकडून अनुग्रह घेऊन सुखी झाली. तो देखिल तुझ्यासारखाच कष्टी होता. तर ती दुखी व्यक्ति भक्ति मार्गाला लागते. त्याच्यासाठी दु:ख हे जणू वरदान बनते. सुखी असलेल्याला कसे समजावून सांगावे की त्याच्याजवळ पुण्याची केवढी राशी आहे. ती धनवान व्यक्ति आपले सर्व पुण्य खर्च करून पापांनी भरलेला गाडा भरून मृत्युपश्चात परमात्माच्या दरबारात उभा राहतो तेव्हा चेहरा पाडून भयभीत होऊन जाईल व कुत्रा–गाढव, डुकराचा जन्म प्राप्त करेल. त्याच्या उलट दुखी गरीब व्यक्ति परमात्माची भक्ति करून व दानधर्म करून वर्तमान जीवनातच सुखाची प्राप्ति करेल. पापकर्मांपासून स्वतःचा बचाव करून पुण्याची मालगाडी भरून भक्तिरूपी धनाने युक्त होऊन परमात्माच्या दरबारात निर्भयपणे जाईल. परमात्मा त्याला आलिंगन देईल. त्या भक्ताला मोक्ष देऊन कायमचे सुखी करेल.

राजपदाची प्राप्ति केलेला धनवान मनुष्य देखिल भक्ति मार्गाला लागल्यास त्याचे काम झालेले असते व त्याला देखिल मोक्ष प्राप होण्यास कुठलीच अडचण निर्माण होत नाही.

प्रश्न :– एक सज्ञन मनुष्य म्हणाला मी कोणतेही नशापाणी करीत नाही, सर्व वाईट गोष्टींपासून लांब आहे. दुसऱ्याच्या लेकी–सुनांना आपल्या समजतो. कोणतेही पाप करीत नाही. मला भक्तिची काहीही आवश्यकता नाही. जे दुसऱ्यांची सतत निंदा करीत असतात बदनाम असलेल्या अशा अनेक लोकांना मी सत्संगाला जाताना पाहिले आहे.

उत्तर :– एखादी दोन एकर जमिन आहे. एक एकर जमिनीत नांगरून तयार केली आहे म्हणजेच तेथील झाडे–झुडपे, गवत छाटून नांगर किंवा ट्रॅकटरने नांगरून (गुडाई) स्वच्छ करून ठेवली आहे पण बी पेरलेले नाही.

दुसऱ्या एकरात झाडे झुडपे, आणि गवत तसेच आहे तर मग दोन्ही व्यर्थ आहेत. दुसऱ्या एकरात कोणी नांगरून व साफ करून गहू पेरल्यास आणि पहिल्या एकरात काहीच न पेरल्यास तर दुसरा पहिल्यापेक्षा म्हणजे ज्याने साफ सफाई करून काहीही पेरले नाही त्याच्यापेक्षा किती तरी पटींनी उपयोगी (चांगले) आहे.

त्यामुळे तुम्ही कोणत्याही दोष–विकार रहित असाल तर आपल्या मनात भक्तिचे बीज पेरावे लागेल आणि मगच त्या शरीररूपी जमिनीचा आपल्याला लाभ होईल.

जे दुसऱ्याची निंदा करीत असत, त्यांना ज्ञान लाभले व निंदेचा त्याग करून ते भक्ति करू लागतात. त्यांनी आपल्या जगण्याचा मार्ग बदलुन स्वच्छ करून घेतला आहे. ते योग्य मार्गाच्या निकट आहेत.

एका वेश्येने परमात्मा कबीरांचे सत्संग ऐकून आपला मार्ग बदलला व अनुग्रह घेऊन सत्संगात सहभागी होऊ लागली हे तुम्ही पुढे वाचालच. नगरातील लोकांना हे काही रुचले नाही. कबीरांच्या सत्संगात बदनाम झालेल्या स्त्रिया जातात. ते चांगले संत नाहीत. सगळ्या अशाच स्त्रिया त्यांच्या सत्संगांत जातात. त्यामुळे आपल्या लेकीबाळींना तिथे जाऊ देऊ नये अशा वावड्या त्यांनी तोंडातोंडी उठवायला सुरवात केली. या वावड्या ऐकून कबीरांचे काही भक्त देखिल गावातील लोकांची भाषा बोलू लागले. तेव्हा परमेश्वर कबीर जींनी सांगितले:-

कुष्टी हो संत बंदगी कीजिए।
जे हो वैश्या को प्रभु विश्वास, चरण चित दीजिए।।

भावार्थ :- जर एखाद्या भक्ताला कुष्ठरोग असेल व त्याने भक्ति केल्यास भक्तांनी त्याचा तिरस्कार करता कामा नये. इतर भक्तांना जसे नमस्कार करता तसा त्याला देखिल केला पाहिजे. त्यांचा मान ठेवला पाहिजे. त्याची उमेद वाढविली पाहिजे. भक्तिने त्याचे जीवन सफल होऊन जाईल व त्याचा रोग देखिल बरा होऊन जाईल. त्याचप्रमाणे जर कोणत्या वेश्या भगिनीला भक्ति करण्याची व सत्संगात सहभागी होण्याची प्रेरणा मिळत असेल, तर तिचा परमात्मावर विश्वास बसला आहे. कीर्तनातील विचार तिने श्रवण केल्यास तिच्यातील वाईट विचार गळून पडतील. तिचे कल्याण होऊन जाईल. समाजातून वाईट प्रवृत्तींचे उच्चाटन होईल. जर ती सत्संगात सहभागी झालीच नाही तर आपल्या पापाची जाणीव तिला कशी होणार? जसे मळलेल्या वस्त्राला साबण आणि पाणी लागलेच नाही तर ते निर्मळ कसे होणार? त्यामुळे एखादी बदनाम झालेली अशी स्त्री जर भक्ति करीत असेल तर तिला आदराने बोलवा जेणेकरून तिला सत्संगात सहभागी होण्यास संकोच वाटणार नाही. तिला रोखले तर तुम्ही पापात सहभागी असल्यासारखे होईल. या नंतरची कथा आपण याच पुस्तकाच्या ''जगण्याचा मार्ग'' पृष्ठ क्रमांक ९८ ''कबीर जी कडून शिष्यांची परीक्षा'' या शीर्षकाखाली वाचावी.

श्रीमद् भगवत गीताच्या ९ अध्यायातील ३० व्या श्लोकात हेच प्रतिपादन आहे. असे लिहिले आहे की कोणीही कितीही दुराचार करणारी व्यक्ति असली तरीही तो जर दृढ विश्वासाने परमात्माची भक्ति करीत असेल तर त्याला महात्माच म्हटले पाहिजे. संतांचे विचार ऐकून तो सुधारून जाईल व आपले कल्याण करून घेईल. त्यामुळे मानवी देह धारण करणाऱ्या प्राण्याने गुरुंना शरण जाऊन परमात्माची भक्ति व शुभ कर्म, दान-धर्म केला पाहिजे.

पूज्य कबीर परमेश्वरांनी असे म्हटले आहे की :-

कबीर, मानुष जन्म दुर्लभ है, मिले न बारं-बार।
तरवर से पत्ता टूट गिरे, बहुर ना लागे डार।।

भावार्थ :- कबीर परमात्मा जी असे समजावत आहेत कि हे मानवशरीर धारी प्राणी! अनेक युगांनी अतिशय दुर्मिळतेने हा मानवी जन्म लाभतो. हा वारंवार मिळत नाही. हे शरीर धारण केले आहेस तोपर्यंत सत्कर्मे व परमेश्वराची भक्ति कर, अन्यथा शरीर त्यागल्यावर पुन्हा हा मानवजन्म लाभणे दुर्मिळ आहे. जसे झाडावरून पान गळून पडल्यानंतर ते परत त्या फांदीवर चिकटत नाही.

त्यामुळे मानवी शरीर धारण करण्याची मिळालेली ही दुर्मिळ संधी गमावू नकोस. कबीरांनी पुन्हा म्हटलेले आहे की :-

कबीर, मानुष जन्म पाय कर, नहीं रटैं हरि नाम।
जैसे कुंआ जल बिना, बनवाया क्या काम।।

भावार्थ :– मानवी जीवनात जर भक्ति केली नाही तर ते जीवन म्हणजे जणू सुंदर विहीर खोदलेली आहे. पण त्याच्यात पाणी नसल्यासारखी आहे. किंवा एखाद्या विहिरीतील पाणी असले तरी ते खारे (पिण्यायोग्य नसलेले) असेल, तर त्याचे नांव जरी विहीर असले, तरी गुण विहिरीचे नाहीत. त्याच प्रमाणे मनुष्य भक्ति करीत नसल्यास त्याला भलेही आपण माणूस म्हणू, पण मनुष्याचे गुण त्याच्यात नाहीत.

पूर्वजन्मी केलेल्या बऱ्या वाईट कर्मामुळे व भक्तिमुळे कोणी उत्तम स्वास्थ्य असलेला मनुष्य असतो. त्याला अचानक कुठलाही रोग उद्भवतो व उपचारांवर लाखो रुपये खर्च करून देखिल शेवटी त्याचा मृत्यु होतो. कोणी जन्मापासूनच रोगी असतो आणि आयुष्यभर कष्ट भोगून मृत्यु पावतो. कोणी गरीब असतो, कोणाचा श्रीमंत घरात जन्म होतो. कोणाला अपत्ये होतात, कोणी निःसंतान असतो. कोणाला फक्त मुली–मुलीच होतात, पण इच्छा असून देखिल पुत्र होत नाही. ही सर्व पूर्वजन्माची फळे मनुष्य भोगीत असतो. जोपर्यंत तो पुन्हा भक्ति सुरु करीत नाही तोपर्यत आधीचेच संस्कार त्या प्राण्याला प्राप्त होत असतात. ज्यावेळेस पूर्ण गुरुंचा अनुग्रह घेऊन तो गुरूंच्या मर्यादामध्ये राहुन भक्ति करावयास लागतो तेंव्हा उत्तम संस्कारांमध्ये वृद्धी होऊन त्यामुळे दुःखाचा कालावधी संपून सुखाचा कालावधी सुरु होतो.

## ''मानवी जीवनाविषयी सर्वसाधारण समजुती''

जोपर्यंत यथार्थ परमार्थिक ज्ञान प्राप्त होत नाही तोवर जनसामान्यांची अशी समजूत असते की :–

१. मोठे होऊन शिकून सावरून आपल्या उदरनिर्वाहाची सोय करून विवाह करुन कुटुंबियांचे पालनपोषण करू. मुलांना उच्च शिक्षण देऊ. मग त्यांना नोकऱ्या लागतील. त्यांची लग्न करून देऊ. परमात्मा आपल्या मुलांना मुले होऊ दे. मग आमचे कर्तव्य पूर्ण झाले. पुष्कळ वेळा गावातले किंवा आजूबाजूचे (जवळच्या गावातले) ज्येष्ठ लोक एकत्र येतात तेव्हा एकमेकांची ख्यालीखुशाली विचारतात तेव्हा एकाने म्हटले परमेश्वर कृपेने मला दोन मुले व दोन मुली आहेत. कठोर परिश्रम करून सर्वांचे पालनपोषण केले तसेच शिकवले, विवाह करून दिले. सगळ्यांना मुले–मुली आहेत. माझे कर्तव्य पूर्ण झाले. आता ७५ वर्षांचा झालोय. आता मृत्यु आला तरी हरकत नाही, माझे जीवन सफल झाले. वंशाचा दिवा तेवतो आहे, जगात माझे नाव राहील.

विवेचन :– वरील प्रसंगात जे काही प्राप्त झाले, ते पूर्वनिर्धारित संस्कारांमुळे प्राप्त झाले आहे, त्यात नवीन असे काहीही नाही.

एका व्यक्तिचा विवाह झाला. त्याला एक मुलगी होते. मनुष्य जातीचा असा समज आहे की मुलगा नसेल तर त्याचा वंश पुढे चालत नाही. (परंतु पारमार्थिक दृष्टीकोनातून मुलगा आणि मुलगी यात काहीही फरक नाही) त्याला अशी आशा लागून राहिली की आपले दुसरे अपत्य तरी मुलगा असेल. पण दुसरी देखिल मुलगीच झाली. मग वाटले निदान तिसरे अपत्य तरी परमेश्वर मुलगा पदरात घालेल. पण तिसरी देखिल मुलगीच झाली. अशा प्रकारे त्याला एकूण पाच मुली झाल्या. मुलाचा जन्म झालाच नाही. या उदाहरणावरून मनुष्याने इच्छा केल्याप्रमाणे किंवा करण्याने काहीही होत नाही हे स्पष्ट झाले. जे काही झाले ते प्रारब्धवशांत झाले हे परमेश्वराचे विधान आहे. मानव शरीर धारण करणाऱ्याने वर्तमान जन्मात पूर्ण संतांकडून अनुग्रह घेऊन भक्ति केली पाहिजे व दान–धर्म व सत्कर्मे अवश्य केली पाहिजेत. अन्यथा

पूर्वजन्मातील पुण्यकर्मे ही मानवी जीवनातच खर्ची पडतात व परमात्माच्या दरबारी रिकाम्या हाताने जावे लागते. मग पशु इत्यादी योनी प्राप्त होऊन भोगावी लागते.

❖ जसा एखादा शेतकरी आपल्या शेतात गहू, हरबरा इत्यादी पिकांची पेरणी करतो. परिश्रम करून त्याची कापणी करून ते पीक आपल्या घरातील धान्य कोठारात (कक्ष) साठवण करतो. जर पुन्हा पेरणी करून त्याने पिक घेतले नाही व आधीच्या वर्षात उगवलेला गहू व हरबरा तो वापरत असेल तर वर्तमानात त्याला कोणतीही आपत्ती येणार नाही कारण मागील वर्षीचा गहू, हरबरा शिल्लक आहे. पण एक ना एक दिवस पूर्वी साठवलेला गहू व हरबरा संपणार आहे आणि मग ते शेतकरी कुटुंब भिकारी होणार आहे. त्याचप्रमाणे मानवी शरीराने जे प्राप्त झाले आहे ते पूर्वजन्मीच्या पुण्याचा साठा आहे. जर वर्तमानात पुण्यकर्म किंवा दानधर्म भक्ती केला नाही तर भविष्यातील जीवन नरकासमान आहे.

पारमार्थिक ज्ञानाची प्राप्ति झाल्यावर मनुष्य एखाद्या सुज्ञ शेतकऱ्याप्रमाणे दरवर्षी प्रत्येक ऋतूत दानधर्म रुपी बीज पेरेल व आपल्या घरी त्याची साठवण करून खाईल व ते विकून आपला खर्च देखिल चालवेल म्हणजेच गुरुकडून अनुग्रह घेऊन त्यांच्या सांगण्यानुसार साधना व दानधर्म करून भक्तिचे धन साठवून ठेवेल. त्यामुळे संतमहात्मे मानवाला सत्संगमध्ये जाण्याचा मार्ग सांगतात. त्याचा आधार हा पारमार्थिक सर्व ग्रंथांमधील प्रमाणित ज्ञान असते.

जसे पूर्वीच्या प्रसंगात एका वृद्धाने सांगितले त्याने सर्व अपत्यांना पालन-पोषण करून मोठे केले व त्यांचे विवाह करून दिले. माझे मानवी जीवनाची कर्तव्य पूर्ण झाली असल्याने माझे जीवन सफल झाले. आता मरण आले तरी हरकत नाही. विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की त्याने तर पूर्वीची असलेली जमा खर्च करून टाकली, भविष्यासाठी काहीच केले नाही. त्यामुळे त्याचे मानवी जीवन व्यर्थ गेले.

कबीर जी म्हणतात :-

क्या मांगुँ कुछ थिर ना रहाई। देखत नैन चला जग जाई।।
एक लख पूत सवा लख नाती। उस रावण कै दीवा न बाती।।

भावार्थ :- जर एखादा मनुष्य एका पुत्रा साठी आपली वंशवेल कायम फुलवत ठेवण्याची इच्छा करीत असेल तर ती त्याची चूक आहे. श्रीलंकेचा राजा रावण याला एक लाख पुत्र व सव्वा लाख नातवंडे होती. वर्तमानकाळी त्याच्या घरात (वंशाचा) दिवा लावणारा कोणीही शिल्लक नाही. सगळे मृत्यु पावले. त्यामुळे हे मानव! जे शाश्वत नाही ते परमात्माकडे काय मागतोस? परमार्थाच्या ज्ञानाच्या अभावामुळे तुला असे मागायला सुचते आहे. परमात्मा पूर्वसंस्कारानुसार आपल्याला देत असतो. तुम्ही केलेले काहीही होत नसते. त्या वृद्ध माणसाचे म्हणणे मान्य करायचे तर मुलाचा जन्म झाल्याने वंश वृद्धी होऊन त्याचे नाव जगात सुरु राहते. एका गावात सुरवातीला ४-५ माणसे होती. त्यांच्या वंशातून शेकडो परिवार तयार झाले. त्यांचा वंश सुरु आहे. जगात त्यांचे नाव देखिल सुरु आहे. परंतु शास्त्रोक्त पद्धतीने भक्ति न केल्यामुळे परमात्माच्या योजनेनुसार तो भला मनुष्य कुठेतरी गाढव होऊन कष्टाची ओझी वाहत असेल. तिथे गाढवाच्या वंशाची वृद्धी करून कुत्र्याचा जन्म प्राप्त करून त्या कुलाचा उद्धार करून उतर प्राण्यांचा जन्म घेऊन जन्मानुजन्म गाढवासारखे कष्ट करीत राहील. भावार्थ हाच की मानव शरीर धारण केलेल्याने आपली प्रापंचिक कर्तव्ये पार पडताना आत्मकल्याण देखिल करून घ्यावे. ज्यायोगे कुटुंबावर येणारा संकटांचा मारा देखिल टळेल व कुटुंब सुखरूप राहील. अन्यथा शुभाशुभ कर्मांचा भोग म्हणून कधी सुख तर कधी दु:ख भोगावे लागते.

एकदा दास (लेखक) एका गावात तीन दिवस प्रवचनाच्या निमित्ताने मुक्कामाला होते. त्याच कुटुंबातील एक नातेवाईक आपल्यासोबत एका चार वर्षाच्या मुलाला घेऊन आला. बोलता बोलता त्याने सांगितले मला चार मुलगे व दोन मुली अशी सहा अपत्ये आहेत. सर्वांचा विवाह झाला आहे. माझ्यासारखा सुखी माणूस या गावात कोणी दुसरा कदाचितच असेल. मग अशी वेळ आली की सगळे घरच उजाड झाले. दोन मुले मोटारसायकल वर आपल्या सासरवाडीला चालली होती, तर त्यांना अपघात होऊन ते देवाघरी गेले. त्याच्या पत्नीने अन्य गावी विवाह केला व ती तिथे राहायला गेली. एका वर्षानंतर त्यांचा एक मुलगा ट्यूबवेल वर साप चावल्याने मृत्यु पावला. या सगळ्याचा आघात सहन न होऊन चौथा मुलगा ह्रदयविकाराने मृत्यु पावला. सगळ्या सुना देखिल निघून गेल्या. पत्नीचे मानसिक संतुलन बिघडले. हा मोठ्या मुलीचा मुलगा आहे आणि त्याच्या कडे पाहून आम्ही दिवस काढतोय. मुलीला घरी ठेवून घेतले आहे. प्रिय साधकांना विनंती आहे की त्यांनी विवेकाच्या आधाराने जगावे व मानवी जीवनाचा खरा मार्ग अनुसरावा व भक्ति जरूर करावी.

❖ अपत्य होणे न होणे हे आपल्या पुर्वकर्मावर अवलंबून आहे. जर मुलांना देवाधर्माचे ज्ञान नसेल तर ती कितीही प्रामाणिक असली तरीही कधी न कधी चूक करतीलच. हे सर्व पाप कर्मामुळे होईल. एका व्यक्तिने सांगितले की त्याचे सासरे हे चार एकर जमीन मालकी असलेले जाट होते. दिवसरात्र कष्ट करून त्यांनी आपली एकूण १६ एकर जमीन वाढवली म्हणजेच आणखी बारा एकर जमीन विकत घेतली. चार मुले व एक मुलगी होती. सर्वांचे विवाह करून दिले. साठाव्या वर्षी सासऱ्यांना अर्धांगवायूचा झटका आला. चारही मुले वेगळी राहत होती.

काही दिवस मोठ्या मुलाकडे राहिले, पण सहा महिन्यातच कपड्यांना घाणेरडा वास यायला लागला. मग तीन नंबरच्या मुलाकडे राहायला गेले. काही दिवसांनी त्याने देखिल आपले हात वर केले. अशा प्रकारे चारही मुले सेवा करून करून त्रासली होती. माझ्या सासऱ्यांची सेवा करावी या हेतूने गावाच्या पंचायतीने असा निर्णय घेतला की त्याची सेवा करणाऱ्या मुलाला दोन एकर जमीन जास्त देण्यात येईल. या मोहात पडून सर्वात धाकट्या मुलाने वडिलांची सेवा करण्यास मान्यता दिली. पण सहा महिन्यातच हे माझ्या आवाक्यातील काम नाही म्हणून माघार घेतली. सगळे नातेवाईक एकत्र भेटले. सगळ्यांना सर्व पद्धतीने समजावून सांगितले पण सेवा करायला कोणीच तयार नाही झाले. तो भक्त सांगत होता की माझ्या सासऱ्यांना बोलता देखिल येत नव्हते. जेव्हा छोटा नातू समोर आला तेव्हा मुंडी हलवून तो असे दर्शवित होता माझ्याजवळ ये, तुझे खूप लाड करीन. त्याला मोह झाला होता. मुलांनी तर मजा मारली, नातवंडेच बाकी होती. त्या दोन एकर जमीनीचा ठेका देऊन त्यासाठी एक नोकर ठेवला आपल्या दुर्गतिने मेला.

विचार करा भक्ति किंवा धर्माशिवाय मानवी जीवन म्हणजे एक नरकच आहे याचे ज्ञान अशा कामसू (मेहनती) व्यक्तिला असते तर त्यासोबतच त्याने परमात्माची भक्ति केली असती व अशी दशा करून घेतली नसती. मुलांनी देखिल त्याची सेवा केली असती. सत्संगामध्ये हेच तर शिकविले जाते. श्रद्धाळूंना दया-धर्म शिकविला जातो. आश्रमात सत्संगामध्ये वृद्ध, रोगी, अपंग, छोटी मुले, माता, भगिनी, मुली येतात. आश्रमात जुन्या भक्तांना काम वाटून देण्यात येते. ते येणाऱ्या वृद्ध, रोगी व असहाय्य व्यक्तिंची सेवा करतात. त्यांना स्नान घालतात, त्यांचे कपडे धुतात, स्वतः पाक गृहातून प्रसाद घेऊन मंडपात बसलेल्यांना खाऊ घालतात. तिथे बसलेल्यांना चहा-दुध देखिल आणून देतात. विचार करा (सत्संगात जाणारी) जी मुले, मुली, भगिनी, बंधू व भक्त बंधू सत्संगात येणाऱ्या त्रयस्थ व्यक्तिंची सेवा करतात तर घरी ते आपले

आई वडील, भाऊ बहिण, सासू सासरे यांची देखिल त्याच भावाने सेवा करतील कारण तो त्यांचा स्वभाव होऊन जातो. त्यांच्या हृदयात दयाभाव निर्माण होतो. त्यांना परमात्माचा संदेश उत्तम तऱ्हेने लक्षात राहतो. मागच्या प्रसंगातील कामसु (मेहेनती) शेतकऱ्याला अर्धांगवायूचा झटका येणे व मुलांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करणे. जर त्या शेतकऱ्याने देवाची भक्ति केली असती तर त्याचे शरीर स्वास्थ्य राहिले असते व त्याच्या भक्तिने, भजन कीर्तनाने प्रभावित होऊन कुटुंबाने आपोआप त्याचा आदर केला असता. उदाहरणार्थ साधु संत भक्तिच करतात व त्यामुळे सगळे गाव त्यांची सेवा व आदरसत्कार करते. अशा प्रकारे भक्ति केल्यामुळे परमात्माची शक्ति आपोआप इतरांना स्फूर्ती देऊन भक्ताला अनुकूल परिस्थिती निर्माण करते. त्यामुळे संतसज्जन भक्ति करण्याची प्रेरणा देतात. सत्संग केल्याने जगण्याचा मार्ग सुकर होतो.

❖ **कबीर परमेश्वर पुन्हा सांगतात कि :–**

कबीर, काया तेरी है नहीं, माया कहाँ से होय।
भक्ति कर दिल पाक से, जीवन है दिन दोय।।
बिन उपदेश अचम्भ है, क्यों जिवत हैं प्राण।
भक्ति बिना कहाँ ठौर है, ये नर नाहीं पाषाण।।

भावार्थ :– परमात्मा कबीर म्हणतात हे मूढ़ मानव! मला आश्चर्य वाटते कि गुरुकडून कोणताही अनुग्रह न घेता कशाच्या आधारावर जिवंत आहेस. हे शरीरही तुझे नाही, ते तुला सोडून जाणार आहे. मग संपत्ति तुझी कशी होइल?

भक्ति शिवाय जीव शून्य आहे हा विवेक ज्यांना नाही, ते नर मानव नसून पाषाण आहेत. त्यांची बुद्धी दगड झाली आहे. म्हणून कबीर जी परत एकदा सांगतात कि :–

**बेगार ची परिभाषा :–**

अगम निगम को खोज ले, बुद्धि विवेक विचार।
उदय–अस्त का राज मिले, तो बिन नाम बेगार।।

भावार्थ :– पूर्वीच्या काळी पोलीस ठाण्यांमध्ये जीप किंवा कार नसायची. जर पोलीस विभागाला कुठे छापा (रैड) मारायचा असेल तर कोणाची तरी खासगी तीन किंवा चार चाकी गाडी असेल त्याला घेऊन त्याच्या गाडीतून बसून जात असत. चालक देखिल (तीन चाकी किंवा चार चाकी) असलेला असायचा आणि पेट्रोल डीझेल आपल्याच खर्चाने टाकायचा. आपला रोजगार देखिल त्याला कमावता यायचा नाही. पोलिस संपुर्ण दिवस त्याला इकडून तिकडे नुसते फिरवत असत. सामान्य व्यक्ति हाच विचार करणार की तीनचाकी वाला आज भरपूर कमाई करणार. पूर्ण दिवस त्याची गाडी चालली आहे, पण प्रत्यक्षात किती कमाई होणार आहे हे त्या तीन चाकी वाल्यालाच माहित असते. तसेच राजे–महाराजे देखिल या जन्मी भक्ति न करता केवळ आपले राज्य राखण्याच्या हेतूने आपले जीवन घालवत असतात आणि बेठबिगारी करीत असतात. पूर्वजन्मातील कर्माने राजा बनलेले असतात. सद्य जन्मात ते पुण्य खर्च होत असते. लोकांना वाटत असते राजाची रोजच चंगळ आहे. पण परमार्थिक दृष्टीने तो बेठबिगारी करीत असतो. भक्तिची कमाई करीत नाही आहे. गुरुकडून अनुग्रह घेऊन एखादी व्यक्ति भक्ति करू शकत नसेल तर त्याला संपुर्ण पृथ्वीचे जरी राज्य प्राप्त झाले तरी त्या तीनचाकी मालकाच्या प्रमाणेच व्यर्थ परिश्रम आणि बेठबिगारी करतो आहे. त्याने काहीही लाभ होणार नाही. त्यामुळे राजा असो वा प्रजा, सधन असो वा निर्धन, सर्वांनी नव्याने भक्ति केली पाहिजे. त्यामुळेच त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.

**❖ परमात्मा कबीरांनी आपले शिष्य संत गरीबदास जी यांना जे तत्वज्ञान समजाविले ते खालीलप्रमाणे :- ( राग आसावरी शब्द क्रमांक १)**

मन तू चलि रे सुख के सागर, जहाँ शब्द सिंधु रत्नागर। (टेक)
कोटि जन्म तोहे मरतां होगे, कुछ नहीं हाथ लगा रे।
कुकर-सुकर खर भया बौरे, कौआ हँस बुगा रे।।(१)
कोटि जन्म तू राजा किन्हा, मिटि न मन की आशा।
भिक्षुक होकर दर-दर हांड्या, मिल्या न निर्गुण रासा।।(२)
इन्द्र कुबेर ईश की पद्वी, ब्रह्मा, वरूण धर्मराया।
विष्णुनाथ के पुर कूं जाकर, बहुर अपूठा आया।।(३)
असँख्य जन्म तोहे मरते होगे, जीवित क्यूं ना मरै रे।
द्वादश मध्य महल मठ बौरे, बहुर न देह धरै रे।।(४)
दोजख बहिश्त सभी तै देखे, राज-पाट के रसिया।
तीन लोक से तृप्त नाहीं, यह मन भोगी खसिया।।(५)
सतगुरू मिलै तो इच्छा मेटैं, पद मिल पदै समाना।
चल हँसा उस लोक पठाऊँ, जो आदि अमर अस्थाना।।(६)
चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी।
दास गरीब अभय पद परसै, मिलै राम अविनाशी।।(७)

**सूक्ष्मवेदाच्या वाणीचा भावार्थ :-**

**वाणी चा सरलार्थ :- आत्मा आणि मन यांचे रूपक बनवून संत गरीबदास जी यांनी जगतातील मानवाला समजावले आहे की हा प्रपंच म्हणजे दुख्खांचे माहेरघरच आहे. याच्या व्यतिरिक्त आणखी एक प्रपंच आहे. तिथे कोणीही दुखी नाही. ते स्थान (सनातन परम धाम = सत्यलोक) आहे व तिथला परमात्मा (अविनाशी परमेश्वर) हा सुखांचा सागर आहे.**

**सुख सागर म्हणजेच अमर परमात्मा आणि त्याची राजधानी म्हणजे अमर लोकाची संक्षिप्त परिभाषा सांगितली आहे :-**

शंखों लहर मेहर की ऊपजैं, कहर नहीं जहाँ कोई।
दास गरीब अचल अविनाशी, सुख का सागर सोई।।

**भावार्थ :- ज्या वेळेस मी (लेखक) एकटा असतो, तर कधी-कधी आतमध्ये अशी एक लहर येते, त्या वेळेस सगळे आपले वाटायला लागतात. मग भलेही कुणी मला खूप त्रास दिला असेल पण कोणाही बाबत तिरस्काराची भावना निर्माण होत नाही. सर्वांच्या बद्दल प्रेम भावना उचंबळून येते. ही स्थिती काही मिनिटे राहते. त्याला प्रेमाने उचंबळणे म्हणता येईल. सतलोक म्हणजेच सनातन परम धाम मध्ये गेल्यानंतर प्रत्येक प्राण्याला इतका आनंद होतो. तिथे अशा असंख्य लहर येत असतात. जिथे अशा उर्मी माझ्या आत्म्यापासून दूर जातात तिथेच दुःखमय स्थितिचा प्रारंम्भ होत असतो. त्याने असे का केले? ती व्यक्ति चांगली नाही आहे, असे नुकसान झाले, असे झाले, तसे झाले. ही दुखाची (कहर) लहर झाली.**

**त्या सतलोकात दयाभावाच्याच (मेहर) उर्मी उमटतात तिथे उत्पाताला वावच नाही. तसे तर सतलोकात कुठलेच दुःख नाही. उत्पाताचा अर्थ भयंकर कष्ट. जस एखाद्या गावात आपसातील चाललेल्या संघर्षात विरोधकांनी दुसऱ्या पक्षाच्या कुटुंबातील तीन जणांची हत्या केली, कुठे भूकंपामुळे हजारों व्यक्ति मरण पावतात, त्याला उत्पात किंवा कहर झाला असे**

म्हणतात. वर लिहिलेल्या वाणीत सुखसागराची परिभाषा संक्षिप्त रुपात सांगितली आहे. तो अमर लोक स्थिर व अविनाशी आहे म्हणजेच त्याचा कधीही लय होत नाही म्हणजेच तिथे वास करणारा परमात्मा अविनाशी आहे. ते स्थान आणि परमेश्वर सुखाचा सागर आहेत. जसे समुद्रामध्ये समुद्री जहाज बंदराच्या किनाऱ्यापासून १०० ते २०० कीमी. दूर जाते तेव्हा जहाजातील प्रवाश्यांना समुद्राशिवाय काहीही दिसत नाही. सगळीकडे पाणीच पाणी दिसते. त्याचप्रमाणे सतलोकात देखिल सुखाशिवाय काहीही दिसत नाही. तिथे दु:ख नावाला देखिल अस्तित्वात नाही.

आता आधी लिहिलेल्या वाणीचा सरलार्थ करता येतो. :-

मन तू चल रे सुख के सागर, जहाँ शब्द सिंधु रत्नागर।।(टेक)
कोटि जन्म तोहे भ्रमत होगे, कुछ नहीं हाथ लगा रे।
कुकर शुकर खर भया बौरे, कौआ हँस बुगा रे।।

भावार्थ :- परमेश्वर कबीरजींनी त्यांचे अंतरस्थ शिष्य संत गरीबदास जी यांना सूक्ष्मवेद समजावून सांगितला त्या संत गरीबदास जी (गाव-छुड़ानी जिला-झज्जर, हरियाणा राज्य) यांनी आत्मा आणि मन यांचे रूपक करून विश्वातील मानवाला काल ब्रह्मच्या लोकातील कष्ट आणि सतलोकातील सुख सांगून त्या परमधामाकडे जाण्यासाठी शास्त्रोक्त सत्य साधना करण्याची प्रेरणा दिली आहे. मन तू चल रे सुख के सागर म्हणजेच सनातन परम धामा कडे चल जिथे शब्द नष्ट होत नाही. त्यामुळेच शब्दाचा संबंध अमरत्वाशी आहे आणि ते स्थान अर्थातच सिंधू म्हणजेच सागर आहे आणि तिथे मोक्ष रूपी रत्नांची खाण आहे. या काल ब्रह्म लोकात आपण भक्ति देखिल केली परंतु शास्त्रानुकूल साधना सांगणारे तत्वदर्शी संत न मिळाल्याने आपण किती कोटी जन्म दिशाहीन भटकत आहोत. करोड़ों-लाखो रूपये कमावण्यासाठी पूर्ण जन्म खर्च करता, नंतर मृत्यु होतो. आपल्या पूर्व संस्कारांमुळे प्राप्त झालेले ते कमावलेले धन आपण या जगाच्या त्याग केलात. ते धन कमावण्यासाठी आपण जी पापे केली, ती देखिल आपल्या बरोबर गेली. आपल्या त्या मानव जीवनात तत्वदर्शी संतांकडून अनुग्रह घेऊन शास्त्राविधि अनुसार भक्ति न केल्यामुळे आपल्या हाती काहीही लागले नाही. पूर्व पुण्याच्या बदलयात धन घेतले. ते धन इथेच राहून गेले आणि तुम्हाला हाती काहीही लागले नाही. हाती लागले, ते फक्त धन साठवणुकीचे आणि भक्ति शास्त्रानुकूल न करण्याचे पाप.

ज्यामुळे आपणास कुकर = कुत्रा, खर = गाढव, सुकर = डुक्कर, कौआ = कावळा, हँस=एक पक्षी जो केवळ सरोवरातील मोती खातो, बुगा=बगळा पक्षी इत्यादी-इत्यादी योनि प्राप्त करून कष्ट भोगावे लागले.

कोटि जन्म तू राजा कीन्हा, मिटि न मन की आशा।
भिक्षुक होकर दर-दर हांड्या, मिला न निर्गुण रासा।।

सरलार्थ :- हे मानव! आपण काल ब्रह्मची कठिणातील कठिण साधना केली. घराचा त्याग करून जंगलात निवास केला नंतर गाव व नगरात घरोघर दारोदार फिरलात. भिक्षा प्राप्ति करण्यासाठी जंगलातील साधनारत साधक निकटच्या गावात अथवा शहरात जातात. एका घरात भिक्षा पूर्ण न मिळाल्यास अन्य घरामधून भोजन घेऊन जंगलात जातात कधी-कधी तर साधक एक दिवस भिक्षा मागून आणतात, त्यावरच दोन-तीन दिवस निर्वाह करतात. पोळ्यांना ठेवण्याच्या रूमाला सारख्या पातळ कपड़यास छालना म्हणतात. छालण्यात गुंडाळून झाडाच्या फांदीला बांधून ठेवत असत. त्या पोळ्या वाळून जात. त्या पाण्यात बुडवून

मउ करून खात असत. रोज भिक्षा मागण्यात व जान्यायेण्यात जो व्यर्थ वेळ जात होता तो वाचवून त्याचा उपयोग काल ब्रह्मची साधना करण्यात व्यतीत करीत असत. भावार्थ असा की जन्म-मरणा पासून मुक्ती प्राप्त करण्यासाठी म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्ति साठी वेदामध्ये वर्णन केल्यानुसार आणि परंपरेनुसार, विधिनुसार ते घोर तप करत असत. त्यांना तत्वदर्शी संत न मिळाल्याने निर्गुण रासा म्हणजेच गुह्य ज्ञान ज्याला तत्वज्ञान म्हणतात ते मिळाले नाहीं कारण यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० मध्ये आणि चारों वेदांचा सारांश असलेल्या श्रीमद् भगवत गीता अध्याय ४ श्लोक ३२ आणि ३४ मध्ये म्हटले आहे की जो यज्ञ म्हणेच धार्मिक अनुष्ठानाचे विस्तृत ज्ञान स्वतः सच्चिदानन्द घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्म आपल्या मुखकमला मधून बोलून ऐकवतो, ते तत्वज्ञान म्हणजेच सूक्ष्मवेद आहे. गीता ज्ञान दाता ब्रह्मने सांगितले आहे की ते तत्वज्ञान तू तत्वज्ञानी गुरुजवळ जाऊन समजून घे व त्यांना दण्डवत् प्रणाम करून नम्रतापूर्वक प्रश्न करून ते परमात्म तत्व पूर्णपणे जाणणारे भली-भाँति तत्वदर्शी संत तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील. त्यामुळे हे सिद्ध झाले की तत्वज्ञान न वेदांमध्ये आहे ना गीता शास्त्रामध्ये. तसे असते तर एक अध्याय आणखी सांगून तत्वज्ञान त्या अध्यायात वाचण्यास सांगितले असते. संत गरीबदास जी ने मनाचे रूपक करून मानव शरीर धारण करणाऱ्यांना समजावले आहे की ते निर्गुण रासा म्हणजेच तत्वज्ञान न मिळण्याचे कारण काल ब्रह्मची साधना करून तुम्ही करोड़ों जन्मात राजा झालात. तरीदेखिल मनाची इच्छा संपली नाही कारण राजा असा विचार करतो की राज्यात सुखशांती समाधान नाहीच आहे, ते फक्त स्वर्गात आहे.

निर्गुण रासा चा भावार्थ :- निर्गुणाचा अर्थ आहे की ती वस्तु तर आहे परंतु तिचा लाभ मात्र होत नाही आहे. वृक्षाच्या बीजात फळ आणि वृक्ष हे निर्गुण रूपात आहे, व ते बीज मातीत पेरून त्याचे सिंचन करून सगुण वस्तू (वृक्ष, फळे, फुले) हे प्राप्त केले जाते. हे ज्ञान न झाल्यामुळे आंब्याचे फळ व सावलीपासून ते वंचित राहतात. रासा = गोंधळ म्हणजेच अडकलेले काम.

सूक्ष्मवेदात परमेश्वर कबीर जी म्हणतात :-

नऊ मण (३६० की.ग्रा.) सूत = कच्चा दोरा

कबीर, नौ मन सूत उलझिया, ऋषि रहे झख मार।<br>
सतगुरू ऐसा सुलझा दे, उलझे न दूजी बार।।

सरलार्थ :- परमेश्वर कबीर जी असे म्हणतात की परमार्थाचे ज्ञान हे गुंतलेल्या नऊ मण सुतासारखे आहे. एक कीलो.ग्राम दोऱ्यातील गुंतागुंत सोडवायला विणकराला एकापेक्षा अधिक दिवस लागतात. सोडविताना दोरा तुटल्यास कपड्यात गाठ येते. गाठ असलेल्या कपड्याला काहीही किंमत नसते. त्यामुळे कबीर परमेश्वर या विणकराने विणकरांचे अचूक उदाहरण देऊन अधिक गुंतागुंत असलेला दोरा सोडविण्याच्या फंदात कोणी पडत नसल्याचे समजाविले आहे. परमार्थ ज्ञान हे त्या गुंतागुंत असलेल्या नऊ मण दोऱ्यासारखे आहे. सतगुरु म्हणजेच तत्वदर्शी संत त्याची अशी सोडवणूक करतील की त्यात पुन्हा कोणताही गुंता निर्माणच होणार नाही गुंता न सुटलेल्या परमार्थज्ञानाच्या आधाराने म्हणजेच लोकवेदा प्रमाणे साधना करून स्वर्ग-नरक, चौरयांशी लाख योनीमधील प्राण्याचे जीवन, पृथ्वी वरच्या कुठल्यातरी तुकड्याचे राज्य, स्वर्गाचे राज्य प्राप्त केले, पुनःपुनः जन्म-मरणाच्या चक्रात अडकून खडतर जीवन व्यतीत केले. परंतु काल ब्रह्म वेदात वर्णन केलेल्या विधिनुसार साधना करून गीताच्या

**अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये सांगितल्यानुसार साधकाला परम शांति आणि सनातन परम धाम असलेले परमात्माचे पद प्राप्त झाले नाही गीताच्या अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगितल्यानुसार आपली मृत्युलोकात रवानगी देखिल टाळू शकला नाही. काल ब्रह्मची साधना करून काही लाभ होत असतात खालील प्रमाणे.**

वाणी नं ३ :– इन्द्र–कुबेर, ईश की पदवी, ब्रह्मा वरूण धर्मराया।
विष्णुनाथ के पुर कूं जाकर, बहुर अपूठा आया।।

**सरलार्थ :– काल ब्रह्मची साधना करून साधक इन्द्र पद देखिल प्राप्त करु शकतो इन्द्र हे स्वर्गाच्या राजाचे पद आहे. त्याला देवराज म्हणजेच देवांचा राजा व सुरेश असे देखिल म्हटले जाते. सिंचन विभाग म्हणजेच पावसाचे मंत्रालय यांच्या अधीन असते.**

**प्रश्न :– इन्द्र ही पदवी कशी प्राप्त होते?**

**उत्तर :– अधिक तप करून व शंभर मण (४ हजार की.ग्रा.) गायीचे किंवा म्हशीचे तूप वापरून धर्मयज्ञ केल्यास एक धर्मयज्ञ सम्पन्न होतो. असे शंभर धर्मयज्ञ निर्विघ्नपणे पार पडल्यास इन्द्र ही पदवी साधकाला प्राप्त करता येते. तप किंवा यज्ञात काही विघ्न आल्यास ते पुन्हा नव्याने सुरु करावे लागते. अशा प्रकारे इन्द्र ही पदवी प्राप्त होते.**

**प्रश्न :– इन्द्राचा राज्य करण्याचा कालावधी किती आहे? मृत्यु नंतर इन्द्र पदाचा त्याग करून प्राणी कोणत्या योनिला प्राप्त होतो?**

**उत्तर :– इन्द्र ७२ चतुर्युग पर्यंत म्हणजेच स्वर्गाचा राजा हे पद भूषवू शकतो. एक चतुर्युग म्हणजे सत्ययुग+त्रेतायुग+द्वापरयुग तसेच कलयुगाचा कालावधी असतो. जो सत्ययुग त्रोतायुग द्वापरयुग व कलयुग यांची अनुक्रमे १७२८००००+१२९६०००+८६४०००+४३२००० क्रमाने सत्ययुग+त्रेतायुग+द्वापरयुग आणि कलयुगाचा वर्षे मिळून एकूण ४३ लाख २० हजार वर्षाचा कालावधी म्हणजे एक चतुर्युग असते. असे ७२ चतुर्युगे पावतो तो साधक इन्द्र पद भूषवून स्वर्गाच्या राजाचे सुख उपभोगू शकतो. एक कल्प म्हणजेच ब्रह्मा जीच्या एका दिवसात (एक दिवस म्हणजे एक हजार आठ (१००८) चतुर्युगे कालावधी असतो) १४ जीव इन्द्र पदावर राहून आपले केलेले पुण्य–कर्म भोगत असतात. इन्द्र पद भोगून ते प्राणी गाढवाचा जन्म प्राप्त करतात.**

## कथा :– ''मार्कण्डेय ऋषि आणि अप्सरा यांचा संवाद''

**एकदा बंगालच्या खाड़ीमध्ये मार्कण्डेय ऋषि तप करत होता. इन्द्र पद पर विराजमान आत्म्याला अशी अट असते की जर त्याच्या राज्य करण्याच्या कालावधीत ७२ चातूर्युगाच्यामध्ये कोण्या व्यक्तिने इन्द्र पद प्राप्त करण्यासाठी योग्य तप अथवा धर्मयज्ञ केल्यास आणि त्याच्या क्रियेत कोणतीही बाधा न आल्यास त्या साधकाला इन्द्र पद दिले जाते व वर्तमान इन्द्राकडून ते पद हिस्कावून घेतले जाते. त्यामुळेच शक्यतोवर इन्द्र आपल्या कारकीर्दीत कोणत्याही साधकाचे तप अथवा धर्मयज्ञ पूर्ण होऊ देत नाही. काय वाट्टेल ते करावे लागले तरी ते करून त्याची साधना भंग करतो.**

**जेव्हा दूतांनी इन्द्राला सांगितले की बंगालच्या खाड़ीत मार्कण्डेय नामक ऋषि तप करीत आहेत तेव्हा इन्द्राने मार्कण्डेय ऋषि च्या तपाचा भंग करण्यासाठी उर्वशीला (इन्द्राची पत्नी) पाठविले. सर्व शृंगार करुन देवपरी मार्कण्डेय ऋषि समक्ष नाचू–गाऊ लागली. आपल्याला प्राप्त सिद्धिने त्या स्थानी बसंत ऋतु सारखे वातावरण निर्माण केले. मार्कण्डेय ऋषिनी**

कोणतेही स्वारस्य दाखविले नाही. उर्वशीने कमरेचे नाडा सोड़न निःवस्त्र झाली. तेव्हा मार्कण्डेय ऋषि तिला म्हणाले हे मुली! हे भगिनी! हे माते! आपण इथे काय करीत आहात? आपण इथे घोर अरण्यात एकट्या का आल्या आहात? उर्वशीने त्यांना म्हटले, ऋषि जी माझे रूप पाहून या अरण्यातील (वन–खण्ड) सर्व साधक आपले संतुलन गमावून बसले आहेत, परंतु आपण डगमगला नाहीत, कोणास ठाऊक आपली समाधि कुठे लागली होती? कृपया आपण माझ्यासोबत इन्द्रलोकात चला, नाहींतर मी हार पत्करल्यामुळे मला शिक्षा मिळेल. मार्कण्डेय ऋषि म्हणाले की माझी समाधि ब्रह्मलोकात गेली होती, जिथे मी अतिशय सुंदर उर्वश्या नाचताना पाहत होतो. तुझ्यासारख्या तर त्यांच्या ७–७ दासी आहेत. त्यामुळे मी तुझ्याकडे काय पाहणार, तुझ्यावर काय आसक्त होणार? जर तुझ्यापेक्षा कोणी अधिक सुंदर असेल तर तिलाही घेऊन ये. तेव्हा देवपरी ने म्हटले की ती इन्द्राची पट्टराणी म्हणजेच मुख्य राणी मी आहे आणि माझ्याहून सुंदर स्त्री तिथे कोणीच नाही.

तेव्हा मार्कण्डेय ऋषिनी विचारले इन्द्राचा मृत्यु झाल्यावर तू काय करशील? उर्वशीने उत्तर दिले की ती १४ इन्द्र भोगेल. मतितार्थ असा की श्री ब्रह्मा जीच्या एक दिवसात १००८ चतुर्युग असतात ज्यामध्ये ७२–७२ चतुर्युगांची कारकीर्द पूर्ण करून १४ इन्द्र मृत्यु पावतात. इन्द्राच्या राणीच्या आत्म्याने कोणत्यातरी मानव जन्मात इतके अत्यधिक पुण्य केले होते ज्यामुळे ती १४ इन्द्राची पट्टराणी होऊन स्वर्ग सुख आणि पुरूष सुख भोगत होती.

मार्कण्डेय ऋषिनी विचारले १४ इन्द्र देखिल मेल्यानंतर तुम्ही काय कराल? उर्वशीने सांगितले की ती पुन्हा मृत्य लोकी (पृथ्वीलोकाला म्हणजेच मनुष्य लोक म्हणजेच मृत्युलोक म्हणतात) गाढवीण होईन व जितके इन्द्र माझे पति झाले असतील ते देखिल पृथ्वीवर गाढवाची योनी प्राप्त करतील.

मार्कण्डेय ऋषि म्हणाले मग जिथे राजा गाढव होईल आणि राणीला गाढवीची योनी प्राप्त करणार आहे अशा लोकात तुम्ही मला कशासाठी घेऊन जात आहात? उर्वशी म्हणाली की माझी प्रतिष्ठा (अब्रू) वाचविण्यासाठी असे करत आहे नाहीतर मी हार पत्करली असे ते म्हणतील.

मार्कण्डेय ऋषि म्हणाले गाढवीची कसली आली आहे प्रतिष्ठा? तू वर्तमानात देखिल गाढवीच आहेत कारण तु १४ इद्र संपवशील आणि मृत्युनंतर मी गाढवी होणार आहे, हे तू स्वतःच मान्य करीत आहेस. गाढवीची कसली आली आहे अब्रू? तेवढ्यात इन्द्र तिथे आले. नियमानुसार आपले इन्द्राचे राज्य मार्कण्डेय ऋषींना देण्यासाठी ते आले होते. म्हणाले ऋषि जी मी हारलो आणि तुम्ही जिंकलात. तुम्ही इन्द्र पदवीचा स्वीकार करावा. मार्कण्डेय ऋषि म्हणाले अरे–अरे इन्द्र! इन्द्र ही पदवी मला काहीही उपयोगाची नाही. माझ्यासाठी ते कावळ्याच्या (काग) विष्ठे सारखे आहे. मार्कण्डेय ऋषिनी इन्द्राला पुन्हा म्हणाले मी त्यांनी सांगीतल्यानुसार साधना करण्यास सांगितले आणि हे इन्द्रलोकाचे राज्य सोडून दे, तुला मी ब्रह्मलोकात घेउन जाईन असे आशवासन दिले. इन्द्र म्हणाला हे ऋषि जी! आता तर मला मौजमजा करु दे. नंतर कधीतरी विचार करीन.

श्रोतेहो! विचार करा :– इन्द्राला हे माहित आहे की मृत्यु झाल्यावर गाढवाची योनी प्राप्त होणार आहे, हे ज्ञात असून देखिल तो क्षणिक सुखाचा त्याग करण्यास तयार नाही. नंतर कधीतरी पाहीन म्हणतो. नंतर कधी पाहणार? गाढव झाल्यावर कुंभार तुझ्याकडे पाहिल किती वजन गाढवाच्या पाठीवर द्यायचे ते? कुठे त्याला काठी मारायची? त्याच प्रकारे या

पृथ्वीवर कोणी छोट्या-छोट्या तूकड़याचा पंतप्रधान, मंत्री, किंवा राज्याचा मुख्यमंत्री किंवा मंत्री बनतो किंवा कोणत्यातरी पदावर सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी होतो किंवा मालक होतो. त्यांना सांगितले जाते की तुम्ही भक्ति करा नाहीतर तुम्ही गाढव व्हाल. ते एक तर नाराज होतात. नाहीतर म्हणतात आम्ही का गाढव व्हायचे? पुन्हा असे म्हणू नका. काही शहाणे असतात, ते म्हणतात कोणी पाहिलंय, गाढव होतो का? त्यांना सांगतील संत आणि ग्रंथ तसे सांगतात. बहुतांशी म्हणतात बघू काय होईल ते.

त्यांना नम्र विनंती आहे की मृत्युनंतर गाढव झाल्यावर तुम्ही काय बघणार, नंतर तर तुमच्याशी कसे वागायचे हे कुंभार पाहिल. पाहायचाच असेल तर वर्तमान पहा. निंदा सोडून शास्त्रानुकूल साधना करा जी वर्तमान काळी फक्त माझ्याजवळच (रामपाल दास) आहे ती ग्रहण करून आपल्या जीवाचे कल्याण करा.

वर लिहिलेल्या वाणी नं. ३ मध्ये असे सांगितले आहे की इन्द्र-कुबेर आणि ईश ही पदवी प्राप्त करणाऱ्या आणि ब्रह्मा जी आणि वरूण, धर्मराज ही पदे प्राप्त करून विष्णु लोक प्राप्त करून देवपद प्राप्त करणार्यांना देखिल जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकून पडावे लागते.

स्वर्ग लोकात ३३ करोड़ देव पद असतात. जसे भारताच्या संसदेत ५४० खासदारांची पदे आहेत. व्यक्ति बदलत राहते. त्याच खासदारांमधून पंतप्रधान व अन्य केन्द्रीय मंत्री इत्यादी-इत्यादी होत असतात.

त्याच प्रकारे त्याच ३३ करोड़ देवतामधूनच कुबेराचे म्हणजेच धनाच्या देवतेचे पद प्राप्त होते. कुबेर म्हणजे देवांचे अर्थमंत्री असतात. ईश पदवीचा अर्थ आहे परमात्मा पद आणि लोक परंपरेप्रमाणे मृत्युलोकात ते एकूण तीन मानले गेले आहेत :- १. श्री ब्रह्मा जी, २. श्री विष्णु तसेच ३. श्री शिव.

वरूणदेव जल देवता आहे. धर्मराज मुख्य न्यायधीश आहेत व ते सर्व जीवाना त्यांच्या कर्माचे फळ देतात त्याला धर्मराज सुध्दा म्हणतात हे सर्व काल ब्रह्मची साधना करून पद प्राप्त करतात. पुण्य क्षीण (समाप्त) होताच सर्व देवता पदमुक्त होऊन पशु-पक्षी इत्यादी-इत्यादी ८४ लाख प्रकारच्या योनित टाकले जातात. पुन्हा नवीन ब्रह्मा जी, नवीन विष्णु जी आणि नवीन शिव जी या पदांवर विराजमान होतात.

या सर्व उपरोक्त देवता जन्मतात-मरतात. या अविनाशी नसतात. यांची ही स्थिति आपणास ''सृष्टि रचना'' प्रकरणात याच पुस्तकात स्पष्ट होईल की हे किती प्रभु आहेत? कोणाचे पुत्र आहेत तसेच यांची माताजी कोण आहे?

अन्य प्रमाण :- श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोठा टाईप फक्त हिन्दीमध्ये गीता प्रैस गोरखपुर यांचेकडून प्रकाशित) तिसऱ्या स्कंदात पान क्रमांक १२३ वर लिहिले आहे की तुम्ही शुद्ध स्वरूपा आहात, या सर्व जगताचा उद्गम तुमच्यापासून आहे. मी (विष्णु), ब्रह्मा व शिव आपल्या कृपेने विद्यमान आहोत. आमचा तर अविर्भाव म्हणजे जन्म व तिरोभव म्हणजे मृत्यु होत असतो. आपण प्रकृति देवी आहात.

भगवान शिव बोलले हे देवी! जर विष्णुच्या नंतर उत्पन्न होणारे ब्रह्मा जी आपल्या पासून उत्पन्न झाले असतील तर मी तमोगुणी लीला करणारा शिव आपले लेकरू नाही काय? म्हणजेच मला उत्पन्न करणाऱ्या आपणच आहात. आम्ही तर फक्त नियमित कार्यच करू शकतो म्हणजेच ज्याच्या प्रारब्धात जे लिहिले आहे, तेच फक्त आम्ही त्याला प्रदान करू शकतो. ना कमी ना जास्त करु शकत नाहीत.

वाचकहो! या श्री देवी पुराणातील उल्लेखावरून हे स्पष्ट झाले की श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी नाश पावणारे आहेत. यांच्या मातेचे नाव श्री देवी दुर्गा आहे. अधिक माहितीसाठी आपण ''सृष्टि रचना'' प्रकरण पाहावे. ते या पुस्तकाच्या पाठीमागे पान क्रमांक २३१ वर लिहिलेले आहे. या मुख्य देवता आहेत. अन्य देवता यांच्यापेक्षा निम्न स्तरावरील देव आहेत. हे सर्व जन्मतात–मृत्यु पावतात, हे अविनाशी राम नाहीत, हे अविनाशी परमात्मा नाहींत.

श्रीमद् भगवत गीता अध्याय १० श्लोक २ मध्ये लिहिले आहे की गीता ज्ञान दाता काल ब्रह्म ने म्हटले आहे की ''माझ्या उत्पत्ति बाबत देवता आणि महर्षिजन काहीच जाणत नाहीत कारण यांचे सर्वांचे आदि कारण मीच आहे म्हणजेच हे सर्व माझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत.''

गीता अध्याय ४ श्लोक ५ मध्ये गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुन! तुझे आणि माझे पुष्कळ जन्म झाले हे तू जाणत नाहीस, मी जाणतो. गीता अध्याय २ श्लोक १२ मध्ये देखिल स्पष्ट आहे की तू–मी तसेच सर्व राजे–सैन्य आधी देखिल जन्माला आले होते आणि पुढे देखिल जन्म घेणार आहेत.

गीता अध्याय १४ श्लोक ३ गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुन! माझी प्रकृति म्हणजेच दुर्गा तर गर्भ धारण करते, मी तिच्या गर्भात बीज स्थापित करतो ज्यापासून सर्व प्राण्याची उत्पत्ति होते.

गीता अध्याय १४ श्लोक ४ गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुन! नाना प्रकारच्या सर्व योनिमध्ये जितक्या शरीरधारी मूर्ति उत्पन्न होत असतात (महत्) प्रकृति तर त्यांच्या सर्वांचा गर्भ धारण करणारी माता आहे. (अहम् ब्रह्म) मी ब्रह्म बीज स्थापित करणारा पिता आहे.

गीता अध्याय १४ श्लोक ५ :– गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे स्पष्ठ म्हटले आहे की हे अर्जुन! सत्वगुण श्री विष्णु जी, रजगुण श्री ब्रह्मा जी आणि तमगुण श्री शिव जी, हे प्रकृति म्हणजेच दुर्गा देवी पासून उत्पन्न तिन्ही देवता म्हणजेच तिन्ही गुण अविनाशी जीवात्म्याला कर्मानुसार शरीरात बांधून ठेवतात.

उपरोलेखित प्रमाणांवरून हे स्पष्ट झाले की उपरोक्त देवता नाशवान आहेत आणि काल ब्रह्मचेच अपत्य आहेत.

संदर्भ सुरु आहे वाणी सँख्या ३ चा सरलार्थ :–

इन्द्र, कुबेर, ईश म्हणजेच ब्रह्मा, विष्णु, शिव पर्यंत पदवी प्राप्त करून आणि वरूण, धर्मराय ही पदवी आणि श्री विष्णुनाथ लोक प्राप्त करून देखिल जन्म–मरणाच्या फेऱ्यात फिरत राहतात.

❖ मार्कण्डेय ऋषि ब्रह्मची साधना करत होते आणि तिलाच सर्वोत्तम समजत होते. त्यामुळेच ते इन्द्राला ब्रह्मच्या साधनेचे ज्ञान करवून देतो म्हणत होते. ब्रह्मलोकच्या तुलनेत स्वर्गाचे राज्य म्हणजे हलव्याच्या तुलनेत जणू कावळ्याची विष्ठा आहे.

वाचकहो! आपण ब्रह्म साधना करणाऱ्या श्री चुणक ऋषि, श्री दुर्वासा ऋषि आणि कपिल मुनि यांच्या ब्रह्म साधनेचे वर्णन करताना गीता ज्ञान दात्याने अध्याय ७ श्लोक १८ मध्ये तिला निकृष्ट दर्जाची असल्याचे वर्णन केले आहे. मार्कण्डेय ऋषिची साधना त्याच दर्जाची

**होती आणि ते तिला उत्तम समजत होते. आणि इन्द्राने देखिल ही ब्रह्म साधना करावी असे मत व्यक्त करीत होते.**

**सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-**

औरों पंथ बतावहीं, आप न जाने राह।।१
मोती मुक्ता दर्शत नाहीं, यह जग है सब अन्ध रे।
दिखत के तो नैन चिसम हैं, फिरा मोतिया बिन्द रे।।२
वेद पढ़ें पर भेद ना जानें, बांचे पुराण अठारा।
पत्थर की पूजा करें, भूले सिरजनहारा।।३

**वाणी नं. १ चा भावार्थ :- दुसऱ्यांना मार्गदर्शन करतात पण, स्वत:ला भक्ति मार्गाचे ज्ञान नसते.**

**वाणी नं. २ का भावार्थ :- तत्वदर्शी संतांच्या अभावामुळे मोती मुक्ता म्हणजेच मोक्ष रूपी मोती म्हणजेच मोक्ष मंत्र दिसत नाही. हे सर्व संसार अध्यात्म ज्ञान डोळे नसलेल्या आंधळ्यासारखे आहे. ज्याला मोतीबिंदू झालेला असतो, त्याचे डोळे अगदी उत्तम भासत असतात पण त्या रोगाने ग्रस्त असलेल्या व्यक्तिला काहीही दिसत नाही. हे उदाहरण देऊन पुढे म्हणतात. संस्कृत भाषा फराटेदार बोलत असल्यामुळे मोठे विद्वान भासतात, पण सदग्रथांमधील गुह्य रहस्य जाणत नाहीत. यांना अज्ञान रूपी मोतिबिंदू झाला आहे.**

**वाणी नं. ३ चा भावार्थ :- वेदांचा अभ्यास करून तोंडपाठ करणारे वेदांमधील गुह्य रहस्ये समजून न घेता त्यांच्या विपरीत साधना करतात-करवून घेतात. वेदांमध्ये दगडाच्या मूर्तीची पूजा करण्याबाबत उल्लेख नाही आहे, पण वेदांचे विद्वान म्हणवून घेणारे दगडाच्या मूर्तीची पूजा करतात आणि करवून घेतात. वेदांत वर्णन केल्यानुसार निर्मात्याचा विसर पाडला.**

**श्रीमद् भगवत गीता अध्याय ४ श्लोक २५ ते २९ मध्ये देखिल हेच सांगितले आहे की जो साधक जशी साधना करीत असतो, तिला उत्तमच समजत असतो, सर्व साधक आपली-आपली भक्ति पाप नाश करणारी असल्याचेच मानतात.**

**गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये स्पष्ट केले आहे की यज्ञों म्हणजेच धार्मिक अनुष्ठानाचे सर्व विधींचे ज्ञान स्वतः सच्चिदानन्द घन ब्रह्मने आपल्या मुखातून बोललेल्या वचनाने विस्तारपूर्वक सांगितले आहे व ते तत्वज्ञान आहे. त्याचे ज्ञान करवून घेऊन साधक सर्व पापांपासून मुक्त होतो.**

**गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये स्पष्ट केले आहे की तत्वदर्शी संत ते तत्वज्ञान जाणतात, त्यांना दंण्डवत प्रणाम करुन आणि त्यांना नम्रपणे शरण जाऊन प्रश्न केल्यास ते तत्वज्ञान जाणणारे ज्ञानी महात्मे तुला त्या तत्वज्ञानाचा उपदेश करतील.**

**वरील वाणीमध्ये ज्या तत्वज्ञानाला निर्गुण रासा म्हटले आहे, ते न मिळाल्याने सर्व साधक जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकले आहेत.**

**मार्कण्डेय ऋषि ब्रह्म साधना करत होते. श्रीमद् भगवत गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्मलोकात गेलेले साधक देखिल पुनरावर्ती म्हणजेच वारंवार जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकले आहेत.**

पूर्व शब्द की वाणी सँख्या ४ = असंख जन्म तोहे मरतां होगे, जीवित क्यों न मरै रे।

द्वादश मध्य महल मठ बोरे, बहुर न देह धरै रे।।

सरलार्थ :- हे मानव! तू अनेकवेळा जन्मला आणि मृत्यु पावला आहेस. सत्य साधना करून जिवंतपणी मर. जीवंत मरण्याचा भावार्थ असा की साधकाला या जगातील प्रत्येक वस्तू नश्वर असल्याचे ज्ञान होते. हे शरीर देखिल शाश्वत नाही आहे. जन्म-मृत्युचा भयंकर रोग आहे. या जगात दुःखाच्या व्यतिरिक्त काहीही नाही. मानव शरीर प्राप्त करून मोक्ष प्राप्त केला नाही तर पशु सारखेच जीवन जगलास. जसे गीता अध्याय ७ श्लोक २९ मध्ये म्हटले आहे की जो साधक केवळ जरा म्हणजेच वृद्धावस्थेत कष्ट आणि मरण यांच्या दुःखाचे मुक्तिसाठी साधनारत राहतात, ते तत् ब्रह्म आणि संपुर्ण परमार्थ व कर्म जाणत असतात.

अशा प्रकारे तत्वज्ञान प्राप्त झाल्यानंतर मानवाला अनावश्यक वस्तुंची इच्छा होत नाहीं. तम्बांखु, दारू-मांसाहार सेवन करत नाही. नाच-गाणे हे मूर्ख लोकांचे काम वाटू लागते. जसे भोजन मिळेल, त्यातच संतुष्ट रहतात.

❖ आत्म कल्याण होण्यासाठी साधक विचार करतो की जर मी सत्संगात आलो नाही तर गुरूजीचे दर्शन घेऊ शकणार नाही आणि सत्संगातील विचार न ऐकल्याने मन पुन्हा विकारात अडकेल. तो साधक सर्व कामे सोडून सत्संग ऐकण्यास येतो. तो विचार करतो की आम्ही रोज ऐकतो आणि पाहतो की लहान-लहान बालकांना सोडून बाप जग सोडून जातो, मृत्यु पावतो. मोठ-मोठे भांडवलदार अपघातात मरण पावतात. आयुष्यभर जी संपत्ती प्राप्त केली होती, ती सोडून जावे लागते आणि त्या संपत्तीचा सांभाळ करण्यासाठी परत येऊ शकत नाहीत. मृत्यु पूर्वी एक दिवस देखिल काम सोडण्यास मन तयार व्हायचे नाही, आता कामापासून कायमची सुटका झाली.

## ''आज बंधू निवांत आहे''

एक साधक सत्संगात जाऊ लागला. अनुग्रह घेतला आणि ज्ञान ऐकून भक्ति करू लागला. आपल्या मित्राला देखिल त्याने सत्संगात येण्याची आणि भक्ती करण्याची विनंती केली. परंतु मित्राने ऐकले नाही. म्हणाला कामामुळे फुरसत (मोकळा वेळ) नाही. छोटी-छोटी मुले आहेत. त्यांचे पालन-पोषण देखिल करायचे आहे. काम सोडून सत्संगात जाऊ लागलो तर सारा धंदा चौपट होईल.

हा सत्संगात जाणारा भक्त जेंव्हा देखिल सत्संगात येण्यासाठी आपल्या मित्राला म्हणायचा तेव्हा तो हेच सांगायचा आता कामामुळे फुरसत नाही आहे. एक वर्षानंतर त्या मित्राचा मृत्यु झाला. त्याचे पार्थिव उचलून कुटुंबातील लोक आणि नगरवासी गेले. सोबत गावाच्या गल्ल्यांमधील शेकड़ों व्यक्ति देखिल बरोबर चालत होते. सर्व जण राम नाम सत् आहे, सत् बोले गत् आहे असे म्हणत होते.

भक्त म्हणत होता राम नाम तो सत् आहे परंतु आज बंधूला फुर्सत आहे. नगरवासी म्हणत होते सत् बोले गत् आहे, भक्त म्हणत होता आज बंधूला फुर्सत आहे. अन्य लोक त्या भक्ताला सांगू लागले असे म्हणू नको, त्याच्या घरातील लोकांना वाईट वाटेल. भक्त म्हटला मी तर असेच म्हणणार. मी या मूर्खाला हात जोडून विनंती करीत होतो की सत्संगात चल, काही भक्ति कर. हा म्हणायचा आता फुर्सत म्हणजेच रिकामा वेळ नाही आहे. आज याला कायमची फुर्सत आहे. ज्यांच्या पालन-पोषणाचा बहाणा करून परमात्मापासून लांब राहिला त्या छोट्या-छोट्या मुलांना देखिल सोडून चालला आहे. भक्ति करत असता तर रिकाम्या हाताने तरी गेला नसता.काही भक्ति धन घेऊन गेला असता तर मुलांचे पालन-पोषण परमात्मा करत असतो.

भक्ति करण्याने साधकाचे आयुष्य देखिल परमात्मा वाढवतो. भक्तजन असा विचार करूनच भक्ति करतात आणि काम सोडून सत्संगात श्रवण करायला जातात.

भक्त विचार करतात की परमात्मा आमचा मृत्यु लवकर न आणो, मग आमची कामे कोण करणार? आम्ही असे समजून चालतो की आमचा मृत्यु झाला. आम्ही तीन दिवस मृत्यु पावलो असा विचार करून सत्संगात जातो. स्वत:ला मृत मानून सत्संगात जाणे तसे तर त्या परमात्माच्या भक्तांचे काम कधीच बिघड़त नाही, तरीही प्रत्यक्षात आम्ही असे समजून चालतो की आमच्या गैर-हजेरीत काही काम खराब झाल्यास तीन दिवसांनी जाऊन ते ठीकठाक करू. पण प्रत्यक्षात जर वरचे तिकीट कापल्यास म्हणजेच मृत्यु झाल्यास काम कायमस्वरूपी बिघडते. मग पुन्हा ते ठीक करण्यासाठी आपण येऊच शकत नाही. अशा स्थितीला जिवंतपणी मरणे म्हणतात.

**वाणीचा उर्वरित सरलार्थ :-** द्वादश मध्य महल मठ बौरे, बहुर न देहि धरै रे।

सरलार्थ :- श्रीमद् भगवत गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्वज्ञानाच्या प्राप्ति नंतर परमेश्वराच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे, जिथे एकदा पोहोचल्यानंतर साधक या मृत्युलोकात परत येत नाहीत म्हणजेच त्यांचा पुनर्जन्म होत नाही. ते पुन्हा देह धारण करीत नाहीत. सूक्ष्मवेदाची ही वाणी हेच स्पष्ट करीत आहे की द्वादश म्हणजेच १२ वें द्वार पार करूनच त्या परम धाममध्ये पोहोचवायचे असते. आजपर्यंत सर्व ऋषि-महर्षि, संत, मंडलेश्वर केवळ १० द्वारचा सांगत होते. परंतु परमेश्वर कबीर जी यांनी आपले स्थान प्राप्त करण्यासाठीचा सत्यमार्ग, सत्य स्थान स्वतःच सांगितले आहे. त्यांनी १२वे द्वार सांगितले आहे. यावरून हेच स्पष्ट होते की आज पर्यंत (सन् २०१२ पर्यंत) पूर्वीचे सर्व ऋषि, संत, पंथ यांची भक्ति काल ब्रह्म पर्यंतच होती. त्यामुळेच जन्म-मृत्युचे चक्र सुरु राहिले.

**वाणी सँख्या ५ :-** दोजख बहिश्त सभी तै देखे, राजपाट के रसिया।
तीन लोक से तृप्त नाहीं, यह मन भोगी खसिया।।

सरलार्थ :- तत्वज्ञानाचा अभाव असल्याने पूर्णमोक्षाचा मार्ग न मिळाल्याने कधी कधी दोजख म्हणजेच नरकात गेले, कधी बहिश्त म्हणजेच स्वर्गात गेले कधी राजा होऊन आनंद घेतला. या मनुष्याला तीनही लोकाचे राज्य जरी दिले तरीही त्याची कधीही तृप्ति होणार नाहीं.

उदाहरण :- जर कोणी गावचा सरपंच बनला तर त्याची इच्छा असते की आमदार होऊन मजा करता येईल. आमदार इच्छा करतो की मंत्री बनलो तर काही वेगळी गोष्ट होईल. मंत्री बनून इच्छा होते की मुख्यमंत्री बनलो तर पूर्ण चैन करता येईल. होणारा आनंद देखिल न्याराच असेल. साऱ्या प्रान्तावर हुकुमत चालेल. मुख्यमंत्री बनून प्रबल इच्छा होते की पंतप्रधान बनलो तर जीवन सार्थकी लागेल. पण तोपर्यंत जीवन लीला समाप्त होऊन जाते. मग गाढव होऊन कुंभाराच्या लाठ्या (डण्डे) खात असेल. त्यासाठीच तत्वज्ञानात असे सांगितले आहे की काल ब्रह्म द्वारा बनविलेली स्वर्ग-नरक आणि राज्य प्राप्तिच्या भूल-भुलैया मध्ये सारे जीवन व्यर्थ घालवले. कुठेही समाधान मिळाले नाही, हे मन म्हणजे असा खुसरा (हिजड़ा) आहे.

एक अब्राहिम सुल्तान अधम नावाचा ईराक देशातील बलख शहराचा राजा होता. तो पूर्व जन्मी अतिशय चांगला भक्त होता. परंतु वर्तमानात ऐश्वर्याची मस्ती चढल्यामुळे परमात्माला विसरला होता. राजथाट आणि महालांच्या आनंदात मग्न होऊन बसला होता. एक दिवस परमात्मा सत्यलोकातून येऊन एका यात्रेकारुचे रूप घेऊन राजाच्या महालात गेले आणि

म्हणाले हे धर्मशाळावाल्या! एक खोली भाड्याने दे, पैसे किती ते सांग, रात्र काढायची आहे. राजा म्हणाला हे भल्या गृहस्था! आपणास ही धर्मशाळा (सराय) दिसते आहे काय मी राजा आहे आणि हा माझा महाल आहे. यात्रेकरूच्या रूपातील परमात्माने विचारले आपणा पूर्वी या महालात कोण राहत होते राजाने सांगितले की माझे वडिल, आजोबा पणजोबा राहत होते. यात्रेकरूच्या रूपातील परमात्माने विचारले आपण अजून किती दिवस या महालात रहाल? राजाने सांगितले एक दिवस मी पण हे सोडून निघून जाणार. परमेश्वराने म्हटले की मग ही धर्मशाळा नाही तर काय आहे? ही धर्मशाळाच आहे. जसे तुझे बाप-आजोबा गेले तसेच तू देखिल जाणार आहेस. त्यामुळेच मी महालाचे वर्णन धर्मशाळा असे केले आहे. राजाला वास्तवाचे ज्ञान झाले. जगताची इच्छा त्यागून आत्म-कल्याण करवृन घेतले. सदा राहणारा आनंद व सुख व अमर जीवन प्राप्त करण्यासाठी अनुग्रह घेतला व आजीवन भक्ति करून आपल्या मानव जीवनाचे सार्थक केले.

**वाणी सँख्या ६:-** सतगुरू मिलैं तो इच्छा मेटैं, पद मिल पदे समाना।
चल हंसा उस लोक पठाऊँ, जो आदि अमर अस्थाना।।

**सरलार्थ :- जर तत्वदर्शी संत सतगुरु मिळाले तर उपरोक्त ज्ञान सांगून काल ब्रह्म लोकातील सर्व वस्तु व पदांची इच्छा समाप्त करून ''पद मिल पदे समाना'' यामध्ये एका ''पदाचा'' अर्थ आहे पद्धति म्हणजेच शास्त्राविधिनुसार साधना. दूसऱ्या ''पदाचा'' अर्थ आहे ''परम पद'' म्हणजेच ''पदवी.'' सतगुरु शास्त्राविधि अनुसार पद्धत सांगून परमेश्वराच्या त्या परम पदाची प्राप्ति करून देतात जिथे पोहोचल्यावर साधकाला पुन्हा फिरून मृत्युलोकात यावे लागत नाही. हे भक्त! चल तुला अशा लोकात पाठवतो जिथे सनातन अमर शाश्वतस्थान असते म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये वर्णन केलेले सनातन परम धाम आहे आणि तिथे परम शांति आहे.**

**वाणी सँख्या ७ :-** चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी।
दास गरीब अभय पद परसै, मिले राम अविनाशी।।

**सरलार्थ :- त्या सनातन परम धामी परम शान्ति आणि अत्यधिक सुख आहे. काल ब्रह्म लोकात चार मुक्ति मानल्या जातात व त्या प्राप्त करून साधक स्वतःला धन्य समजतो. परंतु त्या शाश्वत नसतात. काही कालावधी नंतर पुण्य समाप्त होते आणि पुन्हा ८४ लाख प्रकारच्या योनिंमध्ये कष्ट उपसतात. परंतु त्या सत्यलोकात चारही मुक्तिचे सुख सदासर्वदा असते. माया आपल्या पायाची दासी होऊन राहते.**

**संत गरीबदास जी ने सांगितले आहे की अमर लोकात गेल्यानंतर प्राणी निर्भय होऊन जातो आणि त्या सनातन परम धामी तो अविनाशी राम म्हणजेच परमेश्वर प्राप्त होईल. त्यासाठी शास्त्रानुकूल भक्ति केल्यास पूर्ण मोक्ष मिळतो. ज्यामुळे त्या परमेश्वरापर्यंत पोहोचता येते.**

**उपरोक्त वाणी आणि पूर्वोक्त विवरणावरून हे स्पष्ट झाले की श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी आणि यांचे वडिल काल ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूष व अक्षर पुरूष सर्व राम म्हणजेच प्रभु नश्वर आहेत. केवल परम अक्षर ब्रह्म हेच अविनाशी राम म्हणजेच परमात्मा आहेत. या परमेश्वराची भक्ति करुनच परमशांति आणि सनातन परम धाम म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्त होइल जिथे चारही मुक्तिचे सुख सदासर्वदा असेल माया म्हणजेच सर्व सुख-सुविधांसह साधकाच्या नोकरासारखी हात जोडून हजर असते. सूक्ष्मवेदात लिहिले आहे की :-**

कबीर, माया दासी संत की, उभय दे आशीष।
विलसी और लातों छड़ी, सुमर–सुमर जगदीश।।

**भावार्थ :– सर्व सुख–सुविधा धनाने प्राप्त होत असतात. शास्त्राविधि अनुसार भक्ति करणाऱ्या संत–भक्तांचा धन प्राप्त करण्याचा उद्देश नसतो पण तरीदेखिल एक By Product म्हणून ते मिळतेच. जसे एखाद्याने गहू पेरण्याचा उद्ददेश हा गव्हाचे अन्न प्राप्त करण्याचा असतो. परंतु भुसा म्हणजेच चारा देखिल अवश्य प्राप्त होतो. चारा, हा भुसा गव्हाचे By Product आहे. त्याच प्रकारे सत्य साधना करणारयाला धन मायारूपात मिळत असते. साधक ती भोगतो, त्याच्या चरणी ती पड़लेली असते म्हणजेच धनाचा अभाव नसतो पण दुसरीकडे ते आवश्यकते पेक्षा अधिक प्राप्त होत राहते. परमेश्वराची भक्ति करून मायेचा आनंद देखिल भक्त, संत प्राप्त करतात व पूर्ण मोक्ष देखिल प्राप्त करतात.**

**❖ त्याच प्रसंगाचा विचार पुढे नेऊ कि मानव शरीर प्राप्त प्राण्याने आपले उद्दिष्ट लक्षात ठेवले पाहिजे. भक्ति करुन आपले कल्याण करून घेतले पाहिजे. सूक्ष्म वेदात लिहिले आहे की :– (राग आसावरी शब्द नं. ७१)**

यह सौदा फिर नाहीं सन्तो, यह सौदा फिर नाहीं।
लोहे जैसा ताव जात है, काया देह सराही।।
तीन लोक और भुवन चतुर्दश, सब जग सौदे आहीं।
दुगने–तिगुने किए चौगुने, किन्हूँ मूल गवाहीं।।

**भावार्थ :– जसे दोन व्यापारी (Businessmen) दूर कोणत्यातरी एका शहरात सौदा करण्यास गेले आणि ५–५ लाख रूपये भांडवल घेऊन गेले. एकाने आपल्या धनाचा सदुपयोग केला. धर्मशाळा किंवा होटेलात खोली भाड्याने घेऊन सामान खरेदी केले आणि जास्त भावात विकले. त्यामुळे त्याने २० लाख रूपये जास्त कमावले. दोन वर्षात परत आपल्या घरी आला. सगळीकडे प्रसंशा झाली आणि श्रीमंत झाला.**

**दूसऱ्याने देखिल होटेलात किंवा धर्मशाळेमध्ये खोली भाड्याने घेऊन दारू पिऊ लागला, वेश्यांचे नृत्य पाहणे, खाणे आणि झोपणे. त्याने आपले मूळ भांडवलाचे ५ लाख रूपये खर्चून टाकले आणि कर्जबाजारी होऊन घरी आला. ज्याच्याकडून ५ लाख रूपये उसने घेऊन गेला होता त्याने त्याची रक्कम परत मागीतली. पण देऊ न शकल्यामुळे, त्याला स्वतःच्या घरी मजूर म्हणून ठेऊन आपले ५ लाख रक्कम वसूल केली. उपरोक्त वाणीचे तात्पर्य एवढेच की तीन लोकांमध्ये (स्वर्ग लोक, पाताल लोक आणि पृथ्वी लोक) जितके प्राणी आहेत, ते सर्व आपल्या राम–नामाचा सौदा करण्यासाठी आले आहेत. कोणी दुप्पट, तर कोणी तिप्पट, चौपट असे कमाविले म्हणजेच संतांकडून अनुग्रह घेऊन मनुष्य जीवनाचे मुळचे भांडवल असलेले श्वांसांचे मूळ धन भक्ति करून वाढविले. ज्या अन्य व्यक्तिनी भक्ति केली नाही या शास्त्रविधिचा त्याग करून मनाला वाटेल तसे आचरण करतात किंवा अधिकार नसलेल्या गुरू कडून अनुग्रह घेऊन भक्ति करतात, त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. हे पवित्र गीता अध्याय १६ श्लोक २३–२४ मध्ये प्रमाण आहे. याच कारणामुळे त्याने देखिल आपल्या मनुष्य जीवनाचे श्वांस रूपी भांडवल सत्य भक्ति शिवाय नष्ट करून टाकले.**

## ❖ भक्ति न केल्याने होणाऱ्या नुकसानाचे अन्य विवरण :

**(शब्द क्र. ७१ चा उर्वरित)**

यह दम टूटै पिण्डा फूटै, हो लेखा दरगाह मांही।
उस दरगाह में मार पड़ैगी, जम पकड़ेंगे बांही।।
नर-नारायण देहि पाय कर, फेर चौरासी जांही।
उस दिन की मोहे डरनी लागे, लज्जा रह के नांही।।
जा सतगुरू की मैं बलिहारी, जो जामण मरण मिटाहीं।
कुल परिवार तेरा कुटम्ब कबीला, मसलित एक ठहराहीं।
बाँध पींजरी आगै धर लिया, मरघट कूँ ले जाहीं।।
अग्नि लगा दिया जब लम्बा, फूंक दिया उस ठाहीं।
पुराण उठा फिर पण्डित आए, पीछे गरूड पढाहीं।।

**भावार्थ :- हा दम म्हणजेच श्वास ज्या दिवशी संपेल, त्याच दिवशी हे शरीर रुपी पिंड सुटेल. मग परमात्माच्या दरबारात पाप-पुण्याचा हिशोब होईल. भक्ति न करणाऱ्या किंवा शास्त्राविरूद्ध भक्ति करणाऱ्याला यमाचे दूत दंडांना पकडून घेऊन जातील, मग भले तो कोण्या देशाचा राजा का असेना, मग त्याची पिटाई होईल. संत गरीबदासांना परमेश्वराची प्राप्ति परमेश्वर कबीरांकडून झाली होती. त्यांच्या आत्म्याला ते वर घेऊन गेले होते. सर्व ब्रह्माण्डांचे दर्शन घडवून व संपुर्ण अध्यात्म ज्ञान समजावून परत शरीरात सोडले होते. संत गरीब दास जी हे आँखों देखा हाल सांगत आहेत की :- हे मानव! तुला जे नर शरीर मिळाले आहे ते नारायण म्हणजेच परमात्माच्या शरीरा सारखेच आहे म्हणजेच त्यांचेच स्वरूप आहे. अन्य प्राण्याना हे सुदंर शरीर मिळलेले नाहीं. हे प्राप्त झाल्यानंतर मानवाने जन्मभर परमात्माची भक्ति केली पाहिजे. असे परमात्मा स्वरूप शरीर प्राप्त करूनही सत्य भक्ति न केल्यामुळे पुन:पुन्हा चौऱ्याशी लाख योनीच्या चक्रात फिरत राहतोस. धिक्कार असो तुझ्या मानव जीवनाचा! मला तर त्या दिवसांची चिन्ता लागली आहे आणि भीती याची वाटते की कुठे भक्ति कमी पडून त्या परमात्माच्या दरबारात आपली काही अब्रू राहील की नाही. मला तर भक्ति करता-करता देखिल भीती वाटते की माझी भक्ति कुठे कमी तर पडणार नाही. आपण तर भक्तिच करीत नाही. जरी करत असलात, तरी ती शास्त्राविरूद्ध करीत आहात. तुमची अतिशय वाईट अवस्था होईल आणि मला तर असे वाटते की तुम्ही असा गुरु शोधा जो तुमचे जन्म मरणाचे जुनाट रोगापासून तुम्हाला मुक्ती देईल. जे खरी भक्ति करीत नाहींत, त्यांचे मृत्यु पश्चात् काय हाल होतात. आस-पास चे कुटुंबातील लोक एकत्र होतात आणि मग सगळ्यांचा एकाच मसलत म्हणजे विचार ठरतो-याला उचला. (उचलून स्मशान घाटावर नेऊन जाळून टाका. लाठीने किंवा काठीने (ठोकर) मारून मारून छाती फोडतात. संपुर्ण शरीर जाळून टाकतात. खिशात जे काही असेल, ते काढून घेतात. मग शास्त्रविधिचा त्याग करून मनाला येईल तसे आचरण करणाऱ्या त्या जगातून निघून गेलेल्या जीवाच्या कल्याणासाठी गुरु गरूड पुराणाचे पारायण करतात.)**

**तत्वज्ञान (सूक्ष्मवेद) असे सांगते की आपले मानवी जीवन पूर्ण करून तो जीव निघून गेला. परमात्माच्या दरबारात त्याचा हिशोब होईल. तो कर्मानुसार कुठे गाढव-कुत्रा होणाऱ्या रांगेत उभा राहील. मृत्यु पश्चात् केलेल्या गरूड पुराणाच्या पारायणाचा त्याला काय लाभ होणार? हे शास्त्राविरूद्ध होत असलेले व्यर्थ क्रियाक्रम आहे. त्या प्राण्याने मनुष्य शरीर धारण**

केले असताना त्याला परमात्माच्या भक्तिचे ज्ञान करून द्यायला पाहिजे होते. त्यायोगे भले–बुरे समजून घेऊन त्याने आपले मानव जीवन सफल केले असते.

प्रेत शिला पर जाय विराजे, फिर पितरों पिण्ड भराहीं।
बहुर श्राद्ध खान कूं आया, काग भये कलि माहीं।।

भावार्थ :– असा की मृत्यु नंतर त्या जीवाच्या कल्याणासाठी म्हणजेच त्याला गती प्राप्त होण्यासाठी शास्त्राविरूद्ध केलेली सर्व क्रियाकर्मे व्यर्थ आहेत म्हणजेच त्याला गती प्राप्त होण्यासाठी गरूड पुराणाचे पारायण करविले, त्या मरणाराची गती म्हणजेच मोक्ष होण्यासाठी त्याच्या अस्थी गंगेमध्ये सोडून दिल्या. त्याची गती (मोक्ष) होण्यासाठी मग तेराव्या आणि सतराव्या दिवशी होमहवन आणि भण्डारा केला, आधी मासिक श्राद्ध आणि नंतर सहा महिन्यांनी छःमाही क्रिया करायची, मग वार्षिक श्राद्ध करायचे, श्राद्धाच्या दिवशी पुरोहित भोजन स्वतः बनवून सांगतात की भोजनाचा काही भाग घराच्या छतावर ठेवा म्हणजे जर आपले वडिलांना कावळ्याची गती प्राप्त झाली असल्यास तो भोजन करून जाईल. कावळ्याने भोजन खाल्ल्यावर म्हणतात तुमचे जे आई किंवा वडिलांचा मृत्यु झाला त्यांच्यासाठी ही सर्व क्रिया आणि श्राद्धे केली गेली. जो कावळा झाला त्याचे श्राद्ध सफळ झाले. उपरोक्त विवरणावरून हे स्पष्ट होते की ज्या व्यक्तिचे उपरोक्त क्रियाकर्म केले होते, तो कावळा झाला आहे.

श्राद्ध करणारे पुरोहित म्हणतात की श्राद्ध करण्यामुळे तो जीव एक वर्ष पर्यंत तृप्त होतो. मग एक वर्षानंतर परत श्राद्ध केले पाहिजे.

विचार करा :– जीवित असलेली कोणतीही व्यक्ति दिवसभरात तीन वेळा भोजन करतात. आता एक दिवस भोजन करून एक वर्षभर कशी काय तृप्त होउ शकेल? जरी दररोज छतावर भोजन ठेवले तरी तो कावळा रोजच भोजन करून जाणार.

दूसरी गोष्ट :– मृत्यु नंतर केलेल्या सर्व क्रिया गती (मोक्ष) मिळण्याच्या उद्देशाने केलेल्या होत्या. त्या ज्ञानहीन गुरूने शेवटी कावळा करूनच सोडले. ते प्रेत दगडावर प्रेत योनि भोगते आहे. मागून गुरू आणि कावळा मजेत जेवण करत आहेत. पिण्डदानाचा असा लाभ सांगितला आहे की प्रेत योनिमधून सुटका होते. एक वेळ समजून चालू. प्रेत योनि सुटली तरीदेखिल तो गाढव किंवा बैल झालाच ना मग त्याला कोणती गती मिळाली?

नर से फिर पशुवा कीजै, गधा, बैल बनाई।
छप्पन भोग कहाँ मन बौरे, कहीं कुरड़ी चरने जाई।।

भावार्थ :– मनुष्य जीवनात आम्ही किती उत्तमोत्तम म्हणजेच ५६ प्रकारची जेवणे जेवत असतो. भक्ति न केल्यामुळे किंवा शास्त्राविरूद्ध साधना केल्यामुळे गाढव बनेल, मग हे छप्पन प्रकारची भोजने कशी त्याला प्राप्त होणार, कुठे कुरणावर (रुडी) पोट भरण्यासाठी गवत खाण्यास जाईल. अशा प्रकारे बैल इत्यादी–इत्यादी पशुच्या योनित त्याला कष्टमय जीवन जगावे लागणार.

जै सतगुरू की संगत करते, सकल कर्म कटि जाईं।
अमर पुरि पर आसन होते, जहाँ धूप न छाँइ।।

भावार्थ :– संत गरीब दास हे परमेश्वर कबीर जी कडून प्राप्त सूक्ष्मवेदात पुढे म्हणतात की जरी सतगुरुना (तत्वदर्शी संत) शरण जाउन अनुग्रह घेतला असता तरीही उपरोक्त सर्व कर्मांचे कष्ट झाले नसते म्हणजेच न प्रेत, न गाढव, न बैल काहीच बनले नसते. अमरपुरी मध्ये

आसन मिळाले असते म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये वर्णन केल्यानुसार सनातन परम धाम प्राप्त झाले असते, परम शान्ति प्राप्त झाली असती. पुन्हा कधीही प्रपंचात परतून आले नसते म्हणजेच जन्म-मरणाचे कष्टदायक चक्र कायमचे संपले असते. त्या अमरलोकात (सत्यलोक) ऊन-सावली नाहीच आहे म्हणजेच जसे ऊन दुःखदायक असल्यामुळे सावली ची गरज भासते. त्या सत्यलोकात केवल सुखच आहे, दुःख नाहीच.

सुरत निरत मन पवन पयाना, शब्दै शब्द समाई।
गरीब दास गलतान महल में, मिले कबीर गोसांई।।

भावार्थ :- संत गरीबदास जी पुढे म्हणतात की मला परमेश्वर कबीर भेटले आहेत. मला सुरत-निरत, मन आणि श्वांस यावर लक्ष ठेवून नामस्मरण करण्याची प्रक्रिया सांगितली. या साधनेमुळे सतलोकामधून येणारी शब्द धुनि धरून सतलोकात गेलो. त्यामुळे सत्यलोकातील (शाश्वत स्थान) आपल्या महालात आनंदाने राहतो कारण परमेश्वर कबीर जींनी संत गरीब दासांना जी सत्य साधना सांगितली होती ते स्थान (सत्यलोक) गरीबदास जी परमेश्वरा सोबत जाऊन पाहून आले होते. त्यामुळेच की मी जी शास्त्रानुकूल साधना करतो आहे, ती परमात्माने सांगितली असल्याचे ते आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकले. ज्या शब्द म्हणजेच नामाचा मी जप करतो, त्यामुळे मी अवश्य पूर्ण मोक्ष प्राप्त करीन. याबाबत कोणताच संशय राहिलेला नाही. त्यामुळेच मी (गरीब दास) सत्यलोकामधील आपल्या महालात (विशाल घरात) जाईन, यामुळेच निश्चिन्त आणि निवांत (महल प्राप्तिच्या खुशीत मस्त) होईन. कारण मला पूर्ण गुरू स्वतः परमात्मा कबीर जी आपल्या लोकातून येऊन भेटले आहेत.

गरीब, अजब नगर में ले गए, हमको सतगुरू आन।
झिलके बिम्ब अगाध गति, सूते चादर तान।।

भावार्थ :- गरीबदास जी सांगतात की सतगुरु म्हणजेच स्वतः परमेश्वर कबीर जी आपल्या निज धाम असलेल्या सत्यलोकातून येऊन मला बरोबर घेऊन अजब (अद्‌भुत) नगरात म्हणजेच सत्यलोकात बनलेल्या शहरात घेऊन गेले. ते स्थान आपल्या डोळ्यांनी पाहून मी परमात्माने सांगितलेल्या मार्गावर चालत आहे. सत्यनाम, सारनाम यांची साधना करतो आहे. त्यामुळे निश्चिंत होऊन चादर ओढून निवांत झोपलो आहे म्हणजेच माझ्या मोक्षाबाबत कोणताही संदेह राहिलेला नाही.

चादर ताणून झोपणे=निश्‍चिंत होऊन राहणे. ज्याचे कोणतेही काम राहिलेले नाही आणि तो चादर ओढून निवांतपणे पडलेला असेल तर खेडेगावात म्हणतात हा चादर ताणून झोपला आहे. काय कोणतेच काम शिल्लक नाही? त्याच प्रकारे गरीबदास जी म्हणतात की आता मोठमोठे महाल बांधणे व्यर्थ वाटू लागले आहे. आता तर त्या सत्यलोकात जायचे आहे. तिथे मोठमोठ्या इमारती अगोदरच बांधलेल्या आहेत. ज्या सोडून आम्ही या मृत्युलोकात आलो आणि मोठी चूक केली. आता डाव टाकला आहे. सत्य भक्ति आणि तत्वज्ञान प्राप्त झाले आहे.

सज्जनहो! ते सत्य भक्ति वर्तमानात माझ्या (रामपाल दास जी) जवळ आहे. ज्यामुळे या दुःखाच्या घर संसारातुन पार होऊन ते परम शान्ति आणि शाश्वत स्थान (सनातन परम धाम) आपल्याला प्राप्त होते. या विषयी गीता अध्याय १८ श्लोक ६२ तसेच गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान प्राप्त करून त्या तत्वज्ञानाच्या आधारे अज्ञानाचा नाश करून, त्यानंतर परमात्माच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे.

तिथे पोहोचल्यावर साधक परत फिरून या संसारात कधीच येत नाही.

## ''भक्ति न केल्याने अती दुःख होईल''

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

यह संसार समझदा नाहीं, कहंदा शाम दुपहरे नूँ।
गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे नूँ।।

भावार्थ :- आध्यात्मिक ज्ञानाच्या अभावी परमात्माच्या करणीची जाणीव नसल्यामुळे हा प्राणी या दुःखाने भरलेल्या घर संसारात अतिशय कष्टात जीवन जगतो आहे आणि त्यालाच सुखाचे स्थान मानतो आहे.

जसे एक व्यक्ति जून महीन्यामध्ये दिवसा १२ किंवा १ वाजता, हरियाणा राज्यात दारू प्राशन करून तळपत्या उन्हात पडला आहे, घामाघूम झाला आहे आणि शरीर वाळूने माखले आहे. एका व्यक्ति ने म्हटले मित्रा! उठ, तुला झाडाखाली बसवतो, इथे तू उन्हात भाजून निघतो आहेस. दारुड्या म्हटला नाही मी बिल्कुल ठीक आहे, मजा येते आहे, काहीच कष्ट नाहीयेत.

❖ एक माणूस काही कारणाने कोर्टात गेला. तिथे त्याला एक त्याचा नातेवाईक भेटला. एकमेकांचे क्षेमकुशल विचारून दोघांनी हि म्हटले सर्व ठीक आहे, मजा आहे.

❖ एका माणसाचा एकुलता एक मुलगा अतिशय आजारी होता. त्याला रुग्णालयात P.G.I. दाखल केले होते. तो वाचण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. अशा स्थितीत माता-पित्यांची काय स्थिती होत असेल, हे सहज समजून येते. नातलग भेटायला आले, आणि विचारले कशी काय आहे मुलाची तब्बेत? वडिलांनी सांगितले वाचण्याची शक्यता कमीच आहे. नंतर क्षेम-कुशल विचारले तर वडील म्हणाले की सगळे मजेत आहे.

आपण विचार करा :- दारूच्या नशेत धुंद असलेला भर उन्हात इकडून निघत होता. तरी देखिल म्हणत होता मजा करतोय.

❖ कोर्ट दरबारी जे नातलग भेटले, दोघेही हेच म्हणत होते सर्व मजा आहे. विचार करा, जो माणूस कोर्टाच्या शुक्लाकाष्ठात अडकला आहे. त्याला स्वपनात देखिल सुख दिसणार नाही. तरी देखिल दोघेही म्हणत होते की मजा आहे म्हणजेच आनंद आहे.

❖ ज्या माणसाचा एकुलता एक मुलगा मृत्यु शैय्येवर असेल, त्याला कसली मजा आली आहे? म्हणूनच सूक्ष्मवेदात म्हटले आहे की या दुःखमय जगातील हे प्राणी या महाकष्टालाच सुख समजत आहेत.

यह संसार समंझदा नाहीं, कहंदा शाम दोपहरे नूं।
गरीब दास यह वक्त जात है, रोवोगे उस पहरे नूँ।।

भावार्थ :- संत गरीबदास जी सांगतात की मनुष्य जन्म प्राप्त करून जी व्यक्ति भक्ति करत नाही, ती कुत्रा गाढव इत्यादी योनिमध्ये दुःख भोगतो. कुत्रा रात्रि आकाशाकडे तोंड करून रडतो. म्हणूच गरीबदास जी असे सांगतात की हे मानवी शरीर एकदा हातातून निसटले आणि भक्ति केलेली नसेल तर त्यावेळी ही वेळ (या वेळेला) आठवून रडण्याची वेळ येईल.

## ''भक्ति मार्गावरील प्रवास''

जोपर्यंत आध्यात्मिक ज्ञान होत नाही तोपर्यंत जीव मायेच्या प्रभावाने आपला उद्देश्य विसरला होता आणि वर म्हटल्यानुसार दारुडा मनुष्य दारूच्या नशेत ज्येष्ठ महीन्यातील दुपारच्या कडक उन्हात घामाघूम झालेल्या आणि वाळूने माखलेल्या अवस्थेत म्हणतो मजा करतोय. परंतु नशा उतरल्या नंतर त्याला कळते की तो तर जंगलात पड़ला आहे, घर तर अजून खूपच दूर आहे.

**कबीर जींनी म्हटले आहे की :-**

कबीर, यह माया अटपटी, सब घट आन अड़ी।
किस-किस को समझाऊँ, या कूऐ भांग पड़ी।।

**भावार्थ :- अध्यात्म ज्ञान रूपी औषधि सेवन केल्यानंतर जीव धुंदीतून बाहेर येतो. मग तो भक्तिचा मार्गावर चालू लागतो कारण त्याला परमात्मापाशी पोहोचायचे आहे. तो आपला पिता आहे आणि तो सतलोक जीवाचे स्वतःचे घर आहे.**

यात्रा करणारी व्यक्ति सगळे सामान घेऊन नाही चालू शकत. केवळ आवश्यक ते सामान घेऊनच लेकर यात्रा करायला बाहेर पडतो. त्याच प्रमाणे भक्ति यात्रेत सर्व भार हल्का होउन चालणे होईल तेव्हाच आपला मार्ग प्राप्त करता येईल. भक्ति रूपी मार्गावर वाटचाल कारण्यासाठी आपल्याला मानसिक शांति असणे अनिवार्य आहे. मानसिक त्रासाचे कारण आहे आपल्या परंपरा आणि मान-अपमान, मोठेपणा, लोकदेखावा, नशा, इत्यादी भार घेऊन आपण व्यर्थ उभे आहोत. जशी मोठी हवेली, मोठी महागडी चारचाकी, नटणे मुरडणे, महागडे सोन्यामोत्याचे दागिने घालणे, लग्नात हुंडा देणे-घेणे, बैंड-बाजा, डीजेचा धिंगाणा करणे, घोड्यावर चढताना सगळ्या कुटुंबाने निर्लज्जपणे नाचणे, श्राद्धाचे जेवणावळी घालणे, मुलाचा जन्म झाला म्हणून उत्सव साजरे करणे, त्याप्रसंगी फटाके वाजवणे, फालतू खर्च करणे इत्यादी बाबी भक्ति मार्गाला बाधक असल्याने त्यांचा त्याग करावा लागेल.

## ''विवाह कसा करावा''

जसे श्री दुर्गा देवीने आपल्या तिन्ही पुत्रांचे (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) विवाह कसे केले होते, ते याच पुस्तकात पुढे वाचाल. माझे (लेखकाचे) अनुयाई असेच करत आहेत. १७ मिनिटांची असुर निकंदन रमैणी आहे. सात फेरे घेण्याच्या ऐवजी ते म्हटले जाते. ते करोड़ो गायत्री मंत्रापेक्षाही (ॐ भूर्भवः...) उत्तम आणि लाभदायक आहे. यामध्ये विश्वातील सर्व देवी-देव आणि पूर्ण परमात्मा यांना आव्हान करून आणि स्तुति-प्रार्थना केली आहे. यामुळे सर्व शक्ति त्या विवाह झालेल्या जोड़प्याचे सदैव रक्षण आणि मदत करतात. यामुळे मुलगी सुखरूप राहील आणि आयुष्याचा मार्ग देखिल सुखकर होईल.

विवाहातील प्रचलित वर्तमान परंपरांचा त्याग :-

विवाहात व्यर्थ खर्च बंद करावा लागेल. जसे मुलीच्या विवाहात मोठी वरात घेऊन येणे, हुंडा देणे, या व्यर्थ परंपरा आहेत. ज्यामुळे मुलगी ही कुटुंबावरील भार समजली जाते आणि तिला गर्भातच मारण्याचे उद्योग सुरु आहेत. माता-पित्यांसाठी तर हे महापाप आहे. मुलगी देवीचे स्वरूप आहे. आमच्या विकृत परंपरानी मुलीला शत्रू बनविले आहे. श्री देवीपुराणाच्या तीसऱ्या स्कंदात याचे प्रमाण आहे की या ब्रह्माण्डाच्या प्रारंभी तिन्ही देवतांचा (म्हणजेच श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) यांचा त्यांची श्री दुर्गा देवी जींनी विवाह केला

त्यावेळी कोणी वरात काढली नव्हती किंवा भोजनावळ देखिल घातल्या नव्हत्या. ना नाचगाणी होती किंवा बँडबाजा होता. श्री दुर्गा देवीने आपल्या ज्येष्ठ मुलास श्री ब्रह्मा जीला म्हटले की हे ब्रह्मा! ही सावित्री नावाची मुलगी तुला पत्नीच्या रूपात देत आहोत. हिला घेऊन जा आणि आपले घर प्रपंच थाट. त्याचप्रमाणे आपल्या मधल्या मुलाला म्हणजेच श्री विष्णु यांना लक्ष्मी जी आणि कनिष्ठ मुलगा श्री शिवजींना पार्वती जी देऊन सांगितले, या तुमच्या पत्नी आहेत. यांना घेऊन जा आणि आपले घर प्रपंच थाटा. तिघेही आपल्या पत्नी बरोबर घेऊन आपल्या लोकात गेले आणि मग विश्वाचा विस्तार झाला.

शंका समाधान :– काही व्यक्ति असे म्हणतात की पार्वती जीचा मृत्यु झाला. त्या देवीचा पुनर्जन्म राजा दक्षाच्या घरात झाला होता. यौवनात पदार्पण केल्यावर देवी सतीजींनी (पार्वती) नारदाने सांगितल्यानंतर श्री शिवजींना पति म्हणून स्वीकारण्याचा दृढ़ संकल्प करून आपल्या मातेकरवी आपली इच्छा वडिल दक्ष याला सांगितली. तेव्हा राजा दक्ष यांनी म्हटले की हे शिव जी माझे जावई बनण्यायोग्य नाहीत कारण ते नागडे राहतात. एकाच मृगजीन बांधून राहतात आणि शरीरावर राख फासून भांगेच्या नशेत असतात. सर्पांना सोबत ठेवतात. अशा व्यक्तिशी माझ्या मुलीचा विवाह करून जगात मी आपले हसू नाही करून घेणार. परंतु देवी पार्वती देखिल जिद्दीला पक्कया होत्या. त्यांनी स्वतःची इच्छा श्री शिव जीना कळवली आणि त्यांना सांगितले मी आपल्याशी विवाह करू इच्छीत आहे. राजा दक्षाने पार्वती जीचा विवाह अन्य कोणासोबत ठरविला होता. त्याच दिवशी श्री शिव जी आपल्या हजारोंच्या संख्येतील भूत–प्रेत, भैरव आणि आपल्या गणां सह विवाह मंडपात पोहोचले. राजा दक्षाच्या सैनिकांनी विरोध केला. शंकारांची सेना आणि दक्षाच्या सेनेत युद्ध झाले. पार्वतीजींनी शिवजींना वरमाला घातली. श्री शिव जी पार्वती जींना बलपूर्वक कैलाश पर्वतावर आपल्या घरी घेऊन गेले. काही व्यक्ति असे म्हणतात की बघा! श्री शिव जी देखिल भव्य अशी वरात घेऊन पार्वतीशी विवाह करण्यास आले होते. त्यामुळे वरातीची परंपरा पुरातन आहे. त्यामुळे वरातीशिवाय विवाहात शोभा येत नाही. त्याचे उत्तर असे आहे की हा विवाह नव्हता तर प्रेम प्रसंग होता. पार्वतीजींना बलपूर्वक इचलून घेऊन जाण्यासाठी श्री शिव जी वरात नाही तर सेना घेऊन आले होते. विवाहाची पुरातन परंपरा श्री देवी महापुराणाच्या तीसऱ्या स्कंदात आहे व ती वर सांगितली आहे. मुले आणि मुलींनी आपल्या माता–पित्याच्या इच्छेनुसार विवाह केला पाहिजे. प्रेम विवाह हे महाक्लेशाचे कारण होऊ शकते. पुढे भगवान शिव जी आणि पार्वती जी यांच्यामध्ये काही गोष्टींवरून तंटा झाला. शिवजींनी पार्वती जीशी पत्नीचे नाते समाप्त केले व बोलाचाली देखिल बंद केली. पार्वती जींनी विचार केला आता हे घर माझ्यासाठी एक नरकच बनले आहे.त्यामुळे काही दिवस मी आईकडे जाऊन राहते. पार्वती जी आपल्या पिता दक्षाच्या घरी माहेरी गेल्या. त्या दिवशी राजा दक्ष यांनी एका हवन यज्ञाचे आयोजन केले होते. राजा दक्षाने आपल्या मुलीला सन्मानाने न वागवता म्हटले की आज काय घ्यायला आली आहेस? बघितलेस त्याचे प्रेम, निघून जा माझ्या घरातून. पार्वतीजींनी आपल्या आईस श्री शिव जी नाराज झाल्याची गोष्ट सांगितली. मातेने आपल्या पतिला सगळे सांगितले होते. पार्वतीजींना ना माहेरी काही स्थान होते ना सासरी. प्रेमविवाहाने अशी गंभीर परिस्थिति उत्पन्न निर्माण केली की दक्ष पुत्रीला आत्महत्या करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय उरला नाही आणि राजा दक्षाच्या विशाल हवनकुण्डात जाळून मृत्यु पावल्या. धार्मिक अनुष्ठानाचा नाश केला. आपले अमोल मानवी जीवन गमावून बसल्या. पित्याचाही नाश करवला कारण जेव्हा श्री शिवजींना हे सर्व माहिती झाल्यावर ते आपली सेना घेऊन तिथे गेले आणि आपले

सासरे दक्ष जीचे मुंडके छाटून टाकली. नंतर बकऱ्याचे मुंडके लावून जीवित केले. त्या प्रेम विवाहाने कसे घमासान केले. श्री शिवांच्या सैन्याला वरात असल्याची बतावणी सांगून या कुप्रथेला जन्म दिला आहे. आणि हा प्रसंग प्रेमविवाह रूपी कुप्रथेचा जनक आहे आणि हे समाजाच्या विनाशाचे कारण बनले आहे.

जे विवाह सुप्रथेनुसार झाले, ते आजपर्यंत सुखी जीवन जगत आहेत. जसे श्री ब्रह्मा जी आणि श्री विष्णु जी.

विवाह करण्याचा उद्देश :- संततीची उत्पाती हाच विवाहाचा उद्देश आहे. मग पति-पत्नी मिळून परिश्रम करून मुलांचे पालन करतात. त्यांचा विवाह करून देतात. मग ते आपले घर थाटतात. त्याशिवाय प्रेमविवाह हे समाजात अशांतिचे बीज पेरत आहेत. समाज बिघडवणारे हे अस्तनीतले निखारे आहेत.

## प्रेम प्रसंग कसा असतो?

उत्तर :- जी चरित्रहीन मुले-मुली आहेत. ते चालताना तरतऱ्हेचे अभिनय करीत असतात. त्या निर्लज्ञांची नजर देखिल वाकडी तिकडी चालत असते. कधी खोटे हसणे, वळून-वळून मागे पुढे पाहणे, चवचालपणा करणे, हा त्या पापात्म्यांचा छंद असतो. जो अंततः प्रेमविवाहात रूपांतारीत होतो. नंतर दोघांना कळते की दोघांचेही अन्य प्रेमी-प्रमिका होते. मग त्यांची स्थिती भगवान शिव जी-पार्वतीजींच्या सारखी होते. न घर के ना घाट के. विवाह करण्याचा उद्देश वर सांगितला आहे. त्यापासून दूर जाऊन जे युवा वर्ग करतो, ते जीवनाच्या प्रवासाला नरक बनविण्यासारखेच आहे. जरी कोणाचा प्रेम सम्बन्ध झाला तरीही आपल्या समाजाची मर्यादा (जसे गोत्र, गाव आणि विवाह क्षेत्र) भंग होणार नाही आणि आई बापांना खटकणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. चुकून अशी चूक झालीच, आणि ते नंतर लक्षात आल्यास मुलामुलींनी आपले प्रेमसंबंध त्वरित तोडले पाहिजेत. सांप्रतकाळी अंतर जातिय विवाह करण्यात काही नुकसान नाही. परंतु उपरोक्त मर्यादा अवश्य लक्षात ठेवाव्यात. भगवान शिवजींनी देखिल देवी पार्वती जींना याच कारणासाठी त्यागले होते. त्याची कथा अशी आहे:-

## ''भगवान शिव जींनी आपल्या पत्नीचा त्याग केला''

ज्या वेळेस अयोध्येचा राजा श्री दशरथ पुत्र श्री रामचन्द्र वनवास भोगत होते, त्या दरम्यान लंकेचा राजा रावण याने सीता जीचे अपहरण केले होते. श्रीरामांना हे माहित नव्हते. सीताजींचा वियोग सहन न होऊन श्रीराम जी विलाप करीत होते. आकाशातून शिव-पार्वतीजींनी ते पहिले. पार्वतीदेवींनी शंकर्जीना विचारले की ही व्यक्ति अशी जोर-जोराने का रडते आहे? याच्यावर काही संकट आले आहे काय? श्री शिवजींनी सांगितले की ही कोणी साधारण व्यक्ति नाही आहे. हे स्वतः श्री विष्णु जी आहेत. त्यांनी राजा दशरथांच्या घरी जन्मले आहेत. आता वनवासात आहेत. त्यांची पत्नी सीता जी देखिल त्यांच्या सोबत आल्या होत्या आणि त्यांचे कोणीतरी अपहरण केले आहे. त्यामुळे ते दुखी आहेत. पार्वती जींनी म्हटले की मी सीता रूप धारण करून त्यांच्या समोर गेल्यावर देखिल त्यांनी मला ओळखले तरच ते भगवान असल्याचे मी मान्य करीन. श्री शिव जींनी पार्वती जींना ही चूक न करण्यास सांगितले. जर तुम्ही सीता रूप धारण केले, तर मला तुमचा काही उपयोग राहणार नाही. पार्वतीजींनी त्या वेळेस तर म्हटले, ठीक आहे, मी परीक्षा घेणार नाहीं. परंतु शिवजींच्या

घरातून बाहेर पडताना सीता रूप धारण करून श्रीराम जी समोर उभ्या राहिल्यावर श्री राम त्यांना म्हणाले की हे दक्ष पुत्री माया! आज एकट्या कशा आलात? श्री शिवजींना कुठे सोडून आलात? तेव्हा देवीजींना लाज वाटून त्या म्हटल्या, परमेश्वर शिव सत्यच सांगत होते की आपण त्रिलोकीनाथ आहात. आपण मला ओळखलेत. मी आपली परीक्षा घ्यायला आले होते. भगवान शिव जींना देखिल समजले की पार्वती जींनी सीता रूप धारण करून परीक्षा घेतली आहे. पार्वती जींना त्यांनी विचारले, जे काम करू नको म्हणून सांगितले, तेच नेमके केले ना? पार्वती जींनी खोटेच सांगितले की मी कोणाचीच कोणतीच परीक्षा घेतलेली नाहीं आहे, परंतु शिव जी पूर्णपणे नाराज झाले आणि प्रेम विवाहाला नरकाचे रूप येऊन गेले, जे आपण वर वाचले आहे.

त्यामुळे युवकांना विनम्र आवाहन आहे की आपल्या कमजोरीमुळे माता-पिता आणि समाजात विष कालवू नका. विवाह करणे हि चांगली गोष्ट आहे. फुकटचा वाद घालणे वाईट आहे. विवाहाची माता-पित्यांना आपणहून काळजी लागून राहिलेली असते. आणि विवाह करुनच त्यांना स्वस्थता लाभते. मग तरुण स्वतःच्या डोक्याला का ताप करून घेत आहेत? जोवर विवाह होत नाहीं तोवर ताव चढ़लेला असतो. पण विवाह झाल्यावर मुले होतात. सात वर्षानंतर जाणीव व्हायला लागते की ''हे काय झाले''? जसे हरियाणवी कवि (स्वांगी) जाट मेहर सिंह जी यांनी म्हटले आहे की :-

विवाह करके देख लियो, जिसने देखी जेल नहीं है।

जसे तुरुंगात चार भितींमध्ये राहणे अनिवार्य असते. त्याच प्रमाणे विवाहानंतर माता-पित्यांना आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी व ग्रहस्थ जीवन जगण्यासाठी सामाजिक मर्यादा रूपी चार भिंतींमध्ये राहणे अनिवार्य होऊन जाते. आपल्या इच्छेने काही करता येत नाही. नोकरी करणारा नोकरीवर जातो. मजूर मजूरी करतो आणि शेतकऱ्याला शेतात काम करणे अनिवार्य आहे. आणि ते आवश्यक आहे. त्यामुळे विवाहित जीवन मर्यादेला कारागृह संबोधले आहे. परंतु या कारागृहांशिवाय जगात उत्पत्ति होऊ शकणार नाही. आपल्या माता-पित्यांनी देखिल विवाह केला. आपल्याला मनुष्याचे अमूल्य शरीर मिळाले आहे. या शरीराचा वापर करून मानव मोक्ष प्राप्त करू शकतो. विवाह हा एक वरदान आहे. या पवित्र सम्बन्धाला चरित्राहीन व्यक्ति कामुक (Sexy) कथा ऐकवून आणि गाणी गाऊन तरूणांमध्ये वासना भडकावीत आहेत. त्यामुळे शांत व मर्यादशील मानव समाजात याची धग लागून अनेक कुटुंबे उद्वस्त होत आहेत. वर्तन्मानपत्रात आपल्याला वाचायला मिळते, तरुण तरुणीने गावात प्रेम करून विनाशाचे बीज रोवले. मुलीच्या घरच्यांनी त्यांच्या मुलीला समजावले पण घाणेरड्या फिल्म्स पाहून तसे वागणाऱ्या मुलीने काहीही ऐकले नाही. कुटुंबीयांनी मुलीची हत्या केली. त्यामुळे मुलीचे माता-पिता, भाऊ, व वहिनीला तुरुंगात जावे लागले आणि जन्मठेप झाली. त्या दोघांनी प्रेम प्रसंग रूपी अग्निने संपूर्ण कुटुंब स्वाहा केले. नांदत्या घराचा सत्यानाश केला. अन्य अनेक उदाहरणे आहेत. ज्यामध्ये औनर कीलिंगचा खटला होऊन फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. अरे तरूणांनो-मुलांनो! विचार करा! आई बाप तुमच्याकडून काय काय अपेक्षा ठेवतात, तुम्हाला शिकवतात, तुमचे पालन पोषण करतात, पण तुम्ही सामाजिक मर्यादा विसरून केलेल्या छोट्याशा चुकीमुळे मोठे नुकसान होऊन आयुष्यच नष्ट होते. त्यामुळे मुलांना सत्संग ऐकवणे आवश्यक आहे. सामाजिक वरिष्ठ-कनिष्ठत्व शिकवणे आवश्यक आहे. त्याचाच आज जवळजवळ अभाव आहे.

प्रश्न :– वरातीची प्रथा कशी प्रचलित झाली?

उत्तर :– राजे लोकांपासून प्रारंभ झाला. ते मुलाच्या विवाहात सैन्य घेऊन जात असत. रस्त्यात राजाच्या सुरक्षेसाठी सैन्य जात असे. हा सर्व खर्च वधू पक्ष असलेला राजा सोसत असे.

शेठ–सावकार हुंड्यात दागिने आणि धन देत असत. ते गावातील अन्य गरीब वर्गातील व्यक्तिना रोजंदारीवर रक्षण करण्यासाठी नेत असत. त्यांना पहिल्या दिवशी मुलाकडे आपल्या घरी मिठाई खाऊ घालायचा. वधू पक्षाकडून प्रत्येक रक्षकाला एक चाँदीचा रूपया आणि एक पीतळ्याचा पेला दिला जात असे. जे गरीब आपली गाड़ी आणि बैल घेऊन येत असत, त्यांना थोड्या अधिक रकमेचे आकर्षण दाखवले जात असे. पूर्वी जंगल अधिक असायची. वाहतुकीची साधने नव्हती. अशा प्रकारे ही एक परंपरा बनून गेली. त्यावेळेस दुष्काळ पडत असे. लोक गरीब होते. कोणी श्रीमंत व्यक्ति एकटा जात असेल, तर त्याला लुटणे ही नेहमीची बाब असायची. त्यामुळे वरातीच्या रूपाने सेना नेण्याची प्रथा प्रचलित झाली. मग एक लोकांमध्ये मिरवण्याचे साधन म्हणून ही परंपरा बनून गेली, पण आता त्याची बिल्कुल आवश्यकता नाही आहे.

प्रश्न :– भात आणि न्योंदा–न्यौंदार यांची प्रथा कशी प्रचलित झाली? (एक प्रकारचा लग्नाचा निधी व उधार रोखमदत)

उत्तर :– त्याचे मूळ देखिल वरात येणे, हुंडा देणे यात आहे. वरात घेऊन जाण्यासाठी वर पक्षाकडून मिठाई खाऊ घालणे. वधू पक्षाला त्या वरातीसाठी मिठाई आणि रूपया–पेला देणे यामुळे भात आणि न्यौता (आहेर) प्रथा प्रारंभ झाली. न्योता समूहात गाव आणि आसपासच्या परिसरातील स्नेहीजन असत. ज्याच्या मुलाचे किंवा मुलीचा विवाह होत होते, तो एकटा परिवार खर्चाचे निर्वाहन करू शकत नव्हता. त्यामुळे त्या गटात शंभराहून अधिक सदस्य त्या समूहात सामील होत असत. ज्याच्या मुला–मुलीचा विवाह असेल, तर सर्व सभासद त्यांच्या आर्थिक स्थितिनुसार निमंत्रण करणाऱ्या पित्याला रोख रक्कम देत असत. कोणी शंभर, दोनशे, कोणी कमी कोणी जास्त असा तो निशुल्क उधार होता. त्यावर ब्याज द्यावे लागत नाही. सगळ्यांची आमंत्रणाची रक्कम लिहून ठेवले जाते. प्रत्येक सदस्याच्या वहीत (डायरी) प्रत्येक विवाह प्रसंगी दिलेल्या रकमेची नोंद केलेली असते. अशा प्रकारे विवाह होणाऱ्या कुटुंबात पैशांची समस्या कधीही येत नाही.

भात :– भात देखिल याच संबंधाने भरला जातो. बहिणीच्या मुलांच्या विवाहात काही कपड़े आणि रोख रक्कम देण्यास (भावा कडून केलेली मदत) म्हणजे भेट. ही रक्कम बहिणीला परत द्यायचे नसते. त्यामुळे ज्या बहिणींना भाऊ नाही त्या दिवशी अत्यंत दु:खी होतात. त्या एकांतात बसून रडतात.

पीलिया (बाळंतविडा) :– मुलगा झाल्यावर माहेरच्या लोकांकडून नवजात बाळाला देशी शुद्ध घी, काही डिंकाचे लाडू, (दही+पिठ मळुन+गोळा+अजवायन+काळी मिरची चे मिश्रण डिंक म्हणतात), नवजात बालकाला छोटे–छोटे कपड़े (झबली) देखिल माहेरच्या व मुलीच्या नंणदांकडून आणले जातात. या परंपरेत सर्व कपडे एका वर्षानंतर व्यर्थ जातात.

अशा परंपरांचा त्याग करणे आवश्यक आहे. कारण जीवनावरील हा व्यर्थ भार आहे. आपण आपल्या मुलीला मदत करू शकतो. जसे गाय–म्हैस घ्यायची आहे. मुलीची आर्थिक स्थिती खराब असेल तर तिला आपण रोख रक्कम देऊ शकतो, परंतु लग्नाच्या वेळी नाही. जर

मुलीची इच्छा असेल तर मुलीला आपल्या संपत्तीत हक्क देऊ शकता. जर मुलीला हवी असेल तर मुलीने गरज पडल्यास धन जरूर घ्यावे पण परत करावे. परमात्मावर विश्वास ठेवा. तुमचा मान कायम राहील.

समाधान :- विवाह सूक्ष्म वेदा अनुसार करणे हा सर्व समस्यांवरचा उपाय आहे. आपण चार वेद ऐकले आहेत :- यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद. परंतु पाचवा वेद सूक्ष्म वेद आहे, जो स्वतः पूर्ण ब्रह्म जींनी पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुखकमलातून आपल्या अमृतवाणीने प्रदान केला आहे.

माझे (रामपाल दास यांचे) अनुयायी त्याच पाचव्या वेदानुसार विवाहाचे विधी करत आहेत. यामध्ये कोणत्याही उपरोक्त परंपरेची आवश्यकता पड़त नाहीं. विवाह आणि अन्य प्रसंगी वधू-वर पक्ष यांनी काहीही खर्च करायचा नसतो. केवळ कन्यादान म्हणजेच मुलीचे दान करायचे आहे. वधू परिधान करण्यासाठी फक्त चार ड्रैस घेऊन जाऊ शकते. जोडे तर घातलेलेच असतात. बस ज्या घरात जाईल ते कुटुंब त्या मुलीला आपल्या घरचीच लेक समजेल. आपल्या घरच्या आर्थिक स्थिति अनुसार अन्य सदस्यांसाठी सर्व आवश्यक वस्तु उपलब्ध करून देतील. मुलगी आपल्या माता-पिता, व भाऊ-भाऊजयीवर भार होणार नाही. माहेरी ती जेव्हा केव्हा येईल, तेव्हा कोणताही पोशाख आणि रोकड घेणार नाही. त्यामुळे भाऊ-भाऊजयीला देखिल तिचे येणे सुखदायक होईल. भाऊजयीला देखिल नणंद येऊन चार-पाच हजार खर्च करवून गेली म्हणून खटकत असते. परंतु आमची मुलगी मानाने येईल आणि मानाने परत जाईल. आपल्या माहेर हून कोणतीही वस्तु घेणार नाहीं. त्यामुळे दोन्ही पक्षांचे परस्परांवर अधिक प्रेम सदैव राहील. भक्तिदेखिल उत्तम होईल. अशा प्रकारे जीवनात यथार्थ अशा मार्गावर चालून आम्ही उद्दिष्टांपर्यंत (मोक्ष पर्यंत) पोहोचू.

प्रश्न :- ज्यांना मुलबाळ नसते, अशा निपुत्रिक व्यक्तिचे तर सकाळी किंवा शुभ कार्यास जाताना तोंडही पाहणे अशुभ मानले जाते? असे का?

उत्तर :- संपूर्ण आध्यात्मिक ज्ञानाच्या चुकीच्या समजुतीमुळे ही चुकीची समजूत फोफावली आहे. साधकांनी याच पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक ५ वर चार पुत्र असलेल्या एका व्यक्तिची गोष्ट वाचावी. त्याला अर्धांगवायू झाला तर त्याची सेवा करायला कोणी केली नाही. त्या व्यक्तिला पुत्र आहेत म्हणून त्याचे दर्शन शुभ आहे. त्याच्या दुरवस्थेला कोण पाहू इच्छिणार?

## कृतघ्न पुत्र

एका व्यक्तिला दोन पुत्र होते. सैन्यातून सेनानिवृत झाला होता. पैंशन मिळत असे. मुले वेगवेगळी राहू लागली. छोट्या मुलाने आईला आपल्या घरी ठेऊन घेतले कारण त्याची मुले लहान होती. त्यांच्यावर देखरेख करण्यास आई पाहिजे होती. वडील मोठ्या मुलाच्या वाट्याला आले. त्यांनी म्हटले की मी ज्याच्याकडे जेवीन त्याला मी पैंशनची रक्कम देईन. छोटा मुलगा म्हणायचा की पेन्शन अर्धी अर्धी करा. वडिलांनी नकार दिल्यामुळे एक दिवस वडिलांच्या डोक्यात काठी मारली. वडील जागेवरच गतप्राण झाले. मुलाला जन्मठेप झाली. मृत व्यक्तिला पुत्र असल्यामुळे त्याचे दर्शन शुभ मानले जाते पण त्याच्यासाठी ते अशुभ झाले. आता आध्यात्मिक तराजू (Balance) मध्ये तोलून पाहूयात की निपुत्रिक व्यक्तिचे दर्शन शुभ आहेत की अशुभ? जसे या पुस्तकात वरच स्पष्ट केले आहे की कुटुंब संस्काराने बनत असते. कोणते तरी कर्ज फेडण्यासाठी पिता-पुत्र, पत्नी, माता-पिता, बहीण-भाऊ इत्यादी-इत्यादी रूपात

जन्म घेऊन कुटुंब स्वरुपात थाटात राहताना दिसतात. परंतु अनेक युवा अवस्थेत मरण पावतात, तर अनेक जण विवाह होताच मरण पावतात. हे सर्वजण आपले ऋण पूर्ण होताच विनाविलंब शरीर त्याग करून जात आहेत. जे निपुत्रिक आहेत. त्यांचे काहीही देणेघेणे नाही. त्यांनी जरी पूर्ण गुरूकडून अनुग्रह घेऊन भक्ति केली तरी त्यांच्यासाखे भाग्यवान कोणीच नाहीं. न कुणाच्या जन्माचा आनंद न मृत्युचे दुःख. त्या निपुत्रिकांचे दर्शन तर अति शुभ आहे. जरी भक्ति करीत नसले तरी सापुत्रिक (संतान) असोत किंवा निपुत्रिक (बिना संतान वाले) असोत दोघेही आपले जीवन नष्ट करीत आहेत. जर भक्ति करत असतील तर दोघांचेही दर्शन शुभच आहे.

## निपुत्रीकांनो सावधान

जे पुण्यात्मे निपुत्रिक आहेत त्यांच्यामध्ये आध्यात्मिक ज्ञानाच्या अभावाने संतान होण्यासाठी त्यांची तड़फड सुरूच असते. त्यासाठी ते हरसंभव प्रयत्न करत असतात. तरीदेखिल देणे घेणे असणारे (संतान) त्यांना मिळत नाही आणि मग निपुत्रिक होण्याचे दुःख ते झेलते आहेत. विशेषकरून स्त्रियांमध्ये संतान उत्पन्न करण्याची तीव्र इच्छा असते. त्या स्वतःला बांझ म्हणवून घेऊ इच्छित नाहीत. तपासणी करून डॉक्टर सांगतात की तुमच्यात बांझपणाची कोणतीच लक्षण नाहीत. सगळी विधात्याची लीला आहे. परंतु तत्वज्ञानहीन स्त्री यासाठीच तड़फडत असते. भक्ति न केल्यामुळे तिचा पुढील जन्म कुत्रीचा असतो. मग यमदूत बाळांतपणात तिला म्हणतात. चला पिल्ल जन्माला घालून सगळी कसर भरून काढ. एकाच वेळी आठ–आठ होतील. पुढला जन्म डूकरीणीचा असेल एकाच वेळेस बारा पिल्लांना जन्म देशील. आणि असे सात आठ वेळा बाळंत होईल. पिल्लांना जन्माला घालण्याची सगळी तुझी हौस पूर्ण होईल.

साधक बंधू/भगिनींनो! अध्यात्म ज्ञान समजून घ्या. मानवी जीवन सफल करा. जगण्याचा मार्ग निर्वेध (निर्बंध) करून घ्या म्हणजेच पूर्ण गुरू कडून अनुग्रह घेऊन भक्ति करून स्वतःचा उद्धार करून घ्या.

## ''अज्ञानी लोक विवाहात नाचतात.''

एक दिवस वर्तमान पत्रात वाचले की रोहतकमधील एक मुलगा भिवानीला विवाहासाठी जात होता. त्याच्या दोन्ही बहिणींचे नवरे त्याच्या गाडीत होते. पहिल्या दिवशी सर्व कुटुंबीयांनी (भाऊ–बहिणी, आई–वडील, काका–पुतणे) डी. जे. वाजवून नाचले, सगळे धिंगाणे केले. उतमात केला. कलानौर जवळ नवऱ्यामुलाची गाडी एका ट्रेलरवर आदळली. गाडीतील सर्व लोक अपघातात मरण पावले. नवरा मुलगा गेला, त्याच्या दोन्ही बहिणी विधवा झाल्या. एकुलता एक मुलगा गेला. सगळा सत्यानाश झाला. आता नाचा डी जे वाजवून! परमात्माची भक्ति केल्यास अशी संकटे टाळता येतात. त्यामुळे माझ्या (रामपाल दास यांच्या) अनुयायांना सख्त आदेश देत आहे की परमात्माचे अधिष्ठान ठेवून कार्य करा. साधे विधि करून विवाह कर. या मृत्युलोकात कधी कोणावर गाज येईल याचा काहीही भरवसा नाही.

## ''संतांची शिकवण''

एका गावातील एक मनुष्य श्री नानक देव जी यांच्याकडे प्रथमच गेला. त्याने पाहिले की संत जी उदास अवस्थेत एकांतात बसले आहेत. (नामस्मरण करत होते) त्या माणसाने त्यांना रामराम केला. श्री नानकजींनी देखिल उत्तर दिले. भोजन झाले. ज्ञान विचार ऐकवले.

**तो मनुष्य निघून गेला. एक दिवस परत आला आणि म्हणाला महाराज जी! तुम्ही कधीही आनंदी दिसत नाही. याचे काय कारण आहे? संत नानक जी म्हणाले :-**

ना जाने काल की कर डारे, किस विधि ढ़ल जा पासा वे।
जिन्हाते सिर ते मौत खुड़कदी, उन्हानूं केहड़ा हांसा वे।।

**भावार्थ :- संत नानक जी म्हणतात हे भल्या माणसा! मृत्युलोकात सगळे नाशवंत आहे. कोणाची वेळ कधी येईल काहीही सांगता येत नाही. सर्वांच्या डोक्यावर मृत्यु गरजतोय, अशा स्थितीत त्या माणसाला नाच गाणे, थट्टा मस्करी आवडेल काय मूर्ख किंवा नशेत असलेला माणूस अशा घाणेरड्या लोकांसोबत राहण्यात आनंद मानतो. उदाहरणार्थ एका मनुष्याला विवाहानंतर १० वर्षांनी मुलगा झाला. त्याच्या जन्माला येण्याचा आनंद म्हणून त्याने लाडू वाटले, बँडबाजा वाजवला, इतमात केला. पुढच्या वर्षीच्या वाढदिवशी त्या मुलाचा मृत्यु झाला. जिथे वाढदिवसांची तयारी सुरु होती, तिथे रडून छाती बडवणे सुरु झाले. घराचे नरक झाले. आता करा साजरे समारंभ.**

**हे सत्य ऐकून त्या माणसाला राग आला आणि म्हणाले कि हे प्रभु! आपण कधी आनंद साजरा करीत नाही काय? श्री नानकजींनी उत्तर दिले करतो आनंद साजरा करतो.**

साध मिले साडे शादी हूंदी, बिछुड़दा दिल गीरी वे।
अखदे नानक सुनो जिहाना, मुश्किल हाल फकीरी वे।।

**भावार्थ :- जेव्हा माझे शिष्य सत्संग ऐकण्यासाठी येतात तेव्हा त्यांच्या सहवासात मला आनंद होतो. सर्व भक्ति करीत आहेत कोणीही विचलित झालेला नाही हे पाहून आनंद होतो. सत्संग झाल्यावर परत जातात तेव्हा उदासीनता येते की कोणी माथेफिरू यांना संभ्रमित करून परमात्मापासून लांब तर नाही नेणार? श्री नानकजींनी म्हटले आहे की ज्ञानहीन संतांनी फकीरी म्हणजेच भक्ति अवघड केली आहे. असे गुरु पूर्ण मोक्षाचा मार्ग जाणत नाहींत, फक्त संभ्रमित करतात आणि गोड गोड बोलून माझ्या भक्तांना मायेच्या जाळ्यात ओढतात. त्यामुळेच जेव्हा ते सगळे सत्संग करण्यास परत येत नाहीत, तोवर काळजी लागून राहते. सगळे आल्यावर आनंद होतो. पण आम्ही नाचगाणे नाही करत, तो आनंद ह्दयी जाणून घेतो. मृत्युला देखिल आम्ही विसरत नाही. कबीर जींनी म्हटले आहे :-**

मौत बिसारी मूर्खा, अचरज किया कौन।
तन मिट्टी में मिल जाएगा, ज्यों आटे में लौन।।

**शब्दार्थ :- हे मूर्ख मानवा! तू कसे आश्चर्य करत आहे कि मृत्यूस विसरत आहेस. तुझे शरीर एक दिवस मृत्यूस प्राप्त होऊन मातीत मिसळेल. तुझे नामो-निशान म्हणजे खुण देखिल दिसणार नाही. जसे पिठात मीठ मिसळल्यानंतर दिसत नाही. भावार्थ आहे कि मृत्यूचा दिवस विसरून मनुष्य (स्त्री-पुरुष) स्वार्थापोटी चुका करतात आणि या संसारात निश्चिंत राहतात. जर मृत्यू लक्षात असेल तर मानव पाप व चुका करू शकत नाही.**

**अन्य उदाहरण :- एक मोठा व्यापारी एका साधु पुरुषाच्या आश्रमात गेला. संतकृपा होऊन त्याला चांगला लाभ झाला. तो सफरचंद, संत्री, केळी यांचा मोठा पेटारा घेऊन आला. ज्या टोपलीत प्रसाद ठेवत असत, तिथे साधु पुरुषाने ती फळे टाकून दिली. तो व्यापारी दोन दिवसांनी गेला तेव्हा ती टोपली फळांनी भरलेली होती. प्रसादाचा काही भाग साधु पुरुषाने साधकांमध्ये वाटून टाकला. काही साधक फळांचा प्रसाद घेऊन आले होते, तो टोपलीत टाकून दिला. व्यापाऱ्याने साधु पुरूषाला विचारले, महाराज! आपण फळे का घेत नाही? साधु**

पुरुष म्हणाले मला माझा मृत्यु समोर दिसतो आहे. त्यामुळे खाल्ले जात नाही. व्यापाऱ्याने विचारले या जगातून तुम्ही कधी जाणार? साधु पुरुष म्हणाले आजपासून चाळीस वर्षांनी मला मृत्यु येणार आहे. व्यापारी म्हणाला हे महाराज! एक दिवस तर सगळ्यांनाच मारायचे आहे. मग घाबरायचे कशाला? असा तर सामान्य मनुष्य देखिल घाबरत नाही. तुम्ही हे काय सांगताय? पुढले दोन तीन दिवस येऊन व्यापारी असेच काहीबाही बोलत होता. त्या नगराचा राजा देखिल साधु पुरूषाचा भक्त होता. साधु पुरूषाने राजाला सांगितले, तुमच्या नगरात ते करोडीमल शेठ आहेत. त्यांचे चंदनाच्या लाकडांचे दुकान आहे. त्यांना फाशीची शिक्षा सुनवा आणि एक महिन्यानंतर चांदण्या रात्री फाशी देण्याची तारीख ठेवा. तुरुंगात व्यापाऱ्याच्या कोठडीत फळांची एक टोपली भरलेली असावी आणि एक शेराच्या तांब्या भरून दुध असे ठेवलेले असावे. जेवणात खीर, हलवा, पूरी, पोळी भाजी त्यांना द्या. राजा ने आज्ञेचे पालन केले. तुरुंगात व्यापाऱ्याला बंद करून २० दिवस झाले. तो एकदम दुबळा झाला. नंतर साधु पुरुष कारागृहात गेले. प्रत्येक कैद्याला भेटले. व्यापाऱ्याला पाहून म्हणाले, कुठला राहणारा आहेस? काय नाव आहे? व्यापारी म्हणाला महाराज! आपण मला ओळखले नाही, मी कीरोड़ीमल चंदनाच्या लाकडांचा दुकानदार. साधु पुरुष म्हणाले, अरे कीरोड़ीमल! तू इतका बारीक कसा झालास? काही खात पीत नाहीस. अरे! फळांनी भरलेली टोपली आहे, ताब्यांत दूध भरले आहे. जेवणाच्या ताटात हलवा, खीर ठेवली आहे. व्यापारी म्हणाला महाराज! मला फाशीची शिक्षा सुनावली आहे. शपथ घेऊन सांगतो, मी निर्दोष आहे. वाचवा मला महाराज! घरात छोटी छोटी मुले आहेत. साधु पुरुष म्हणाले, अरे बाबा, सगळ्यांनाच एक दिवस मरायचे आहे. मग कशाला घाबरायचे? खाऊन पिऊन मजा कर. व्यापाऱ्याने गजाआडून त्यांचे पाय पकड़ले आणि म्हणाला महाराज! वाचवा. काही खाल्ले जात नाही. सतत चांदणी रात्र दिसते. साधु पुरुष म्हणाला शेठ कीरोड़ीमल! जशी तुला चांदण्या रात्रीचा मृत्यु निश्चित दिसतोय, तसाच साधु-संतांना देखिल आपली चांदणी रात्र दिसत असते. भले मग ती चाळीस वर्षांनी का असेना.

आपण अध्यात्म ज्ञानहीन प्राणी मस्ती करता आणि अचानक मृत्यु होतो. काहीही करू शकत नाही. असाच मला देखिल आपला चाळीस वर्षांनी येणारा मृत्युचा दिवस दिसतो आहे यामुळे खाणेपिणे नेमस्तपणे केले जाते. मनात मस्ती कधी येतच नाही. सतत परमेश्वराची आठवण ठेवतो. आपल्या ज्ञान चक्षुंवर अज्ञानाची पट्टी बांधलेली आहे. ती पट्टी सत्संग केल्याने गळून पडते व जगण्याचा आपला मार्ग प्रशस्त होतो. मोक्ष प्राप्त होतो. साधु पुरुशाने राजा ला सांगून व्यापाऱ्याला मुक्त केले. व्यापाऱ्याने नाम घेऊन कल्याण करून घेतले.

## ''विवाहा नंतरचा प्रवास''

विवाहा नंतर एकमेकांचा विश्वास कायम राखणे हे पति-पत्नीचे कर्तव्य बनते. भावार्थ असा आहे की दोघांनीही आपापल्या मर्यादांचे निर्वाहन करावे. पतिवर नितांत विश्वास असेल तर माझी पत्नी अन्य पुरूषांना कधीही समर्पित होणार नाही. मग तो कितीही सुंदर आणि धनीक असुदे. त्याचप्रमाणे पत्नीला नितांत विश्वास असला पाहिजे की माझा पति अन्य कोणत्याही स्त्रीशी संबंध ठेवणार नाही. मग भले ती स्वर्गातील कोणी अप्सरा का असेना.

➢ कथा :- एक लष्करी जवान होता. त्याची पत्नी सति म्हणजे पतिव्रता होती. ही गोष्ट त्याने आपल्या फौजेतील साथीदारांना सांगितली. ही गोष्ट राजाचा मुसलमान मंत्री शेरखान याच्यापर्यंत पोहोचली. त्याने ती राजाला सांगितली आणि यातील सत्यासात्याची

शहानिशा करावी अशी विनंती केली. राजा ने सभा भरवली आणि त्या लष्करी जवान चाप सिंह चैहानला बोलावले. सभेत राजा ने विचारले की आपण म्हणता की माझी पत्नी पतिव्रता आहे, ती अन्य पुरूषाची लालसा ठेवून त्याच्या सोबत कधीही मिलन करणार नाही. फौजी चाप सिंह ने म्हटले की हे शंभर टक्के सत्य आहे. राजा ने म्हटले की जर खोटे आढळून आले तर? फौजीने म्हटले की आपण जी सजा द्याल, ती मंजूर असेल.

मंत्री शेरखानने म्हटले की राजा जी! याची शहानिशा मी स्वतः करतो. मग राजाने म्हटले की ठीक आहे. चापसिंह ने म्हटले की माझ्या विवाहाच्या वेळेस तिच्या सौभाग्याचे चिन्ह म्हणून एक पटका (कापडाचा परणा) तसेच कटारी (मोठा चाकू) आहे आणि माझी पत्नी तुम्हाल देणार नाही. जरी शेरखान इथे घेऊन आला तर हार मान्य करीन. तसेच माझ्या पत्नीच्या शरीरावरील कोणतेही चिन्ह सांगितल्यास माझी पत्नी धर्मभ्रष्ट झाल्याचे देखिल मान्य करीन.

शेरखान चाप सिंहच्या गावी गेला आणि तिथे जाऊन एका खबऱ्या स्त्रीला म्हटले की एक चाप सिंह नावाच्या सैनिकाची पत्नी इथे रहाते आहे. तिच्यासोबत माझा संबंध जुळवून दे. त्याबद्दल मी तुला खूप पैसे देईन. त्या स्त्रीने सांगितले की हे कोणत्याही परिस्थितीत अशक्य आहे. मग शेरखानने म्हटले की कसेही करून तिच्या घरून विवाहाच्या वेळी सौभाग्याचे चिन्ह म्हणून तिला मिळालेले पटका व मोठा चाकू हे चोरून मला आणून दे आणि चाप सिंहाची पत्नी सोमवतीच्या गुप्तांगावर किंवा मांडीत, ओटीपोटात काही खूण असल्यास ते माहिती करून मला माहिती देती स्त्री पाहुणी बनून चाप सिंहाची नकली आत्या होऊन सोमवतीच्या घरी गेली. सोमवतीच्या विवाहाच्या वेळेस आणि नंतर देखिल चाप सिंहाची ही आत्या आली नव्हती. आजारी असल्यामुळे विवाहात देखिल येऊ शकली नव्हती. अनेक दिवस तिने मुक्काम केला. सोमवतीला स्नान करताना पाहिले आणि तिच्या जवळ जाऊन तिच्या सुंदर शरीराची प्रशंसा करण्याच्या निमित्ताने प्रत्येक अंग पहिले. सोमवतीच्या गुप्तांगाजवळ एक मोठा तिळ होता. ही खूण पाहून खबरी स्त्री तो पटका व चाकू चोरून घेऊन गेली आणि शेरखान मंत्र्याने राजाला सांगितले की मी तिच्याशी संबंध ठेऊन आलो आहे. तिच्या मांडीत एक काळा तीळ आहे. या सौभाग्याचे प्रतिक असलेल्या वस्तु पतिव्रता कोणालाही देत नाहीत. माझ्या प्रेमात आणि धनाच्या लालसेने तिने मला दिल्या आहेत.

राजा ने सभा भरवली. चाप सिंहाला बोलाविले व विचारले की हे पटका तसेच चाकू कोणाचे आहेत. चाप सिंहाने लक्षपूर्वक पाहून त्या त्याच्याच वस्तू असल्याचे मान्य केले. शेरखानने पुढे म्हटले की आणखी सांगू, ऐक! तुझ्या पत्नीच्या उजव्या मांडीवर गुप्तांगा जवळ एक काळा तीळ आहे. चापसिंहाने हे सर्व सत्य असल्याचे मान्य केले, परंतु माझी पत्नी आपल्या धर्मापासून ढळणार नाही असेही सांगितले. राजाने म्हटले की तू अजूनही तीच पोपटपंची करतो आहेस. तू खोटारडा आहेस. तुला आतापासून बरोबर एक महिन्याने फाशी दिले जाईल. तुझी काही अंतिम इच्छा असल्यास सांग. चाप सिंह ने म्हटले की मी माझ्या पत्नीला भेटू इच्छितो. राजाने आज्ञा दिली. चाप सिंह आपल्या पत्नीकडे गेला. तिने केलेल्या बेईमानी बद्दल तिची निर्भत्सना केली व तुझ्यामुळे मला आता फाशी होणार असल्याचे सांगितले. सोमवतीने सांगितले की तुमच्या आत्याचे नाव घेऊन एक स्त्री आली होती. तिने माझ्या अंगावरील खूण पाहिली आणि पटका आणि कटारी चोरून घेऊन गेली. चाप सिंहने सांगितले की मंत्री शेरखान आला होंता आणि त्याने हे सर्व षड़यंत्र रचले आहे. फांसीच्या आधी एक आठवडा सोमवती राजाच्या नगरी मध्ये एक नर्तकी बनून गेली आणि राजाला नृत्य

दाखवण्याच्या बहाण्याने भेटली. राजाने आज्ञा दिली सर्व दरबारी उपस्थित होये. मंत्री शेरखानदेखिल उपस्थित होता. नर्तकीच्या नृत्याने राजा अति प्रसन्न झाला व तिला म्हटले की तुला जे पाहिजे ते मागून घे. काय मागतेस ते माग. मी अति प्रसन्न झालो आहे. नर्तकीने म्हटले की वचन द्या मग मागते. राजा ने म्हटले की राज्य सोडून काहीही माग. मी वचनबद्ध आहे.

नर्तकी ने म्हटले की आपल्या सभेत माझा चोर आहे. माझ्या घरातून चोरी केली आहे. त्याचे नाव शेरखान असून तो मंत्री आहे. त्याला फांशीची शिक्षा द्यावी. राजाने शेरखानला विचारले, आता सांग शेरखान! हे खरे आहे काय? शेरखानने सांगितले की हे परवरदिगार! मी तर आजपर्यंत या नर्तकीचा चेहरा देखिल पाहिलेला नाही.

तेव्हा सोमवतीने म्हटले की जर आपण माझा चेहेरा देखिल पाहिलेला नाही, तर मग हा पटका आणि चाकू कोणाच्या घरून आणले होते? ज्या चापसिंहाला तुझ्या खोटे बोलण्यामुळे फाशीची शिक्षा झाली आहे, त्या चापसिंहाची मी पतिव्रता पत्नी आहे, चाप सिंहाला बोलावण्यात आले. राजाने चाप सिंहाला अर्धे राज्य सौपविले आणि त्याला क्षमा केली. शेरखान या मंत्र्याला फांशीची शिक्षा दिली. अशा मुली खरेच धन्य आहेत आणि देशाला त्यांच्याबद्दल अभिमान आहे.

गरीबदास जी को परमेश्वर कबीर जी ने बताया था की :-

तुरा न तीखा कूदना, पुरूष नहीं रणधीर।
नहीं पदमनी नगर में, या मोटी तकसीर।।

भावार्थ :- कबीर जी सांगतात की गरीबदास! ज्या गावात व देशात वेगाने धावणारा व उंच उडी मारणारा घोड़ा नसेल आणि नागरिक रणधीर (शूरवीर) नाहींत आणि ज्या गावात व देशात पद्मिनी या पतिव्रतेच्या तोडीच्या स्त्रीया नसतील, तिथे काहीतरी मोठी गफलत (खुप मोठे चुक) झाली आहे. अशा प्रकारचे चरित्र्यवान स्त्री-पुरूष असणे आवश्यक आहे.

❖ विवाहानंतर काही मुली सासरी सर्व श्रृंगार करतात. नटून थटून रस्त्याने जातात. तरतऱ्हेचे नखरे करत असतात. भड़क रंगाचे आणि भडकावू कपडे घालून बाजार किंवा शेतात किंवा पाण्याच्या नळावर किंवा विहिरीवर जातात. त्यांचा काय उद्देश असतो? आपल्या पतीव्यतिरिक्त अन्य पुरुषांना आकर्षित करून आपल्या सौंदर्य आणि वैभवाचे प्रदर्शन करणे. ही सभ्य लेकीसुनांची लक्षणे नव्हेत. आपल्या पतिला प्रसन्न करण्यासाठी असे करत असतील तर हे त्यांनी घरापुरते सीमित ठेवले असते, तर बरे झाले असते. परंतु असे लक्षण हे मानसिक दोष दर्शवितात.

साधे कपडे परिधान करा, ते महाग, स्वस्त कसेही असोत. लेकीसुनांनी आपली नजर पुढल्या १२ फुटापर्यंतच सीमित ठेवली पाहिजे. उठता बसता कोणाच्या भावना चळवल्या जातील अशा हालचाली करण्याचे टाळा. स्त्रीयांच्या चुकीच्या कृतीमुळे म्हणजे हालचाली मुळे लफडेबाज लोकांची हिम्मत वाढते आहे. ते स्त्रियांची असभ्य भाषेत टिंगल करून त्यांना त्रास देतात. ही एक सामाजिक विकृतीच आहे. जशा मुली लेकीसुना या सर्व युवती जशा आपल्या कुटुंबियांच्या सोबत घरात वागतात बोलतात, तसेच बाहेर देखिल असले पाहिजे. समाजाकडून त्याची प्रशंसाच होते. अन्य युवकांना हे उदाहरण अनुसरायला काहीच हरकत नाही. पैट्रोलला जर निखारा मिळालाच नाही तर ते विस्फोटक नसते.

❖ या उलट अशा हालचाली करणे हे समाजात आग लावण्यासारखे आहे. ही बाब युवति आणि युवक दोघांनाही सारखीच लागू होते.

तारुण्य हे दारुगोळ्यासारखे आहे. आग लावायला एखादी ठिणगी देखिल पुरेशी आहे. त्यामुळे सर्व नाश होतो. ठिणगी नसेल तर वर्षानुवर्षे सर्व सुरक्षित राहू शकते.

❖ प्रत्येक पुरूषाची इच्छा असते की माझ्या लेकीसुना उत्तम चारित्र्याच्या असाव्यात. गावात शहरात कोणी त्यांच्या कुटुंबावर बोट दाखवू नये.

❖ जेव्हा एखाद्या युवतीला पाहून मनात काही वाईट विचार आल्यास, असा विचार करा की जर कोणी आमच्या लेकीसुनांच्या बाबत असे चुकीचे विचार केले आणि काही दुष्कृत्य करण्याच्या उद्देशाने काही विचित्र चाळे केल्यास (विदुषकी विक्षेप, डोळे मारणे, तिरक्या नजरेने पाहणे) असे केल्यास कसे वाटेल. उत्तर स्पष्ट आहे की त्याचे हातपाय तोडु. जो निर्बल आहे. तो एकान्तात बसून रडेल. त्यावेळेस विचार करावा :-

जैसा दर्द अपने होवे, ऐसा जान बिराणै।
जो अपनै सो और कै, एकै पीड़ पिछानै।।
कबीर, परनारी को देखिये, बहन-बेटी के भाव।
कह कबीर काम (Sex) नाश का, यही सहज उपाय।।

समाधान :- परमेश्वर कबीर जी सांगतात की :-

लैंगिक छळास चालना देणारे प्रेरक :- खोट्या गोष्टी आणि बेगडी पात्रे असलेले सिनेमे पाहून तरूण तरुणी बेशरमपणे त्यांची नक्कल करतात. सिनेमात दाखवितात त्याप्रमाणे आपण घरी किंवा सभ्य समाजात वावरू शकत नाही. मग त्या पाहण्याचे नक्की उद्देश काय असावा? काहीही नाही. केवळ मनोरंजनाचे निमित्त. असे मनोरंजन जे समाजाच्या सर्वनाशाचे मूळ कारण आहे. माझे (लेखकाचे) अनुयायी सिनेमे बिल्कुल पाहत नाहीत.

अश्लील, फिल्मी गाणी, सोंग आणि अश्लील चर्चा निकम्मे युवक करत असतात. त्यांच्या संगतीत हुशार युवक देखिल त्यांच्यापासून प्रेरित होऊन बकवास करत असतात. म्हणूनच परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की :-

कथा करो करतार की, सुनो कथा करतार।
काम (Sex) कथा सुनों नहीं, कह कबीर विचार।।

भावार्थ :- परमेश्वर कबीर जी सांगतात एकतर परमात्माच्या महिम्याचे गुणगान (कथा) करा किंवा त्याविषयी काही चर्चा (कथा) होत असल्यास तिचे श्रवण करा. लैंगिक अश्लील चर्चा कधीही ऐकू नका. परमेश्वर कबीरांनी त्यांचे हे विचार सांगितले आहेत.

## ''विशेष मंथन''

काम (Sex) प्रक्रियेचा विशेष विवेकाने विचार करावा. पति-पत्नी मिलन होण्यास समाज मान्यता देतो. तुम्ही दोघेही परस्पर मिळून मुले उत्पन्न करा. सगळ्यांच्याच आई बापांनी मुले उत्पत्ति करण्याची संभोग नावाची प्रक्रिया केली आहे. ज्यामुळेच आपला आणि आपल्या भावा-बहिणीचा जन्म झाला. तर विचार करा ही क्रिया किती पवित्र आणि सुंदर आहे. ज्यामुळे आपल्याला हे अमूल्य मानवी शरीर मिळाले आहे. कोणी डॉक्टर झाला, कोणी सैनिक, कोणी मंत्री, तर कोणी इंजीनियर झाला आहे. कोणी शेतकरी होऊन आपल्याला अन्न देतो. कोणी मजुरी करून महाल उभारले, कोणी कारागीर बनला. मानवी शरीर धारण करून भक्ति-दान-धर्म कर्म करून आपण आपल्या जीवाचे कल्याण करू शकतो आहेत. संभोग क्रिया पवित्र आहे. बकवास करून, सिनेमातील बेगडी गाणी आणि हिडीस अंगविक्षेप

करून त्याला विकृत वासनेचे स्वरूप देऊ नका. बस्स, इतकीच महत्वाची गोष्ट आहे. ही बंद पडद्याआड करायची बाब आहे. पशु–पक्षी देखिल प्रजनन क्रिया करतात. पण ते उघड्यावर करतात, ते बरे नाही वाटत. मानव सभ्य प्राणी आहे. त्याने पडद्याआड आणि मर्यादा सांभाळून या गोष्टी करायच्या आहेत.

उपरोक्त विचार वाचून आपल्या कोणाच्याही मनात कोणत्याही लेकीसुना आणि भगिनी पाहून अश्लील विचार उत्पन्न होणार नाहीत. आपल्या आजी आजोबांनी हीच क्रिया केली, तेव्हा आपल्या आई बापांचा जन्म झाला. ज्या माता–पित्यांनी आपल्याला उत्पन्न केले, त्यांनीदेखिल हीच प्रक्रिया केली. यात अश्लील काय आहे? विकृत लोक याला अश्लीलता मानून आणि त्याला तसा रंग देऊन समाजात आग लावत आहेत.

❖ देशाच्या संविधानात तरतूद आहे की जर कोणी पुरूष एखाद्या स्त्रीची छेड़छाड़ करीत असेल, तर त्याला तीन वर्षांची शिक्षा दिली जाईल. जर एखाद्या स्त्रीवर बलात्कार झाला तर दहा वर्ष शिक्षा होऊ शकते. कायद्याचे ज्ञान असल्यास मनुष्य वाईट दुराचार करण्यास घाबरतो. कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक देखिल आहे. अशा तऱ्हेची पापे काल ब्रह्म करवून घेतो. काल कोण आहे? याच पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक २३१ वर ''सृष्टि रचना'' प्रकरणात याची अधिक माहिती देण्यात आली आहे.

❖ चित्रपट बघू नका :– चित्रपट हे बनावट व दिखावू कहाण्या रचून सांगतात. त्या पाहताना आपण विसरून जातो कि यातील पात्रे हे त्यांच्या भाजी–भाकरीसाठी हा धंदा चालवीत आहेत. एक चित्रपट बनविण्यास एक कोटी रुपये लागतात. भोळेभाबडे युवक आपला विवेक हरवून त्यांचे प्रशंसक बनतात. ते आपला धंदा चालवत आहेत. आपण मूर्खपणां करून सिनेमा पाहण्यात आपले पैसे व्यर्थ खर्च करीत आहोत. ज्या हीरो–हिरोइनसाठी तुम्ही वेडे असता, तुम्ही त्यांच्या घरी जाऊन पहा, ते तुम्हाला पाणी देखिल विचारणार नाहीत. चहा नाश्ता लांबची गोष्ट. विचार करा की मी लाडू खात असेन आणि आपण पाहत असाल. आपण म्हणताय वा! लाडू मोठ्या ऐटीत खातोय. आपलयाला काय मिळाले? हीच अवस्था सिनेमातील नट आणि प्रेक्षकांची आहे.

❖ आपण आपले विचार बदलले पाहीजे :–

➢ जर आम्ही अश्लील मूर्ति पाहत आहोत तर अश्लीलता उत्पन्न होते आहे कारण त्या उत्तेजक मूर्तिने आतमध्ये ठिणगी पेटवली आहे. जसे पेट्रोल भडकतय, अशा मूर्ती विसर्जित करणे उत्तम.

➢ जर आम्ही देशभक्तांचे चरित्र वाचत असू आणि मूर्ति पाहत असलो तर आमच्या आतमध्ये देशभक्तिची प्रेरणा जागते. अशी तस्वीर घरात असल्यास कोणतेही नुकसान नाही.

➢ जर आम्ही साधु–संत–फकीर तसेच उत्तम चरित्रवान नागरिकांची चरित्रे वाचत ऐकत असेल तर सर्व दोष शांत होऊन आम्ही उत्तम नागरिक बनण्याचा विचार करत आहोत. त्यासाठी आम्हाला संत आणि सत्संग यांची अतिशय आवश्यकता आहे तिथे उत्तम विचार सांगितले जात आहेत.

➢ जर आम्ही आमच्या छोट्याशा मुलीला स्नान घालत असू, कपडे घालत असू. असे तर सगळेच करीत असतात. तीच मुलगी विवाह होऊन सासरी जाते. अन्य घरातील मुली आमच्या घरी सुना म्हणून येतात. आता यात नविन काय झाले? ही शुद्ध मनाने विचार करण्याची गोष्ट आहे. अशा प्रकारे विवेकाने भटके विचार नष्ट होत जातात. साधु भाव उत्पन्न

होत जातो.

➢ वर्तमान पत्रात अनेक अश्लील छायाचित्रे छापली जातात. युवक त्या पाहून चळतात. अंतर्वस्त्रांच्या जाहिरातीसाठी मुली फक्त अण्डरवीयर तसेच चोळी (ब्रेसियर) घालून फोटो देतात, ते चूक आहे. त्याचप्रमाणे पुरुष देखिल त्यांच्या अंतर्वस्त्रांच्या जाहिरातीसाठी फक्त अण्डरवीयर उभे राहून पोज देतात, ते तर महानीचतेचे प्रतीक आहे. अशा प्रकारच्या जाहिराती ताबडतोब बंद केल्या पाहिजेत. त्यासाठी सुसंस्कृत संघटनांनी घटनात्मक मार्गाने अशी अश्लीलीता बंद करण्यासाठी आंदोलन केले पाहिजे. लोकांना चरित्रावान, दयावान बनविण्यासाठी उत्तमोत्तम पुस्तकें उपलब्ध करून दिली जावीत. सत्संगाची व्यवस्था करण्यात यावी.

➢ उत्तम विचार ऐकाणारी मुले संयमी होतात. असे पाहण्यात आले आहे की ज्या मुलींचे पती हे विवाहानंतर काही दिवसातच सैन्यात आपल्या नोकरीवर गेला आणि जवळपास आठ–नऊ महीने सुट्टीवर येऊ शकला नाही. काही मुलींचे पती हे रोजगारासाठी परदेशात जातात. ते तीन वर्ष पर्यत येत नाहीत. त्या मुली देखिल संयम बाळगून राहतात. कुठल्या परपुरुषांच्या स्वप्नात गुंग होत नाहीत. या उत्तम संस्कार असलेल्या कुटुंबातील मुली आहेत. पुरूषदेखिल इतके दिवस संयमाने रहातो आहे. ते देखिल उत्तम संस्कार असलेल्या कुटुंबातील आहेत. अस्सल घरंदाज असतात. जे भड़वे असतात, नखरे करतात, डोक्यावरच्या केसांची नवीन नवीन स्टाईलने कटिंग करून काळे–पिवळे चश्में लावून गल्लो–गल्ली मध्ये कुत्र्यासारखे फिरत असतात असे भटके मुले विकृत गोष्टी करून नांदती घरे उजाड करत आहेत. कारण हे कोण्या लेकीसुनांशी कमी–जास्त करून भांडणे करणार. मग तो कोणत्या थराला जाईल हे सांगणे अवघडच असते. कोणाचा जीव देखिल जाऊ शकतो. त्या एका भडव्याने दोन घरांची वाट लावली. त्यामुळे आपल्या मुलांना लहानपणापासूनच सत्संग ऐकवून विचारवान आणि चरित्र्यवान बनविले पाहिजे.

## ''चरित्रावानाची कथा''

एक शुकदेव ऋषि होते. ते श्री वेदव्यास यांचे पुत्र होते. एक दिवस ते दीक्षा घेण्याच्या उद्देशाने राजा जनकाकडे मिथिला नगरीत गेले. राजा जनक म्हणाला की शुकदेव जी उद्या सकाळी दीक्षा देऊ त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था वेगळ्या वाड्यात करण्यात आली होती. ऋषिजींची परीक्षा घेण्यासाठी एका सुंदर युवतीला त्यांची सेवा करण्यासाठी पाठविले गेले. युवती शुकदेवजींच्या पलंगावर त्यांच्या पायाच्या बाजूला बसली. ऋषिनी पाय ओढून जवळ घेतले. युवती ऋषिजींच्या आणखी जवळ आली तेव्हा ते उठून उभे राहिले आणि म्हणाले ताई! तुम्ही चांगल्या घरच्या दिसत आहात. कृपा करून खोलीच्या बाहेर गेलात तर बरे होईल, नाहींतर मी बाहेर जातो. मुलगी खोलीबाहेर गेली. राजा जनकाला सांगितले की मनुष्य प्रामाणिक आहे. असे असे झाले. सकाळी राजा जनकाने ऋषि शुकदेव जींना विचारले आपल्याला भेटायला आलेल्या स्त्रीचा अंगिकार न करून आपण चांगलाच संयम दाखविला आहे. आपण संयमी व्यक्ति आहात. आपले माता–पिता धन्य आहेत.

❖ परमेश्वर कबीर जीचे विचार यांच्यापेक्षा ही उच्च आणि श्रेष्ठ आहेत. ते म्हणतात की ऋषि शुकदेव देखिल आत्मज्ञानी नव्हते कारण जेव्हा युवती शुकदेव यांच्या पलंगावर बसली तेव्हा शुकदेवांनी तिला स्त्री समजून आपल्या शरीराला स्पर्श करू दिला नाही आणि उभे राहून बाहेर जाण्याची तयारी केली. यावरून हे स्पष्ट आहे की शुकदेवजींना आत्मज्ञान नव्हते. विचार

करा की जर युवतीच्या जागी एखादा युवक बसला असता, तर शुकदेवजींनी काय केले असते? त्याचे क्षेम कुशल विचारले असते पण उभे नसते राहिले. म्हणाले असते की बंधो! पलंग एकच आहे, आपण पलंगावर आराम करा मी खाली जमिनीवर आपले आसन टाकतो. जर युवक सभ्य असता तर म्हणाला असता की नाहीं ऋषि जी! आपण पलंगावर बसा, मी खाली जमिनीवर पडतो. परंतु युवती असल्या कारणाने ऋषि शुकदेवांना काम दोषामुळे भीती वाटली.

परमेश्वर कबीर जी सांगतात की स्त्री तसेच पुरूष आत्म्याची दोन वस्त्रे आहेत. जसे गीता अध्याय २ श्लोक २२ मध्ये म्हटले आहे की हे अर्जुन! जीव शरीर त्याग करून नवे शरीर धारण करतो. त्यालाच मृत्यु म्हणतात. जसे मनुष्य जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र परिधान करतो, तसे हे आहे. त्यामुळे आत्म तत्वाला ओळख.

उदाहरण :- एका गावात एकदा नाटक मंडळी आली. अनेक दिवस त्यांनी नाटक वठविले. पूर्वीच्या काळी नाटकात स्त्रियांच्या भूमिका पुरुषच करीत असत. एक मुलगा आपल्या मित्राच्या साथीने नाटक पहिल्यांदा पाहायला आला. नाटकात एका मुलाला मुलीचे कपडे घातले होते. त्याची छाती देखिल एखद्या युवतीप्रमाणे केली होती. प्रथमच नाटक पाहायला गेलेल्या मुलाने आपल्या मित्राला म्हटले की अरे बघ! किती सुंदर मुलगी आहे. मित्र म्हणाला, आरे ती मुलगी नाही, मुलगा आहे. परंतु प्रथमच गेलेला मुलगा हे मान्य करायलाच तयार नव्हता. त्याचा मित्राच्या सांगण्यावर विश्वास बसत नव्हता. नाटक संपल्यानंतर नटमंडळी आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी गेले. ही दोन्ही मुले देखिल त्यांच्या मागोमाग गेली. ज्या मुलाने नाटकात स्त्रीपात्र वठविले होते, त्याने स्त्री पात्राचे कपडे काढून खुंटीवर टांगले होते. छातीवर बसविलेली नकली स्तने उतरवून पेटीत टाकली आणि आपले नेहमीचे कपडे घेऊन आंघोळ करायला गेला. हे पाहून आपल्या नवीन प्रेक्षकाला तो नट हा प्रत्यक्षात मुलगा असल्याचे पटले. दुसऱ्या दिवशी त्या मुलीच्या वेशातील मुलाबद्दल आपल्या नवीन प्रेक्षक मुलाला कोणतीही वासना उत्पन्न झाली नाही. त्याला मुलगा दिसत होता. त्याच प्रकारे जरी शुकदेव ऋषिंना अध्यात्म विवेकाचे आत्म ज्ञान असते, तरी त्यांनी त्या स्त्रीला आत्म रूपातील पुरूष समजून म्हणाले असते, आपण पलंगावर बसा, मी जमिनीवर आराम करतो. साधु, संत, फकीर अशा विचाराने जीवन जगतात. साधना करून मोक्ष प्राप्त करतात.

## ''संगतीचा प्रभाव आणि परमात्मावरील विश्वास''

एका गावात एका माणसाचा विवाह होऊन दहा-बारा वर्ष झाली होती. मुलबाळ काही झाले नव्हते. त्याच गावात दोन किलोमीटर अंतरावर एक आश्रम होता. त्यामध्ये एक सिद्ध संत रहात होता. तो गावातून भिक्षा मागून आणायचा आणि त्यावर तीन-चार किंवा त्यापेक्षा जास्त दिवस त्याची गुजराण व्हायची. एक दिवस तो त्या कोणतेही मुलबाळ नसलेल्या गृहस्थाच्या घरी भिक्षा घ्यायला गेला. ती स्त्री-पुरूष दोघांनीही साधुला पुत्र प्राप्ति होण्यासाठी त्याचे पाय धरून प्रार्थना केली. साधु ने म्हटले की एका अटीवर तुम्हाला मुलबाळ होऊ शकेल. स्त्री-पुरूषाने विचारले, सांगा काय अट आहे. साधु ने म्हटले की प्रथम पुत्र उत्पन्न होईल, तो दोन वर्षांचा झाल्यावर मला द्यावा लागेल. त्याला मी माझा उत्तराधिकारी बनवील. आपल्याला मान्य असेल तर बोला. त्यानंतर मुलगी होईल आणि त्यानंतर पुन्हा एक मुलगा होईल. दोघांनीही ती अट मान्य केली. साधुच्या आशीर्वादाने दहाव्या महीन्यात पुत्र झाला. दोन वर्षाचा झाल्यावर साधु कडे सोपविले. त्या वेळेस स्त्री पुन्हा गर्भवती राहिली. तिने कन्येला

जन्म दिला. त्यानंतर अजून एका पुत्राचा जन्म झाला. यामुळे साधुची कीर्ती सर्वदूर पसरली. त्या आश्रमात युवा मुलींना प्रवेश नव्हता. जेव्हा तो मुलगा सोळा वर्षांचा झाला तेव्हा एक दिवस गुरूजींच्या छातीमध्ये स्तनाजवळ एक फोड़ झाला. तिथे दुखत असल्यामुळे साधु अतिशय व्याकुळ झाला. जड़ी-बूटीचे औषध बनवून फोडांवर लावले. चार-पाच दिवसात ते फोड़ फूटून बरे झाले. तेव्हा साधला बरे वाटले. काही दिवसांच्या नंतर साधुला ताप आला. वृद्धावस्था व ताप यामुळे अशक्तपणा येऊन त्याला हिंडता फिरता येइनासे झाले.

गावातील मुलांच्या संगतीत त्याला वाईट सवयी लागू नयेत व त्यापायी तो बिघडू नये किंवा त्याला विवाह करण्याची प्रेरणा मिळू नये म्हणून आतापर्यंत साधने त्याच्या शिष्याला गावात भिक्षा मागण्यासाठी पाठविले नव्हते. परंतु त्या दिवशी नाईलाजाने साधुने आपल्या शिष्यास म्हटले की बेटा! गावातील पहिल्या गल्लीत चौथ्या घरी जाऊन भिक्षा मागून जे मिळेल ते आण. त्याच्या पुढे जाऊ नको. गुरूच्या आदेशानुसार मुलाने त्या घराच्या द्वारावर आरोळी दिली, अलख निरंजन! त्या घरातून एक १४ वर्षीय मुलगी भिक्षा टाकण्यासाठी द्वाराजवळ आली तर तो साधु मुलगा त्या मुलीच्या छातीकडे टक लावून पाहत होता. मुलीने पाहिले की साधुच्या पाहण्यात काही तरी दोष आहे. मुलगी म्हणाली बाबा, भिक्षा घ्या. साधु म्हणाला, ताई! तुझ्या छातीवर दोन फोड़ झाले आहेत. तुम्ही आश्रमात या. तुमचे फोड गुरूजी बरे करून देतील. तुम्हाला याचा खूप त्रास होत असेल. माझ्या गुरुजींना एकाच फोडाचा अतिशय त्रास झाला. हे सर्व ऐकून त्या मुलीचा पक्का समज झाला की हा साधु प्रामाणिक नाही. मुलगी मोठ्या आवाजात म्हणाली मुर्खा! आधी आपल्या आई-बहिणीचे फोड़ बरे कर. पुढे जर काही बोललास, तर पायातील चपलेने तुला मारीन. असे म्हणून तिने पायातील चप्पल काढली आणि म्हणाली, जा आता इथून, पुन्हा इथे येऊ नकोस. हा सर्व आरडाओरडा ऐकून मुलीची आई दारात आली आणि विचारले काय ग? काय झाले? तेव्हा मुलीने साधचे बोलणे तिच्या आईला सांगितले. आईने विचारले, बाबा जी! कुठून आलात? साधु मुलाने सांगितले. की गावाबाहेरच्या आश्रमातून आलो. माझे गुरुजी आजारी आहेत. त्यांना हिंडता फिरता येत नाही. म्हणून त्यांनी प्रथमच मला भिक्षेसाठी गावात पाठविले आहे. मी त्यांचा शिष्य आहे. मी फक्त या ताईला विचारले, तुझ्या छातीवर दोन फोड़ आहेत. खूप दुखत असतील. माझ्या गुरूजींना फक्त एकच फोड़ झाला होता, दिवस-रात्र त्या दुखण्याने बेचैन असायचे. त्यांना त्यावरील औषध माहित आहे. आपण गुरूजीकडे जाउन फोड़ बरे करून घ्या. तो साधु मुलगा हा त्या स्त्रीचाच त्या साधला अर्पण केलेला मुलगा होता. ती मुलगी त्या साधु बाबाची छोटी बहीण होती. आईने सांगितले, हा तुझा भाऊ आहे. आम्ही त्याला साधु बुवांना अर्पण केले आहे. याला जगाच्या व्यवहारांची माहिती नाही आहे. याला काहीच माहीती नाही. मुली, जो दोष तुला लागला आहे, त्यापासून तुझा हा भाऊ खूप लांब आहे. तो पवित्र-प्रामाणिक हेतूने बोलत होता. तू गावातील चंचल युवकांच्या फाजील खोड्यांसारखे हे काहीतरी असेल असा विचार करून त्याला बोललीस. आईने सांगितले की साधु जी! माझ्या मुलीच्या छातीवर फोड़ नाहीत. ते स्तन आहेत. बघा! जसे माझ्या छातीवर आहेत तसे. तिचा विवाह करु. तिला मुलेबाळे होतील. तेव्हा ती या स्तनांतून तिच्या मुलांना दुध पाजेल. साधु मुलगा म्हणाला, हे माते! हिचा विवाह कधी होईल? हिला मुलेबाळे कधी होतील. आईने सांगितले की कधीतरी तीन-चार वर्षांनी हिचा विवाह करु. मग दोन-तीन वर्षानंतर हिला मुलेबाळे होतील.

साधु मुलाने आध्यात्मिक दृष्टिकोणातून विचार केला की परमात्माला जन्म घेणाऱ्या

मुलांची केवढी काळजी आहे. जन्मापूर्वी ७-८ वर्ष आधीच दूध पिण्याची व्यवस्था करून ठेवली आहे. तो आमच्या जेवणाची व्यवस्था आश्रमातच करणार नाही काय? आम्ही गुरू-शिष्य तर त्या परमात्माच्याच आधारे जगतो आहोत. आजपासून भिक्षा मागणे बंद. हा विचार तो करत होता तर आई ने विचारले, बाबा जी! कसली काळजी करताय? साधु म्हणाला की माई चिंता समाप्त. असे म्हणून भिक्षेसहित झोळी फेकून देऊन आश्रमात रिकाम्या हातांनी परत गेला. गुरूजीनि विचारले, कारे, भिक्षा का नाहीं आणली? झोळी कोणी घेतली की काय तुझी? मुलाने सांगितले की गुरूजी! जर परमात्मा मुलाचा जन्म होण्याआधी ७-८ वर्ष त्याच्या सर्व खाण्यापिण्याची व्यवस्था करत आहे तर आपल्याच आश्रमात आपली नाही का करणार? अवश्य करेल. त्यामुळे मी झोळी फेकून दिली. साधु समजून गेला की हा कामचुकार रस्त्यातच झोळी फेकून आला म्हणजे रोज भिक्षा मागायला जावे लागणार. साधुचा नाईलाज होता. तो काहीच नाही बोलला. त्याने विचार केला की उद्या मीच कसेही करून स्वतः भिक्षा आणीन.

जेव्हा साधु मुलगा झोळी आणि भिक्षा गल्लीत फेकून आश्रमात गेला तेव्हा परमात्माने गावातील काही व्यक्तिना प्रेरणा दिली की बड़े साधबाबा अस्वस्थ आहेत. छोट्या बाबाना कोणी काहीतरी बोलले म्हणून तो भिक्षा व झोळी दोन्ही फेकून निघून गेला. साधु भूकेला आहे, मुलगा देखिल भुकेला असेल असा विचार करून चांगले भोजन तयार करून खीर-फुल्के-वरण बनवून आधी एक जण आला. साधुला म्हटले की छोट्या बाबा जीने कुणाच्या तरी म्हणण्यावर रूष्ट होऊन भिक्षा नाही आणली. झोळी-भिक्षा फेकून आला. आपण भोजन करावे. साधु ने म्हटले की आधी मुलाला खाऊ द्या. मुलगा म्हणाला आधी गुरुजी खातील. मग शिष्य जेवेल. साधु जेवण करु लागले. इतक्यात दूसरा मनुष्य हलवा-पूरी-छोले घेऊन आला. अशा प्रकारे जवळजवळ दहा जणांनी गावातून असा विचार करून भोजन घेऊन आश्रमात आले. शिष्य म्हणाला वाह परमेश्वर! आम्हाला माहितच नव्हते की आपण किती चांगले आहात ते! त्यामुळे तुमच्या नामस्मरणापेक्षा भोजनाचीच काळजी जास्त असायची. गावातील लोकांनी एक एक दिवस बांधून घेतला आणि साधु आणि त्याच्या शिष्याला रोज भोजन मिळण्याची व्यवस्था झाली.

शिकवण :- जशी संगत, तशी रंगत. आपला दोष आपल्याला दुसऱ्यामध्ये दिसतो. परमात्मावरील विश्वासाशिवाय भक्त अपूर्ण आहे. मागून खाणे देखिल शास्त्राच्या विपरीतच आहे. कारण जरी भक्ताची श्रद्धा आणि भावना खरी असली, तरी तो परमात्मा व्यवस्था करतो आहे. परंतु गृहस्थाची कर्म करून भोजन ग्रहण करने सर्वोत्तम आहे. साधु-संत यांचे कर्म सत्संग करणे म्हणजेच, भक्ति करणे आहे. जो खरी श्रद्धा ठेऊन भक्ति करतो, त्याला तर मागायची देखिल आवश्यकता नाही. संत गरीबदास जीनि परमेश्वर कबीर जी यांच्याकडून प्राप्त ज्ञानामधून आपल्या अमृतवाणी मध्ये असे म्हटले आहे की :-

**''वैराग प्रकरण के अंग से कुछ वाणी''**

गरीब, नट पेरणा कांजर सांशी मांगत हैं भठियारे।
जाकी तारी लागी तत् में मोति देत उधारे।।(३)
गरीब, द्रोपद सुता के चीर बढ़ाए बिन ही ताने काते।
सकल मनोरथ पूर्ण साहिब तुम क्यों मांगन जाते।।(२)
गरीब, आप तें आवै रत्न बराबर मांग्या आवै लोहा।
लक्षण नहीं जोग के जोगी जा बस्या बन खोहा।।(६)

गरीब, टूकां कारण फिरै कुकरा (कुत्ता) सतघर फिर आवै।
ये तो लक्षण नहीं जोग के क्यों बाणा बिरदल जावै।।(१०)
गरीब, जिनको आत्मज्ञान नहीं है वे मांगैं रे भाई।
चावल चून इकट्ठा करकै ब्याज बधावैं जाई।।(२४)
गरीब, जो मांगै सो भड़वा कहिये दर-दर फिरै अज्ञानी।
योगी योग सम्पूर्ण जिसका जो मांग न पीवै पानी।।(४१)
गरीब, कद नारद जमात चलाई व्यास न टुकड़ा मांग्या।
वसीष्ठ विश्वामित्रा ज्ञानी शब्द बिहंगम जाग्या।।(५०)
गरीब, कबीर पुरूष कै बालद आई नौ लख बोडी लाहा।
केशव से बणजारे जिस कै देवैं यज्ञ जुलाहा।।(५५)

**भावार्थ :- उपरोक्त वचनांचा भावार्थ असा की जो सत्य व शास्त्र अनुकूल अशी भक्ति करीत नाही, तो पोळीच्या तुकड्यासाठी जसा कुत्रा घरोघरी धुंडाळत राहतो, त्याप्रमाणे साधुच्या वेषात फिरत असतात, जसे अन्य म्हणजेच नट-पेरणें, कांजर व सांशी या जातिचे लोक भाजी भाकरी साठी फिरत असतात. जर साधु देखिल असेच करीत असेल, तर त्याच्या साधनेत अवश्य त्रुटी आहे. परमेश्वर कबीर जी हे विणकराचे आपले दैनिक कर्म करीत असत आणि खरी साधना देखिल करत असत. ते सत्संग देखिल करीत असत. खरी भक्ति करणाऱ्याला परमात्मा कसे मदत करतात, याचे दृष्टांत स्वतः कबीर जींनीच दिले आहेत. कथा अशी आहे:-**

## ''परमेश्वर कबीर जी कडून काशी क्षेत्री भोजन-प्रसाद म्हणजेच भोजन रुपी (धर्म यज्ञाची) व्यवस्था करणे''

शेखतकी सर्व मुसलमानांचा प्रमुख म्हणजेच मुख्य पीर होता. त्याला पहिल्या पासूनच परमेश्वर कबीर जी बद्दल द्वेष व इर्षा होती. सर्व ब्राह्मण आणि मुल्ला-काजी व शेखतकी यांनी मिटींग घेऊन (सभा) यांनी एक षड़यंत्र रचले की कबीर एक गरीब निर्धन व्यक्ति आहे. त्यांच्या नावाने सर्वांना पत्र पाठवा की कबीर जी काशीमधले खूप मोठे व्यापारी आहेत. त्यांचा पूर्ण पत्ता कबीर पुत्र नूरअली अंसारी, विणकर वस्ती, काशी शहर. कबीर जी तीन दिवस सर्वांना धर्मभोजन-प्रसाद घालणार आहेत. सर्व साधु संत आमंत्रित आहेत. रोज भोजन करणाऱ्या प्रत्येकाला एक दोहर (जी त्या वेळेस सर्वात उंची शाल समजण्यात येत असे), एक मोहोर (१० ग्राम वजनाची सुवर्ण मोहोर) दक्षिणेच्या रुपात देतील. दररोज जो जितक्या वेळा भोजन करेल, कबीर त्याला तितक्या वेळा दोहर आणि मोहर दान करतील. भोजनामध्ये लाडू, जलेबी, हलवा, खीर, दही वड़े, मालपूवे, रसगुल्ले इत्यादि मिष्ठान असतील. कोरडा शिधा (म्हणजेच कणिक, तांदूळ, डाळ, तुप, गुळ) देखिल देण्यात येईल. एक पत्र शेखतकीच्या नावे आणि दिल्लीचा बादशाह सिकंदर लोधी याच्या नावे देखिल पाठविण्यात आले. ठरलेल्या दिवसांच्या आदल्या रात्रिच सर्व साधु-संत भक्त एकत्रित व्हायला लागले. दुसऱ्या दिवशी भोजन प्रसाद होणार होता. संत रविदास जी परमेश्वर कबीर जींना म्हणाले की आपल्या नावाची पत्रे घेऊन जवळपास १८ लाख साधु-संत व भक्त काशी शहरी आले आहेत. भोजन प्रसाद घेण्यास आमंत्रित आहेत. कबीर जी आता तर आपल्याला काशी सोडून अन्य ठिकाणीच जावे लागेल. कबीर जी मात्र एकदम निवांत होते. पण तरी देखिल असे दाखवत नव्हते, ते तर अभिनय करत होते. ते म्हणाले, रविदास जी झोंपड़ीच्या आतमध्येच बसा, कडी लाऊन घ्या. वाट

पाहतील आणि आपोआप निघून जातील. आपण बाहेर निघायचेच नाही. परमेश्वर कबीर जी आपल्या राजधानी निजधामाला सत्यलोकी पोहोचले. तिथून नऊलाख बैलांवर गाढवांवर ठेवतात तश्या पोत्यांमध्ये शिजवलेले अन्न व कोरडा शिधा (कणिक, तांदूळ, डाळ तूप इत्यादी) लादून पृथ्वीवर उतरले. सत्यलोकातून देखिल सेवेकरी आले. परमेश्वर कबीर जीनि स्वतः एका व्यापाऱ्याचा वेश धारण केला आणि आपले नाव केशव सांगितले. दिल्लीहून सिकंदर बादशाह आणि त्याचा धार्मिक गुरु शेखतकी देखिल आला. काशीमध्ये भोजन–प्रसाद सुरु होता. भोजनानंतर सर्वांना एक दोहर आणि एक १० ग्राम सोन्याची मोहर दक्षिणा म्हणून देण्यात येत होती. अनेक बनावट संत तर दिवसातून चार–चार वेळा भोजन करून चारही वेळा दोहर आणि मोहर घेत होते. काहीजण तर कोरडा शिधा (तांदूळ, डाळ, तूप, कणिक) देखिल घेत होते.

हे पाहून शेखतकीचा चेहेरा पाहण्यासारखा झाला होता. जिथे केशव हे नाव धारण करून कबीर जी जिथे थांबले होते, त्या तंबूत शेखतकी सिकंदर लोधी राजासोबत आला. कबीर जी वेश बदलून व्यापाऱ्याच्या वेशात बसले होते. (त्यावेळच्या व्यापाऱ्यांना बंजारे म्हणत होते.) सिकंदर लोधी राजा ने विचारले, आपण कोण आहात? नाव काय आहे? आपला कबीर जीशी काय संबंध आहे? केशव रूपात बसलेले परमेश्वर म्हटले की माझे नाव केशव आहे, मी एक व्यापारी आहे. कबीर जी माझे लंगोटीयार मित्र आहेत. माझ्याकडे त्यांचे पत्र आले की एक छोटा–सा भण्डारा भोजन–प्रसादाचे आयोजन म्हणजेच लंगराचे आयोजन करायचे आहे, काही सामान घेऊन या. त्यांच्या आदेशाचे पालन म्हणून त्यांचा हा सेवक इथे हजर आहे. भण्डारा सुरु आहे. जिथे १८ लाख लोक रोज भोजन करीत आहेत, तो एक छोटा भोजन प्रसाद आहे असे ऐकून शेखतकी पटकन खालीच बसला. प्रत्येकाला दोहर आणि मोहर आणि तांदूळ, डाळ, तूप, कणिक रुपात कोरडा शिधा देण्यात येत होता. याला हे छोटासा भण्डारा म्हणत आहेत. परंतु ईर्षेचा जळणारा अग्नि त्याला थोडाच स्वस्थ बसू देतोय? तो तसाच राजाचा मुक्काम असलेल्या विश्राम गृहात गेला. सिकंदर लोधीने केशवाला विचारले, कबीर जी का नाही आले? केशवाने उत्तर दिले की मी त्यांचा सेवक बसलोय ना. मग त्यांनी येण्याची काय गरज आहे? त्यांना जेव्हा वाटेल तेव्हा येतील. हा भोजन प्रसाद तर तीन दिवस चालणार आहे. सिकंदर लोधी हत्तीवर बसून अंगरक्षकांच्या सोबत कबीर जींच्या झोंपड़ीत आले. हत्तीवरून उतरून राजाने दरवाजावर थाप मारली, म्हणाला परवरदिगार! दरवाजा उघडा. आपला शिष्य सिकंदर आला आहे. परमेश्वर कबीर जी म्हणाले, हे राजन! काही जण माझ्या मागे लागले आहेत. दररोज काही ना काही षड़यंत्र रचून त्रास देताहेत. आज खोटी पत्र पाठवून लाखों लोकांना बोलावले आहे. मी एक गरीब विणकर कपडे विणून आपल्या कुटुंबाचे पोषण करतो आहे. माझ्याकडे भोजन–प्रसाद (लंगर) करण्यासाठी आणि दक्षिणा देण्यासाठी पैसा अडका काही नाहीं आहे. मी रात्रिच कुटुंबासहित काशी क्षेत्र सोडून कुठेतरी लांब निघून जाईन. मी दरवाजा उघडणार नाहीं सिकंदर सम्राट होता, म्हणाला, हे कादिर अल्लाह (समर्थ परमात्मा)! मी आपल्याला ओळखले आहे. आपण मला नाहीं फसवू शकत आपण शेजारच्या खुल्या जागेत कसा भोजन प्रसाद सुरु केला आहे. आपला मित्र केशव आला आहे. त्याने भरपूर खाद्य सामग्री आणली आहे. लाखों लोक भोजन करून आपला जय–जयकार करीत आहेत. आपले दर्शन घेऊ इच्छितात. एकदाच दरवाजा उघडून आपल्या सेवकाला सिकंदरला दर्शन तरी द्यावे. कबीर जींनी संत रविदास जी ना दरवाजा उघडायला सांगितले. दरवाजा उघड्ताच सिकंदर राजाने वाहणा काढून मुकुटासहित साष्टांग दण्डवत् प्रणाम केला. नंतर

काशीत सुरु असलेल्या भोजन–प्रसादात येण्याची विनंती केली. जेव्हा परमेश्वर कबीर झोंपडीच्या बाहेर आले तेव्हा आकाशातुन सुंदर मुकुट आला आणि परमात्मा कबीर जी च्या डोक्यावर विराजमान झाला आणि आकाशातून सुगंधित फूलांचा वर्षाव होऊ लागला. राजाने परमेश्वर कबीर जींना हत्तीवर चढ़ण्याची विनंती केली. कबीर जींनी रविदास जींना बरोबर घेतले. राजा, रविदास जी आणि परमेश्वर कबीर जी तिघेही जण हत्तींवर बसून भोजन प्रसादाच्या ठिकाणी आले. सगळ्यांची कबीर शेठ यांच्याशी ओळख करून देण्यात आली. आणि मग केशवरूपात स्वतः डबल रोल करून उपस्थित असलेल्या संत–भक्तांना प्रश्न–उत्तर स्वरुपात २४ तास सत्संग ऐकवला. कित्येक लाख संतांनी आपल्या चुकीच्या भक्तिचा त्याग करून कबीर जी कडून अनुग्रह घेतला व आपले कल्याण साधले. भोजन प्रसादाच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेले सर्व सामान आणि तंबू बैलांवर लादून चालू लागले, त्यावेळी सिकंदर लोधी राजा आणि शेखतकी, केशव आणि कबीर जी एका जागेवर उभे होते आणि सगळे बैल आणि सोबत आणलेले व्यापाऱ्याच्या वेशातील सेवक गंगा पार करून निघून गेले. काही वेळातच सिकंदर लोधी राजा केशवाला म्हणाला आपण जावे. आपले बैल आणि साथीदार जात आहेत. जिकडे बैल आणि व्यापारी गेले होते, त्या दिशेने राजाने पाहिले तर कोणीच नव्हते. आश्चर्यचकीत होऊन राजा ने विचारले कबीर जी! ते बैल आणि व्यापारी इतक्या लवकर कुठे गेले? त्याच वेळी पाहता पाहता केशवदेखिल परमेश्वर कबीर जींच्या शरीरात समावून गेले. एकटे कबीर जी उभे होते. सर्व रहस्य समजुन सिकंदर लोधी राजाने म्हटले कबीर जी! ही सर्व आपलीच लीला होती. आपण स्वतःच परमात्मा आहात. शेखतकीच्या तर रोमा–रोमात ईर्षा आणि द्वेष ठासून भरला होता. तो म्हणू लागला असे भोजनप्रसाद तर मी शेकडो करू शकतो. हा काय भण्डारा केलाय? हा तर महौछा केला आहे.

महौछा म्हणजे कोणा वृध्दाची गती करण्यासाठी बळजबरी गुरु कडून करण्यात येणारे अनुष्ठान. त्यासाठी अतिशय निम्न दर्जाचे सामान आणले जाते. जे विशेष आनंदाच्या प्रसंगी केले जाते त्या अनुष्ठानास निकृष्ठ जेवणावळ असे म्हणतात. त्याला अनुष्ठान असेही म्हणतात यामध्ये अनुष्ठान करणारा मनासून खर्च करतो. संत गरीब दास जींनी म्हटले आहे की :–

गरीब, कोई कह जग जौनार करी है, कोई कहे महौछा।<br>
बड़े बड़ाई किया करें, गाली काढे.औछा।।

शब्दार्थ :– त्या समारंभास म्हणजे अन्न भंडारास पाहून चांगल्या व्यक्ती तर म्हणत होते की जग जौनर म्हणजे म्हणजे मोठ्या मनाने धर्मकार्यामध्ये पैसे खर्च करून धर्माचे काम केले आहे म्हणजे धर्म यज्ञ करून अन्नदान केले आहे म्हणजे जेवण खाऊ घातले आहे. जे अहंकारी दृष्ट व्यक्ती होते ते म्हणत होते की विधी केला आहे म्हणजे मन मारून कमी खर्चात जेवण घातले आहे.

सारांश :– कबीर जी ने भक्तांना उदाहरण घालून दिले आहे की जरी आपण माझ्यासारखी मनापासून खरी भक्ति केली तसेच प्रामाणिकपणे स्वतःचा उदरनिर्वाह केल्यास परमात्मा आपल्याला नक्की मदत करतो.

वास्तविक भक्त हेच शेठ म्हणजेच धनवंत आहेत. भक्ताच्या जवळ दोन्ही संपत्ती आहेत. संसारात जे पाहिजे ती संपत्ती देखिल भक्ताजवळ असते तसेच सत्य साधना रूपी संपत्ती देखिल भक्ताजवळ असते.

## त्या भंडाऱ्यात आणखी एक चमत्कार झाला

त्याच ठिकाणी भोजन प्रसाद (लंगर) तीन दिवस सुरु होता. प्रत्येक माणूस दिवसातून किमान दोन वेळा तरी भोजन घेत होता. काही जण तर तीन-चार वेळा देखिल भोजन करीत होते. प्रत्येक भोजनानंतर दक्षिणा म्हणून एक मौहर (१० ग्राम सोना) आणि एक दौहर (महागडी सूती शाल) देण्यात येत होती. या लोभापोटी सारखे सारखे भोजन घेतले जात होते. सलग तीन दिवस १८ लाख व्यक्तिच्या शौच आणि लघवीने काशीचा चोहीकडून उकिरडा झाला असता. काशीचे रहिवासी आणि ते १८ लाख पाहुणे आणि एक लाख सेवेकरी सतलोकातून आलेले होते. त्याच्या मलमुत्राच्या घाणीने श्वांस घेणे दुष्कर झाले असते. परंतु असे काही वाटले देखिल नाही. सगळे दिवसातून दोन-तीन वेळा भोजन करीत होते, परंतु शौचास किंवा लघुशंकेस एकदा देखिल जात नव्हते. इतके स्वादिष्ट भोजन होते की पोटभर जेवत होते. आधीपेक्षा दुप्पट जेवत होते. त्या सर्वांना मध्यान्ही काळजी लागून राहिली की न पोटात जड वाटतंय आणि भूक देखिल व्यवस्थित लागते आहे. आपण कुठे आजारी पडू नये म्हणजे झाले. सतलोकातून आलेल्या त्या सेवकांना ही समस्या सांगितल्यावर तर त्यांनी म्हटले की हे भोजन अशा जड़ी-बूटियांनी बनविले आहे ज्यायोगे हे शरीरातच सामावून जाईल. आम्ही आमच्या भोजनात नेहमी याच वनस्पती वापरतो. आम्ही हेच सेवन करतो. आम्हाला कधीही शौच आणि लघवीदेखिल होत नाही. आपण निश्चिंत असा. तरीदेखिल विचार करीत होते जेवण केलय तर काही ना काही मल निघाला पाहिजे. त्यांना शौचास लागली. सगळे गावाच्या बाहेर आले. शौचास बसण्यासाठी एकान्त जागेचा शोध घेत होते तर पोटातून वायू बाहेर पडला. पोट हलके झाले आणि वायुपासून केवड्याचे सुगंधी पाणी शिंपडल्यावर जसा सुगंध येतो, तसा सुगंध आला. हे सर्व पाहून सर्वांचा सेवेकऱ्यांच्या सांगण्यावर विश्वास बसला. मग त्यांची भीती गेली. तरीदेखिल काही जणांच्या डोळ्यांवर अज्ञानाची पट्टी तशीच होती. परमेश्वर कबीर जींना त्यांनी परमेश्वर म्हणून स्वीकारले नाही.

पुराणांमध्ये देखिल अशी गोष्ट येते की अयोध्येचे राजा ऋषभ देव राज्याचा त्याग करून अरण्यात साधना करत होते. त्यांचे भोजन स्वर्गातून येत असे. त्यांच्या मलातून (पाखाने) सुगंध येत असे. आजूबाजूची माणसे हे पाहून आश्चर्यचकीत होत असत. त्याच प्रमाणे सतलोकातील आहार घेतल्यानंतर मल येत नाही, केवळ सुगंधच येतो. स्वर्ग ही सतलोकाची नक्कल आहे आणि नकलीही (Duplicate) आहे.

प्रश्न :- भक्ति करण्यासाठी घराचा त्याग करणे किंवा घरीच राहून भक्ति करणे, यामध्ये काय श्रेष्ठ आहे?

उत्तर :- शास्त्रविधी अनुसार परम गुरूकडून अनुग्रह घेऊन भक्तिने घालून दिलेल्या मर्यादांचे निर्वाहन करत आजीवन साधना केल्यास मोक्ष प्राप्त होईल. जरी घराचा त्याग करून अरण्यात गेले, तरीही भोजन व अन्य कारणांसाठी पुन्हा गाव किंवा शहरातील गृहस्थिंच्या घरीच जावे लागेलच. उन-पाउस थंडी पासून बचाव करण्यासाठी एखादी झोपडी बनवावी लागेलच. वस्त्र देखिल मागावे लागतीलच. म्हणजे मग पुन्हा नवीन घर करणे आलेच. त्यामुळे प्रपंचातच राहा. खरीखुरी साधना करा, मोक्ष निश्चित आहे. विवाह होवो अथवा न होवो, दोघेही भक्ति करून मोक्ष प्राप्त करू शकतात. पुष्कळ जण म्हणतात की भक्ति फक्त ब्रह्मचारी जीवनातच होऊ शकते. याचेही उत्तर आहे की खरीखुरी साधना शास्त्रानुसार करून दोघेही मोक्ष प्राप्त करू शकतात.

उदाहरण :– आम्ही असे समजतो की भक्त ध्रुव जी आणि भक्त प्रहलाद जी यांनी मोक्ष प्राप्त केला आहे. या दोघांनीहि विवाह केला होता. त्यांनाही मुलेबाळे होती. प्रहलादांना बैलोचन नावाचा पुत्र होता. त्यांचा नातू म्हणजे राजा बली याने शंभर यज्ञ केले होते. भगवन्तांनी वामन रूप धारण करून तीन पावलांच्या एवढी जमीन दक्षिणा म्हणून मागितली होती. फक्त ब्रह्मचारीच मोक्षाचे अधिकारी आहेत, असे म्हणतात. तसा विचार केल्यास, हिजड़े तर आजीवन ब्रह्मचारीच आहेत. मग ते तर मोक्षाचे अधिक अधिकारी झाले.

सत्य साधना करून हिजड़े, ब्रह्मचारी, गृहस्थ आणि स्त्रिया सर्वजण मोक्ष प्राप्त करू शकतात. संत गरीबदास जी यांनी कबीर जींची खालील वचने उधृत केली आहेत :–

गरीब, डेरे डांडै खुश रहो, खुसरे लहें ना मोक्ष।
ध्रुव–प्रहलाद पार हुए, फिर डेरे (घर) में क्या दोष।।१
गरीब, केले की कोपीन है, फूल–पात–फल खांई।
नर का मुख नहीं देखते, बस्ती निकट नहीं जाईं।।२
गरीब, वे जंगल के रोझ हैं, जो मनुष्यों बिदके जाहीं।
निश दिन फिरो उजाड़ में, यूं सांई पावै नाहीं।।३
गरीब, गाड़ी बाहो घर रहो, खेती करो खुशहाल।
सांई सिर पर राखिये, सही भक्त हरलाल।।४

भावार्थ :– वाणी सख्या १ का भाव अर्थ वर सांगितला आहे.

वाणी सख्या २–३ चा भावार्थ :– काही लोक सांगत होते की आम्ही संतांचा शोध घेत जंगलात, डोंगर दऱ्या पालथ्या घातल्या. एका ठिकाणी जंगलात एक साधु रहात होते. या साधबाबा विषयी आजूबाजूच्या गावातील लोक सांगत होते की ते केळीची पाने लंगोट म्हणून बांधतात आणि जंगलातील पाने–फळे–फूले खाऊन जगतात. गावाच्या जवळ देखिल येत नाहीत. माणसांचे तोंड देखिल पाहत नाहीत. बघितलेच, तर जंगलात धूम ठोकतात. लोक सांगत होते की ज्याला त्यांचे दर्शन होते, तो श्रीमंत होतो. त्याचे दर्शन घेण्यासाठी आम्ही त्या जंगलात सकाळपासून संध्याकाळ पर्यंत थांबायचो. एक दिवस पळणाऱ्याची पाठ दिसली. दर्शन झाले असते तर उध्दार झालो असतो. तर ते धूम ठोकत असत. विचार करा अशी व्यक्ति अपराधी असते व पोलिसांपासून वाचण्यासाठी अशी नाटके करीत असते. संत गरीबदास जींनी अशा माणसांना नील गायीची उपमा दिली आहे. जो लोकांना घाबरून लपून छपून राहतो, असे लोक दिवस रात्र जंगलात भटकले तरी त्यांना परमात्मा प्राप्त होऊ शकत नाही.

भावार्थ :– वाणी सँख्या ४ चा भावार्थ :–

गरीब, गाड़ी बाहो घर रहो, खेती करो खुशहाल।
सांई सिर पर राखिये, सही भक्त हरलाल।।

भावार्थ :–

# ''हरलाल जाटाची कथा''

बेरी गावात (जिला-झज्जर, प्रान्त-हरियाणा) एक हरलाल नावाचा जाट शेतकरी होता. अतिशय धार्मिक प्रवृत्तिचा होता. त्याचे सर्व कुटुंब धार्मिक विचाराचे होते. भगव्या वेशातील एक माणूस बेरी गावाच्या धर्मशाळेत थांबला होता. त्याने काही दिवस सत्संग केला. भक्त हरलालजींनी त्याची विचारपूस केली, तेव्हा समजले त्यांच्या घरी कोणीच नाही. माता-पिता लहानपणीच निर्वतले. भक्ति करण्यासाठी घर सोडले. भक्त हरलालजींनी त्यांना विनंती केली की आपण आमच्याच घरी राहा. आम्हाला संत सेवेची संधी मिळेल. तुम्हाला भक्ति करण्यास पूरेसा वेळ मिळेल भगव्या कपड्यातील व्यक्तिने त्यांना होकार दिला. भक्त हरलाल जी यांची दोन घरे होती. एकात स्त्रिया रहात. दूसरे घर काही अंतरावर होते, तिथे जनावरे बांधत होती आणि पुरूष सदस्य रहात होते. त्याला गोठा म्हणतात. त्या गोठ्याच्या वर एक खोली होती. साधु बाबांना त्या खोलीत राहण्याचा आग्रह केला. सर्व कुटुंब त्यांची सेवा करत असे. दोन-तिन्ही वेळेस भोजन वाढत असत. काही वर्षांनी त्या साधु बाबांनी देह ठेवला. त्यांचे अंतिम संस्कार करून स्वतःच्या शेतात त्यांचे स्मारक उभारले.

श्री हरलाल जाट जी बैलगाड़ीमधून व्यापाऱ्याचे सामान एका बाजारातून दुसऱ्या बाजारात्त भाडे घेऊन ने-आण करीत असत. जसे हल्ली ट्रक किंवा मालमोटारीने भाड़े घेऊन माल एका मंडई मधून दुसऱ्या मंडईत घेऊन जातात तसे. सन् १७५० च्या सुमाराचा कालावधी होता. त्या काळात साखर, गहू, तांदूळ, ज्वारी, गुळ, बाजरी, इत्यादी भाड्याने बैलगाड़ी मधून भाड़े घेऊन नेले जात असे. बेरीहून नजफगढ़च्या बाजारात जायचा रस्ता छुड़ानी गावातून जात असे. श्री हरलाल जीचा एक बैल पांढऱ्या रंगाचा होता आणि कामचुकार होता. गाड़ी ओढता ओढता मध्येच बसून जायचा. त्याला मारून मारून उठवावे लागायचे. काही अंतर गेल्यावर परत बसायचा. हे असे अनेक दिवस सुरूच राहिले. एक दिवस उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सकाळी जवळपास ४ वाजता श्री हरलाल जी नजफगढ़च्या बाजारातून गाड़ी भरून परतत होते. छुड़ानी गावाजवळ एका विहिरीपासून काही अंतरावर बैल खाली बसला. हरलाल जी त्याला मारू लागले. त्या विहिरीवर छुड़ानी गावचे संत गरीबदास जी स्नान करत होते. त्यांनी सांगितले की हरलाल! मारू नका. गायीपासून जन्माला आला आहे. संत गरीबदास जी हे जाट शेतकरी होते. हरियाणाची जी साधारण वेशभूषा म्हणजेच धोतर-सदरा घालत असत. हरलाल जी त्याना म्हणाले बंधो! याने माझे रक्त आटवले आहे. अर्धा मैल चालतो. पुन्हा खाली बसतो. संत गरीबदास जी त्या बैलाजवळ गेले आणि त्याच्या कानात काही सांगितले. त्यावेळी तो पांढरा बैल त्वरित उठला. संत गरीबदास जी म्हणाले आता हा बैल व्यवस्थित चालेल. श्री हरलाल जीचा त्यावर विश्वास बसला नाहीं. गाड़ी घेऊन निघाले. तो पांढरा बैल दूसऱ्या बैलापेक्षाही वेगाने जाऊ लागला. छुड़ानी गावापासून बेरी पर्यंत बसलाच नाही याचे श्री हरलालजींना आश्चर्य वाटले आणि त्यांच्या आनंदाला काही पारावारच राहिला नाही. त्यांनी घरातील त्यांच्या कुटुंबियांना हे सर्व सांगितले तर त्यांचाही विश्वास बसेना. त्यानंतर हरलाल जाट छुड़ानी गावात गेले. त्यांनी चुकून त्या स्नान करणाऱ्या माणसाचे नाव गाव विचारायचेच राहून गेले. परत छुड़ानी गावात परत आले. त्यांनी विचार केला, हे रोज त्याच वेळेस स्नान करण्यासाठी येतच असतील. म्हणून सकाळी ४ वाजताच त्या विहिरीपाशी गेले तेव्हा गरीबदास जींनी विचारले की काय हरलाल जी! त्या बैलाबाबत जाणून घ्यायला आला आहेस काय? हरलाल जी म्हटले की आपल्यापासून काय लपून राहणार? आपण काय

**जादू केली हे जाणून घेण्यासाठी मी आलो आहे. तो बैल तर दूसऱ्या बैलापेक्षाही वेगाने चालतोय. संत गरीबदास जींनी विचारले की एक सांगा, तुमच्या घरी एक साधु रहात होते, त्यांची काय परिस्थिती आहे? मी एक दिवस त्यांना भेटून आलो होतो. त्या दिवशी तुम्ही गाडी घेऊन कुठेतरी गेला होतात. हरलाल जी म्हणाले, त्यांनी चार वर्षापूर्वीच आपले शरीर सोडले आहे. त्यांचे स्मारक देखिल बांधले आहे. संत गरीबदास जी म्हणाले की हा पांढरा बैल म्हणजेच तो पाखण्डी बाबा आहे. मी त्याच्याशी ज्ञानचर्चा केली होती. त्याला समजावले होते की तुमची भक्ति चुकीची आहे. तुम्ही भक्ति पण नाहीं करत, फक्त खाता आणि झोपा काढता. परमात्माच्या दरबारी जेव्हा सगळा हिशोब होईल तेव्हा तुम्हाला कळेल, जे खाता आहात तेच द्यावे लागेल.**

गरीब, नर से फिर पशुवा कीजै, गधा-बैल बनाय।
छप्पन भोग कहाँ मन बोरे, कुरड़ी चरने जाय।।
गरीब, तुमने उस दरगाह का महल ना देखा। धर्मराज कै तिल-तिल का लेखा।।

**परंतु तो नाराज झाला आणि म्हणाला तू ग्रहस्थी आहेस, मी बाल ब्रह्मचारी आहे. आपण जावे. एका साधुला शिकवायला आला आहे.**

कबीर, राम नाम से खिज मरैं, कुष्टि हो गल जाय।
शुकर होकर जन्म ले, नाक डूबता खाय।।

**भावार्थ :- कबीर जींनी म्हटले आहे की अहंकारी व्यक्ति रामनामाची चर्चा केल्यामुळे त्रासतो. मग त्याला कोढ़ (कुष्ट रोग) होऊन तो मरतो. पुढला जन्म डुक्कराचा होऊन घाणीत लोळतो. डुक्कराचे नाक देखिल घाणीचाच वास घेत त्यात बुडालेले असते. अशा प्रकारे जो खोटी भक्ति करून खोटा सत्पुरुष बनून लोकांमध्ये फुकटचा भ्रम निर्माण करतो, त्याला कष्टाचीच कामे करावी लागतात.**

**हरलाल जी! मी त्याच्या कानात इतकेच सांगितले त्या दिवशी मी तुला काय सांगितले होते ते आठव, तेव्हा तुम्ही ते मानले नाही. अरे जीव! तुला त्या शेतकऱ्याचे ऋण फेडायचे आहेच, मग ते मार खाऊन चुकव किंवा आनंदाने फेड. त्यापासून तुझी सुटका नाही. त्या बैलाचे शरीर धारण केलेल्या नकली बाबाला सर्व गोष्ट आता नीट ध्यानात आली आहे. हा आधी कुठल्यातरी जन्मात परमेश्वर कबीर जीचा शिष्य झाला होता. परंतु पुन्हा गिरी पंथात गेला होता. त्यामुळेच हा सूमार्गाचा त्याग करून जन्म-मरणाचे कष्ट भोगतो आहे. आता तो कधीही बसणार नाही. हरलाल जींनी गरीबदास जीचे चरण धरले आणि म्हटले की संत महाराज! मला आपला शिष्य करून घ्या घरदार सोडून आपल्या सोबत यायला मी तयार आहे. भक्ति शिवाय जीवाला किती कष्ट करावे लागतात. संत गरीबदासजींनी सांगितले आहे:-**

गरीब, गाड़ी बाहो घर रहो, खेती करो खुशहाल।
सांई सिर पर राखिये, सही भगत हरलाल।।

**भावार्थ :- परमात्माला प्राप्त करण्यासाठी घर सोडण्याची काहीही आवश्यकता नाहीं. आपले शेतीचे आणि वाहतुकीचे कर्म आनंदाने करा. घरीच राहा. परमात्माची मी सांगेन तशी भक्ति करत रहा. तुम्ही खरे भक्त म्हणून ओळखले जाल.**

गरीब, नाम उठत नाम बैठत, नाम सोवत जाग रे।
नाम खाते नाम पीते, नाम सेती लाग रे।।

हेच प्रमाण यजुर्वेद अध्याय ४० के मंत्र १५ मध्ये आहे की :-

वायु अनिलम् अथइदम् अमृतम् भस्मन्तम् शरीरं।
ओम् (ॐ) कृतु स्मर किलवे स्मर कृतम् स्मर।।

भावार्थ :- संत गरीबदास जींनी म्हटले की जो खरा साधनेचा सत्य मंत्र मी आपणास देईन, त्याचा उठता बसता खाता पिता म्हणजेच सकाळी झोपून उठलात, काही वेळ जप करा. झोपण्यापूर्वी काही वेळ जप करा. बसताना, उठताना परमात्माचे नामस्मरण करा, अशा प्रकारे घरातील कामे देखिल होतात. नामस्मरणही होते. जसे गावात आपण बघतो आहोत की लोक संपुर्ण दिवस पत्ते खेळत असतात. हुक्का ओढत वेळ वाया घालवत आहेत. राजकरणावर चर्चा करून कुणाची निंदा करतात, किंवा नाटक-सिनेमा पाहून वेळ वाया घालवत आहेत. तोच वेळ परमात्माची भक्ति आणि सत्संग चर्चा ऐकण्यात व्यतीत केला तर मोक्ष शक्य आहे.

श्री हरलाल जाट जी अनुग्रह घेऊन घरी आले. कुटुंबियांना सर्व घडले ते सांगितले. त्या नकली बाबाची समाधि तोड़ली आणि सर्व कुटुंबियांना घेऊन छुड़ानी येथे आले. संत गरीबदास जी कडून अनुग्रह दिला. आपले आणि आपल्या कुटुंबाचे कल्याण करविले. संत गरीबदास जींच्या आदेशानुसार त्या पांढऱ्या बैलाला कधीही गाड़ीला किंवा नांगराला जुंपले नाही. त्याला सर्व अन्य जनावरांपासून वेगळ एका वेगळ्या खोलीत बांधले. उत्तम चारा खाऊ घातला. संत गरीबदास जी म्हणाले की हा भक्त होता. कर्म बिघडल्याने तो पशु झाला आहे. याच्याकडून काम करून घेऊ नका. तो बैल पाच वर्ष जगला. भक्त हरलालजींनी त्याला भक्त समजून त्याची सेवा केली. परमात्मा कबीर जींनी आपल्या वाट चुकलेल्या भक्ताची पशु जीवनात मदत केली. त्याला पुन्हा कधी मानव जन्म मिळाला तर पुढे त्याच्या भाग्यात कोणी परम गुरु प्राप्त झाल्यास त्याला मुक्ति आहे, अन्यथा पुन्हा चौऱ्यांशी लाख योनिमध्ये कष्ट आहेतच.

भक्त हरलालजींचे वंशज बेरीमध्ये आजही या घटनेचे साक्षी आहेत.

## ''तंबाखू सेवन करणे महापाप आहे''

संत गरीबदास जींनी भक्त हरलालजींना म्हटले की आपण (जे कोणी अनुग्रह घेतात) त्यांनी तंबाखूचे (हुक्का, बीड़ी, सिगरेट, चिलिम इत्यादि स्वरुपात देखिल) व आणि अन्य नशीली वस्तुंचे कधीही सेवन करू नये. भक्ताने म्हटले की महाराज जी! तंबाखू तर जवळपास सर्वच शेतकरी सेवन करतात. त्याने काय नुकसान होणार आहे?

उत्तर :- संत गरीबदास जींनी सांगितले की तुम्ही रामायण आणि महाभारतातील कथा तर ऐकल्या असतील. त्यामध्ये हुक्का सेवन केल्याचे काही ठिकाणी वर्णन आहे. तंबाखू कशी उत्पन्न झाली ते सांगू, तर ऐक!

## ''तंबाखूच्या उत्पत्तीची कथा''

एक ऋषि आणि एक राजा साडू होते. एक दिवस राजाच्या राणीने आपली बहिण म्हणजे ऋषिच्या पत्नीला असा निरोप पाठविला की पूर्ण कुटुंबाने आमच्याकडे भोजन करण्यास यावे. मी तुला भेटू इच्छिते आणि तुझी अतिशय आठवण येते आहे. आपल्या बहिणीचा हा निरोप ऋषिच्या पत्नीने आपल्या पतिला सांगितला तेव्हा ऋषि जी म्हटले की साडूशी मैत्री चांगली नाही. तुझी बहिण वैभवशाली आयुष्य जगते आहे. राजाला धन आणि राज्याच्या सत्तेचा अहंकार असतो. ते आपली बेअब्रू करण्यासाठी आपल्याला बोलावत आहेत. कारण मग आपल्याला देखिल त्यांना आपल्या घरी भोजनासाठी येण्याचे आमंत्रण करावे लागेल. आपण

त्यांच्या सारखी भोजन-व्यवस्था जंगलात करू शकत नाही. हे सर्व साडूचे षड्यंत्र आहे. आपल्या समोर ते स्वतःला अतिशय महान व मला गरीब सिद्ध करू इच्छित आहेत. तेव्हा तुम्ही हा विचार सोडून द्यावा. न जाण्यातच आपले हित आहे. परंतु ऋषिच्या पत्नीने नाही ऐकले. ऋषि आणि पत्नी व त्यांचे कुटुंब राजाचे पाहुणे म्हणून गेले. राणीने बहुमूल्य दागिने घालून बसली होती. भरजरी वस्त्रे नेसली होती. तर ऋषिच्या पत्नीच्या गळ्यात रामनामाची जपमाळ व सामान्य वस्त्रे नेसलेली पाहून दरबारातील कर्मचारी-अधिकारी हसत होते की हा आहे राजाचा साडू. कुठे राजा भोज, कुठे गंगू तेली. ही चर्चा ऋषिचे कुटुंबीय ऐकत होते. भोजन झाल्यानंतर ऋषिच्या पत्नीने देखिल म्हटले की तुम्ही आमच्या इथे या या दिवशी भोजन करण्यास यावे.

ठरलेल्या दिवशी राजा हजारों सैनिक घेऊन सहकुटुंब साडू ऋषिच्या कुटीमध्ये आला. ऋषिने स्वर्ग लोकाचा राजा इन्द्राला विनंती करून एक कामधेनु (सर्व कामना यानि इच्छा पूर्ति करणारी गाय, जिच्या असण्यामुळे खाण्याच्या कोणत्याही पदार्थाची कामना केल्यास ती त्वरित प्राप्त होते अशी पुराणात समजूत आहे.) मागीतली. त्या बदल्यात ऋषिने आपल्या सर्व पुण्य कर्माचा संकल्प केला होता. इन्द्र देवाने एक कामधेनु आणि एक मोठा तंबू आणि काही सेवक पाठविले. तंबूत गायीला सोडून दिले. ऋषि कुटुंबीयांनी गोमातेची आरती केली. आपली मनोकामना सांगितली. त्याच वेळी छप्पन (५६) प्रकारची पक्वान्ने चांदीच्या पराती, टोप्ल्या, कढयामध्ये स्वर्गातून आली आणि तंबूत ठेवायला लागले. लाडू ,जिलेबी, कचौरी, दही बड़े, हलवा, खीर, दाल, मांडे आणि पूरी, बुंदी, बर्फी, रसगुल्ले इत्यादी पक्वान्नांनी अर्धा एकर तंबू भरून गेला. ऋषिने राजाला म्हटले की भोजन सेवन करा. राजाने त्याची बेअब्रू करण्यासाठी म्हटले की माझे सैन्य देखिल सोबत भोजन करेल. घोड्याना देखिल चारा खायला घालायचा आहे. ऋषिने म्हटले की प्रभु कृपेने सर्व व्यवस्था होइल. आधी आपण आणि सैनिकांचे तर भोजन होऊ दे. राजा उठून भोजन करण्याच्या जागी बसला. तिथे देखिल सुंदर कपड़े अंथरले होते. राजा हे सर्व बघून आश्चर्यचकीत झाला. मग चांदीच्या ताटात वेगवेगळया प्रकारचे भोजन सेवक आणून ठेवायला लागले. अन्नदेवाची स्तुति करून ऋषिने भोजन सुरु करण्याची विनंती केली. राजा ने विचार केला, याच्यापुढे माझा भोजन भंडारा तर काहीच नव्हता. आणि मी तर फक्त ऋषि-कुटुंबालाच भोजन करविले होते. ते देखिल तीन-चार पदार्थच बनविले होते. राजाने लाजेने मान खाली घातली. जेवण करताना राजा अतिशय त्रासला होता. ईर्षाची आग त्याच्या मनात पेटली होती. बेअब्रू होऊन त्याची मान खाली गेली. सर्व सैनिक जेवण करून अतिशय तृप्त झाले. राजाचे रक्त खवळून उठले होते. आपल्या तंबूत जाऊन त्याने ऋषिना बोलावले आणि विचारले या जंगलात आपण हे भोजन बनविले कसे? ना कुठे कढई सुरु आहे ना, न कुठे चूल पेटवली आहे. ऋषिने सांगितले की मी आपले पुण्य आणि भक्ति पणाला लावून स्वर्गातून एक गाय उसनी मागितली आहे. त्या गायीचे असे वैशिष्ट्य आहे की आम्हाला जितके भोजन पाहिजे तेवढे त्वरीत उपलब्ध होते. राजाने म्हटले की माझ्यासमोर ते उपलब्ध करून दाखवा तरच मला विश्वास होइल. ऋषि आणि राजा तंबूच्या द्वारावर उभे राहिले. आतमध्ये फक्त गाय उभी होती. दाराकडे तिचे तोंड होते. तंबू रिकामा होता कारण सर्वांनी भोजन घेतले होते व उरलेले अन्न सेवक घेऊन गेले होते. गाय ऋषिच्या अनुमतिची वाट पाहत होती. राजा ने म्हटले की ऋषि जी! ही गाय मला द्या. माझ्याकडे खूप मोठी सेना आहे. त्यांचे भोजन हिच्या कडूनच बनवून घेईन. तुम्हाला काय उपयोग आहे हिचा? ऋषिने सांगितले, राजन! मी ही गाय स्वर्गातून उसनी आणली आहे आणि मी काही तिचा मालक नाही. मी ती आपणास

देऊ शकत नाही. राजाने लांब उभ्या असलेल्या सैनिकांना सांगितले की या गाईला घेऊन चला. साडूची बदललेली नियत ऋषिच्या लक्षात आली. त्याच वेळी ऋषिने गोमातेला आपआपल्या लोकात म्हणजेच तिचा धनी स्वर्गराज इन्द्र याच्याकडे लवकर परत जाण्यास सांगितले. त्याचवेळी कामधेनुने तंबू फाडून सरळ आकाशात झेप घेतली. राजाने गाइला खाली पाडण्यासाठी गाईच्या पायात बाण मारला. गाईच्या पायातून रक्त येऊन पृथ्वीवर वाहायला लागले. पण गाय जखमी अवस्थेत स्वर्गात गेली. जिथे जिथे गायीचे रक्त पडले तिथे तंबाखू उगवली. मग त्यातून बीज उत्पन्न होऊन अनेक रोपे आली. संत गरीबदास जी यांनी म्हटले आहे की :-

**तमा + खू = तमाखू.**

खू नाम खून का तमा नाम गाय। सौ बार सौगंध इसे न पीयें-खाय।।

**भावार्थ :- भावार्थ आहे की फारसी भाषेत ''तमा'' म्हणजे गाय. खू = खून म्हणजे रक्त. रक्त म्हणजेच ही तंबाखू गायीच्या रक्तापासून उपजली आहे. तिच्यावर गायीचे केस रोमासारखे असतात. अरे माणसा! या तंबाखूचे सेवन कोणत्याही स्वरुपात करू नकोस अशी तुला शपथ आहे. तंबाखूचे सेवन केल्याने गायीचे रक्त प्यायल्यासारखे पाप तुला लागेल. मुसलमान धर्मातील लोकांना हिन्दुंकडून असे समजले की तंबाखूची अशी उत्पत्ती झाली आहे. म्हणून त्यांनी तंबाखूला गायीचे रक्त समजून ती खायला आणि हुक्के प्यायला सुरवात केली. कारण गोमास खाणे हा आपला धर्म असल्याची समजूत करून घेऊन आपले मुसलमान बंधू गायीचे मास प्रसाद म्हणून खातात. वास्तविक हजरत मुसलमान धर्माचे प्रवर्तक मुहम्मद यांनी कधीही कोणत्याही जीवाचे मास सेवन केले नाही.**

गरीब, नबी मुहम्मद नमस्कार है, राम रसूल कहाया।
एक लाख अस्सी कू सौगंध, जिन नहीं करद चलाया।।
गरीब, अर्स कुर्श पर अल्लह तख्त है, खालिक बिन नहीं खाली।
वै पैगंबर पाक पुरूष थे, साहेब के अबदाली।।

**भावार्थ :- नबी मुहम्मद हे एक आदरणीय महापुरूष होते आणि परमेश्वराचे दूत होते. तसे तर एक लाख ऐंशी हजार पैगंबर मुसलमान धर्मात (बाबा आदम पासून महम्मदा पर्यंत)मानले गेले आहेत. ती सर्व अतिशय पवित्र माणसे होती, व त्यांनी कोणत्याही पशुवर व पक्षावर कधीही तलवार चालवली नव्हती. त्यांची तर परमात्मावर श्रद्धा होती. परमात्माची कृपा पात्र होते. नंतर काही मुल्ला-मौलवी यांनी मांस खाण्याची पद्धत सुरू केली, जी पुढे धार्मिकतेची विकृती झाली (बिघडलेले रूप). त्या आधारावरच सर्व मुसलमान बंधू पाप सेवन करीत आहेत. मग संभ्रमित मुसलमानांनी तंबाखू सेवन करण्यास (कच्ची, हुक्का, खाने-पिणे) इत्यादी स्वरुपात सुरवात केली. भोळ्या भाबड्या हिन्दु लोकांना त्यांची चाल समजली नाही. त्यांनी सांगितले म्हणून यांनी तंबाखू उत्साहाने खाण्यास सुरवात केली. वर्तमानात तर हा शिष्टाचार झाला आहे. हे अतिशय चुकीचे आहे, अज्ञानाचा परिणाम आहे. चुकून देखिल तंबाखूचे सेवन करू नये. संत गरीबदास जींनी परत तेच सांगितले आहे की भक्त हरलाल जी! आणि आता ऐका तंबाखू सेवन केल्याचे पाप :-**

गरीब, परद्वारा स्त्री का खोलै। सत्तर जन्म अंधा हो डोलै।।१
मदिरा पीवै कड़वा पानी। सत्तर जन्म श्वान के जानी।।२
मांस आहारी मानवा, प्रत्यक्ष राक्षस जान। मुख देखो न तास का, वो फिरै चौरासी खान।।३
सुरापान मद्य मांसाहारी। गमन करै भोगै पर नारी।।४

सत्तर जन्म कटत है शीशं। साक्षी साहेब है जगदीशं।।५
सौ नारी जारी करै, सुरापान सौ बार। एक चिलम हुक्का भरै, डूबै काली धार।।६
हुक्का हरदम पीवते, लाल मिलांवे धूर। इसमें संशय है नहीं, जन्म पीछले सूअर।।७

**उपरोक्त वाण्यांचा भावार्थ :-**

**पहिल्या चरणात असे म्हटले आहे की :- जो माणूस अन्य स्त्रीशी अवैध सम्बन्ध ठेवतो आहे, त्या पापामुळे त्याला आंधळ्याचे सत्तर जन्म प्राप्त होतात. आंधळे गाढव, आंधळा बैल, आंधळा मनुष्य किंवा आंधळी स्त्री सलग सत्तर जन्मांचे भोग भोगतो.**

**दुसऱ्या चरणात म्हटले आहे की :- कडू दारूरूपी पाणी पिणारा गलिच्छ नाल्यांचे पाणी पितो. आणि त्यामुळे सत्तर जन्म कुत्र्याचे मिळून त्यातील भोग भोगतो. पोळी न मिळाल्यास विष्ठा (टट्टी) सेवन करतो.**

**तिसऱ्या चरणात म्हटले आहे की :- जी माणसे मांस खातात, ते तर राक्षसच आहेत. त्यांचे तर तोंड देखिल पाहू नये. त्यांच्या बरोबर राहील्याने इतर लोकसुध्दा मांस खाण्याच्या आहारी जाऊ शकतात. म्हणून त्यांच्यापासून थोडे लांबच रहा ते चौऱ्यांशी लाख योनि भोगतील.**

**चौथ्या व पाचव्या चरणात म्हटले आहे की :- बाई आणी बाटलीचा उपभोग घेणाऱ्या मांसाहारी लोकांना आणखी पाप कर्मांचे फळ भोगावे लागते. त्यांना सत्तर जन्म माणूस किंवा बकरा-बकरी, किंवा म्हैस किंवा कोंबड्याचा जन्म प्राप्त होतात आणि त्याच जन्मात त्यांची मान कापले जाते. विश्वास ठेवा, हे मी त्या परमात्माच्या साक्षीने सांगत आहे.**

**सहाव्या चरणात म्हणतात :- एका चिलिमीत तंबाखू भरून हुक्का ओढणाऱ्याला जे पाप लागते ते ऐक. एकदा परस्त्री गमन करणारा, एकदा दारू पिणारा, एकदा मांस खाणारा पापामुळे उपरोक्त भोग भोगतो आहे. शंभर स्त्रियांचा उपभोग घेऊन आणि शंभर वेळा दारू पिऊन जे पाप लागते, ते पाप एक चिलीम भरून हुक्का ओढणाऱ्याला किंवा देणाऱ्यांला लागते. विचार करा. तंबाखू (हुक्का बीड़ी-सिगरेट फुकणारे, खाणारे) सेवन करणाऱ्याला किती पाप लागेल? त्यामुळे उपरोक्त सर्व पदार्थांचे सेवन कधीच करू नका.**

**सातव्या चरणात म्हटले आहे :- समाजातील लोकांचे पाहून काही जण हुक्का किंवा अन्य नशा आणणाऱ्या वस्तुचे सेवन करण्यास सुरवात करतात. जरी सत्संग ऐकून वाईट गोष्टी सोडत असतील तर ते जीव मागील जन्मात देखिल मनुष्य असतील. त्यांना व्यसन लागले नसते. परंतु जो वारंवार सत्संग ऐकून देखिल तंबाखू इत्यादी नशा आणणाऱ्या गोष्टी सोडत नाही, तो मागील जन्मी नक्की डुक्कर असला पाहिजे. डुकराच्या शरीरातील घाणेरडा वास (Bad Smell) घेतल्यास तंबाखू सेवनाचे व्यसनच लागते. असे लोक हुक्का व अन्य व्यसनाचा लवकर त्याग करू शकत नाहीत. ते आपल्या अमूल्य मानव शरीराची शरीररुपी हिऱ्याची माती करुन टाकतात. लाल माती करत आहेत. त्यांना अधिकाधिक सत्संग ऐक्ण्याचा सल्ला दिला जातो. निराश होंऊ नका. खऱ्या मनाने परमात्मा कबीर जींना व्यसना पासून सोडविण्याची प्रार्थना केल्यास सर्व व्यसने सुटतात.**

## ''तंबाखू विषयी अन्य विचार''

**तंबाखू म्हणजेच हुक्का पिणाऱ्यांची स्थिती सांगितली आहे :-**

**(संत गरीबदास जी यांच्या ग्रंथातील 'अथ तमाखू की बैंत' नावाच्या अध्यायात)**

पित बाई खांसी निबासी निबास। कफ दल कलेजा लिया है गिरास।।
काला तमाखू अरू गोरा पिवाक। दस बीस लगर जहाँ बैठे गुटाक।।
बाजे नै गुड़ गुड़ अरू हुक्के हजूम। कोरे कुबुद्धि बीसा हैं न सूम।।
बांकी पगड़ी अरू बांकी ही नै खुद डूबै अरू डुबोए है कै।
गुटाकड़ अटाकड़ मटाकड़ लहूर। एक बेठैगा अड़कर एक बेठैगा दूर।।
पीवै तमाखू पड़ै कर्म मार। अमली के मुख में मुत्र की धार।।
कड़वा ही कड़वा तू करता हमेश। कड़वा ही ले प्यारे कड़वा ही पेश।।
कामी क्रोधी तूं लोभी लबूट। बचन मान मेरा धूंमा न घूंट।।
हुक्का हरामी गुलामी गुलाम। धनी के सरे में न पहुँचे अलाम।।
पामर परम धाम जाते न कोई। झूठे अमल पर दई जान खोई।।
मुरदा मजावर हरामी हराम। पीवैं तमाखू सो इन्द्री के गुलाम।।
अज्ञान नींद न सो उठ जाग, पीवैं तमाखू गए फुटि भाग।।
भांग तमाखू पीवैं ही, सुरापान से हेत। गोसत मिट्टी खायकर जंगली बनैं प्रेत।।
गरीब, पान तमाखू चाबहीं, सांस नाक में देत। सो तो अकार्थ गए,ज्यों भड़भूजे का रेत।।
भांग तमाखू पीवहीं, गोसत गला कबाब। मोर मृग कूं भखत हैं, देंगे कहां जवाब।।
भांग तमाखू पीवते, चिसम्यों नालि तमाम। साहिब तेरी साहिबी, जानें कहाँ गुलाम।।
गऊ आपनी अम्मा है, इस पर छुरी ना बाहय। गरीबदास घी दूध को,सब ही आत्म खाय।।

**भावार्थ :- उपरोक्त चरणांचा भावार्थ असा आहे की माणसांच्या शरीराला प्राणवायूची गरज असते. त्याऐवजी तंबाखूचा धूर म्हणजेच कार्बन डाईऑक्साइड शिरला तर त्याला खोकला होणारच आहे. पित्त खवळते आणि बाई (बाय) रोग होतो. हुक्का ओढणाऱ्यांची बसायची स्टाईल अशी सांगितली आहे की हुक्का पिणारे एक-दोघे तर हुक्कयाच्या जवळ बसतात. एकजण काही अंतरावर बसून म्हणेल की सरकवा थोड़ीशी इकडे. दूसरे त्याच्याकडे हुक्का देंतील. मग धूर खेचत येणारी नळी गुडू-गुडू वाजेल. आपण तर हुक्का पीऊन सत्यानाश करत आहातच, पण छोटी मुलेदेखिल त्यांचे बघून तेच पाप करून त्या नरकात स्वतःचा नाश करून घेतील. जे तंबाखू ओढतात त्यांचे तर नशीबच फुटके आहे. अन्य लोकांना तंबाखू पीण्यास उद्युक्त करून त्यांचे नुकसान करतात. उपरोक्त वाईट गोष्टी करणारे तर आपले मानवी जीवन असे व्यर्थ करत आहेत. जसे भड़भूंजा वाळू विस्तवाने खूप गरम करून फुटाणे भाजतो आणि काम झाल्यार वाळू फेकून देतो, त्याच प्रकारे जो माणूस उपरोक्त वाईट गोष्टी करतो आहे, तो देखिल आपले मानवी जीवन असे व्यर्थ करत निघून जातो. त्या जीवाला नरकात आणि अन्य प्राण्यांच्या जीवन रूपी गल्लीत फेकण्यात येते. जी माणसे उपरोक्त पाप करत आहेत, ते परमात्माच्या दरबारात काय उत्तर देणार? म्हणजेच ते बोलण्या योग्य देखिल असणार नाहीत.**

**मग म्हटले आहे की गाय आपल्या मातेसमान आहे. सर्व जाति धर्माचे लोक तिचे दूध-तूप खातपीत आहेत. त्यामुळे गायीला मारू नका. विषय तंबाखूचा चालू आहै :-**

**भक्ति मार्गात तंबाखू ही एक बाधाच निर्माण करत आहे. आता आपल्या दोनही**

नाकांच्यामध्ये एक छोट्या सुईच्या नाकाएवढा तीसरा मार्ग आहे. जे तंबाखूचा धूर नाकाने सोडतात, ते हा मार्गच बंद करतात. तोच मार्ग वर त्रिकुटीकडे जातो आहे जिथे परमात्माचा वास आहे, ज्या मार्गाने आम्ही परमात्माला भेटायचे आहे, तंबाखूचा धूर तोच मार्ग बंद करतो आहे. हुक्का पिणाऱ्याना पाहिले आहे, रोज हुक्काची नळी लोखंडाच्या गजाने फिरवतात. ज्यामुळे धुराचा सगळा मळ निघून जातो. ती नळी थांबते. मानव जीवन परमात्माच्या प्राप्तिसाठीच मिळाले आहे. परमात्माला प्राप्त करण्याचा मार्ग तंबाखूचा धूर बंद करतो. त्यामुळे देखिल तंबाखू भक्ताचा मोठा शत्रु आहे. तसे तर हुक्का पिणारेदेखिल हे मान्य करतात की तंबाखू चांगली गोष्ट नाहीं आहे. जेव्हा एखादा छोटा मुलगा आपल्या दादा-काका-पिता यांना हुक्का ओढताना पाहतो, तोदेखिल नक्कल करत असतो. हुक्का ओढायला लागतो तेव्हा स्वतः हुक्का ओढणारी मोठी माणसे त्या मुलाला धमकावतात की खबरदार! जर हुक्का ओढलास तर. हे चांगले नसते. जर आपण त्याला चांगले म्हणत ओढत असाल, तर मुलांना देखिल ओढू द्या. आपण त्याला ओढू देत नाही म्हणजेच ते वाईट असल्याचे, नुकसान करणारे असल्याचे मान्य करतो. थंडीच्या दिवसांमध्ये एका घरात छोटी मुले झोपलेली असतात. त्यांच्यामध्येच हुक्का ओढणारा हुक्का ओढीत असतो. तो स्वतः तर पाप करतो आहेच, पण आपल्या कुटुंबाला धूर पाजून पाजून पापात सहभागी करून घेतो आहे. वडील-आजोबा हे आपल्या वाट्याचे दुध छोट्या मुला-मुलींना पाजायचा प्रयत्न करीत असतात. म्हणतात, घे बेटा थोडे घे, बघ तुझी उंची कशी वाढते आहे. घे पिऊन टाक. अशा प्रकारे तो दूधाचा पेला पाजूनच थांबतो. कारण दूध मुलांना आरोग्यकारी आहे. हुक्का-बीड़ी प्यायला मन परवानगी तर देत नाही, तंबाखू खाणे वाईट आहे हे पटत असते, परंतु समाजात हे व्यसन सर्वत्र पसरले आहे. म्हणून ते पाप आहे असे वाटत नाही. जसे अनेक कुटुंबे मांसाहार करीत असतात. त्यांच्या मुलांसाठी हे पाप नेहमीचेच आहे.

त्याच प्रकारे तंबाखू सेवन करणे हे देखिल महापाप आहे, परंतु परंपरा पडली आहे, म्हणून ते पाप वाटत नाही. ते सोडलेच पाहिजे. भक्त हरलालजींनी त्याच दिवशी हुक्का तोड़ला. चिलिम फोड़ली. सर्व कुटुंबाला सर्व गोष्टी सांगितल्या. नाम दिक्षा अनुग्रह देववला. अनेक पिढ्यापर्यंत बेरीच्या त्या कुटुंबांमध्ये हुक्का कोणीच ओढत नव्हते. नंतर सत्संग नसल्यामुळे काही लोग पुन्हा ओढू लागले आहेत.

## ''घोडे आणि गाढव देखिल तंबाखूचा तिरस्कार करतात''

एक दिवस संत गरीबदास जी (गाव-छुड़ानी, जिल्हा झज्जर) हे काही कामासाठी घोड़यावर जींद जिल्यातील एका गावात चालले होते. रस्त्यात जिंद जिल्यातील मालखेड़ी गावातील शेते होती. त्या शेतांमधून घोड्यावर बसून जात होते. गव्हाचे पिक शेतात उभे होते. घोड़ा रस्ता सोड़ून गव्हाच्या पिकाच्या मधून चालू लागला. शेतात पिकाची राखणदारी करणारे होते. ते काठी घेऊन धावले आणि संत गरीबदास जींना मारू लागले की तूझे डोके फिरले आहे का? आमच्या पिकाचा नाश करतो आहेस. घोड्याला सरळ चालवू शकत नाहीस काय? त्यांनी संत गरीबदास जींना काठीने मारण्याचा प्रयत्न केला, तर त्यांचे हात वरच्यावरच राहिले. सगळे आपल्या जागी पुतळ्या प्रमाणे स्तब्ध होऊन गेले. पाच मिनटे सगळे तसेच होते. मग संत गरीबदास जींनी आपला हाथ आशीर्वाद देण्याच्या अमिषाने वर केल्यावर त्यांची ती स्थिती संपली आणि सगळे पाठीवर खाली पडले. काठ्या हातातून जमिनीवर पडल्या. जणू अघटितच घडले. ही कोणी सामान्य व्यक्ति नाही हे रखवालदारांना समजण्यास वेळ लागला

नाही. सगळ्यांनी रडत त्यांची क्षमा मागितली तेव्हा संत गरीबदास जी त्यांना म्हणाले की भल्या गृहस्थांनो! रस्त्याने चाललेल्या लोकांशी असे वागतात काय? मारायला धावताय? घोडा पिकामधून का चालतोय, हे आधी तुम्ही जाणून घेतले पाहिजे. तर ते शेतकरी म्हणाले, आता सांगा! घोडा पिकामधून का चालतोय? संत गरीबदास जींनी विचारले की या शेतात पहिल्यापासून काय पेरले आहे? त्यांनी सांगितले ज्वारी पेरली होती, त्याच्या पूर्वी काय पेरले होते? त्यांनी सांगितले तंबाखू होती. संत गरीबदास जींनी सांगितले की त्या तंबाखूचा घाणेरडा वास अजूनही त्या शेतातून येतो आहे. त्या घाणेरड्या वासाने त्रासून माझा घोड़ा रस्ता सोडून दूरून जाऊ लागला. ती तंबाखू तुम्ही ओढता, तुम्ही तर त्या पशुंपेक्षाही वाया गेलेले आहात. लक्ष देऊन ऐका! यानंतर गावात एकही माणूस हुक्का ओढणार नाही. तंबाखू खाणार नाही. आज्ञेचे पालन झाले नाहीं तर गावाचे अतिशय नुकसान होईल. त्या वेळेस तर सर्वांनी माना डोलावल्या. पण ते गेल्यानंतर म्हणाले की चल भर छोटा हुक्का! जेव्हा छोटा हुक्का भरायला लागले, तेव्हा हातातून चिलिम निसटून जमिनीवर पडली आणि फुटली. दूसऱ्या छोट्या हुक्क्याची चिलीम आणली, तर ती देखिल निसटून जमिनीवर पडली आणि फुटली. शेतात जितक्या म्हणून चिलीमी होत्या, सगळ्या तुटल्या. पहारेकरी घाबरले, अरे! हा त्या संतपुरुषाचाच चमत्कार आहे. गावात गेले तर तिथले देखिल सगळे हुक्के तुटून गेले. चिलिमी फूटल्या. सगळ्या गावात हाहाकार माजला. सगळे भयभीत झाले. पहारेकरी गावात आल्यावर खरे कारण कळाले. त्या दिवसापासून आजपर्यंत गावात कोणीही हुक्का ओढत नाही. गावाचे नाव आहे ''मालखेडी.''

❖ हुक्का ओढणारे म्हणतात की घ्या! माझ्या जवळची तंबाखू कड़क आहे, भर त्या चिलमीत. दूसरा म्हणतो की माझ्या जवळची तंबाखू अधिक कड़क आहे. संत गरीबदास जी सांगतात की मृत्युनंतर यमदूत त्या कड़क तंबाखू ओढणाऱ्याच्या तोंडात लघवी करतात. म्हणतात की तुला अधिक कड़क-कड़क तंबाखू ओढायची होती ना, घे! कड़क लघवी पिऊन घे. लघवीची धार त्याच्या तोंडात सोडतात.

संत गरीबदास जींनी चमत्कार करून या वाईट व्यसनापासून सुटका केली होती. ज्ञान प्राप्त झाल्याने जो प्रभाव पड़तो, त्यामुळे वाईट सवयी कायमच्या सुटतात. ज्ञान सत्संग यामुळेच हे होऊ शकते. सत्संग ऐकण्याची आवड निर्माण करा. सत्संग ऐका.

निवेदन:-उपरोक्त वाईट सवयीचा संपूर्ण त्याग करा. त्यामुळे जगण्याचा मार्ग सुकर होईल.

## ''नशा नाश करते''

व्यसन कशाचेही असो, दारू, अफू, गांजा, चरस हेरोईन , त्याने आपला सर्वनाश अटळ आहे. सर्व प्रथम तर व्यसन माणसाला राक्षस बनविते. मग शरीराचा नाश करते. शरीराचे चार महत्वपूर्ण भाग आहेत. :- १. फुफ्फुसे, २. यकृत (Liver), ३. मूत्रपिंड (Kidney), ४. हृदय दारू सर्व प्रथम या चारही भागांना इजा पोहोचवते. चरस मेंदूचा पूर्णपणे सत्यानाश करते. हेरोईन तर दारूपेक्षाही शरीर अधिक खिळखिळे करते. अफुमुळे शरीर अशक्त होते. शरीर आपली वाट सोडून चालू लागते. अफू सेवन करूनच मग चालता येऊ शकते. रक्त दुषित होते. म्हणून अशा गोष्टींना घरातच काय, गावात देखिल कुठेही थारा देता कामा नये. ती सेवन करण्याचा तर विचारही करू नये.

❖ एक माणूस दिल्लीच्या पालम विमानतळावर नौकरी करत होता. सन् १९९७ ची ही घटना आहे. त्यावेळी त्याचा पगार दरमहा रु बारा हजार होता. दिल्लीतील एका गावात हा दास (रामपाल दास) सत्संगामध्ये गेला. तिथे एक वृद्ध आपल्या तीन नातींसह ज्या घरात सत्संग होता, तिथे आला. नात्याने ती सत्संग आयोजकांची काकी होती. ती गावाच्या बाहेर आपले घर बांधून राहात होती. विमानतळावर काम करणारा माणूस तिचाच मुलगा होता. खूप दारू प्यायचा. घराचा नुसता दारूचा अड्डा करून ठेवला होता. पत्नी आणि मुलांना मारहाण करायचा कारण हा रोज दारु पिऊन येणार, मग पत्नी टोकणार, मग हा तिला मारहाण करणार, हे रोजचेच महाभारत होते. पत्नी मुलांना सोडून माहेरी गेली. आजीने मुलांना सांभाळले. मग तिने स्वतः जाऊन सुनेची समजूत घातली आणि तिला परत घेऊन आली. त्या रात्री ती वृद्ध स्त्री आपल्या सुनेला आणि नातींना घेऊन आली होती कारण तिच्या मोठ्या दिराच्या घरीच सत्संग होता. म्हणून यावे लागले. सत्संगामध्ये प्रत्येक मुद्द्यावर प्रवचन द्यायचे असते. आधी परमेश्वराच्या भक्ति केल्याने लाभ, आणि न केल्यास होणारे नुकसान संपूर्ण विस्तार करून सांगितले जाते. त्या दिवशी तो दारुडा आधी घरी आला. घरी कोणी नव्हते म्हणून काही वेळ घरीच थांबला. मग शेजाऱ्याने सांगितले की त्याची आई त्याच्या मोठ्या काकांच्या घरी सगळ्या कुटुंबाला घेऊन गेली आहे. त्यांच्या घरी सत्संग आहे. सगळ्यांना तिथेच जेवण आहे. परमेरश्वराची कृपा होऊन तो देखिल सत्संगात गेला. सर्वात मागे बसला कारण दारू प्यायला होता.

सत्संग वचन :- सत्संगात असे सांगितले की मानव जन्म प्राप्त करूनही जो मनुष्य शुभ कर्म करीत नाही, त्याचे भविष्य म्हणजे नरक असतो. जो नशा करतो आहे, त्याचे वर्तमान आणि भविष्य दोन्ही नरकच आहेत. व्यसन हे माणसांसाठी नाही. व्यसनाने माणसाचा राक्षस होतो. ज्या माणसांनी पूर्व जन्मात पुण्यकर्म केली आहेत, त्यांना या जन्मी त्याचे प्रतिफल म्हणून उत्तम नोकरी मिळते किंवा त्यांचा व्यवसाय उत्तम चाललेला असतो. जर वर्तमानात शुभ कर्म, भक्ति व दान-धर्म केला नाहीं तर भविष्यातील जन्मात गाढव-कुत्रा, डुक्कर, बैल होऊन सारखे मार व घाण खाल.

जसे मानव (स्त्री/पुरूष) जीवनात पूर्वीच्या शुभ कर्मानुसार उत्तम भोजन मिळाले आहे. उत्तम मानव शरीर मिळाले आहे. जेव्हा पाहिजे, तेव्हा जेवण जेवा. तहान लागली, पाणी प्या, इच्छा झाल्यास चहा-दूध प्या. फळे आणि सुका मेवा (काजू-बादाम) खा. जर परम गुरू करून सच्च्या मनाने भक्ति व सत्संग सेवा, दान-धर्म केला नाही, तर पुढल्या जन्मी गाढव-बैल-कुत्रा होऊन दुर्गतिला प्राप्त व्हाल. वेळेवर ना जेवण मिळेल, ना पाणी ना थंडी-तापापासून संरक्षण. ना, मच्छर-माशा यांच्यापासून संरक्षण मिळेल. मानव जीवनात तर मच्छरदाणी, ऑल-आऊट वापरून बचाव करून घेता येतात. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी उपाय शोधता येतात. पण जेव्हा प्राणी जन्मात जाल, तेव्हा काय असणार आहे? संत गरीबदास जी यांनी परमेश्वर कबीर जी कडून प्राप्त ज्ञान खालील शब्दात सांगितले आहे :-

गरीब, नर सेती तू पशुवा कीजै, गधा बैल बनाई।
छप्पन भोग कहाँ मन बोरे, कुरड़ी चरने जाई।।

भावार्थ :- मानव शरीर सोडल्यावर भक्तिहीन आणि शुभकर्म हीन होऊन जीव गाढव -बैल इत्यादी योनि प्राप्त होतील. मग मानवाचा आहार नाहीं मिळणार. गाढव होऊन उकिरड्यावरचे घाण खावे लागेल. बैल झाल्यावर नाकात वेसण घातली जाईल. दोरीने बांधले

जाईल. तहान लागल्यावर ना पाणी मिळेल ना भूक लागल्यावर जेवण. डास– माशा मारण्यासाठी एक शेपूट असेल, तिलाच कुलर समजायचे. किंवा पंखा किंवा मच्छरदाणी समजावे ज्याची पापे अधिक असतात, त्यांची प्राणी जीवनात शेपूट देखिल तुटते. एक–दीड फुटी काठी ठेवढी उरते. त्याला फिरवत राहतो.

एका बैलाच्या मागल्या पायाच्या खुरात जवळपास १½ इंच मोठा खिळा घुसला. तो तसाच चालल्यामुळे तो आणखी आत गेला. बैल पायाने लंगडायला लागला. नांगर चालवणाऱ्या माणसाला वाटले की झटका लागला आहे. नसे वर नस चढ़ली असेल, चालून ठीक होईल. पुष्कळ वेळा असे होते की बैलाची नसे वर नस चढ़ली असेल तर चालता चालताच बरी होऊन जाते. पण आता तसे झाले नाही. सगळा दिवस बैल नांगरावर फिरवला. घरी आला तर मोठ्या मुश्किलीने पाय जमिनीवर ठेवता येत होता. हळूहळूच चालत होता. घरी आल्याबरोबर बसून गेला. डोळ्यातून अश्रू येत होते. खूप दुखत होते. चारा देखिल खाल्ला नाही. सकाळी देखिल तीच स्थिती. बैल उठला नाही, पडून राहिला. पायावर आता सूज आली होती. गावात पशुवैद्य बोलावला. जुन्या काळातील गोष्ट आहे. त्यावेळी असेच उपचार होत असत. डॉक्टरने पाहून सांगितले याच्या गुडघ्यात सुज आली आहे. जुना गुळ कुटून मऊ करून पट्टी बांधून टाका, ठीक होऊन जाईल. खिळा गेला होता खुरात, इलाज चालला होता गुडघ्याचा. जवळपास एक महिनाभर हे सुरु होते. एक दिवस घरातील माणसाने पहिले की पायाच्या तळव्यातून पू बाहेर येतो आहे. साफ केल्यावर कळले कि पायात खिळा घुसला आहे. कुठल्यातरी हत्याराने खिळा काढला. तेव्हा कुठे एका आठवड्यात बैल बरा झाला. पोटभर चाराखाल्ला–पाणी प्यायला.

विचार करा :– जेंव्हा हा प्राणी मानव शरीरात असेल तेव्हा त्याला स्वप्नात देखिल वाटले नसेल की एक दिवस मी बैल देखिल होईन आणि आता बोलून देखिल सांगू शकत नव्हता की कुठे दुखते आहे? कबीर जींनी म्हटले आहे की :–

कबीर, जिव्हा तो वोहे भली, जो रटै हरिनाम।
ना तो काट के फैंक दियो, मुख में भलो ना चाम।।

भावार्थ :– जसे जीभ हे शरीराचे अतिशय महत्वपूर्ण अंग आहे. जरी परमात्माचे गुणगान आणि नामस्मरण यासाठी उपयोग होत नसेल तर ती व्यर्थ आहे कारण या वाणीने कोणी दुसऱ्याला वेडेवाकडे बोलून पाप करतो. शक्तिशाली माणूस दुबळ्या माणसाला वेडेवाकडे काहीतरी बोलतो. त्यामुळे त्याचा आत्मा आक्रंदत असतो. शिव्याशाप देत असतो. बोलता येत नाही कारण मार पडायची भीती असते. हे पाप आहे. मग कोणाची टिंगल कर, कुठे खोटी साक्ष दे, तर कुठे व्यवहारात खोटे बोलून फसवून माणूस आपल्या जिभेने अनेक पापे करीत असतो. परमेश्वर कबीर जी सांगतात की जरी जीभेचा सदुपयोग करता आला नाही म्हणजेच सद्वचन–सौम्य बोलणे, परमात्माची स्तुती म्हणजेच त्याबाबत विचारविनिमय करणे, धार्मिक सद्ग्रन्थांचे चिंतन–मनन, आणि परमात्माचे नामस्मरण जिभेने करीत नसेल, तर ती कापून फेकून द्या. फक्त पापच जमा करतोय.

(जीभ कापायला सांगणे हे आपणास सावध करण्यासाठी आहे. जीभ कापू नका. तर उत्तम कर्म, वाणीसाठी जिभेचा वापर करा. रामनामाचा जप व परमात्माचे गुणगान नाही करता आले तर ती आपल्या पवित्र मुखात ही जीभ कोंडून ठेवणे इष्ट नाही.)

❖ मानवी शरीर धारण केलेल्या प्राण्याला वर्तमानात (१९७० पासून) अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे दिवसागणिक तो परमात्मापासून लांब चालला आहे.

त्याच गतीने सर्व दु:खे त्याच्या वाट्याला येत आहेत. आर्थिक स्थिती उत्तम होते आहे. परंतु मानसिक शांती संपली आहे. व्यसने हे याचे एक प्रमुख कारण आहे. एक वडील नोकरीवर गेले आहेत. मुलांना आशा असते कि वडील काही आवश्यक त्या गोष्टी तरी आणतील. वडील कामावरून परत येतात. सगळी छोटी मुले त्यांना येऊन बिलगतात. ज्या मुलांचे वडील व्यसने करतात, त्या घरांमध्ये कलह स्वाभाविकच आहे. मुले भीतीखाली वावरतात आणि त्यांचा परिणाम त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासावर होतो. ते घर म्हणजे एक नरकच असतो. आज जे दारूत तर्र आहेत त्यांना समाजात कोणताही आदर नाही.

पुढील जन्मात तोच माणूस कुत्रा होईल विष्ठा सेवन करेल, घाणेरड्या गटारातील पाणी पिईल. मग पशु पक्षी होऊन हलाखीचे जीवन जगेल. म्हणून सर्व व्यसने आणि वाईट सवयींचा त्याग करून माणसासारखे आयुष्य जगा. सभ्य समाजाला देखिल सुखाने जगू द्या. एक दारुड्या अनेक माणसांना दुखावत असतो :– पत्नी, आपले व पत्नीचे आई–वडील, भाऊ–बहिणी, मुले, भाऊ इत्यादी. केवळ एक तासांच्या व्यसनापायी पैसा, अब्रू, घरदार, कुटुंब यांचा सर्वनाश करून शांती सुख हिरावून घेतो. असा मनुष्य कधीतरी आयुष्यात सुखी होईल काय? कधीच नाही. नरकात असल्याप्रमाणे जीवन जगेल. त्यामुळे विचार करायला हवे. वाईट सवयी लगेच सोडल्या पाहिजेत.

प्रश्न :– कोणी पाहिलंय पुढल्या जन्मात काय होणार आहे?

उत्तर :– उदाहरणासाठी सांगतो एकदा एक आंधळा माणूस जंगलाकडे जात असतो. वाटेत एक सज्जन माणूस उभा असतो. त्याने सांगितले सूरदास जी! इकडे जाऊ नका. हा रस्ता भयंकर अशा जंगलात जातो. सिंह–चित्ता यासारखी खुनशी जनावरे तिथे रहात आहेत. आपण परत फिरा. जर आंधळ्याने नशा केली नसेल तर तो लगेच मागे फिरेल. जर नशेत असले तर म्हणेल कोणी पाहिलंय जंगलात सिंह–चित्ता, साप हे प्राणी राहतात म्हणून. आणि असे म्हणून तो आपल्या रस्त्याने चालायला लागतो.

विचार करा :– आंधळ्याला दिसत नाही आणि डोळस सांगतो त्यावर तो विश्वास ठेवत नाही. तरमग त्याला कोणत्या पद्धतीने समजावणार? जर नाहीं ऐकले, तर डोळस माणसाने सांगितली, तीच अवस्था होणार. सिंह मारून टाकणार.

अशाच प्रकारे संतजन (ज्ञान चक्षुमुळे) डोळस आहेत. त्यांनी वर वर्णन केलेले आम्हाला सांगितले आहे. आम्ही आंधळे ज्ञानचक्षु नसलेले आहोत. जर आपण संतांच्या शिकवणुकीवर पूर्ण विश्वास ठेऊन आपला मार्ग बदलला नाही तर वर सांगितले आहे तसेच होईल.

नर से फिर पीछे तू पशुवा कीजै, गधा बैल बनाई।
छप्पन भोग कहां मन बौरे, कुरड़ी चरने जाई।।

❖ काही माणसांची मजल तर जे होईल ते पाहता येईल असे म्हणण्यापर्यंत जाते. त्यांना विनंती आहे की गाढव झाल्यावर तुम्ही काय पाहणार, जे काय पहायचे ते कुंभार बघून घेईल अशा प्रकारच्या प्रवचन सत्संगात असे प्रसंग अवश्य सांगितले जातात.

तर तो दारुड्या सत्संगात येऊन बसला कारण घरात कोणी नव्हते. दाराला कुलूप होते. थोड्या वेळानंतर त्याची नशा उतरली आणि सगळा सत्संग त्याला ऐकावा लागला. त्या दिवसानंतर त्या माणसाने कधीही व्यसन केले नाही. सर्व व्यसने सोडली. अनुग्रह घेतला पूर्ण कुटुंबाला अनुग्रह देववला. आम्ही (लेखक आणि सोबत सत्संगात असेलेले काही भक्त) सकाळी गावत फेरफटका मारण्यासाठी गेलो, तेव्हा त्या माणसाचे (**Airport** वाले) घर आले.

त्या गल्लीत त्याची आई उभी होती. तिने म्हटले की महाराज जी! या. चहा पिऊन जा. गावातील भक्ताने सांगितले की यांच्या घरी अवश्य चला, हे सर्व कुटुंब उघडे पडले आहे. साधु–संतांचे चरण लागून घर पवित्र होत असते. आम्ही सगळे त्यांच्या घरी गेलो. आम्ही एकूण पाच जण होतो. अंगणात खाट टाकली होती. मे महीना होता. झाडाची सावली होती. त्याच्या आईने सुनेला म्हटले की बेटी! चहा कर. त्या मुलीने चूल पेटवून चहाचे आधण ठेवले. अर्ध्या तासाने आम्ही म्हणालो, चहा लवकर आणा. आम्हाला फिरायला पुढे जायचे आहे. नंतर दुसऱ्या गावात सत्संगासाठी जायचे आहे. तरीही ती मुलगी आधणाखाली चूल पेटवतच होती. परत सांगितले तर रडायला लागली.

गावातील भक्त उठून गेला तेव्हा कळले, घरात न साखर ना चहापत्ती ना दूध काहीच नाही. त्या माणसांची आई रडायला लागली. म्हणाली आम्ही असे उघडे पडतो. महाराज आम्हाला वाचवा! तो माणूस अनुग्रह घेऊन वेळेवर आपल्या कामावर निघून गेला होता.

काही दिवसानंतर आमचा दिल्ली जवळील पंजाबखोड़ गावात सत्संग होता. तिथे एक माणूस आपली आई, पत्नी व तीनही मुलींसह कारमध्ये बसून सत्संगात आला. आधी तुटकी फुटकी मोटारसायकल होती. आता छान कपडे घालून आले होते. सांगत होते की आता वडील आईशी कधीही भांडण करीत नाहीत. सगळा पगार आजीच्याच हातात देतात. आमचे घर म्हणजे स्वर्ग आहे आता. आजी म्हणाल्या त्या दिवशी आपले दर्शन झाले, आमचे उजाड झालेले घर आता संपन्न आहे. मी म्हणालो आजी! तुझा मुलगा वाईट नव्हता. त्याने हे चांगले विचार कधी ऐकलेच नव्हते. हे त्याने पूर्वीच ऐकले असते, तर तो या व्यसनांच्या मागे लागलाच नसता. ही सर्व परमेश्वर कबीर जींची कृपा आहे. त्यादिवशी हा सत्संगात आला आणि याच्या आत्म्यावर साचलेला मळ साफ झाला. आता तुमचे कुटुंब नरकातून निघून स्वर्गात निवास करत आहे. परमात्मावर श्रद्धा ठेवा. काहीही कमी पडणार नाही. भक्ति करत राहा. सर्व पिढ्यांचा उद्धार होईल. अशा प्रकारे सत्संगामुळे माणसाचा उद्धार होऊन जगात शांती, परस्पर प्रेम वाढीला लागते. सत्संगातील विचार अवश्य ऐकत चला. पृष्ठ २८३ वर ''भक्ति मर्यादा'' अवश्य वाचा.

## ''आई वडिलांची सेवा व आदर करणे हे परम कर्तव्य आहे''

प्रत्येक आई वडिलांची हीच इच्छा असते की माझा मुलगा उत्तम असावा. समाजात त्याची बदनामी होऊ नये. उत्तम चारित्र्य असावे. त्याने आज्ञाधारक असावे. वृद्धावस्थेत आमची सेवा करावी. आमची सून आमच्या वचनात असावी. समाजात तिने आमचा मान राखावा. वृद्धावस्थेत आमची सेवा करावी. प्रेमाने राहावे. सत्ययुग, त्रेता, द्वापार युगापर्यंत ही मर्यादा उत्तम पद्धतीने सांभाळली गेली. सर्व सुखी जीवन जगत होते. कलयुगात काही काळापर्यंत तर ठीक होते, पण वर्तमानात मात्र परिस्थिति विपरीतच आहे. ती सुधारण्याचा लेखकाचा (रामपाल दास) उद्देश आहे असा विश्वास देखिल वाटतो की परमात्माच्या कृपेने ज्ञानाच्या प्रकाशात हे शक्य आहे, होत पण आहे आणि होईलही असे, माझा अंतरात्मा सांगतो आहे.

➢ आईचे मुलावरील प्रेम :–

एका मुलाच्या वडिलांचा मृत्यु झाला. त्यावेळी तो १०–११ वर्षाचा होता. आईने आपल्या एकुलत्या एक मुलाचा सांभाळ केला. आई आणि वडील, दोघांचेही प्रेम दिले. त्याला

वडिलांची उणीव भासू दिली नाही. मुलगा मोठा झाला आणि दारूच्या आहारी जाऊन वेश्यागमन देखिल करू लागला. आईला रोज पैसे मागायचा आणि रोज व्यसनांवर उडवून टाकायचा. एक दिवस आईजवळ पैसे नव्हते. दारूच्या नशेत आईला मारहाण केली आणि वेश्येकडे गेला. त्या दिवशी पैसे नव्हते तर वेश्येने म्हटले की आपल्या आईचे हृदय काढून आण. तसाच उलट-पावली घरी आला. आई बेशुद्धच होती. आईवर सुरी चालवून आईचे हृदय काढून घेऊन गेला. तसेतच वाटेत त्याला ठेच लागली. आणि खाली पडला तर आईचे हृदय त्याला म्हणाले मुला, तुला कुठे लागले तर नाही?

नशेमुळे बेभान झालेला तो मुलगा वेश्येकडे आईचे हृदयं घेऊन गेल्यावर वेश्या त्याला म्हणाली की जर तू आपल्या आईचे हित सांभाळू शकत नाहीस, तर माझी काय कथा? कुणाच्या सांगण्यावरून तू मलाही मारून टाकशील. मला तुझा पिच्छा सोडवायचा आहे कारण आता तू पूर्णपणे निर्धन झाला आहेस. तू माझ्या काय कामाचा? म्हणून अशी अट घातली होती की तू आपल्या आईचे हृदय काढून आण आणी ती तुला कुठल्याही गोष्टीसाठी नाही म्हणत नसल्यामुळे, तू तिचे हृदय काढणार नाहीस. पण कसला कर्मदरिद्री आहेस तू! अरे हैवाना, दूर हो माझ्या नजरेसमोरून. असे म्हणून त्याला वेश्येने धक्के मारून घराबाहेर काढले व दरवाजा बंद केला. तो हैवान घरी येऊन आईच्या मृतदेहापाशी अश्रू ढाळू लागला. म्हणाला आई! देवाच्या दरबारी मला शक्य झाले तर वाचव. आवाज आला, बेटा! काही झाले नाही. बस मला फक्त तू आनंदी दिसायला हवा आहेस. त्याच वेळी गावातील लोक आले. ठाण्यात माहिती दिलीच होती. त्या अपराध्याला राजाने फासीची सजा दिली.

त्या गुन्हेगाराला राजाने फाशी देण्यापूर्वी त्याची अंतिम इच्छा विचारली तेव्हा त्या मुलाने म्हटले की काही नागरिकांना बोलवा. मी माझे कारनामे सगळ्यांच्या समक्ष कबुल करू इच्छितो. गावातील माणसे आली. त्या मुलाने आपले सर्व अपराध कबूल केले आणि सांगितले की मी हे सर्व गुन्हे केले असूनदेखिल आईचा आत्मा अंतिम समयी देखिल मला सुखी रहाण्याची इच्छा करते आहे. माझ्या व्यसनाने मला राक्षस केले. मी वेश्या गमन करून समाजदूषित केला. आपण लोक माझे ऐका. माझ्या आईला त्रास देऊन मी जे घोर पाप केले, तसे तुम्ही कोणीही करू नका. जगात आईसारखी दुसरी हितचिंतक कोणीही नाही. अगदी पत्नी देखिल नाही, भलेही ती कितीही प्रामाणिक असेल. आई आपल्या मुलामुलींवर इतके प्रेम करते की थंडीत मुलाने लघवी केल्यावर आई त्या लघवीने ओल्या झालेल्या थंड कापडावर झोपते. मुलाला कोरडा बिछाना देते. मुलगा भुकेने रडत असेल तर जेवण मध्ये सोडून आधी त्याला दुध पाजते व त्याला शांत करते.

## ''वडील मुलांची प्रत्येक चूक पोटात घालतात.''

परमात्मा कबीर जींनी म्हटले आहे की वडील आपल्या मुला-मुलींच्या सर्व अपराधांना क्षमा करतात :-

अवगुण मेरे बाप जी, बक्शो गरीब नवाज।<br>
जो मैं पूत-कपूत हूँ, तो भी पिता को लाज।।

**शब्दार्थ :-** परमात्मा सर्व प्राण्यांचे पिता आहेत. पिता मध्ये विशेषता असते कि त्यांचा मुलगा-मुलगी अज्ञानात चुका करतात व ते पित्यास क्षमा याचना करतात कि भविष्यात कधीच चुका करणार नाही तर पिता लगेच क्षमा करतात. त्यामुळे भक्त परमात्यास विनंती करतात कि हे दिन द्याल! आपण तर सर्वांचे पिता आहात. माझे अवगुण (अपराध) पिता

होण्याच्या नात्याने क्षमा करा. मी कपूत म्हणजे निकम्मा पुत्र आहे तरी आपण पित्याच्या कर्तव्याचे पालन करून क्षमा करा.

➢ रामभक्ताच्या पत्नीचे निधन झाले. त्या वेळी त्याचा मुलगा तीन वर्षांचा होता. त्या माणसांच्या नात्यात एक घटना अशी घडली ज्यामुळे तो पूर्णपणे हादरून गेला. कथा अशी आहे:–

त्याचे मामा आपली बहिण म्हणजेच रामभक्ताच्या आईहून जवळपास दहा वर्षे मोठे होते. मामाजींना दोन मुले होती. रामभक्ताच्या मामीचे निधन झाले. मामाजींनी दूसरा विवाह केला. दूसऱ्या पत्नीला मुलगा झाला. दूसरी पत्नी पहिल्या पत्नीच्या मुलांचा द्वेष करायला लागली. तिने विचार केला की १५ एकर जमीन आहे. तीन जणांमध्ये वाटली जाईल. तिने त्या मुलांना दुधात आणि अन्नात काचेचा चुरा घालून खाऊ पिऊ घातले. ज्याच्यामुळे दोघांचे हळू–हळू दुखून मुत्यु झाला. डॉक्टरांनी सांगितले की मुलांनी काच खाल्लयामुळे त्यांचा मृत्यु झाला आहे. एक दिवस त्याच्या पत्नीने शेजारणीला सांगितले की मी असे असे केले. माझ्या मुलाला पंधरा एकर जमीन मिळाली. त्या स्त्रीने माझ्या मामांना सांगितले. मामा जी छोट्या मामीवर खूप प्रेम करायचे आणि तिच्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांना विश्वास होत नव्हता. एक दिवस छोटी मामी आपल्या भावाला सांगत होती की मी असे असे केले. तुझ्या भाच्याला पंधरा एकर जमीन मिळाली. ही गोष्ट माझा मामादेखिल खिडकीबाहेर उभा असल्यामुळे ऐकत होता. मामीचा भाऊ म्हणाला ताई! हा तू गुन्हा केला आहेस. कुठे फेडशील हे पाप. यापुढे मी तुझे तोंड देखिल पाहणार नाही. मामाजींना डोके फाटल्यासारखे वाटले. घर सोडून आपल्या बहिणीच्या म्हणजेच रामभक्ताच्या घरी आले आणि उर्वरित आयुष्य तिथे म्हणजे आमच्या घरी व्यतीत केले. काही वर्षानंतर छोट्या मामीपासून झालेला तो मुलगा देखिल मरण पावला. ती छोटी मामी कोणाबरोबर तरी पळून गेली. नंतर कळले की त्या माणसाने तिचे दागिने हिरावून घेऊन तिला ठार मारले आणि विहिरीत फेकले. पोलिसांना हे माहित झाले तर त्या माणसाला फाशी दिले. हे सर्वनाशाचे महाभारत पाहून रामभक्ताने दूसरा विवाह केला नाही. मुलाला आपल्या सोबतच ठेवायचा, नांगर चालवायचा तर मुलाला खांद्यावर बसवायचा, दमला तर झाडाखाली लवंडायचा, स्वतः जेवण बनवायचा, आंघोळ घालायचा, कपड़े साफ करायचा. मुलगा जसा मोठा झाला, तसा त्याचा विवाह झाला. तरीदेखिल सर्व कामे करायचा. मुलगा देखिल त्याला कामात मदत करायचा, पण अवघड कामे हा स्वतःच करायचा. वृद्धावस्था आल्यावर काही कामे करू नाही शकायचा. सुनेला हा व्यर्थचा खर्च वाटायला लागला. त्यामुळे आपल्या सासऱ्याला शिळेपाके जेवण दयायची. द्यायला लागली नंतर पोटभर जेवण सुध्दा देत नव्हती. मुलगा विचारायचा, बाबा! तुम्हाला सगळे व्यवस्थित वेळेवर मिळते आहे ना? वडील म्हणायचे बेटा! माझ्या सेवेत काहीही कमी नाही. सून मोठी भाग्याने आपल्याला मिळाली आहे. माझ्याकडे तिचे विशेष लक्ष असते ही गोष्ट सून देखिल ऐकत असे. आणि अधिकच त्रास द्यायची. माझ्या नवऱ्याला यातले काही माहिती नाही. म्हाताऱ्याला देखिल माझी चाल कळलेली नाही. एक दिवस मुलाने पाहिले कि वडिलांना जेवण व्यवस्थित मिळत नाही. त्याने पत्नीला तसे म्हटले, तर ढोंगीपणाने म्हणाली की घर पाहून जेवायचे असते. तुम्हाला घरची काळजी नाहीं आहे. मी आहे म्हणून सगळे घर व्यवस्थित चालले आहे. घर खर्च कसा चालवायचा हे मला माहिती आहे. एक दिवस वृद्धाला चक्कर आली आणि तो पडला. पाय तुटला. वैद्यांनी सांगितले की पुरेसे जेवण न मिळाल्यामुळे शरीरात अशक्तपणा आहे. दोन वेळ अर्धा अर्धा शेर दुध त्यांना द्या. ताजे अन्न द्या. वैद्य निघून गेला. पत्नीने म्हटले की असे केले

तर घराचे दिवाळे वाजायला वेळ नाही लागणार. नवऱ्याला म्हणजे मुलाला ही गोष्ट पटली. वृद्धाची काहीच काळजी घेत नव्हती. वृद्धाच्या सासुरवाडीचे लोक, इजा झाल्याची बातमी ऐकून भेटायला आले. त्यांनी विचारले मुलगा सून व्यवस्थित देखभाल करतात का? रामभक्ताने म्हटले की विचारूच नका. असाच मुलगा आणि सून प्रत्येकाला मिळू दे. मला काहीच करू देत नाहीत. ही इजा झाली आहे म्हणजे हे माझ्याच कोणत्यातरी कर्माचे फल आहे. त्याच गावात दोन बहिणींचा देखिल विवाह झालेला होता. एकीचा रामभक्ताशी, दूसरीचा शेजारी. जेव्हा ते आपल्या दुसऱ्या मुलीच्या घरी गेले तेव्हा त्यांना असे दिसले की त्या रामभक्ताची कोणीच सेवा करीत नाही. मुलगा काहीच उपयोगाचा नाही. ही गोष्ट सासुरवाडीकडच्या लोकांच्या घशाखाली उतरली नाही. कारण ते तर रामभक्ताच्या तोंडूनच ऐकून आले होते की सेवेत काही कसर नाहीं आहे. काही वेळानंतर ते पुन्हा रामभक्ताच्या घरी गेले त्यावेळी तो शिळी पोळी पाण्यात भिजवून खात होता हे पाहुन त्यांना रडु आले मुलाला बोलावले आणि म्हटले की तुला काही लाज वाटते का? त्यांनी तुला कसा मोठा केलाय, ते माहिती आहे ना तुला. मुलाची सून देखिल तिथे आली, दोघेही म्हणाले, आम्ही तर अशीच त्यांची सेवा करणार. रामभक्त म्हणाला की तुम्ही जा. घरात भांडणे लावू नका. माझ्या नशिबात जे लिहिले आहे, ते मिळते आहे. मी माझ्या मुलाला दु:खी पाहू शकत नाही. रामभक्ताच्या आत्याचा मुलगा रामनिवास सत्संगी होता. तो रामभक्ताला खूप म्हणायचा, काही वेळ देवाचे नाव घ्या. माझ्या सोबत संतांच्या सत्संगात या. तर रामभक्त म्हणायचा की मी माझ्या मुलाचीच पूजा करणार. तो सुखी रहावा हीच माझी इच्छा आहे. आत्याच्या मुलाने म्हटले की मुलाची पूजा आता पूर्ण झाली असेल तर अजूनही करून घ्या शुभकर्म. तरीदेखिल त्याने असेच म्हटले की मुलगा-सुनेकडे पाहून जगतोय. खूप दिवस सांगून झाल्यावर एक दिवस रामभक्त आपल्या आत्याच्या मुलगा रामनिवास सोबत सत्संगात आला. मग रामनिवास त्याला आपल्या घरी घेऊन गेला, त्यांचे औषधपाणी केले, उत्तम जेवण दिले. खूप दिवस त्याच्याकडेच ठेऊन घेतले. रामभक्त भक्तिवर पूर्ण दृढ़ झाला होता. घरी गेल्यावर मुलांना म्हणाला आजपर्यंत मी तुमच्याकडे काहीच मागितले नाही. आजच मागतो आहे. तुम्ही माझ्यासोबत सत्संगात एकदा तरी चला. त्यांनी म्हटले की इकडे जनावरांची आणि मुलांची काळजी कोण घेणार? रामभक्त म्हणाला मुलगा घरी राहील. मुलगी आणि नातवंडे माझ्यासोबत येतील. असेच केले. जेव्हा त्या सुनेने सत्संगातील दृष्टांत ऐकले, तिथे येणारे भक्त सर्व जुन्या भक्तांची अशी सेवा करीत होते, जणू त्यांच्या घरचे ते विशेष असे पाहुणेच आहेत. वृद्ध,रोगी, अपंग श्रद्धाळू लोकांची देखिल विशेष सेवा करत होते. सत्संगात असे सांगितले जाते की की जीवावर दया भाव ठेवल्यास परमात्मा प्रसन्न होतो. दु:खि-असहाय्य लोकांची सेवा करणे तर मानव मात्राचे परम कर्तव्य आहे.

दया-धर्म का मूल है, पाप मूल अभिमान।
कह कबीर दयावान के पास रहे भगवान।

शब्दार्थ :- धर्म तोच करतो कि ज्याच्या ह्ृदयात द्या आहे. द्या धर्माची मूळ आहे तसेच पाप तोच करतो ज्याच्यामध्ये अभिमान भरलेला आहे. अभिमान पापाचे मूळ आहे. कबीर परमात्मा ने म्हटले आहे कि परमात्मा दयावानाच्या बरोबर असतात. अभिमानीच्या जवळ नाही राहत.

भक्त रामभक्ताची सून ज्या भक्तमतीजवळ बसली होती, ती म्हणाली, ताई! आपल्याला काही सेवा करायची असेल तर करून घ्या.

''सत्संग वचन'' :– गुरूदेव जी सांगत आहेत की जो सेवा–भक्ति करेल, त्यालाच फळ मिळेल. मी भोजन जेवलो तर, माझे पोट भरेल. तुम्ही भोजन केले तर तुमचे पोट भरेल. सर्व प्राणीमात्र परमात्माची लेकरे आहेत. आपण मालकाची मुले समजून सेवा करा. जशी एका श्रीमंत माणसांची मुलगी ८–९ वर्षाची होती. तिला सांभाळण्यासाठी एक बाई ठेवली होती. उन्हाळ्याच्या दिवसात त्या मुलीला शाळेत सोडायला जाताना त्या मुलीवर छत्री धरून ती जात असे. स्वत: आपण उन्हाचा मारा सहन करायची. त्यामुळे मालकाला आनंद व्हायचा व तो तिला पगार द्यायचा. सगळे हा विचार करून आपला–परका याचे भान ठेवा. सासू–सासरे, छोटे मोठे सर्वांचा मानसन्मान ठेवणे आपले परम कर्तव्य आहे. जर तुम्ही आपल्या सासू–सासरे, आई वडील किंवा अन्य आश्रितांची सेवा केल्यास तो परमात्मा आपल्या सेवेची व्यवस्था करेल. तुम्ही तुमच्या छोट्या छोट्या मुलांना देखिल तुमच्या सोबत सत्संगात आणत चला. मुलांवर मोठ्या माणसांची सेवा करण्याचे व त्यांच्याशी नम्रपणे वागण्याचे संस्कार होतील. हीच मुले पुढे मोठी होऊन आपण वृद्ध झाल्यावर आपली सेवा करणार आहेत. जशी मुलगी आपल्या आई वडिलांना सोडून आपल्या नवीन आई वडिलांकडे (सासू–सासरे) जाते. आता जन्मदाते आई वडीलांची साथ आतापर्यंतच होती. त्यांनी पालन पोषण करून नवीन आई वडिलांच्या कडे तिला सोपविले. सासू सासऱ्यांचे कर्तव्य आहे की येणाऱ्या सुनेला मुलगी समजून तिच्यावर प्रेम करायला पाहिजे. आपली नवीन मुलगी आणि जन्म दिलेल्या मुलीत स्वप्नात देखिल कोणताही भेद करू नका. तेच सर्व भांडणांचे मूळ आहे. नव्या घरातील परिस्थिती अनुसार स्वतःला घडवणे हे नवीन सुनेचे देखिल कर्तव्य आहे. आईच्या घरी जशी वागत होती, ते जरा कमी केले पाहिजे. आता हे सासरच सुनेचे घर आहे.

बोध कथा :– एक सून आपल्या सासूला खूप दु:ख द्यायची. तिला वाईट वागवायची. फुटक्या मातीच्या भांड्यात जसे कुत्र्यांना खायला देतात, तशा भांड्यात तिला जेवण द्यायची. कधी ते स्वच्छ करायची, कधी नाही. तिच्या मुलाचा विवाह झाला. काही कालावधीनंतर सासू मरण पावली. तेव्हा हिने आपल्या सुनेला ते ते मातीचे भांडे फोडून टाकण्यास सांगितले. तेव्हा सून म्हणाली, सासूबाई! तुम्हाला देखिल याच भांड्यात जेवण देत जाईन. तुमच्या सासूला तुम्ही खूप छळले आहे. तेव्हा ती आपल्या चुकीला समजून फार रडली. त्या मातीच्या भांड्याला संध्याकाळ पर्यंत फोडले नाही. तिच्या सासूला ते मातीचे भांडे एखाद्या शत्रू प्रमाणे दिसत होते. सून बुध्दीवान होती. सून सासूला म्हटली आई! मी सत्संग ऐकले आहेत. मी खराब काम कधीही करणार नाही. असे म्हणून तिने ते मातीचे भांडे फोडून टाकले. पाप कर्म केल्यामुळे सासूला कर्करोग झाला. रोज आरडाओरडा करायची. सून तिची सेवा करायची, कुठलीही उणीव ठेवायची नाही. पण म्हणायची की सासुबाई! तुमची सेवा मी मनापासून करीन, पण तुमची पापे मी वाटून घेऊ शकणार नाही. ते तर तुम्हालाच भोगावे लागतील. जरी सत्संग श्रवण केले असते, तर हे दिवस नसते बघावे लागले. तेव्हा ती खडूस सासू म्हणाली की बेटी! मी महापापिणी आहे. माझा पण उद्धार होईल काय? माझी पण अनुग्रह घ्यायची इच्छा आहे. सून सत्संग करणाऱ्या घरातली होती. तिला माहिती होते की अनुग्रह घेतल्यावर भक्ति केल्यास पापकर्म नष्ट होतात. ज्यांची अधिक पापे आहेत, त्यांचा भक्ति करण्याने लाभ ही होईल, पाप कमीच होतील आणि भविष्यात मानव जन्म देखिल मिळू शकतो. मर्यादा सांभाळून जरी अंतिम श्वांसा पर्यंत साधना करत राहिले तरी उद्धार होईल. सत्संगात गुरूदेव जी उदाहरण देऊन समजावतात की जसे कोणाचे वस्त्र कमी मळलेले आहे तर थोड़े प्रयत्न करून तो निर्मल होतो. जरी अधिक मळलेला असेल, तर तो दोन–तीन वेळा साबणाच्या पाण्यात

धुतल्यास निर्मल होतात. ज्याचा अधिक मळलेला आहे आणि आणखी डागदेखिल लागले आहेत, तो ड्रायक्लीन करून साफ होतो. जर स्वच्छ करण्याचा निश्चय ठाम असेल तर मिस्त्रीचे काळे कपडे देखिल स्वच्छ होतात. सुनेला माहिती होते की सासूने तर मिस्त्रीच्या कपड्यांच्या सारखी दशा करून घेतली आहे. परंतु तरीही परमात्माला शरण गेल्यास लाभ अवश्य होतो. या उद्देशाने तिने आपली सासूबाईंना अनुग्रह देवविला. काही काळानंतर कर्करोगाचा त्रास थोडा कमी झाला. सत्संग ऐकून तिला रडू आले की आई वडिलांची आपल्या मुला-सुनेकडून काय अपेक्षा असणार? मी पापिणीने माझ्या सासूशी अशी का वागले? मला हा रोग होणारच होता. याआधी जरी हे ज्ञान श्रवण केले असते, तर हे पाप मी कशाला केले असते? निर्लेप जीवन जगले असते. सासूबाईंचे आशीर्वाद देखिल मिळाले असते. माझे आयुष्य सफल झाले असते. वरील प्रवचन ऐकून रामभक्त जींची सून तिच्या जुन्या मैत्रिणीच्या (जुनी भक्तमति) खांद्यावर डोके ठेऊन जोरजोरात रडू लागली. अर्धा तास ती अशीच रडत होती. समजूत घातल्यावर रडणे थांबले. आपल्या वडिलांच्या प्रमाणे असलेल्या सासऱ्याशी कशी वागले, याचा उल्लेख पश्चातापाने स्फुंदत स्फुंदत केला. आपल्या सासऱ्यांची माणुसकी वर्णन केली. तिचे त्यांच्याशी वाईट वागणे असून देखिल कधीही त्यांनी ते मुलाला सांगितले नाही. मी तुझी बायको माझ्याशी वाइट वागत आहे. मुलाने विचारले तर सून उत्तम सेवा करते आहे, कुठेच काही कमी नाही असेच सांगायचे. सून समजूतदार आहे, चांगल्या घरातील आहे, अशी सून मिळणे हे परमभाग्यच, तिने आमच्या घराची घडी उत्तम बसविली आहे असे सांगायचे. मी पापी एवढी निर्दयी की या शब्दांचा देखिल माझ्यावर परिणाम शून्य. माझ्यावर तेव्हा अशी पाप कर्मे करायचे भूत चढले होते आणि दोन तीन दिवस सत्संग श्रवण केल्यावर आता ते उतरले आहे. माझ्यावर आता चांगले संस्कार होताहेत. तीन दिवस सत्संग श्रवण करून भक्त रामभक्त, नातवंडे आणि सुनेसह घरी आले. मुलांनी देखिल तिथे छोट्या मुलांना जेवण भरविताना आणि पाणी पाजताना तिथल्या सत्संगी मुलांना पाहिले असल्यामुळे आता ते देखिल सेवा करायला लागले. दोघेही बहिण भाऊ आपल्या आजोबांसाठी पाण्याची बादली भरून घेऊन आले आणि म्हणाले, दादा जी! स्नान करून घ्या. रामभक्त जीने म्हटले की मुलांनो, तुमच्या पोटात दुखायला लागेल. इतके वजन उचलू नका. माझे मी उचलून घेईन. मुले म्हणाली दादा जी! सत्संगात गुरूजींनी सांगितलय, सेवा करून नेहमी लाभच होतो. काहीही कष्ट होत नाहीं. आम्ही पोळी खाल्यावर आमचे पोट भरेल. आम्ही सेवा केली तर आम्हाला पुण्य मिळेल. जरी रोग असला तरीही भक्ति आणि सेवा केल्याने तो संपतो. तिकडे आश्रमातील अनेक माता भगिनींनी सांगितले की आम्ही आजारी असलो आणि नाम घेतल्यानंतर जशी सेवा करू लागलो, तसे आम्हाला बरे वाटले. डॉक्टरांनी सांगितले होते, हे बघा! आमची औषधे घेऊन चार वर्षापासून उपचार सुरु होते, आता कोणतेही औषध घेत नाही. (ऋग्वेद मण्डल १० सूक्त १६१ मंत्र २ मध्ये याचे प्रमाण आहे की जरी रोगी मृत्युच्या निकट गेलेला असला आणि त्याला असाध्य रोगही झालेला असला तरीही तो भक्ति करायला लागल्यावर परमात्मा त्याला मृत्युच्या दाढेतून बाहेर काढून खडखडीत बरा करतो आणि तो आपले पूर्ण आयुष्य जगतो १०० वर्षे – लेखक)

इतक्यात सून आली आणि म्हणाली, बाबा! स्नान करून घ्या. धोतर इथेच ठेवा. मी धुवीन. रामभक्त जी म्हणाले बेटी! तुला घरातले सगळे काम बघावे लागते, जेवण शिजवणे, पाणी आणणे, जनावरांना सांभाळणे आहे. मी माझे घोतर धुतो. माझा पाय आता ठीक झाला आहे. बस थोड़ासा लंगडतो आहे इतकेच. रामभक्त स्नान करून धोतर बदलून धोतर धुवायला

लागले. त्याचवेळी मुलांनी त्यांचे धोतर घेतले आणि आपल्या आईला नेऊन दिले. मग सदरा घेऊन गेले आणि नवीन सदरा आणून दिला. मुलगा शेतातून घेऊन प्राण्यांना चारा देऊन घरी आला. पूर्वीप्रमाणेच वडिलांना पाहिले आणि काहीही न बोलता घरात निघून गेला. त्याने पत्नी निर्मलाला हलवा बनविताना पाहिले. त्याला वाटले असेल एखादा सण. मग पोळी भाजी बनविली. सर्व प्रथम गुरूदेवांना दोन पोळ्यांचा नैवेद्य दाखविला आणि मग एका ताटात पोळी, वाटीत हलवा, आणि भाजी घालून सासऱ्यांच्या जवळ जाऊन म्हणाली, बाबा! जेवण करून घ्या. भूक लागली असेल तुम्हाला. रामभक्त म्हणाले, मुली! इतके अन्न मला जाणार नाही. मी आजारी पडेन. कोरड्या पोळ्या मला आणून दे. रामभक्तजींनी विचार केला की भावनेच्या आहारी जाऊन ही मुलगी आज तर सर्व करेल, पण मुलगा परत तिला धमकावेल कारण त्याला सत्संगाचे काहीच ज्ञान नाहीं आहे. तेवढ्यावरून घरात भांडण व्हायला नको. तेवढ्यात मुलगा देखिल आला. आपल्या पत्नीला म्हणाला, बाबा म्हणताहेत ते बरोबर आहे. आतमध्ये घेऊन चल. बाबांची खोली थोडी बाजूला होती. मुलांची रहाण्याची खोली आतची होती. पत्नी म्हणाली जरा थांबा. मी आतापर्यंत खुप पापे केली आहेत. आता बाबांची सेवा मी स्वतः करणार आहे. मुलगा गप्प झाला. रामभक्ताने दोन्ही नातवंडांना थोड़ा-थोड़ा हलवा दिला. सुनेला द्यायला लागला तर म्हणाली, तुम्ही काय खाणार मला दिल्यावर? घरी आणखी खूप हलवा प्रसाद राहिला आहे. तुम्हीच खाऊन घ्या. घेतला नाहीत, तर माझ्या आत्म्याला बरे वाटणार नाही. भक्त रामभक्तजींनी गुरूदेवांचे स्मरण करून भोजन घेतले. सुनबाई स्वतः रोज मऊ मऊ गरम पोळ्या आपल्या हातांनी भरवायची. कपडे स्वच्छ धुवायची आणि म्हणायची बाबा, तुम्ही आता भजन करा.

एक दिवस रामभक्तजींच्या आत्याचा मुलगा भक्त रामनिवास आला. रामभक्तजींनी त्याला कवेत घेतले आणि म्हणाले अरे! तुझ्या कृपेने आमचे घर म्हणजे स्वर्ग झाला आहे. भक्त रामनिवास म्हणाला की मामाचा मुलगा म्हणजे रामनिवास कडून काही नाही झाले, गुरूदेवजींच्या शब्द-शक्तिचा चमत्कार आहे. तुम्ही आणि मी दोघे बरोबर विटी दांडू खेळायचो. माझ्याकडून होणारे असते, तर आधीच झालेच असते. गुरूजी म्हणत होते की रामभक्त मागल्या जन्मी भक्त होता. याला घराचा मोह पडल्यामुळे श्रद्धेत गफलत होत होती. त्यामुळेच त्याला इतके हाल सोसावे लागले. आता अतिशय दुखी होता. म्हणूनच तुझ्यासोबत आला. नाहीतर आधी कितीतरी लोकांनी रामभक्ताला आधी सांगितले होते की सत्संगात चल, परंतु मोह-मायेत आंधळ्या झालेल्याला या यातना आणि मुला-सुनेचे वागणे म्हणजे वरदान ठरले आहे.

कबीर जींनी म्हटले आहे की :-

कबीर, सुख के माथे पत्थर पड़ो, जो नाम हृदय से जाय।
बलिहारी वा दुःख के, जो पल-पल राम रटाय।।

भावार्थ :- हे परमात्मा! तुझा विसर पडेल इतके सुख देखिल देऊ नकोस. ज्या दुःखामुळे परमात्माची क्षणाक्षणाला आठवण येते, ते दुःख मला सतत दे. ते दुःख सुध्द एक प्रकारे वरदानच मानावे ज्या कारणाने परमात्माची भक्त मिळाली.

भक्त रामभक्त जीने भक्त रामनिवास जींना म्हटले की आताच्या सत्संगात बेटा प्रेम सिंहला देखिल घेऊन जा. त्याचा देखिल उद्धार होऊन जाईल. पुढल्या महिन्यातच सत्संग होता. भक्त रामनिवास जी आले आणि प्रेम सिंहला आपल्या घरी नेण्याच्या नावाखाली सत्संगात घेऊन गेले. तीन दिवस आश्रमात राहिले. सत्संग श्रवण केला. अन्य जुन्या भक्तांवर

आलेल्या संकटांचे वर्णन ऐकल्यावर सत्संगात रंग भरला. भक्त रामभक्तजींच्या कुटुंबात चमत्कार वाटावेत असे बदल घडले. भक्ति-सेवा करून आपले कल्याण साध्य केले.

## ''सत्संग ऐकल्याने घरातील भांडणतंटे समाप्त होतात''

एक सासू आपल्या आपल्या सुनेवर सारखी राग-राग करायची ओरडायची. छोट्या-छोट्या चुका मोठ्या करून मुलाला सांगायची. मुलगा आपल्या पत्नीलाधमकावायचा. अशा प्रकारे घर म्हणजे एक नरक झाले होते. सून तिच्या सासुबाईंना कधी कधी सत्संगात जायला सांगायची. आपली शेजारची बाई देखिल जाते. सासूबाई म्हणाल्या की सत्संगात नखरेवाले स्त्रिया जातात. ज्यांना संसारात कोणताही सम्मान मिळत नाहीं, ज्या चांगल्या घरच्या नसतात, त्या स्त्रिया सत्संगात जातात. आपण घरंदाज आहोत. आपला सत्संगाशी काय संबंध? सुनेने अनेक प्रयत्न केले पण बाई काही ऐकायला तयार नाही. एक दिवस गावातील एक स्त्री काही कामाने त्यांच्या घरी आली होती, आली तेव्हा सासू सुनेला शिव्या घालत होती, धमकी देत होती, आज येउदे तुझा नवरा. तुझी कशी पोल उघडी करते बघ. झाले असे होते की सासूबाईसाठी पेल्यात चहा ठेवला होता. सून झोपून उठलेल्या मुलाला आणायला म्हणून एक मिनिटासाठी आतमध्ये गेली होती. तो उठल्यावर रडत होता. मुलाला उठवून आण्यासाठी मिनिटपण लागला नाही. इतक्यात एका कुत्र्याने चहाच्या पेल्याला जीभ लावली. पेला पडला. चहा जमिनीवर सांडला आणि सगळीकडे पसरला. सासूबाई अंगणात खाटेवर त्या सांडलेल्या पेल्यापासून वीस फुट अंतरावर बसल्या होत्या. धडधाकट होत्या शेतात रोज चक्कर मारायला जायच्या, पण कामात अजिबात हात लावायच्या नाहीत. याच कारणावरून घरात भांडणे होत होती. गावातल्या दुसऱ्या गल्लीतून आलेल्या बाई नियमित सत्संगात जात असत. हे सर्व ऐकल्यावर तिने देखिल भतेरीला (त्या सासूचे नाव आहे, सांगितले की सत्संगात चला. तिचे हेच उत्तर होते. त्या सत्संगात जाणाऱ्या भक्तमतिने सत्संगातील अनेक गोष्टी तिला खूप वेळा सांगितल्या. परंतु भतेरी ऐकायलाच तयार नाही. भतेरीची दूसरी बहीण जिथे सत्संगात जाणारी जानकी राहत होती, त्याच गल्लीत विवाह होऊन दिलेली होती. भतेरीच्या बहीणीचे नाव दयाकौर होते. जानकी ने जाऊन दयाकौरला सांगितले की तुझी बहिण भतेरीने तर तिच्या घराचे नरक केले आहे. बिनाकारण भांडणे करत असते. मी काही कारणाने काल गेले होते. एक चहाचा पेला कुत्र्याने पाडला. त्यावरून हिने सगळे महाभारत घडवले. दयाकौरदेखिल जानकीच्या सांगण्यावरून सत्संग श्रवण करण्यास गेली होती आणि अनुग्रह घेतला होता. जानकीने म्हटले की कसेही करून तिला एकदा सत्संगाला घेऊन चल. जोपर्यंत संतांचे विचार ऐकण्यास मिळणार नाहीत, तोवर ती व्यर्थ चिंता स्वतःच करत राहील आणि घरच्या लोकांना देखिल चिंता करायला लावेल. दयाकौर दुसऱ्याच दिवशी आपल्या बहिणीच्या घरी गेली. काहीतरी कारण सांगून भतेरीला आपल्या घरी घेऊन गेली. तिथून सत्संगात जाण्यासाठी इतर स्त्रिया जानकीच्या घरासमोर उभ्या राहिल्या. त्या दयाकौरला सत्संगात घेऊन जाण्यासाठी तिच्या घरी गेल्या. तिथे तिच्या बहिणीला भतेरीला पाहून तिला पण सत्संगाला घेऊन गेली. भतेरी ने आयुष्यात प्रथमच सत्संग श्रवण केला. आश्रमात कसे स्त्री-पुरूष रहातात हे डोळ्यांनी पाहिले तर छान वाटले. ती जशी वेडेवाकडे बोलायची, तसे आश्रमात काहीही बघायला मिळाले नाही. सत्संगात असे सांगितले की अनेक लोक स्वतः कधी सत्संगात जात नाहीतच पण आपली सून, सासू, मुली, आणि अन्य स्त्रियांना देखिल तिथे जाऊ देत नाहीत. ते म्हणतात की आम्ही सत्संगात गेल्याने घराची बेअब्रू होईल आणि आमच्या लेकीसुना बदनाम

**होतील. त्यांनी हा विचार करायला पाहिजे की सत्संगात न आल्यास परमात्माच्या विधानाचे ज्ञान होत नाहीं त्यामुळे भक्ति न करणाऱ्या स्त्री-पुरूषांना पुढल्या जीवनात अनेक यातना भोगाव्या लागतात.**

❖ **सूक्ष्मवेदात सांगितले आहे की जो मनुष्य शरीर प्राप्त करून देखिल भक्ति करत नाहीं, त्यांचे काय नुकसान होते?**

कबीर, हरि के नाम बिना, नारि कुतिया होय।
गली-गली भौकत फिरै, टूक ना डालै कोय।।

**संत गरीबदास जी म्हणतात :-**

बीबी पड़दै रहे थी, ड्योडी लगती बाहर।
अब गात उघाड़ै फिरती हैं, बन कुतिया बाजार।
वे पड़दे की सुन्दरी, सुनों संदेशा मोर।
गात उघाड़ै फिरती है करें सरायों शोर।।
नक बेसर नक पर बनि, पहरें थी हार हमेल।
सुन्दरी से कुतिया बनी, सुन साहेब(प्रभु)के खेल।।

**भावार्थ :- मनुष्य जीवन प्राप्त करणाऱ्याने जर भक्ति केली नाहीं तर मृत्युनंतर पशु-पक्षांची योनि प्राप्त करतो. परमात्माचे नामजप न करणारी स्त्री पुढल्या जन्मात कुत्रीचा जन्म घेते. मग निःवस्त्र होऊन नागड्या शरीराने रस्त्यावरून भटकत राहते, भूकेने व्याकूळ होऊन जाते, पण तिला कोणी पोळीचा तूकड़ा देखिल टाकत नाही. ज्या वेळेस तो आत्मा स्त्री रूपात कोण्या राजा, राणा आणि उच्च अधिकाऱ्याची पत्नी होती, ते तिच्या पूर्व जन्मातील पुण्याईचे फळ होते, जे तिने कोणत्या तरी जन्मात भक्ति-धर्म केल्यामुळे मिळाले होते. ती सर्व भक्ति आणि पुण्य स्त्रीरूपात प्राप्त केल्या. त्या स्त्रीया उच्च घराण्यातील लेकी सुना होत्या. तेव्हा पडद्यात राहत असत, काजु-किसमिस घालून हलवा आणि खीर खायच्या, त्यांचे उष्टे त्यांच्या मोलकरणी खायच्या. त्यांना सत्संगात जाऊ देत नव्हते. कारण त्या उच्च घराण्यातील लेकीसुना होत्या आणि त्या घराबाहेर पडल्या, तर त्या घराची ती बेअब्रू समजली जात असे. लेकीसुना घरीच पडद्यामध्ये राहणे हीच घराण्यांची अब्रू-इज्ञतीची संकल्पना होती. त्यामुळे त्यांना पुण्यात्मा संतांच्या सत्संगामधील विचार श्रवण करायला मिळायचे नाहीत. त्या मानवी शरीरात ती स्त्री गळ्यात नऊ नऊ लाख रूपये किमतीचे दागिने-हार घालायच्या नाकात सोन्याच्या नथी घालायच्या आणि त्या साजशृंगारातच धन्यता मानत होत्या. भक्ति न केल्यामुळे आता त्यांना कुत्रीची योनी प्राप्त होऊन नागड्या शरीराने रस्त्यात भाकरीच्या एका एका तुकड्यासाठी लाचार व्हावे लागत होते. गावात पूर्वी एक धर्मशाळा असायची. प्रवासी रात्रि तिथे थांबत असत. सकाळी भोजन घेऊन पुढे जायचे. त्या पडद्यात राहणाऱ्या सुदंर स्त्रिया आता कुत्री होऊन धर्मशाळेतील थांबलेल्या प्रवाशांकडून टाकल्या गेलेले तुकडे मिळविण्यासाठी भुंकत आहेत. पोळीचा तुकडा जमिनीवर टाकतात. त्यासोबत रेती-माती आणि रस्त्यावरची इतर घाण चिकटून येते. ज्या सुंदर स्त्रिया काजु-किसमिस घालून हलवा आणि खीर खायच्या, त्यांनी भक्ति न केल्यामुळे त्यांना रेती-माती युक्त पोळीचे फेकलेले तुकडे खावे लागत आहेत. मानवी शरीर धारण केले असताना संतपुरुषांची प्रवचने ऐकून भक्ति केली असती, तर हे दिवस पाहवे लागले नसते.**

## "पुहलो बाईचा सल्ला"

एका राजाने पुहलो बाईचे ज्ञान–विचार ऐकले आणि तो अतिशय प्रभावित झाला. त्या राजाला तीन राण्या होत्या. राजाने त्यांना पुहलो बाईविषयी सांगितले. राजाने अनेक वेळा पुहलो बाई भक्तिणीचे आपल्या राण्यांच्या समोर कौतुक केले होते. नवऱ्याच्या तोंडून अन्य स्त्रीची अशी प्रशंसा त्या राण्यांना रुचली नाही. परंतु काही बोलू शकत नव्हत्या. त्यांनी भक्तमति पुहलो बाईना पाहण्याची व भेटण्याची इच्छा व्यक्त केली. राजाने पुहलो बाईना आपल्या घरी सत्संग करण्यासाठी विचारले तेव्हा पुहलो बाईने सत्संगाची तारीख आणि वेळ राजाला सांगितली. सत्संगाच्या दिवशी राण्यांनी अतिशय सुंदर आणि महागडे कपडे आणि दागिने घातले होते. आपले सौंदर्य प्रदर्शन करण्याची एकही संधी त्यांनी सोडली नव्हती. राण्यांनी. विचार केला की पुहलो अतिशय सुंदर असेल. भक्तमति पुहलो राजाच्या घरी आली. तिने खादीचे मळकट वस्त्र नेसले होते. हातात माळ होती. चेहरा देखिल फारसा उजळ नव्हता. भक्तमति पुहलोला पाहून तिन्ही राण्या फिदीफिदी हसायला लागली आणि म्हणाल्या की हीच होय ती पुहलो, आम्हाला तर वाटले होते की ती खूप सुंदर असेल. त्यांच्या या सगळ्या गोष्टी ऐकल्यावर भक्तमति पुहलो बाईने म्हटले कि :–

वस्त्रा–आभूषण तन की शोभा, यह तन काचो भाण्डो।
भक्ति बिना बनोगी कुतिया, राम भजो न रांडो।।

भावार्थ :– सुंदर वस्त्रे आणि दागिने शरीराची शोभा वाढवतात. हे शरीर नाशवंत आहे. एखाद्या कच्चा घड्यासारखे हे शरीर क्षण भंगुर आहे. कोणत्या कारणामुळे आणि कोणत्या वयात काबाड कष्ट होतील, काय माहित. भक्ति केली नाहीं तर पुढल्या जन्मात कुत्री व्हाल. मग वस्त्रहीन अवस्थेत फिराल. म्हणून म्हटले आहे रांडो–रांडो हा शब्द विधवा स्त्रियांसाठी वापरला जातो. परंतु सामान्यपणे स्त्रिया आपल्या आवडत्या मैत्रिणीला प्रेमाने संबोधण्यासाठी हा शब्द (प्रिय शिवी म्हणून) वापरतात. आता शिक्षित झाल्यामुळे हा शब्द वापरात नाहीत. भक्तमति पुहलो बाई ने सत्संग ऐकवला. परमेश्वर कबीर जीचे दोहे ऐकवले :–

कबीर, हरि के नाम बिना, नारी कुतिया होय।
गली–गली भौंकत फिरे, टूक ना डाले कोय।।
कबीर, राम रटत कोढ़ी भलो, चू–चू पड़े जो चाम।
सुंदर देहि किस काम की, जा मुख नाहीं नाम।।
कबीर, नहीं भरोसा देहि का, विनश जाए छिन माहीं।
श्वांस–उश्वांस में नाम जपो, और यत्न कुछ नाहीं।।
कबीर, श्वांस–उश्वांस में नाम जपो, व्यर्था श्वांस मत खोओ।
ना जाने इस श्वांस का, आवन हो के ना होय।।
गरीब, सर्व सोने की लंका थी, रावण से रणधीरम्।
एक पलक में राज्य गया, जम के पड़े जंजीरम्।।
गरीब, मर्द–गर्द में मिल गए, रावण से रणधीरम्।
कंस, केसि, चाणूर से, हिरणाकुश बलबीरम्।।
गरीब, तेरी क्या बुनियाद है, जीव जन्म धरि लेत।
दास गरीब हरि नाम बिन, खाली रह जा खेत।।

❖ शब्दार्थ :– कबीर परमेश्वराने अध्यात्माचे विधान सांगितले आहे कि, जी स्त्री

**भक्ति करत नाही, ती पुढील जन्मात कुत्रीचे जीवन प्राप्त करून गल्लो गल्ली भूकंत फिरते. कोणी तिला जेवणाचा घास देखील टाकत नाही. मानव जीवनात सर्व जेवण वेळेवर मिळत होते. भक्ति न केल्याने हि दशा झाली.**

**❖ परमात्माची भक्ति कुष्ट रोगी (ज्याच्या शरीराची साल देखील निघत आहे, त्यातून रक्त निघत आहे) देखील करत आहे तर खूप चांगले आहे. भक्ति केल्याने त्याचा कुष्ट रोग देखील ठीक होईल. भविष्य देखील उज्वल होईल. जो भक्ति करत नाही तो सुंदर शरीराचा का असेना त्याचे सुंदर स्वस्थ शरीर काही कामाचे नाही.**

**❖ या मानवी शरीराचा काही विश्वास नाही कि हे केव्हा व कोणत्या कारणाने नष्ट होईल. यास सांभाळून ठेवले जाऊ शकत नाही. याचा एकच उपाय आहे, भक्ति करा. एवढे स्मरण करा कि एक श्वास देखील नाम जपा व्यतिरिक्त नाही गेले पाहिजे.**

**❖ श्वास सोडताना तसेच घेताना प्रत्येक श्वासात नाम जपा. श्वासास नामाच्या जापाशिवाय व्यर्थ नका जाऊ देऊ. या श्वासास ज्ञान नाही, कि हा आतमध्ये गेल्यावर बाहेर येईल का नाही. यासाठी चूक न करता भक्ति सुरु करा.**

**❖ जर आपल्या जवळ धन दौलत आहे. यामुळे भक्ति करण्यास विसरू नका. श्रीलंकाच्या रावण राजा जवळ सर्वात जास्त धन होते. त्याने सोन्याचे घर बांधले होते आणि स्वत: देखील योद्धा होता. परंतु श्रीरामचंद्र बरोबर युद्ध झाले व मारला गेला. सोने देखील लुटून गेले. राज्य भी गेले. हे सर्व एकाच क्षणात झाले म्हणजे रामाच्या बाणाने मारला गेला. काही क्षणात नष्ट झाले तसेच यमाचे दूत म्हणजे मृत्यू देवता चे नौकर त्या रावणास साखळीने बांधून घेऊन गेले. नरक मध्ये टाकले.**

**❖ रावणासारखा पुरुष (शुरुवीर) माती मध्ये मिळाला तसेच मथुराचा राजा कंस, त्याचा प्रसिद्ध पहलवान चाणूर, कंस चा नोकर केशी रूपधारी राक्षस तसेच हिरण्यकशिपू यांच्यासारखे बलवान देखील भक्ति विना जीवन व्यर्थ करून गेले. हे सामान्य व्यक्ति तुझी काय औकात आहे म्हणजे तू कोणत्या आधारे वाचशील? तू कर्माच्या आधारे वेगवेगळ्या जीवांचे शरीर धरण करतो. संत गरिबदासांनी परमेश्वर कबीरांनी सांगितलेल्या ज्ञानाने म्हटले आहे कि भक्ति न केल्याने तुझे असे नुकसान होईल जसे शेतकरी शेतात बी न पेराल्याने भुखा मरतो. त्यास कोणताच लाभ होत नाही.**

**भक्तिमति पुहलोने या संसारातील वास्तविकता सांगितली आणि भक्तिबिना होणारे कष्ट सांगितले. छोटयाशा राज्याचे तुकड़े मिळवून तुम्ही इतका अहंकार दाखवत आहात, तो व्यर्थ आहे. लंकेचा राजा रावणाने सोन्याची घरे बनवली होती. खरी भक्ति न केल्याने राज्यही गेले, स्वर्णदेखिल इथेच राहिले आणि नरकात जाऊन पडला. राजा-राण्यांनी उपदेश घेऊन भक्ति केली आणि आपले जीवन धन्य केले.**

कबीर, हरि के नाम बिन, राजा रषभ होय।
मिट्टी लदे कुम्हार के, घास न नीरै कोए।।

**परमात्माची भक्ती न केल्याने राजाला गाढवाचे शरीर प्राप्त होते. कुंभाराच्या घरी माती वाहून नेतो. आणि जवळच्या जंगलातील गावात खाऊन राहतो.**

फिर पीछे तू पशुआ किजै, दीजै बैल बनाय।
चार पहर जंगल में डोले, तो नहीं उदर भराय।।

सिर पर सींग दिए मन बौरे, दूम से मच्छर उड़ाय।
कांधै जूआ जोतै कूआ, कोंदों का भुस खाय।।

**भावार्थ :-** गाढवाचे जीवन झाल्यावर तो प्राणी बैलाच्या योनिला प्राप्त होतो. मानवी शरीरात जीवाला किती सुविधा प्राप्त होत्या. भूक लागताच जेवण करा, दूध प्या, चहा प्या, तहान लागली तर पाणी प्या. भक्ति न केल्यामुळे तोच प्राणी बैल होऊन सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत चार प्रहर म्हणजेच १२ तास जंगलात फिरत असतो. नांगराला जोडला जातो. बैलाला दिवसात फक्त दोन वेळा खायला देतात. दुपारी १२ वाजता आणि रात्रि. परंतु बैलाला मध्येच भूक लागली आहे आणि चारी बाजूला चारा पड़लेला असेल तरी खाऊ शकत नाही. नांगर चालवणारा त्याला खाऊ देत नाही. पाणी देखिल दिवसातून दोन किंवा तीन वेळच दिले जाते. डोक्यावर शिंग आणि एक शेपूट असते. जेव्हा मानव शरीर धारण केले होते, तेव्हा तोच जीव कूलर, पंखे आणि ए.सी. खोलीत राहत होता. आता एक शेपूट आहे. त्याचा कसाही वापर कर म्हणजे पंखा किंवा कुलर असा डास उडविण्यासाठी प्रयोग करतो.

❖ सत्संगात हेही सांगितले जाते की परमात्माचे सांगणे समजावून न घेऊन जगाचा भाव मनात ठेवल्यामुळे घरोघरी कलह दिसून येतो. घरातील कोणाचीही घराला नुकसान करण्याची इच्छा नसते, त्यामुळे त्यावर भांडण वाढविण्यात फारसा अर्थ नाही. काही कारणाने नुकसान झालेच, त्यावरूनही भांडण करण्यात अर्थ नाही. जे नुकसान व्हायचे ते होऊन गेले आहे. ते आता काही भरून निघणार नाही आहे. उगाच भांडणे करण्यात काही शहाणपण नाही. ज्याच्या चुकीमुळे नुकसान होते, मग ती मुलगा-मुलगी, आई-वडील, सासू-सासरे असोत, त्याला हेच सांगितले गेले पाहिजे, हे पहा! तुमच्याकडून हे जे काही झाले, आपल्या भाग्यात नव्हते. ते जाणूनबुजून झालेले नाही. यामुळे घरात शांतता कायम राहील. भांडणात काळाचे वास्तव्य असते. भुतेखेते घरात मुक्काम करतात. जे भांडणे करीत नाहीत, ते सुखात असतात. ज्या घरांमध्ये परमात्माची भक्ति (आरती-स्तुति, ज्योति यज्ञ) होत आहे, त्या घरांमध्ये देवतांचा निवास असतो.

सत्संग ऐकून सगळे आपापल्या घरी गेले. सत्संग दिवसा १२ ते ०२ पर्यंत झाला. सुनेला माहिती नव्हते की सासूबाई सत्संगात गेल्या आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हशीचे दुध काढून सुनेने ती बादली छताला लागलेल्या खुंटीला रोजच्या प्रमाणे अडकवून ठेवली. तिला वाटले की बादली व्यवस्थित टांगली गेली. पण बादलीची कडी खुंटीच्या उलट्या बाजूने टांगली गेली होती. सुनेने विचार केला की बादली व्यवस्थित लागली आहे आणि तिने बादली सोडून दिली. पण बादली जमिनीवर पडली आणि दुध सगळीकडे जमिनीवर पसरले. आवाज ऐकून भतेरी आली आणि सून दुधाच्या ऐवजी सासूकडे भेदरून पाहू लागली. काहीही बोलून उपयोग नव्हता कारण सुनेला हे माहिती होते की काहीही खुलासा केला तरी सासूला ते पटणार नाहीच आहे. सून विचार करीत होती आज सगळा दिवस भांडणात जाणार. संध्याकाळी नवरा येणार, त्याच्याकडूनही मार बसणार. अरे देवा! हे काय होऊन बसले? अशी चूक तर कधीच झाली नव्हती. हे सतगुरु! काही तर दया करा. मला आपली भक्ति विसरायला झाली आहे. संपुर्ण दिवस सासूबाईचे श्लोक मला (ऐकावे लागतील) आठवतात. भतेरी म्हणाली मुली! जे झाले ते झाले. आज आपल्या नशिबात दुध लिहिले नव्हते. काळजी नको करू. सांडलेले दुध बादलीत भरून म्हशीला प्यायला देऊ. असे म्हणून अनुग्रह घेताना जे नामस्मरण सांगितले होते, त्याचा जप करायला लागल्या. सुनेचा आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता.

ती विचार करत होती, आज सासूबाई आकाशवाणीचे कोणते केंद्र लावून बसल्या आहेत काही कळत नाही. एवढे शांत आणि सहज भतेरी बोलूच शकत नाही. तिच्यात खुंखार पुरेपूर भरलेला आहे. आजूबाजूने गेली तरी बड़बड़ करत जाईल. सुनेचे नाव निशा होते. ती विचार करीत होती :– निशा आज निशा (रात्रि) में तेरी बुरी होगी दशा।

निशा असा विचार करीत होती की नवऱ्याला सांगेल, तो तर आईचे ऐकल्यावर पत्नीचे काहीच ऐकून घ्यायचा नाही. भलेबुरे काहीही म्हणेल आणि मग सगळी रात्र आणि दिवस नुसता रडण्यातच जाईल. निशाने दुध बादलीत भरून म्हशीला प्यायला दिले. बादली धुवुन ठेवून भतेरी आली आणि म्हणाली की मुली! पोळी खावुन घे. तू अजिबात काळजी करू नको. मी काल माझी बहिण दयाकौर सोबत दिवसा सत्संगाला गेले होते. तिथे माझे डोळे उघडले. मी खूप भांडकुदळ आहे. मुली शक्य असल्यास मला क्षमा कर. आधी झाले ते झाले. आता मी माझ्या मुलीला फुलासारखे ठेवीन. तूच माझी खरी मुलगी आहेस. जन्म दिलेली मुलगी दुसऱ्यांची होती, ती तर आता गेली. आता आपले सुख–दु:ख एकच आहे. एका दिवसांच्या सत्संगाने माझे डोळे उघडले. मुली! पुढल्या रविवारी तू पण चल. मी पण येईन. हळूहळू तुझ्या नवऱ्याला देखिल घेऊन जाऊ. निशा ने आपल्या गुरूजीचा फोटो (स्वरूप) कापड़ात लपवून ठेवला होता. फोटो काढून त्यावर डोके टेकवून ती गुरुजींना म्हणाली की हे गुरूवर! आज आपण आपल्या मुलीची हाक ऐकली. घराचा स्वर्ग झाला आहे. सायंकाळी चतुरसिंह आल्यावर तर आईने दुध वाया गेल्याचा उल्लेख देखिल केला नाही. काही दिवसांच्या नंतर चतुरसिंहाला देखिल अनुग्रह देवविला. काही दिवसानंतर निशाचे गुरूजी आले होते. निशाने सांगितले की गुरूजी! माझ्या सासूबाई खूप छान आहेत. त्यांनी देखिल आपला अनुग्रह घेतला आहे. भतेरी म्हणाली, महाराज जी! निशाने आपला अनुग्रह घेतल्याचे कधीच सांगितले नाही. ती माझ्या भांडकुदळ स्वभावाला घाबरत असेल. जेव्हा मी अनुग्रह घेतला तेंव्हा आता सांगितले. चांगले केले तिने, जरी आधी सांगितले असते तरी मी तिला अधिक दु:खी केले असते आणि अजून पाप झाले असते. निशाचे गुरुजी म्हणाले, भतेरी ताई! तुम्ही आकाशातून पडून खजुराच्या झाडावर अडकल्या आहात कारण तुमचा अनुग्रह शास्त्रानुकूल नाहीं आहे. खऱ्या साधनेशिवाय मोक्ष होणारच नाही. जसे झालेल्या रोगावर बरोबर औषध खाल्ले तरच रोगापासून मोक्ष मिळतो. त्याच प्रकारे खरी साधना करण्यामुळेच जन्म–मरणाच्या रोगातून मुक्ति मिळते. निशाने विचार केला की सासूबाई नाराज नकोत व्हायला. म्हणून मधूनच उठली आणि म्हणाली की गुरूजी! असे ऐकण्यात आले, तुम्ही नविन पुस्तक लिहिले आहे, ते संगतने छापले आहे. तुमच्या जवळ आहे काय? गुरूजी म्हणाले मुली! ते द्यायलाच मी इथे आलो आहे. असे म्हणून गुरूजी ते थांबलेल्या दूसऱ्या खोलीत गेले. तिथे पिशव्या ठेवलेल्या होत्या. निशादेखिल त्यांच्या मागोमाग गेली आणि म्हणाली, गुरूदेव! मधाच्या पोळ्याला हात घालू नका. महतप्रयासाने शांत झाले आहे. गुरूजी म्हणाले मुली! आता तुझ्या सासूला भक्तिची पूर्ण गोडी लागली आहे. ती ऐकेल. गुरुजींनी तीन दिवस मुक्काम केला. तत्वज्ञान समजावले. भतेरीने देखिल गुरू बदलले आणि आपले कल्याण करून घेतले.

सत्संगामुळे घराचा स्वर्ग झाला. चोहीकडे शांतता झाली. जिथे रोज दिवसभर शिव्यागाळीचे तोफगोळे सुटत होते, तिथे परमात्माच्या ज्ञानाची गंगा वाहू लागली.

भक्तमति निशाचे गुरूजी परमेश्वर कबीर जी होते आणि ते वेषांतर करून खऱ्या भक्तिचा भक्ति प्रचार करण्यासाठी फिरत होते. त्यांनी सांगितले की ''गीतानुसार भक्ति कोणत्या प्रभुची करावी.'' ते याच पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक २०६ वर वाचा.


**निष्कर्ष :- परमेश्वर कबीर जी सांगतात की :-**

मन नेकी कर ले, दो दिन का मेहमान।।टेक।।
मात-पिता तेरा कुटम कबीला, कोए दिन का रल मिल का मेला।
अन्त समय उठ चले अकेला, तज माया मण्डान।।१
कहाँ से आया, कहाँ जाएगा, तन छूटै तब कहाँ समाएगा।
आखिर तुझको कौन कहेगा, गुरू बिन आत्म ज्ञान।।२
कौन तुम्हारा सच्चा सांई, झूठी है ये सकल सगाई।
चलने से पहले सोच रे भाई, कहाँ करेगा विश्राम।।३
रहट माल पनघट ज्यों भरिता, आवत जात भरै करै रीता।
जुगन-जुगन तू मरता जीता, करवा ले रे कल्याण।।४
लख-चौरासी की सह त्राासा, ऊँच-नीच घर लेता बासा।
कह कबीर सब मिटाऊँ, कर मेरी पहचान।।५

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जींनी आपल्या मनाला सम्बोधित करून आम्हा प्राण्यांना सावध केले आहे की तुम्ही या जगतात दोन दिवसांचे म्हणजे अगदी थोड्याच दिवसांचे पाहुणे आहात. या छोट्याशा मानवी जीवनात आत्मज्ञानाच्या अभावाने अनेक पापे एकत्र करून अमूल्य मानवी जीवन नष्ट करता आहात. पैसे कमावण्याचे नियम तर जगातील माणसे सांगू शकतात. परंतु गुरूदेव जी शिवाय आत्मज्ञान म्हणजेच जीव कुठून आला? मनुष्य जगण्याचा मूळ उद्देश काय आहे? सतगुरुना शरण गेल्याशिवाय म्हणजेच त्यांचा अनुग्रह घेतल्याशिवाय मानव जन्म संपतो. ही गोष्ट गुरूजींच्या शिवाय कोणीच सांगणार नाही. भले मग तू पृथ्वीचे राज्य कर, पण भविष्यात तुला पशु जन्मच मिळेल. जन्म-मरणाचे चक्र गुरूजींच्या ज्ञान व अनुग्रह मंत्रा (नाम) शिवाय समाप्त होत नाही. जोपर्यंत जन्म-मरणाचे चक्र समाप्त होत नाहीं तोवर सांगितले आहे की :-**

यह जीवन हरहट का कुँआ लोई। या गल बन्धा है सब कोई।।
कीड़ी-कुंजर और अवतारा। हरहट डोर बन्धे कई बारा।।

**भावार्थ :- जसे रहाट असलेल्या विहिरीवर लोखंडाचे चक्र लावलेले असते. त्याच्यावर बादलल्यांची साखळी वेल्डिंग केली जाते. त्यास रहाट म्हटले जाते. ते बैल किंवा ऊँटाकडून चालवले जातात. जसे चरक बैल किंवा उंटाकडून चालविला जातो. रहाटावर लावलेली बादली खालून विहिरीतून पाणी भरून वर येते आणि वर रिकामी होते. जीवनाचे रहाट गाडगे देखिल असेच अखंड सुरु असते. त्याच प्रकारे पृथ्वीरूपी विहिरीतून पाप आणि पुण्याची बादली भरून वर स्वर्ग-नरकात रिकामी होते. अशाच प्रकारे जन्म-मरणाच्या चक्रात जीव सदैव अडकलेला असतो. वरील शब्दांमध्ये हेच समजावले आहे की जगातील कुटुंब-धन (संपत्ती) या सगळ्याचा त्याग करून एक दिवस एकटेच जायचे आहे. मग पुन्हा अन्यत्र जन्म घेऊन हीच क्रिया पुन्हा करून जाईल. जर आपण घरून दुसऱ्या गावाला जाणार असू, तर निघण्याच्या आधी तिथे जाण्याचे ठरवतो. नंतर कुठे विश्रांती घ्यायची, हे देखिल ठरवतो. परंतु जग सोडून जातांना तर कधीही विचार करत नाहीं की कुठे विश्रांती घ्यायची. अरे जीवा! चौऱ्यांशी लाख प्रकारच्या प्राणी योनीमध्ये प्रतारणा सहन करतो आहे. मरतो-जन्मतो-मरतो (नविन प्राणी योनीचे जीवन प्राप्त करतो) आहे. कधी राजा होऊन उच्च स्थान भूषवतो, कधी कंगाल होऊन नीच म्हणवतो. परमात्मा कबीर जी समजावत आहेत की अवतारांना (राम, कृष्ण इत्यादी) देखिल**




योह हरहट का कुआँ लोई, या गल बंध्या है सब कोई।
कीड़ी कुंजर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।।

काल लोका मध्ये जन्म–मरण रुपी हरहट (चक्र)

खऱ्या साधनाची प्राप्ति न झाल्यामुळे जन्म–मरणाच्या चक्रात अडकावे लागले आहे. खरी साधना माझ्याजवळ आहे. अरे प्राण्या! तू मला ओळख, मीच तो समर्थ परमात्मा आहे. मी तुझ्या जन्म–मरणाची सर्व झंझट संपवीन.

**(शब्द नं. २)**

नाम सुमरले सुकर्म करले, कौन जाने कल की।।
खबर नहीं पल की (टेक)
कोड़ि–२ माया जोड़ी बात करे छल की,
पाप पुण्य की बांधी पोटरिया, कैसे होवे हल्की।।१।।
मात–पिता परिवार भाई बन्धु, त्रीरिया मतलब की,
चलती बरियाँ कोई ना साथी, या माटी जंगल की।।२।।
तारों बीच चंद्रमा ज्यों झलकै, तेरी महिमा झला झल्की,
बनै कुकरा, विष्टा खावै, अब बात करै बल की।।३।।
ये संसार रैन का सपना, ओस बूंद जल की,
सतनाम बिना सबै साधना गारा दलदल की।।४।।
अन्त समय जब चलै अकेला, आँसू नैन ढलकी,
कह कबीर गह शरण मेरी हो रक्षा जल थल की।।५।।

**भावार्थ :–** परमात्मा कबीर जी सांगतात की अरे भाबड्या माणसा (स्त्री/पुरूष)! परमात्माचे नामस्मरण कर आणि शुभ कर्म कर. माहित नाही, उद्या म्हणजे भविष्यात कुठली दुर्घटना होईल. एका क्षणाचे देखिल ज्ञान नाहीं आहे.

लाडी लबाडी शिवाय धनाचा साठा होणारच नाही. त्यामधून काही रक्कम धर्मावर खर्च करणार आहे. अशा प्रकारे पाप आणि पुण्य यांची दोन गाठोडी बांधली. ती हलकी कशी होणार? पाप नरकात आणि पुण्य स्वर्गात भोगायचे असते. आई–वडील, भाऊ–पत्नी, इत्यादी जवळचे लोक हे आपल्या आपल्या स्वार्थाचा विचार करीत असतात. पूर्व जन्मामुळे ते कुटुंबाच्या स्वरूपात जोडलेले आहेत. ज्याची वेळ जेव्हा संपेल, तो संस्कार समाप्त होत जाईल आणि तो त्या कुटुंबाला त्वरित सोडून जाईल. जसा रेल्वेचा डब्बा भरलेला असतो, ज्याने ज्याने जिथले जिथले तिकीट काढले आहे तो तिथे तिथे उतरत निघून जातो. आपले कुटुंब हे त्या रेल्वे डब्ब्या सारखे आहे. मृत्युनंतर हे शरीर मातीच होऊन जाते. त्या वेळेस तुझ्या सोबत कुटुंबातील कोणीही येणार नाही.

एक माणूस आपल्या पत्नीवर खूप प्रेम करायचा. वृद्ध झाला, तेव्हा त्याचा मृत्यु जवळ आला. तेव्हा त्याने आपल्या पत्नीला म्हटले की तू येशील माझ्या सोबत? तिने लगेच नाही म्हणून सांगितले. म्हणाली ''मी तुमच्या सोबत कशाला मरायचे. मी तीन वर्षे तुमच्या पेक्षा लहान आहे.'' त्याचा वृद्धाला अतिशय धक्का बसला. त्याने तिच्याशी बोलणेच बंद केले. जवळ आली तर तोंड फिरवायचा. काहीच बोलायचा नाही. ६० वर्षात त्या वृद्धाला प्रथमच जाणवले की कोणीच कोणाचे नसते. त्या वृद्धेला थोडी जरी समझ असती आणि खरच प्रेम असते, तरी म्हणाली असती की मला पण सोबत घेऊन जा. वृद्ध तिला काय लगेच घेऊन चालला होता काय? त्याचे मन खुश झाले असते इतकेच. सुखाने मेला असता. वेळेच्या आधी त्या वृद्धेला कोण मारणार? यावरून हेच सिद्ध होते की वास्तविक प्रेम या लांबूनच करायच्या गोष्टी आहेत. सगळे स्वार्था मुळेच जोडले गेले आहेत. अरे माणसा! पूर्वजन्मीच्या जप–तप आणि दान धर्म

**संस्कारामुळे वर्तमानात मंत्री, पंतप्रधान किंवा उच्च अधिकारी होऊन असा सुशोभीत होतोय जणू रात्रिच्या तारांगणातील चंद्रच जणू. जर सत्संगातील विचार श्रवण केले नाहीत, तर आत्मज्ञाना शिवाय परमात्माची भक्ति न केल्यास पुढल्या जन्मात कुत्रा होऊन बिष्टा (शेण) इत्यादी खाईल. आता तू आपल्या शारीरिक ताकदीची, पदाच्या ताकदीची फुशारकी मारतोयस,नंतर पशु होऊन अनेक यातना भोगशील.**

नर से फिर पशुवा कीजै, गधा–बैल बनाई।
छप्पन भोग कहाँ मन बोरे, कुरड़ी चरने जाई।।

**शब्दार्थ :– जो मनुष्य (स्त्री / पुरुष) शास्त्रानुसार सत्य भक्ति गुरु पासून दीक्षा घेऊन करत नाही. तो मृत्यू नंतर पशु जीवन मिळवतो. तो गाढव किंवा बैलाचे शरीर प्राप्त करतो. मानव शरीरात स्वादिष्ट जेवण खात होता. गाढव बनल्यानंतर चांगले जेवण मिळत नाही. गाढवाचे शरीर धारण केल्यावर जंगलातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर घाणारडे जेवण व गवत खातो. त्याकरिता भक्ति करा.**

**हे मानव! जगात तुझे जीवन हे असे आहे. जशी सकाळी दवाच्या पाण्याचे थेंब गवतावर चमकत असतात. काही वेळातच त्यांची चमक संपते. त्यामुळे परम सतगुरुकडून सतनामाचा म्हणजे सत्य नामाचा जप मंत्र घेऊन भक्ति करून जीवाचे कल्याण करून घे. खऱ्या शास्त्रानुकूल भक्ति व्यतिरिक्त शास्त्राविरूद्ध केलेली सर्व साधना म्हणजे चिखलातील गाळीसारखे आहे. निघण्याऐवजी दुप्पट अडकतच जाते. ती साधना परमेश्वर कबीर जी जवळ होती आणि त्यांनी ती काही संतांना परमेश्वर कबीरांनी सांगितली होती, परंतु अन्य लोकांना सांगण्यास त्यांना बंदी घातली होती. वर्तमनात (सन् १९९७ पासून) फक्त माझ्या दासाजवळ (रामपाल) आहे. माझ्या शिवाय वर्तमानात कोणत्याही संताजवळ व गुरूजवळ शास्त्र प्रमाणित भक्ति मंत्र नाहीयेत. या अनुग्रह घ्या आणि आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन सफल करा. आपण जरी माझ्या (रामपाल) व्यतिरिक्त अन्य कोणत्या पंथाच्या किंवा संत किंवा गुरूंकडून अनुग्रह घेतला तर आकाशातून पडले आणि खजुराच्या झाडावर अडकले असेच होईल. ना घर के ना घाट के. मी (लेखक) आधी गावोगावी सत्संग करायचो. माझा सत्संग श्रवण करून सगळे आतुन हलायचे. माझ्याकडून नामाचा अनुग्रह न घेता दुसऱ्या संतांकडून अनुग्रह करून घेत. पण तिथून काही लाभ झाला नाही की मग माझा अनुग्रह घेतल्यावर सुखी व्हायचे.**

**वरील सत्संग वचनातून असा निष्कर्ष निघतो की सत्संगाचे विचार जरी नुसते श्रवण केले तरी घराचा स्वर्ग होतो. त्याच्याशिवाय जगणे म्हणजे नरकात जगण्यासारखे आहे. अशा प्रकारे जगाचा उद्धार शक्य आहे. प्रेमाने सर्व पडताळणी करून मोक्ष प्राप्त करता येतो. हे अति आवश्यक आहे.**

# वर्तमानातील काही सत्य कथा

(नोट :- खालील कथा येथे व उर्वरित भाग पान २९३ वर वाचा)

## ''भक्त सुरेश दासच्या उध्वस्त कुटुंबाला सावरले ''

गाव- डीघल पान्नागंज आहे की भक्त सुरेश याला दारू, अफू, तंबाखूचे जबरदस्त व्यसन होते. घराची पार वाट लावली होती. भगिनी यशवन्ती (सुरेशची पत्नी) असाध्य रोगाने आजारी होती. दोन छोटी मुले होती. वडील घरी येताना दिसले की ते कुठेतरी घरात लपून बसत. घरात सतत भांडणे होत असत. भगिनी यशवंतीचा एक भाऊ हरियाणा पोलिस दलात D.S.P. होता. आता तो निवृत्त झाला आहे. नाव आहे भक्त राजेंद्रसिंह राठी. गाव भापड़ोदा. त्याने आपल्या बहिणीवर उपचार करण्याचे काहीही बाकी ठेवले नव्हते. परंतु व्यर्थ. हरियाना पोलीस दलात काम करणारा माझा भक्त आर्य समाजाचे महान प्रचारक श्री जौहरी सिंह यांचा मुलगा आहे. (गाव-जसराना जिल्हा-सोनीपत). त्याच्या सोबत माझा छोटा भाऊ महेन्द्र सिंह देखिल हरियाणा पोलिस दलात नोकरी करत होता. तो सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणार होता, परंतु परमार्थी मिशनचे उद्देश समजून घेऊन सन् २००५ मध्येच सेवानिवृत्त होऊन मला मदत करतो आहे. माझा भाऊ रोहतकच्या S.P. वाहन चालक होता. भक्त जयबीर मलिक हा झज्ररच्या D.S.P. चालक होता. दोघे जेव्हा भेटायचे, तेव्हा माझा भाऊ त्याच्याशी ज्ञानाच्या बाबतीत चर्चा करायचा. आधी आर्य समाजी असल्यामुळे भक्त जयबीर जी अतिशय दुःखी झाले होते. त्यांच्या आचार्यांना भेटले, परंतु अंतत: सत्याला डोळ्यांनी पाहील्यावर हेच मान्य केले की हेच खरे आहे. त्याने सन् १९९४ मध्ये माझ्याकडून दिक्षा घेतली. सन् १९९५-१९९६ पर्यंत भक्त राजेन्द्र सिंह राठी झज्ररमध्ये कार्यरत होते आणि जयबीर जी त्यांचे वाहन चालक होते. भक्त राजेन्द्रजीचा एक भाऊ देखिल पोलिसात नोकरी करत होता. भगिनी यशवन्तीला जो आजार झाला होता, तोच त्यालाही होता. त्यामुळे सन् १९९५ मध्ये त्याचा मृत्यु झाला. चालक म्हणून भक्त जयबीर जी देखिल D.S.P. सोबत त्यांच्या घरी गेले. त्यांना सर्व परिस्थिती कळली. परत घरी आल्यावर एक दिवस जयबीरजींनी D.S.P. साहेबाना विनंती केली की तुम्हाला तुमचे कुटुंब वाचवायचे असल्यास आपण संत रामपालजींची दीक्षा घ्या. आधी तर नाही ऐकले. परंतु ट्रायल घेण्यासाठी स्वतःची बहिण यशवन्तीला आपल्या धाकट्या भावासोबत. सुखबीरसोबत अनुग्रह घेण्यास पाठविले. प्रस्तुत दास (रामपाल दास) सिंचन विभागात कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत होतो. गुरूजीचा आदेश घेऊन अनुग्रह द्यायला लागलो आणि प्रचार करायला लागलो. मिशनच्या उद्देशांनी प्रेरित होऊन जनहित आणि जगहितासाठी सन् १९९५ मध्ये नोकरी मधून राजीनामा देऊन प्रचार-प्रसार करण्याच्या कामात झोकून दिले. (राजीनामा हरियाणा सरकारने स्वीकृत केला आहे.) गावोगाव संत गरीबदास जींच्या वचनाचा अखण्ड पाठ करायचा, सत्संग करायचा, तीन दिवसांचे हे अनुष्ठान असायचे. ज्ञान समजावून वाईट सवयी सोडवून अनुग्रह देत असे. त्यामुळे अनुग्रहीताला आश्चर्यकारक फायदा होत असे. याच दरम्यान एक दिवस सन् १९९६ मध्ये- पंजाबखोड़ (दिल्ली) गावात भक्त जगदीशजींच्या घरी अनुष्ठान सुरु होते. जगदीशदेखिल अट्टल दारुड्या, आणि दारू पिऊन धिंगाणे करणारा होता आणि दिल्ली परिवहन महामंडळात D.T.C. नोकरी करीत असे. त्याची पत्नी माझ्याकडून अनुग्रह घेतल्यामुळे असाध्य रोगापासून बरी झाली होती. परमात्मा करत असतो. त्याची शक्ती संतांच्या माध्यमातून येत असते. जसे वायर म्हणजे वीज नाही. वीज वायरच्या माध्यमातून जात असते. त्याच प्रकारे संत भले

परमात्मा नसतील. पण वायर मात्र अवश्य असतात. त्या वेळेस भगिनी यशवन्तीची वाणी निकामी झाली होती. ती मुकी झाली होती. सुखबीर जी आपल्या बहिणीला घेऊन संध्याकाळच्या वेळेला भक्त जगदीशजींच्या घरी आले. मला सर्व समस्या सांगितली. ते दोघेही भाऊ-बहिण त्या रात्री सत्संग ऐकून तिथेच थांबले. भगिनी यशवन्तीला अनुग्रह दिला, प्रसाद दिला. सकाळी उठून ती आपल्या भावाला म्हणाली, दादा! मी बोलायला लागली आहे. मी ठीक झाली आहे. हा चमत्कार पाहून दोघेही भाऊ-बहिण सत्संग ऐकायला आणि प्रसादासाठी थांबलेल्या उपस्थित लोकांना सांगत होते, कमाल झाली. त्यानंतर D.S.P साहेब आणि त्यांच्या सर्व कुटुंबाने अनुग्रह घेतला. आज सगळे सुखरूप आहेत. भक्ति करत आहेत. भक्त सुरेश अट्टल दारुड्या होता. आपली पत्नी बरी झालेली पाहून सत्संगात येऊ लागला. दारू आणि सर्व व्यसनांचा त्याग करून व नामस्मरण करून सुधरला. त्या वेळी आश्रम वगैरे काहीही नव्हते. गावोगाव प्रचार केला जायचा. आता भगिनी यशवन्तीचे कुटुंब म्हणजे दिघल गावात एक आदर्श आहे. सुरेश चौधरी भक्त झाला आहे. सर्व वाईट सवयींचा त्याग केला आहे. दोन्ही मुले दिल्ली पोलिस दलात एकाच दिवशी शिपाई म्हणून भरती झाली. लोकाना वाटले असेल की पैसे देऊन भर्ती केले असेल. परंतु सत्य हेच आहे की एक पैसादेखिल कोणालाही दिला नाही. तुम्ही स्वतः याचा तपास करू शकता. दोन्ही मुलांच्या विवाहात एक रूपया पेक्षा एक पैसा खर्च केला नाही. हा देखिल एक संशोधनाचाच विषय आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. ही गोष्ट सांगण्याचा माझा उद्देश एवढाच आहे की जसे गीतात अध्याय १६ श्लोक २३ आणि २४ मध्ये म्हटले आहे की शास्त्रविधिचा त्याग करून आपल्या मनाप्रमाणे आचरण करणाऱ्याला परमात्माकडून कोणताही लाभ होत नाही. शास्त्रोक्त भक्ति केल्यास परमात्माची शक्ती सर्व असंभव गोष्टींना शक्य करते. मोक्ष देखिल मिळतो. ऋग्वेद मण्डल १० सूक्त १६१ मंत्र २ मध्ये देखिल याचे प्रमाण आहे की परमात्माची भक्ति करणाऱ्याचा असाध्य रोगदेखिल नष्ट होतो. जरी रोगी मृत्युच्या निकट असला तरीही खरी भक्ति करणाऱ्याला बरे करून परमात्मा त्याला शंभर वर्षांचे आयुष्य बहाल करतो. म्हणजे भक्त पूर्ण आयुष्य जगतो.

जशी पूर्वी वीज नसताना आपल्या माता भगिनी जात्यावर गव्हाचे पीठ दळत असत, पुरुष हाताने प्राण्यांचा चारा छाटत असतात. मग हाताने चालवायच्या यंत्राचा शोध लागला, ते सुध्दा अवघड काम होते मशिनमुळे लवकर आणि चांगले कार्य होते.आता विजेवर चालणाऱ्या यंत्रावर गव्हाचे पीठ काढले जाते. पशुंचा चारा मशिनवर कापला जातो. अशक्य काम करणे शक्य झाले. विजेची रीतसर जोडणी घेतली पाहिजे. विजेच्या मर्यादांचे पालन केले पाहिजे, अन्यथा सुखदायक वीज विनाशास कारणीभूत होते. त्याच प्रकारे परमात्माशी जोडून घ्यावे लागते आणि परमात्माच्या मर्यादा सांभाळाव्या लागतात. मगच परमात्मा सर्व सुख आणि मोक्ष देणार आहे. मर्यादा भंग झाल्यास परमात्माची कृपा देखिल बंद होते. सर्व सुविधा मिळण्याचे बंद होते. डीघल गावातील लोक त्या तोतया आचार्यांचे सांगणे खरे मानून करौंथा आश्रमात जाणाऱ्या आपल्या गावातील लोकांना परावृत्त करीत असत. तेव्हा भक्त सुरेश जी आणि भगिनी यशवंती जी हात जोडून गावातील त्या लोकांना म्हणत आम्हाला मारझोड करा किंवा काहीही करा, आम्ही आश्रमात जाणे बंद करणार नाही. आमचे घर तर तेथूनच व्यवस्थीत झाले आहे. नाहीतर आज आम्ही उध्वस्त झालो असतो. परमात्माने त्याच्या खऱ्या भक्तिचे फळच त्यांना असे दिले आहे.

भक्त सुरेश यांचा मोबाईल नं. ९०३४०२९४९५ आहे.

## ''सत्संग न श्रवण केल्यामुळे सर्वनाश झाला''

कबीर, राम-नाम कड़वा लागै, मीठे लागें दाम।
दुविधा में दोनों गए, माया मिली ना राम।।

**शब्दार्थ :- सत्संग न ऐकणाऱ्या मानवास (स्त्री-पुरुष) परमात्माच्या विधानाचे ज्ञान नाही होत. ज्या कारणाने त्यास परमात्माविषयी चर्चा देखील चांगली नाही लागत. धन साठवणे चांगले वाटते. ज्यामुळे त्यास दोन्हीपासून हाथ धुवावे लागतात. म्हणजे त्यास ना तो परमात्मा मिळतात आणि मृत्यू नंतर धन देखील येथे राहते. त्याचा हातातून दोन्ही निघून गेले.**

**पंजाब राज्यात माझ्या (रामपाल दास चे ) पूज्य गुरूदेवजीचा आश्रम ''तलवण्डी भाई च्या'' नावाच्या गावात आहे. त्यांचे सतलोकी गमन झाल्यावर त्यांचा सेवक (रामपाल दास) महीन्याच्या दूसऱ्या रविवारी सत्संग करण्यास जात असे. माझ्या गुरूदेवजीचे काही शिष्य तलवण्डी भाई गावातील व्यापारी देखिल आहेत. त्यांचा एक नातेवाईक शुक्रवारी एका वृद्धाचा मृत्यु झाल्यामुळे त्या कुटुंबाच्या समाचारासाठी सहकुटुंब आला होता. तो शनिवारी २ वाजता नंतर दुपारी आपल्या घरी चण्डीगढ़ला निघाला. तेव्हा सत्संगी नातेवाईकांनी त्याला म्हटले की आज थांबा आणि उद्या सकाळी ८-१० पर्यंत सत्संग होईल. सत्संगाचे श्रवण करून प्रसाद घेऊन मग तुम्ही जा. तेव्हा नातेवाईकाने म्हटले की उद्या रविवारी एक पार्टी येणार आहे. दोन वाजता आम्ही भेटायचे ठरले आहे. त्यामुळे माझा पाच लाख रुपयांचा फायदा होईल. ही घटना सन् १९९८ ची आहे. सत्संगी शिष्यांनी आग्रह केला की तुम्ही रविवारी सकाळी अकरा वाजता निघालात तरीदेखिल वेळेवर पोहोचू शकाल . फोन करून त्यांना कळवा की थोडे उशिराने भेटू. परंतु त्याने ऐकले नाही. त्यांच्या कुटुंबातील एकूण चार जण होते-पत्नी आणि मुलगा-मुलगी. चारही जण त्यांच्या मारूति कार मध्ये बसून शनिवारी रात्रीच चण्डीगढ़ला गेले.**

**चण्डीगढ़च्या थोडेसे आधी अंबाला शहराजवळ एक जाड सळईचा भरलेला ट्रक खराब झाल्यामुळे उभा होता. त्याची मागची चाके काढलेली होती. जॅक लावून ठेवला होता. त्या पैशाच्या लोभाने आंधळ्या झालेल्याला फक्त पाच लाख रुपयांचा लाभच दिसत होता. तो कार पूर्ण वेगात चालवत होता. त्याची कार त्या जाड सळईच्या भरलेल्या ट्रकच्या खाली घुसली. त्यामुळे तो जॅक कोलमडला. त्या ट्रकच्या वजनाखाली संपूर्ण कुटुंब चेंदामेंदा झाले. मोठ्या खेदाने म्हणावे लागते आहे की सत्संग श्रावण करण्यास जरी थांबला असता, तर हा अपघात झाला नसता. मायेशिवाय काम चालून जाईल, परंतु कायेशिवाय होणारच नाही कारण शरीर असले तरच परमात्माची भक्ति करून आत्म-कल्याण साध्य करता येते. परमेश्वर कबीर जींनी सावध केले आहे कि :-**

कबीर, रामनाम कड़वा लगै, मीठे लागें दाम।
दुविधा में दोनों गए, माया मिली ना राम।।

**शब्दार्थ :- सत्संग न ऐकणाऱ्या मानवास (स्त्री-पुरुष) परमात्माच्या विधानाचे ज्ञान नाही होत. ज्या कारणाने त्यास परमात्माविषयी चर्चा देखील चांगली नाही लागत. धन साठवणे चांगले वाटते. ज्यामुळे त्यास दोन्हीपासून हाथ धुवावे लागतात. म्हणजे त्यास ना तो परमात्मा मिळतात आणि मृत्यू नंतर धन देखील येथे राहते. त्याचा हातातून दोन्ही निघून गेले.**

**त्यामुळे बंधूभगिनीनो! सत्संगाकडे आपली ओढ वाढवा. आत्म-कल्याण करवून घ्या आणि जगण्याचा मार्ग सुकर करा.**

## ''सत्संगात जाण्यामुळे मोठ्यातील मोठे संकट टळते''

कबीर, संत शरण में आने से, आई टलै बला।
जै भाग्य में सूली हो, कांटे में ट्ल जाय।।

**भावार्थ :– समर्थ कबीर परमेश्वराच्या कृपा पात्र खरे गुरु (सतगुरु) पासून दीक्षा घेणारे भक्त/भक्तिनी चे परमात्मा रक्षण करतात. जर पूर्व जन्माच्या पापांमुळे साधकाला मृत्यू ची शिक्षा सुळावर चढवण्याची भाग्यात लिहली असेल जी अत्यंत दुखदायक असते. तर परमात्मा त्या साधकास त्या मृत्युदंडास समाप्त करून काही छोटे मोठे दंड जसे पायात काटा मोडून टाळतात. भयंकर दंडास किरकोळ दंडात बदलतात जो सर्वात मोठा त्रास होता.**

एका गावात एका संतांचा आश्रम होता. तो गावापासून जवळपास दोन किलोमीटर लांब होता. त्या गावातील अनेक कुटुंबे त्या संतपुरुषाचे शिष्य होते. संतपुरुष वर्षातून केवळ दोन वेळा त्या आश्रमात येत असत. त्यांच्या सोबत काही शिष्य कायमस्वरूपी येत असत. ते संतपुरुष आपल्या मंडळींच्या सोबत प्रत्येक वेळेस दोन महीने त्या आश्रमात रहात असत. नंतर अन्य आश्रमांमध्ये जात असत. संत जी आपल्या कार्यक्रमानुसार दोन महीन्यांसाठी आले होते. त्या गावातील भक्तांनी त्यांच्या भोजनाची व्यवस्था आपापल्या घरून केली होती. एक कुटुंब दर दिवशी आश्रम वासियांना भोजन आपल्या घरून बनवून नेऊन देत असत. प्रत्येक भक्ताची इच्छा असायची की आपल्या गुरूजींना उत्तम भोजन, खीर व पोळी भाजी खाऊ घालावी. एका कुटुंबाची भोजन देण्याची पाळी होती. त्या दिवशी दुध नासले होते. त्या भगिनीचे नाव कस्तूरी होते. तिच्या शेजारीच एका कुटुंबात केवळ आई आणि मुलगा एवढे दोघेच होते. कारण तो मुलगा दोन वर्षांचा असतानाच तिच्या पतीचा मृत्यु झाला होता. त्या भगिनीने एक घटना पहिली होती की तिच्याच घराण्यातील दुसऱ्या कुटुंबातील मुलांमध्ये एक सून विधवा झाली होती. एक मुलगा तीन वर्षाचा होता. तिने आपल्या धाकट्या दिराशी विवाह केला. धाकटा दीर देखिल विवाहित होता. धाकट्या दिरापासून देखिल तिला एक मुलगा झाला. दीर–जाऊ तिला एखाद्या मोलकरणीप्रमाणे वागवायचे. तिला आणि तिच्या पहिल्या मुलाला कोरडे–उष्टे अन्न तिला जेवायला देत असत. त्यामुळे तिच्या मोठ्या मुलाने मोठा झाल्यावर आत्महत्या केली. ती देखिल डोक्यावर परिणाम होऊन कुठेतरी निघून गेली. (सगळेच मोठे–धाकटे दीर काही वाईट नसतात.) ही घटना लक्षात घेऊन त्या रामों भगिनीने आपल्या दिराशी विवाह नाहीं केला. (म्होतर नाही केले). आपल्या मुलाला, कर्मपालला वाढवले, मोठे केले. थोडी जमीन होती. त्यामध्येच मेहनत करून गाय–म्हैस पाळली होती. आपल्या मुलाला छान दही–दुध तूप द्यायची. विचार करायची की मुलगा काय आत्ता मोठा होईल. त्याचा विवाह करीन. तो आपला कामधंदा पाहील. मग माझे जीवन सुखाने जगेन. परंतु सत्संगा शिवाय ज्ञान प्राप्त होत नाही, ज्ञान सतगुरु देत असतात. भक्ति शिवाय कोणताही जीव सुखी होणार नाही, मग तो कितीही श्रीमंत असू दे. डोक्यावर पित्याचे छत्र नव्हते. मुलगा आईच्या लाडाने बिघड़तोच. आईचा स्वभाव आपल्या मुलाला शक्य ते सर्व सुख देण्याचा असतो. विधवेचा मुलगा आणि विधुराची मुलगी बिघडतातच अशी म्हणच आहे. कारण वडील कामाच्या रगाड्यात मुलीच्या हालचालींवर लक्ष देऊ शकत नाहीत. आई मुलाच्या हालचालींवर लक्ष देत नाही. मुलीला आपल्या सोबत ठेवते. त्यामुळे कर्मपाल व्यसने करायला लागला. आईशी भांडण करून रूपये किंवा बाजरी–ज्वारी, हरभरा घेऊन जायचा. ते विकून व्यसने करायचा. त्याची आई संपूर्ण दिवस रडत बसायची. विचार करत बसायची–काय स्वप्न रंगवली

होती, काय होऊन बसले आहे? पुढून मागून सगळे उलटेच होत आहे. त्या काळजीमुळेच ती अशक्त झाली होती. भक्तमति कस्तूरी तिची शेजारीणीच्या (रामप्यारी) घरी गेली. आधी सर्व क्षेम कुशल विचारले आणि नंतर औपचारिकता म्हणून मुलगा काय करतो? तुम्ही मायलेक कसे आहात? विचारले तर भगिनी रामों रडू लागली. म्हणाली ताई! काय सांगायचे. मुलगा बिघडला आहे. व्यसने करतो. सांगितलेले ऐकत नाही. भांडणे करतो. शिव्यागाळी करतो. तुम्हाला तर माहिती आहे, कुटुंबाने आणि गावातील लोकांनी माझ्यावर किती दबाव आणला होता, मोठ्या दिरांशी पुन्हा विवाह करण्यासाठी. राजवंतीच्या बाबतीत जे झाले, त्यामुळे घाबरून मी मोठ्या दिरांशी विवाह केला नाही. माझ्या मुलाला सुखी बघण्याची माझी इच्छा होती. पण आज तोच अधिक दु:ख देतो आहे. असे वाटते कुठेतरी निघून जावे किंवा आत्महत्या करावी. भक्तमति कस्तूरी ने म्हटले की ताई! चुकीच्या गोष्टींचा विचार करू नको. मोठा होऊन सुधारेल. तू मरून गेलीस, तर माहित आहे काय होईल? काका लोक सगळी जमीन हडप करतील आणि मुलाला अधिक व्यसनाधीन करून त्याला मारून टाकतील. असा विचार करू नको. एक काम कर, माझ्या सोबत सत्संगात ये. इथे एकटीच्या मनात असे विचार येतच राहणार. वाळून गेली आहेस. रामों म्हणाली, ताई. गावातील सगळे लोक माझ्याकडे संशयाने बघतातच. कोणीही माणूस काही कामानिमित्त घरी आला, तर घराच्या छतांवर चढून टक लावून बघतात. तुमच्या डोक्यावर तुमचा पती आहे. मी सत्संगात आले तर माझे जगणे अशक्य करून सोडतील. मला मरावेच लागेल. बर ताई, हे सांग आज माझ्याकडे कसे येणे झाले? कस्तूरी ने म्हटले की ताई, तुम्हाला तर माहितच की आमचे गुरूजी आश्रमात थांबले आहेत. आज भोजन नेऊन देण्याची माझी पाळी आहे. ताई, मला खीर बनवायची होती. दूध नासले आहे. काही दुध उसने दिलेस तर बरे होईल. उद्या परत करते. हे ऐकून भगिनी रामोंला झटका बसल्यासारखे झाले. दूध काढून ठेवलेली बादली खूंटीवर लटकत होती, तिने त्यातील सर्व दुध कस्तूरीच्या बादलीत ओतले. कस्तूरीने म्हटले ताई! थोडे तरी ठेव. रामों म्हणाली, ताई! काय माहित कोणत्या जन्मीचे पुण्य होते, त्यामुळे माझ्यासारख्या अभाग्याला दूध पुरविण्याचे पुण्य मिळाले. बस ताई, तू घेऊन जा हे दुध, संत-भक्त यांना खीर करून वाढ. कस्तूरी भगिनी आश्चर्यचकीत झाली. मी सत्संगी असून देखिल इतके सगळे दुध एकाच वेळी देऊ शकत नाही. एक-दोन किलो तरी ठेऊन घेतेच. भगिनी रामोंला तर सत्संगाची प्रेरणा मिळण्याची आवश्यकता आहे.त्या दिवशी तर कस्तूरीला वेळ नाहीं मिळाला. दुसऱ्या दिवशी ११-१२ वाजता रामोंच्या घरी गेली. गावात १२ ते २ दरम्यानचा वेळ स्त्रियांना एकमेकांशी बोलयला मिळतो. दोन तास तिला सत्संगातील गुरूजींनी सांगितलेल्या सर्व गोष्टी ऐकवल्या. परंतु लोकलाजेस्त्व रामों काही यायला तयार होत नव्हती. तेव्हा भगिनी कस्तूरी तिला म्हणाली की ताई! तुम्ही मीराबाईचे नाव ऐकले असेलच. रामों म्हणाली की हो, ती तर कृष्णजींची भक्त होती. कस्तूरी म्हणाली की ती मंदिरात जात असे. ठाकुर कुटुंबात तिचा जन्म झाला होता. महिलानी घराबाहेर जाण्यास बंदी होती. परंतु मीराबाईने कोणाचीच पर्वा केली नाही. नंतर तिचा राजाशी विवाह झाला. राणा जी धार्मिक विचारांचे होते. त्यांनी मीराबाईना मंदिरात जाण्यावर बंदी नाही घातली. परंतु लोकापवाद टाळण्यासाठी मीराबाई सोबत तीन-चार महिला दासी पाठवत असत. त्यामुळे सर्व काही व्यवस्थित सुरु राहिले. काही वर्षानंतर मीराबाईंच्या पतिचा मृत्यु झाला. धाकटा दीर राजगादी वर बसला. त्याने कुटुंबातील लोकांच्या सांगण्यावरून मीराबाईंना मंदिरात जाण्यास बंदी केली. परंतु मीराबाईने ऐकले नाही. त्यामुळे राजाने मीराबाईंना मारण्याचे षड़यंत्र रचले. विचार केला की अशी युक्ति योजली पाहिजे की

ती तर मरावीच, पण बदनामी होऊ नये. राजाने विचार केला की हिला आता कसे मारावे? राजाने गारुड्याला बोलावले आणि सांगितले की एक असा साप दे की जो डब्बा उघडताच उघडणाऱ्याला डंख मारेल आणि ती व्यक्ति मरून जाईल. असेच केले गेले. राणाजींनी आपल्या मुलाचा वाढदिवस साजरा करायचे ठरविले. त्यासाठी नातेवाईक अन्य सन्माननीय लोकांना आमंत्रित केले. राजाने मीराबाईंच्या दासीला म्हटले की यात अमूल्य हार आहे. माझ्या मुलाचा वाढदिवस आहे. दूरून-दूरून नातेवाईक येणार आहेत. मीराबाईंना सांगा की सुंदर कपड़े परिधान करून हा हार गळ्यात घाला. नाहीं तर नातेवाईक म्हणतील की आपल्या वहिनीला विचारत नाही. माझ्या अब्रूचा प्रश्न आहे. मोलकरणीने तो दागिन्यांचा डब्बा मीराबाईना दिला आणि राजाचा आदेश देखिल ऐकवला. त्या दागिन्यांच्या डब्यात काळ्या-पांढऱ्या रंगाचा एक विषारी सर्प होता. मीराबाईंनी त्या नोकरांनी समोरच तो डब्बा उघडला. त्यामध्ये हीरे-मोत्याने मढलेला हार होता. मीराबाईनी विचार केला की जर मी हार घातला नाहीं तर फुकटच भांडण होईल. माझ्यासाठी तर हा माती सारखाच आहे. असा विचार करून मीराबाईंनी तो हार गळ्यात घातला. राजाचा हेतू असा होता की आज सर्प डंख मारेल आणि मीराबाईंचा मृत्यु होईल. सगळ्यांना असेच वाटेल की राजाचा यात काहीच हात नाहीं आहे. आपल्या समोरच सर्प डसल्यामुळे मीराबाईंचा मृत्यु झाला आहे. काही वेळानंतर राजा मंत्र्यांच्या आणि काही नातेवाईकांच्या सहित मीराबाईंच्या महालात गेला तर मीराबाईच्या गळ्यात तो सुंदर महागडा हार पाहून राणा चिडला, आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला, कुलटे! कुठल्या मित्राकडून हा हार घेऊन आलीस? मीराबाईच्या डोळ्यात अश्रू आले. म्हणाली की तुम्हीच तर नोकरांनीसोबत पाठवला होता. तोच तर आहे. नोकराणीला बोलावले आणि विचारले की तो डब्बा कुठे आहे? दासीने पलंगाच्या खालून काढून दाखवला. हाच तर तुम्ही पाठविलेला हार आहे राजा जी. राजा परत गेला. राजाने विचार केला की आता हिला विष मी माझ्या समोरच प्यायला लावीन, प्यायली नाही तर तिचे डोकेच उडवीन.

## ''मीराबाईना विषाने मारण्याचा व्यर्थ प्रयत्न''

एका गारुड्याला म्हटले की इतके भयंकर विष आणून दे जे जीभेवर ठेवताच ती व्यक्ति मरण पावली पाहिजे. असे विष आणले. राजाने मीराबाईंना म्हटले की हे विष प्या नाहीतर तुमचे डोकेच उडवीन. मीराबाईनी विचार केला की डोक उडवायचे म्हणजे यातना होतील, त्यापेक्षा विष पीते. मीराबाईने विषाचा प्याला परमात्माला स्मरून पिऊन घेतला. पण त्यांना काहीच झाले नाही. गारुड्याला बोलाविले आणि त्याला म्हटले की हे खोटे विष आणले आहे. गारुड्याने म्हटले की तो प्याला कुठे आहे? त्याला तो प्याला दिला. गारुड्याने त्या प्याल्यात दूध घालून एका कुत्र्याला तिथेच पाजले. कुत्रा लगेच मेला.

❖ राजाने पाहिले की ही अशी मरणारी नाही. तेव्हा तिला मंदिरात जाण्यापासून थांबविले नाही. तिच्या सोबत अनेक सेवक आणि दासी पाठवायला लागला जेणेकरून लोक असे म्हणणार नाहीत ती आवारागर्दीमध्ये जाते.

## ''मीराबाईंना सद्गुरुच्या चरणी आश्रय मिळाला''

ज्या श्रीकृष्ण मंदिरात मीराबाई पूजा करण्यासाठी जात असत, त्या रस्त्यावर एक छोटा बगीचा होता. त्यात दाट सावली असलेले काही वृक्षदेखिल होते. त्या बगीचात परमेश्वर कबीर जी आणि संत रविदास जी यांचा सत्संग सुरु होता. सकाळी सुमारे १० ची वेळ असावी.

मीराबाईंनी पाहिले की येथे परमात्माची चर्चा किंवा कथा सुरु आहे. काही वेळ श्रवण करून पुढे जाऊ.

परमेश्वर कबीर जींनी सत्संगात सृष्टि रचनेचे संक्षिप्त ज्ञान ऐकवले. म्हणाले की श्री कृष्ण जी म्हणजेच विष्णुजींच्या वर देखिल अन्य सर्वशक्तिमान परमात्मा आहे. जन्म–मरण समाप्त नाहीं झाले तर भक्ति करून न करून सारखेच आहे. जन्म–मरण तर श्रीकृष्णांना (श्री विष्णु) देखिल चुकलेले नाहीये. मग त्यांच्या पुजाऱ्याचे कसे होईल. जसे सर्व हिन्दू संत म्हणत आहेत की गीताचे ज्ञान श्री कृष्णांनी म्हणजेच श्री विष्णुजींनी अर्जुनाला सांगितले. गीताचे ज्ञानदाते गीता अध्याय २ श्लोक १२, अध्याय ४ श्लोक ५, अध्याय १० श्लोक २ मध्ये स्पष्ट करतात की हे अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. तुला माहित नसले तरी मला माहिती आहे. यावरून हे स्वयंस्पष्ट आहे की श्री कृष्णांना देखिल जन्म–मरण चुकलेले नाही. ते अविनाशी नाहींत. त्यामुळे गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये गीताकारांनी म्हटले आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या परमात्माला शरण जा. त्या परमात्माच्या कृपेनेच तू सनातन परम धामाला पोहोचशील आणि परम शांतिला प्राप्त होईल.

परमेश्वर कबीर जींच्या मुखकमलातून हे शब्द ऐकल्यावर परमात्मासाठी तळमळणाऱ्या आत्म्याला एक नवीन वाट मिळाली. सत्संगा नंतर मीराबाईनी प्रश्न विचारला की हे महात्माजी! आपली आज्ञा असलयास शंकासमाधान करून घेऊ काय? कबीर जी म्हटले हे भगिनी! विचार प्रश्न.

प्रश्न :– हे महात्मा जी! आज पर्यंत मी कोणाकडूनही असे ऐकले नाही की श्री कृष्ण जी पेक्षा वर देखिल कोणी परमात्मा आहे. आज हे आपल्या मुखातून ऐकल्यावर मी द्विधा मनस्थितीत आहे. मला मान्य आहे की संत खोटे बोलत नाहींत. परमेश्वर कबीर जी म्हटले की आपल्या धार्मिक अज्ञानी गुरूंचा तो दोष आहे ज्यांना स्वतःला ज्ञान नाहीं की आपके सद्ग्रंथ काय सांगतात. देवी पुराणाच्या तिसऱ्या स्कंदात श्री विष्णु स्वतः स्वीकारतात की मी (विष्णु), ब्रह्मा आणि शिव नाशवंत आहोत. आमचा अविर्भाव म्हणजे जन्म आणि तिरोभाव म्हणजे मृत्यु होतच असतो. (लेख पूर्ण जाले)

मीराबाई म्हणाल्या की हे महाराजजी! भगवान श्रीकृष्ण मला साक्षात दर्शन देतात. मी त्यांच्याशी संवाद करते. कबीर जी म्हटले की हे मीराबाईजी! आपण एक काम करा. भगवान श्रीकृष्णांना विचारा की तुमच्या वर देखिल कोणी परमात्मा आहे काय? ते देव आहेत. कधी खोटे बोलणार नाहीत. मीराबाईना वाटले की जर श्रीकृष्णाच्या वर कोणी परमात्मा असेल, तर त्यांना वेडच लागेल. रात्री मीराबाईंनि भगवान श्रीकृष्णांना आवाहन केले. त्रिलोकीनाथ प्रकट झाले. मीराबाईंनी आपल्या शंकेचे निरसन करून घेण्यासाठी विचारले हे प्रभु! तुमच्या पेक्षाही श्रेष्ठ असा कोणी परमात्मा आहे काय? एक संतपुरुषांनी सत्संगात असे सांगितले आहे. श्रीकृष्ण जी म्हणाले की मीरा! परमात्मा तर आहे, परंतु ते कोणालाही दर्शन देत नाहींत आम्ही समाधी व साधना खूप करून पाहिली आहे. मीराबाईनी सत्संगात परमात्मा कबीरांकडून असेही ऐकले होते की त्या परमात्माचे दर्शन मी प्रत्यक्ष दाखवेन. सत्य साधना करून त्यांच्याकडे सत्यलोकात पाठवून देईन. मीराबाईनी श्री कृष्णजींना पुन्हा विचारले तुम्ही जीवाचा जन्म–मृत्यु थांबवू शकता? श्री कृष्ण जी म्हणाले की हे संभवत नाहीं. कबीर जी म्हटले होते की माझ्याजवळ असा भक्ति मंत्र आहे ज्यायोगे जन्म–मरण कायमचे समाप्त होऊन जाते. ते परमधाम प्राप्त होते. त्या विषयी गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्वज्ञान

आणि तत्वदर्शी संतांना प्राप्त केल्यावर परमात्माच्या त्या परमधामाचा शोध घेतला पाहिजे. जिथे पोहोचल्यावर साधक पुन्हा मृत्युलोकात परत येत नाही. त्याच एका परमात्माची भक्ति करा. मीराबाई म्हणाल्या की हे भगवान श्री कृष्णजी! संत म्हणतात की मी जन्म-मरण कायमचे समाप्त करतो. मग मी काय करू? मला तर पूर्ण मोक्ष प्राप्त करण्याची इच्छा आहे. श्री कृष्ण जी म्हणाले की मीरा! तुम्ही त्या संतांना शरण जा. आपले कल्याण करून घ्या. मला जितके ज्ञान होते, ते सांगितले. मीराबाई दुसऱ्या दिवशी मंदिरात गेल्या नाहीत. आपल्या दासीच्या सोबत सरळ संतांच्या कडे गेल्या आणि दीक्षा घेण्याची इच्छा व्यक्त केली आणि श्री कृष्णजीशी झालेला संवाद संत कबीरांना सांगितला. त्यावेळी अस्पृश्यता पूर्णपणे पाळली जात असे. ठाकुर लोक स्वतःला सर्वोत्तम मानत असत. अहंकारी प्राण्यांना परमात्मा कधीच प्राप्त होत नाही. मीराबाईची परीक्षा घेण्यासाठी कबीर जीने संत रविदास जींना सांगितले की तुम्ही मीराबाई राठौर यांना प्रथम मंत्र द्या. हा माझा तुम्हाला आदेश आहे. संत रविदास जींनी आज्ञेचे पालन केले. संत कबीर परमेश्वर मीराबाईंना म्हणाले की बहिण ते बसलेले संत रविदास जी आहेत, त्यांच्या पाशी जाऊन अनुग्रह दीक्षा घ्या. भगिनी मीराबाई त्वरित रविदास जी कडे गेल्या आणि म्हणाल्या संतजी! दीक्षा देऊन माझे कल्याण करा. संत रविदास जींनी त्यांना सांगितले की बहिण! मी जातीने चांभार आहे. तुम्ही ठाकुरांच्या घरातील आहात. तुमच्या समाजाचे लोक तुम्हाला बरेवाईट बोलतील. जातिच्या बाहेर वाळीत टाकतील. एकदा विचार करा. मीराबाई अधिकारी आत्मा होत्या. परमात्मासाठी मृत्यु पत्करायला कधीही तयार होत्या. म्हणाल्या महाराज! तुम्हीच माझे वडील आहात. मी तुमचीच कन्या आहे. माझ्यावर अनुग्रह करा. समाज खड्ड्यात गेला. उद्या मला कुत्रीचा जन्म प्राप्त झाला, तर हे ठाकूर लोक माझ्यासाठी काय करणार आहेत? सत्संगात बड़े गुरूजी (कबीर जी) सांगतात की :-

कबीर, कुल करनी के कारणे, हंसा गया बिगोय।
तब कुल क्या कर लेगा, जब चार पाओं का होय।।

**शब्दार्थ :-** परमेश्वर कबीर जी सतर्क करत आहेत कि हे भक्त (स्त्री-पुरुष)! जो कुळ परिवार व संसाराच्या लाजेने भक्ति नाही करत, व म्हणतात कि घर परिवार व संसारातील व्यक्ती थटटा करतील कि नाम दीक्षा घेऊन दंडवत प्रणाम करतो. अन्य देवी देवतांची पूजा नाही करत. श्राद्ध-पिंडदान नाही करत. तुला लाज वाटली पाहिजे. त्यांनी आपला मानव जीवन नष्ट केले आहे. भक्ति न केल्याने जर चार पायाचे पशु म्हणजे गाढव, कुत्रा, डुक्कर, बैल इत्यादी इत्यादी बनशील. तेव्हा हे कुळ व संसारातील व्यक्ती काय वाचवू शकतात. भक्तिच वाचवू शकते ते नाहीत. त्यामुळे भक्ति करा.

संत रविदास जी उठून संत कबीर जी कडे गेले आणि सर्व सांगितले. परमात्मा म्हणाले की अजिबात वेळ घालवू नको. तो आत्मा आपल्या अधीन करून घे. त्याच वेळी संत रविदास जींनी भगिनी मीराबाईंना प्रथम मंत्रात केवळ पाच नाम दिले. (हे पाच नाव शरीरात बनलेल्या कमळला खोलणारे आहेत. राधास्वामी पंथ वाले नाही तसेच दामाखेडा वाल्या गादिने दिले जाणारे नाहीत. त्यापेक्षा वेगळे मोक्ष देणारे मंत्र आहेत.) मीराबाईना सांगितले की हि त्यांची पूजा नाही आहे, तर साधना आहे. या लोकात राहण्यासाठी, खाण्या-पीण्यासाठी जी भक्तिसंपदा पाहिजे, ती या मंत्रांनी मिळवता येते. इथल्या ऋणातून मुक्ती मिळते. मग मोक्षाचे अधिकारी होता येते. परमात्मा कबीर जी आणि संत रविदास जी तिथे एक महीना थांबले. मीराबाई आधी तर दिवसाच घराच्या बाहेर जात असत, मग रात्री देखिल सत्संगात जाऊ लागल्या कारण सत्संग दिवसा कमी आणि रात्री अधिक व्हायचा. कोणी दिवसा वेळ काढायचा,

**कोणी रात्री. मीराबाईंचे धाकटे दीर राणा जी मीराबाईंच्या रात्री घराच्या बाहेर जाण्याने संतापले, परंतु मीराबाईंना थांबविणे म्हणजे एखाद्या वादळाला थांबविण्यासारखे होते. त्यामुळे राणाजींनी त्यांच्या मावशीला म्हणजेच मीराबाईच्या आईला बोलाविले आणि मीराबाईंना समजावण्याची गळ घातली. म्हणाले हिने आमची अब्रू धुळीला मिळवली. आईने समजावले तर मुलगी ऐकेल. आईने मीरेला समजावले. मीराने त्वरित त्याचे उत्तर दिले :–**

**''शब्द''**

सतसंग में जाना ऐ मीरां छोड़ दे, आए म्हारी लोग करैं तकरार।
सतसंग में जाना मेरा ना छूटै री, चाहे जलकै मरो संसार।।टेक।।
थारे सतसंग के राहे मैं ऐ, आहे वहाँ पै रहते हैं काले नाग,
कोए–कोए नाग तनै डस लेवै। जब गुरु म्हारे मेहर करै री,
आरी वै तो सर्प गंडेवे बन जावैं।।१।।
थारे सतसंग के राहे में ऐ, आहे वहाँ पै रहते हैं बबरी शेर,
कोए–कोए शेर तनै खा लेवै। जब गुरुआं की मेहर फिरै री,
आरी व तो शेरां के गीदड़ बन जावैं।।२।।
थारे सतसंग के बीच में ऐ, आहे वहां पै रहते हैं साधु संत,
कोए–कोए संत तनै ले रमै ए। तेरे री मन मैं माता पाप है री,
संत मेरे मां बाप हैं री, आ री ये तो कर देगें बेड़ा पार।।३।।
वो तो जात चमार है ए, इसमैं म्हारी हार है ए।
तेरे री लेखै माता चमार है री, मेरा सिरजनहार है री।
आरी वै तो मीरां के गुरु रविदास।।४।।

**शब्दार्थ :– मीरा बाई च्या आईने म्हटले कि हे मीरा! तू सत्संग ला जाणे बंद कर. संसारातील व्यक्ती आम्हाविषयी चुकीच्या गोष्टी करत आहेत. मीरा ने म्हटले आई! मी सत्संगाला जाणे बंद नाही करणार, संसार भले ईर्ष्या च्या आगीत जळून मरून जाऊ. आई ने मीराला घाबरवण्यासाठी म्हटले कि ज्या रस्त्याने तू रात्रीची सत्संग ऐकण्यासाठी जाते, त्या रस्त्यावर साप तसेच सिंह राहतात ते तुला मारतील. मीरा ने उत्तर दिले कि माझे गुरुजी एवढे समर्थ आहेत कि, त्यांनी कृपा केली कि सिंह देखील गिधाडसारखे व्यवहार करेल आणि साप तर निष्क्रिय होतील जसे मांडूळ प्राणी असतात जे सापासारखे असतात, परंतु ६ ते ८ इंच लांब आणि अर्धा इंच जाडीने मोठे असतात. ते चावत नाहीत. मीराच्या आईने पुन्हा म्हटले कि, सत्संग च्या ठिकाणी काही युवा भक्त पुरुष देखिल राहतात. कोणी तुला कोठे घेऊन जाईल व वाईट कार्य करेन. मीरा ने उत्तर दिले कि हे आई! आपल्या मनात दोष आहे. त्याकरिता आपल्या मनात असे विचार आलेत. हे आई! ते संत व भक्त तर माझ्या आई–वडिलांसारखे आहेत. ते असे चुकीचे काम नाही करत. मीरा च्या आईने शिवाशिवी च्या कारणाने मीराला थांबवायेचे ठरविले, म्हटले कि हे मीरा! तुझे गुरु रविदास तर अनुसूचित जातीतील चांभार आहे. यामुळे आम्हा राजपुतांची बेइज्ज़ती होते. सत्संगला जाणे बंद कर. मीरा ने म्हटले कि हे आई! आपल्या विचाराने माझे गुरुजी तर अनुसूचित जातीतील चांभार आहेत. माझ्यासाठी तर ते परमात्मा आहेत. मी त्यांची मुलगी व ते माझे वडील आहेत. सत्संगाला जाणे बंद नाही होणार.**

**ही कथा ऐकल्यावर रामप्यारीचे (रामों) डोळे उघडले. दुसऱ्याच दिवशी कस्तूरी सोबत**

सत्संगात गेली आणि सत्संग श्रवण करून अनुग्रह घेतला. मग एक दिवस भोजनाची सेवा मागीतली. सर्व कुटुंबांनी सांगितले की भगिनी! आम्ही आमची सेवा नाहीं सोडू शकत. गुरूजी पुढल्या वेळी येतील, तेव्हा तुझी पाळी लावू. भक्तमति रामोंला तर एक क्षणभर देखिल चैन पडत नव्हते. रडका चेहरा केला. त्याच वेळी कस्तूरी म्हणाली की भगिनी! माझी पुढली पाळी आली तर सकाळचे भोजन मी करवीन आणि रात्रीचे भोजन तुम्ही करा. रामोंच्या आनंदाला पारावार उरला नाही. तिचा पाय कुठे ठरत नव्हता. आपली वेळ आल्यावर रात्रीचे भोजन तयार केले खीर–हलवा–भाजी, मांडे (पातळ पोळी–फुल्के) बनविले. परंतु सतगुरुची लीला अशी की रामोंला भयंकर ताप चढला. शरीर आगी सारखे जळायला लागले. एक पाउल देखिल चालता येत नव्हते. त्याच वेळी रामोंचा मुलगा आला. भगिनी रामोंने म्हटले की बेटा! आज माझे एक काम करशील? तुझे उपकार आयुष्यभर विसरणार नाही. बेटा मी गुरू केले आहेत. आज रात्रीचा भोजन प्रसाद मी तुझी काकी भक्तमति कस्तूरीकडून मागून घेतला आहे. बेटा हे बघ! मला सडकून ताप भरला आहे. शरीर आगीसारखे जळते आहे. चालण्याची देखिल माझ्यात ताकद नाहीये मुलगा म्हणाला की मला आता वेळ नाहीं. मी ते भोजन आश्रमात घेऊन जाणार नाही. आई तूदेखिल त्या आश्रमात जाऊ नकोस. मला तुझ्याविषयी खूप काही ऐकून घ्यावे लागते. हे ऐकून भक्तमति रामों जोरजोरात रडायला लागली. मुलाला दया आली आणि तो तावातावात म्हणाला, कुठे आहे ते भोजन, देऊन येतो. भगिनी रामों लगेच उठली आणि सर्व भोजन त्याच्याकडे दिले. मुलाने ते सर्व जेवण एका परातीत घेऊन आश्रमात गेला. रामों गुरूजींना वारंवार सांगायची की गुरूजी मुलगा व्यसने करतो. घराचा पार उकिरडा करून टाकला आहे. काही ऐकतच नाही. त्यालाही पदरात घ्या महाराज! दुसऱ्याच दिवशी मुलाला आश्रमात पाहून अन्य भक्त आणि भक्तमति म्हणू लागले की गुरूजींनी दु:खी रामोंची हाक ऐकली. मुलगा स्वतः भोजन घेऊन आला आहे. गुरूजींना माहित झाले तेव्हा त्यांना आनंद झाला, चला बेटी रामों, परमात्माने तुझी हाक ऐकली. मुलगा म्हणाला, महाराजजी! माझ्या आईला ताप चढला आहे, त्यामुळे आपणासाठी भोजन घेऊन मला पाठविले आहे. भोजन करून घ्या. संतजी भोजनास बसले आणि विचार केला मुलगा प्रथमच आला आहे, काही ज्ञान त्याला ऐकवू. संतजीनि सांगण्यास सुरवात केली की मुला! आई वडिलांची सेवा केली पाहिजे. त्यांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. मोक्षासाठी गुरू करून खरी भक्ति केली पाहिजे. व्यसनाने तर मोठमोठी घरे उध्वस्त झाली आहेत. मुलगा तर फुगून बसला होता. क्षणाक्षणाला उशीर होत असल्याने अस्वस्थ झाला होता. कारण त्या रात्री त्याने आपल्या साथीदारांसोबत राजाच्या घरी चोरी करण्यासाठी जायचे होते. रात्री बारा वाजता गावाच्या बाहेर मंदिरात एकत्र येऊन चोरी करायला जाणार होते. त्यांची कल्पना अशी होती की राण्यांचे महागडे असे अनेक हार असतात. ते चोरून आणले तर आपण मालामाल होऊन जाऊ. म्हणून मुलगा संतजींना म्हणाला की बाबाजी! लवकर भोजन जेवून घ्या. मला शिकवायची काही गरज नाही. संतजींना बरोबर नाही वाटले. त्यांनी मनात विचार केला की वास्तविक रामों या सैतानामुळे दु:खी आहे. जेवण झाल्यावर भांडी न घासताच उचलली आणि गावाकडे गेला. अर्धा अधिक रस्ता पार केल्यावर त्याच्या पायात एक मोठा काटा घुसला. पाय खूप दुखायला लागला. चालणे देखिल अवघड झाले. कसातरी घरी पोहोचला. अंगणात भांडी टाकून आपल्या आईला हाका मारायला लागला. आजच तुझ्या गुरूजीचे दर्शन घेतले. आजच माझे नशीब फुटके निघाले. माझ्या पायात काटा घुसला. मला चालता देखिल येत नाही आहे. आजपासून त्या आश्रमाचे तोंड देखिल मी पाहणार नाही. रामोंचा ताप उतरला होता. लगेच उठली आणि

काटा लागलेल्या ठिकाणी पाय धुतला. त्यावर तेलाच्या पट्ट्या लावल्या आणि कपड्याने बांधले. सकाळी काटा काढू असे ठरविले. मुलगा आपल्या आईशी खूप भांडला, उलटसुलट बोलला, कारण त्याला वाटत होते की त्या चोरीच्या कृत्यात सामील न झाल्यामुळे त्याचे खूप मोठे नुकसान झाले आहे. जशी सकाळ झाली तसा मुलाच्या पायातून काटा काढला. आई (रामों) घरच्या कामाला लागली. काही वेळानंतर वाजत गाजत एक बैंड–बाजा आला. गावातील लोकांना माहित होते की जेव्हा एखाद्याला फाशीची शिक्षा सुनावली जायची, तेव्हा असे वाजत गाजत गावातून गुन्हेगारांना नेले जात असे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ति आपापल्या घराच्या बाहेर येऊन उभे राहत होते आणि कोणाला फाशी देणार आहेत. हे त्यांना माहित व्हायचे. राजाचे शिपाई त्या चारही जणांकडून त्यांचे कृत्य वदवून घेत होते. ते म्हणत होते की आम्ही राजाच्या घरी चोरी करायला गेलो होतो. आम्ही घोर अपराध केला आहे. आज सायंकाळी आम्हाला फाशी होणार आहे. कोणी ऐकत असल्यास सांगतो, अशी चूक चुकूनदेखिल करू नका. कर्मपालला आपल्या साथीदार चोरांना ओळखण्यास वेळ लागला नाही आणि सगळी भानगड त्याच्या लक्षात आली. रामों म्हणाली की झाले हे ठीकच झाले. करा अजून चोरी करा, तुम्हाला हीच शिक्षा दिली पाहिजे. काम करुन खाता येत नाही तुम्हाला. रामों आपल्या घरात गेली. कर्मपाल द्वारावर भेदरलेल्या अवस्थेत भयभीत होऊन उभा होता. मग घरात जाऊन जोर–जोरात रडायला लागला. रामोंने पहिले की कर्मपाल का रडतो आहे? विचारले की अरे काय झाले तुला बेटा? काटा देखिल निघाला. आता दुखते आहे काय? कर्मपाल उठला आणि आपल्या आईला छातीशी धरून म्हणाला, आई! तुझ्या गुरुजींचे भले होवो. त्यांनी आज माझी फाशी वाचवली. आई! आज तुझा मुलगा फाशी जाणार होता. आई, तू कशी जिवंत राहिली असतीस? रामों म्हणाली की माझा मुलगा चोर थोडाच आहे? तो फाशी का जाईल? चोरांना फाशी झाली आहे. कर्मपाल म्हणाला होय आई! तुझा मुलगा चोर होता. आता तुझी शपथ घेऊन सांगतो, मी कधीहि व्यसन करणार नाही. तुझ्यासोबत सत्संगात येईन. तुझ्यासोबत घरच्या कामात तुला मदत करीन. मी माझ्या आयुष्यात तुला कधीही दु:खी करणार नाही. रामों म्हणाली की अरे निरुपयोगी माणसा! चोरीदेखिल करायला लागलास का आता तू? मुलगा म्हणाला की होय आई! मी पक्का चोर झालो होतो. धन्य आहेत. तुझे सतगुरु, धन्य आहेत, धन्य आहे माझी आहे, माझ्या आईला अशा महापुरूषाचे शिष्यत्व लाभले आहे. आई, आजच चल मला अनुग्रह मिळवून दे. रामों लगेच मुलाला घेऊन भक्तमति कस्तूरी कडे गेली. सगळा वृत्तान्त सांगितला. कस्तूरीदेखिल सगळी कामे सोडून त्यांच्या सोबत आश्रमात आली आणि गुरूजींना धन्यवाद दिले. सर्व घटनाक्रम सांगितला आणि मुलाला अनुग्रह देववला. दुसऱ्या गावातील सत्संगी परिवारातील एका मुलीशी कर्मपालचा विवाह झाला. सगळे कुटुंब सत्संगात येऊ लागले आणि सेवा करून सुखी जीवन जगू लागले.

रामों तर सत्संगी रंगात अशी रंगली की जेव्हा जेव्हा सतगुरु जी मंडळींच्या समवेत येऊन आश्रमात मुक्काम करत, तेव्हा ती सकाळीच तिथे जात असे आणि संध्याकाळी उशिरा घरी येत असे. तिथे ती सेवा करायची, भांडी घासायची, गुरूजीचे कपडे धुवायची. सत्संगातील एक शब्दही सोडत नसे. एकदा थंडीचे दिवस होते. सकाळी १० वाजता सत्संग सुरू झाला. गुरूजींनी रामोंला सांगितले, बेटी! नदीवरून कपडे धुऊन आण. ऊन थोडा वेळच असते. सत्संगा नंतर गेलीस तर कपडे वाळणार नाहीत. भगिनी रामों कपडे बादलीत घालून गेली. नदी थोड़ी लांब होती. कपड़े पाण्याच्या बादलीत भिजवून सोडा टाकला. मग विचार केला की कपडे सोड्यात भिजायला जेवढा वेळ लागेल तेवढ्या वेळात सत्संग ऐकून येते. आश्रमाच्या

बाहेरच्या भिंतीला कान लावून सत्संग ऐकायला लागली. सत्संग संपून ''सत साहेब''चा आवाज ऐकल्यावर रामोंला कपड्यांची आठवण आली. धावत धावत नदीकडे गेली. आणि घाबरली होती, आज आपल्याकडून चूक झाली. गुरूजींच्या आज्ञेची आपण अवहेलना केली. मला रागावतील. गुरूजी नाराज झाले तर माझी आतापर्यंतची सगळी सेवा पाण्यात जाणार. हे परमेश्वर! हे काय झाले? याच विचारात नदीवर आली. पाहिले तर बादली रिकामी होती आणि कपडे धुऊन झाडांवर वाळत टाकले होते आणि ते वाळले देखिल होते. रामों आधीपासूनच नदीत कपडे धुणाऱ्या त्या महिलांना म्हणाली भगिनी! हे कपडे धुऊन तुम्ही वाळत टाकले आहेत का? सगळ्या त्या महिला रामोंकडे पाहू लागल्या. एक म्हणाली, ताई! तुमचे डोके बीके फिरले आहे का? ही काय आमची गम्मत करता आहात तुम्ही? तुम्ही स्वत:च तर कपड़े धुवत होतात अधीर होऊन. आमच्यावर देखिल त्याचे शिंतोडे उडत होते. तुम्हाला आम्ही टोकले देखिल, जरा हळू हळू कपडे धुवा म्हणून. तुम्ही स्वतः झाडांवर कपडे वाळत टाकून गेलात. आता काय भांग पिऊन आला आहात काय? रामों रडू लागली आणि सर्व कपडे उचलून बादलीत टाकून आश्रमाकडे चालू लागली. आश्रमाच्या कोण्या सेवकाने रामोंला आश्रमाच्या बाहेर बसून बराच वेळ सत्संग ऐकताना पाहिले होते. त्याने गुरूजींना सांगितले की आज तुमचे कपड़े ओलेच राहणार कारण रामों तर सत्संग संपेपर्यंत भिंतीला कान देऊन सत्संग ऐकत होती. आत्ता गेली आहे कपड़े धुवायला. इतक्यात रामोंने आश्रमात प्रवेश केला आणि कपड़े गुरूजींच्या जवळ ठेऊन जोरजोरात रडू लागली. संतजींनी कपड़याना हात लावला तर सगळे ठणठ्णीत कोरडे होते. रामोंला रडण्याचे कारण विचारले तर म्हणाली की गुरूजी! आपण दुःखी होऊन स्वतः कपड़े धुतले आहेत. माझ्याकडून चूक झाली. मी असा विचार केला की थोडा वेळ सत्संग ऐकून कपड़े धुवीन. परंतु लक्षात नाही राहिले. गुरूजी म्हणाले की बेटी! परमात्मा कबीर जींनी रामों होऊन कपड़े धुतले आहेत.

ज्यों बच्छा गऊ की नजर में, यूं सांई कूं संत।
भक्तों के पीछे फिरे, भक्त वच्छल भगवन्त।।

**शब्दार्थ :-** जसे गाय आपल्या मुलावर एकटक नजर ठेवते कि कोणी पशु-पक्षी किंवा मनुष्य माझ्या मुलाला मारून तर टाकणार नाही. अशाप्रकारे परमात्मा आपल्या भक्तावर दृष्टी ठेवतात. जसे गाय चा मुलगा खेळत उड्या मारत कोठेतरी जातो तर गाय देखील त्याच्या सुरक्षेसाठी त्याच्या मागे मागे पळते. अशाप्रकारे परमात्मा जो भक्ताचा हितकारी आहे, आपल्या भक्तांच्या पाठीमागे फिरतो. त्यांच्या सुरक्षेसाठी बरोबर राहतो.

परमात्माने दुष्ट ईब्राहिम सुल्तानाला नरकातून बाहेर काढण्यासाठी दासीचे स्त्री रूप घेऊन आपल्या शरीरावर फटके खाल्ले होते. मुली दु:खी होऊ नकोस! तुझा उद्देश चुकीचा नव्हता. परमात्मा तर खऱ्या भक्ति व भावाचे भूकेले आहेत. रामों शांत झाली. सत्संगात रामों तल्लीन झाली. तिला मोक्ष देखिल मिळाला.

कबीर, सतगुरू शरण में आने से, आई टलै बला।
जै भाग्य में सूली लिखी हो, कांटे में टल जाय।।

**भावार्थ :-** समर्थ कबीर परमेश्वरचे कृपा पात्र खरे गुरु (सतगुरु) पासून दीक्षा घेणारे भक्त/भक्तमति ची सुरक्षा परमात्मा करत असतात. जर पूर्व जन्माच्या पापांमुळे साधकाला मृत्यू ची शिक्षा सुळावर चढवण्याची भाग्यात लिहली असेल जी अत्यंत दुखदायक असते. तर परमात्मा त्या साधकास त्या मृत्युदंडास समाप्त करून काही छोटे मोठे दंड जसे पायात काटा

मोडून टाळतात. भयंकर दंडास किरकोळ दंडात बदलतात जो सर्वात मोठा त्रास होता.

## ''चोर कधीही श्रीमंत होत नाही''

परमेश्वर कबीर जींच्या कथनानुसार एका गावात एक साधु पुरुष जंगलात आश्रम बांधून राहत होते. काही दिवस आश्रमात राहायचे, सत्संग करायचे, परत परिभ्रमण करण्यास जायचे. एक जाट शेतकरी काही महिन्यांपूर्वीच त्यांचा शिष्य झाला होता. शेतकरी गरीब होता. त्याच्याजवळ एक बैल होता. दुसऱ्या शेतकऱ्यासोबत मिळून मिसळून त्या बैलाच्या सहाय्याने शेती करीत होता. दोन दिवस दुसऱ्यांचा बैल स्वतः घेऊन दोन्ही बैलाच्याकडून नांगर फिरवून घेत असे. मग पुढचे दोन दिवस दुसरा शेतकरी त्याचा बैल घेऊन आपल्या बैलासोबत जोडून नांगर चालवायचा. आपल्या कच्च्या घराच्या अंगणात शेतकरी आपला बैल बांधत असे. एका रात्री चोराने त्या शेतकऱ्याचा बैल चोरला. शेतकऱ्याने पाहिले की बैल चोरी झाला आहे. तेव्हा तो सकाळी आश्रमात गेला. गुरूदेवजींना आपले दु:ख सांगितले. गुरूदेव जी त्याला म्हणाले की बेटा! परमात्मावर विश्वास ठेव. दान-धर्म-भक्ति करत रहा, तुला परमात्मा दोन बैल देईल. जो बैल चोरून घेऊन गेला आहे, तो पापात सहभागी आहे. परमात्माच्या कृपेने पाउस उत्तम झाला. शेतकरी भक्ताचे चौपट पीक आले. भक्त शेतकऱ्याने दोन बैल घेतले आणि त्यांना उत्तम खुराक दिला. बैल सांडांसारखे ताकदवान झाले. गावात त्याच्याच बैलांची चर्चा व्हायची. एक वर्षानंतर तोच चोर त्याच भागात चोरी करण्यास आला. कुठे डाव जमला नाही. त्याने विचार केला ज्याचा बैल चोरला होता, त्याच्याच घरी बघूया. त्याने नवीन बैल घेतलेला असू शकतो. पाहतो, तर दोने धष्टपुष्ट बैल बांधलेले होते. चोराने दोन्ही बैल चोरून नेले. शेतकरी उठला, तर दोन्ही बैल चोरीला गले होते. गुरूजींना सांगितले तर गुरूजी म्हणाले की बेटा! परमात्मा तुझ्या घरी चार बैल देईल. चोर कधीही श्रीमंत होत नाहीत. पापी-पाप जमा करतो आहे. परमात्माची मर्जी, गुरूदेवाचा आशीर्वाद, यामुळे पावसाने शेतकऱ्यांची चंगळ केली. भक्त शेतकऱ्याकडे पुरेशी जमीन होती. परंतु पावसांच्या अभावी तो शेती थोड़याच भागात करायचा. पाऊस चांगला झाला. दोन बैल विकत घेतले आणि दोन बैल कर्ज घेऊन घेतले. शेती जास्त जमिनीत केली. एक नोकर नांगर चालविण्यासाठी ठेवला. एका वर्षात सगळे कर्ज फेडले. बैल देखिल चार झाले होते, ते देखिल सांडासारखे तगडे. घर देखिल पक्के बनविले. दोन वर्षांच्या नंतर चोर परत तिथे गेला. सर्वप्रथम त्याच शेतकऱ्याची परिस्थीती पहायला गेला. चोराने पाहिले की चार सांडासारखे बैल बसले होते आणि चोराच्या जवळ फक्त दोन दिवसांचीच कणिक शिल्लक होती. तो अधिकच गरीब झाला होता. चोराने शेतकऱ्याला रात्रीच्या झोपेतून उठविले. तेव्हा शेतकऱ्याने विचारले, तुम्ही कोण आहात. चोराने सांगितले की मी तुमचे तीन बैल चोरी केलेला चोर आहे. शेतकरी म्हणाला दादा! माझी झोप खराब करू नको. तू आपले काम कर. परमात्मा त्याचे काम करत आहे. मला झोपू दे. चोराने पाय पकड़ले आणि म्हणाला, हे देवता! माझ्याकडून आता चोरी होणार नाही. एक सांग, चोर तुझ्या समोर उभा आहे पण तू पकडत का नाही? तुझा एक बैल मी चोरला, पुढल्या वर्षी तुझ्या घरी दोन सांडासारखे बैल बांधले होते, ते दोन्ही बैल मी चोरले. आज दोन वर्षांच्या नंतर, तुझ्या घरी चार सांडासारखे बैल बांधले आहेत. माझा तर सर्वनाश झाला आहे. माझी मुले भुकेली असतात. मला मारझोड कर, पण तुझ्या यशाचे रहस्य सांग. मी पण जाट शेतकरी आहे. जमीन पण आहे. पण गरिबीला अंत नाही. भक्त शेतकऱ्याने त्याला सांगितले की तुम्ही स्नान करा, जेवण करा. चोराने तसे केले. मग भक्त त्या चोराला घेऊन आश्रमात आला. गुरूदेवानी सर्व घटना कथन केली. गुरूदेवानी चोराला

समजावले. सात–आठ दिवस भक्त शेतकऱ्याने त्याला आपल्या घरी ठेऊन घेतले आणि रोज गुरूजींना भेटवून सत्संग ऐकवला. चोराने अनुग्रह घेतला. गुरूजींनी म्हटले की भक्त बेटा! नवीन भक्ताला एक बैल उधार दे. तो शेती करेल आणि तुझे पैसे परत करेल. भक्त म्हणाला, गुरूजी! ठीक आहे. भक्त शेतकऱ्याने नवीन भक्ताला एक बैल दिला. नवीन भक्त प्रत्येक महीन्यात सत्संगात येत असे. पूर्ण कुटुंबाने अनुग्रह घेतला. दोन वर्षात आर्थिक स्थिति उत्तम झाली. एक बैल विकत घेऊन चोरलेल्या तीन आधीच्या बैलांचे रूपये घेऊन चोर भक्त त्या शेतकरी भक्ताच्या घरी गेला. त्याची मुले त्याच्या सोबत होती. शेतकरी भक्ताकडे सगळे पैसे देउन चोर भक्ताने म्हटले की मला क्षमा कर. तुमचे उपकार माझ्या सात पीढ्या देखिल फेडू शकणार नाहीत. जुना भक्त म्हणाला अरे दादा! ही सर्व गुरूदेवांची कृपा आहे. त्यांचे शब्द फळले आहेत. तुम्ही हे सर्व रूपये गुरूजींना दान रुपात द्या. मला तर त्यांनी आधीच कैकपट बैलांचे भांडवल दिले होती. हे माझ्या कामाचे नाही. दोघेही भक्त गुरूजीकडे गेले आणि सर्व दान रक्कम त्यांच्या चरणी वाहिली. गुरूजींनी ती रक्कम भोजन–प्रसादात देऊन सत्संग केला. अशा प्रकारे चोरीचे धन मोरीत जाते. भक्त सदैव वैभवात जगतो.

➢ ''संस्कार संसर्गजन्य रोगासारखे पसरतात'' :–

चांगले आणि वाईट संस्कार सांसर्गिक रोगासारखे पसरतात. जसे भक्ताच्या हाती बीज पेरले असल्यास त्यात देखिल भक्तिचे संस्कार होत असतात. जो ते अन्न सेवन करतो, त्याला देखिल भक्तिची प्रेरणा होते.

एखाद्या व्यसने करणाऱ्या आणि कोणत्याही अन्य प्रकारच्या विचारांना मनात थारा देणाऱ्या नांगर चालवणाऱ्याकडून बीजाची पेरणी केली तरी त्यापासून तयार होणारे अन्न सेवन करणाऱ्यावर देखिल त्याच्या संस्कार/विचारांचा प्रभाव पडत असतो.

उदाहरण :– एका भगिनीने गुरूकडून अनुग्रह घेतला होता. तिच्या घरी गुरूजी आणि त्यांच्या सोबत एक शिष्य असे दोघे आले. त्या भगिनीची बहिण देखिल काही निमित्ताने त्याच दिवशी तिच्याकडे आली होती.

तिच्या जावयाचे निधन झाले होते. मुलीला छोटी छोटी मुले होती. ती अतिशय काळजीत होती. राहून राहून विचार येत होते, आता माझ्या मुलीचा उदरनिर्वाह कसा होईल. तिचे तर सगळेच उध्वस्त झाले आहे. मोठे आणि धाकटे दीर तर कोणाचेच नसतात. मुलांना कोण सांभाळणार? अरे देवा हे काय झाले कोणत्या जन्माचे पाप आडवे आले. अनुग्रहित भगिनी भोजन तयार करीत होती, त्यात तिची बहिण देखिल तिला मदत करीत होती. जिचा जावई निधन पावला होता, तिनेच बहुतांशी जेवण बनविले होते. संत आणि भक्त जेवण जेवून झोपले. सकाळी उठल्यावर भक्त गुरूदेवांना म्हणाला गुरूदेव! आज रात्री झोपेत मन अतिशय दु:खी होते. माझे जावई गेले, मुलीची छोटीछोटी मुले आहेत, त्यांच्या भवितव्याची काळजी वाटते, त्यांचे कसे होईल त्यांचा निर्वाह कसा होईल. अशा काळज्या उभ्या राहिल्या. गुरूजीनि आपल्या शिष्येला विचारले, बेटी! रात्रीचे भोजन कोणी बनविले होते? तिने उत्तर दिले की माझ्या छोट्या बहिणीने बनविले आहे. संतजींनी विचारले त्यांना काही समस्या आहे काय? शिष्येने उत्तर दिले की गुरूदेव! समस्या तर अनेक आहेत. मुलीची छोटी–छोटी मुले आहेत. जावयाचे निधन झाले आहे. सगळा दिवस बहिण याच काळजीत असते. दिवसातून किती तरी वेळा म्हणत असते की माझ्या मुलीचे कसे होईल? कशी आपल्या मुलांना सांभाळेल?

गुरूजींनी शिष्याला सांगितले की त्या मुलीच्या विचारांचा भोजनात शिरकाव झाला

आणि त्याच विचारांनी जेवण प्रभावित झाले. मला देखिल रात्रभर हाच त्रास होत होता. त्यामुळेच भक्ति नाम-स्मरण किंवा आरती किंवा संतांच्या वचनांचे मनन करत-करत भोजन बनविलयास ते सेवन करणाऱ्यांना उत्तम संस्कार आणि प्रेरणा मिळते. भक्तिची आवड वाढत जाते. कोणी शेतकरी नांगरधारी गाणी गात बी पेरतो किंवा कोणती गाणी गाता गाता भोजन बनविते, तर तसे संस्कार त्या अन्नावर होतात. ते अन्न सेवन करणारा देखिल त्याच पद्धतीने विचार करू लागतो. ज्याचा परिणाम वर्तमानात (१९९७ च्या आगेमागे) दिसून येतो आहे. चांगल्या कामात कमी वाईट मध्ये जास्त संख्येमध्ये मनुष्य आहेत.

संतांची वाणी-आरती-नामस्मरण करणाऱ्यांची संख्या वाढेल तसे वातावरण भक्तिमय होईल. प्रत्येक व्यक्तिच्या मनात भक्त भाव जागृत होईल. तसे वातावरण निर्माण होण्यासाठी घरोघरी आरती, पूजापाठ आणि नित्य-नियमीत उपासना झाली पाहिजे. गुरूकडून अनुग्रह घेऊन नामस्मरण केले पाहिजे. ज्यायोगे वातावरणात भक्ति विचार अधिक भरून राहील आणि वाईट संस्कार नाहीसे होतील. भक्तिचे संस्कार ऑक्सिजन सारखे आहेत आणि वाईट विचार हे कार्बन-डाईऑक्साईड सारखे आहेत. ऑक्सिजन रूपी भक्ति संस्कारांचे सिलेंडरच्या सिलेंडर उघडावे लागतील म्हणजेच सद्ग्रन्थांचे पाठच्या पाठ करावे लागतील आणि तिन्ही वेळची नित्यकर्मे करावी लागतील. नामस्मरण करावे लागेल. भक्ति करणाऱ्यांची सँख्या वाढ़ेल तेव्हा भक्तिचे विचार देखिल पृथ्वीवर प्रसारित होतील ज्यामुळे प्रत्येक मनामध्ये शांतिची अनुभूती होईल. सत्संग करण्यास कोणत्याही घरी गेलो की पहिल्या दिवशी आमचे मनदेखिल अशांत व्हायचे. मग प्रत्येक भक्त आपापली दैनंदिनी म्हणजेच सकाळची नित्यकर्मे, रमैनी सायंकाळची आरती, आणि नामस्मरण करायचे, मग सत्संग ऐकवायचो तेव्हा त्या घरातून वाईट विचार (कुसंस्कार) निघून जायचे. सुसंस्कार झाल्यामुळे मन शांत व्हायचे. जेव्हा आम्ही सत्संग किंवा पाठ करून पुढल्या गावी जायला लागल्यावर सगळ्या कुटुंबाच्या डोळ्यात अश्रू यायचे. त्यांना संत व भक्तांच्या संगतीत इतकी शांति लाभत होती. त्या संस्कारांचा परिणाम अनेक महीने रहायचा. जरी अनुग्रह घेऊन दैनंदिन संध्या जरी कुटुंबातील लोकांनी केली तरी त्या घरात शांती व सुख नांदेल.

❖ जो बीड़ी-हुक्का यामध्ये तंबाखू ओढतो, त्याने पेरणी केल्यास त्यापासून शिजवलेल्या अन्नाला तंबाखूच्या वासनेची सूक्ष्म तत्वे त्यात शिरतात. ते अन्न सेवन करणाऱ्यांना तंबाखू सेवन करण्याची प्रेरणा होते. त्यामुळे तरुणांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढू लागले आहे. जोपर्यंत लहान असतात, तोपर्यंत वडील-काका-आजोबा यांच्या भीतीने तंबाखू सेवन करत नाहींत, परंतु मोठे होताच ते संस्कार प्रबळ होतात आणि सवयीचे व्यसन कधी होते हे कळत नाही. माझा उद्देश आहे की मानवाने व्यसने व अन्य सर्व वाईट सवयी मुळापासून सोडून पृथ्वीवर स्वर्ग बनवावा. परमात्मा कबीर जींनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्ष साकार झालेले मला पहायचे आहे. त्यांच्याच प्रेरणा व शक्तिने हे अमूल्य काम सार्थ होऊ शकते. हा सेवक आणि माझे अनुयायी ते यशस्वी करण्यसाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील आहेत. यशस्वीपणाची पूर्ण अपेक्षा आहे.

## ''सांसारिक धामधुमीतच भक्ति करावी लागेल''

एक अंमलदार घोड़यावर स्वार होऊन आपल्या छेत्रात काही कामानिमित्त चालला होता. जून महिना होता, दुपारच्या एक वाजताच्या उन्हात चालला होता. हरियाणा प्रांतातून चालला होता. एक शेतकरी मोटेने पिकाला विहिरीचे पाणी देत होता. बैलाकडून चरकाप्रमाणे

रहाट सुरु होता. बादल्यांची रांग चक्रीवर फिरत होती आणि त्यातील पाणी शेतात जाणाऱ्या पन्हाळीत पडत होते. रहाटाच्या चालण्याचा चीं-चूं असा आवाज होत होता. अंमलदार आणि घोड़ी दोघेही तहानेने व्याकूळ झाले होते. अंमलदाराने पाणी पिण्यासाठी आणि घोड़ीला पाजण्यासाठी रहाटाकडे आला. रहाटातून येत असलेल्या चीं-चूं अशा मोठ्या आवाजा मुळे घोड़ी घाबरून दूर पळून गेली. अंमलदाराने शेतकऱ्याला म्हटले की हा चीं-चूं आवाज जरा बंद करा ना! शेतकऱ्याने बैलांना थांबविले. परिणामी रहाट बंद झाला. विहिरीतून पाणी येणे बंद झाले. जे पाणी आधीच बाहेर आलेले होते, ते जमिनीच्या पोटात जिरले. अंमलदाराने घोड़ी जवळ आणली तर पन्हाळीत पाणी नव्हते. अंमलदार म्हणाला शेतकरी मित्रा! पाणी काढ. शेतकऱ्याने बैल परत फिरवायला सुरवात केली, त्यामुळे रहाटातून चीं-चूं आवाज आणि पाणी दोन्ही सुरु झाले. घोड़ी पुन्हा घाबरून आणि एक ऐक्कर (२०० फुट) लांब जाऊन उभी राहिली. अंमलदार घोडीवर बसला होता. पुन्हा म्हणाला, हा आवाज बंद करा. शेतकऱ्याने बैल थांबवले, तसे पाणीदेखिल जमिनीत मुरून गेले. घोड़ीला जवळ आणले, पाणी मिळाले नाहीं तर पुन्हा पाणी सुरु करण्यास सांगितले. रहाट सुरु करताच घोड़ी पळून गेली. शेतकरी म्हणाला की अंमलदारसाहेब! या रहाटाच्या चीं-चूं आवाजातच पाणी प्यावे लागेल, नाहीतर दोघेही मराल. अंमलदार घोड़ीवरून उतरला, लगाम पकडून हळू हळू घोड़ीला जवळ आणले, रहाट सुरु असतानाच दोघेही पाणी प्याले आणि आपली तहान भागवली. त्यामुळे प्रापंचिक कर्तव्ये करत असतानाच भक्ति, दान-धर्म, नामस्मरण करावे लागेल.

## आता भक्तिने काय होणार? आयुष्य तर थोडेच शिल्लक होते.

जींद जिल्ह्यातील 'मनोरपुर' गावात भक्त रामकुमार यांच्या घरी तीन दिवस पाठ आणि सत्संग सुरु होता. गावातील पुरूष सत्संगाला पाखण्ड समजतात. कारण जुन्या जमान्यात वृद्ध स्त्रिया सत्संगाचे आयोजन करत असत. रात्री सत्संग करायच्या आणि दिवसा सुनेला तिच्या भावा-पुतण्यांच्या वरून घालून पाडून बोलायच्या. शिव्या देत होत्या. काही काही तर दुसऱ्यांच्या वाळायला ठेवलेल्या गोवऱ्या देखिल चोरायच्या. कधी पकडल्या गेल्या, तर नाव खराब होत असे. अशा प्रकारच्या घटनांच्या मुळे लोकांना सत्संग या शब्दाबाबतच तिरस्कार होता. भक्त रामकुमार यांच्या पूर्ण कुटुंबानेच अनुग्रह घेतला होता. त्यांना माहित होते की सतसंग वेगळ्या प्रकारच आहे. जेव्हा रामकुमार च्या वडीलांना माहीत पडले की आपल्या घरी मोठा मुलगा सत्संग करवून घेतो आहे, ते त्यांना कमीपणाचे वाटले आणि त्यांनी विचार केला की गाँव काय म्हणेल? म्हणून तो वृद्ध तीन दिवस आपल्या मोठ्या मुलाच्या घरी आलाच नाही. छोटया मुलाच्या घरी ओसरीवर राहिला. दिवसा शेतात जायचा, रात्री ओसरीवर हुक्का ओढायचा आणि कसे दिवस पाहायला मिळताहेत असे दु:खाचे उसासे टाकत होता.

रात्री सेवकाने (लेखक) सत्संग केला. लाऊड स्पीकर लावलेला होता. रामकुमारजींच्या मुलाला माहित होते की दादा तिथे ओसरीवर हुक्का ओढताहेत. त्याने एक स्पीकरचे तोंड आजोबांच्या हुक्का ओढण्याच्या ठिकाणच्या दिशेने केले. सत्संगातील प्रवचन जबरदस्ती श्रवण करावेच लागले. दोन दिवस सत्संग श्रवण करून तिसऱ्या दिवशी प्रसादाच्या वेळेस रामकुमारच्या घरी आला. रामकुमारच्या पत्नीने सांगितले की म्हातारा सगळे वातावरण बिघडवायलाच आला आहे. महाराजांना काहीतरी उलट सुलट बोलेल. सत्संगाचा नैवेद्य झाल्यावर रामकुमारचे वडील माझ्या समक्ष येऊन बसले आणि म्हणू लागले, महाराज! माझ्या मनात या सत्संगाबाबत घोर नाराज होते. परंतु दोन दिवस आपले प्रतिपादन ऐकल्यावर मी आतून हललो. मी तर

मनुष्य जीवनाचा पूर्ण सत्यानाशच केला. मी आठ एकर जमीन विकत घेतली, दोन्ही मुलांना पालनपोषण करून मोठे केले आणि दिवसरात्र शेतात राबत राहिलो. आपल्या विचारांमधून समजले की मी तर जीवनाचा नाश केला. आता ७५ वर्ष वय झाले आहे. आता भक्ति केल्याने काय होणार? असे म्हणून तो वृद्ध रडू लागला. त्याला उचकी लागली. मी त्याला समजावत म्हणालो की आपण विश्वास ठेवा अजूनही काही बिघडलेले नाही. एक उदाहरण तर गुरूजी कडूनच या सेवकाने (रामपाल दास) ऐकले होते. ते असे की जसे विहिरीत बादली सुटली आहे. तिची दोरी देखिल सुटून चालली असली (बादली दोरीला बांधतात आणि त्यातून विहिरीचे पाणी काढले जाते. पूर्वीच्या काळी तर विहिरी १००-१५० फुट खोल असत.) तरीही धावत जाऊन दोरीला पकडत असताना दोरीचे शेवटचे टोक जरी हाती लागले तरीही सगळे साधल्यासारखेच आहे. बादली पण मिळाली आणि पाणी पण मिळाले. पण असे विचार केले की बादली पण गेली आणि पाणी पण गेले असा विचार करून काहीच प्रयत्न न करणे हा मूर्खपणा आहे. त्याच प्रमाणे आपल्या आयुष्याच्या दोरीचे शेपूट तर शिल्लक आहे! आताच अनुग्रह घेऊन सर्व व्यसनांचा त्याग करून मर्यादेमध्ये राहून साधना करा. मोक्ष होईलच. त्या भक्ताने त्याच वेळी अनुग्रह घेतला आणि पूर्ण श्रद्धेने भक्ति केली. त्याने वयाच्या ८५ व्या वर्षी देह त्यागला. जीवन धन्य केले. तो हुक्का ओढीत असत. त्याच दिवशी सोडून दिला आणि आयुष्यात परत कधी त्याला हात देखिल लावला नाही. रामकुमारच्या छोटया भावाच्या कुटुंबाने देखिल अनुग्रह घेतला. वृद्ध भक्त त्यांना घेऊन स्वतः सत्संगात घेऊन यायचा. भक्ति करायला सांगायचा. मनोरपुर गावातील लोक देखिल आश्चर्यचकीत झाले की इतका हुक्का ओढणारा, याने हुक्का सोड़ला कसा? हुक्का ओढणाऱ्या जवळ देखिल बसत नसे.

एकै चोट सिधारिया जिन मिलन दा चाह।

**हरियाणवी भाषेत एक म्हण आहे की :-**

घाम का और ज्ञान का चमका-सा लाग्या करै।

**शब्दार्थ :-** भावार्थ आहे कि भाद्रपद महिन्यात ऊन (घाम) चा खूप जोर असतो. शेतात काम करणाऱ्यांना उन्हातच काम करीत असल्यामुळे अधिकच घाम येतो. त्यामुळे यांच्या शरीरातील उष्णता वाढते. तो माणूस वैद्याला म्हणायचा की मला कधी उष्माघात झाला हे कळले देखिल नाही. वैद्य म्हणायचे की उष्णतेचा एकदम परिणाम होतो. मग त्याचा प्रभाव जाणवू लागतो. अशा प्रकारे ज्ञानाचा प्रभाव व्हायला हवा असेल तर ज्ञानाचे एक दोन मुद्दे लक्षात आल्यानंतर भक्ति करू लागतो.

## ''चौधरी जीता जाटाला ज्ञान झाले''

उत्तर प्रदेश मधील बागपत जिल्यातील खेखड़ा गावात जवळपास दोनशे पंचाहत्तर वर्षापूर्वी एक जीता राम जाट राहत होता. नऊशे एकर जमिनीचा मालक होता. गावातील सर्वात श्रीमंत प्रतिष्ठित आणि पुढारी इसम होता. नेहमी खऱ्याची बाजू घ्यायचा. खोटेपणाला कधी महत्व दिले नाही. त्याच खेखडा गावात एक संत घीसा दास जी यांचा त्या वेळी सत्संग होत असे. ते चांभार जातीचे होते. त्यावेळेस अस्पृश्यता कसोशीने पाळली जात असे. संत घीसादास यांना परमेश्वर कबीर जींनी वयाच्या सात-आठव्या वर्षी जंगलात दर्शन दिले होते. त्यांना यथार्थ ज्ञान आणि अनुग्रह देऊन ते अंतर्धान पावले होते. मोठे होऊन संत श्री घीसा दास जी सत्संग करू लागले. आसपासचे लोक सत्संग ऐकून व अनुग्रह घेऊन संकटमुक्त व्हायला लागले. दिवसा आपल्या निर्वाहासाठी काम करायचे आणि रात्रि सत्संग श्रवण करत.

महीन्यात दोन दिवस सत्संग करत असत. रात्रीच्या सत्संगात स्त्रिया–पुरूष दोघेही जात असत. गावात चर्चा लगेच सुरु झाली की रात्री स्त्रियांनी जाणे उचित नाहीं. कोणतीही अनुचित घटना घडू शकते. त्यामुळे हा सत्संग बंद करायला पाहिजे. खेखड़ा गावाची पंचायत भरली. पंचायतीत सत्संग बंद करण्याचा निर्णय घेतला गेला आणि हा निरोप स्वतः पंचायतीचे प्रमुख चौधरी जीतारामजींना सांगितला गेला. चौधरी जीताराम जी संत घीसारामजींच्या घरी गेले. त्या दिवशी सत्संग सुरु होता. गावाच्या पंचायतीच्या निर्णयाची चर्चा पूर्ण गावात झालेली होती. जेव्हा चौधरी जीताराम जी तिथे पोहोचले, तेव्हा सत्संगातील श्रोत्यांना वाटले की चौधरी साहेब जाटी डोक्याचे आहेत. संतजीशी भांडण करतील. जीताराम जी घरून काठी घेऊन निघाले होते. पण वाटेत एका झाडाखाली ती काठी ठेऊन पुढे गेले. मनात विचार केला की भक्त काय भांडण थोड़ेच करणार आहेत? चांगल्या ठिकाणी लाठी घेऊन जाणे पंचायती प्रमुखाला शोभत नाही. सत्संग सुरु होता. चौधरी साहेबांनी विचार केला की थोडे हे काय म्हणत ते तरी ऐकुया. मग त्याला काय सांगायचे ते सांगू. हरलालजींच्या प्रकरणी जे आपण पाहिले तेच ज्ञान सत्संगात सांगत होते. चौधरी साहेब एकदम भावुक झाले. डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. उठून संत घीसाजींच्या पायांवर डोके ठेवले आणि म्हटले की हे गुरूदेव! मला अपराध्याला मारा किंवा सोडा, खूप मोठी चूक केली आहे. मी एक तुच्छ जीव सत्संग बंद करण्याचा आदेश घेऊन आलो आहे. क्षमा करा प्रभु. आपण मनापासून सत्संग करा, कोणीही आडकाठी आणणार नाही. संत घीसा जी म्हणाले की चौधरी साहेब! जे काम करायला आला होतात, ते करा. जीता जाट पुन्हा रडू लागला आणि म्हणाला, क्षमा करा, क्षमा करा, मला अनुग्रह द्या. चौधरी जीता राम जाट जी भक्त बनले. स्वतःदेखिल रात्रि सत्संग श्रवण करण्यास येत. खेखड़ा गावात घरोघर चौधरी साहब जीतराम जी यांची संत घीसारामजींना शरण गेल्याबद्दल निंदा होऊ लागली. संत घीसाराम मांत्रिक आहे. असे म्हणून लागले. जादूटोणा त्याला माहित आहे. गावच्या चौधरीवर तांत्रिक जादूटोणा करून संमोहित करून वश केले आहे संमोहन मंत्राचा माहीतगार आहे. चौधरी जीतारामजींच्या घरचे लोक म्हणजेच मुले, भाऊ, काका, सगळे जीताराम जाट आणि घीसाराम संत यांचा विरोध करू लागले. गावातील लोक चौधरी जीताराम यांना म्हणू लागले की चौधरी साहेब! तुम्हाला म्हातारचळ लागला आहे या म्हाताऱ्या वयात. चौधरी जीतारामजींना आध्यात्मिक ज्वर चढला होता म्हणजेच ज्ञानाचा प्रभाव प्रबळ झाला होता. ते आपल्या गावातील लोकांना म्हणायचे अरे! मी भक्त बनलो हे तर माझे भाग्यच. आणि तुमच्या दृष्टीने तर काय, मी बिघडलोच आहे. देवाची कृपा होवो, माझ्याप्रमाणेच तुम्ही देखिल बिघाडावे. बिघडल्याशिवाय काहीच होणार नाही. काही दिवसा नंतर गावाची पंचायत भरली आणि संत घीसादास जी आणि भक्त जीताराम जी यांना गाव सोड़ण्याचा हुकुम देण्यात आला. दोघेही गुरू–शिष्य त्वरित गाव सोड़ून लांब असलेल्या एका गावात सत्संग करून लोकांचे प्रबोधन करू लागले. अनेक लोक त्यांचे अनुयायी झाले. संत निघून गेल्यानंतर खेखड़ा गावात अकाली मृत्यु होऊ लागले. पंचायति लोकांच्या घरांवर परमात्माचा प्रकोप सुरु झाला. कुणाच्या चाऱ्याला आग लागली, कोणाची जनावरे मरू लागली, कुणाच्या कुटुंबातील प्रेते बोलू लागली, कुणाची मुलगी विधवा झाली, कुणाला अर्धांगवायूचे झटके आले, गावातील जनावरांमध्ये रोग पसरू लागले. गावात असे का होत आहे असे गावातील काही व्यक्ति भविष्य–पत्रिका पाहणाऱ्या लोकांना विचारून आले. त्यांनी सांगितले की आपल्या गावात जे दोन संत–भक्त राहत होते, ते गाव सोडून गेल्यामुळे असे होत आहे. ते परत आले तर गाव स्वस्थ होईल अन्यथा उध्वस्त होईल. त्या लोकांनी गावात येऊन

पंचायतीत हा सगळा वृत्तांत सांगितला. गावातील प्रतिष्ठित व्यक्ति संत–भक्तांना परत आणण्यासाठी त्या गावात गेले. भक्त जीतादास गुरूजी घीसादास जींना म्हणाले की गुरूदेव! हे लोग आपल्या इथूनही घालवून द्यायला आले आहेत असे वाटते. ते बघा, ते आलेत. संत घीसा दास जी म्हणाले, आवर आपले, चादर ओढून घे, आपण चालू लागू. तेवढ्यात गावाचे चौधरी निकट आले आणि आपापल्या डोक्यावरील फेटे संत घीसा व भक्त जीता जी यांच्या पायांवर ठेवले. सगळे म्हणाले, महाराज जी! चूक झाली आहे. क्षमा करा. तुम्ही इथे आल्यापासून गाव उजाड व्हायला लागला आहे. काहीही करून गावाला वाचवा. नाहीतर आम्ही आता इथून जाणारच नाही. त्या गावातील सगळे लोक एकत्र झाले. सगळी हकीकत लक्षात आली. वर्तमान गावातील लोक म्हणू लागले की चौधरियो! तुम्ही सावरलात, तर आम्ही उध्वस्त होऊ. जेव्हापासून ही दोन देवमाणसे आमच्या गावात आली आहते, तेव्हापासून गावात कुठेही भांडणे नाहीत, दोन वेळा पाउस उत्तम झाला आहे. बघा! पिके कशी डोलताहेत. खेखड़ा गावातील लोकांनी कळकळीची विनंती केली तेव्हा दोन्ही महापुरूषांनी गावात परत येण्यास होकार दिला आणि वर्तमान गावातील लोकांना म्हटले की आम्ही वेळोवेळी इथे येत राहू. प्रत्येक महिन्याच्या पोर्णीमेला तुम्ही खेखडा गावात येत चला. परमात्मा कबीर जी सर्व काही ठीक करतील. दोघेही महापुरुष येताच संपूर्ण गावात संपूर्ण शांतता निर्माण झाली. प्राणी स्वस्थ झाले. दुसऱ्याच दिवशी भरपूर पाउस पडला. शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ३६ जाती/जमातीचे लोक खुश झाले. सगळे उपद्रव बंद झाले. आज पर्यंत त्या गावांमध्ये संत घीसा दास जी आणि भक्त जीता दास जी यांच्या नावाने जत्रा भरतात. संत गरीबदास जींनी म्हटले आहे की :–

गरीब, जिस मण्डल साधु नहीं, नदी नहीं गुंजार।
तज हंसा वह देशड़ा, जम की मोटी मार।।

शब्दार्थ :– ज्या क्षेत्रात महात्मा, गुरुजन नसतात आणि जवळपास नदी वाहत नसते. हे भक्त! त्या ठिकाणास सोडून दे त्या ठिकाणी काल चा भयंकर प्रकोप आहे.

म्हणूनच भक्तजनहो! जेव्हाही ज्या वयात जेव्हा सतगुरु प्राप्त होतात तेंव्हा भक्तिला सुरवात करा. संत गरीबदास जींनी म्हटले आहे की :–

गरीब, चली गई सो जान दे, ले रहती कूं राख।
उतरी लाव चढ़ाईयो, करो अपूठी चाक।।

भावार्थ :– हे मानव! जे आयुष्य सतगुरु मिळाल्याविना संपली आहे, ती तर वाया गेली. त्याची चिंता करने सोडून खऱ्या मनाने उरलेले आयुष्याचे भक्ति करून कल्याण करून घे. भक्ति करावयास सुरुवात केल्यास संसारिक कार्य देखील सोपे होतील. जसे विहरीतून पाणी काढण्याच्या वेळेस दोरी (बादलीला बांधलेली रस्सी) कप्पीतून निसटली असता बादलीला ओढणे अवघड जाते. दोरीला परत काप्पीवर चढवून बादलीला ओढणे सोपे होते. सतगुरु च्या शरणात येण्याच्या अगोदर दोरी (रस्सी) काप्पीतून निघाल्यासारखे असल्याने पाणी काढणे अवघड जात होते. त्याचप्रकारे सर्व काम अवघड होत होते. भक्ति सुरु करताच सर्व काम सहज होऊ लागले जसे दोरी कप्पीवर चढल्यावर पाणी सहजतेने निघत आहे. हा विचार नाही करायचा कि आता आयुष्य कमी राहिले आहे. आता काय भक्ति करणार. जेव्हा सत्संग मधून ज्ञान होईल. तेव्हा त्याच आयुष्यात दृढतेने भक्ति करावयास लागले पाहिजे.

भावार्थ :– जे आयुष्य निघून गेले, त्याची काळजी सोडा आणि उर्वरित आयुष्याचा विचार करा म्हणजेच ते भक्ति, दान–सेवा यात व्यतीत करा. जसे पूर्वीच्या काळी विहिरीवर

शेतात सिंचन करण्यासाठी चामड्याच्या पिशवीचा उपयोग करीत असत. त्यात दोन-तीन क्विंटल पाणी सहज मावायचे. ती लाकडाच्या चक्रावर मोठी दोरी चढवून बांधून खेचत असत. जर दोरी चक्रावरून निसटली, तर वर ओढणे मोठे कठीण असायचे. कसे बसे तिला पुन्हा लाकडाच्या चाकावर चढवल्यावरच मग विहिरीतून पाणी काढणे सोपे जायचे. जो यांच्यापासून लाभ घेण्याचा योग्य प्रकार असे म्हणून अरे माणसा! जरी गुरूना शरण गेलेला नसलास, तर तुझ्या आयुष्याची दोरी घसरली आहे. जीवनातील प्रत्येक कार्य हे संकट बनले आहे. ती आयुष्याची दोरी परत चक्रावर चढव आणि पुन्हा चालव. म्हणजे आयुष्य सुसह्य होईल म्हणजेच गुरुजींना शरण जाऊन आपले जीवन सुसाह्य करा.

## ''वैश्येचा उद्धार''

❖ सत्संग ऐकल्यास जगण्याचा दर्जा सुधारतो :-

परमेश्वर कबीर जी रात्री घरोघर सत्संग करत असत. दिवसा आपल्या निर्वाहासाठी सर्व श्रोते आणि कबीर जी काम करत असत.

एका रात्री सत्संग सुरु होता. थोड्या अंतरावर काशी शहरातील प्रसिद्ध वेश्या चम्पाकली हिचे आलीशान घर होते. त्या रात्रि वैश्येला ग्राहक मिळत नव्हता. त्यामुळे ती त्याची वाट पाहत जागीच होती. त्याच वेळी तिला परमात्मा कबीर जींच्या मुख कमलातून आपल्या सर्वांच्या आवडती अशी अमृतवाणी ऐकू आली. सत्संगात असे सांगत होते की मानव (स्त्री/पुरूष) जीवन मोठ्या पुण्याइने प्राप्त होते. जो स्त्री-पुरूष भक्ति, दान-सेवा करत नाहींत, ते देवाचे चोर आहेत. (गीता अध्याय ३ श्लोक १२ मध्ये देखिल म्हटले आहे की जो माणूस परमात्माकडून प्राप्त धनाच्या भागापैकी काही अंश दान-धर्म केल्याशिवाय स्वतःचेच पोट भरत रहातो, तो तर परमात्माचा चोरच आहे.) जो माणूस चोरी, दरोडा, फसवणूक, वैश्यागमन करत असतो, ते महाअपराधी आहेत. ज्या स्त्रिया वैश्येचा धंदा करतात, त्या देखिल महाअपराधी आहेत. परमात्माच्या दरबारात त्यांना जबर दण्ड केला जाईल. मानव जीवन शुभ कर्म आणि भक्ति करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

कबीर, चोरी जारी वैश्या वृति, कबहु ना करयो कोए।
पुण्य पाई नर देही, ओच्छी ठौर न खोए।।

शब्दार्थ :- हे मानव! चोरी-जारी म्हणजे परस्त्री व्यवहार, वैष्यावृती म्हणजे परपुरुषाशीं पैशाच्या लोभापोटी स्त्रीने संभोग करने हे कोणीही करू नका. हे मानव शरीर (स्त्री-पुरुष) भरपूर पुण्याने मिळाले आहे. यास पाप कार्य करून चुकीच्या ठिकाणी जाऊन नष्ट करू नका. चांगले काम करा, गुरु धारण करून आपले कल्याण करा.

मानव शरीर प्राप्त प्राण्याने सर्व प्रथम पुर्ण गुरूना शरण जाऊन दीक्षा प्राप्त केली पाहिजे. मग आजीवन गुरूच्या मर्यादेत राहून साधना आणिसेवा, दान-धर्म केला पाहिजे. आपले दैनंदिन कार्य देखिल करावे परंतु सर्व वाईट गोष्टींचा त्याग करावा त्यातच त्याचे कल्याण अवश्य होते. अध्यात्म ज्ञानाच्या अभावाने मनुष्य (स्त्री-पुरुष) केवळ धनार्जन एवढेच आपले मुख्य लक्ष्य समोर ठेऊन आपले जीवनाचा प्रवास पूर्ण करतात. जर आपल्याजवळील अब्जावधीपर्यंतची संपत्तीसाठी आटापिटा आणि छळ कपट करून प्राप्त केली असेल आणि अचानक मृत्यु झाल्यास आयुष्यभर प्राप्त केलेली धनसंपत्ती इथेच राहिली, शरीरही इथेच राहिले आणि तुमची पापे मात्र तुमच्यासोबत आली. या पुर्ण आयुष्यात माया गोळा करण्यासाठी

**जे पाप केले ते बरोबर गेले.**

काया तेरी है नहीं, माया कहाँ से होय।
गुरू चरणों में ध्यान रख, इन दोनों को खोय।।
कबीर, सब जग निर्धना, धनवंता ना कोय।
धनवान वह जानिये, जापे राम नाम धन होय।।

**भावार्थ :– म्हटले आहे की ज्या शरीराला रोगमुक्त करण्यासाठी माणूस आपली संपत्ति देखिल विकून उपचार करवतो आहे, ते शरीर देखिल तुमच्या सोबत येणार नाही, मग मायेची गोष्टच काय करतात? पूर्ण गुरूजी कडून अनुग्रह घेऊन दिवस–रात्र भक्ति कर. गुरूजींनी दिलेल्या ज्ञानाच्या आधारावर जीवनाच्या दाखवून दिलेल्या मार्गावर वाटचाल कर. काया आणि माया यांचा मोह सोडून भक्ति धन संग्रह कर.**

**हे मानव! मानव का पिछला इतिहास देख ले।**

सर्व सोने की लका थी, रावण से रणधीरं।
एक पलक में राज नष्ट हुआ, जम के पड़े जंजीरं।।
गरीब, भक्ति बिना क्या होत है, भ्रम रहा संसार।
रती कंचन पाया नहीं, रावण चली बार।।

**भावार्थ :– संत गरीबदास जींनी देखिल भक्ति शिवाय जीवाचा कोणताही लाभ होणार नाहीं याला दुजोराच दिला आहे. माया जोड़ण्यासाठी आयुष्यभर भटकत राहतो. श्रीलंकेचा राजा रावण याच्या जवळ अपार धन, सोने होते, परंतु प्रपंच मागे त्याग करते वेळी एक गुंज सोने देखिल सोबत घेऊन जाऊ शकला नाहीं. खऱ्या परमात्माची खरी भक्ति न केल्यामुळे यमदूत हातकड्या अडकवून यमराजांकडे घेऊन गेले. नरकात टाकले. म्हणून हे मानव! अशुभ कर्मापासून घाबरून रहा. गुरूना शरण जाऊन खरी भक्ति कर.**

**शंका समाधान करताना परमेश्वर कबीर जी यांनी सत्संगामध्ये म्हणाले की आध्यात्मिक ज्ञान नसल्याकारणाने चांगल्या लोकांकडून देखिल पापे झालेली आहेत. जेव्हा त्यांनी सत्संग श्रवण केले तेव्हा सर्व अपराध त्यागून व भक्ति करून आपले कल्याण करून घेतले आहे. परमात्मा कबीर जी पुढे सांगितले की माझ्याजवळ साधना करण्याचे असे यथार्थ मंत्र आहेत, जे सर्व पापे नष्ट करतात. पुण्याची बचत करतात. (जसे वर्तमानात वैज्ञानिकांनी असे औषध शोधून काढले आहे, जे शेतात टाकल्यास गवत आणि नको असलेली झुडपे नष्ट करून पिक सुरक्षित ठेवतात.) हे मंत्र मी आपल्या लोकातून घेऊन आलो आहे.**

सोहं शब्द हम जग में लाए। सार शब्द हम गुप्त छिपाए।।

**शब्दार्थ :– शब्दार्थ वरती केलेला आहे.**

**(ऋग्वेद मण्डल ९ सूक्त ९५ मंत्र २ मध्ये देखिल असे प्रमाण आहे की परमात्मा या संसारात प्रत्यक्ष प्रकट होऊन आपल्या अमृतवाणी द्वारे मुक्तिच्या खऱ्या मार्गाची प्रेरणा देत असतो. तोच परमात्मा सर्व देवतांचा देव म्हणजेच सगळ्यांचा परमात्मा भक्तिच्या गुप्त नावांचा आविष्कार करत असतो.) जरी कोणी महापापी असला, तरीही खरी साधना करू लागल्यास आणि भविष्यात कोणतेही पाप न केल्यास त्याची सर्व पापे समाप्त होतात आणि भक्ति करून तो आपले कल्याण करवून घेऊ शकतो.**

**उपरोक्त अमृतवचन ऐकून ती भगिनी वैश्या जणू गाढ निद्रेतून जागी झाली. थरथर**

कापू लागली. घराला कुलूप ठोकून तत्पर सत्संगाच्या स्थळी आली. मागेच स्त्रियांमध्ये बसली. सत्संग समाप्त झाल्यावर, ज्यांना अनुग्रह घेण्याची इच्छा असेल त्यांनी पुढे श्रीगुरुंजवळ जावे असे आवाहन करण्यात आले. काही स्त्री आणि पुरूष उठून पुढे गेले. ती वैश्या देखिल आली आणि गुरूदेवजींना आपला परिचय दिला आणि सांगितले की मी तर ४० वर्षात प्रथमच असे शब्द ऐकले आहेत. हे परमात्मा! माझ्यासारखी पापिणी आपले कल्याण करून घेऊ शकते काय? तसे तर तुम्ही सर्व उपासना सत्संगात सांगितली आहे परंतु जेव्हा आपल्या घृणित जीवनाकडे मागे वळून पाहते, तेव्हा लाज वाटते आणि विश्वास नाहीं वाटत की माझ्यासारख्या अपराध्याला देखिल क्षमा होईल. परमेश्वर कबीर जी ने म्हटले की :-

कबीर, जब ही सत्यनाम हृदय धरा, भयो पाप को नाश।
जैसे चिनंगी अग्नि की, पडै पुरानै घास।।

भावार्थ :- जसे करोड़ो टन कोरड्या गवताच्या गंजीवर एक काडी पेटवून टाकल्यास ती संपूर्ण गंजी बेचिराख करून टाकते आणि नंतर हवा चालल्यास ती राख देखिल उडून जाते. सगळेच काम तमाम झाले. त्याच प्रकारे करोड़ों जन्मांचे पाप का असेना, माझा पूर्ण मंत्र जपल्यास त्या पापाची राख होऊन जाईल. भविष्यात कोणतीही चूक करू नकोस, तुझे कल्याण होइल.

(यजुर्वेदाच्या अध्याय ८ मंत्र १३ मध्ये देखिल असाच दाखला आहे की परमात्मा आपल्या भक्तांच्या (एनसः एनसः) घोर पापांचा देखिल नाश करतो. जीवाचे कल्याण करतो).

त्या भगिनीने पापकार्य म्हणजेच वैश्या धंद्याचा त्याग केला. परमात्मा कबीर जी कडून अनुग्रह घेऊन व मर्यादा पालन करून आजीवन साधना करून चम्पाकलीने मोक्ष प्राप्त केला.

## ''रंका-बंकाची गोष्ट''

परमेश्वर कबीर जींना चम्पाकलीने विचारले की हे परमेश्वर! या पापाच्या संपत्तिचे आणि रूपयांचे मी काय करू? परमेश्वर कबीर जी म्हणाले की बेटी! हे नरकाचे धन दान करून टाक. घरी जाऊन चम्पाकलीने विचार केला की जरी सर्व धन दान केले तर मी खाणार काय? अजून कोणतेच काम नाही मला. चम्पाकली सत्संगात अधिक वेळ जाऊ लागली. एक दिवस सत्संगात असे सांगितले की :-

रंका (पुरूष) आणि बंका (स्त्री) परमात्माचे परम भक्त होते. तत्वज्ञान व्यवस्थित समजले होते. त्याच्याच आधाराने आपले जीवन व्यतीत करीत होते. त्यांना एक अंबका नावाची मुलगी होती. (अंबिकास अबंका म्हणत होते.) एक दिवस भक्त नामदेव आपल्या गुरूजींना म्हणाले की गुरूदेव! आपले भक्त रंका व बंका खूपच गरीब आहेत. त्यांना तुम्ही काही धन द्या, म्हणजे ते जंगलातील लाकडे आणून शहरात विकतील आणि आपला निर्वाह करण्यासाठी गरज पडणार नाही. दोघेहि जंगलात जातात. लाकड़े मोळी बांधून आणत आहेत. भोजन मोठ्या मुश्किलीने मिळते. गुरूदेव म्हणाले, अरे दादा! मी किती तरी वेळा पैसे देण्याचा प्रयत्न केला आहे, पण हे सगळे दानच करून टाकतात. दोन-तीन वेळा तर मी स्वतः वेश बदलून लाकड़े घेणारा म्हणून गेलो आहे. त्यांच्या लाकडांची किंमत इतरांपेक्षा शंभरपट जास्त होती. त्यांचे लाकडे रोज दोन-दोन आण्यात विकली जात होती. मी त्यांना दहा रूपये देऊन खरेदी केली. त्यांनी चार आणे ठेऊन घेतले व उरलेले रूपये मला सत्संगात दान केले. आता तुम्ही सांगा, कसे पैसे देऊ यांना? भक्त नामदेवजींनी परत आग्रह केला की आता धन देऊन

बघा, अवश्य घेतील. ज्या रस्त्यावरून रंका–बंका लाकडे घेऊन जंगलातून येत असत, त्या रस्त्यावर गुरूजी आणि नामदेव जी गेले आणि गुरूजींनी रस्त्याच्या मध्येच सोन्याचे लाखो रुपयांचे खूप दागिने ठेऊन दिले. नामदेव आणि गुरूदेव एका झाड़ाच्या मागे लपून पाहत होते. रंका लाकडे डोक्यावर घेऊन पुढे पुढे चालत होता आणि त्याच्या मागे बंका लाकडे घेऊन दोनशे फुट अंतर ठेऊन चालत होती. भक्त रंकाजीनि पहिले की सोन्याचे दागिने अमूल्य आहेत. आणि बंका स्त्रीजातीची असल्यामुळे, ते दागिने पाहून तिला त्यांचा मोह सुटेल आणि आपले धर्म–कर्म मातीत घालेल. म्हणून त्याने पायांनी त्या सर्व दागिन्यांवर माती टाकायला सुरवात केली. भक्तमति बंकादेखिल परम गुरुंचीच शिष्या होती. तिने पाहिले की पतिदेव दागिन्यांवर माती टाकत आहेत. ती त्यांचा हेतू समजून गेली. आवाज देऊन म्हणाली की चला भक्तजी! कशाला मातीवर माती टाकता आहात. बंका जी समजून गेले की ही निग्रहाची पक्की आहे, कच्ची नाही. दोघेही ती लाखोंची संपत्ती ओलांडून गावाकडे पुढे निघून गेले. गुरूजी म्हणाले की बघितलेस नामदेवा! भक्त असावेत तर असे.

एक दिवस गुरूजी संध्याकाळी ४ वाजता सत्संग करत होते. सत्संगाच्या ठिकाणापासून रंकाजीची झोंपड़ी चारशे एकरच्या अंतरावर होती. रंका आणि बंका दोघेही सत्संग श्रवण करायला आले होते. त्याची मुलगी अबंका (वय १९ वर्ष) झोंपड़ीच्या बाहेर ठेवलेल्या खाटेवर बसली होती. झोंपड़ीलाआग लागली. सर्व सामान जळून गेले. अबंका धावत धावत आली आणि पहिले तर सत्संग चालला होता. गुरूजी सत्संग ऐकवत होते. श्रोते अगदी विशेष लक्ष देऊन सत्संग श्रवण करीत होते. निस्सीम शांतता होती. अबंका जोरजोरात म्हणाली की आई! झोंपड़ीला आग लागली आहे. सर्व सामान जळाले आहे. आई उठली आणि मुलीला एका बाजूला घेऊन गेली आणि विचारले की काय राहिले आहे? मुलगी अबंकाने सांगितले की फक्त एक खाट तेवढी बाहेर होती, ती शिल्लक आहे. भक्त रंकादेखिल उठून आला. दोघांनीही म्हटले की मुली! ती खाट देखिल आगीत स्वाहा करून ये आणि इथे सत्संग ऐकायला बस. झोपडी नसती तर आग नसती लागली, आणि आग नसती लागली तर सत्संगातील आनंद भंगला नसता. अबंका गेली आणि खाट झोपड़ीला लागलेल्या आगीत टाकून सत्संग श्रवण करायला येऊन बसली. सत्संग संपल्यावर घरी गेले. त्यावेळचे जेवण सत्संगात केले होते. रात्री जळलेल्या झोपड़ीच्या जवळ एका झाडाखाली बिछाना न टाकताच झोपले. भक्ति करण्यासाठी म्हणून वेळ झाल्यावर उठले तर काय, ते एका सुंदर झोपडीत झोपले होते आणि सगळी भांडी तिथे होती आणि कणिक–धान्य–डाळी भरून सगळे मातीचे रांजण भरलेले होते. त्याच वेळी आकाशवाणी झाली की भक्त परिवार! ही परमात्माची कृपा आहे. आपण याच झोपडीत राहण्याची आपल्याला गुरूदेवांची आज्ञा आहे. तिघेही म्हणाले की जशी आज्ञा गुरूदेव! सूर्योदय झाल्यावर गावातील सर्व लोक बघून आश्चर्यचकीत झाले की गावातील जी झोपड़ी दूसऱ्या वृक्षाजवळ घातली होती, ती जुनी जळून खाक झाली आणि तिची राख पडली होती, एका आठवड्याच्या आत नवीन झोपडी कशी काय उभारली गेली? सगळ्यांचे हे म्हणणे पडले की हा यांच्या गुरुजींचा चमत्कार आहे. गावातील लोकांनी हे पाहिले आणि गुरूजीचा अनुग्रह घेण्याचा त्यांनी संकल्प करायला लागले. हजारो नगरवाशीयांनी अनुग्रह घेतला. (ही सगळी लीला परमेश्वर कबीर जींनी काशी शहरात प्रकट होण्याच्या आधी जवळ जवळ दोनशे वर्ष आधी केली होती. त्यावेळी भक्त नामदेवजींना अनुग्रह दिला होता.)

उपरोक्त कथा प्रसंग ऐकून भक्तमति चम्पाकलीच्या मनातील भीती संपुष्टात आली. आणि सर्व सम्पत्ति आणि धन परमात्मा कबीर गुरूजींना समर्पित केले. परमात्मा म्हटले की

मुली! जेव्हा तूच माझी झालीस, तर तुझी सम्पत्ति देखिल आपोआप माझी झाली. या माझ्या सम्पत्तिमधून तुझ्या चरितार्थासाठी आवश्यक तेवढी ठेऊन घे आणि उरलेली दान करत रहा. भक्तमति चम्पाकलीने तसेच केले. घर ठेऊन घेतले आणि बहुतांशी रूपये गुरूजींच्या आज्ञेनुसार भोजन-प्रसादासाठी (लंगर) दान केले.

## ''कबीर जी कडून शिष्यांची परीक्षा''

बंदी छोड परमेश्वर कबीर जींनी अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखविल्याने प्रभावित होऊन चौसष्ठ लाख शिष्य झाले होते. परमेश्वर कबीर जी तर भूत-भविष्य आणि वर्तमान सगळेच जाणतात. त्यांना माहित होते की हे सगळे चमत्कार पाहून आणि यांना माझ्या आशीर्वादाने मिळालेल्या भौतिक सुखांच्या मुळे हे सगळे माझा जयजयकार करत आहेत. मी परमात्मा आहे, यावर यांचा कोणाचाच विश्वास नाहीं. परंतु समोर आल्यावर अवश्य म्हणतात की आमचे गुरु कबीर जी तर स्वतःच परमात्मा आहेत. आपल्याला झालेले लाभही सांगतात. एक दिवस परमेश्वर कबीर जी शिष्यांची परीक्षा घ्यायची ठरवतात की बघूया कोणाला किती ज्ञान समजले आहे ते. जर यांना विश्वासच नसेल तर हे मोक्षाचे अधिकारी नाहीत. मग हे तर माझ्या डोक्यावरच व्यर्थ भार आहेत. असा विचार करून त्यांनी एक योजना आखली. आपल्या परम शिष्य रविदास यांना म्हटले की एक हत्ती भाड्याने आणा.

काशी नगरात एक सुंदर वैश्या होती. तिच्या घरापासून थोडेच लांब कबीर जींच्या एका भक्ताचे घर होते. कबीर जी त्याच्या घरातील अंगणात रात्रिच्या वेळेस सत्संग करत होते. त्या दिवशी त्या वेश्येकडे गिऱ्हाईकच नव्हते. त्यामुळे सत्संगातील उपदेश श्रवण करण्यासाठी तिच्या घराच्या गच्चीवर जाऊन खुर्चीत बसली होती. पूर्ण रात्रभर झालेंला सत्संग श्रवण केला आणि सकाळी उजाडल्यावर सत्संगाच्या ठिकाणी गेली आणि आपला परिचय दिला. आणि म्हटले की गुरूजी! माझ्यासारख्या पापिणीचा उद्धार होऊ शकतो का? मी आपल्या आयुष्यात प्रथमच हे आत्मकल्याणाचे विचार ऐकले आहेत. आता माझ्या जवळ दोनच पर्याय आहेत. एकतर माझे कल्याण होऊदे, किंवा मी आत्महत्या करून पापांचे प्रायश्चित करणे. परमात्मा कबीर जी म्हणाले, मुली! आत्महत्या करणे हे महापाप आहे. भक्ति केल्यास परमात्मा सर्व पाप नष्ट करतात. तू माझ्याकडून अनुग्रह घेऊन साधना कर आणि भविष्यात कोणतेही पाप न करण्याची काळजी घे. पापापासून जपून रहा त्या भगिनीने प्रतिज्ञा केली आणि परमात्मा कबीर जी कडून अनुग्रह घेऊन भक्ति करायला लागली आणि जिथे कुठे प्रभु कबीर जीचा सत्संग असेल, तिथे सत्संग श्रवण करण्यास जाऊ लागली. त्यामुळे कबीर जींच्या भक्तांना तिचे सत्संगात येणे रुचत नव्हते. ते त्या मुलीला सांगायचे की तुझ्यामुळे गुरूजीची अकारण बदनामी होते आहे. तू सत्संगात येऊ नकोस. तू सर्वात पुढे गुरूजींच्या जवळ बसतेस, तिथे नको बसत जाउस. त्या मुलीने ही गोष्ट तिचे गुरू कबीर जींना सांगितले आणि जोरजारोत रडायला लागली. परमेश्वर कबीर जी तिला म्हणाले की मुली! तू सत्संगात येत जा. कबीर जींनी सत्संगात दृष्टांत देऊन स्पष्ट केले की मळलेले कापड साबण आणि पाण्यापासून दूर राहून कसे स्वच्छ राहू शकेल. त्याच प्रकारे पापी व्यक्ति सत्संग आणि गुरू यांच्यापासून लांब राहून आत्म कल्याण कसे करून घेणार आहे? भक्त वैश्या आणि रोगी यांचा तिरस्कार करीत नाहीत, त्यांचा उचित सन्मान ठेवतात. त्याला ज्ञान चर्चा करून मोक्ष प्राप्तिची प्रेरणा देतात. परमात्मा कबीर जींनी वारंवार समजावून देखिल भक्तजन त्या मुलीला सत्संगात येण्यापासून परावृत्त करत आणि कारण काय तर तिच्यामुळे गुरूजींची काशीत बदनामी होते. काशीमधील

लोक आम्हाला सारखे म्हणतात की तुमच्या गुरूजींकडे वैश्या देखिल जातात. असा कसा हा गुरू आहे.

कबीर जी त्या मुलीला म्हटले की मुली! तू माझ्या सोबत हत्तीवर बसून येशील का? मुलगी म्हणाली जशी आपली आज्ञा गुरूदेव! दुसऱ्या दिवशी साधारण १०.०० वाजता हत्तीवर बसून तिघेजण काशी नगराचं मुख्य बाजारातून जायला लागले. संत रविदास जी हत्तीवर सारथ्य करीत होते. ती मुलगी रविदास जींच्या मागे आणि कबीर जींच्या पुढे म्हणजेच दोघांच्या मध्ये बसली होती. कबीर जींनी गंगेच्या पाण्याची एक बाटली सोबत घेतली होती आणि ती तोंडाला लावून घोटघोट पीत होते. लोकांना वाटले की कबीर जी दारू पिताहेत आणि त्या नशेतच एका वैश्येला उघडपणे बाजारात फिरत आहेत. काशीमधले लोक एकमेकांना सांगत होते की बघा! मोठमोठे उपदेश देत असतो हा कबीर विणकर, आज याचे सगळे पितळ उघडे पडले आहे. हे लोक सत्संगाच्या नावाखाली अशी कर्मे करत असतात. काशीतले लोक कबीर जींच्या शिष्यांना पकडून-पकडून आवर्जून दाखवत होते की बघा तुमच्या परमात्माचे उद्योग! दारू पितोय, वैश्ये सोबत उघडपणे हिंडतोय! हे सगळे बघून चौसष्ट लाख तोतया शिष्य कबीर जींना सोडून निघून गेले. पूर्वीची साधना करायला लागले. लोकलाजेस्तव गुरुविन्मुख झाले.

ज्या वेळेस दिल्लीचा सम्राट सिकंदर लोधी काशी नगरीत मुक्कामाला असेल, तेव्हा परमात्मा कबीर जी असे जानून-बुजुन काहीतरी करीत असत. त्या वेळेस सिकंदर लोधी राजा काशीमध्ये आला होता. काजी आणि पंडितांनी राजाकडे तक्रार केली की कबीर विणकर गुन्हे करतो आहे. लाजलज्ञा गुंडाळून ठेऊन वैश्ये सोबत उघडपणे हिंडतोय आणि हत्तीवर बसून अश्लील चाळे करतो आहे आणि दारू पितो आहे. राजाने त्वरित पकडून गंगेत बुडवून मारण्याचे आदेश दिले. राजा सिकंदर याने आपल्या हाताने हातात हातकड़ी आणि पायात बेड़ी आणि गळ्यात लोखंडाची गोल सळई लावली. नौकेत बसवून गंगा नदीच्या प्रवाहाच्या मध्यभागी नेऊन नदीत नेऊन शिपायांनी टाकून दिले. हातकड्या, बेड्या आणि गळ्यातील गोल सळई आपोआप तुटून पाण्यात पडून गेल्या. परमात्मा पाण्यावर पद्मासन घालून बसले. नदीचा प्रवाह त्यांना वळसा घालून वाहत होता. परमात्मा पाण्यावर निवांत बसले होते. काही वेळानंतर परमात्मा कबीर जी गंगा नदीच्या किनाऱ्यावर आले. शिपायांनी शेखतकीच्या राज्याचा पीर आदेशावरून कबीर जी परत पकडून नौकेत बसवून त्यांच्या पायांना आणि कंबरेला जाड दगडांनी बांधून हातांना दोरीने मागे बांधून. गंगा नदीच्या पात्रात मध्यभागी फेकून दिले. दोऱ्या तुटल्या आणि दगड पाण्यात बुडाले, पण परमेश्वर कबीर जी पाण्यावर आपले बसलेलेच. जेव्हा कबीर गंगा नदीत बुडत नाहीत हे बघितले, तेव्हा संतापून शेख तकीने राजाला सांगून तोफेचे गोळे मारण्याचे हुकुम दिले. आधी कबीर जींना दगड, गोळ्या, तीर मारल्या, शेवटी चार प्रहर म्हणजे बारा तास तोफांचे गोळे कबीर जींवर डागले. एक गोळा किनाऱ्यावरचा पडायचा, एक गोळा दुसऱ्या किनाऱ्यावर पडायचा, एक गोळा तलावात जाऊन पडायचा, पण एकही गोळा , दगड किंवा बंदूकीची गोळी किंवा बाण परमेश्वर कबीर जींच्या आसपास देखिल गेला नाही. इतके सगळे बघून देखिल काशीचे लोक परमेश्वर कबिरांना ओळखू शकले नाहीत. तेव्हा परमेश्वर कबीर जींनी बघितले की हे सगळे निर्बुद्ध आहेत. त्याच वेळेस ते गंगेच्या प्रवाहात विलीन झाले आणि आपला भक्त रविदास जींच्या घरी प्रकट झाले. पाहणाऱ्यांची खात्री झाली की कबीर विणकर गंगेत बुडून मरण पावला आहे. त्याच्यावर वाळु आणि गाळ जमा झाली असेल असे समजून सगळे आनंदाने नाचू लागले आणि नाचत व उड्या मारतच गावात परत गेले. शेखतकी आपल्या सोबतच्या मंडळींना घेऊन

संत रविदास जींच्या घरी हे सांगण्यासाठी गेला की ज्या कबीर जींना तुम्ही परमात्मा समजत होतात, ते बुडून मरण पावले आहेत. संत रविदास जींच्या घरी जाऊन पाहतो तर काय, कबीर जी एकतारी घेऊन परमेश्वर स्तुती गात होते. शेखतकीला त्याची आई मेल्यासारखे झाले. राजा सिकंदराकडे जाऊन त्याने सांगितले की तो आपली नजर चुकवून पळून गेला आणि रविदासांच्या घरी बसला आहे. हे ऐकून बादशाह सिंकदर लोधी संत रविदास जींच्या झोपडीत गेला. परमात्मा कबीर जी तिथून अंतर्धान पावून गंगा नदीच्या पाण्याच्या प्रवाहाच्या मध्यभागी समाधी अवस्थेत जमिनीवर बसावे तसे बसलेले होते. रविदासना विचारले की कबीर जी कुठे आहेत? संत रविदास जी म्हणाले हे बादशाहजी! ते संपूर्ण परमात्मा आहेत. तेच अलख अल्लाह आहेत. तुम्ही यांना ओळखा. ते आपल्या मर्जीचे मालक आहेत. पाहिजे तिथे जाऊ शकतात. मला नाही माहित, कुठे गेलेत ते? ते तर सर्वांच्या सोबतच असतात. त्याच वेळी कोणीतरी सांगितले की कबीर जी तर गंगा नदीच्या मध्ये बसून भक्ति करत आहेत. सगळे लोक आणि राजा व शिपाई गंगा नदीच्या किनारी पुन्हा गेले. राजाने नौका पाठवून नावाड्याद्वारे पाण्याबाहेर येण्यासाठी निरोप पाठविला की बाहेर यावे. नावाड्याने नौका कबीर जींच्या जवळ नेऊन सिकंदर बादशाह आपली आठवण करताहेत असा राजाचा आदेश ऐकवला. आपण चलावे. परमेश्वर कबीर जी त्या मोठ्या नौकेत बसून किनाऱ्यावर आले. राजा सिकंदराने परत पकडून आणि हात-पाय बांधून रक्तपिपासू हत्तीकडून मारण्याची आज्ञा केली. चारही बाजूने लोक उभे होते. सिकंदर ऊंच जागी बसला होता. परमात्मा कबिरांना बांधून जमिनीवर ठेवले होते. माहुताने ने हत्तीला दारू पाजली आणि कबीर जींना चिरडून मारण्यासाठी कबीर जींच्या दिशेने पुढे सरकला. कबीर जींनी आपल्या जवळ एक बब्बर सिंह उभा केला होता. आणि तो फक्त हत्तीलाच दिसत होता. घाबरून हत्ती परत फिरत होता. माहुताला त्याच्या नोकरी जाण्याची भीती वाटू लागली. हत्तीला भाल्याने मारून-मारून कबीर जींच्या दिशेने घेऊन जाऊ लागला. परंतु हत्ती उलटा मागेच पळत होता. तेव्हा माहुतालादेखिल सिंह उभा असलेला दिसला. तेव्हा भीतीमुळे त्याच्या हातातील अंकुश गळून पडला. हत्ती पळून गेला. परमेश्वर कबीर जींची सर्व बंधने गळून पडली आणि कबीर जी उभे राहिले. आणि शरीराचे आळोखे विळोखे दिले (अंगडाई) त्यांचे आकार वाढले. डोके आकाशाला टेकत असल्याचे दिसू लागले. प्रकाशमान शरीर दिसु लागले. सिकंदर राजा भितीपोटी थरथर कापत परमेश्वर कबीर जींच्या पाया पडला, क्षमायाचना केली आणि म्हटले की आपण परमात्मा आहात. मला वाचवा. माझ्याकडून मोठी चूक झाली आहे. आपण स्वतः पृथ्वीवर अल्लाहच्या रूपाने आला आहात. तेव्हा परमेश्वर कबीर जी काशी नगरात गेले आणि त्या वेश्येच्या घरासमोरील चौकात बसले. ती मुलगी परमात्माचे पाय दाबत होती. परमेश्वर कबीर जीचे पाय आपल्या मांडीवर ठेवले होते.

**टीप : या वाणींचा शब्दार्थ वरती संक्षिप्त मध्ये केला आहे.**

फिर गणिका कै संग चले, शीशी भरी शराब। गरीबदास उस पुरी में, जुलहा भया खराब।।७२६।।
तारी बाजी पुरी में, भिष्ट जुलहदी नीच। गरीबदास गनिका सजी, दहूं संतौं कै बीच।।७२७।।
गावत बैंन बिलासपद, गंगाजल पीवंत। गरीबदास विह्वल भये, मतवाले घूमंत।।७२८।।
भड़ुवा भड़ुवा सब कहैं, कोई न जानैं खोज। दास गरीब कबीर करम, बांटत शिरका बोझ।।७२९।।
देखो गनिका संगि लई, कहते कौंम छतीस। गरीबदास इस जुलहदी का, दर्शन आन हदीस।।७३०।।
शाह सिकंदर कूं सुनी, भिष्ट हुये दो संत। गरीबदास च्यारों वरण, उठि लागे सब पंथ।।७३१।।
च्यारि वरण षट आश्रम, दोनौं दीन खुशाल। गरीबदास हिंदू तुरक, पड़्या शहर गलि जाल।।७३२।।

शाह सिकंदरकै गये, सुनि कबले अरदास। गरीबदास तलबां हुई, पकरे दोनौं दास।।७३३।।
कहौ कबीर यौह क्या किया, गनिका लिन्हीं संग। गरीबदास भूले भक्ति, पर्‌या भजन में भंग।।७३४।।
सुनौं सिकंदर बादशाह, हमरी अरज अवाज। गरीबदास वह राखिसी, जिन यौह साज्या साज।।७३५।।
जड़ियां तौंक जंजीर गल, शाह सिकंदर आप। गरीबदास पद लीन है, तारी अजपा जाप।।७३६।।
हाथौं जड़ी हथकड़ी, पग बेड़ी पहिराय। गरीबदास बीच गंग में, तहां दीन्हा छिटकाय।।७३७।।
झड़ि गये तौंक जंजीर सब, लगै किनारै आय। गरीबदास देखै खलक, स्यौं काजी बादशाह।।७३८।।
नीचै नीचै गंगाजल, ऊपर आसन थीर। गरीबदास बूड़े नहीं, बैठे अधर कबीर।।७३९।।
योह अचरज कैसा भया, देखैं दोनौं दीन। गरीबदास काजी कहैं, बांधि दिया जल सीन।।७४०।।
गल में फांसी डारि करि, बांधौ शिला सुधारि। गरीबदास यौह जलहदी, जब बूड़ै गंगधार।।७४१।।
शिला धरी जब नाव में, बांधी गलै कबीर। गरीबदास फंद टूटि कै, ना डूबै जलनीर।।७४२।।
शिला चली शाह और कौं, देखत काशी ख्याल। गरीबदास कबीर का आसन अधर हमाल।।७४३।।
तीर बाण गोली चलैं, तोप रहकल्यौं शोर। गरीबदास उस जुलहदीकै, गई एक नहीं ओर।।७४४।।
अधर धार गाले बहैं, जलकै बीच गभाक। गरीबदास उस जुलहदी पर, शस्त्रा छूटैं लाख।।७४५।।
तोप रहकले सब चलै, तीर बाण कमान। गरीबदास वह जलहदी, जल पर रहै अमान।।७४६।।
अधरि धार अपार गति, जल परि लगी समाधि। गरीबदास निज ब्रह्मपद, खेलैं आदि अनादि।।७४७।।
जुलम हुआ बूड़े नहीं, शस्त्रा लगै न बाण। गरीबदास इब कौंन गति, कैसैं लीजै प्राण।।७४८।।
लगी समाधी अगाध में, बिचरै काशी गंग। गरीबदास किलोल सर, छूहैं चरण तरंग।।७४९।।
च्यारि पहर गोले बगे, धमी मुलक मैदान। गरीबदास पोखर सुखैं, रहे कबीर अमान।।७५०।।
अपनी करनी सब करी, थाके दोनौं दीन। गरीबदास अब जुलहदी, पैठि गये जलमीन।।७५१।।
डूब्या डूब्या सब कहैं, हो गये गारत गोर। गरीबदास कबले धनी, तुम आगै क्या जोर।।७५२।।
आनंद मंगल होत है, बटैं बधाई बेग। गरीबदास उस जुलहदी पर फिर गई रेती रेघ।।७५३।।
हस्ती घोडे चढत हैं, पान मिठाई चीर। गरीबदास काशी खुसी, बूडे गंग कबीर।।७५४।।
जावो घरि रैदासकै, हिलकारे हजूर। गरीबदास खुसिया कहौ, कहियो नहीं कसूर।।७५५।।
झालरि ढोलक बजत हैं, गावैं शब्द कबीर। गरीबदास रैदास संगि, दोनौं एकही तीर।।७५६।।
काजी पंडित सब गये, शाह सिकंदर उठ। गरीबदास रैदासकै, भेष गये जटजूट।।७५७।।
कोठी कुठले सब झके, बासन टींडर गोलि। गरीबदास रहदास सुनौं, कहां गये वह बोल।।७५८।।
वे प्रगट पूरण पुरूष हैं, अबिनाशी अलख अल्लाह। गरीबदास रैहदास कहैं, सुनौं सिकंदर शाह।।७५९।।
रजमुखी सुभांन सर, खिले फूल गुलजार। गरीबदास काजी पंडित करता शाह पुकार।।७६०।।
शाह सिकंदर फिर गये, उस गंगा कै तीर। दास गरीब कबीर हरी, बैठे ऊपर नीर।।७६१।।
बैठि मलाह जिहाज में, गये धार कै बीच। गरीबदास हरि हरि करैं, प्रेम फुहारे सीच।।७६२।।
करी अरज मलाह तहां, दीन दुनी बादशाह। गरीबदास आसन उधर, लगी समाधि जुलाह।।७६३।।
भंवर फिरत हैं गंग जल, फूल इगानें कोटि। गरीबदास तहां बंदगी, हरिजन हरि की ओट।।७६४।।
संकल सीढी लाय करि, उतरे तहां मलाह। गरीबदास हम बंदगी, याद किये बादशाह।।७६५।।
बैठ कबीर जहाज में, आये गंगा घाट। गरीबदास काशी थकी, हांडे बौह बिधि बाट।।७६६।।

**शब्दार्थ :- वाणी क्रं ७२६-७३० चा शब्दार्थ :- परमात्मा कबीर जींनी शिष्याची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने एका बाटलीत गंगा नदीचे पाणी भरले. काशी शहरातील प्रसिद्ध वैश्या आणि रविदास संत जी यांच्या बरोबर हत्तीवर बसून काशी शहरातील मुख्य बाजारातील गल्लीमध्ये फिरू लागले. बाटलीला तोंड लावून पाणी पीत होते परंतु असे दाखवत होते कि दारू**

पीत आहेत. रविदासजी हत्ती चालवत होते. पाठीमागे वैश्या बसली होती. वैश्याच्या पाठीमागे कबीर जी वैश्या च्या गळ्यात हाथ टाकून प्रेमी सारखा अभिनय करत होते. काशी शहरातील व्यक्ती हे पाहून हातांनी टाळ्या वाजवू लागले आणि म्हणू लागले कि पहा कबीर जी खालच्या जातीचा विणकर वैश्यास बरोबर घेऊन दारूच्या नशेत वैश्याच्या गळ्यात हाथ टाकून मतलबी होऊन फिरत आहे. परमात्मा कबीर जी भक्तिच्या शब्द-कविता गात होते व डुलत होते. जनता समजत होती कि गाणी म्हणत आहे व अभद्र पद्धतीने वैश्यास चिटकून बसला आहे. याने लोकलाज देखील सोडली आहे. काशी शहरातील सर्व नागरिक कबीर जींना भडवा-भडवा म्हणजे व्याभिचारी-व्याभिचारी म्हणू लागले. परंतु या रहस्यास कोणी समजू शकले नाही कि परमात्मा कबीर जी सतगुरु रुपात अनेक शिष्यांना दीक्षा दिली आहे. त्यांच्या पापांचा भार आपल्या डोक्यावर घेतला होता. शिष्य गुरु आज्ञाचे पालन करत नव्हते. त्यांच्या बोज्यातून मुक्त होत होते. शिष्यगण हि लीला पाहून नामदिक्षा त्यागून कबीर जी पासून दूर गेले होते. त्यांचे सत्संग विचार देखील ऐकण्यासाठी सत्संगास जाणे सोडले होते. जेवढ्या शिष्यांनी नाम सोडले. त्यांचा बोज कबीर जींच्या डोक्यावरून उतरला. काशी शहरातील छत्तीस जातीचे व्यक्ती म्हणत होते कि पहा गणिका (वैश्यास) बरोबर घेऊन चालला आहे. या विणकर कबीर जींच्या दर्शनाने देखील पाप लागते.

वाणी क्रं ७३१-७५४ चा शब्दार्थ :- त्या दिवसात दिल्ली चा राजा सिकंदर लोधी काशी शहरात थांबला होता. काशी शहराचे नरेश बिरदेव सिंह बघेल देखील सिकंदराच्या आधीन होते. परमात्मा कबीर जी देखील अनोखी लीला त्याच वेळी करत होते ज्या वेळी दिल्ली चा राजा सिकंदर काशी शहरात आला होता. परमेश्वरास माहित होते कि जेवढे मानव ज्या ज्या धर्मात आहे तसेच अन्य जीव हे सर्व आपलीच मुले आहेत. त्यांच्याच वचनाने उत्पन्न आहेत. वडील होण्याच्या नात्याने परमेश्वर कबीर जी देखील आपल्या मुलांना काल ब्रह्मच्या तावडीतून काढण्याचा प्रयत्न करत राहतात. परमेश्वर कबीर जींना वाटत होते कि कसे तरी सिकांदरास माझी ताकद समजली पाहिजे आणि याने त्याच्या राज्यात माझ्या सत्य ज्ञानाचा प्रचार करण्यास सहयोग केला पाहिजे तसेच आपले देखिला कल्याण केले पाहिजे.

भारतात हिंदू गुरु ब्राम्हण तसेच मुसलमान काजी-मुल्लांची आपापसात कधीच जमत नव्हते. धर्माच्या नावावर भांडणे करत असत. परंतु जेव्हा कबीर जींची त्रुटी त्यांना मिळत असे तेव्हा सर्व जन एक होऊन कबीर जींचा जोरदार विरोध करत असत. कारण असे होते कि परमात्मा कबीर जी दोन्ही धर्माच्या प्रचारकांच्या ज्ञानास चुकीचे सिद्ध करत होते. म्हणत असत कि या धर्म प्रचारकांना आपल्या धर्मग्रंथाचे ज्ञान नाही. सर्वच्या सर्व जन शास्त्रविरुद्ध ज्ञान व भक्ति सांगतात. ज्या कारणाने साधकाला कोणताच अध्यात्मिक लाभ परमात्मा कडून भेटत नव्हता.

कबीर जींची दीक्षा घेणाऱ्यास तुरंत लाभ भेटत होता. हेच कारण होते कि त्यावेळी परमात्मा कबीर जींचे चौसष्ठ लाख शिष्य झाले होते. सर्व महादुखी होते. दीक्षा व आशीर्वादाने सर्वांचे कष्ट नष्ट होऊन सर्व सुखी झाले होते. कबीर जींचे अनुयाई हिंदू तसेच मुसलमान मोठ्या संखेने बनत होते. ज्या कारणाने ते धर्म प्रचारक (धर्मगुरू) कबीर जींशी घोर ईर्षा ठेवत होते. या घटनेने त्यांना पंख लागले. विचार केला कि दिल्लीचा सम्राट देखील आला आहे. आज या विनकरास मृत्यूची शिक्षा देऊ. हा विचार करून हजारांच्या संख्येने दोन्ही धर्माच्या व्यक्ति राजा सिकंदराच्या विश्रामगृहाकडे गेले. कारण कळल्यावर राजाने राजा सिकंदरने जनतेस प्रसन्न करण्यासाठी म्हटले कि आता अटक करून त्या कबीरास मृत्यू देतो. संत रविदास जी

तसेच परमात्मा कबीर जी दोघांना पोलिसांनी पकडून आणले. संत रविदास जींना तर सोडून दिले कारण कबीर जींनी सर्व चुका मान्य केल्या होत्या. म्हटले कि ना तर रविदास जीं चा दोष आहे, ना कि गणिकाचा, सर्वच मी केले आहे.

सिकंदर लोधीचा असाध्य रोग परमेश्वर कबीर जींच्या आशीर्वादाने समाप्त झाला होता. कमाल मुलगा तसेच कमाली मुलीस तसेच स्वामी रामानंद ज्यांची हत्या सिकंदर लोधी राजाने केली होती, राजाच्या समोर प्रेतास जिवंत केले होते. राजा सिकंदर देखिला कबीर जींना गुरु मानत होता. परंतु अधिक जनतेस पाहून तसेच अक्षम्य अपराध मानून न्याय व्यवस्था व्यवस्थित ठेवण्याच्या उद्देशाने कबीर जींना अटक केली. परंतु काही गुरु मार्यादा ध्यानात ठेवून प्रश्न केला कि कबीर जी! आपण एवढ्या चांगल्या विचारांचे आहात. हे काय करून बसले. आपण वैश्यास बरोबर घेतले. आपण भक्ति विसरलास. आपले भजन म्हणजे नाम खंड झाले. भक्तिचा नाश झाला. कबीर जींनी उत्तर दिले कि सिकंदर बादशाह! आपल्या प्रश्नाचे उत्तर ऐका. ज्या परमेश्वराने सर्व ब्रह्मांडास सुरक्षित ठेवले आहे. तो माझी पण सुरक्षा करेन. सिकंदर लोधी राजाने जनतेस शांत करण्याच्या उद्देशाने आपल्या हाताने कबीर जी परमेश्वराच्या हातात हाथकडी व पायात बेडी, गळ्यात साखळी टाकून गंगा नदीच्या मध्यात टाकून मारण्याचा आदेश दिला. परमेश्वर कबीर जींच्या हाथातील हाथकडी, पायातील बेडी तसेच गळ्यातील साखळी तुटून पाण्यात पडली आणि परमात्मा कबीर जी पाण्याच्या वर बसून राहिले. हे पाहून काजीने म्हटले कि याने जादू जंत्र करून पाण्यास बांधले आहे. यामुळे डूबत नाही. काही वेळ पाण्यावर बसले. परत गंगा नदीच्या किनाऱ्यावर आले ज्या ठिकाणावरून नौकेमध्ये बसवून घेऊन गेले होते. त्याच नदीच्या किनाऱ्यावर हजारो व्यक्ती बघण्यासाठी उपस्थित होते. राजा सिकंदर देखील उपस्थित होता. काजी व मुल्ला तसेच ब्राम्हणांनी विचार करून राजास म्हटले कि याच्या गळ्यात जास्त वजनाचा दगड बांधून नदीच्या मध्ये टाकण्यात यावे, हा तेव्हाच डुबेल. नौकामध्ये कबिरजींना बसवून गळ्यात लोखंडाच्या मोठ्या साखळीने मोठा दगड बांधून पाण्यात टाकले. साखळी तुटली. दगड पाण्याच्या वर तरंगत जोरात सिकंदर राजाकडे आली. कबीर जी पाण्याच्या वर मांडी घालून सुखासन करून बसले. अर्थात पाणी खालून वाहत होते. परमात्मा कबीर जी पाण्यात बुडाले नाही. पाण्याच्या लहरी परमेश्वराचे चरण स्पर्श करून जोरजोरात आवाज करत होत्या. राजाने आदेश दिला कि बाण मारून यांचा अंत करा. तेव्हा भरपूर वेळ बाणांनी कबीर जी मेले नाही तेव्हा यंत्र मागवण्यात आले. तोफेचे गोळे तसेच बाण दोन्हीही सोडले गेले, परंतु एकदेखील परमेश्वर कबीर जींच्या कडे गेला नाही. काही गोळे त्याच किनाऱ्याच्या नदीत पडले, काही दूर पडले. काही तोफेचे गोळे तर दूर तळ्यात पडले ज्याचे पाणी आटले होते. तोफेचे काही गोळे डावीकडे-उजवीकडे पडले. परमात्मा कबीर जींच्या जवळ एक देखील तीर-बाण व तोफेचा गोळा गेला नाही. हा प्रयत्न चार प्रहर म्हणजे १२ तास चालला. परंतु कबीर जी मेले नाही. पूर्ण परमात्मा कबीर जी अविनाशी आहेत. अविनाशीस कोण मारू शकतो? ते जनतेस लीलाच्या माध्यमातून आपले सामर्थ्य दाखवत होते. परंतु काल ब्रह्मने बुद्धी हरवून ठेवली होती. कोणाच्याच विचारात हि गोष्ट नाही आली कि सामान्य व्यक्ती नाही आहे. जेव्हा राजा तसेच प्रजाने सर्व प्रयत्न केले तेव्हा म्हणू लागले कि यास कसे मारावे? जेव्हा सर्व अन्याय करून थकले होते, तेव्हा परमात्मा कबीर जींनी गंगा नदीच्या पाण्यात डुबकी घेतली. उपस्थित जनता तसेच राजाने मान्य केले कि कबीर जी पाण्यात बुडून मेला. त्याच्या शरीरावर वाळू व दगडी गेली. कबीर जींच्या मरणाच्या खुशीत लोक ढोल वाजवून नाचू गाऊ लागले, मिठाई वाटू लागले. राजा

**विश्राम गृहात गेला. काजी, मुल्ला व पंडितजन मिळून रविदास जी यांच्या घरी गेले. तेथे त्यांना आतून कबीर जींचा आवाज ऐकण्यात आला. ते परमात्माच्या महिमाचे शब्द (कविता) म्हणत होते. रविदासास सांगण्यासाठी गेले होते कि ज्यास आपण अविनाशी म्हणता तो कबीर जी मेला आहे. घराच्या आतमध्ये गेले तर कबीर जी रविदास जींच्या जवळ बसलेले होते. दोघेही कविता म्हणत होते. हे पाहून परत सिकंदरास जाऊन सांगितले कि कबीर मेला नाही, तो तर रविदासाच्या घरी बसला आहे. हजारोच्या संख्येत काजी-मुल्ला, पंडित रविदास जींच्या घरी गेले. तेथे कबीर जी मिळाले नाही. रविदास जींना विचारले कि कबीर कोठे आहे. ते म्हणाले आत्ताच माझ्याजवळून गेले आहेत. म्हणत होते कि गंगेत आंघोळ करून येतो. राजा तसेच सर्व व्यक्ती गंगाच्या त्याच किनाऱ्यावर गेले तर तेथे परमात्मा कबीर जी पाण्याच्या वर पाहिल्यासारखे बसलेले दिसले. नदीच्या मध्ये बसलेले होते. छोटे समुद्री जहाज मध्ये जहाजी म्हणजे जहाज चालक व अन्य काही व्यक्ती गेले व म्हणाले कि आपणास राजा सिकंदर बोलावत आहे. जहाजातून सीडी साखळीने बांधून पाण्यात सोडली. कबीर जी सीडीवर चढून जहाजात बसून गंगा नदीच्या बाहेर आले तर लगेच पकडले म्हणजे अटक केली.**

## ''खुनी हाथीद्वारे कबीर परमात्म्याला मारण्याची कुचेष्ठा''

खूनी हाथी मस्त है, पग बंधे जंजीर। गरीबदास जहां डारिया, मसक बांधि कबीर।।७६७।।
सिंह रूप साहिब धर्‍या, भागे उलटे फील। गरीबदास नहीं समझती, याह दुनिया खलील।।७६८।।
बने केहरी सिंह जित, चौंर शिखर असमांन। गरीबदास हस्ती लख्या, दीखै नहीं जिहांन।।७६९।।
कूटै शीश महावतं, अंकुश शीर गरगाप। गरीबदास उलटा भगै, तारी दीजैं थाप।।७७०।।
भाले कोखौं मारिये, चरखी छूटैं पाख। गरीबदास नहीं निकट जाय, किलकी देवैं लाख।।७७१।।
जैसी भक्ति कबीर की, ऐसी करै न कोय। गरीबदास कुंजर थके, उलटे भागे रोय।।७७२।।
दुंम गोवैं मूंडी धुनैं, सैंन न समझै एक। गरीबदास दीखै नहीं, आगै खड़ा अलेख।।७७३।।
पीलवान देख्या तबै, खड़ा केहरी सिंघ। गरीबदास आये तहां, धरि मौला बहु रंग।।७७४।।
उतरे मौला अरस तैं, भाव भक्ति कै हेत। गरीबदास तब शाह लखे, कबीर पुरूष सहेत।।७७५।।
लीला की कबीर ने, दो रूप में रहे दीस। दासगरीब कबीर कै, पास खडे. जगदीश।।७७६।।
जंभाई अंगडाईयां, लंबे भये दयाल। गरीबदास उस शाह कूं, मानौं दर्श्या काल।।७७७।।
कोटि चन्द्र शशि भान मुख, गिरद कुंड दुम लील। गरीबदास तहां ना टिके, भागि गये रनफील।।७७८।।
नयन लाल भौंह पीत हैं, डूंगर नक पहार। गरीबदास उस शाह कूं, सिंह रूप दीदार।।७७९।।
मस्तक शिखर स्वर्ग लग, दीरघ देह बिलंद। गरीबदास हरि ऊतरे, काटन जम के फंद।।७८०।।
गिरद नाभि निरभै कला, दुदकारै नहीं कोय। गरीबदास त्रिलोकि में, गाज तास की होय।।७८१।।
ज्यूं नरसिंह प्रहलादकै, यूं वह नरसिंह एक। गरीबदास हरि आईया, राखन जनकी टेक।।७८२।।
बार-बार सताय कर, मस्तक लीना भार। गरीबदास शाह यौं कहै, बकसौ इबकी बार।।७८३।।
तहां सिंह ल्यौलीन हुआ, परचा इबकी बार। गरीबदास शाह यौं कहै, अल्लह दिया दीदार।।७८४।।
सुन काशी के पण्डितौ,काजी मुल्लां पीर। गरीबदास इसके चरण ल्यौह, अलह अलेख कबीर।।७८५।।
यौह कबीर अल्लाह है, उतरे काशी धाम। गरीबदास शाह यौं कहैं, झगर मूंये बे काम।।७८६।।
काजी पंडित रूठिया, हम त्याग्या योह देश। गरीबदास षटदल कहैं, जादू सिहर हमेश।।७८७।।
इन जादू जंतर किया, हस्ती दिया भगाय। गरीबदास इत ना रहैं, काशी बिडरी जाय।।७८८।।
काशी बिडरी चहौं दिशा, थांभन हारा एक। गरीबदास कैसे थंभै, बिडरे बौहत अनेक।।७८९।।

शब्दार्थ :- वाणी क्रं ७६७-७८९ :- परमात्मा कबीर जींचे हात पाय बांधून एका मैदानात टाकण्यात आले. जेथे घोर अपराधीना कठोर दंड दिला जातो. सध्याच्या स्टेडियम सारखे ते मैदान होते. राजा तथा पदाधिकारी स्टेजवर बसत असत. दर्शक चारही बाजूने उभे राहत. मनुष्यास मारण्यासाठी हत्तीला प्रशिक्षण दिले जात असत. त्यास दारू तसेच रक्त पिण्याची सवय लावली जात असे. त्यास खुनी हत्ती म्हणतात. राजा सिकंदर तसेच अन्य मंत्रीगण बसलेले होते. प्रजा चारही बाजूने उभी होती. खुनी हत्तीस माहोत (हत्तीला वश करून चालवणारा व्यक्ती) कबीर जींच्याकडे मारण्यासाठी घेऊन आला तेव्हा कबीर जींनी एका सिंहाचे रूप दाखवले जे केवळ हत्तीस दिसत होते. हत्ती दारू प्यायला होता. सिंहास पाहून घाबरून उलटा पळाला. माहोत ने हत्तीस भाल्यांनी मारले. परंतु कबीर जींच्याकडे हत्ती गेला नाही. हत्ती पळून गेला. परमात्मा कबीर जींचे बंधन तुटले व उभे राहिले. उभे राहून अंग मोडले व जांभळी दिली. खूप मोठे झाले. डोक्याला आकाश लागत होते. शरीरातून असंख्य सूर्यांचा प्रकाश येत होता. हे केवळ राजा सिकंदरास दिसत होते. राजा भयभीत होऊन उभा राहून मैदानात आला. आणि म्हणाला कि मला जीवदान द्या, माझ्याकडून खूप मोठी चूक झाली आहे. मला परमात्माचे दर्शन झाले. जनतेस राजाने सांगितले कि अल्लाच अकबर आहे, कबीर जी रुपात पृथ्वीवर आले आहेत. यांचे चरण स्पर्श करून आपले कल्याण करून घ्या. परंतु कर्महीन काजी-मुल्ला व पंडित म्हणू लागले कि कबीराने जादू तंत्र करून हत्तीला पळवून लावले. आम्ही जात आहोत. हे बोलून ते सर्व पापी आत्मा गेले. परमात्मा ने आपले शरीर सामान्य केले व सिंहास अदृश्य केले व आपल्या झोपडीत निघून गेले.

## ''दीक्षा घेतल्यानंतर''

पूर्ण गुरूदेव जी कडून अनुग्रह घेऊन पूर्ण विश्वासाने गुरूदेवांनी सांगितली गेलेली साधना पूर्ण निष्ठेने करावी.

➢ कबीर जी सांगतात की :- १. धैर्य ठेवा.

कबीर, धीरे-धीरे रे मना, धीरे सब कुछ होय।
माली सींचे सौं घड़ा, समय आए फल होय।।

भावार्थ :- ज्याप्रमाणे माळी आंब्याचे बी पेरतो, त्याला पाणी घालतो. काही दिवसांच्या नंतर त्याला अंकुर दिसू लागतात. पण तरी देखिल वेळोवेळी पाणी घालतच असतो. त्याचे रक्षण करण्यासाठी काटेरी झाडांचे कुंपण घालतो. एक आंब्याच्या रोपाचे झाड होण्यासाठी ८-१० वर्षे जातात. तोपर्यंत माळी (रोप लावणारा बागेचा मालक किंवा नोकर) हे त्या रोपाला खतपाणी करत असतात. जेव्हा त्या रोपट्याचे झाड होते, तेव्हा आंब्याचे फळ लागते. इतकी फळे लागतात की स्वतःचे कुटुंब तर ती चाखतेच पण विकून आपला उदरनिर्वाह देखिल करता येतो. त्याचप्रमाणे भक्ति नाम रूपी बीज जरी पेरले तरी अनुग्रह घेऊन त्याचे स्मरण ठेवून व दानधर्म रूपाने त्याला खतपाणी घालून ती भक्ति वाढविली पाहिजे. आंब्याच्या झाडाप्रमाणेच हळूहळू भक्तिरूपी बीज हे झाड झाल्यानंतर त्याला देखिल सुखांची रीघ लागेल. ज्याप्रमाणे आंब्याच्या झाडाला टनावारी आंबे लागले, ते खाल्ले आणि विकून पैसाही कमावला. त्याचप्रमाणे भक्तित देखिल विश्वास ठेवला पाहिजे हळूहळू भक्तीचे परिणाम येऊ लागतील.

➢ २. विश्वास :-

ज्याचा परमात्माच्या महिम्यावर विश्वास आहे, त्यालाच भक्तिचा लाभ होत असतो.

# ''परमात्माला काहीही अशक्य नाही''

एका शहराच्या बाहेर एका जंगलात दोन महात्मे साधना करत होते. एक जण घर सोडून चाळीस वर्ष इथे राहून साधना करत होता. दूसरा आता दोन वर्षांपूर्वी साधना करायला लागला होता. परमात्माच्या दरबारातील एक देवदूत रोज काही वेळ त्या दोन्ही साधकांच्या सोबत व्यतीत करत असे. दोन्ही साधकांचे आश्रम गावाच्या पूर्व आणि पश्चिम दिशांना होते. मोठ्याचा आश्रम पश्चिमेकडे आणि छोटयाचा आश्रम गावाच्या पूर्व दिशेला जंगलात होता. देवदूत रोज तास दोन तास त्यांच्यापाशी बसायचा, परमात्माबाबत चर्चा करायचा. दोन्ही साधकांचा वेळ देखिल चांगला व्यतीत होत असे.

एक दिवस देवदूताने भगवान विष्णुजींना म्हटले की परमेश्वर! कपिला नगरीच्या बाहेर आपले दोन परम भक्त राहत आहेत. श्री विष्णु जी म्हणाले की एक परम भक्त आहे, दूसरा तो बनावट भक्त आहे. देवदूताने विचार केला की जो चाळीस वर्ष साधनारत आहे , तोच पक्का भक्त असेल कारण लांब-लांब दाढ़ी, डोक्यावर मोठमोठ्या जटा, आहेत आणि चाळीस वर्षापेक्षा जास्त होऊन गेली तो साधना करतो आहे. देवदूत म्हणाला की हे प्रभु! जो चाळीस वर्षापासून तुमची भक्ति करतो आहे, तोच असेल तुमचा परमभक्त. परमात्मा म्हणाले, नाहीं. जो दोन वर्षापासून साधना करतो आहे तो खरा भक्त आहे. अरे देवदूता! माझ्या बोलण्यावर तुला विश्वास नाहीं वाटत का? देवदूत म्हणाला प्रभु! असे नाहीं. परंतु माझ्या अल्पबुद्धिला असे वाटते की जास्त वयाचा देखिल उत्तम भक्त असू शकतो. श्रीविष्णु म्हणाले की उद्या तुम्ही उशिरा असे पृथ्वीवर जा. दोघेही उशिरा येण्याचे कारण विचारतील. तेव्हा तुम्ही असे सांगा की परमात्माला आज सुईमधून हत्ती काढायचा होता. ती लीला पाहून आलो म्हणून उशीर झाला. याचे जे उत्तर मिळेल, त्यावरून तुम्हालाच लक्षात येईल की परम भक्त कोण आहे? एरवी देवदूत रोज सकाळी आठ वाजता ज्येष्ठ भक्ताकडे जायचा, आणि १० वाजायच्या आसपास छोटया भक्ताकडे जायचा. दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ भक्ताकडे दिवसा १२ वाजता पोहोचला. उशिरा येण्याचे कारण विचारता, देवदूताने सांगितले की आज ११:३० वाजता परमात्माला लीला करायची होती, ती पाहून आलो आहे. चाळीस वर्षाच्या भक्ताने विचारले की मला सांगा ना, प्रभूंनी काय लीला केली? देवदूत म्हणाला की श्रीविष्णुजींनी तर कमाल केली, हत्तीला सूईच्या छिद्रातून काढले. हे ऐकून भक्त म्हणाला की देवदूतजी! खोटे असे बोला, जे ऐकल्यावर विश्वास बसेल. हत्तीला सूईच्या छिद्रातून काढणे कसे शक्य आहे? माझ्यासमोर काढून दाखवा. देवदूत समजून गेला की भगवान म्हणत होते ते खरेच होते. हा माणूस नाही तर पशु आहे. परमात्मा काहीही करायला सक्षम आहे यावर ज्याचा विश्वास नाही, तो भक्त नाहीच. जे काम माणूस करू शकत नाही, ते परमात्मा करू शकतो. याची भक्ति व्यर्थ आणि बनावट आहे. देवदूत नमस्ते म्हणून पुढे निघाला आणि छोटया भक्ताकडे आला. भक्ताने उशिरा येण्याचे कारण विचारले. त्याने काही चुकीचे बोलू नये म्हणून देवदूत संकोचाने सांगू लागला की भक्ता अरे तुला काय सांगू? परमात्माने आज आश्चर्यच घडविले. पाहून माझे तर डोळेच दिपले. परमात्माने सुईच्या छिद्रातून हत्ती बाहेर काढला. हे ऐकून भक्त म्हणाला देवदूत जी! याच्यात आश्चर्य ते काय आहे? परमात्माची इच्छा असेल तर हत्तीच काय, संपूर्ण पृथ्वीदेखिल सुईच्या छिद्रातून निघेल? देवदूताने भक्ताला अलींगन देऊन म्हटले की आपण खरोखर आपले माता-पिता ज्यांच्या पासून आपला जन्म झाला. आपल्या परमात्मावरील अटळ विश्वासाला सलाम.

श्रोतेहो! हे तर एक उदाहरण आहे. वास्तविक भक्ताचा परमात्मावर संपूर्ण विश्वास

असला पाहिजे की त्याला काहीही करणे शक्य आहे. जरी कोणी म्हणाले की परमात्मा हे करू शकत नाही, ते करू शकत नाही, तर समजावे, त्याला भक्तिचा अधिकारच नाही आहे. भक्तिचे नाटक करून कशाला आपला वेळ व्यर्थ घालवायचा? परमात्मावर संपूर्ण विश्वास ठेऊन भक्तिमार्गावर वाटचाल केली तर उद्दिष्टांपर्यंत पोहोचेल.

➢ ३. ''परमात्मा जे करतो, ते चांगल्यासाठीच करतो''

अनुग्रह घेतल्यानंतर भक्ताला भक्तिमार्गावर वाटचाल करताना कितीही त्रास होवो, परमात्मा जे करतात, ते भल्यासाठीच करतात असाच विचार मनात असला पाहिजे.

कथा :- एक राजा आणि त्याचे महामंत्री हे एकाच गुरूचे शिष्य होते. महामंत्रीजीचा पूर्ण विश्वास होता, परंतु राजाला सत्संग श्रवण करण्यास पुरेसा वेळ मिळत नसल्यामुळे तो परमात्माच्या लीलांशी परिचित नव्हता, परंतु भक्ति श्रद्धापूर्वक करत असे. तो राजा महामंत्र्याला नेहमी आपल्या सोबत ठेवत असे. त्यांच्या बद्दल अतिशय आदर होता. यासाठीच एका मंत्र्याला महामंत्र्यांशी इर्षा होती. त्याला राजाच्या नजरेतून उतरवण्यासाठी तो राजासमोर महामंत्र्याची निंदा करत असे. एका मंत्र्याला वाटत होते, राजाने त्याला महामंत्री बनवावे. म्हणून तो सारखा म्हणायचा की राजन! हे महामंत्री विश्वासपात्र नाहीत. हा तुम्हाला कुठेही धोका देऊ शकेल. एक दिवस राजा आणि महामंत्री आणि हा चुगलखोर मंत्री व अन्य मंत्रीगण दुसऱ्या एका शहरात जाण्याच्या तयारीत महालात हॉलमध्ये उभे होते. राजा आपली तलवार काढून तिची धार तपासत होता आणि अन्य मंत्र्यांशी देखिल बोलत होता. त्यामुळे राजाच्या एका हाताचे एक बोट कापले जाऊन खाली पडले. चापलूस म्हणाला की महाराज! हे काय झाले? आमचे महाराज किती सुंदर होते. आज हे काय दुर्भाग्याचा दिवस आमच्या वाट्याला आला आहे. हाय, हाय! हे काय झाले? प्रजेचा कोणता भार आपल्यावर घेतला महामंत्री म्हणाला, चांगले झाले, परमात्मा जे काही करतात, ते चांगल्यासाठीच असते. राजा दु:खाने व्याकुळ होता आणि वर असे ऐकून महामंत्र्याचा राग आला आणि सैनिकांना सांगितले की याला तुरुंगात धाडा. तुरुंगात धाडले त्याला. चापलूस चुगलखोर मंत्र्याला महामंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. बोटावर औषधोपचार केल्यावर सहा महिन्यांनी बोट तुटल्याची जखम भरून आली. आता तिथे काहीही दुखत नव्हते. आता राजाच्या उजव्या हाताला तीन बोटे आणि एक अंगठा राहिला होता. राजा आपल्या नविन महामंत्र्यावर अतिशय प्रसन्न होता कारण त्याच्या मनाप्रमाणे झाले होते. तो राजाला म्हणायचा की हे राजन! मी तर तुम्हाला अनेक वेळा म्हटले होते की तो एक दिवस तुम्हाला गोत्यात आणेल म्हणून. बोट कापले गेले, ते चांगले झाले असे त्या दिवशी तो म्हणाल्याचे तुम्ही ऐकले. तुमचे मरणच त्याला हवे होते. तो आपल्याला कधीही मारु इच्छित होता. राजा त्या चापलूस मंत्र्याच्या प्रत्येक कथनाला खरे समजून चालला होता. एक दिवस राजा त्या नवीन महामंत्र्यासोबत जंगलात शिकार करण्यास गेला. दोघेही जंगलात खोलवर गेले. पुढे काही भिल्ल लोक राहत होते. त्यांनी त्या दोघांनाही पकड़ले आणि आपल्या पुरोहिता कडे नेले. त्या दिवशी त्या लोकांचा कसला तरी सण होता. एका व्यक्तिला कापून देवीला चढ़वायचे होते. त्यांच्या हाती दोन जण होते. पुरोहिताने म्हटले की दोन घेऊन आला असाल, तर दोघांनाही बळी चढवू. देवी अधिक प्रसन्न होईल. परंतु आधी त्यांच्या शरीराचा प्रत्येक भाग अभंग असल्याची खात्री करून घ्या. म्हणजे डोळा फुटलेला हाथ किंवा बोट कापलेले नसावे. तपासणी केली असता एकाच्या हाताचे एक बोट तुटले आहे. पुरोहिताने म्हटले की याला सोडून द्या. दूसरा ठीक आहे ना, तर याचे मुंडके उडवा. त्याच वेळी राजाला सोड़ले आणि चापलूस महामंत्र्याचे मुंडके राजाच्या समोर उडविले

आणि देवीला अर्पण केले. राजा तिथून निघाला आणि आपल्या महालात आला. सरळ कारागृहात गेला आणि महामंत्र्याला मोकळे केले. राजा ने महामंत्र्याला घट्ट मिठी मारली आणि म्हटले की जेव्हा माझ्या हाताचे बोट तुटले असताना आपण म्हटले होते की चांगले झाले. परमात्मा जे करतात ते चांगलेच करतात. ते खरे आहे. त्या दिवशी माझे बोट तुटले नसते, तर आज मी जीवानिशी जात होतो. परमात्माने उत्तम केले. राजा मग म्हणाला की माझे तर भले झाले, पण तुम्हाला सहा महीने फुकटच कारागृहात काढावे लागले. तुमच्यासाठी काय चांगले झाले? महामंत्री म्हणाले आज मी कारागृहात नसतो, तर आपल्या सोबत आलो असतो. मग तिथे माझेच मुंडके कापले गेले असते. माझा मृत्यु झाला असता. सहा महीने कैदेत असल्यामुळे माझा जीव वाचला, हेच माझ्यासाठी चांगले झाले.

अशा प्रकारे भक्ताने परमात्मावर विश्वास ठेऊन आपल्या जीवनात वाटचाल केली पाहिजे.

❖ ''एक लेवा एक देवा दूतं। कोई किसी का पिता न पूतं।''

एका शेतकऱ्याच्या घरी मुलाचा जन्म झाला. पुत्र आठ वर्षाचा झाला तेव्हा त्याची पत्नी मृत्यु पावली. शेतकऱ्या जवळ १६ एकर जमीन होती. काही वर्षानंतर शेतकऱ्याने दुसरे लग्न केले. त्या पत्नी पासून दुसरा पुत्र झाला. काही वर्षानंतर ती पत्नी देखिल मृत्यु पावली. शेतकऱ्यांच्या प्रथम पत्नीचा पुत्र आता १६ वर्षाचा झाला. त्याचा विवाह करून दिला. शेतकऱ्याचा देखिल मृत्यु झाला. छोटा मुलगा १०-१२ वर्षाचा असताना त्याला रोग झाला. काही दिवस उपचार केले, मग मोठ्या भावाने (मावशीचा मुलगा) आणि त्याच्या पत्नीने विचार केला की उपचारांवर खर्च कशाला करायचा? जरी मृत्यु पावला तरी याच्या हिस्स्याची आठ एकर जमीन आपल्या कडेच राहणार आहे. हा विचार करून शेजारच्या गावातील उपचार करणाऱ्या वैद्याला म्हटले की या मुलाला औषधात विषघालून द्या. आम्ही तुम्हाला जे काय पैसे असतील ते देऊ. पाँचशे रूपयाची हाव सुटून वैद्याने त्या मुलाला औषधात विष पाजून मारून टाकले. गावातील लोकांना सांगितले की रोगामुळेच याचा मृत्यु झाला. कोणालाच शंका आली नाही. मुलाचा मृत्यु रोगाने झाल्याचे कारण सगळ्यांना पटले.

त्या मावशीच्या मुलाचा मृत्यु झाल्यावर एक वर्षानंतर मोठ्या भावाला पुत्र झाला. आनंदाला नुसते उधाण आले. मुलगा झाला म्हणून आनंदात सगळ्यांना जेवणावळी घातल्या. सगळ्या गावात मिठाई वाटली. त्यानंतर काहीही अपत्य झाले नाही. एकुलता एक पुत्र मोठा झाला, त्याल प्रेमाने सांभाळून, दही-दुध-तूप खायला घालून धष्टपुष्ट केले. सोळाव्या वर्षी त्याचा विवाह करून दिला. त्यावेळेस बाल विवाह मोठ्या अभिमानाने मिरवला जात असे. त्या मुलाला रोग झाला. वैद्यांवर वैद्य बोलावले. महागातील महाग औषधे आणली, परंतु व्यर्थ. त्या वेळेस एका महीन्यात एक-एक हजार रुपयांची औषधि सुरु होती. हीरा आणि मोती भस्मदेखिल औषधात घालून दिले. त्यामुळे आठ एकर जमीनदेखिल विकावी लागली. परंतु आराम पडण्याऐवजी रोग वाढतच गेला आणि शेवटचा दिवस आला. मुलाचे वडील चिंतित अवस्थेत पुत्राजवळ बसले होते. त्याच वेळेस मुलगा म्हणाला, दादा! एक काम करा. पिता म्हणाला बेटा! मी तुझा पिता आहे. मुलगा म्हणाला ज्या भावाला तू विष पाजून मारले होतेस, तोच मी आहे. मीच तुमच्यावर सूड उगवण्यासाठी तुमच्या पुत्रारुपात जन्म घेतला आहे. त्या मुलाची आई देखिल तिथेच होती. मुलगा म्हणाला की माझ्या हिस्स्याची आठ एकर जमीन तर मी वसूल केली. आता फक्त तिरडी आणि लाकडांची तयारी करा. त्याचाच हिशोब बाकी आहे. हे ऐकून त्याच्या पित्याचे उर्फ भावाचे तोंड पाहण्यासारखे झाले होते. आपल्या कृत्यावर पति-

पत्नी दोघांनाही पश्चात्ताप झाला. परमात्माची योजना अटळ आहे. मोठया भावाने पुत्ररुपात जन्मलेल्या भावाला विचारले की आम्ही तर हावेपोटी जे पाप केले, त्याचे तर परमात्माने आम्हाला फळ दिले. ज्या उद्देश्याने आम्ही तुमचा जीव घेतला ती आठ एकर जमीन गेली आणि अन्य अपत्य नाहीच आहे. ही शिल्लक जमीन कोणी अन्य घेऊन टाकेल. आमचा नाश व्हायचा तो झालाच, तो व्हायलाच पाहिजे होता. परमात्माने न्याय केला. परंतु जी मुलगी आपल्या पत्नीच्या रूपात आली आहे, तिने कोणता गुन्हा केला होता, ज्यामुळे आपल्या गावातील सती प्रथेनुसार तुमच्या सोबतच जिवंत जाळली जाईल. परमात्माने हिच्याशी तर अन्याय केला आहे. छोटा भाऊ उर्फ पुत्र म्हणाला की ज्या वैद्याने पाचशे रुपयांच्या बदली विष देऊन मला मारले होते, त्या वैद्याचा (डॉक्टर) माझ्या मृत्युनंतर दोन वर्षानी मृत्यु झाला. ती पत्नी त्याच वैद्याचा आत्मा आहे. हिला तेच फळ मिळेल. जिवंत जाळली जाईल. त्या वेळेस सतीप्रथा जोरात होती. पतिच्या मृत्युनंतर पत्नीला जिवंत त्याच चितेत जाळले जायचे.

प्रिय साधकहो! विचार करा. परमात्मापासून काहीही लपून राहत नाही. जसे कर्म तसे फळ. प्रत्येक कुटुंब अशाच प्रकारे मागील संस्कारामुळे एकमेकांशी जोडलेले आहेत. कोणी पूर्वजन्मीचे कर्ज फेडण्यासाठी जन्मला आहे, कोणी पूर्वजन्मीचे कर्ज वसूल करण्यासाठी जन्मला आहे. उदाहरण म्हणून :-

वडिलांनी मुलाला शिकविले. विवाह होण्याआधी २ दिवस अपघात होऊन तो मृत्यु पावला. तो आपले कर्ज पित्याकडून वसूल करण्यास आला होता. मुलगा मोठा झाला. काम करून आपला उदरनिर्वाह करायला लागला. वडील आजारी पडले, लाखों रूपये खर्च झाले पण व्यर्थ. वडील मृत्यु पावले. हा बाप मागल्या जन्मीचे कर्ज वसूल करण्यासाठी आला होता. काही द्यायला आला होता. मुलीचा विवाह केला. दोन वर्षानंतर मुलगी मृत्यु पावली. खूप हुंडा दिला होता. तो जावई पूर्वजन्मीच्या कर्जाच्या ऐवजी मुलगी आणि पैसा दोन्ही घेऊन गेला. वर्तमानात जे इतरांना फसवून त्यांची संपत्ती हड़प करतात, ती संपत्ती पुढील जन्मी जावई होऊन वसूल करेल. परमात्माचा हा अटळ सिद्धांत आहे. शहाण्याला शब्दांचा मार पुरतो. वर सांगितलेली केवळ गोष्ट नाही. प्रत्यक्षात घडलेले आहे. कोणी म्हणतात, घाबरविण्यासाठी रचलेली ही एक कथा आहे. कोणी पाहिलंय, काय होणार आहे? जसे सभ्य लोक चोराला समजावतात की अरे दादा! चोरी नको करत जाऊ. जर पकडला गेलास, तर आधी लोक तुला तिंबून काढतील, मग पोलिसांकडून प्रसाद मिळेल आणि तुरुंगात जाऊन कष्टमय जीवन जगावे लागेल. जर कोणी म्हणाले, हे तर त्या चोराला घाबरवण्यासाठी सगळी ही कथा रचली आहे. कोणी पाहिलंय, काय होणार आहे? पण जरा विचार करा, इथे चोराला वस्तुस्थिती सांगून घाबरवले आहे आणि ती वस्तुस्थिती देखिल आहे. चोराने खरी परिस्थिती जाणून चोरी करणे जरी सोडले, तरी त्यात त्याचेच भले आहे. तो असे जरी म्हणाला की कोणी पाहिलंय, काय होणार आहे? तरीही काय घडण्याची शक्यता आहे, हे त्याला सांगितले आहेच. त्याचप्रमाणे वरील कथा ही समजवण्यासाठी-घाबरवण्यासाठीच रचली आहे असे मानले तर ते दुर्दैव ठरेल. चोराला जेवढे आपण सावध करतो, तेवढेच त्यातील मर्म घ्या.

❖ लेखकाने ही कथा सन् १९७८ मध्ये एका पशुवैद्याकडून ऐकली होती. त्याप्रमाणेच शेतकऱ्याच्या दोन मुलांची कथा वर सांगितली आहे. तो त्याच्या जवळ बसणाऱ्याला ही गोष्ट नेहमीच सांगत असे, परंतु त्याप्रमाणे वागला मात्र कधीच नाही. दहा रुपयांची औषधे देऊन आणि शुद्ध पाण्याच्या (**Distilled Water**) तीन चार इंजेक्शनच्या सुया टोचून २००-३०० रुपये फी घेत असे. मग संध्याकाळी भेटल्यावर तो आपले कारनामे देखिल सांगून म्हणायचा

की मी जरी कमी रूपये घेतले तरी जनावरांचा मालक हेच समजणार की मी काही बरोबर औषध नाही दिले. खरे तर दहा रुपयांचे औषध घेऊनच ते जनावराला गुण येणार होता. विचार करा! अशा लोकांची कथनी आणि करणीत किती फरक आहे? मग त्यांनी सांगितलेल्या कथानांचा इतरांवर कसा प्रभाव पडणार? संत गरीबदास जींनी म्हटले आहे की या गोष्टी केवळ ऐकून सोडून द्यायच्या नाहीयेत. त्याप्रमाणे आपण वागणे गरजेचे आहे. परमात्मा च्या विधानास समजून निर्मळ जिवन आत्मसात करा. जीवनाच्या रस्त्याला काटे रहित बनवा.

## ''एक लेवा एक देवा दूतं''

ज्या वेळेस श्री शिव आपल्या पत्नी पार्वतीला अमरनाथामध्ये एका वाळलेल्या वृक्षाखाली बसून नामस्मरणाचा अनुग्रह दिला होता. त्या वृक्षाच्या खोबणीत पोपटाच्या मादीने अण्डी घातली होती. स्वस्थ अण्डी होती, त्यांचे शिव जींनी वाजवलेल्या एका टाळीने पिले होऊन ती पिले उडून गेली. त्यामध्ये एक अंडे अस्वस्थ असे होते. त्याचा जीव त्याच्यात अडकला होता. जेव्हा श्री शिव जींनी माता पार्वतीजींना दीक्षा मंत्र ऐकवला, तेव्हा ते अस्वस्थ अंडे स्वस्थ झाले आणि पोपटाचे पिलू झाले. त्याला पंख आले आणि ते उडण्यायोग्य झाले. पार्वतीजींची तर समाधि लागली होती. त्या हाँ-हाँ करत नव्हत्या. पोपट हाँ-हाँ करायला लागला. जेव्हा श्री शिव जींनी पाहिले की पार्वतीजींची तर समाधि लागली आहे, काही ऐकत-बोलत नाही आहेत, मग हा हाँ-हाँ आवाज कोणाचा आहे? तर वृक्षाच्या खोडावर असलेल्या खोबणीतून पोपट बोलत होता. श्रीशिवजींना त्याला मारायचे होते, पण पोपट उडून गेला. श्री शिवजी आपली सिद्धि वापरून त्याच्या मागे उडून त्याला मारायला गेले. ऋषि वेदव्यास जींच्या पत्नीने जांभई दिली. तोंड उघडले तर तो जीव पोपटाचे शरीर त्यागून व्यास जींच्या पत्नीच्या गर्भात त्याच्या तोंडावाटे गेला. श्री शिव जींनी व्यासांच्या पत्नीला म्हटले की माझे ज्ञान चोरून जीवाने पोपटाचे शरीर त्यागून आपल्या गर्भात प्रवेश केला आहे. त्याने माझ्याकडे चोरी केली आहे. त्याला मी मारून टाकणार. त्याच वेळेस ऋषि वेदव्यास जी देखिल तिथे आले आणि सगळे ऐकत होते. व्यास जींनी विचारले, हे भगवान! कोण-कसला चोर? श्री शिव जी म्हणाले की मी पार्वतीजींना दीक्षा देत होतो. अंतस्थ कमलांचा भेद सांगत होतो, तो या पोपटाने ऐकला. याने एखाद्या अनाधिकाऱ्याला हा मंत्र सांगितला तर तो अमर होऊन प्रजेला त्रास देईल. हा अमर झाला आहे. मी या जीवाला मारणार. व्यास जी म्हणाले, हे भगवान शिवजी! जर तो अमर झाला असेल तर तुम्ही त्याला मारणार कसे? हे ऐकून श्री शिव जी परत पार्वतीजींकडे परत गेले. पार्वतीजींना घडलेली सर्व हकीकत सांगितले. श्रीवेदव्यास जींनी आपल्या दिव्य दृष्टिने पहिले तर असे दिसले की पत्नीचा गर्भ पुत्राचा आहे. बारा वर्षानंतर पुत्र जन्माला आला. आई म्हणत होती की पुत्राचे नाव सुखदेव ठेवले पाहिजे. गर्भावस्थेत असताना मला कोणतेच दुःख नव्हते. मन प्रसन्न असायचे. सुखाचा आभास होत असायचा. त्यामुळे गर्भातच मी याचे नाव सुखदेव ठेवले होते. पोपटाच्या अंड्यात राहिल्याने आणि लगेच मानव शरीर प्राप्त केल्याने ब्राह्मण लोक याला शुक देव (शुक म्हणजे पोपट) असे देखिल म्हणतात. ऋषि शुकदेव जी जन्म घेताच त्यांचे शरीर बारा वर्षाचे झाले आणि उठून चालायला लागले, तेव्हा ऋषि वेदव्यास जी त्यांना म्हणाले अरे मुला! कुठे चाललास? शुकदेवजींनी आपल्या माता-पित्याकडे पाठ करून म्हणाले, आपला आणि माझा इतकाच संबंध आहे. ऋषि व्यास जी म्हणाले, अरे सुखदेवा! आम्ही तुझ्या जन्माची बारा वर्ष वाट पाहिली आणि आज तू आम्हाला सोडून जातो आहेस. एकदा तुझे मुख तरी दाखव. सुखदेव ऋषि म्हणाले, ऋषिजी!

खुप वेळा तुम्ही माझे वडील झालात. मी देखिल तुमचा पिता झालो. ही तर मोठी झंजटच आहे. मी भक्ति करून जन्म-मरणातून मुक्ति करवून घेईन. मी तुमच्याकडे तोंड एवढ्याचसाठी करत नाही की मी तुमच्या मोहात अडकू नये. ही गोष्ट संत गरीबदास जींनी एका वचनाद्वारे सांगितली आहे की :-

एक लेवा एक देवा दूतं, कोई काहू का पिता न पूतं।
ऋण सम्बन्ध जुड़ा एक ठाठा, अंत समय सब बारा बाटा।।

भावार्थ :- शुकदेवजींनी म्हटले की जे कुटुंबातील लोक मुलगा-बाप इ. विविध नात्यानी एकमेकांशी बांधलेले आहेत, ते सर्व मागचे ऋणानुबंध घेण्यासाठी किंवा फेडण्यासाठी जोडलेले आहेत. वास्तवात कोणीच कोणाचा पिता-पुत्र नाही. मृत्यु पावल्यावर सर्वच जण आपापल्या कर्मानुसार विभिन्न जागी जाऊन अन्य शरीर धारण करतात. त्यामुळेच कोणीही कोणाचे नसतात.

साधकांनी वरील शेतकऱ्याच्या गोष्टीत वाचले आहे की मोठ्या भावाने छोट्या मावशीच्या मुलाला आठ एकर जमीनीच्या लालसेने मारले तर तोच जीव त्याचा मुलगा होऊन आपले ऋण घेण्यासाठी जन्मला आणि आपला हिशेब चुकता करुन मेला. म्हणूनच म्हटले आहे की :-

एक लेवा (ऋण घेणारा) एक देवा (ऋण परतफेड करणारा) दूतम। कोई काहू का पिता नहीं पूतं। ऋण सम्बन्ध जुड़ा एक ठाठा। अंत समय में बारा बाटा म्हणजेच कुटुंबात थाटात राहतात असे दिसते, पण अचानक मृत्यु होतो म्हणजेच मुत्युपश्चात् कोणीच नाही आणि जन्म घेणार म्हणजे बारा (१२) वाटांनी निघून जाणार. म्हणजे मृत्युनंतर कोण कोठे जन्म घेईल याचा पत्ता नाही असे आपल्या वडिलांशी बोलून शुकदेव आकाशमार्गे उड्न अन्य स्थानी निघून गेले. प्रिय साधकहो! म्हणून भक्ति करा आणि जीवाचे कल्याण करवून घ्या. केवल कुटुंबालाच चिकटून आपले जीवन नष्ट करू नका. परमात्माच्या भक्तिने ऋणदेखिल सहज उतरून जाईल.

## ''कथनी आणि करणीतील अंतर घातक आहे''

एक माणूस प्रसिद्ध कथाकार होता आणि रोज रामायणाचा पाठदेखिल करीत असे. एक दिवस त्याला काही कारणास्तव शहरात जावे लागले. त्याच्या सोबत त्याचा साथीदार होता. गावापासून रेल्वे स्थानक तीन कीलोमीटर लांब होते. सकाळी पाच वाजताची गाड़ी होती. म्हणून स्नान करून स्थानकावर पोहोचले. विचार केला की पाठ गाड़ीतच करून घेऊ. गाड़ीत चढ़ले. ज्या डब्यात दोघेही चढ़ले, तो भरलेला होता आणि कुठेही रिकामी जागा नव्हती. काही लोक उभी होती. गाडी सुरु झाली. काही वेळाने त्या कथाकाराने बसलेल्या दोघांना म्हटले की दादा! कृपया मला सीट देता का? मला रामायणाचा पाठ करायचा आहे. आज गाड़ी पकड़ण्याची घाई असल्यामुळे घरी नाहीं करता आला. सज्जन लोकांनी संपूर्ण बाकच रिकामा करून दिला. ते उभे राहिले आणि म्हणाले विप्रजी! आमचे अहो भाग्य आहे की आज आम्हाला देखिल पवित्र ग्रंथ रामायणा मधील अमृतज्ञान ऐकायला मिळते आहे. पंडितजींनी पाठ मोठ्या आवाजात बोलायला सुरवात केली. प्रसंग होता-भरत आपल्या मोठ्या भावाचे सर्व अधिकार असलेले राज्य स्वीकारत नाही. जोपर्यंत श्रीरामचंन्द्र जी बनवास पूर्ण करून येत नाहींत, तोवर सिंहासनावर आपल्या भावाच्या रामचंन्द्राच्या पादुका ठेवल्या आणि स्वतः पृथ्वीवर बसला. आणि सेवक होऊन राज-काज संभाळले. जेव्हा भाऊ रामचंन्द्र अयोध्येत परतले तेव्हा त्यांना राज्य सोपवून दिले. भाऊ असावा तर असा. पाठ संपुर्ण झाल्यावर सगळ्यांनी म्हटले की वा पंडित जी वा! तुम्ही तर कमाल केली. एक माणूस त्या

**डब्यात बसलेला होता आणि त्याला आपल्या वडिलांच्या वर्षतिथी निमित्त एक दिवसाचा पाठ करायचा होता. कोणी पाठी मिळत नव्हता. वर्षतिथी दुसऱ्याच दिवशी होती. त्याने पंडितजींना म्हटले की गुरूजी! उद्या माझ्या वडिलांची वर्षतिथी आहे, तर तुम्ही पाठ करा. पंडित जी म्हणाले की उद्या करता येणार नाही. डब्यातील सर्व प्रवाश्यांनी म्हटले की पंडितजी! हे तर तुमचे कामच आहे. हा बिचारा धर्मसंकटात सापडलाय. परंतु पंडित जी मात्र बिल्कुल राजी होत नव्हते. सगळ्यांनी विचारले की असे काय आवश्यक कार्य आहे, ज्यामुळे आपण उद्या पाठ करण्यास नकार देत आहात? पंडित जी, असेच असेच म्हणून सांगणे टाळत होते. त्यांचा साथीदार म्हणाला की हे उद्या पाठ का करू शकत नाहीत त्याचे खरे कारण काय आहे ते मी सांगतो. यांनी आपल्या भावावर पन्नास फुट जमीनीतील खड्ड्यांबाबत खटला केला आहे. मी त्यामध्ये साक्षीदार आहे. त्या खटल्याची उद्या तारीख आहे. प्रवासी म्हणाले पंडितजी! कथा तर कशी मार्मिक ऐकवली आणि आपण तर त्याप्रमाणे अजिबातच वागत नाही. अशा व्यक्तिकडून सांगितलेल्या कथेचा श्रोत्यांवर काय प्रभाव पडणार?**

**कबीर जींनी म्हटले आहे की :-**

कबीर, करनी तज कथनी कथैं, अज्ञानी दिन रात।
कुकर (कुत्ते) ज्यों भौंकत फिरैं, सुनी सुनाई बात।। (१)

**गरीबदास जींनी देखिल म्हटले आहे :-**

गरीब, बीजक की बातां कहैं, बीजक नांही हाथ।
पृथ्वी डोबन उतरे, ये कह कह मीठी बात।। (२)

**शब्दार्थ :- ज्या व्यक्ती ज्ञानाच्या गोष्टी करतात, आणि दुसऱ्यांना शिकवतात कि कोणाचेच वाईट करू नका, परंतु स्वत: चुकी करतात. ते आध्यात्मिक गुरु त्या कुत्र्यासमान आहे जो उगाचच भुकत राहतो. त्याच प्रकारे हे धर्मगुरू एक-दुसऱ्यांकडून कथा ऐकून शिष्यास ऐकवत राहतात. स्वत: वापर नाही करत. (१)**

**वाणी क्रं २ : - ते अज्ञानी धर्मगुरू तत्वज्ञान सांगून कोऱ्या अज्ञानाचा प्रचार करतात कारण त्यांना तत्वज्ञानाचा पत्ता नाही. ते खोटी लोके पृथ्वीवर मानवाच्या अनमोल जीवनाचा नाश करण्यासाठी जन्माला आलेले असतात. (२)**

## सत्संगानेच भक्तिची वाट मिळाली.

**संत नित्यानंदजीचे लहानपणीचे नाव नंदलाल होते. ते ब्राह्मण कुलात जन्मले होते. संत गरीबदास जी (छुड़ानी गाव जिला-झज्जर) यांचे ते समकालीन होते. संत गरीबदासजीचे जीवन सन् १७१७ ते १७७८ पर्यंत होते. त्यावेळेस ब्राह्मणांना विशेष सम्मान मिळत असे. सर्वोच्च जात असल्याचे मानले जात असे. त्यामुळे गर्वाची बाधा होणे स्वाभाविकच होते. नंदलालजींच्या माता-पित्याच देहांत त्यांच्या लहानपणीच झाला होता. त्यावेळेस ते ७-८ वर्षांचे होते. त्यांच्या आईचे वडील नारनौलच्या नवाबाच्या कार्यालयात उच्च पदावर कार्यरत होते. त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजी आजोबांनी केले. शिक्षणानंतर आजोबांनी आपल्या नातवाला नंदलालला नारनौल मध्ये तहसीलदार पदावर नोकरी लावली. एक तर जातिने ब्राह्मण, दूसरे म्हणजे त्या वेळचे तहसीलदाराचे पद. यामुळे असे अहंकार होणे अगदी स्वाभाविक होते. तहसीलदाराचा विवाहदेखिल आजी आजोबांनी करून दिला होता. तहसीलदारजींच्या महाला पासून काही अंतरावर एक वैष्णव संत श्री गुमानीदासजी आपल्या एका भक्ताच्या घरी**

सत्संग करत होते. ते श्रीविष्णुजीचे भक्त होते. सर्व संत आपल्या सत्संगात परमात्मा कबीर जींच्या अमृतवाणीचा आधार अवश्य घेत असतात. सत्संगात सांगितले की मानव जीवन कशासाठी प्राप्त होत असते. परंतु सत्संग श्रवण न केल्यामुळे प्रापंचिक उठारेट्यात आपले अमूल्य मानवी जीवन नष्ट करतो. अज्ञानामुळेच जीव धन, पद आणि जाति यांचा अभिमान करत असतो. भक्ति न करणारा प्राणी पुढील जन्मी गाढव-कुत्रा-बैल इत्यादी पशु-पक्ष्याच्या शरीरात जाऊन कष्टप्रद आयुष्य जगतात. त्यामुळे अभिमान सोडून परम संतांकडून अनुग्रह घेऊन आपले कल्याण करवून घेतले पाहिजे. अन्यथा डोंगरा एवढ्या यातना भोगाव्या लागतील.

सत्संगाचा आवाज ऐकल्यावर तहसीलदार घराच्या गच्चीवर खुर्ची घेऊन बसले. पूर्ण सत्संग श्रवण केला. अनुग्रह घेण्याची प्रबळ प्रेरणा झाली. परंतु जाति आणि पदाचा अहंकार त्रास देत होता. ब्राह्मण लोकांची किती प्रतिष्ठा असते. त्यात मी पडलो तहसीलदार. सत्संगात सामान्य लोग जातात. मला लाज वाटेल. पण मग आश्रमात कसा जाऊ? स्वामी गुमानीदासजीचा आश्रम नारनौल शहरापासून जवळपास दीड किलोमीटर लांब होता. शेवटी एक दिवस निर्णय घेतला की सकाळच्या वेळी आश्रमात जातो. इतर लोक येईपर्यंत तर माझा अनुग्रह घेऊन परत येईन. सत्संग करून संत जी आश्रमात गेले. सकाळी उठून काही वेळ फेरफटका मारत असत. एक दिवस नंदलाल जी घोड़यावर बसून सकाळी आश्रमाकडे जात होते. गुमानीदास जी त्याच रस्त्याने फेरफटका मारत होते. संतजींच्या डोक्यावरील केस कापलेले होते. वस्तरा फिरवला होता. डोक्याला काहीही बांधलेले नव्हते. नंदलाल जी ब्राह्मण असल्यामुळे शकून-अपशकुनावर विश्वास ठेवत. काही शुभ कार्यासाठी जायचे असल्यास आणि वाटेत कोणी वस्तरा फिरवलेले भुंडे डोक्याचे दिसल्यास ते जाणे रद्द करून परत फिरत असत. आश्रमात अनुग्रह घ्यायला जात असल्यामुळे आयुष्यातील ते सर्वात शुभ कार्य होते, तो सर्वोत्तम दिवस होता. पुढ्यात डोक्यावर वस्तरा फिरवलेला एक भुंडा माणूस त्यांना दिसला. नंदलालजींच्या डोक्यात सनक आली आणि त्यांचा पारा चढला. विचार केला की आज अनुग्रह घ्यायची संधी सोडायची नाही. परंतु आपल्या शकून-अपशकुनांना देखिल थारा द्यायचा नव्हता. म्हणून त्यांनी असा मार्ग काढला की याच्या डोक्यावर एक उलटी टपली मारतो म्हणजे अपशकून निष्प्रभ होईल. त्याच उद्देशाने त्या माणसाजवळ (संत गुमानी दास जी) घोड़ा नेऊन थांबवला आणि म्हटले की अरे मूढा! तुझे टाळके मूंडून तुला आजचं माझ्यासमोर यायचे होते काय? आज मी माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम कार्य करण्यास आश्रमात जात होतो, असे म्हणून गुमानीदास जींच्या डोक्यावर एक टपली मारली आणि घोड़ा आश्रमाच्या दिशेने घेऊन गेले. संतांना अशा घटना नेहमीच्याच असतात. त्याचा ते अधिक विचार करीत नाहीत. त्यांनी विचार असा केला की व्यक्ति सभ्य आणि कोणी उच्चाधिकारी आणि उच्च कुलातील वाटते आहे. काम मात्र गुराख्या सारखे करतोय. नंदलाल आश्रमात गेले. तिथे संतांचे शिष्य भेटले, राम-राम झाले. येण्याचे कारण सांगितले. घोड़ा वृक्षाला बाँधला आणि संतजींच्या आसनाजवळ अंथरलेल्या पोत्यावर जाऊन बसले. संत गुमानीदास जी फेरफटका मारून व स्नान करून आसनावर बसले तर घोड़ा दिसला. त्यांना समजायला वेळ लागला नाही. नंदलालजींनी पहिले तर शरमेने त्यांची मान खाली गेली होती. गुमानीदास जींना आश्रमातील भक्तांनी सांगितले की हे तहसीलदार आहेत आणि अनुग्रह घेण्यास आले आहेत. नंदलालजींनी संतचरणांवर डोके टेकवले आणि टपली मारण्याचे कारण सांगितले. संत गुमानीदास जी म्हणाले की अरे भक्ता! जेव्हा आपण एक आण्याचा घड़ा घेण्यासाठी कुंभाराकडे जातो, तर त्याला टपल्या मारून मारून वाजवून तपासतो की कुठे फुटलेला तर नाही. तुम्ही तर आयुष्याचा सौदा करायला

**आला आहात. तुम्ही गुरूजींना देखिल वाजवून घेतले, यांनी कुठे पाप तर नाही केले. नितानंद जी संतजींच्या प्रेमळ स्वभावाने प्रभावित झाले. अनुग्रह घेतला संत गुमानी दास जींनी त्यांचे नाव बदलून नित्यानंद ठेवले. जेव्हा सत्संग केल्याने जगण्याचा मार्ग सापडला, तेव्हा नितानंद जी म्हणाले :-**

ब्राह्मण कुल में जन्म था, मैं करता बहुत मरोड़।
गुरू गुमानी दास ने, दिया कुबुद्धि गढ़ तोड़।। (१)

**मग सत्संगाच्या किती आधीन झाले हे या ओवी वरून कळून येते :-**

सिर सौंपा गुरूदेव को, सफल हुआ यह शीश।
नित्यानंद इस शीश पर, आप बसै जगदीश।। (२)

**भावार्थ :- जोपर्यंत सत्संगाचे विचार श्रवण करायला मिळत नाहीत, तोपर्यंत मोहाच्या अमलाखाली माणूस अहंकाराने झिजत राहतो. आज राजा आहे, मृत्यु नंतर गाढव, कुत्रा होईल याचे जेव्हा ज्ञान होते तेव्हा या अहंकाराचे काय होणार? त्यामुळे भक्त आपल्या त्या अड्गे असलेले ते ज्ञान पुसून भक्तिमार्गावर वाटचाल करून जीवन सफल करत आहेत. श्रीलंकेचा राजा रावणाने भक्ति खूप केली, परंतु अहंकार नाहीं गेला. त्यामुळेच त्याचा विनाश झाला. रावण देखिल ब्राह्मण होता. नित्यानंद जी देखिल ब्राह्मण होते. सत्संग श्रवण करून निर्मल झाले. रावणाला सत्संग श्रवण करायची संधीच नाही मिळाली. त्यामुळेच त्याचे जीवन व्यर्थ गेले आणि न मिटणारा कलंक माथी लागला तो निराळाच. नित्यानंद जी म्हटले की माझा जन्म ब्राह्मण कुलात झाल्यामुळे व जातिचा अभिमान असल्यामुळे काहीच साध्य होत नव्हते. जेव्हा गुरुजी गुमानीदास जी यांचे सत्संग श्रावण केले तेव्हा जातिच्या अहंकार रूपी कुबुद्धीचा डोंगर धाराशायी झाला आणि जीवन सफल झाले.(१)**

**वाणी क्रं २ चा भावार्थ : - सत्संग ऐकून नित्यानंद जी भरपूर आधिनी करू लागले. अहंकार सोडून दिला. म्हटले कि मी माझ्या गुरूला माझे डोके दान केले आहे. म्हणजे जसे गुरुजी ठेवेल तसेच राहील. माझे डोके सफल झाले. अन्यथा कोणत्या आजाराने जीवन निघून जाते. आता माझ्या डोक्यावर परमात्माचा निवास आहे. माझी राखण परमात्मा करतात. मला कोणतीच चिंता नाही.**

**नित्यानंदजीचे शब्द :-**

और बात तेरे काम ना आवै सन्तों शरणै लाग रे।
क्या सोवै गफलत में बन्दे जाग-जाग नर जाग रे।।
तन सराय में जीव मुसाफिर करता रहे दिमाग रे।
रात बसेरा करले डेरा चलै सवेरा त्याग रे। और बात-------।
उमदा चाला बना अनमोला लगे दाग पर दाग रे।
दो दिन क गुजरान जगत में जलै बिरानी आग रे। और बात----।
कुबद्ध कांचली चढ रही चित पर तू हुआ मनुष से नाग रे।
सूझै नहीं सजन सुख सागर बिना प्रेम बैराग रे। और बात-----।
हर सुमरै सो हंस कहावै कामी क्रोधी काग रे।
भंवरा ना भरमै विष के बन में चल बेगमपुर बाग रे। और बात---।
शब्द सैन सतगुरु की पहचानी पाया अटल सुहाग रे।
नितानन्द महबूब गुमानी प्रकटे पूर्ण भाग रे। और बात--------।

(वास्तवात वरती लिहिलेला शब्द कबीर साहेबांचा आहे परंतु आम्हास ज्ञान प्राप्त करावयाचे आहे)

**शब्दार्थ :- हे मानव (स्त्री/पुरुष)! परमात्मा कि चर्चा व भक्तिच्या व्यतिरिक्त कोणतीही गोष्ट म्हणजे चर्चा तुझ्या कामाची नाही. आपणास तत्वज्ञान नाही आहे. त्याकरिता मोह ममता व अज्ञानता च्या निद्रेत झोपला आहे म्हणजेच परमात्मास विसरला आहे. जाग-जाग म्हणजे संभाळ आणि संताकडून सत्संग ऐकून आत्मकल्याण करून घे. या मानव शरीतात जीव असा आहे जसा यात्रेकरू कोणत्या तरी हॉटेल मध्ये खोली भाड्याने घेऊन रात्र काढतो आणि सकाळी सोडून आपल्या कामावर निघून जातो. या प्रकारे या शरीररुपी हॉटेल मध्ये जीव यात्री सारखा आहे. जेव्हा मृत्यूची वेळ येईल तेव्हा सकाळ होईल म्हणजे शरीररुपी खोली म्हणजे हॉटेलला सोडण्याची वेळ होईल. आपण शरीर सोडून भक्ति न करता मोकळ्या हाथाने जाल.**

❖ मानव शरीररूपी वस्त्र अनमोल आहे. तत्वज्ञानाच्या अभावाने भक्ति न करता पापावर पाप करून यावर डाग लावत आहे. या संसारात अधिक जीवन नाही. आपल्या परिवाराचे पोषण करणे तसेच धन संचय करण्यासाठी जे त्रास उचलत आहात. पाप करून धन जोडत आहात. मृत्यू नंतर परिवार तसेच धनसंपत्ती बेगानी होईल. यास जोडण्यासाठी केलेले पाप तुला नरकात जाळेल. पाप करून दुसऱ्याच्या आगीत जळून मरू नकोस.

❖ सत्संग ऐकल्याशिवाय पाप-पुण्य तसेच शिष्टाचार चे ज्ञान होत नाही. मानव खोडसाळ बुद्धीचा असतो. मानवतास विसरून आपल्या शक्ती च्या जोरावर निर्बलास त्रास देऊन सापासारखे कार्य करत आहे जो तुझ्या नाशाचे कारण होत आहे. हे सज्ञन पुरुषा! हे ज्ञान बिना प्रेम व खऱ्या मनाने सत्संग ऐकल्याशिवाय भेटत नाही.

❖ जी व्यक्ती भक्ति करते त्यास भक्त म्हणतात म्हणजे हंस पक्षी जसा अहिंसावादी म्हटला जातो अर्थात भक्त कोणास कष्ट देत नाही. हंस पक्षी देखील तलावातील मासे व किडे खात नाही. केवळ मोती खातो. कावळा पक्षी स्वार्थापोटी जिवंत पशु-पक्षाचे मांस तोडून-तोडून खातो. कष्ट देतो. याप्रकारे सत्संग न ऐकणारा व्यक्ती अध्यात्म ज्ञानाच्या अभावाने स्वार्थापोटी अन्य कडून धन लुटतो. चोरी करतो. किंवा अन्य कष्ट देतो जे पाप आहे. हे जीव रुपी भवरा! विषय विकार काम, क्रोध, मोह, लोभ रुपी विषाच्या जंगलात नको जाऊ. हे काल लोक तर कष्टाचे घर आहे. त्याव्यतिरीक्त विना कष्टाच्या सतलोकात चल ती सुखदायक बाग आहे.

❖ नितानंदाने म्हटले आहे कि मी माझ्या गुरुजींचा सत्संग ऐकला आणि त्यांचा संकेत समजलो जो माझ्यावर सांगितला आहे. आपले जीवन धन्य केले आहे. मला माझे प्रिय गुरु गुमानी दास जी भेटले. हे माझे काही पूर्व जन्माचे सौभाग्य आहे.

**शब्द**

तन मन शीश ईश अपने पै, पहलम चोट चढावै।
जब कोए राम भक्त गति पावै, हो जी।। टेक।।
सतगुरु तिलक अजपा माला, युक्त जटा रखावावै।
जत कोपीन सत का चोला, भीतर भेख बनावै।।१।।
लोक लाज मर्याद जगत की, तृण ज्यों तोड़ बगावै।
कामनि कनक जहर कर जानै, शहर अगमपुर जावै।।२।।

ज्यों पति भ्रता पति से राती, आन पुरुष ना भावै।
बसै पीहर में प्रीत प्रीतम में, न्यूं कोए ध्यान लगावै।।३।।
निन्दा स्तुति मान बड़ाई, मन से मार गिरावै।
अष्ट सिद्धि की अटक न मानै, आगै कदम बढावै।।४।।
आशा नदी उल्ट कर डाटै, आढा बंध लगावै।
भवजल खार समुन्द्र में बहुर ना खोड़ मिलावै।।५।।
गगन महल गोविन्द गुमानी, पलक मांहि पहुंचावै।
नितानन्द माटी का मन्दिर, नूर तेज हो जावै।।६।।

**शब्दार्थ : – संत नित्यानंद ने भक्ति ला सफल करण्याची विधी सांगितली आहे. म्हटले आहे कि गुरुजीकडून दीक्षा घेतल्यानंतर परमेश्वरास पूर्ण रूपाने समर्पित झाले पाहिजे. आणि तन मन धनाने आपल्या परमेश्वरास अगोदर चढावा द्यावा म्हणजे सुरुवातीपासूनच कुर्बानी चा भाव बनला पाहिजे. तेव्हा भक्ताची यती म्हणजे मुक्ती होईल.**

❖ वाणी क्रं १ :– काही साधक वेशभूषा करतात. ते कपाळावर टिळा लावतात. माळा हातात घेऊन मंत्र जाप करतात. डोक्यावर मोठे मोठे केस वाढवून ठेवतात. चड्डी च्या ऐवजी केवळ लंगोट (चार इंच रुंदीचे कापड) बांधतात तसेच शरीरावर लांब अंगरखा जो गुढघ्यापर्यंत लांब असतो, घालतात. या बाहेरील दिखाव्याच्या जागी आपल्या गुरूला सन्मान द्या. त्यास डोक्यावर बसवा म्हणजे गुरुचे भक्त बनून प्रत्येक मर्यादा व आज्ञाचे पालन करून लोकांमध्ये उदाहरण बनवा कि भक्त असावा तर असा ज्याच्या गुरुजीच्या शिक्षा–दीक्षा चा परिणाम लांबून दिसला पाहिजे जसे कपाळावरील टिळा लांबून दिसून येतो जी भक्ताची ओळख आहे. भक्ताची ओळख बाहेरील दिखाव्याच्या ऐवजी क्रीयेद्वारा केली जावी. चांगले काम करा, वाईटपासून वाचा. श्वासाच्या जापाची माळा श्वास–उश्वास पासून अजपा जाप करा. डोक्यावर मोठ्या केसांच्या जागी सतगुरु द्वारा सांगितलेल्या भक्ति च्या युक्ती दृढतेने आपलेसे केल्याने केले पाहिजे. युवा स्त्री पाहून मनात दोष येऊ देऊ नका. खरे बोलावे. हे भक्ताचे खरे कपडे आहे म्हणजे भक्त दिसणारा कपडा आहे. खऱ्या ज्ञानाने पत्ता लागतो कि खरी भक्ति करत आहे किंवा आपले जीवन चुकीची साधना करून नष्ट करत आहे.

❖ संसारातील व्यक्तीच्या सवयी व लाजेमुळे भक्ति मध्ये बाधा येऊ देऊ नका. त्या लोक लाज म्हणजे लोक काय म्हणतील, मी सत्संग मध्ये जात आहे, दंडवत करत आहे, परंपरागत भक्ति सोडून दिली आहे. या लोकलाजास काडीसारखे तोडून फेकून द्या म्हणजे त्यास अडचण बनून देऊ नका. कनक म्हणजे सोने तसेच कामिनी म्हणजे सुंदर युवती ला पाहून आपल्या नियती मध्ये दोष येऊ देऊ नका. त्यास विषासमान समजा. तेव्हा साधक अमर लोकात जाऊ शकेल.

❖ आपल्या इष्टदेवास पतिव्रता सारखे समर्पित रहा. जसे पतिव्रता स्त्री आपल्या पती व्यतिरिक्त अन्य कोणत्याच पुरुषास पतीच्या रुपात इच्छा करत नाही. अगर कितीही सुंदर व धनवान असेल. आपल्या परमात्मा च्या भक्तिस केव्हाच विसरू नका. लोक दिखावा न करता हृदयापासून मनातल्या मनात श्वास–उश्वासाने परमात्माच्या नामाचे स्मरण करत रहा. (भक्ताचे तात्पर्य आहे कि स्त्री किंवा पुरुष कोणीही असेल) जसे पतिव्रता स्त्री आपल्या माहेरी जाते तेव्हा ती आपल्या परिवारास माहित होऊ देत नाही कि ती आपल्या पतीची आठवण काढत आहे. या प्रकारे साधकाने आपले ध्यान प्रभु च्या चिंतनात लावावे (३)

❖ पूर्ण सतगुरुकडून सत्य भक्ति प्राप्त केल्यानंतर कोणी भक्ताची निंदा करतात तर वाईट समजू नका. जर कोणी प्रशंसा करत असेल तर प्रभावित होऊ नका. सत्य भक्ति शास्त्रानुसार विधी विधानाने केल्याने साधकास काही सिद्दी प्राप्त होऊन जातात ज्या मोक्ष मार्गात मदत करत नाही. त्या आठ आहेत. त्याद्वारा साधक कोणास नुकसान, कोणास फायदा देऊन आपली भक्ति नष्ट करतात. तो चमत्कार दाखवून प्रसिद्ध होऊन जातो, परंतु त्याचे भविष्य नरक बनून जाते. पशु पक्षांच्या जन्मास जातो. याकरिता मोक्ष प्राप्ति ची इच्छा करनारे साधक या आठ सिद्धीच्या फुकटच्या प्रभुतामध्ये अडकू नये. यांना त्यागून मोक्ष प्राप्ति च्या उद्देशाने याच्या पुढील आशा करा, पुढे जावा. (४)

❖ या पृथ्विलोकातील धन–वैभव, राज, संपती कि अनेक इच्छारुपी नदीस थांबवा. बांध घाला म्हणजे दृढ निश्चयरुपी मजबूत बांध लावा. संसाररूपी खार म्हणजे दु:खाने भरलेल्या समुद्रात पुन्हा जन्म घेऊ नका.(५)

❖ ज्या देवताची भक्ति गुरु सांगतात, तो गुरु आपल्या अनुयाईनां त्या देवताच्या ठिकाणी जे आकाशात आहे, पोहोचण्यासाठी पूर्ण मदत करतात. नित्यानंदजिचे गुरु गुमानी दास जी श्री विष्णूचे भक्त होते. नित्यानंदाने त्यांच्याच प्राप्तिची महिमा सांगितली आहे. तसेच म्हटले आहे कि आपल्या साधनेच्या शक्तीस सुरक्षित ठेवल्याने जे सूक्ष्म शरीर जे स्थूल शरीराच्या आत आहे ते भक्ति च्या शक्तीने तेजोमय होऊन जाते. जर भक्ति नाही करत तर ते शरीर मातीसमान आहे. या शब्दाने हे प्रमाणित झाले आहे कि जसे खेळाडू जिल्हा स्थरावर खेळतो तर खेळाचे नियम तेच असतात जे आंतरराष्ट्रीय स्थरावर खेळ खेळण्याचे असतात. नित्यानंद तर राज्य स्थरावर खेळ खेळत होते. त्यास सफल केले. आम्ही परमात्मा कबिरांना इष्ट मानून भक्ति करत आहे, नियम तेच आहेत. आम्ही आंतरराष्ट्रीय स्थरावरील खेळाडू आहोत. (६)

संत नित्यानंदजींनी आपल्या जीवनाचा शेवटचा दिवस जटैला तलावात भक्ति करून व्यतीत केला. जटैला तलाव भिवानी जिल्ह्याच्या दादरी तहसीलमधील अनेक गावांच्या सीमेवर आहे. (गाव–माजरा, बिगोवा, बास इत्यादीच्या सीमेवर आहे.) संत नित्यानंद जी श्री विष्णु जींची (श्री कृष्ण) भक्ति करत असत. त्यांचे गुरू श्री गुमानीदास जी हे दिल्लीचे संत श्री चरणदास वैष्णव यांचे शिष्य होते. साधकांनी याच पुस्तकामधील पृष्ठ २३१ वर ''सृष्टि रचना'' अभ्यासावी. संत नित्यानंदजींना कोणत्या दर्जाचा मोक्ष प्राप्त झाला आहे याचे आपणास ज्ञान होईल. संत गरीबदास जींना परमात्मा कबीर जी भेटले होते. त्यांनी संत गरीबदास जींना सांगितले होते या की संत–भक्त कोणत्याही स्तरावर भक्ति करत असो, तो आदरणीय आहे. परंतु जोपर्यंत दोन अक्षरांची खरी नामस्मरण दीक्षा देणारा परम सतगुरु (पूर्ण गुरू) भेटत नाहीं, तोवर ना शिष्याची ना त्या गुरूची मुक्ति आहे.

गरीब, साध सब नेक हैं, आप आपनी ठौर।<br>
जो निज धाम पहुँचावहीं, सो साधु कोई और।।<br>
गरीब, साध हमारे सगे हैं, ना काहू को दोष।<br>
जो सारनाम बतावहीं, सो साधु सिर पोष।।

**शब्दार्थ :–** संत गरीबदास जींने म्हटले आहे कि जो परमात्मा चा सत्य मार्ग सांगत आहे, ते चांगले आत्मा आहेत. त्यांचा उद्देश चुकीचा नाही. जो जेथपर्यंतचे ज्ञान ठेवत आहे. तो त्या ठिकाणावर योग्य आहे म्हणजे जसे कोणी विष्णूची साधना सांगतात, कोणी शिवची तर

कोणी ब्रह्मा ची साधना वेदानुसार करतात तसेच करून घेतात. ते त्या स्थिती पर्यत ठीक आहे. परंतु त्या साधनाने जे नीज धाम म्हणजे सनातन परम धाम (सतलोक) प्राप्त नाही होऊ शकत. जे संत सतलोक प्राप्ति चे मार्गदर्शन करतात ते संत उपरोक्त संता पेक्षा भिन्न आहेत.

जे संत परमात्मासाठी प्रयत्नशील आहेत ते सर्व संत आमचे सक्खे म्हणजे नातेवाईक आहेत. आमचे खास साथी आहेत. यांना आम्ही दोष नाही देत कारण यांना पूर्ण मोक्ष मंत्र सारनाम चे ज्ञान नाही. या संताचे शिष्य बनण्याने जीवाचा पूर्ण मोक्ष होत नाही, जन्म मृत्यू होत राहतो. जे संत सारनामाची दीक्षा देतात ते आमच्या डोक्यावरील मुकुट आहेत. ते डोक्यावर ठेवण्यायोग्य आहेत अर्थात विशेष आदरणीय आहेत.

श्री विष्णुजींना जन्म-मरण आहेच. त्यामुळे साधकांना गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये प्रतिपादन केलेला मोक्ष प्राप्त होणार नाही. त्यात असे म्हटले आहे की ''तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान प्राप्त केल्यानंतर जिथे गेल्यानंतर साधक परत फिरून मृत्युलोकात कधीही परत येणार नाही अशा परमात्माच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे.'' ज्या परमात्माने संसाररुपी वृक्षाची रचना केली आहे आणि त्याचा विस्तार ज्याच्या पासून झाला आहे, त्या परमात्माचीच भक्ति करा.

हिन्दु धर्मातील गुरूजन सांगतात की गीताचे ज्ञान श्रीकृष्णजींनी अर्जुनाला प्रदान केले. श्री कृष्ण जी हे श्री विष्णुजीचे अवतार म्हणजेच स्वतः श्रीविष्णु जी समजले जातात. श्रीमद्भगवत गीताच्या अध्याय ४ श्लोक ५ मध्ये गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णजींनी म्हटले आहे की हे अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. तूला माहित नाही, मी सगळे जाणतो. (यावरून हे स्पष्ट होते की श्री विष्णु जी नाशवंत आहेत. जन्म-मृत्यु तर होतच असतो.) श्री देवीपुराणाच्या तीसऱ्या स्कंदात स्वतः विष्णुजींनी म्हटले आहे की मी (विष्णु), ब्रह्मा आणि शिव यांचे जन्म - मरण आहेच. आमचे तर अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यु) होतच असतात. {यावरून देखिल स्पष्ट आहे की श्रीविष्णु जी अविनाशी नाहीत. गीता अध्याय २ श्लोक १७, गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये देखिल अविनाशी परमात्मा तर गीता ज्ञान दात्यापेक्षाही भिन्न असल्याचे म्हटले आहे. मग गीता अध्याय १८ श्लोक ६२ में गीता ज्ञानदात्याने म्हटले की हे भारत! सर्वभावाने तू त्या परमात्माला शरण जा. त्या परमात्माच्या कृपेनेच तू परम शांति आणि सनातन परमधामाला प्राप्त होशील.}

या प्रमाणांवरून सहज लक्षात येते की श्री नित्यानंदजींना गीतात वर्णन केल्यानुसार पूर्ण मोक्ष प्राप्त झाला नाही. कबीर जींनी म्हटले आहे की :-

जो जाकि शरणा बसै, ताको ताकी लाज।<br>
जल सौंही मछली चढ़े, बह जाते गजराज।।

भावार्थ :- जो भक्त ज्याही देवी-देवाची भक्ति करतो आहे, ते इष्ट देव त्याला सुख अवश्य देतात. सामान्य लोकांसाठी ती देखिल अशक्य कोटीतील गोष्ट आहे. उदाहरण म्हणून एखाद्या व्यक्तिने ठाणे अमलदाराची सेवा केली आणि त्याच्याशी मैत्री ठेवली तर तो अंमलदार आपल्या मित्राला ठाण्यात आल्यावर खुर्चीवर बसवतो. चहा नाश्ता देतो. हे सामान्य व्यक्तिंसाठी असंभवच आहे. म्हणजे सामान्य व्यक्तिसाठी अघटीतच आहे. जर कोणत्या माणसाने पोलिस अधीक्षकाशी ओळख ठेवली असेल, तर त्याला अधिक लाभ होतो. त्याच प्रकारे आपण अजून वर गेलो तर जर राज्याच्या मुख्यमंत्र्याशी ओळख असेल तर जो लाभ होईल, तो खालच्या पातळ्याशी तुलना करता अघटितच असेल. अशाच प्रकारे जर देशाच्या पंतप्रधानांशी ओळख

असल्यास जो तो लाभ होईल, त्याला तर पारावारच नाही.

लेखक हेच सांगू इच्छितो की जरी कोणत्याही देवी-देवतेची भक्ति केल्यावर तो लाभ तर सगळ्यांनाच मिळतो, परंतु जो लाभ पूर्ण परमात्माची भक्ति केल्याने होते, तर तो पूर्ण लाभ होतो. जरी प्रधानमंत्री एक व्यक्ति असले तरीही त्यांच्या सोबत देशातील सर्व मुख्यमंत्री, मंत्री आणि अन्य अधिकारी-कर्मचारी असतात. सगळे त्यांना सहकार्य करतात. विरोधाला तिथे स्थानच नसते. त्याच प्रकारे पूर्ण परमात्माची भक्ति करणारे भक्त जगातील सर्व देवी-देवतांचे भक्त होतात. ते त्यांची शक्य ती सर्व मदत करतात. बाधा निर्माण करीत नाहीत. जरी एखादे भूत-पिशाच्च, प्रेत, भैरव, वेताळ यांनी पूर्ण परमात्माच्या भक्ताचे नुकसान करण्याचा विचार जरी केला तरी सर्व देवी-देवताच त्यांना दूर करतात आणि सांगतात की तुम्हाला माहित नाही, तो कोणाला शरण गेला आहे ते. मग त्या शक्ति घाबरून कोणालाही हानि करण्याची हिम्मत करत नाहीं. जर चुकून एखाद्या भूत-प्रेताने परमात्माच्या भक्ताशी काही छेड़छाड़ केलीच, तर त्याला परमात्माचे गण पकड़ून नेतात आणि त्याची पिटाई करून त्याला कोठडीत बंद करून ठेवतात. परमात्मा कबीर जींनी म्हटले आहे की :-

एकै साधै सब सधै, सब साधें सब जाय।
माली सींचै मूल को, फूलै-फलै अघाय।।

शब्दार्थ :- आंबा किंवा अन्य वृक्षाचे रोपाच्या मुळास जमिनीत खड्डा करून लावले जाते. मुळाची सिंचाई केली जाते. एका मुळाची साधना अर्थात पूजा केल्याने रोपाचे सर्व अंग विकसित होतात. रोप चांगल्या पद्धतीने फुलते. रोप झाड बनून सावली, लाकडे तसेच फळ देतात. जर त्या रोपाच्या फांद्या जमिनीतील खड्यात लावून सर्व फांद्यांची सिंचाई केल्यास आणि मुळाची सिंचाई न केल्यास तर सर्व काही नष्ट होऊन जाईल. माळी म्हणजे रोप लावणारा जाणकार ज्यास माळी म्हणतात, जो मुळाच्या बाजूने रोप जमिनीत लावतो, मुळाची सिंचाई करतात. लाभ घेतो. याचप्रकारे तत्वदर्शी संत संसार रुपी रोपट्याची मूळ म्हणजे परम अक्षर ब्रह्मास इष्ट मानून पूजा करतो तसेच करवून घेतो. तो त्या एकाची पूजा करून घेऊन सर्व देवतांना साधन घेतो. सर्व देवता त्याच सतपुरुषच्या आज्ञामध्ये चालतात. साधकाचे कार्य सिद्ध करतात. जर सर्व देवांची पूजा करेल तर सतपुरुष नाराज होईल. त्याच्या आज्ञा व्यतिरिक्त देवता काहीच करत नाहीत म्हणजे साधकाची साधना शास्त्र विरुद्ध असल्याने काहीच लाभ मिळत नाही.

त्यामुळेच पूर्ण परमात्माची भक्ति करा. वर्तमानात माझ्या (रामपाल दास) शिवाय जगात कोणाकडेच सत्य ज्ञान नाहीं आहे. आपण येथून अनुग्रह घ्यावा आणि आपले आणि कुटुंबाचे कल्याण करून घ्यावे.

## ''पंडित मणीराम कथाकाराची गोष्ट''

पंडित मणीराम नावाचा एक कथावाचक पंडित प्रसिद्ध होता. हरियाणा राज्यातील एका गावात रामायण कथेचे आयोजन केले होते. रामायण कथा जास्तीत जास्त अकरा (११) दिवसात पूर्ण होते. मणीराम पंडितजींनी तीस दिवसात पूर्ण केली. विचार हाच केला की जास्त दिवस कथा केली, तर रोज दक्षिणा चांगली मिळेल. त्यायोगे अधिक दक्षिणा प्राप्त होईल. तीस दिवस सांगितलेल्या कथेत मनीराम पंडितांना फक्त तीस रूपयेच मिळाले. गावातील काही लोकांनी ज्या दिवशी मणीरामांच्या कथेची समाप्ती होती, त्याच दिवशी त्याच वेळेत दिल्लीची

नाचगाणी करणारी प्रसिद्ध नर्तिका चम्पाकलीचे नाच–गाणे ठेवले होते. सगळे गाव नाच–गाण्याचा कार्यक्रम पाहण्यासाठी लोटले होते. दोन तासात चम्पाकलीला पाचशे रूपये मिळाले. मणीरामजींना तीस दिवसात एकूण फक्त तीस रूपयेच मिळाले. पंडितजींना अतिशय वाईट वाटले. त्याच्या वाटेतच छुड़ानी गाव होते. मणीरामजींना माहिती होते की इथे परम संत गरीबदास जी राहतात. त्याना भेटून पुढे जाऊया. संत गरीबदास जींच्या इथे गावातील आणि आसपासच्या गावातील (खेडूत) दहा–बारा भक्त बसले होते. त्याच वेळी पंडित मणीराम जी तिथे पोहोचले. संत गरीबदास जींना प्रणाम केला, राम–राम केले. संत गरीबदास जींनी देखिल राम–राम म्हटले आणि उचित आसन देऊन बसविले. ख्याली खुशाली विचारता मणीराम म्हणाले, महाराज! कलयुग आले आहे हे नक्की. धर्माचा नाश झाला आहे. जीव अगदी गळ्याशी आला आहे म्हणजेच लोकांची धर्मावर असलेली श्रद्धा संपली आहे. आकाश आणि जमीन फाटले तरी आश्चर्य वाटायला नको आहे. उपस्थित भक्तांनी विचारले की पंडितजी! असे काय झाले? मणीराम जी म्हणाले की काय सांगू आता? संत गरीबदास जींना तर सगळे माहित आहे. भक्तांनी विचारले की महाराजजी! असे काय घडले ज्यामुळे पंडितजींना वाईट वाटले? संत गरीबदास जींनी म्हटले की :–

गरीब, फूटि आँख विवेक की, अंधा है जगदीश।
चम्पाकली को पाँच सौ, मनीराम को तीस।।

भावार्थ :– ज्या जगदीश नामक इसमाने जाणून–बूजून खोडी काढून मणीरामजींच्या कथेच्या शेवटच्या दिवशी नाच–गाणे करणाऱ्या चम्पाकलीचा कार्यक्रम ठरविला, तो ज्ञानहीन अंध आहे. गावातील लोकांनी देखिल त्यांची सद्सदविवेकबुद्धी गहाण टाकली होती म्हणजेच त्यांनी देखिल असा विचार नाहीं केला की धर्म कथा सुरु आहे. त्याच्या विरुद्ध असे अभद्र पद्धतीने काही करू नये. साधकहो! मणीरामजींनी अकरा दिवसात पूर्ण होणारी कथा अधिक दक्षिणा प्राप्त करण्याच्या मोहाने तीस दिवसापर्यंत वाढवली. गावातील काही उचापतखोर लोकांना मणीरामजीचा हा अंतस्थ हेतू माहित होता. म्हणूनच त्यांनी पंडितजींना धडा शिकविण्यासाठी नृत्यांगनेला आमंत्रित करून महापाप केले आहे. संत गरीबदास जींच्या मुखातून हे सत्य ऐकून मणीरामजींच्या आश्चर्याला पारावारच उरला नाही. ते हाच विचार करीत होते की आज ११:३० वाजता सकाळी प्रसाद घेऊन मी सरळ इथेच आलो. संत गरीबदास जींना कसे काय माहित पडले हे सगळे? ते तर परमात्मा आहेत. सगळे जाणतात. मणीराम आसनावरून उठला आणि संत गरीबदास जी च्या पायांवर लोटांगण घालून म्हणाला, प्रभु! आपले म्हणणे खरेच आहे. मी लालसेपोटीच कथा अधिक काळ लांबवली. आपन तर सर्वज्ञ आहात. हे प्रभु! धर्म–कर्म आणि जगण्याचा खरा मार्ग मला दाखवा. तेव्हा संत गरीबदास जींनी सत्संग करून त्या पुण्यात्मा मणीरामजींना सांगितले की :–

मणीरामजी! तुम्ही पाठ करून जनतेकडून धन गोळा करता, ते आपल्यावर कर्जच आहे. हे व्याजासहित परतफेड करावे लागते. आपल्याला यथार्थ आध्यात्मिक ज्ञान नाहीं आहे. आपण कथा–पाठ आणि सत्संग करण्यासाठी देखिल अधिकारी नाहीं आहात. आपण लोकांना आकर्षित करण्यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालता आहात, (ही वैष्णव पंथाची खुण आहे. एका माळेत १०८ (एकशे आठ) रूद्राक्ष ओवलेले असतात आणि मंत्रजप/नामस्मरण करण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. संतसज्ञन तिचा उल्लेख सुमरणी असा करतात.) मस्तकावर तिलक रेखला आहे. पीतांबर वस्त्र धारण केले आहे. संत गरीबदास जींनी ओवीतून समझावले आहे की :–

कण्ठी माला सुमरणी, पहरे से क्या होय।
ऊपर डूंडा साधु का, अन्तर राखा खोय।।

**भावार्थ :- मणीरामजी! वरवरच्या या पेहरावामुळे आपण साधु वाटता खरे, पण तुम्ही नुसते त्याचे अवडम्बरच माजविले आहे. तुमच्या वेशभूषेला भुलून भक्तसमाज तुमची सेवा तर करेल, पण आतमध्ये साधुत्वाचे गुण बिल्कुलच नाहींत. मोहामुळे अंतःकरण मलीन झाले आहे. साधुत्व हरविले आहे म्हणजेच संत भाव नाहीं. त्यामुळे तुळशीची माळ-सुमरणी-घातली म्हणजे संत होत नाही. आत्म-कल्याणासाठी परम संताचा अनुग्रह घेऊन व आजीवन त्या मर्यादांचे पालन करून भक्ति केल्यास कल्याण होते. आपण पाठ करण्याचे अधिकारी नाहीं आहात. अधिकारा शिवाय पाठ करणे ही यजमानाची फसवणूक आहे. आपले पूर्वज ऋषिजन वास्तविक पंडित होते. विद्वान पुरूष होते. त्यांनी अशी चूक केली नसती. संत गरीबदास जींनी उदाहरणाद्वारे समजावले आहे की :-**

## ''राजा परीक्षिताचा उद्धार''

**ज्या वेळेस राजा परिक्षितला तक्षक सर्प चावून मृत्यु येईल असा ऋषिनी शाप दिला तेव्हा त्याचा उद्धार करण्यासाठी श्रीमद् भागवत (सुधा सागर) या ग्रंथाचे सात दिवस पारायण करायचे ठरले. पृथ्वीवरील सर्व ऋषि आणि पंडितांना श्रीमद् भागवत कथा राजा परीक्षितला सांगण्यासाठी आग्रह करण्यात आला. हे सर्व वास्तविक पंडित होते. ते परमात्माचे वचन जाणत होते. सातव्या दिवशी इष्ट फळ मिळेल याबद्दलही त्यांना शंका नव्हती. सातव्या दिवशी परिक्षित राजाचे काय होणार याकडे जगातील बुद्धिजीवी लोकांची दृष्टि लागलेली होती. पृथ्वीवरील सर्व पंडितांनी श्रीमद् भागवत ही कथा ऐकवण्यास नकार दिला आणि सांगितले की आम्ही ती कथा ऐकवण्यास अधिकारी नाही आहोत. कोणत्याही माणसांच्या जीवनाशी खेळ करण्याच्या पापात ते वाटेकरी होणार नाहीत. ज्या वेदव्यास जींनी श्रीमद्भागवत लिहिले होते, त्यांनीदेखिल कथा ऐकवण्यास नकार दिला. सर्व ऋषिंनी सांगितले की स्वर्गातून ऋषि सुखदेवजींना या कामासाठी बोलाविण्यात यावे. त्यांना कथा ऐकवण्याचा अधिकार आहे. राजा परिक्षित कडून स्वर्गात सुखदेव ऋषिना आमंत्रण गेले. काही कालावधीसाठी नरक भोगून युद्धिष्ठिर स्वर्गात पुण्य फळ भोगत होता. त्याने वंशाच्या मोहाला बळी पडून अर्जुनाचा नातू असलेल्या परीक्षितीचा उद्धार होण्यासाठी आपल्या गाठीचे काही पुण्य सुखदेव (शुकदेव) ऋषिना दान केले. त्या पुण्याचे मूल्य म्हणून श्री शुकदेव ऋषि जी विमानात बसून पृथ्वीवर परीक्षित राजाला श्रीमद्भागवत कथा ऐकवण्यास आले. सात दिवस कथा ऐकवून परिक्षितला राज्य आणि कुटुंबाचा पडलेला मोह समाप्त केला. तक्षक सर्पाने परीक्षित राजाला कथेच्या कालावधीतच दंश केला आणि त्याच वेळेस राजाचा मृत्यु झाला. परंतु कथा श्रवण केल्याने परिक्षितचे लक्ष प्रपंचातून कमी होऊन स्वर्गसुखाकडे लीन झाले होते. राजा म्हणून परीक्षित याने अनेक मोठे मोठे धर्म यज्ञ केले होते. त्यामुळे भरपूर पुण्यसंचय झाला होता. म्हणून परमात्माने असे सांगितले आहे की :-**

कबीर, जहाँ आशा तहाँ बासा होई। मन कर्म वचन सुमरियो सोई।।

**शब्दार्थ :- गीता अध्याय ८ श्लोक ६ मध्ये देखिल याचेच प्रमाण आहे की ''हे भारत! परमात्माचे असे आश्वासन आहे की जो अन्तसमयी ज्या भावात असतो म्हणजेच श्रद्धा ठेवून स्मरण करत असतो, तेच त्याला प्राप्त होते.'' त्याच आश्वासनानुसार राजा परीक्षितचा जीव स्थूल शरीर त्यागून (तो देह तर सर्पाच्या विषामुळे मृत्यु पावला होता) सूक्ष्म शरीरयुक्त शुकदेव**

ऋषि सोबत विमानात बसून स्वर्गात गेला.

संत गरीबदास जी (छुड़ानी गाव, झज्जर जिला) यांनी मणीरामजींना सांगितले की शुकदेव ऋषि कडून ऐकलेल्या कथेमुळे राजा परीक्षितीचे लक्ष प्रपंचातून स्वर्गप्राप्तिसाठी उद्युक्त झाले. त्यामुळे त्या जन्मात केलेल्या पुण्याईचे फळ म्हणून मृत्युपश्चात स्वर्गाला प्राप्त झाला. जन्म–मरणाचे चक्र अजून शिल्लक आहे. काल ब्रह्म लोकात स्वर्ग–महास्वर्ग (ब्रह्मलोक) प्राप्तिलाच उद्धार झाल्याचे मानले जाते. जो संपुर्ण आध्यात्मिक ज्ञानाच्या अभावाचा परिणाम आहे. काल ब्रह्म लोकातील उद्धारदेखिल पृथ्वीवरच्या कोण्या ऋषि पंडिताच्या स्तराचा नसतो कारण यांच्या पाठ व कथा म्हणजेच सत्संगात मान–मरातबाचा उद्देश असतो. प्रसिद्धिसाठी एकमेकांशी इर्षा करण्याचा देखिल या ऋषिंचा प्रयत्न असतो व तशी इच्छा पण असते. शुकदेव जी एक संत असलेल्या जनकजीचे शिष्य होते. राजा जनकाला परम परमात्मा कबीर जी भेटले होते. त्यांना सोहं मंत्राचा नामजप दिला होता. राजा जनकाचे शुकदेव जी हे प्रमुख आणि प्रिय शिष्य होते. जनकजींनी हा मंत्र केवल शुकदेवजींना दिला होता. त्यामुळे शुकदेवांचा स्वर्ग कालावधी अधिक आहे. राजा जनकाची काल–ब्रह्मने फसवणूक केली होती. त्यांनी आपले अर्धे पुण्य नरक भोगणाऱ्या बारा कोटी जीवांना दान केले होते. त्यामुळे त्यांचा स्वर्गातील कालावधी कमी झाला आणि ते सन् १४६९ मध्ये भारत देशातील पंजाब प्रान्तातील श्री कालूराम मेहता (खत्री–अरोड़ा) यांच्या घरी श्री नानक नावाने जन्मले होते. (वर्तमानात हे गाव पाकीस्तान देशात आहे.) शुकदेवांना पृथ्वीवर कोणाशीही कसलाही द्वेष आणि इर्षा किंवा मान–मरातब करण्याची इच्छा नव्हती. त्यांचेकडून ऐकलेल्या कथेचा प्रभाव परिक्षितच्या मनावर पड़ला. त्या कारणामुळेच त्यांचा स्वर्गवास झाला. जरी अन्य ऋषिंकडून कथा ऐकली असती तरीही राजाचे मन राज्य व कुटुंबात घोटाळत राहिले असते. त्यांचा पृथ्वीवर पुनर्जन्म झाला असता. राजा होऊन पुण्य नष्ट केले असते.

संत गरीबदास जी म्हणाले की मणीराम! जोपर्यंत जीवाचे जन्म–मरण समाप्त होत नाहीं तोवर त्याला परम शांति होत नाहीं. मग राजा होऊन राज्याच्या होणाऱ्या लाभ–हानिची काळजी जाळत असते. निर्धन होऊन हालापेष्टा भोगतो. मग पशु–पक्षी इत्यादी शरीरांमध्ये हालापेष्टा भोगतो. आपण श्री विष्णु जी उर्फ श्री कृष्णजीचे भक्त आहात (वैष्णव साधु श्री विष्णुजींना ईष्ट रूपात मानतात.) श्री कृष्ण म्हणजेच श्री विष्णुजींनी श्रीम्दभागवत गीताचे ज्ञान अर्जुनाला ऐकवले असेही तुम्ही मानता. गीताज्ञान ऐकवणारा गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये स्पष्ट करतात की माझ्यापेक्षा अन्य कोणीतरी परमेश्वर आहे. हे भारता! तू सर्वभावाने त्या परमात्माला शरण जा. त्या परमात्माच्या कृपेनेच तू परम शांति आणि सनातन परमधामाला (सत्यलोक) प्राप्त होशील.

गीता अध्याय ७ श्लोक २९ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की जो साधक वृद्धावस्था आणि मृत्यु पासून सुटका म्हणजेच मोक्ष प्राप्तिसाठी प्रयत्नशील आहेत. (काल लोकांचे राज्य आणि स्वर्ग–महास्वर्गयांची देखिल इच्छा बाळगत नाहीत) ते तत् ब्रह्म पासून संम्पूर्ण अध्यात्माशी आणि सर्व कर्मांशी परिचितआहेत.

❖ गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये अर्जुनाने गीता ज्ञान दात्याला प्रश्न विचारला आहे की ज्या तत् ब्रह्म विषयी अध्याय ७ मधील श्लोक २९ मध्ये जे म्हटले आहे ते तत् ब्रह्म काय आहे? त्याचे उत्तर गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ मधील श्लोक ३ मध्ये दिले आहे. ते म्हणतात की ते परम अक्षर ब्रह्म आहेत.

गीता अध्याय ८ मधीलच श्लोक ५ आणि ७ में गीता ज्ञान दात्याने त्याची भक्ति करण्यास सांगून त्याद्वारेच त्याची प्राप्ति होईल असे सांगितले आहे आणि गीता अध्याय ८ मधील श्लोक ८, ९ व १० अनुसार त्याच्या पेक्षा अन्य परम अक्षर ब्रह्मची भक्ति केल्यास त्यामुळे त्याची प्राप्ति होत असल्याचे सांगितले आहे.

गीता अध्याय २ श्लोक १२, अध्याय ४ श्लोक ५, अध्याय १० श्लोक २ मध्ये गीता ज्ञान दात्याने असे सांगितले आहे की हे अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत आणि पुढे देखिल होत राहतील.

गीता अध्याय २ श्लोक १७ मध्ये जो अविनाशी परमात्मा म्हटले आहे आणि अध्याय १५ श्लोक १६-१७ मध्ये तीन पुरूष (प्रभु) सांगितले आहेत. श्लोक १६ मध्ये क्षर पुरूष आणि अक्षर पुरूषाचे वर्णन आहे. दोघेही नाशवंत आहेत असे सांगितले आहे. मग अध्याय १५ श्लोक १७ मध्ये अविनाशी परम अक्षर ब्रह्म विषयी सांगितले आहे. तोच उत्तम पुरूष म्हणजेच सर्वश्रेष्ठ परमात्मा असल्याचे म्हटले आहे. तेच तिन्ही लोकांचे पालन-पोषण करतात, खरेतर तेच अविनाशी आहेत. गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञानदात्याने स्पष्ट केले आहे की तत्वदर्शी संतांची कृपा झाल्यावर जिथे पोहोचल्यावर साधक परत फिरून या मृत्युलोकात येत नाहीत अशा परमात्माच्या त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे. ज्या परमात्मामुळे या विश्वरुपी वृक्षाचा प्रवृति विस्तार झाला आहे म्हणजेच ज्याने या विश्वाची रचना केली आहे, त्याच परमात्माची भक्ति केली पाहिजे. (गीताचा उल्लेख समाप्त)

संत गरीबदास जींनी मणीरामला सांगितले की परम अक्षर ब्रह्म म्हणजेच तत् ब्रह्मची भक्ति माझ्या (संत गरीबदास जी) जवळ आहे. जर आपल्याला पूर्ण मोक्ष प्राप्त करायचा असल्यास अनुग्रह घ्या आणि स्वतःचे कल्याण करवून घ्या. मणीरामजीचे गीतातील सर्व श्लोक मुखोद्गत होते. काय समजायचे त्वरित समजले आणि अनुग्रह घेऊन पाखंण्डाचा त्याग करून कल्याण करवून घेतले.

## ''पंडीताची व्याख्या''

विद्वान माणसाला पंडित म्हटले जाते. माझे पूज्य गुरू जी ब्राह्मण जातित बड़ा पैंतावास गावात, तहसील-चरखी दादरी, जिल्हा भिवानी (हरियाणा) येथे जन्मले होते. ते स्वतःला कधीही पंडित म्हणवून घेत नसत.

माझ्या गुरुजींचे गुरु दिल्लीच्या नजफगढ़ जवळील छावला गावचे जाट होते. ते लहान वयातच संत गंगेश्वरानंदजींच्या सत्संगाने प्रभावित होऊन त्यांचे सोबत हरिद्वारला गेले. संत गंगेश्वरानंदजींनी त्यांना काशी विद्यापीठात शिकण्यासाठी ठेवले. त्यांची बुद्धिमत्ता तीक्ष्ण होती. चार विषयात आचार्य पदवी प्राप्त केली. त्यामुळे त्या जाट असूनदेखिल त्यांना पंडित चिदानंद म्हणून हाक मारली जात असे. हरियाणा राज्यातील सोनीपत जिल्ह्यातील खरखोदा तहसील मधील गोपालपुर गावात त्यांचा आश्रम आहे. तिथे पाटी आहे, ''पंडित चिदानंद जी (गरीब दासी) आश्रम, गोपालपुर.'' त्यांचे नाव चिदांनद जी असे होते. कोणी ब्राह्मण बंधूने वाईट वाटून घेऊन नये म्हणून पंडिताची परिभाषा सांगणे अनिवार्य होते म्हणून सांगितली.

## ''सुदामा जी पंडीत होते''

सुदामाजीचा ब्राह्मण कुलात जन्म झाला होता. घरात अठराविश्वे दारिद्र्य होते. अनेक वेळा मुले भुकेल्या पोटी झोपी जायची. सुदामाजींच्या धर्मपत्नीला हे माहिती होते की द्वारकेचा

राजा श्रीकृष्ण जी हे सुदामाजीचे चांगले मित्र आहेत. पत्नीने अनेकवेळा म्हणून पाहिले आपण आपल्या मित्राकडे राजा श्रीकृष्णाकडे काही पैसे मागून आणा. सुदामा जी म्हणायचे की मागणे हे पंडितांचे काम नव्हे. परमात्माचे नियम समजून घेऊन त्याला अनुकूल असे जीवन व्यतीत करायचे असते. गरीबदास जींनी देखिल म्हटले आहे की :–

गरीब, नट, पेरणा कांजर सांसी, मांगत हैं भठियारे।
जिनकी भक्ति में लौ लागी, वो मोती देत उधारे।।
गरीब, जो मांगै सो भड़वा कहिए, दर–दर फिरै अज्ञानी।
जोगी जोग सम्पूर्ण जाका, मांग ना पीवै पानी।।

शब्दार्थ :– ''नट'' हे लोक जनता मध्ये काही खेळ दाखवतात. जसे लांब बांबूस जमिनीत न गाडता त्याच्यावर चढणे जे वेगळे व कठीण कार्य असते. त्या खेळाच्या समाप्ती नंतर वाटी घेऊन तमाशा (खेळ) बघण्यासाठी उपस्थित असणाऱ्या गर्दीमध्ये रुपये पैसे मांगतात. याच प्रकारे अन्य जातीच्या व्यक्ती कंजर, सांसी, भठीयारे आपली कला दाखवून रुपये किंवा धान्य (गहू, बाजरी, डाळ) मागत होते. जर योगी म्हणजे साधक अशा सिद्धीचे प्रदर्शन करून रुपये व धान्य एकत्र करत असतो तर ती त्याची सत्य साधना नाही. जर सत्य साधक असतो, शिष्यांना आशीर्वाद रुपी मोती देऊन धनी बनवतो जे साधकाच्या भाग्याव्यतिरिक्त वेगळे आपल्याकडून उधार स्वरुपात असते. जर संत दारोदार जाऊन मागत असेल तर तो अज्ञानी आहे. त्याच्याजवळ शास्त्रानुसार साधना नाही तो संत नाही भडवा आहे. भडवा चा अर्थ याठिकाणी बेशरम आहे. जोगी म्हणजे साधकाची भक्ति संपूर्ण त्याची समजली जाते जो कोणाकडे काहीच मागत नाही. त्याच्या उदाहरणार्थ म्हटले आहे कि तो साधक वस्तू तर सोडा, पाणी पण देखील मागून पीत नाही.

परंतु पत्नीने वारंवार आग्रह केल्यानंतर विप्र सुदामा जी आपल्या मित्राला श्री कृष्णजींना भेटण्यास त्यांच्याकडे गेले. श्रीकृष्णजींनी त्यांचा विशेष पाहुणचार केला. जाताना सोबत मुठ्भर पोहे घेऊन गेले होते ते देखिल श्रीकृष्णजींनी गोड मानून खाल्ले. त्यांचे पाद्य पूजन देखिल केले व क्षेमकुशल विचारले तेव्हा पंडित सुदामा जी यांनी म्हटले की परमेश्वर! मला कोणत्याच वस्तुची आवश्यकता नाहीं. आपल्या कृपेने सर्व काही ठीक सुरु आहे. एक आठवडा श्रीकृष्णजीकडे थांबून सुदामा जी घराकडे परत निघाले. मला काही दे असे एकदा देखिल म्हणाले नाहीत. त्यांना माहित होते की :–

कबीर, बिन माँगे मोती मिलें, माँगे मिले न भीख।
माँगन से मरना भला, यह सतगुरू की सीख।।

शब्दार्थ :– कबीर परमात्मा ने सांगितले आहे कि जो पूर्ण परमात्मा ची सत्य साधना करतात, त्यास मागितले नाही पाहिजे. मागितल्याने परमात्मा नाराज होतात. त्यास भिक्षा देखील मिळत नाही. तो साधक परमात्मा वर विश्वास ठेवून नाही मागणार तेव्हा परमात्मा त्याची इच्छा पूर्ण करतात म्हणजे मोत्यासारखी बहुमुल्य वस्तू देखील देतात. पूर्ण सतगुरु हीच शिक्षा देतात कि मागितल्याने व्यक्ती तर जिवंत मरून जातो. मागण्यापेक्षा मरने भले. भावार्थ आत्महत्याचा नाही. येथे आपल्या इच्छाना दाबून मृत बनून राहण्यासारखे आहे.

श्रीकृष्ण जी राजा होते. आपल्या मित्राची स्थिति समजून विश्वकर्माजींना आदेश दिला व एक आठवड्याच्या आत सुदामा जी साठी एक राजमहाल बनवून दिला आणि खूप धन देखिल दिले. पंडित सुदामा जी आपल्या धर्माशी व कर्माशी एकनिष्ठ राहिले. त्यामुळेच त्यांना

लाभ झाला. त्यालाच पंडित म्हणतात. मागणाऱ्याला भिकारी म्हणतात. पंडिताची व्याख्या अशी असते.

विषय सुरु आहे :- अनुग्रह घेतल्यानंतर भक्ताची श्रद्धा प्रपंचात आणि परमार्थात कशी असली पाहिजे. त्या विषयी पवित्र कबीर सागर ग्रन्थाच्या ''अनुराग सागर'' अध्यायात परमेश्वर कबीर जींनी आपल्या प्रिय शिष्याला ते खालील प्रकारे सांगितले आहे :-

## अध्याय ''अनुराग सागर'' चा सारांश

अनुराग सागर पृष्ठ ३ ते ५ चा सारांश :-

पृष्ठ ३ ने :- धर्मदास जींनी परमेश्वर कबीरांना प्रश्न विचारला :-

प्रश्न :- प्रभु! अनुग्रह प्राप्तिनंतर परमात्माप्रति श्रद्धा कशी असली पाहिजे?

उत्तर :- परमेश्वर कबीर जी सांगतात की जसे मृग (हरिण) हे शब्दावर आसक्त असते, तसे साधकाने परमात्माशी ध्यान लावावे.

❖ हरणाची (मृग) शिकार करणारा शिकारी एका यंत्रातून विशेष शब्द काढत असतो. तो हरणाला अत्यंत आवडत असतो. जेव्हा त्या शब्दाचा आवाज येतो, तेव्हा हरीण त्या दिशेने चालू लागते आणि शिकारी जो शब्द म्हणत असतो, त्याच्या समोर बसून तोंड जमिनीवर ठेऊन समर्पित होऊन जाते. आपले आयुष्य तिथे पणाला लावतो. भक्ताने त्याप्रमाणे परमात्माला समर्पित होऊन आपले जीवन त्यावर ओवाळून टाकले पाहिजे.

❖ दुसरा उदाहरण :- पतंगाला (पंख असलेला कीड़ा) उजेड अतिशय प्रिय आहे. आपल्याला आवडती वस्तू प्राप्त करण्यासाठी तो दिवा, मेणबत्ती, विजेचा दिवा यावर आसक्त होऊन तो उजेड प्राप्त करण्यासाठी त्यावर उडी घेतो आणि मृत्यु पावतो. त्याचप्रमाणे भक्ताने परमात्मा प्राप्त करून घेण्यासाठी अशी जीवन समर्पीत करण्यासाठी तयारी ठेवली पाहिजे. समाजातील परंपरागत साधना व अन्य शास्त्राविरूद्ध तसेच रीति-रिवाजांचा त्याग आणि सत्य साधना करताना अडचणी येणारच आहेत. त्यावर मात करून आपले साध्य साधले पाहिजे. त्यासाठी तुम्हाला कितीही त्याग करावा लागला तरी मागे हटता कामा नये.

❖ तीसरे उदाहरण :- पूर्वीच्या काळी पत्नी पतीवर इतके प्रेम करायची की पतीचा मृत्यु पत्नीच्या आधी झाल्यास पत्नी मृत पतीच्या चीतेवरच आपले जीवन संपवीत असे. त्यावेळेस घरातील इतर व्यक्ति तिला समजावत असत, तुझी मुले लहान आहेत. तू गेल्यावर त्यांना कोण सांभाळणार? काका-मामा कोणाच्या मुलांना सांभाळत नाहीत.

जोपर्यंत माता-पिता असतात तोपर्यंत कुटुंबातील माणसे प्रेम करण्याची औपचारिकता दाखवतात. खरे तर प्रेम हे आपल्या वाटणाऱ्याच्याच वाट्याला येते. आपल्या या छोट्या मुलांकडे पहा जरा. वडीलांच्या वियोगाने ती रडत आहेत. आईचा पदर धरून तिला थांबवत आहेत. त्या स्त्रीला तिचे सोन्याचे दागिने दाखवले जात आहेत. बघ यांचे काय होईल. किती सुंदर आणि अमूल्य असे हे दागिने आहेत. आपल्या मुलांसाठी तरी राहा. परंतु ती स्त्री प्रेमवश होऊन त्याच चितेत जिवंतपणी जळून मृत्यु पत्करायची, पण मागे हटायची नाही. आधी या प्रकारे एक दोन स्त्रिया सती जात असत. नंतर याला कुलाच्या रीति-रिवाजाचे स्वरूप दिले गेले. पतिच्या मृत्यु पश्चात् स्त्रीला जबरदस्तीने त्याच चितेत जाळले जाऊ लागले आणि त्यातूनच सती प्रथेचा जन्म झाला. नंतर यावरून मोठा संघर्ष होऊन ही प्रथा समाप्त झाली.

या कथेचा सारांश इतकाच की जशी एक पत्नी आपल्या पतिच्या वैराग्यात जिवंत

**जळून मृत्यु पत्करते, व तोंडाने राम–राम घेत चितेत जळून जाते.**

जगत में जीवन दिन–चार का, कोई सदा नहीं रहे।
यह विचार पति संग चालि कोई कुछ कहै।।

**शब्दार्थ :– खूप जुन्या काळी स्त्री आपल्या मृत पती बरोबर जळून मरून जात असत. त्या वेळी तिची आस्था आपल्या पती व्यतिरिक्त कसल्याही धन–संपत्ती, मुले व दागिन्यात नव्हती राहत. ती विचार करत असत कि संसारात आज नाही तर काही दिवसानंतर मृत्यू होणारच. संसारातील व्यक्ती काहीही म्हणतील ती कोणाचीच काळजी करत नसे. याच प्रकारे विचार करून ती स्त्री आपल्या पती बरोबर जळून मरत होती. हि चुकीची पद्धत होती, परंतु त्यावेळी भरपूर महत्व दिले जात होते. आता शिक्षित समाजाने या चुकीच्या प्रथेचा व अत्याचाराचा अंत केला आहे. भक्ति मध्ये दृढता उत्पन्न करण्यासाठी उदाहरण दिले आहे. भक्तास अशीच आस्था परमात्मा प्राप्तिसाठी बनविली पाहिजे. संसाराच्या व्यक्तीने संसारातील गोष्टीवर ध्यान न देता आपल्या उद्देश पूर्तीसाठी दृढ होऊन भक्ति करा. मार्यादाचे पालन करा. खालील वाणीमध्ये हे समजावले आहे कि भक्त सतपुरुषच्या प्राप्तिसाठी असेच रहा. संसारातील नाती व संपतीस विसरून जा केवळ परमात्मा मध्ये ध्यान लावा.**

**हे धर्मदास! अशाच प्रकारे भक्ताचा विचार असला पाहिजे ।**

ऐसे ही जो सतपुरूष लौ लावै। कुल परिवार सब बिसरावै।।१
नारि सुत का मोह न आने। जगत रू जीवन स्वपन कर जानै।।२
जग में जीवन थोड़ा भाई। अंत समय कोई नहीं सहाई।।३
बहुत प्यारी नारि जग मांही। मात–पिता जा के सम नाहीं।।४
तेही कारण नर शीश जो देही। अंत समय सो नहीं संग देही।।५
चाहे कोई जलै पति के संगा। फिर दोनों बनैं कीट पतंगा।।६
फिर पशु–पक्षी जन्म पावै। बिन सतगुरू दुःख कौन मिटावै।।७
ऐसी नारि बहुतेरी भाई। पति मरै तब रूधन मचाई।।८
काम पूर्ति की हानि विचारै। दिन तेरह ऐसे पुकारै।।९
निज स्वार्थ को रोदन करही। तुरंत ही खसम दूसरो करही।।१०
सुत परिजन धन स्वपन स्नेही। सत्यनाम गहु निज मति ऐही।।११
स्व तन सम प्रिय और न आना। सो भी संग नहीं चलत निदाना।।१२
ऐसा कोई ना दिख भाई। अंत समय में होय सहाई।।१३
आदि अंत का सखा भुलाया। झूठे जग नातों में फिरै उमाहया।।१४
अंत समया जम दूत गला दबावै। ता समय कहो कौन छुड़ावै।।१५
सतगुरू है एक छुड़ावन हारा। निश्चय कर मानहू कहा हमारा।।१६
काल को जीत हंस ले जाही। अविचल देश जहां पुरूष रहाही।।१७
जहां जाय सुख होय अपारा। बहुर न आवै इस संसारा।।१८
ऐसा दृढ़ मता कराही। जैसे सूरा लेत लड़ाई।।१९
टूक–टूक हो मरै रण के मांही। पूठा कदम कबहू हटावै नांही।।२०
जैसे सती पति संग जरही। ऐसा दृढ़ निश्चय जो करही।।२१
साहेब मिलै जग कीर्ति होई। विश्वास कर देखो कोई।।२२
हम हैं राह बतावन हारा। मानै बचन भव उतरै पारा।।२३
छल कपट हम नहीं कराहीं। निस्वार्थ परमार्थ करैं भाई।।२४

जीव एक जो शरण पुरूष की जावै। प्रचारक को घना पुण्य पावै।।२५
कोटि धेनु जो कटत बचाई। एता धर्म मिलै प्रचारक तांही।।२६
लावै गुरू शरण दीक्षा दिलावै। आपा ना थापै सब कुछ गुरू को बतावै।।२७
जो कोई प्रचारक गुरू बनि बैठै। परमात्मा रूठे काल कान ऐठै।।२८
लाख अठाइस झूठे गुरू रोवैं। पड़े नरक में ना सुख सोवैं।।२९
अब कहे हैं भूल भई भारी। हे सतगुरू सुध लेवो हमारी।।३०
बोऐ बबूल आम कहां खाई। कोटि जीवन को नरक पठाई।।३१
ऐसी गलती ना करहूं सुजाना। सत्य वचन मानो प्रमाना।।३२

**शब्दार्थ :- वरील वचनांचा भावार्थ असा आहे की :-**

**जेव्हा मुलगा तरुण होतो त्याचा विवाह होतो. विवाह पश्चात् माता-पित्या पेक्षा त्याचे पत्नीवर अधिक प्रेम असते. मग मुलांवर प्रेम करू लागतो. जरी पतिचा मृत्यु झाला तरी पत्नी त्याच्यासोबत सती जात नाही. काही कालावधी नंतर म्हणजेच तेरावा दिवस झाल्यावर पतीच्या छोट्या किंवा मोठ्या भावासोबत विवाह करते. आधीच्या पतिला पूर्णपणे विसरून जाते. जरी एखादी आपल्या पतिसोबत चितेवर चढून मृत्यु पावते, आणि पुढल्या जन्मी पक्षी किंवा पशु होऊन दोघेही भटकत असतात.**

**ज्या पत्नीसाठी पती आपली मान देखिल कापण्यास तयार असतो, जरी कोणाच्याही पत्नीकडे वाईट नजरेने पाहिले, तसे न करण्याबद्दल सांगून देखिल ऐकत नाही, तर पती आपल्या पत्नीसाठी भांडतो आणि प्रसंगी मृत्यु देखिल पत्करतो. मग तीच पत्नी पतीच्या मृत्युनंतर दुसऱ्या पुरुषाची होऊन जाते. काळाप्रमाणे हे आवश्यक असेलही, पण भक्तासाठी ती एक कठोर शिक्षाच आहे.**

**त्याचप्रमाणे एखाद्या माणसांच्या पत्नीचे निधन झाल्यास, काही कालावधीनंतर तो दूसरी पत्नी घेऊन येतो. पत्नी आपल्या पतिसाठी आपले घर, भाऊ-बहीण, आई वडिलांना सोडून येते. परंतु पत्नीच्या मृत्युनंतर स्वार्थापोटी रडत राहतो. परंतु जेव्हा अन्य माणसे विवाहासाठी विचारतात तेव्हा सगळे विसरून लगेच तयार होतो.**

**भावार्थ इतकाच की सगळे स्वार्थाचे नाते आहे. त्यामुळे सत्य भक्ति करून त्या सत्यलोकात चला, जिथे वृद्धावस्था आणि मृत्यु नाहींच आहे.**

**आणि असा इशारा दिला आहे हे भक्त! आपल्या शरीराइतके माणसाला काहीही प्रिय नसते. आपल्या शरीराच्या रक्षणार्थ तो लाखों रूपये औषधोपचारावर खर्च करतो. जगलो वाचलो तर काम मेहेनत करून पैसे परत मिळवता येतील असा विचार करून तो खर्च करतो. हाच विचार करून काही वेळेस आपली संपत्ती देखिल विकतो आणि आपले शरीर वाचवतो. परमेश्वर कबीर जी म्हणतात की हे धर्मदास!**

स्व तनु सम प्रिय और न आना। सो भी संग न चलत निदाना।।

**शब्दार्थ :- आपल्या शरीरा इतकी कुठलीच दुसरी वस्तू आपल्याला प्रिय नसते. ते शरीर देखिल तुमच्यासोबत येत नाही. मग अन्य कोणती वस्तू स्वतःची मानून असा फुगून आणि परमात्माला विसरून इकडे तिकडे भटकतो आहेस? सर्व संपत्ति आणि नातेवाईक हे एक स्वप्नासारखे आहेत. परमेश्वर कबीर जी म्हणतात की माझ्या मतानुसार पूर्ण संतांकडून सत्य नाम (सत्य साधना मंत्र) घेऊन आपल्या जीवाचे कल्याण करावे आणि जोपर्यंत आपण स्वप्नात (प्रपंच) आहोत तोवर स्वप्न पाहत पूर्ण संतांना शरण जाऊन सत्यनाम प्राप्त करून**

आपला मोक्ष प्राप्त करा. सर्व प्राणी जीवनरूपी रेल्वेगाड़ीत (Train) प्रवास करत आहेत. ज्या डब्ब्यात बसला आहात, तेच आपले गाव आहे. ज्या जागेवर बसला आहात, तेच आपले कुटुंब आहे. ज्याचा ज्याचा प्रवास पूर्ण झाला आहे, तो आपापल्या स्थानकावर उतरून जातात. इथल्या प्रपंचाची स्थिती अशीच आहे. सर्व प्रवाश्यांना माहिती असते की आपण काही वेळेचेच सहप्रवासी आहोत. सभ्य व्यक्ति त्याच प्रवासात प्रेमाने राहतात. एकमेकांना सहकार्य करतात. तसेच आपण देखिल या स्वप्नरुपी मानव जीवनात वेळ व्यतीत करायचा आहे. स्वप्न भंगेल म्हणजेच शरीराचा त्याग केल्यावर हे काय होते यांची आठवण राहील? ज्याचा संग्रह करण्यासाठी अनमोल जीवन नष्ट केले, ते कुटुंब आणि संपत्ति कुठे आहे? मृत्युसमयी यमाच्या दुतांचे तोंड बंद करून आपल्याला मदत करणारे या जगतात परमात्माशिवाय असे कोणीच नाही आहे. ज्याने पूर्ण संतांकडून अनुग्रह घेतला आहे त्यालाच भगवंत मदत करीत असतो. परमेश्वर त्या सतगुरुच्या रूपात साधकाला मदत करतात. त्यामुळे सत्गुरुना शरण आल्यावर ज्ञानवान साधक परमात्मा प्रती १. हरीण, २. पतंग, ३. सती, ४. शूरवीरा सारखी आपली श्रद्धा ठेवतात. आपल्या ध्येयाकडे पाठ फिरवत नाहीत. शूरवीर रणांगणावर तूकड़े-तूकड़े होऊन पृथ्वीवर पाडण्यात धन्यता मानतात. पाउल मागे घेत नाहीत. पुराणांत आणि श्रीम्दभागवत गीता अध्याय २ श्लोक ३८ मध्ये म्हटले आहे की अर्जुन! जरी सैनिक युद्धात मारला गेला, तरी तो स्वर्गात सुख प्राप्त करतो. भक्त भक्तिमार्गावर वाटचाल करत भक्ति करून शरीर त्याग करतो आणि तो सतलोक सुख सागरात सदासुखी होऊन जातो. जन्म-मरणाचा फेरा सदासाठी संपून जातो. ज्याप्रमाणे आमचा जन्म पृथ्वीवर झाला. आम्हाला हे माहित नव्हते की आम्ही कोणाच्या घरी मुलगा किंवा मुलीच्या रुपात जन्म घेणार आहोत. आम्हाला तर हेही माहित नाही, आमचा विवाह संयोग कोणाशी होईल? आम्हाला तर हेही माहित नाहीकी आमच्या घरी मुलगा की मुलगी होणार? हे सर्व पूर्व जन्माच्या संस्कारा मुळे होते. आपसात किती प्रेम आणि आपलेपण निर्माण झाले. नेहमीच सोबत राहावे असे वाटते. कोणीच मरू नये अशी आपण इच्छा करत असतो. या मृत्युलोकात कोणीच कायमचा राहणार नाही. एक-एक करून पुढे मागे होत सगळेच मृत्यु पावणार आहेत. सगळ्या आयुष्यात जी संपत्ती एकत्र जमवली, ती इथेच राहणार आहे. जीव रिकाम्या हातानेच जाणार आहे. परंतु जो पूर्ण संतांकडून अनुग्रह होऊन साधना करेल, तो सत्यलोकी जाईल. तिथे पृथ्वीवर होतो तसा जन्म होतो. त्याच प्रकारे कुटुंब बनेल. तिथे कोणतेही कर्म करावे लागत नाहीं. सर्व खाद्य पदार्थ पर्याप्त प्रमाणात सत्यलोकात उपलब्ध असतात. हिरवेगार झाडे-वृक्षवल्ली, सुकामेवा (काजू, कीसमिस, मनुका आदि) दूधाचा समुद्र (क्षीरसागर) आहेत. सतलोकात वृद्ध अवस्था नाहीं आहे. मृत्युदेखिल नाहीं आहे. यालाच अक्षय मोक्ष म्हणतात. पूर्ण मुक्ति देखिल म्हणतात. गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये हेच म्हटले आहे आणि ज्या सिद्धी मोक्ष शक्तिला नैर्ष्कम्य सिद्धि म्हटले आहे, तिचे वर्णन गीता अध्याय ३ श्लोक ४, अध्याय १८ श्लोक ४९ ते ६२ मध्ये आहे. या काल ब्रह्म म्हणजेच ज्योति निरंजनाच्या एकवीस ब्रह्माण्डात सर्व प्राणी कर्म करूनच आहार प्राप्त करत आहेत. सत्यलोकात असे नाहीं आहे. तिथे कर्म केल्याशिवाय सर्व सुख व पदार्थ प्राप्त होत आहेत. जसे बागेत फळे लगडलेले वृक्ष आणि वेल असतात, फळे तोड़ा आणि खा. सर्व प्रकारचे अन्न देखिल उगवत राहते. सदैव बहरलेली आहेत. जी इच्छा आहे, ते बनवा आणि खा. तिथे जेवण बनवावे लागत नाही. जे जेवू इच्छिता, ते भोजनालयात ठेवा. आपोआप तयार होते. हे सर्व परमात्माच्या शक्तिने होत असते. तो सतलोक (शाश्वत स्थान) प्राप्त करण्यासाठी तुम्हाला सती आणि शूरमासारखे समर्पित असावे लागेल. भावार्थ

**हाच आहे की आपल्या उद्देश म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्त करण्यासाठी प्रपंचातील सर्व लोभ–लाभ त्यागावे लागले, तरी विचार करण्याची आवश्यकता नाही. त्वरित त्याग करा आणि आपल्या नामस्मरणात लक्ष देऊन मग्न रहा. जर सत्गुरुना शरण गेला नसाल, तर जेव्हा अंत समय येईल, तेव्हा यमदूत भक्तिहीन प्राण्याचे कंठ यमदूत बंद करतात. त्या यमदूतांपासून कुटुंबातील कोणीही सुटका करू शकणार नाही. केवळ सत्गुरुजीच त्या संकटातून आपली मदत करू शकतात. म्हणून परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे :–**

अंत समय जम दूत गला दबावैं। ता समय कहो कौन छुड़ावै।।
सतगुरू एक छुड़ावन हारा। निश्चय कर मानहु कहा हमारा।।

**शब्दार्थ :– शब्दार्थ वर केला आहे.**

**जरी कोणी भक्त ज्ञान समजून अनुग्रहित होऊन अन्य भोळ्याभाबड्या जीवांना ज्ञान चर्चा करून सत्य ज्ञानाच्या प्रचाराद्वारे सत्गुरु शरण आणून अनुग्रह देववितो, त्याला एक जीवाला सत्य भक्तिमार्ग सांगून गुरूकडून अनुग्रह दिल्याचे पुण्य मिळते, ते एक करोड़ गायीना कसायाच्या हातून वाचविल्यावर मिळणाऱ्या पुण्याच्या समतुल्य आहे. एका मानवाचे जीवन इतके बहुमुल्य आणि इतके पुण्याने प्राप्त होत असते. जरी कोणी मूर्ख प्रचारक मानमरातब मिळण्याच्या मोहासाठी स्वतः अनुग्रह देऊ लागला, गुरुपदी आरूढ झाला तर तो महाअपराधी असतो. त्याच्यावर परमेश्वर रूष्ट होतात आणि जसा खाटिक बकरीला घेऊन जातो, तसे काल जीवाचा कान पकडून ओढत घेऊन जातो. कबीर सागरच्या अध्याय ''अम्बुसागर'' पृष्ठ ४८ वर प्रमाण आहे की :–**

तब देखा दूतन कहं जाई। चौरासी तहां कुण्ड बनाई।।
कुण्ड–कुण्ड बैठे यमदूता। देत जीवन कहं कष्ट बहुता।।
तहां जाय हम ठाड (खड़े) रहावा। देखत जीव विनय बहुत लावा।।

**''नकली सत्गुरुची अवस्था''**

पड़ै मार जीव करें बहु शोरा। बाँध–बाँध कुंडन में बोरा।।
लाख अठाइस पड़े कड़िहारा। बहुत कष्ट तहां करत पुकारा।।
हम भूले स्वार्थ संगी। अब हमरे नाहीं अर्धंगी।।
हम तो जरत हैं अग्नि मंझारा। अंग अंग सब जरत हमारा।।
कौन पुरूष अब राखे भाई। करत गुहार चक्षु ढल जाई।।

**''ज्ञानी (कबीर जी) वचन''**

करूणा देख दया दिल आवा। अरे दूत त्रास भास दिखावा।।

**ही वचने खोटी आहेत. खरी वचने खाली दिली आहेत**

दुर्दशा देख दया दिल आवा। अरे दूत तुम जीवन भ्रमावा।।
जीव तो अचेत अज्ञाना। वाको काल जाल तुम बंधाना।।
चौरासी दूतन कहं बांधा। शब्द डोर चौदह यम सांधा।।
तब हम सबहन कहँ मारा। तुम हो जालिम बटपारा।।
हमरे भगतन को तुम भ्रमावा। पल पल सुरति जीवन डिगावा।।
गहि चोटि दूत घसियाए। यम रू दूत विनय तब लाए।।

**''दूत (जो नकली गुरू बने थे) वचन''**

चुक हमारी छमा कर दीजै। मन माने तस आज्ञा कीजै।।
हम तो धनी (काल) कहयो जस कीन्हा। सो वचन मान हम लीन्हा।।
अब नहीं जीव तुम्हारा भ्रमावैं। हम नहीं कबहू गुरू कहावैं।।

**''ज्ञानी (कबीर जी) वचन''**

सुन ज्ञानी बहुते हंसाई। दूतन दुष्ट बंध न छोड़ो जाई।।
पल इक जीवन सुख दीना। तब संसार गमन हम कीन्हा।।

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जी सांगतात की जे खोटे सत्गुरु होऊन मानमरातबाच्या आहारी जाऊन कालाच्या प्रेरणेने भोळ्या जीवांना संभ्रमित करत होते, त्यांना देखिल शिक्षा झाली. त्यांना नरकात टाकून यातना देण्यात येतात. त्यांचे शिष्यदेखिल त्याच नरकात पडतात. जेव्हा मी त्या नरकाजवळ गेलो, तिथे हेच खोट्या मानमरातबाच्या आहारी गेलेले व आपला महिमा वाढवलेले नकली सत्गुरु तिथे होते. लाखों जीवांना शिष्य बनवून नरकात आपल्या सोबत घेऊन आले. मग परमात्माच्या नियमानुसार ते पण अपराधी असल्यामुळे नरकात पडले होते. त्या नरकात कुण्ड आहेत. प्रत्येक कुण्डात जीव पड़ले आहेत आणि यमदूत त्यांना त्रास देताहेत. त्या अठ्ठावीस लाख नकली सत्गुरुनी मला पाहिल्यावर गयावया केली की आम्हाला वाचवा प्रभु! कारण हे होते की जे यमदूत त्यांना नरकात मार-पीट करत होते, ते सर्व परमेश्वर कबीर जींच्या शक्तिसमोर कापायला लागले. त्यामुळे त्या सर्व नकली सत्गुरुना असे वाटले की ये कोणीतरी परम शक्तिशाली देव आहेत. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की तुम्ही भोळ्या जीवांना संभ्रमित केले. स्वतःला पूर्ण सत्गुरु म्हणवून घेतले. आपल्याला अनुग्रह देण्याचा अधिकार आहे की नाही हे तुम्हाला माहित तरी होते काय? तुम्हाला पूर्ण मोक्ष ज्ञान नाहीं. आपल्या स्वार्थासाठी लाखों माणसांच्या अमूल्य जीवनाचा नाश केलात. ते काल जाळ्यात अडकून गेले. मग मी त्या दूतांना आणि अन्य यमदूतांना मारले आणि त्यांची शेंडी पकडून त्यांना फरफटत नेले. मग नकली सत्गुरुने म्हटले की आम्ही तर आपल्या मालकांची म्हणजेच काल ब्रह्मचे आज्ञापालन केले आहे. आता तुम्ही म्हणाल तसे करू. मी म्हटले की आता तुम्हाला सोडणार नाही. ज्या जीवांनी त्या नकली गुरूचे शिष्य होऊन जीवन वाया घालवले होते, ते देखिल त्यांच्याच सोबत नरकात पड़ले होते. जोपर्यंत मी (परमेश्वर कबीर जी) तिथे होतो, तोपर्यंत त्या जीवांना नरकात राहण्याच्या यातना होत नव्हत्या. अशा प्रकारे त्यांना काही काळासाठी सुख देऊन तिथून निघून मी मृत्युलोकात आलो. मी इकडे आल्यावर त्या नकली गुरू आणि त्यांच्या भौंदू शिष्यांच्या परत नरक यातना सुरु झाल्या. म्हणून आधीच्या वचनात म्हटले आहे की जरी कोणी प्रचारक स्वतः गुरू बनला तरी परमेश्वर रूष्ट होतील आणि काल कान उपटतील म्हणजेच यातना देतील. म्हणूच हे सज्जन पुरूषहो! कधीही अशी चूक करू नका. माझे वचनांना प्रमाणित माना.**

## ''भक्ताचा स्वभाव कसा असावा?''

**(अनुराग सागर पृष्ठ ६ वाणी नं. ७ ते १७)**

**धर्मदास वचन**

मृतक भाव प्रभु कहो बुझाई। जाते मनकी तपनि नसाई।।
केहि विधि मृतक हो यह जीवन। कहो विलोय नाथ अमृतधन।।

**कबीर वचन-मृतक यांचे दृष्टांत (उदाहरण)**

धर्मदास यह कठिन कहानी। गुरूगम ते कोई विरले जानी।।

### भृंगीचा दृष्टांत (उदाहरण)

मृतक होय के खोजहिं संता। शब्द विचारि गहैं मगु अन्ता।।
जैसे भृंग कीट के पासा। कीट गहो भृंग शब्द की आशा।।
शब्द घातकर तेही महैं डारे। भृंगी शब्द कीट जो धारे।।
तब लैगौ भृंगी निज गेहा। स्वाती देह कीन्हो समदेहा।।
भृंगी शब्द कीट जो माना। वरण फेर आपन करजाना।।
बिरला कीट जो होय सुखदाई। प्रथम अवाज गहे चितलाई।।
कोइ दूजे कोइ तीजे मानै। तन मन रहित शब्द हित जानै।।
भृंगी शब्द कीट ना गहई। तौ पुनि कीट आसरे रहई।।
एक दिन कीट गहेसी भृंग भाषा। वरण बदलै पूरवै आशा।।

### ''मृतकाचे आणखी दृष्टांत''

### (अनुराग सागर पृष्ठ ७ वरील वाणी नं ७ ते २०)

सुनहु संत यह मृतक सुभाऊ। बिरला जीव पीव मग धाऊ।।
औरै सुनहु मृतक का भेवा। मृतक होय सतगुरू पद सेवा।।
मृतक छोह तजै शब्द उरधारे। छोह तजै तो जीव उबारे।।

### पृथ्वीचा दृष्टांत

जस पृथ्वी के गंजन होई। चित अनुमान गहे गुण सोई।।
कोई चन्दन कोई विष्टा डारे। कोई कोई कृषि अनुसारे।।
गुण औगुण तिन समकर जाना। तज विरोध अधिक सुखमाना।।

### ऊसाचा दृष्टांत

औरो मृतक भाव सुनि लेहू। निरखि परखि गुरू मगु पगु देहू।।
जैसे ईख किसान उगावै। रती रती कर देह कटावे।।
कोल्हू महँ पुनि ताही पिरावै। पुनि कड़ाह में खूब उँटावे।।
निज तनु दाहे गुड़ तब होई। बहुरि ताव दे खांड विलोई।।
ताहू मांहि ताव पुनि दीन्हा। चीनी तबै कहावन लीन्हा।।
चीनी होय बहुरित तन जारा। ताते मिसरी ह्वै अनुसारा।।
मिसरीते जब कंद कहावा। कहे कबीर सबके मन भावा।।
यही विधिते जो शिष करही। गुरू कृपा सहजे भव तरई।।

**भावार्थ :- अनुराग सागर पृष्ठ ६ वर लिहिलेल्या पंक्ति नं. ७ ते १७ पर्यंतचा भावार्थ आहे की धनी धर्मदास जींनी परमेश्वर कबीर जींना विनम्रतेने प्रश्न केला आहे की हे प्रभु! मला मृतकाचा स्वभाव कसा असतो, ते समजवा? जीविताने कशा प्रकारे मरायचे असते. हे अमर परमात्मा! हे स्वामी! कृपया निष्कर्ष काढून ते अमृत धन म्हणजेच अमर होण्याचा मार्ग सांगावा.**

### ''परमेश्वर कबीर वचन = मृतकाचा दृष्टान्त''

**परमेश्वर कबीर जींनी म्हटले की हे धर्मदास! हा प्रश्न जो आपण विचारला आहे, त्याचे उत्तर जटील आहे. सत्गुरुना शरण राहून ज्ञानाचा इच्छुक साधकच हे समजून घेऊन कसोटीवर खरा उतरतो.**

## ''भुंग्याचा दृष्टांत''

संत–साधकजन जीवित मृतक होऊन परमात्माचा शोध घेतात. शब्द विचार म्हणजेच यथार्थ नाममंत्राला समजून व त्यावर विचार करून त्या मार्गाच्या शेवटापर्यंत म्हणजेच अंतिम टोकाला पोहोचतात म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्त करतात.

ज्याप्रकारे एक भृंग (पंख असलेला नीळ्या रंगाचा कीड़ा) असतो ज्याला भुंगा, भ्रमर इत्यादी नावाने देखिल ओळखले जाते, तो घोंघावत असतो. आपले कुटुंब नर–मादीच्या मिलनविधि द्वारे उत्पन्न करत नहीं. तो एका विशेष कीटकाजवळ जातो. त्याच्या जवळ घोंघावण्याचा आवाज करतो. तो कीड़ा त्याच्या आवाजाने प्रभावित होतो. त्याला उचलून अगोदरच तयार केलेल्या मातीच्या घरात आणतो. ते घर गोल आकाराचे दोन इंच व्यासाचे एक किंवा दोन तोंडांचे घर असते. मग दूसरा–तीसरा असे कीटक घेऊन जातो. त्यांच्यावर सारखा घोंघावण्याचा आवाज करत राहते. मग पावसाचे पाणी आपल्या मुखाने त्याच्या तोंडात घालते. तो घोंघावण्याचा आवाज ऐकून तो कीटक देखिल त्याच्या रंगाचाच होऊन जातो. आणि त्याला पंखदेखिल भुंग्यासारखेच येतात. तो कीटकदेखिल घोंघावण्याचा आवाज करायला लागतो आणि त्याचाही भुंगा होतो. त्याप्रमाणे पूर्ण संत आपले ज्ञान त्या भुंग्यासारखे वारंवार बोलून सामान्य माणसाला देखिल भक्त करतात. मग तो देखिल सतगुरु कडून श्रवण केलेले ज्ञान अन्य लोकांना सांगायला लागतो. प्रपंचाच्या रीति–रिवाजांचा त्याग केल्यावर अन्य लोक म्हणतात की याचा रंग–ढ़ंग बदलला आहे. हा तर भक्त झाला आहे. ज्याप्रमाणे भुंगा कीटकांना वारंवार आपला आवाज ऐकवत असतो, तेव्हा कोणी शीघ्रतेने सक्रिय होतो, तर कोणी दूसऱ्या, कोणी तीसऱ्या वेळेस भुंगा होतो. त्याच प्रकारे जेव्हा गुरु काही लोकांना आपला सत्संग राहून राहून ऐकवतात, तेव्हा उत्तम संस्कार असलेला शीघ्रगतीने समजून घेतो, कोणी एक–दोन वेळा पुन्हा सत्संग श्रवण करून मोक्षाचा मार्ग ग्रहण करतो. अनुग्रह घेतो. काही कीटक असे असतात की अनेक दिवसांनंतर ते आपला स्वभाव बदलतात. तो कीटक जरी भृंग झाला नाही पण त्या भृंग कीटकच्या सान्निध्यात राहिला तर तो अवश्य एक दिवस परिवर्तन होउन भृंग होईल. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की हे धर्मदास! जरी शिष्य अशा प्रकारे गुरूजीचे विचार श्रवण करीत राहिला तरी त्या भृंग कीटका सारखा प्रभावित होऊन प्रापंचिक भाव बदलून भक्त होईल व त्याला हंस दशा प्राप्त होईल.

पृष्ठ ७ वरील पंक्ति ७ ते २० पर्यंतचा भावार्थ :–

कबीर जींनी म्हटले की हे संतांना! असा असतो मृतकाचा स्वभाव. अशा प्रकारे कोणी एखादाच जीव अनुसरण करत असतो. तो पीव म्हणजेच परमात्माला प्राप्त करण्याचा मार्ग प्राप्त करतो. उपरोक्त म्हणजे भृंगाचं दृष्टांताव्यतिरिक्त ज्या मृतकाने जीवित मृतक होऊन सत्गुरुच्या पदानुसार (पद्धति) साधना केली आहे.

## ''पृथ्वीचे उदाहरण''

जसे पृथ्वीमध्ये सहनशीलता असते. त्याच प्रकारे पृथ्वीचे गुण जो ग्रहण करेल, तो जीवित मृतक आहे आणि तोच सफल होतो. पृथ्वीवर कोणी बिष्टा (टट्टी) करते, कचरा टाकतात, कोणी शेती करतो, तर कोणी तिची चीरफाड़ करतो, कोणी भूमीपूजन करतो. पृथ्वी गुण–अवगुण बघत नाहीं. ज्याची जी भावना आहे, तो तसेच करत असतो. असा विचार करून पृथ्वी विरोध न करता सुखी राहते.

भावार्थ असा आहे की जशी जमीन सहनशील आहे, तसेच भक्त-संत यांचा स्वभाव असला पाहिजे. मग कोणी तुम्हाला चूक समजो किंवा आपली निंदा किंवा स्तुती करो, भक्त आपल्या उद्दिष्टाशी प्रामाणिक राहून यश प्राप्त करतो.

## ''उसाचा दृष्टांत''

ज्याप्रमाणे शेतकरी उसांचीपेरणी करतो, त्यावेळेस उसाचे एक फुटाचे बेणे जमिनीत पेरून ती दाबतो. बेण्याचा उस झाल्यावर चरकाचा त्रास सुरु होतो. मग रस कढई मध्ये अग्निच्या आचेवर उकळला जातो. तेव्हा त्याचा गुळ बनतो. जर उसांच्या रसाला अधिक तापवले, तर त्याची खांडसरी साखर होते. ती गुळापेक्षाही गोड असते. आणि अधिक ताव दिल्यास साखर होते. आणि अधिक आच दिल्यास साखरेची कांडी होते. मग मिश्रीचा कंद बनतो. परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की हे धर्मदास! अशा प्रकारे शिष्य भक्तिमार्गात जितक्या अडचणी सहन करत असतो, तितका परमात्माला तेवढाच प्रिय होत असतो.

(८) 132 अनुरागसागर

मृतकभाव कौन धारण कर सकता है? छन्द

मिरतक भाव है कठिन धर्मनि, लहे विरलशूरहो ॥
कादर सुनतेहि तनमन दहै,पाछे न चितवतकूरहो॥
ऐसे शिष्य आप सम्हारे, नाव सही गुरुज्ञानको ॥
लहै भेदी भेद निश्चय, जाय दीप अमानको ॥६॥

मृतक ही साधु होता है

सोरठा-मृतक हो सो साधु, सो सतगुरुको पावई॥
मेटे सकल उपाध, तासु देव आसा करें ॥ ६ ॥

साधु किसे कहते हैं

साधूमार्ग कठिन धर्मदासा । रहनी रहे सो साधु सुबासा ॥
पांचों इन्द्री सम करि राखे।नाम अमीरसनिशिदिन चाखे॥

चक्षुर्वशीकरण

प्रथमहिं चक्षु इन्द्री कहँ साधे। गुरु गम पंथ नाम अवराधे ॥
सुन्दर रूप चक्षुकी पूजा । रूप कुरूप न भावे दूजा ॥
रूप कुरूपहिं सम करजाने । दरस विदेह सदा सुख माने ॥

श्रवणवशीकरण

इन्द्री श्रवण वचन शुभ चाहै । उत्कट वचनसुनत चित दाहै॥
बोल कुबोल दोउ सह लेखे । हृदय शुद्ध गुरुज्ञान विशेखे ॥

नासिकावशीकरण

नासिका इन्द्री बास अधीना । यहि सम राखै संत प्रवीना॥

जिह्वावशीकरण

जिभ्या इन्द्री चाहै स्वादा । खट्टा मीठा मधुर सवादा ॥
सहज भावमें जो कछु आवै । रूखा फीका नहिं विलगावै ॥
जो कोई पंचामृत लै आवे । ताहि देख नहिं हरष चढ़ावै॥
तजे न रूखा साग अलूना । अधिक प्रेमसौ पावैं दूना ॥

अनुरागसागर 133 (९)

शिश्नवशीकरण

इन्द्री दुष्ट महा अपराधी ।कुटिलकाम होई विरलेसाधी॥
कामिनि रूप कालकी खानी । तजहु तासु सँग हो गुरुज्ञानी॥

कामवशीकरण

जबही काम उमंग तन आवै । ताहि समय जो आप जुगावै॥
शब्द विदेह सुरत लै राखे । गहिमन मौन नामरसचाखे ॥
जब निहतत्त्वमें जाय समाई । तबहीं काम रहै मुरझाई ॥

कामदेव लुटेरा है । छन्द

काम परबल अति भयंकर, महा दारुण काल हो॥
सुरदेव मुनिगणयक्षगंधर्व,सबहि कीन्ह विलास हो॥
सबहिं लूटे विरल छूटे, ज्ञान गुण निज दृढ गहे ॥
गुरुज्ञान दीप समीप सतगुरु,भेदमारग तिन लहे॥७॥

कामलुटेरेसे बचने का उपाय

सोरठा-दीपक ज्ञान प्रकाश,भवन उजेरा करि रहो॥
सतगुरुशब्द विलास,भाज चोर अँजोरा जब॥७॥

अनलपक्षिका दृष्टान्त

गुरू कृपासों साधु कहावै । अनलपच्छ है लोक सिधावै॥
धर्मदास यह परखो बानी ।अनलपच्छ गम कहों बखानी॥
अनलपच्छ जो रहै अकाशा ।निशि दिन रहै पवनकी आशा॥
दृष्टिभाव तिनरति विधिठानी ।यहविधिगरभ रहेतिहिजानी ॥
अंडप्रकाश कीन्ह पुनि तहवां । निराधार आलंबहिं जहवां ॥
मारग माहिं पुष्ट भो अंडा । मारग माहि त्रिरह नौखण्डा॥
मारग माहिं चक्षु तिन पावा । मारग माहि पंख पर भावा॥
महि ढिग आवा सुधि भइताहीं। इहां मोर आश्रम नहिं आहीं॥
सुरति सम्हार चले पुनि तहवां ।मात पिताको आश्रम जहवां॥

अनुराग सागरच्या पृष्ठ ८ आणि ९ चा सारांश असा आहे की जो आपल्या सर्व इन्द्रियांवर संयम ठेवतो, तोच खरा साधक आहे. जसे मिळेल त्यात त्याला समाधान असते. रूप पाहून तो आकर्षित होणार नाही आणि कुरूपतेचा तिरस्कार करणार नाही. दोन्ही ठिकाणी समत्वाच्या दृष्टीने पाहून वरची कातडी जरी काळी-गोरी असली तरीही शरीरातील हाड-मास दोन्हीमध्ये एकसारखेच आहे असा विचार करतात तसेच थोडासा आजार झाला तरी ते खराब होऊन घाण वास यायला लागतो. अशा प्रकारे विवेकाने भक्ति करा. जरी कोणी

स्तुती केली किंवा प्रेमाने बोलले, तरी हुरळून जाऊ नका. कोणी अपशब्द बोलले तरी दुःख मानू नका. त्याच्या बुद्धिचा स्तर ओळखून शांत रहा. जरी कोणी खीर-खाण्ड, हलवा-पूरी असे पंचपक्वानाचे भोजन वाढले तरी हुरळून जाऊ नका. त्याला त्याच्या कर्माचे फळ मिळेल. जरी कोणी कोरडे भोजन वाढले तर ते अतिशय प्रेमभावाने सेवन करा. काम वासनेला (Sex) फारसे महत्त्व देऊ नका. असा भक्तच वास्तवात परमात्माची प्राप्ति करू शकतो. जरी कामवासनेने त्रास दिला तर नामस्मरण व भक्ति करून त्याचा आनंद प्राप्त करावा. असे केल्याने त्या वेळेपुरता काम वासनेचा लय होतो. काम वासनेचा नाश करण्याची पद्धत :-

कबीर, परनारी को देखिये, बहन बेटी का भाव।
कह कबीर काम नाश का, यही सहज उपाय।।

## मोक्ष प्राप्तिचा अन्य भाव ''अनल (अलल) पक्षासारखा भाव''

जसा एक अनल पक्षी (अलल पंख) आकाशात रहात होता. आता तो पक्षी लुप्त झाला आहे. त्याला चार पाय असायचे. पुढले छोटे आणि मागचे मोठे. त्याचा आकार खूप मोठा होता. मोठमोठे पंख असायचे. पूर्ण वाढ झालेला तो पक्षी चार हत्तींना एकाच वेळी उचलून आकाशात आपल्या कुटुंबाकडे घेऊन जात असे.

अनल पक्षी (अलल पक्षी) वरच्या वायुत राहत असे. तिथूनच अनल मादी अंण्डी उत्पन्न करायची. जिथे केळ्याची बाग असेल, तिथे ती अंडी टाकीत असे. केळी एकमेकात गुंतून दाट झाडे होत असत. हत्तींचा कळप म्हणजे शेकडो हत्ती केळीच्या बागेत राहायचे कारण हत्ती केळीचे झाड खातो आणि केळीच्या झाडावरच झोपतो. मस्ती करत असतो. अनल पक्षाचे अंडे वायुमंडलातून खाली पृथ्वीपर्यंत येईतोवर हवेतील घर्षणाने उबून पिल्लू तयार होत असे. ते अंण्डे केळीच्या झाडावर पडत असे. केळीची झाडे दाटीवाटीने असल्यामुळे त्या अंड्याला काही इजा व्हायची नाही. ते अंडे देखिल अशा वेगाने पडायचे की केळ्यांच्या झाडांना तोडून ते जमिनीवर पडून फुटून जाते. अंड्याचा आकार मोठा असायचा. त्याचे कवच देखिल मजबूत असायचे. पिलाचा बचाव होण्यासाठी अंड्याचे कवच आणि अंड्यातील पिलामध्ये एक गादीसदृश मऊ पदार्थ असायचा आणि त्यामुळे अंडे जमिनीवर आपटताना पिलाला इजा व्हायची नाही. अनल पक्षाचे पिलू पृथ्वीवर अन्य पक्षांच्या पिलांसोबत राहत असे, त्यांच्यासोबत उडत असे. परंतु त्याचा अंतर आत्मा असेच मानत होता की हे माझे कुटुंब नाही. माझे कुटुंब तर वर आहे. मला आपल्या कुटुंबात गेले पाहिजे. हे जग माझे नाही. तो जेव्हा तरुण मोठा व्हायचा, तेव्हा हत्तींच्या कळपावर तो झडप घालायचा आणि चार पंजांनी चार हत्ती आणि एक हत्ती चोचीत पकडून उडायचा. आपल्या कुटुंबात जायचा तेव्हा सोबत त्यांचे खाणे देखिल घेऊन जायचा.

परमेश्वर कबीर जींनी याचे सटीक उदाहरण सांगून भक्तांना असे मार्गदर्शन केले आहे की आपण या विश्वातील कायमचे रहिवासी नाहीच आहोत. आपल्याला हे सर्व सोडूनच जायचे आहे. आपले कुटुंब वर सत्यलोकात आहे. आपण या पृथ्वीवर वरून पडला आहात. तत्त्वज्ञान प्राप्त भक्ताच्या मनाची स्थिती त्या अनल (अलल) पक्षाच्या पिलासारखी असली पाहिजे. जोपर्यंत सतलोक जाण्याची वेळ येत नाही तोवर प्रपंचातील माणसांसोबत मिळून मिसळून प्रेमाने राहा. जाताना कोणाच्याही मोहात अडकता कामा नये. आपल्या नाम-स्मरण आणि पुण्यधर्माच्या कमाई सहित वर उडायचे आहे. आपल्या कुटुंबात आपल्या स्वतःच्या घरी सतलोकात जायचे आहे.

अनुराग सागरच्या पृष्ठ १५२ चा सारांश :-

या पृष्ठावर परमेश्वर कबीरांनी शरीराच्या आतमधील गुप्त भेद सांगितला आहे. या मानव शरीरात ७२ नाड़्या आहेत. त्यामध्ये (ईड़ा, पिंगला, सुष्मणा) या तीन मुख्य आहेत. मग एक विशेष नाड़ी आहे ''ब्रह्म रंन्द्र.''

परमेश्वर कबीर जी सांगतात की धर्मदास! मनच ज्योति निरंजन आहे. जसा एखादा मदारी माकडाला नाचवतो, तसे याने जीवाला नाचवले आहे. या शरीरात ५ तत्त्व २५ प्रकृति आणि तीन गुण हे कालाचे तीन एजेंट आहेत. जीवाला हे फसवत असतात. या शरीरात काल निरंजन आणि जीव दोघांच्याही मुख्य भूमिका आहेत. काल निरंजन मन रूपाने सर्व पाप करवून घेतो आहे. पाप जीवाच्या डोक्यावर ठेवून देतो.

अनुराग सागराच्या पृष्ठ १५३ चा सारांश :-

कालाने अशी मेख मारून ठेवली आहे की जीव परमात्माला विसरला आहे.

## ''मन पाप-पुण्य कसे करवून घेते''

मनच कालाचे कार्य करते. ते जीवाला नाचवत आहे. सुंदर स्त्री पाहिल्यावर तिच्याशी संभोग-विलास करण्याची इच्छा उफाळून येते. तो उत्साह/जोश मनात उफाळून येते. स्त्रीचा उपभोग घेण्याचा आनंद मन (काल निरंजन) घेते, पाप जीवाच्या डोक्यावर मारते.

{वर्तमानात सरकारने असा कडक कायदा केला आहे की जर कोणा पुरूषाने एखाद्या स्त्रीवर बलात्कार केला, तर त्याला दहा वर्षाची शिक्षा होते. जर अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला तर आजीवन कारावासांचीशिक्षा होते. मनाच्या प्रेरणेने दोन मिनिटांची मजा आणि दु:ख मात्र डोंगरा एवढे. म्हणूनच मनाला आधीच ज्ञानाच्या लगामाने नियंत्रित करणे हितावह आहे.}

अनुराग सागरच्या पृष्ठ १५४ चा सारांश :-

दुसऱ्याचे धन पाहून ते हडप करण्याची प्रेरणा मन देत असते. चोरी करून जीवाला शिक्षा देवावतो. परनिंदा, परक्याचे धन हड़पणे हे पाप आहे. काल अशा पद्दतीने जीवाला कर्माच्या बंधनात अडकवून ठेवतो. संतांना विरोध आणि गुरूद्रोह हाच मनरूपी काल करवत असतो आणि तो घोर अपराध आहे.

''निरंजन चरित्र = कालाचा फास''

परमेश्वर कबीर जी सांगतात की धर्मदास! मी तुला धर्मचा (धर्मराय-काल) फास समजावून सांगतो. काल निरंजनने श्रीकृष्णात प्रवेश करून गीताचे ज्ञान दिले. त्याला कर्मयोग उत्तम सांगून युद्ध करवले. ज्ञान योग सांगून भ्रमित केले. अर्जुन तर प्रथमपासूनच प्रामाणिकपणे बोलत होता. ते ज्ञान होते. म्हणत होता की युद्ध करून आपल्याच कुटुंबातील पुतणे, भाऊ, मेव्हणे, सासरे, काका-मामा यांना मारण्यापेक्षा भीक मागून निर्वाह केलेला कधीही चांगला. मला पापाने प्राप्त केलेल्या अशा राज्याची आवश्यकता नाहीं. त्याला घाबरवून आणि धमकावून युद्ध करवले आणि त्याला नरकाचा धनी बनविले. ज्ञान योग चे कारण सांगून कर्मयोगावर जोर देऊन महापाप करविले.

अनुराग सागरच्या पृष्ठ १५५ चा सारांश :-

धर्मदास जींनी प्रश्न केला की हे प्रभु! आपण काल-जाळ समजावून सांगितले, आता जीवाने आपल्याला प्राप्त करून घेण्यासाठी काय करायला पाहिजे हे कृपा करून सांगावे?

''सत्गुरु (कबीर जी) वचन''

## ''भक्ताचे १६ गुण (आभूषण)''

परमेश्वर कबीर जींनी म्हटले की हे धर्मदास! भवसागर म्हणजेच मृत्युलोकातून निघण्यासाठी भक्तिच्या शक्तिची आवश्यकता असते. परमात्माच्या प्राप्तिसाठी जीवात सोळा (१६) लक्षणे अनिवार्य आहेत. त्यांना आत्म्याची सोळा सौभाग्यलक्षणे (आभूषण) म्हटले जाते..

१. ज्ञान, २. विवेक, ३. सत्य, ४. संतोष, ५. प्रेम भाव, ६. धीरज, ७. निरधोषा (धोखा रहित), ८. दया, ९. क्षमा, १०. शील, ११. निष्कर्मा, १२. त्याग, १३. वैराग्य, १४. शांति निज धर्म, १५. भक्ति करुन स्वःताच्या जीवाचा उद्धार करणे, १६. मित्रासारखे सर्वांना चित्ती धारण करणे.

भावार्थ :- परमात्माच्या प्राप्तिसाठी भक्तात काही विशेष लक्षणे असणे आवश्यक आहे. हे १६ आभूषणे अनिवार्य आहेत.

१. तत्त्वज्ञान २. विवेक ३. सत्य भाषण ४. परमात्माने जे दिले आहे त्यात समाधान मानून तीच परमात्माची इच्छा असल्यचे जाणणे. ५. प्रेमभावाने भक्ति करा आणि इतरांशी मधुर बोलावे ६. धीराने वागा. सत्गुरुनी जे ज्ञान दिले आहे, त्यामध्ये सफल होण्यासाठी कायम सकारात्मक असा. फळ प्राप्तिची घाई करू नका. ७. कोणाचीही फसवणूक करू नका. ८. दया भाव ठेवा ९. भक्त आणि संतांचे क्षमा हे देखिल एक आभूषण आहे. शत्रुला देखिल क्षमा केली पाहिजे. १०. शील (चारित्र्य) हे स्वभाव असले पाहिजे. भक्ति निष्काम भावाने करा. प्रापंचिक लाभच्या उद्देशाने करू नका. १२. त्यागाची भावना अतिशय अनिवार्य आहे १३. वैराग्य असले पाहिजे. प्रपंचाला सार रहित आणि आपल्या जीवनाला तात्पुरते मानून परमात्मा प्रति विशेष प्रेमभाव असणे मोक्ष प्राप्त करण्यासाठी अतिशय आवश्यक आहे. १४. भक्ताचा विशेष गुण म्हणजे शांति आहे, तो अनिवार्य देखिल आहे १५. भक्ति करणे म्हणजे भक्ति करून आपल्या जीवाचे कल्याण करवून घेणे १६. प्रत्येक व्यक्तिशी मित्रत्वाचा व्यवहार असला पाहिजे.

हे उपरोक्त गुण असल्यास सत्यलोकात जायला मिळेल. त्याव्यतिरिक्त गुरू सेवा, गुरूनी सांगितलेल्या पद्यतिवर विश्वास ठेवणे, परमात्माची भक्ति आणि संत समागम करणे अनिवार्य आहे.

अनुराग सागरच्या पृष्ठ १५६ आणि पृष्ठ १५७ चा सारांश :-

या पृष्ठांवर देखिल हेच ज्ञान आहे आणि विषय-विकार यांचा त्याग केला पाहिजे, तरच भक्ति सफल होईल.

अनुराग सागरच्या पृष्ठ १५८-१५९ चा सारांश :-

परमेश्वर सांगतात की अनुग्रहीताने १५ व्या दिवशी कोणतेही धार्मिक अनुष्ठान म्हणजेच पाठ केला पाहिजे. जरी १५ दिवसात नाहीं करता आला तरी महीन्यात अवश्य करावा. निर्धनासाठी असे म्हटले आहे की जरी कोणी रंक असेल त्याने वर्षात दोन वेळा करावे किंवा वर्षात एकदा तरी अवश्य करावे. जर वर्षात केले नाहीं तर तो भक्त भक्तिभावहीन म्हटला पाहिजे. एक वर्षानंतर देखिल पाठ करवल्यास त्याच्या जीवाला मोक्ष मिळेल.

कबीर नाम श्रद्धेने जपावे म्हणजेच अभिमानाने कबीर जींचे नाम घ्यावे. हे काय

परमात्माचे नाव आहे का असे म्हणून लाज वाटून घेऊन नये. असे म्हणणाऱ्याना घाबरू नये. लाज तर अजिबात बाळगू नये आणि यासोबतच तुझे (धर्मदास) नाम देखिल आदरपूर्वक घेतले जावे.

भावार्थ असा आहे की आदरणीय धर्मदास जींच्या सोबत परमात्मा राहिले, ते त्यांना सत्यलोकात घेऊन गेले आहेत. आपला यथार्थ परिचय दिला. धर्मदास जींनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेले आणि कानांनी श्रवण केलेले परमात्माने सांगितलेले आध्यात्मिक ज्ञान कबीर सागर, कबीर बानी, कबीर बीजक, कबीर शब्दावली इत्यादी द्वारे लिहून ठेऊन माणूस जातीवर महान उपकार केले आहेत. त्यासाठीच धर्मदास जींना देखिल आदरणीय मानले पाहिजे.

भक्ताने भक्ति-साधना आणि मर्यादा यांचे पालन अन्तिम श्वासापर्यंत केले पाहिजे. ज्याप्रमाणे शूरवीर युद्धभूमीवर एक तर मारतो किंवा स्वतः वीरगतिला प्राप्त होतो. तो मागे हटत नाही. संत आणि भक्त यांची युध्दभूमी, भक्ति मंत्र जप आणि मर्यादा आहे. जो शिष्य गुरूशी विन्मुख होतो व नाम खंडीत करतो, तो स्वाभाविकच गुरूमध्ये काही ना काही दोष शोधेलच. त्यामुळे तो नरकातील अग्निकुण्डात पडेल. जरी गुरूविमुख होउन भक्ति करणे सोडल्यास, त्याची देखिल खूप हानि होते.

उदाहरण :- ज्याप्रमाणे इन्वर्टरला चार्जिंगसाठी लावले आणि तो चार्ज होतो आहे. जरी मध्येच चार्जर काढून घेतला तरीही तो इन्वर्टर जितका चार्ज केला असेल, तितका वेळ चालणारच. मग अचानक सर्व सुविधा बंद होतील त्याच प्रमाणे त्या शिष्याची स्थिती जाणावी. गुरूशरण मध्ये राहून मर्यादेत राहिल्यास जितके दिवस भक्ति केली, ती शक्ति आत्म्यात जमा झाली म्हणजेच आत्मा तेवढा चार्ज झाला. ज्या दिवशी गुरूजींच्या विमुख झाला, त्या दिवसापासून भक्तिची शक्ती येणे बंद होइल. जरी गुरु विमुख (गुरूला विरोध करून गुरु त्याग करणे) होऊनदेखिल त्याच गुरूने संगीतलेली साधना मंत्र इत्यादी करत असेल तरी कोणताही लाभ मिळणार नाहीं. ज्याप्रमाणे वीज जोडणी तुटली तर पंखे, मोटर, बल्ब इत्यादीची बटने दाबता, तेव्हा न पंखा चालेल न बल्ब लागेल. गुरूविमुख साधकाची हीच स्थिती होणार. मग नरकाचा भागीदार होईल. परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की :-

कबीर, मानुष जन्म पाकर खोवै, सतगुरू विमुखा युग-युग रोवै।<br>
कबीर, गुरू विमुख जीव कतहु न बचै। अग्नि कुण्ड में जर-बर नाचै।।<br>
कोटि जन्म विषधर को पावै। विष ज्वाला सही जन्म गमावै।।<br>
बिष्टा (टट्टी) मांही क्रमि जन्म धरई। कोटि जन्म नरक ही परही।।

भावार्थ :- गुरूचा त्याग करणारा जीव बिल्कुल वाचणार नाहीं. नरकात अग्निच्या कुण्डांमधील पाण्यात उकळून उकळून यातना भोगेल. तेथील अग्निने पिडीत होऊन नाचेल म्हणजेच उड्या मारून सारखा अग्नित पडेल.

मग करोड़ों जन्म विषारी सर्पाची योनी शरीर प्राप्त करेल. सर्पाला त्याच्या शरीरातील विषाची उष्णता अतिशय त्रासदायक असते. उन्हाळ्यात सर्प त्या विषाच्या उष्णते पासून बचाव करण्यासाठी व शीतलता प्राप्त करण्यासाठी चन्दनाच्या झाडावर लटकून वर राहतो. मग त्याच गुरूच्या विमुख म्हणजेच गुरू द्रोह केल्यामुळे तोच विष्ठेतील किड्याचा जन्म प्राप्त करतो. अशा प्रकारे गुरूपासून दूर गेलेला प्राणी महायातना भोगतो. जर गुरू नकली असेल तर त्याचा त्याग करून पूर्ण गुरूला शरण गेल्याने कोणतेही पाप लागत नाहीं.

कबीर गुरू दयाल तो पुरूष दयाल। जेहि गुरू व्रत छुए नहीं काल।।

भावार्थ :- हे धर्मदास! जरी गुरू शिष्याबाबत दयाळू असले म्हणजेच गुरूच्या हृदयात शिष्याची चांगली छबी असेल व तो मर्यादेत राहत असेल तर परमात्मा देखिल त्या भक्तावर प्रसन्न असतो. अन्यथा उपरोक्त यातना शिष्याला भोगाव्या लागतील.

पृष्ठ १६० चा सारांश :-

या पृष्ठावर काही गुरू महिमा आहे आणि कोकिळेच्या चाणक्य नीतिचे ज्ञान आहे.

## ''कालाचा जीव सत्गुरु ज्ञान मानत नाही''

''कोकीळ-कावळ्याचे'' उदाहरण :- कोकीळ पक्षी कधीही आपले वेगळे घरटे बांधून व अंडी घालून आपली पिले जन्माला घालत नाही. कारण हेच की कोकीळ पक्षाची अंडी कावळा खाऊन टाकतो. त्यामुळे कोकिळेला एक अशी नीति सुचली ज्यायोगे तिच्या अंड्यांचे नुकसान होणार नाही. कोकीळेला जेव्हा अण्डी उत्पन्न करावयाची असतात त्यावेळेस ती ध्यान ठेवते की कावळीने आपली अंडी कोणत्या घरट्यात उत्पन्न केलेली आहेत. ज्या वेळेस कावळी भोजनासाठी दूर जाते, तेव्हा कोकिळा त्या कावळीच्या घरट्यात अंडी टाकते. आणि लांब झाडावर बसून राहते किंवा आजूबाजूलाच असते. ज्या वेळेस कावळी घरट्यात येते तेव्हा ती दोनाच्या जागी चार अण्डीबघते. पण आपली आणि बाहेरची अंडी कुठली आहेत, हे तिला ओळखू येत नाही. म्हणून ती चारही अंड्यांचे पोषण करून पिले बाहेर काढते. कोकिळा देखिल आसपासच असते. आता कोकिळा देखिल आपल्या पिलांना ओळखू शकत नाही कारण सगळीच पिले एकाच काळ्या रंगाची असतात. जेव्हा पिले उडायला लागतात, तेव्हा कोकिळा दुसऱ्या झाडावर बसून कुहु-कुहु आवाज काढ्ते. कोकिळेचा आवाज ऐकून प्रभावित होतात तिची पिल्ले कावळे मस्त राहतात. कोकिळेचा आवाज ऐकून तिची पिले उडून कोकिळेकडे जातात. कोकिळा कुहु-कुहु करत दूर निघून जाते, तिच्या सोबतच तिची पिले देखिल तिच्या आवाजाला भुलून तिच्या मागे मागे जातात. कावळी विचार करते आहे की हे गेले ते गेले. जे घरट्यात आहेत, त्यांना संभाळते जेणेकरून कोणत्याही पक्षाने त्यांचे नुकसान करू नये. हा विचार करून कावळी परत येते. अशा प्रकारे कोकिळेची पिले आपल्या कुटुंबात परत येतात.

परमेश्वर कबीर जींनी धर्मदासाला समजावले आहे की हे धर्मदास! तुझा पुत्र नारायण दास कावळा म्हणजे कालाचा पुत्र आहे. त्याच्यावर अजून माझ्या प्रवचनांचा प्रभाव अद्याप पडलेला नाही. आपण दयाळू (करूणामय सतपुरूषाचे) अंश आहात. आपल्यावर माझ्या वाणीचा प्रभाव पडला आणि आपण माझ्याकडे खेचल्यासारखे आलात. कालाचा अंश असलेल्या नारायणदासवर कोणताच परिणाम झाला नाही. हीच गोष्ट प्रत्येक कुटुंबात घडते. अंकुरी हंस म्हणजेच पूर्व जन्मीचा भक्ति संस्कार जो कोणत्यातरी जन्मी सत्गुरु कबीर जींच्या सत्य कबीर पंथाचे अनुग्रहित होते, परंतु मुक्त नाहीं होऊ शकले. ते कोणत्याही कुटुंबात जन्मले तरी सत्गुरु म्हणजेच कबीर जींची वाणी ऐकल्याबरोबर व्याकूळ होतात. आणि आकर्षीत होऊन अनुग्रह प्राप्त करण्यासाठी शिष्य बनून आपले जन्माचे कल्याण करवून घेत आहेत. त्याच कुटुंबात असेच काहीतरी होते आहे. जे बिल्कुल मानत नाहींत. अन्य जे अनुग्रहित आहेत, त्यांना देखिल विरोध आणि त्यांची चेष्टा करतात ते कालाचेच अंश आहेत. ते देखिल नारायण दास प्रमाणेच कालाच्या दूतांकडून प्रचलित साधनाच करतात.

पृष्ठ १६१ अनुराग सागराचा सारांश :-

परमात्मा कबीर यांनी म्हटले की हे धर्मदास! ज्या प्रकारे शूरवीर आणि कोकिळाची

**पिले चालू लागल्यावर मागे वळून बघत नाहीत, त्याच प्रकारे मला शरण येणारे अशा प्रकारे सर्व बाधा सोडून परिवाराचा मोह सोडून माझ्याकडे येतात. तर मी त्यांच्या मागच्या एकशे एक पिढ्यांचा उद्धार करीन.**

कबीर, भक्त बीज होय जो हंसा। तारूं तास के एकोतर बंशा।।
कबीर, कोयल सुत जैसे शूरा होई। यही विधि धाय मिलै मोहे कोई।।
निज घर की सुरति करै जो हंसा। तारों तास के एकोतर बंशा।।

## ''हंस (भक्त) लक्षण''

**कावळ्यासारख्या घाणेरड्या प्रवृत्तींचा त्याग करून हंस म्हणजे भक्त व्हा. कावळा स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी इतरांचे अहित करतो. कोणत्याही प्राण्याच्या शरीरावर असलेल्या जखमेत चोच मारून त्या खालचे मास खातो. प्राण्यांच्या तर डोळ्यातून अश्रू निघतात, पण ते काही करू शकत नाहीत. कावळ्याचे ओरडणे देखिल कोणाला आवडत नाही. हंसाने (भक्त) आपला कावळ्याचा स्वभाव त्यागला पाहिजे स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्यांना कष्ट देऊ नयेत. कोकिळेसारखी मधुर भाषा असावी. ही भक्ताची लक्षणे आहेत.**

## ''ज्ञानी म्हणजेच सत्संगीचे लक्षण''

**सत्गुरुचे ज्ञान आणि अनुग्रह प्राप्त करून जर शिष्य जगत भावाने वाटचाल करीत असेल, तर तो मूर्ख आहे. त्याला भक्तिचा कोणताही लाभ होत नाही. तो भक्तिमध्ये पुढे सरकू शकत नाही. ते सार शब्द प्राप्तिसाठी योग्य होत नाहीत. जर अंध व्यक्तिचा पाय विष्ठा किंवा शेणात पडल्यास त्याची कोणी टिंगल करीत नाही. कोणी त्याला हसत नाही. जर डोळे असणारा म्हणजे भक्त कुठौर (चुकीच्या जागी) गेला (वेश्या गमन, चोरी करणे, मर्यादा सोडणे, वर्जित वस्तू आणि साधना करणे इत्यादी गोष्टी केल्या) तर तो निंदेस पात्र असतो.**

**अनुराग सागरच्या पृष्ठ १६२ आणि १६३ चा सारांश :-**

## ''भक्त परमार्थी असला पाहिजे''

**ज्याप्रमाणे गाय स्वतः जंगलातील व शेतातील गवत खाऊन व पाणी पिऊन माणसाला अमृतरुपी दूध पाजते, त्या दुधाचेच तूप बनते. गायीच्या वासराला नांगराला जोडले जाते. माणसाचे पोषण करतो. गायीचे शेण सुध्दा माणसांच्या उपयोगाचे असते. मृत्युनंतर गायीच्या शरीराच्या कातडीचे चामडया पासून वाहणा बनतात, ज्या माणसाचे काट्या कुट्यापासून संरक्षण करतात. मानव जन्म प्राप्त प्राणी परमार्थ न करून भक्तिपासून वंचित राहून पाप करण्यात आपले अमूल्य जीवन नष्ट करतो. माँसाहारी नर राक्षसा प्रमाणे गायीला मारून तिचे माँस खातो. महापाप करतो. त्यासंबंधीची परमेश्वर कबीराची खालील वचने वाचावीत :-**

### ''परमार्थी गायीचे उदाहरण''

गऊको जानु परमार्थ खानी। गऊ चाल गुण परखहु ज्ञानी।।
आपन चरे तृण उद्याना। अँचवे जल दे क्षीर निदाना।।
तासु क्षीर घृत देव अघाहीं। गौ सुत नर के पोषक आहीं।।
विष्ठा तासु काज नर आवे। नर अघ कर्मी जन्म गमावे।।
टीका पुरे तब गौ तन नासा। नर राक्षस गोतन लेत ग्रासा।।
चाम तासु तन अति सुखदाई। एतिक गुण इक गोतन भाई।।

## ''परमार्थी संत लक्षण''

गौ सम संत गहै यह बानी। तो नहिं काल करै जिवहानी।।
नरतन लहि अस बुद्धी होई। सतगुरू मिले अमर ह्वै सोई।।
सुनि धर्मनि परमारथ बानी। परमारथते होय न हानी।।
पद परमारथ संत अधारा। गुरू सम लेई सो उतरे पारा।।
सत्य शब्द को परिचय पावै। परमारथ पद लोक सिधावै।।
सेवा करे विसारे आपा। आपा थाप अधिक संतापा।।
यह नर अस चातुर बुद्धिमाना। गुन सुभ कर्म कहै हम ठाना।।
ऊँचा कर्म अपने सिर लीन्हा। अवगुण कर्म पर सिर दीन्हा।।
तात होय शुभ कर्म विनाशा। धर्मदास पद गहो विश्वासा।।
आशा एक नामकी राखे। निज शुभकर्म प्रगट नहिं भाखे।।
गुरूपद रहे सदा लौ लीना। जैसे जलहि न विसरत मीना।।
गुरू के शब्द सदा लौ लावे। सत्यनाम निशदिन गुणगावे।।
जैसे जलहि न विसरे मीना। ऐसे शब्द गहे परवीना।।
पुरूष नामको अस परभाऊ। हंसा बहुरि न जगमहँ आऊ।।
निश्चय जाय पुरूष के पासा। कूर्मकला परखहु धर्मदासा।।

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जी ने धर्मदास जींच्या माध्यमातून मानव मात्राला संदेश व निर्देश दिला म्हटले आहे की मानवाने गायीप्रमाणे परमार्थी असले पाहिजे. ज्यांना सत्गुरु प्राप्त झाले आहेत, ते अमर होतील. घोर पापांपासून त्यांची सुटका होईल. सेवा केल्यास आपले महत्व वाढविण्याची अपेक्षा करू नये. जरी स्वतःला थापून घेतले स्व:ताच स्वत:ची माहीती केली तरी त्याला अधिक यातना भोगाव्या लागतील. चांगली कर्मे नष्ट होतील.**

**अनुग्रहीतांनी केवळ एक नावाचीच आस ठेवावी. मानमरातबची इच्छा हृदयापासून त्याग करा. आपली शुभ कर्माची (दान किंवा अन्य सेवा) कोणासमोर जाहिरात करू नये. गुरूजींच्या चरणी पाण्यातील मासोळीप्रमाणे समर्पित राहा. मासोळी एक क्षण देखिल पाण्याशिवाय राहू शकत नाही. पाण्याबाहेर काढल्यास त्वरित मरते. गुरूजींना समर्पित राहण्याचे महत्त्व तसे आहे. गुरूजी कडून प्राप्त शब्द म्हणजे जपमंत्र (सत्गुरुचे शब्द) हे सत्यनाम आहे म्हणजेच आपण त्या पुरुषाच्या (परमात्मा) भक्तिमंत्राचे स्मरण करत त्याच्या चरणी सदैव लीन राहिले पाहिजे. त्याचा इतका प्रभाव आहे, त्याची इतकी शक्ती आहे की साधक पुनः मृत्युलोकात जन्म-मरणाच्या चक्रात येतच नाही. तो सनातन परम धामी, जिथे परम शांति आहे अशा स्थानी जातो. तिथे गेल्यानंतर साधक पुन्हा कधीही मृत्युलोकात परत येत नाही.**

**याचेच प्रमाण श्रीमद्भागवत गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आहे. गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे की हे अर्जुन! तू सर्वभावाने त्या परमात्माला शरण जा, त्या परमात्माच्या कृपेनेच तू परम शांतिला आणि सनातन परम धामला (शाश्वतम् स्थानम्) प्राप्त होशील.(अध्याय १८ श्लोक ६२).**

**गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे की तत्त्वज्ञान प्राप्ति पश्चात् साधक पुन्हा कधीही मृत्युलोकात परत येत नाही अशा परमात्माच्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे. ज्या परमात्माने संसाररूपी वृक्षाची रचना केली आहे , त्याचीच भक्ति करा.(अध्याय १५ श्लोक ४).**

गीता ज्ञानदात्याने आपल्या नश्वर म्हणजेच जन्म-मरणाच्या स्थितिचे वर्णन गीता अध्याय २ श्लोक १२, अध्याय ४ श्लोक ५, ९ मध्ये आणि अध्याय १० श्लोक २ मध्ये स्पष्ट केली आहे की हे अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. ते तुला माहित नाही, पण मला माहित आहे. साधकहो! गीता वाचल्यास हे स्पष्ट होते की गीता ज्ञानदाताच (काल ब्रह्मच श्रीकृष्णाच्या शरीरात प्रवेश करून हे सांगत होते) नश्वर आहे, जन्म-मरणाच्या चक्रात आहे. तर मग त्यांच्या उपासकाची देखिल तशीच स्थिति होते. त्यामुळेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये वर्णन केल्यानुसार लाभ प्राप्त होणार नाहीं. दूसरी गोष्ट अशी सिद्ध होते आहे की गीता ज्ञानदाता कोणी अन्य समर्थ आणि सर्वलाभदायक परमेश्वर आहेत. त्यांना शरण जाण्यासाठी गीता ज्ञान दाता म्हणजेच काल ब्रह्मने सांगितले आहे. ते परमेश्वर कबीर बन्दीछोड़ जी आहेत. आपण जे कबीर सागर वाचत आहोत, त्यामध्ये त्यांनीच आपला महिमा स्वतःच गायला आहे. परमात्मांनी अनुराग सागर पृष्ठ १३ वर म्हटले आहे की सत्य पुरूषा द्वारा रचीत सृष्टिविषयी सांगितलेल्या कथेचा साक्षीदार कोणाला करू? कारण सर्वांची उत्पत्ति नंतर झाली आहे. आधी एकटे सतपुरूषच होते. इथे विवेकाने विचार करण्यासारखी बाब अशी आहे की जर सृष्टिरचनेच्या वेळेस कोणीच नव्हते, तर कबीर जींना हे ज्ञान कुठून झाले? त्यामुळे हे स्वसिद्ध आहे की ते स्वतःच पूर्ण परमात्मा व सृष्टिचे रचनाकार आहेत. परमेश्वर कबीर जी ज्या महान आत्म्यांना भेटले आहेत, त्यांनी देखिल याचीच साक्ष्य दिली आहे की :-

गरीब, अनन्त कोटि ब्रह्माण्ड का, एक रति नहीं भार।
सतगुरू पुरूष कबीर हैं, कुल के सिरजनहार।।

भावार्थ या वचनावरूनच स्पष्ट होतो आहे.

''कूर्म कला परखो धर्मदासा''चा भावार्थ आहे की ज्याप्रमाणे कासव हे आपत्तिच्या वेळेस आपले तोंड आणि पाय आपल्या आतमध्ये लपवून निष्क्रिय होऊन जाते आणि आपत्ति टळल्यानंतर त्वरित आपल्या मार्गाने चालू लागते. त्याच प्रकारे भक्ताने देखिल हे जाणले पाहिजे की जरी प्रपंचातील व्यक्ति आपल्या भक्ति मार्गात बाधा उत्पन्न करत असल्या तरी त्याला उलट जवाब न देता आपली भक्ति लपवून सुरक्षित ठेवावी. सर्व काही शांत झाल्यावर पुन्हा त्याच गतिने साधना करावी. अशा प्रकारे ''निश्चय जाय पुरूष के पासा'' या उक्तीनुसार तो साधक परमात्मापाशी अवश्य पोहोचणारच आहे.

अनुराग सागर पृष्ठ १६३(२८१) वर :-

सोरठा :- हंस तहां सुख बिलसहीं, आनन्द धाम अमोल।
पुरूष तनु छवि निरखहिं, हंस करें किलोल।।

भावार्थ :- उपरोक्त ज्ञानाच्या आधारे साधना करून साधक अमर धामी जाऊ शकतो. तिथे आनंद भोगत असतो. तो सतलोक अनमोल आहे. तिथे सत्यपुरूषाच्या शरीराची शोभा पाहून आनंद मानतात.

## ❖ दीक्षा घेऊन नामस्मरण करणे अनिवार्य आहे :-

अध्याय ''बीर सिंह बोध'' पृष्ठ १२३ वर :-

राजा बीरसिंहाची सुंदरदेई नावाची एक छोटी राणी होती. तिनेदेखिल परमेश्वर कबीर जी कडून अनुग्रह घेतला होता. तिने सत्संग अनेक श्रवण केले होते. श्रद्धा कमी होती, पण

कमाई म्हणजेच साधना करीत नव्हती. जेव्हा राणीची शेवटची वेळ आली, तेव्हा यमदूत राजभवनात प्रवेश करून आले. मग यमदूतांनी राणीच्या शरीरात प्रवेश केला आणि अंतिम श्वांसांचीवाट पाहू लागले. त्याच वेळेस राणी सुंदरदेईच्या शरीरात अस्वस्थता सुरु झाली. यमदूत दिसायला लागला तेंव्हा राजाने राणीला विचारले, काय गोष्ट आहे? राणीने म्हटले की मला राजपाट, महाल, दागिने, अशा कशाचीच ईच्छा राहिलेली नाहीं. राणीने म्हटले की साधु-भक्तांना बोलवून परमात्माविषयी चर्चा करवा. साधु आणि भक्त येऊन परमात्माची चर्चा आणि भक्ति करू लागले. त्याने काहीच लाभ झाला नाहीं. राणीच्या शरीराच्या यातना आणखी वाढल्या. अर्धा-अर्धा श्वांस सुरु होता. श्वास ओढून ओढून यायला लागला. हृदयकमल त्यागून जीव भयभीत होऊन त्रिकुटीकडे पळाला. यमदूतांनी चारही बाजूंनी घेरले. चारही यमदूतांनी जीवाला घेरून म्हटले की आता चला! हरि (प्रभु) ने तुम्हाला बोलावले आहे. तेव्हा राणीच्या जीवाला सत्संगातील वचने आठवली. तिने यमदूतांना म्हटले की अरे दुष्टांनो! अरे पाप्यांनो! तुम्ही इथे कसे आलात? आमचे सत्गुरु आमचे रक्षणकर्ते आहेत. आपण मला घेऊन जाऊ शकत नाही. माझ्या सत्गुरु धन्याने (मालिक) मला नाम दिले आहे. माझे गुरू जी आल्यावर मी जाईन. हे सर्व ऐकून यमदूत म्हणाले की जर आपला कोणी धनी (मालिक) असेल तर त्याला बोलवा नाहीं तर आमच्या सोबत परमात्माच्या दरबारात चला. जीवाने म्हटले की :-

धरनी (पृथ्वी) आकाश से नगर नियारा। तहाँ निवाजै धनी हमारा।।
अगम शब्द जब भाखै नाऊं। तब यम जीव के निकट नहीं आऊं।।

भावार्थ :- जे सत्गुरु जी सत्संगात ज्ञान ऐकवत आहेत, ते सत्य आहे यावर आधी तर राणीचा विश्वास नव्हता. तिला वाटायचे की ही केवळ एक गोष्ट आहे. कारण सगळे नौकर-चाकर हुकुम होताच धावत येत असत. मनमर्जीनुसार जेवण घ्यायची, सुंदर वस्त्रे, दागिने घालत होती. तिने विचार केला की असाच आनंद राहील. ही तर पूर्वजन्माची बैटरी चार्ज होती. वर्तमानात चार्जर मिळाला (नाम रुपात) तो चालू केला नाहीं म्हणजेच साधना केली नाहीं. जेव्हा बैटरीचे चार्जिंग संपले, बैटरी डाउन होते तेव्हा सर्व सुविधा बंद होऊन जातात. मग न पंखा चालतो, न बल्ब लागतो. बटन दाबत रहा, कोणतीही क्रिया होत नाहीं. त्याच प्रकारे जीवाचे पूर्वजन्मीचे भक्तिधन म्हणजेच चार्जिंग समाप्त होते आणि सर्व सुविधा काढून घेतल्या जातात. जीवाला नरकात टाकले जाते, तेव्हा त्याला अक्कल येते. त्या वेळेस वेळ हातातून निघून गेलेली असते. केवळ पश्चाताप आणि रडण्याशिवाय काहीच शिल्लक राहत नाही. राणी सुंदरदेईने सत्संग श्रवण केले होते. पूर्ण सत्गुरुची दीक्षा घेतली होती. नामस्मरणाची कमाई केली नव्हती. ती गुरूद्रोही झाली नव्हती. गुरूनिंदा करत नव्हती. राणीने सत्गुरुचे स्मरण केले की हे सत्गुरु! हे माझे धनी! मला यमदूतांनी घेरले आहे. मज दासीला सोड़वा. मी आपली दीक्षा घेतली आहे. आज मला कळले की अशा आपत्तित न पति, न पत्नी, न मुलगा -मुलगी, भाऊ-बहीण, राजा-प्रजा कोणीही मदतीस येत नाहीं. राणीच्या जीवाने हृदयापासून सत्गुरुना साद घातली. सत्गुरु कबीर जी त्वरित तिथे हजर झाले. राणीनी धावून सत्गुरुदेवांचे चरण धरले. त्याच वेळेस यमदूत पळत पळत हरि म्हणजेच धर्मराजाकडे गेले आणि सांगितले की तिचे सत्गुरु आले तर तिथे प्रकाश पडला. जीवाने सतसुकृत नाम जपले होते. त्याला इतकेच आठवत होते. त्यामुळे त्याला यमदूतांपासून सोड़वले आणि पुनः जीवन वाढवले. तेव्हा राणीने मनापासून भक्ति केली. मग सत्गुरु कबीरजींनी पुनः सतनाम, सारनाम दिले, त्याची कमाई केली. संसार असार दिसू लागला. राज्य, धन, परिवार परका वाटू लागला. जाण्याची

वेळ निकट आल्याचे जाणवत होते. त्यामुळे राणीने तन-मन-धन सत्गुरु चरणी समर्पित करून भक्ति केली तेव्हा सत्यलोकी गेली. तिथे परमात्मानी (सत्य पुरुष) राणीच्या जीवासमोर आपलेच दूसरे रूप सत्गुरुना प्रश्न केला की हे तारणहार! माझ्या जीवाने यमदूतांना कसे रोकले? सत्गुरु रूपात कबीर जींनी म्हटले की हे परमेश्वर! हिने दीक्षा घेऊन भक्ति केली नाहीं. त्या कारणामुळेच हिला यमदूतांनी घेरले होते. मी सोड़वले. परमेश्वर कबीर जींनी जीवाला म्हटले की आपण भक्ति का नाहीं केली? सत्यलोकात कशा आलात?

मान खाली करून जीवाने म्हटले की आधी मला विश्वास नाहीं वाटला. मग यमदूतांच्या यातना पाहिल्यावर मला आपली आठवण आली. आपले ज्ञान सत्य वाटले. आपला धावा केला. आपण माझे रक्षण केले. मग मला परत जीवन दिले गेले. तेव्हा मी मनापासून आपली भक्ति केली. पूर्ण दीक्षा प्राप्त करून आपल्याच कृपेने गुरूजींच्या सहकार्याने मी इथे आपल्या चरणी पोहोचले आहे. सत्यलोकी गेल्यावर भक्ताला अन्य भक्तांकडे पाठविले जाते. सुंदर अमर शरीर मिळते. खूप मोठे घर मिळते. विमान अंगणात उभे असते. सिद्धियां आदेशाची वाटच पाहत आहेत. लगेच विजेसारख्या सक्रिय होतात. ज्याप्रमाणे वीजेचे बटन दाबल्या बरोबर विजेवर चालणारी यंत्र त्वरित कार्य करू लागतात तसेच तिथे तिथे देखिल वचनाचे बटन आहे. जी वस्तु पाहिजे ती मागा. लगेच ती वस्तु-पदार्थ आपल्या जवळ उपलब्ध होईल. भोजन घेण्याची इच्छा झाल्यास आपल्या भोजनस्थळी हालचाल सुरु होईल. ताटवाटी पेला ठेवले जाईल. काही वेळात खाण्याची इच्छा झाली, तर सिद्धिने उठून स्वयंपाकघरात ठेवले जातील. क्षणभरात इच्छा झाली, तर त्याच वेळी ते मिळण्याची व्यवस्था होईल. फिरायला जाण्याची इच्छा झाली, तर विमानात हालचाल झाल्याचे जाणवेल. विमानाच्या जवळ जाताच द्वार उघडेल. विमान सुरु होईल. ज्या द्वीपावर जाण्याची इच्छा होईल, विचार केल्या बरोबर विमान त्याच दिशेने उड़ू लागेल. इच्छा होताच ताजी-ताजी फळे झाडावरून तोडून तुमच्या समोर आणून ठेवली जातील.हा मृत्युलोक म्हणजे सत्यलोकाचीच नक्कल आहे. इथल्या प्रमाणेच स्त्री-पुरुष परिवार आहेत. सत्यलोकात अपत्यांची दोन पद्धतीनी उत्पत्ति होते. शब्दाने आणि मैथुनाने. ते भक्तावर अवलंबून आहे. शब्दातून अपत्योत्पत्ती होणारा भाग हा सतपुरूषाच्या सिंहासनाच्या चारही बाजूला आहे. स्त्री पुरुषापासून असणारे कुटुंब हे त्यानंतर आहे. शब्दाने अपत्य उत्पन्न करणारे केवळ मुलगेच उत्पन्न करतात. सत्यलोकात वृद्धावस्था नाहीं आहे. स्त्री पुरुष विभागात मुलगे व मुली दोघेही निर्माण होतात. विवाह करतात. केवळ शब्दातून जी मुले उत्पन्न होतात, ते मृत्यलोकातून मुक्त होउन गेलेले जीव जन्म घेतलेले असतात. मग कधीही मृत्यु पावत नाहीत किंवा वृद्धही होत नाहीत. जे सत्यलोकात मुक्त होऊन येतात, त्यांना सर्व प्रथम सत्यपुरूषजींचे दर्शन घडवले जाते. त्या वेळेस त्याचे पृथ्वीवर असते तसेच स्वरूप असते. परंतु वृद्ध खालून गेल्यास तिथे सतपुरूषासमोर त्याच अवस्थेत व स्वरूपात जातो. त्याचा प्रकाश सोळा सूर्यांच्या प्रकाशाइतका होतो. त्यानंतर त्यांना सगळ्यांपासून वेगळ्या असलेल्या अशा स्थानावर पाठविले जाते. तिथे जाताच त्यांचे स्वरूप हे तसेच राहते. परन्तु त्याच्या शरीराचा प्रकाश सोळा सूर्यां एवढा होतो. परंतु जरी खालून वर जाताना तो वृद्धावस्थेत गेला असला तरीही तिथे युवा अवस्था प्राप्त होते. तरूण असेल तर तरुणच राहतो. बालकअसेल तर बालकच राहतो. तिथे काहींना सत्यपुरूषाच्या शब्दानुसार स्त्री-पुरूषाचे शरीर मिळते. काही बीज रूपात सतपुरूषा द्वारा बनवली जातात. ज्यांचा मग पुन्हा एकदा सत्यलोकात कोणाच्या तरी घरात जन्म होईल, कुटुंब तयार होईल. त्या स्थानावर जे मृत्युलोक आणि अक्षर लोकातून मुक्त होउन जातात, ते हंस एकदा जन्म घेतील एकान्त स्थानावर ठेवले जाते ते

**दोन्ही भागात जन्म घेतात (शब्दापासून आणि स्त्री-पुरूषापासून) स्त्री-पुरूषां पासून उत्पत्तिची सरासरी जास्त असते. ही सरासरी १०/९० अशी असते. म्हणजे १०% जणांची शब्दापासून उत्पत्ति असेल तर, ९०% जणांची विवाह पद्धतीने उत्पत्ति होत असते.**

**सत्यलोकात स्त्री आणि पुरुषांच्या शरीराचा प्रकाश हा सोळा सूर्याच्या प्रकाशाइतका असतो. छोटा सतलोक, मानसरोवर आधी आहेत. तिथे दोघांच्याही शरीराचा प्रकाश चार सूर्यांप्रमाणे असतो. मग पुढे जातात. जेव्हा परब्रह्मच्या लोकात तयार झालेल्या अष्टकमळा जवळ पोहोचतात, तेव्हा हंस आणि हंसनी म्हणजेच स्त्री पुरुषाच्या शरीराचा प्रकाश १२ सूर्यांच्या प्रकाशा सारखा होतो. मग सत्यलोकात बनलेल्या भंवर गुहेत प्रत्येकाच्या शरीराचा प्रकाश सोळा सूर्यांच्या प्रकाशा प्रमाणे होऊन जातो.**

**याचे प्रमाण कबीर सागराच्या ''मोहम्मद बोध'' अध्यायातील पृष्ठ २०, २१ आणि २२ वर दश मुकामी रेखताः-**

## ''दश मुकामी रेखता''

**पृष्ठ २१ मधून काही अंश लिहिला आहे :-**

भया आनन्द फन्द सब छोड़िया पहुँचा जहाँ सत्यलोक मेरा।
{हंसनी (नारी रूप पुण्यात्माऐं) हंस (नर रूप पुण्यात्माऐं)}
हंसनी हंस सब गाय बजाय के साजि के कलश मोहे लेन आए।।
युगन युगन के बिछुड़े मिले तुम आय कै प्रेम करि अंग से अंग लाए।।
पुरूष दर्श जब दीन्हा हंस को तपत बहु जन्म की तब नशाये।।
पलिट कर रूप जब एक सा कीन्हा मानो तब भानु षोडश (१६) उगाये।।
पहुप के दीप पयूष (अमृत) भोजन करें शब्द की देह सब हंस पाई।।
पुष्प का सेहरा हंस और हंसनी सच्चिदानंद सिर छत्रा छाए।।
दीपैं बहु दामिनी दमक बहु भांति की जहाँ घन शब्द को घमोड़ लाई।।
लगे जहाँ बरसने घन घोर कै उठत तहाँ शब्द धुनि अति सोहाई।।
सुन्न सोहैं हंस-हंसनी युत्थ (जोड़े-झुण्ड) ह्नै एकही नूर एक रंग रागै।।
करत बिहार (सैर) मन भावनी मुक्ति में कर्म और भ्रम सब दूर भागे।।
रंक और भूप (राजा) कोई परख आवै नहीं करत कोलाहल बहुत पागे।।
काम और क्रोध मदलोभ अभिमान सब छाड़ि पाखण्ड सत शब्द लागे।।
पुरूष के बदन (शरीर) कौन महिमा कहूँ जगत में उपमा कछु नाहीं पायी।।
चन्द और सूर (सूर्य) गण ज्योति लागै नहीं एक ही नख (नाखुन) प्रकाश भाई।।
परवाना जिन नाद वंश का पाइया पहुँचिया पुरूष के लोक जायी।।
कह कबीर यही भांति सो पाइहो सत्य पुरूष की राह सो प्रकट गायी।।

**भावार्थ :- या अमृतवाणी वरून हे स्पष्ट आहे की परमेश्वर कबीर जी सत्गुरु रूपात पृथ्वीवरून धर्मदास जींना घेऊन सत्यलोकात गेले तेव्हा मार्गात ९ स्थाने आली जसे नासूत, मलकूत हे फारसी शब्द आहेत. या सात आकाशाच्या पलीकडे अचिन्त, विष्णु लोक इत्यादी पार करून जेव्हा सत्यलोकात पोहोचले तेव्हा धर्मदास जी सांगतात की मला सन्मानपूर्वक घेऊन जाण्यासाठी सत्यलोकातील हंस (पुरुष) व हंसनी (स्त्रिया) नाचत आणि गात ढ़ोल इत्यादी-इत्यादी थाटामाटात वाजवत स्त्रिया डोक्यावर कलश ठेवून घ्यायला आले. त्यांच्या शरीराचा प्रकाश सोळा सूर्यांप्रमाणे होता. माझ्या शरीराचा प्रकाशदेखिल त्यांच्या शरीराप्रमाणे**

सोळा सूर्यांसारखा झाला.

जो पृथ्वी लोकातून मोक्ष प्राप्त करून हंस जातो, त्याला पुहप द्वीपात घेऊन जातात. तिथे सर्व सुख आहे. तो देखिल सत्यलोकाचाच भाग आहे. परंतु सर्व प्रथम खालून मोक्ष प्राप्त जीवाला पोहप द्वीपात ठेवले जाते. तिथले दृश्य सांगत आहेत. इथून त्याचा जन्म अन्य स्थानी असलेल्या कुटुंबात होतो. त्यानंतर जिथे स्त्री पुरुषांपासून उत्पत्ती होऊन कुटुंबे तयार होतात, त्या स्थानाचे वर्णन आहे. जिथे स्त्री पुरुषांच्या जोड्यांचे समूह च्या समूह सुखात बसून गप्पागोष्टी करीत आहेत, ढगांचा गडगडाट होतो आहे, फव्वारे पड़ताहेत, हे एक वेगळे स्थान आहे, जिथे सतलोक निवासी सहली साठी जातात. काही जागा अशा आहेत, तिथे ढग दिसतच नाहीत, पण पाउस मात्र होत असतो.

❖ दीक्षा घेतल्यावर साधकाने काय केले पाहिजे? त्याची माहिती पवित्रकबीर सागरच्या ''धर्म बोध'' अध्यायात देखिल आहे.

कृपया ''धर्म बोध'' अध्यायाचा सारांश वाचावा :-

कबीर सागरामध्ये ३३ वां अध्याय धर्म बोध पृष्ठ १७७ (१५२१) वर आहे. या अध्यायात परमेश्वर कबीर जींनी धर्म करण्याचे विशेष ज्ञान सांगितले आहे. हेही स्पष्ट केले आहे की परमेश्वर कबीरांच्या सच्चा पंथात दिवसातून तीन वेळा संध्या केली जाते आहे. संध्येचा अर्थ आहे दोन वेळांचे एकत्र येणे. एक संध्या सकाळी कारण तेव्हा दिवस आणि रात्रिचे मिलन होत आहे, रात्र संपून दिवसाचा शुभारंभ होतो आहे. दूसरी संध्या दिवसा बारा वाजता असते. त्यावेळेस चढ़त्या दिवसाचा दुसरा प्रहर संपतो व दिवस ढ़ळायला सुरवात होते, ही मध्यन्ह दिवसांचीसंध्या आहे. तीसरी संध्या सायंकाळी असते. त्या वेळेस दिवस आणि रात्रिचे मिलन होत आहे. तसे सामान्य लोक सायंकाळची संध्या म्हणत असतात. संध्याचा अर्थ परमात्माची स्तुति करणे असाही असतो.

वेदांमध्ये प्रमाण आहे की जो जगाचा तारणहार होईल, तो तीन वेळा संध्या करतो आणि करवतो. सकाळी आणि सायंकाळी पूर्ण परमात्माची स्तुति-आरती आणि माध्यान्ही विश्वातील सर्व देवतांची स्तुति करण्यास सांगितले आहे. प्रमाण :- ऋग्वेद मण्डल नं. ८ सूक्त १ मंत्र २९ मध्ये आणि यजुर्वेद अध्याय १९ मंत्र २६ मध्ये आहे.

कबीर सागर मध्ये धर्मबोध अध्यायाच्या पृष्ठ १७७ वर देखिल हेच प्रमाण आहे.

सांझ सकार मध्या सन्ध्या तीनों काल।
धर्म कर्म तत्पर सदा कीजै सुरति सम्भाल।।

भावार्थ :- भक्तांनी तिन्ही वेळेस संध्या करावी म्हणजेच सायंकाळी साकार म्हणजेच सकाळी आणि मध्यान्ह म्हणजेच दुपारी (दिवसांच्या मध्यान्ही) संध्या करते वेळेस सुरति म्हणजेच आपले लक्ष आरतीतील शब्दांकडे असले पाहिजे व धर्माच्या कामात नेहमी तत्पर असावे, आळस करू नये.

धर्म बोध पृष्ठ १७८(१५२२) वर :-

कबीर कोटिन कंटक घेरि ज्यों नित्य क्रिया निज कीन्ह।
सुमिरन भजन एकांत में मन चंचल गह लीन।।

भावार्थ :- भक्ताला कोटीकोटी यातना झाल्या तरी आपली नित्य क्रिया (तीन वेळची संध्या) अवश्य केली पाहिजे आणि चंचल मनाला आवरून एकान्तात परमात्माच्या दीक्षेत

**सांगितलेल्या नामाचा जप केला पाहिजे.**

कबीर भक्तों अरू गुरू की सेवा कर श्रद्धा प्रेम सहित।
परम प्रभु (सत्य पुरूष) ध्यावही करि अतिश्य मन प्रीत।।

**भावार्थ :– आपल्या गुरूदेव आणि सत्संगात किंवा घरीआलेल्या भक्तांची सदैव आदराने सेवा करावी. श्रद्धा आणि प्रेमाने सेवा केली पाहिजे. परम प्रभु म्हणजेच परम अक्षर पुरूषाची भक्ति अत्याधिक प्रेमाने करावी.**

## ''भक्त जती आणि सती असला पाहिजे''

### ''जतिची लक्षणे''

पुरूष यति (जति) सो जानिये, निज त्रिया तक विचार।
माता बहन पुत्री सकल और जग की नार।।

**भावार्थ :– जो आपल्या स्त्रीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्त्रीबाबत पति–पत्नी भाव ठेवत नाही, त्याला यति पुरूष म्हटले जाते. परस्त्रीला तिच्या वयानुसार आई, बहिण किंवा कन्येच्या भावाने पाहावे.**

### ''सति स्त्रीची लक्षणे''

स्त्रि सो जो पतिव्रत धर्म धरै, निज पति सेवत जोय।।
अन्य पुरूष सब जगत में पिता भ्रात सुत होय।।
अपने पति की आज्ञा में रहै, निज तन मन से लाग।।
पिया विपरीत न कछु करै, ता त्रिया को बड़ भाग।।

**भावार्थ :– जी आपल्या पतिवर प्रेम करते, आपल्या पतिव्यतिरिक्त जगातील अन्य पुरूषांकडे त्यांच्या वयानुसार पिता, भाऊ आणि पुत्राच्या भावनेने पाहते म्हणजे त्यांच्याशी तशी वागते, आपल्या पतिच्या आज्ञेत राहते, तन–मनाने सेवा करते व कोणतेही कार्य पतिशिवाय करीत नाही, त्या स्त्रीला सती म्हणतात.**

### ''दान करणे किती महत्वाचे आहे''

कबीर, मनोकामना बिहाय के हर्ष सहित करे दान।
ताका तन मन निर्मल होय, होय पाप की हान।।
कबीर, यज्ञ दान बिन गुरू के, निश दिन माला फेर।
निष्फल वह करनी सकल, सतगुरू भाखै टेर।।
प्रथम गुरू से पूछिए, कीजै काज बहोर।
सो सुखदायक होत है, मिटै जीव का खोर।।

**भावार्थ :– परमेश्वर कबीर जी सांगतात की कोणतीही मनोकामना न ठेवता जे दान केले जाते, त्याची दोन्ही फळे मिळतात. वर्तमान जीवनात कार्य सिद्धि देखिल होईल आणि भविष्यासाठी पुण्य जमा होईल आणि जे मनोकामनेच्या पूर्तिसाठी केले जाते, ते कार्य सिद्धि पश्चात् समाप्त होउन जाते. मनोकामना न ठेवता केलेले दान आत्मा निर्मल करते, पाप नाश करते.**

❖ **आधी गुरूला धारण करा, मग गुरूदेवजींच्या निर्देशानुसार दान केले पाहिजे. गुरूआज्ञेशिवाय कितीही दान केले आणि कितीही नाम–स्मरणाच्या माळा फिरवा सर्व व्यर्थ**

**प्रयत्न आहे. सत्गुरु हेच पुन्हा पुन्हा सांगत आहेत.**

**❖ प्रथम गुरूची आज्ञा घेऊनच आपल्या नव्या कार्याची सुरवात केली पाहिजे. ते कार्य सुखदायक असते आणि मनाच्या सगळ्या काळज्या मिटतात.**

कबीर, अभ्यागत आगम निरखि, आदर मान समेत।
भोजन छाजन, बित यथा, सदा काल जो देत।।

**भावार्थ :– आपल्या घरी कोणी अतिथि आल्यास त्याला आदराने भोजन आणि बिछाना आपल्या आर्थिक स्थितिनुसार नेहमी दिला पाहिजे.**

सोई म्लेच्छ सम जानिये, गृही जो दान विहीन।
यही कारण नित दान करे, जो नर चतुर प्रविन।।

**भावार्थ:– जो गृहस्थी दान करत नाही, तो म्लेच्छ म्हणजेच दुष्ट व्यक्ति सारखाच आहे. त्यासाठीच हे बुद्धिमान! सदैव दान करा.**

पात्रा कुपात्रा विचार के तब दीजै ताहि दान।
देता लेता सुख लह अन्त होय नहीं हान।।

**भावार्थ :– कुपात्राला दान देता कामा नये. सुपात्राला आनंदाने दान द्यावे. सुपात्र गुरूदेव असल्याचे सांगितले आहे. नंतर कोणी भुकेला असेल त्याला भोजन दिले पाहिजे. योग्य ते धन देऊन रोग्यांवर उपचार केले पाहिजेत, पूरग्रस्त, भूकंपग्रस्त लोकांचे गट करून त्यांना आपल्या हाताने भोजन–कपड़े दिल्यास ते सुपात्राला दिलेले दान असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे कोणतीही हानि होत नाहीं.**

**''धर्म बोध पृष्ठ १७९ चा सारांश''**

कबीर, फल कारण सेवा करै, निशदिन याचै राम।
कह कबीर सेवा नहीं, जो चाहै चौगुने दाम।।

**भावार्थ :– जो कोणत्याही कार्याच्या सिद्धिसाठी सेवा (पूजा) करतो आहे, आणि दिवस–रात्र परमात्मा कडे काही ना काही मागत असतो. परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की चौपट धन प्राप्त करण्याच्या उद्देशाने केलेली सेवा ही सेवाच नाही.**

कबीर, सज्जन सगे कुटम्ब हितु, जो कोई द्वारै आव।
कबहु निरादर न कीजिए, राखै सब का भाव।।

**भावार्थ :– भद्र पुरूषों, सगेसोयरे म्हणजेच नातेवाईक, कुटुंबीय, आणि हितचिंतकांना आपल्या द्वारी यायचे असल्यास त्यांचा कधीही अनादर करू नये. सर्वांचा सन्मान करावा.**

कबीर, कोड़ी–कोड़ी जोड़ी कर कीने लाख करोर।
पैसा एक ना संग चलै, केते दाम बटोर।।

**भावार्थ :– दान धर्मावर पैसा खर्च नाहीं केला, लाखों–करोड़ों रूपये जमा केले. जग सोडून जाताना एक पैसाही सोबत घेऊन जाता येणार नाही. मग तुमच्या जवळ कितीही धनसंपत्ती जमा होऊ दे.**

जो धन हरिके हेत, धर्म राह नहीं लगात।
सो धन चोर लबार गह, धर छाती पर लात।।

**भावार्थ :– जे धन परमात्मा प्रीत्यर्थ खर्च होत नाहीं, कधी धर्म कर्मात खर्च होत नाही,**

**ते धन डाकू, चोर, लुटारू छाताडावर पाय ठेऊन म्हणजेच घाबरवून आणि धमकावून घेऊन जातात.**

सत का सौदा जो करै, दम्भ छल छिद्र त्यागै।
अपने भाग का धन लहै, परधन विष सम लागै।।

**भावार्थ :– आपल्या जीवनात परमात्माला साक्षी ठेऊन सत्याच्या आधारावर सर्व कर्म केली पाहिजेत. आपल्या भाग्यात जेवढे धन लिहिले आहे, त्यातच समाधान मानले पाहिजे. परक्याचे धन विषासमान समजावे.**

भूखा जहि घर ते फिरै, ताको लागै पाप।
भूखों भोजन जो देत है, कटैं कोटि संताप।।

**भावार्थ :– ज्या घरातून कोणी भुकेल्या पोटी निघून जातो, त्याला पाप लागते. भूकेल्या लोकांना भोजन देणाऱ्याची करोड़ों विघ्ने टळतात.**

प्रथम संत को जीमाइए। पीछे भोजन भोग।
ऐसे पाप को टालिये, कटे नित्य का रोग।।

**भावार्थ :– जर आपल्या घरी कोणी संत (भक्त) आल्यास आधी त्याला भोजन वाढावे. नंतर आपले भोजन करावे. अशा प्रकारे आपल्या डोक्यावर नित्य येणाऱ्या पापांमुळे होणाऱ्या यातना टाळल्या पाहिजेत.**

**धर्म बोध पृष्ठ १८० चा सारांश :–**

कबीर, यद्यपि उत्तम कर्म करि, रहै रहित अभिमान।
साधु देखी सिर नावते, करते आदर मान।।

**भावार्थ :– अहंकाराचा त्याग करून श्रेष्ठ कर्म केले पाहिजे. संत, भक्त येताना दिसल्यास नम्रतेने डोके झुकवून नमस्कार व आदर सत्कार केला पाहिजे.**

कबीर, बार–बार निज श्रवणतें, सुने जो धर्म पुराण।
कोमल चित उदार नित, हिंसा रहित बखान।।

**भावार्थ :– भक्ताने वारंवार धर्म–कर्मा विषयी सत्संग ज्ञान श्रवण केले पाहिजे व आपले चित मृदू ठेवले पाहिजे. अहिंसा परम धर्म आहे. असे अहिंसेसंबंधी प्रवचन श्रवण केले पाहिजे.**

कबीर, न्याय धर्मयुक्त कर्म सब करैं, न कर ना कबहू अन्याय।
जो अन्यायी पुरूष हैं, बन्धे यमपुर जाऐं।।

**भावार्थ :– सदैव न्याययुक्त कर्म केले पाहिजे. कधीही अन्याय करता कामा नये. जे अन्याय करत आहेत, ते यमराजाच्या लोकात म्हणजेच नरकात जातात.**

**धर्मबोधपृष्ठ १८१ चा सारांश :–**

कबीर, गृह कारण में पाप बहु, नित लागै सुन लोय।
ताहिते दान अवश्य है, दूर ताहिते होय।।
कबीर, चक्की चौंकै चूल्ह में, झाड़ू अरू जलपान।
गृह आश्रमी को नित्य यह, पाप पाँचै विधि जान।।

**भावार्थ :– प्रपंचामध्ये गिरणीतून कणिक दळून आण्यासाठी आणि जेवण बनविण्यासाठी चूल पेटवली जाते. चौंका म्हणजेच त्याची जागा लिंपण्यास, झाडू मारण्यात आणि खाण्यात**

**आणि पीण्यात पाच प्रकारची पापे लागतात. हे प्रापंचीकांनो! ऐका! या कारणांच्या मुळे आपलयाला नित्य पाप लागते आहे. त्यासाठी दान करणे आवश्यक आहे. ही पापे दान करण्यानेच नाश पावतील.**

कबीर, कछु कटें सत्संग ते, कछु नाम के जाप।
कछु संत के दर्शते, कछु दान प्रताप।।

**भावार्थ :- भक्ताची पापे अनेक धार्मिक क्रियांमुळे नाश पावतात. काही सत्संग-वचन श्रवण केल्याने, ज्ञानयज्ञामुळे, काही नामजपा मुळे तर काही संतदर्शन करण्याने आणि काही दानाच्या प्रभावामुळे नाश पावतात.**

**जसे वस्त्र नेसतो. माती धूळ इत्यदी मुळे ते कपडे मळतात. ते पाणी-साबणाने धुवावे लागतात. अशा प्रकारे नित्य कार्यात पाप लागणे स्वाभाविक आहे. त्या वस्त्रासारखेच सत्संग वचन, नाम स्मरण, दान व संत दर्शन रूपी साबण-पाण्याने नित्य धुण्याने आत्मा निर्मल राहतो. भक्तिमध्ये मन व्यग्र राहते.**

कबीर, जो धन पाय न धर्म करत, नाहीं सद् व्यौहार।
सो प्रभु के चोर हैं, फिरते मारो मार।।

**भावार्थ :- जे धन परमात्माने मानवाला दिले आहे, त्याचे मधून जो दान करत नाहीं आणि उत्तम आचरण करत नाहीत, ते परमात्मासाठी चोरच आहेत. ते माया जोड़ण्याच्या धुंदितच फिरत असतात. संत गरीबदास जींनी देखिल म्हटले आहे की :-**

जिन हर की चोरी करी और गए राम गुण भूल।
ते विधना बागुल किए, रहे ऊर्ध मुख झूल।।

**हेच प्रमाण गीता अध्याय ३ श्लोक १० ते १३ मध्ये देऊन म्हटले आहे की जे धर्म-कर्म करत नाहीं, परमात्माने दिलेले धन यामधून दान इत्यादी धर्मकार्यासाठी वापरीत नाहीत, ते तर चोर आहेत. ते तर आपल्या शरीराच्या पोषणासाठीच अन्न शिजवतात. धर्मकर्मात उपयोग करत नाहीत, ते तर पापच सेवन करीत असतात.**

## ''मुलांना शिक्षण अवश्य दिले पाहिजे''

कबीर, मात पिता सो शत्रु हैं, बाल पढ़ावैं नाहिं।
हंसन में बगुला यथा, तथा अनपढ़ सो पंडित माहीं।।

**भावार्थ :- जे माता-पिता आपल्या मुलांना शिकवत नाहीत, ते आपल्या मुलांचे शत्रूच आहेत. शिक्षित माणसांमध्ये अशिक्षित माणूस म्हणजे जणू हंस पक्षांमध्ये बगळा. इथे शिकवणे धार्मिक ज्ञानाशी, सत्संग श्रवण करण्याशी संबंधित आहे.**

**जर एखाद्या व्यक्तिला आध्यात्मिक ज्ञान नसेल तर तो शुभ-अशुभ कर्म ओळखू शकत नाही. त्यामुळे तो पाप करत रहातो. जे सत्संग श्रवण करतात त्यांना संपुर्ण कर्मांचे आणि अध्यात्म ज्ञान होऊन जाते. ते कधीही पाप करत नाहींत. ते सरोवरातील केवळ मोती खाणाऱ्या व जीव-जंतु, मासोळी न खाणाऱ्या हंस पक्षासारखे आहेत. याच्या उलट अध्यात्म ज्ञानहीन व्यक्ति स्वभावाने बगळ्यासारख्या असतात. बगळा पक्षी मासोळी, कीड़े-कीटक, इत्यादी पाण्यातील जंतु खातो. शरीराने दोघेही (हंस पक्षी आणि बुगला पक्षी) एक सारख्या आकाराचे आणि पांढऱ्या रंगाचे असतात. त्यांना पाहून ओळखता येत नाही. त्यांच्या कर्माने ते ओळखता येतात. त्याच प्रकारे तत्त्वज्ञान युक्त व्यक्ति शुभ कर्माने आणि तत्त्वज्ञानहीन व्यक्ति**

**अशुभ कर्माने ओळखली जाते.**

कबीर, पहले अपने धर्म को, भली भांति सिखलाय।
अन्य धर्म की सीख सुनि, भटकि बाल बुद्धि जाय।।

**भावार्थ :- मुलांना किंवा कुटुंबातील अन्य लोकांना आधी आपल्या धर्माचे परिपूर्ण ज्ञान करून दिले पाहिजे. ज्यांना आपल्या धर्म म्हणजेच धार्मिक क्रियांचे ज्ञान नसते, ते बुद्धिने बालकासारखेच असतात. ते अन्य धर्म व पंथाची शिकवण ऐकून भरकटतात. ज्यांना आपल्या धर्माचे (पंथ) संपुर्ण ज्ञान आहे, ते भ्रमित होत नाहींत.**

**धर्म बोध पृष्ठ १८२ चा सारांश :-**

कबीर, जो कछु धन का लाभ हो, शुद्ध कमाई कीन।
ता धन के दशवें अंश को, अपने गुरू को दीन।।
दसवां अंश गुरू को दीजै। अपना जन्म सफल कर लीजै।।

**भावार्थ :- शुद्ध नेक कमाईने जो लाभ होतो आहे, त्याचा एक दशांश हिस्सा आपल्या गुरुदेवांना दान केला पाहिजे.**

कबीर, जे गुरू निकट निवास करै, तो सेवा कर नित्य।
जो कछु दूर बसै, पल-पल ध्यान से हित।।

**भावार्थ :- जर गुरूजीचे स्थान आपल्या निवासांच्या निकट असेल, तर रोज सेवा करण्यासाठी तिथे जावे. जरी दूर असले तरी क्षणोक्षणी आठवण ठेवली पाहिजे. त्यामुळे साधकाचे हित साध्य होते म्हणजेच लाभ प्राप्त होतो.**

कबीर, छठे मास गुरू दर्श करन ते, कबहु ना चुको हंस।
गुरू दर्श अरू सत्संग, विचार सो उधरै जात है वंश।।
कबीर, छठे मास ना करि सके, वर्ष में करो धाय।
वर्ष में दर्श नहिं करे, सो भक्त साकिट ठहराय।।
कबीर, जै गुरू परलोक गमन करे, सीख मानियो शीश।
हरदम गुरू को साथ जानि, सुमरो नित जगदीश।।
कबीर, गुरू मरा मत जानियो, वस्त्रा त्यागा स्थूल।
सूक्ष्म देही गमन करि, खिला अमर वह फूल।।
कबीर, सतलोक में बैठी कर, गुरू निरखै तोहे।
गुरू तज ना और मानियो, अध्यात्म हानि होय।।
कबीर, गुरू के शिष्य की जगदीश करै सहाय।
नाम जपै अरू दान धर्म में कबहू न अलसाय।।
कबीर, जैसे रवि आकाश से, सबके साथ रहाय।
उष्णता अरू प्रकाश को दूरही ते पहुँचाय।।
कबीर, ऐसे गुरू जहाँ बसे सब पर करे रजा।
गुरू समीप जानकर सकल विकार करत लजा।।

**भावार्थ :- गुरूजीचे दर्शन सहा महीन्यांनी अवश्य करावे. सत्संग आणि गुरू दर्शन यामुळे संपूर्ण वंश मुक्त होतो. जर सहा महिन्यात दर्शन करता येत नसेल तर वर्षातून एकदा अति उत्साही म्हणजेच उतावीळ होऊन दर्शन घेत चला. जर एक वर्षात गुरू दर्शन करता येत नसेल तर तो शिष्य भक्तिहीन असल्याचे मानले जाते.**

जर गुरूजी सतलोकी गेले असतील, तर त्यांच्या शिकवणीच्या आधारे आपले धर्म–कर्म करत रहावे आपले गुरूदेव क्षणोक्षणी आपल्या सोबत असल्याचे समजून ईश्वराचे भजन करा. गुरूजींनी जो दीक्षा मंत्र दिला आहे, त्याचा जप करा.

गुरूजीमरण पावल्याचे समजू नये. जसे एखादे वस्त्र काढून ठेवावे त्याप्रमाणे त्यांनी तर फक्त स्थूल शरीर त्यागले आहे. शरीर तर सुरक्षित असते. त्याच प्रकारे स्थूल शरीररूपी वस्त्र त्यागले आहे. तेजोमय शरीर तर सतलोकी गेले आहे. तिथे अमरत्व प्राप्त केले आहे. आपली वाट पाहत आहेत. आपल्याला देखिल तिथेच जायचे आहे. मृत्यु पावल्या शिवाय (स्थूल शरीरत्याग केल्याशिवाय) सत्यलोकी जाता येत नाही. ते तर शिष्यांना देखिल त्यागायचे आहे. मग गुरूजींच्या शरीर त्यागण्याचा शोक न करता त्यांनी सांगितलेली साधना करून आणि मर्यादा पालन करून आपले जीवन सफल करावे.

गुरूदेव सतलोकी बसून आपल्याला पाहत असतात. गुरूजी जग सोडून गेल्यावर अन्य कोणालाही गुरु रूपात पाहू नये अन्यथा भक्तिची हानि होईल.

गुरूजींच्या उपदेशी शिष्याला भगवंत स्वतः मदत करतात. शिष्याने गुरूजींनी सांगितलेल्या नामजप आणि दान–धर्म करण्यास कधीही आळस करता कामा नये.

ज्याप्रमाणे सूर्य दूर आकाशात सर्वांना उष्णता आणि प्रकाश प्रदान करतो , सर्वांना तो आपल्या सोबत असल्याचे दिसते. त्याच प्रकारे गुरूजीदेखिल कुठेही बसलेले असोत, ते तिथूनच आपल्या भक्तांवर कृपा करत असतात. गुरुजींना आपल्याजवळ आहेत व आपल्याला पहात आहेत असे समजून सर्व वाईट विषय विकार करण्यास लज्जा बाळगुन पाहीजे. त्याग केला पाहीजे.

**धर्म बोध पृष्ठ १८३ चा सारांश :–**

कबीर, केते जनकादिक गृही जो निज धर्म प्रवीन।
पायो शुभगति आप ही औरनहू मति दीन।।

**भावार्थ :– राजा जनकासारखे गृहस्थ आपल्या धर्मामधील विद्वान होते म्हणजेच मानव कर्माचे ज्ञानी होते. त्यामुळे त्यांनी स्वतः गती म्हणजे स्वर्ग प्राप्त केलाच, पण अन्य जणांना देखिल स्वर्ग प्राप्तिचा मार्ग दाखवला.**

कबीर, हरि के हेत न देत, धन देत कुमार्ग माहीं।
ऐसे अन्यायी अधम, बांधे यमपुर जाहीं।।

**भावार्थ :– जी व्यक्ति धर्म करत नाहीं आणि धनाचा चुकीच्या पद्धतीने उपयोग करते म्हणजेच दारू पितात, मांस खातात, तंबाखू सेवन करतात किंवा व्यर्थ रुबाब दाखवतात, असे अन्यायी नीच यमलोक म्हणजेच नरकलोकात बाँधून घेऊन जातात.**

## ''भक्ताचा व्यवहार कसा असावा?''

निजधन के भागी जेते सगे बन्धु परिवार।
जैसा जाको भाग है दीजै धर्म सम्भार।।

**भावार्थ :– परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की संपत्तिमध्ये ज्यांचे भाग व कायदेशीर अधिकार आहेत. त्यांना त्यांचा पूर्ण हिंसा दिला पाहिजे. आपले धर्म–कर्म ध्यानात ठेऊन म्हणजेच भक्ताने ज्याचा जेवढा जितका हिस्सा आहे, तो परमात्माला घाबरुन पूर्ण वाटून देणे.**

**धर्म बोध पृष्ठ १८४ चा सारांश :–**

कबीर, खाट पड़ै तब झखई नयनन आवै नीर।
यतन तब कछु बनै नहीं, तनु व्याप मृत्यु पीर।।

**भावार्थ :-** **वृद्ध होऊन किंवा रोगी होऊन जेव्हा माणूस खाटेवर पड़लेला असतो, आणि डोळ्यातून अश्रू वाहत असतात, त्या वेळेस आपला बचाव होऊ शकत नाही, मृत्युसमयी होणारी पीड़ा होत असते. म्हणतात की जो भक्ति करत नाहीं, त्याचा अन्तकाळ महायातनादायक असतो. त्याचे प्राण सहज जात नाहीत. त्याला इतकी पीड़ा होत असते, जणू एक लाख विंचवानी त्याला डंख मारलेला असावा. त्यावेळेस यमदूत त्याचा गळा बंद करतात. ती व्यक्ति न बोलू शकते ना पूर्ण श्वांस घेऊ शकते. डोळ्यातून केवळ अश्रू वाहत असतात. म्हणून वर सांगितलेले भक्ति आणि शुभ कर्म मानवाने अवश्य केले पाहिजेत.**

कबीर, देखे जब यम दूतन को, इत उत जीव लुकाय।
महा भयंकर भेष लखी, भयभीत हो जाय।।

**भावार्थ :-** **यमदूतांचे रूप भयंकर असते. मृत्यु समयी यमदूत त्याच धर्म व भक्तिहीन व्यक्तिला दिसू लागतात. त्यांना पाहून भयापोटी तो प्राणी शरीरातच इकडे तिकडे लपण्याचा प्रयत्न करत असतो.**

कबीर, भक्ति दान किया नहीं, अब रह कास की ओट।
मार पीट प्राण निकालहीं, जम तोड़ेंगे होठ।।

**भावार्थ :-** **ना गुरू केला ना भक्ति आणि ना दान-धर्म केले, आता कोणाच्या साह्याने सुटणार यमदूत मारपीट करून प्राण काढून घेतील आणि काहीही न विचारता इजा करतील म्हणजेच निर्दयी होऊन मारहाण करून तुझे ओठ फोड़तील म्हणजेच निर्दयतेने मारतील.**

**धर्म बोध पृष्ठ १८५-१८६ वर सामान्य ज्ञान आहे.**

**धर्म बोध पृष्ठ १८७ चा सारांश :-**

कबीर, मान अपमान सम कर जानै, तजै जगत की आश।
चाह रहित संस्य रहित, हर्ष शोक नहीं तास।।

**भावार्थ :-** **भक्ताचा कोणी अपमान केला तरी त्याकडे लक्ष देऊ नये व त्याच्या बुद्धीची कीव करावी. जो सम्मान करतो आहे, त्याच्या कडे देखिल लक्ष देऊ नये म्हणजेच त्याच्या आहारी जाऊन आपला धर्म भ्रष्ट होऊ देऊ नये. लाभ-हानि हे परमात्माची देणगी समजून समाधान मानावे.**

कबीर, मार्ग चलै अधो गति, चार हाथ मांही देख।
पर तरिया पर धन ना चाहै समझ धर्म के लेख।।

**भावार्थ :-** **भक्ति मार्गावर वाटचाल करताना खाली पाहूनच चालावे. भक्ताची दृष्टि चालताना चार हात म्हणजेच ६ फुट दूरवर समोर असली पाहिजे. धर्म-कर्माच्या ज्ञानाचा विचार करून परस्त्री आणि परधनाकडे दुषित दृष्टिने पाहू नये.**

कबीर, पात्रा कुपात्रा विचार कर, भिक्षा दान जो लेत।
नीच अकर्मी सूम का, दान महा दुःख देत।।

**भावार्थ :-** **संत म्हणजेच गुरूने आपल्या शिष्याव्यतिरिक्त कोणाकडूनही दान-भिक्षा घेऊ नये. कुकर्मी आणि अधर्मी व्यक्तिचे धन घेतल्यास अतिशय दुःख होते.**

**पृष्ठ १८८ वर सामान्य ज्ञान आहे.**

**धर्म बोध पृष्ठ १८९ वर :-**

कबीर, इन्द्री तत्त्व प्रकृति से, आत्म जान पार।
जाप एक पल नहीं छूटै, टूट न पावै तार।।

**भावार्थ :- आत्मा पाचही तत्त्वांहून भिन्न असल्याचे जाणावे. शरीर आत्मा नाहीं आहे. निरंतर सतनामाचा जप करावा.**

कबीर, जब जप करि के थक गए, हरि यश गावे संत।
कै जिन धर्म पुराण पढ़े, ऐसो धर्म सिद्धांत।।

**भावार्थ :- जर भक्त जप करता-करता थकल्यास परमात्माचा महिमा सांगणारी वचने वाचावीत. पाठांतर असल्यास गावे. तसेच आपली धार्मिक पुस्तके वाचावीत, हा धार्मिक सिद्धांत आहे.**

**धर्म बोध पृष्ठ १९० चा सारांश :-**

कबीर, ज्ञानी रोगी अर्थार्थी जिज्ञासू ये चार।
सो सब ही हरि ध्यावते ज्ञानी उतरे पार।।

**भावार्थ :- परमात्माची भक्ति चार प्रकारच्या व्यक्ति करत आहेत :-**

**१. ज्ञानी :- ज्ञानीला विश्वास असतो की मानवी जीवनात केवळ परमात्माची भक्ति करूनच जीवाचे कल्याण करण्यासाठी प्राप्त होते त्यांना हे हि समजत असते की केवळ एका पूर्ण परमात्माची भक्ति करूनच मोक्ष मिळेल, अन्य देवी-देवतांची भक्ति केल्याने जन्म-मरणाचे क्लेश काही सुटणार नाहीत. पूर्ण सत्गुरुकडून अनुग्रह घेऊनच काही होऊ शकते. त्यामुळे ज्ञानी भक्त पार होतात.**

**२. अर्थार्थी :- जे धन लाभासाठीच भक्ति करत आहेत.**

**३. आर्त म्हणजे संकट ग्रस्त :- केवळ आपल्या संकटाचा नाश करण्यासाठी भक्ति करत आहेत.**

**४. जिज्ञासु :- जिज्ञासुना परमात्माचे अर्धवट ज्ञान असते. आणि वक्ता होऊन चमत्काराच्या भूकेपोटी जीवनाचा नाश करून घेतात. याचे प्रमाण गीता अध्याय ७ श्लोक १६-१७ यामध्ये देखिल आहे.**

**धर्म बोध पृष्ठ १९१ चा सारांश :-**

कबीर, क्षमा समान न तप, सुख नहीं संतोष समान।
तृष्णा समान नहीं ब्याधी कोई, धर्म न दया समान।।

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे की क्षमा करणे हे खूप मोठे तप आहे. याच्यासारखे तप दुसरे नाही. समाधानासारखे कोणतेच सुख नाहीं. कोणत्याही वस्तुच्या प्राप्तिच्या इच्छेसारखे कुठले संकट नाहीं आणि दयेसारखा दुसरा धर्म नाहीं**

कबीर, योग (भक्ति) के अंग पाँच हैं, संयम मनन एकान्त।
विषय त्याग नाम रटन, होये मोक्ष निश्चिन्त।।

**भावार्थ :- भक्तिचे चार आवश्यक पैलु आहेत. संयम म्हणजे प्रत्येक कार्यात संयम बाळगला पाहिजे. संपत्ती जमा करताना, बोलताना, खाताना-पिताना, विषयांचा उपभोग घेताना संयम ठेवा म्हणजेच भक्ताने कमी बोलले पाहिजे व विकारी विषयांचा त्याग केला**

पाहिजे. परमात्माचे भजन कीर्तन आणि त्यांच्या वचनांचे व प्रवचनांचे मनन करणे अनिवार्य आहे. अशी साधना केल्यास आणि मर्यादा पालन केल्यास मोक्ष निश्चित प्राप्त होणारच आहे.

❖ पूर्ण परमात्मा भक्ताचे आयुष्य देखिल वाढवतात :–

ऋग्वेद मण्डल १० सूक्त १६१ मंत्र २ मध्ये म्हटले आहे की पूर्ण प्रभु आपल्या भक्ताचे रोग संपवतात. जर रोग्याचे आयुष्य शिल्लक नसेल, आणि तो मृत्यु देवतेकडे जाणे निश्चित असेल तरी देखिल परमात्मा त्याला स्वस्थ करून शंभर वर्षापर्यंत आयुष्य देतात. त्याचे आयुष्य वृद्धिंगत करतात. ''कबीर सागर'' च्या ''गरूड़ बोध'' अध्यायातील प्रमाण वाचावे :–

## ''गरूड़ बोध'' अध्यायाचा सारांश

कबीर सागरा मध्ये ११वां अध्याय ''गरूड़ बोध'' पृष्ठ ६५(६२५) वर आहे :–

परमेश्वर कबीर जींनी धर्मदास जींना सांगितले की मी विष्णुजीचे वाहन असलेल्या पक्षीराज गरूड़ाला उपदेश दिला, त्याला सृष्टि रचना ऐकवली. अमरलोकाची कथा व सत्यपुरूषाचा महिमा ऐकून गरूड़ देव अचंबित झाले.आपल्या कानांवर त्यांचा विश्वास बसत नव्हता. मनोमन विचार करत होते की मी आज हे काय ऐकतोय? मी कोणते स्वप्न तर पाहत नाही आहे? मी कोणत्या भलत्याच देशात तर नाही गेलेलो? जो देश आणि परमात्मा मी ऐकला आहे, तो जणू माझ्या समोर चित्रपटाप्रमाणे येतो आहे. जेव्हा गरूड़देव याच विचारांमध्ये हरवले होते, तेव्हा मी त्यांना म्हटले, हे पक्षीराज! मी सांगतोय ते आपल्याला खोटे वाटते आहे काय? गप्पसे झाला आहात. काही शंका असेल तर प्रश्न विचारा, त्याचे निरसन करून घ्या. जर आपल्याला माझ्या वाणीमुळे दुःख झाले असल्यास मला क्षमा करा. माझ्या या शब्दांनी त्या पक्षीराजाचे डोळे भरून आले आणि ते म्हणाले की हे देव! आपण कोण आहात? आपला उद्देश काय आहे? इतके कटू सत्य आपण सांगितले आहे ते पचवता येत नाही आहे. आपण सांगितलेला जो अमरलोकातील अमर परमेश्वर सत्य असेल तर मग आम्हाला अंधारात ठेवले गेले आहे. जर आपण सांगितलेले असत्य असेल, तर आपण निंदेस पात्र आहात. अपराधी आहात. जर हे सत्य आहे तर गरूड़ आपला खास सेवक आहे. परमेश्वर कबीर जींनी धर्मदास जींना सांगितले कीमी त्यांना म्हणालो, हे गरूड़देव! आपणास जी शंका आली आहे, ती स्वाभाविक आहे, परंतु आपण संयमाने ते ऐकले आहे. यातच आपले महानत्व आहे. परंतु मी ज्या अमरपुरूष आणि सत्यलोकाची आपल्याला माहिती देतो आहे, ते परम सत्य आहे. माझे नाव कबीर आहे. मी त्याच अमर लोकाचा निवासी आहे. आपल्याला काल ब्रह्मने भ्रमित करून ठेवले आहे. हे ज्ञान ब्रह्मा, विष्णु आणि शिव जी यांनाही नाही. आपण विचार करा गरूड़जी! जीवाचा जन्म होतो. तो आनंदाने राहू लागतो. कुटुंबाचा विस्तार होतो. त्यांच्या पालन–पोषणाच्या कौटुंबिक कर्तव्यांचे निर्वाहन करता–करता वृद्ध होतो. ज्या कुटुंबाकडे पाहून स्वतःला धन्य मानतो आहे, त्याच कुटुंबाचा त्याग करून नाईलाजाने जावे लागते. स्वतः ही रडतो आहे, अंतिम श्वांस मोजतो आहे. कुटुंब देखिल दुःखी आहे. ही काय पद्धत आहे? हे उचित आहे काय? गरूड़ देव म्हणाले, हे कबीर देव! हा तर विश्वाचा नियम आहे. जन्माला आलेला आहे तो कधी ना कधी मरणार आहेच. परमेश्वर जींनी म्हटले की कोणाची मरण्याची इच्छा असते काय? कोणाला वृद्धावस्था आवडते काय? गरूड़ देवाने उत्तर दिले, नाहीं. परमेश्वर कबीरजींनी म्हटले की जर वृद्धावस्था नसेल, मृत्यु नसेल तर कसे वाटेल? गरूड़ देव म्हटले की हा काही प्रश्न आहे काय? असे असेल तर त्यासारखी दुसरी आनंदाची गोष्टच नाही. परंतु हा तर स्वप्नवत विचार वाटतो. हे धर्मदास! मी म्हटले की वेद आणि पुराण तुम्ही सत्य की असत्य मानता? गरूड़देव म्हणाले,

ते परम सत्य आहेत.

देवी पुराणाच्या तिसऱ्या स्कंदात स्वतः विष्णुजींनी म्हटले की हे माते! आपण शुद्ध स्वरूपा आहात. हे सगळे विश्व आपल्यापासूनच उद्भाषित होत आहे. मी, ब्रह्मा आणि शिव आपल्याच कृपेने विद्यमान आहोत. आमचा तर आविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यु) होतच असतो.

परमेश्वर कबीर जींच्या मुख कमलातून असे सज्जड पुरावे असलेली प्रमाणे (सटीक प्रमाण) ऐकून गरूड़देव त्यांच्या चरणी नतमस्तक झाले, आपल्या भाग्याचे त्यांना धन्य वाटले आणि म्हटले की जो देव सृष्टिची रचना, ब्रह्मा-विष्णु-महेश आणि दुर्गा देव आणि निरंजनाची देखिल उत्पत्ति जाणतो आहे, तो तर रचनहार परमेश्वर आहे. आजपर्यंत कोणीच असे ज्ञान सांगितले नाही. जर कोणत्या जीवाला हे माहित असते, मग ते ऋषि-महर्षि का असेनात, त्याने अवश्य सांगितले असते. मी मोठमोठ्या मण्डलेश्वरांची प्रवचने ऐकली आहेत. कोणाजवळही हे ज्ञान नाहीं. त्यांना वेद आणि गीताचे देखिल ज्ञान नाहीं. आपण स्वतःला झाकून ठेवले आहे. मी आपल्याला ओळखले आहे. कृपा करून मला पदरात घ्या, मी तुम्हाला शरण आलेलो आहे परमेश्वर.

परमेश्वर कबीर जींनी गरूड़ाला म्हटले की आपण आधी आपल्या स्वामी म्हणजे श्री विष्णुजींची आज्ञा घ्या की माझी स्वतःचे कल्याण करून घ्यायची इच्छा आहे. मला एक महान संत भेटले आहेत. मी त्यांचे ज्ञान ऐकले आहे. जर आज्ञा असेल तर मी आपले कल्याण करवून घेतो. मी आपला सेवक आहे, आपण स्वामी आहेत. आपल्याला सदैव एकत्रच रहायचे आहे. जर मी आपल्याला न सांगता दीक्षा घेतली, तर आपणास दुःख होईल. गरूड़ाने असेच केले. विष्णुजींना सर्व गोष्ट सांगितली. श्री विष्णुजींनी म्हटले मी आपल्याला अडवणार नाही. आपण स्वतंत्र आहात. आपण सत्य सांगितले हे उत्तम केले. माझी कोणतीही हरकत नाही.

हे धर्मदास! मी गरूड़ाला प्रथम पाच नाममंत्र दीक्षा (कमल उघडणाऱ्या प्रत्येक देवाच्या साधनेचे नाम) दिली. गरूड़देव म्हटले की हे गुरूदेव! हे मंत्र तर याच देवतांचे आहेत. अमर पुरूषाचा मंत्र तर नाही आहे. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की हे यांच्या पूजेचे मंत्र नाहींत. हे या देवतांना आपल्या अनुकूल करून यांच्या जाळ्यातून सुटण्याची किल्ली आहे. त्यांचे वशीकरण मंत्र आहेत. ज्याप्रमाणे रेड्याला आकर्षित करण्यासाठी जरी त्याला रेडा-रेडा म्हणून पुकारा केला तर तो आवाज करणाऱ्या माणसाकडे ढुंकून देखिल बघत नाही. पण त्याच्या लाडक्या आवाजात हुर्र-हुर्र अशी हाक मारल्यावर तो त्वरित सक्रिय होतो. आवाज करणाऱ्याकडे धावत येतो. आवाज करणारी व्यक्ति त्याच्यापासून आपल्या म्हशीला गर्भ धारणा करवून घेतो. त्याच प्रकारे आपण जरी श्री विष्णुजींना अन्य कोणत्याही नावाने जप करत असाल तर ते लक्ष देत नाहीत. जर आपण या मंत्राचा जप केला तर विष्णु देव जी त्वरित प्रसन्न होऊन साधकाला सहायता करतील. या देवता तिन्ही लोकांच्या (पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ) मुख्य देवता आहेत. ते केवळ लिहिलेले संस्कार कर्मच देऊ शकतात. या मंत्राचा जप केल्याने आमचे पुण्य आणि भक्तिधन अधिकाधिक जमा होत राहते. त्याचे फळ म्हणून या देवता साधकाला सहायता करतात. अशा प्रकारे त्यांची साधना आणि पूजा यामधील फरक समजले पाहिजे. ज्याप्रमाणे आपल्याला आंबे खायचे आहेत. तर प्रथम मेहनत, मजूरी, नोकरी करून हे धन मिळेल तर त्याचा विनियोग करून आंबे खायला मिळतील. नोकरी म्हणजे पूजा नाहीं होत. त्यावेळी आपले पूज्य आंबा असतो. पूज्याच्या प्राप्तिसाठी करण्याचा प्रयत्न म्हणजे नोकरी आहे. त्याचप्रमाणे आपले पूज्य परमेश्वर कबीर जीआहेत आणि अमर लोक आहे. त्यासाठी आपण श्री ब्रह्मा, श्री विष्णु, श्री शिव, श्री गणेश आणि श्री दुर्गा जींची

सेवा करतो, साधना करतो. पूजा परमात्माची करतात. गरूड़ जी मोठे प्रसन्न झाले आणि या अमृत ज्ञानाची चर्चा करण्यासाठी श्री ब्रह्माजीनां भेटले. त्यांना सांगितले की मी एका महर्षि कडून अद्भुत ज्ञान ऐकले आहे. मला त्यांचे ज्ञान सत्य वाटते आहे.त्यांनी सांगितले की आपण (ब्रह्मा), विष्णु आणि शिव नश्वर आहेत, पूर्ण कर्ता करतार नाहीत आपण केवळ प्रारब्धात लिहिलेलेच देऊ शकता. आपण कोणाचेही आयुष्य वाढवू शकत नाही. आपण कुणाचीही कर्मे कमी-अधिक करू शकत नाही. पूर्ण परमात्मा वेगळा आहे व तो अमरलोकात राहतो आहे. तो पाप कर्म वजा करतो. तो मृत्यु टाळू शकतो. आयुष्य वाढवू शकतो. त्याचे प्रमाण देखिल वेदांमध्ये सांगितले आहे. ऋग्वेद मण्डल १० सूक्त १६१ मंत्र २ मध्ये म्हटले आहे की रोग्याचा रोग वाढला आहे. तो मृत्यूस झाला आहे. तरी देखील मी त्या भक्तास मृत्यू देताना कडून सोडून आणेल, त्यास नवजीवन प्रदान करतो. त्यास पूर्ण आयुष्य जगण्यास देतो.

ऋग्वेद मण्डल १० सूक्त १६१ मंत्र ५ मध्ये म्हटले आहे की हे पुनर्जन्म प्राप्त प्राणी! तू माझी भक्ति करत रहा. तुझी दृष्टी जरी संपली तरी तुझे डोळे मी बरे करीन. तुला भेटीन म्हणजेच तुला प्राप्त देखिल होईन.

ब्रह्माजींना वेद मंत्र कंठस्थ आहेत. ते काय समजायचे ते समजले. परंतु जगतात लोकवेदांच्या आधारे ब्रह्मा जी स्वतःला प्रजापिता म्हणजेच सर्वांच्या उत्पत्तिचे कर्ता मानत होते. वेद कठंस्थ (याद) करणे वेगळे पण ते समजून घेणेच विशेष ज्ञान आहे. मानमरातबाने वश होऊन ब्रह्मा जी म्हटले की वेदांचे ज्ञान माझ्या व्यतिरिक्त जगात अन्य कोणालाच नाही आहे. त्या मंत्रांचा चुकीचा अर्थ लावला आहे. परमेश्वर कबीरानी अशा व्यक्तिंच्या विषयी असे म्हटले आहे की :-

कबीर, जान बूझ साची तजैं, करै झूठ से नेह।
ताकि संगत हे प्रभु, स्वपन में भी ना देय।।

शब्दार्थ :- कबीर परमेश्वराजींने सांगितले कि जो व्यक्ती प्रमाण डोळ्यांनी पाहून देखील खोटे मानतो, त्या व्यक्तीबरोबर परमात्मा! स्वप्नात देखील भेटायचे नाही. तो एवढा दुष्ट आहे. त्याच्याबरोबर ज्ञानचर्चा करणे व्यर्थ आहे.

ब्रह्मा जी गरूड़ाचे हे शब्द ऐकून अतिशय क्रोधित झाले आणि म्हटले की तुझी पक्षीयोनीची बुद्धि आहे. तुला कोणीतरी काहीतरी सांगते, त्यावर तू विश्वास ठेवतो आहेस. तुला आपली स्वताची अक्कल नाहीच आहे. त्याच वेळेस ब्रह्माजींनी विष्णु, महेश, इन्द्र आणि अन्य सर्व देवतांना व ऋषिमुनींना बोलाविले. सर्वांची सभा भरली. ब्रह्मा जी सर्वांना बोलावण्याचे प्रयोजन सांगितले की गरूड़ आज काहीतरी नवीनच सांगतो आहे की ब्रह्मा-विष्णु-महेश नश्वर आहेत. पूर्ण परमात्मा कोणी वेगळाच आहे. तो अमरलोकात रहातो आहे. तुम्ही कर्ता नाहीं आहात. हे ऐकून श्री विष्णु जी आणि श्री शिव जी देखिल अत्यंत क्रोधित झाले आणि गरूड़ालाच ब्रह्मा जी जसे बोलले होते, तसेच बरेवाईट म्हणू लागले. मग सर्वांनी मिळून निर्णय घेतला की दुर्गा माते कडूनच सत्य काय ते जाणून घेऊ. सगळे मिळून दुर्गा मातेकडे गेले. हाच प्रश्न विचारला की आमच्या शिवाय (ब्रह्मा, विष्णु आणि शिव) अन्य कोणी परमात्मा आहे काय? आम्ही नश्वर आहोत काय?

दुर्गा मातेने स्पष्ट शब्दात उत्तर दिले की तुम्ही अविनाशी आणि जगताचे कर्ता आहात असा तुम्हाला भ्रम कधीपासून झाला? जर असे आहे तर मग तुम्ही माझे देखिल कर्ते (वडील) आहात. परंतु तुमचा जन्म माझ्या उदरातून झाला आहे. वास्तविक परमात्मा अन्य आहे, तोच

अविनाशी आहे. तोच सर्वांचा कर्ता आहे. हे ऐकल्यावर सभा विसर्जित झाली. परंतु ब्रह्मा-विष्णु-शिवजींच्या गळ्याखाली काही हे सत्य उतरत नव्हते. त्यांनी गरूड़ाला बोलावले. गरूड़ाने येऊन प्रणाम केला. परवानगी घेऊन बसला. तिन्ही देवतांनी म्हटले, हे पक्षीराज! आम्ही जगताचे कर्ते नाही यावर आपण कसा काय विश्वास ठेवलात? आपल्याला पाहिजे ती परीक्षा घ्या. गरूड़ जी तिथून उठले आणि उडून माझ्याकडे (कबीर जी) आले आणि सर्व वृतांत सांगितला. तेव्हा मी म्हटले की बंग देशात (वर्तमानातील में बांग्लादेश) एक बारा वर्षीय ब्राह्मण बालक आहे. त्याचे आयुष्य संपत आले आहे. तो काही दिवसांचाच पाहुणा आहे. मी त्या बालकाला मला शरण येण्यासाठी ब्रह्मा, विष्णु, शिव यांची तुला (गरुडाला) सांगितलेली स्थिति विषद केली. त्या बालकाने खूप वादविवाद केला पण त्याला मी सांगितलेले ज्ञान काही पटले नाही. तेव्हा मी त्या बालकाला म्हटले की तुझे अजून तीन दिवस आयुष्य शिल्लक आहे. जर तुझे ब्रह्मा-विष्णु-शिव समर्थ आहेत, तर आपले रक्षण करवून घे. एवढे म्हणून मी अंतर्धान पावलो. तो बालक बेचैन आहे. त्या बालकाला घेऊन देवतांकडे जा. त्यांच्या कडून होणार काहीच नाही आहे. मग आठवणीने तू माझ्याशी बोल. पुढे काय करायचे ते सांगेन. गरूड़ जी त्या बालकाला घेऊन ब्रह्मा-विष्णु-शिव जी कडे गेले. गरूड़ाने बालकाला त्या देवतांशी काय बोलायचे ते समजावले की तू त्या देवतांना असेम्हण की मी तुमचा भक्त आहे. माझे वडील, आजोबा, पणजोबा आणि मी सदैव आपली पूजा केली आहे. माझ्या आयुष्याचे दोन दिवस शिल्लक आहेत. माझे वय ते काय ? कृपया माझे आयुष्य वाढवा.

मुलाने अशीच विनंती केली तेव्हा तिघांनीही प्रयत्न केले, परंतु व्यर्थ. मग त्यांनी विचार केला की धर्मराज (न्यायधीश) महाराजांकडे जाऊया. सगळ्याचा हिशोब त्यांच्याकडे आहे. त्यांच्याकडून आपण वाढवून घेऊ. असा विचार करून सगळे धर्मराजांकडे गेले. त्यांना तिन्ही देवतांनी म्हटले की आधी हे सांगा की या ब्राह्मण मुलाचे अजून किती आयुष्य शिल्लक आहे? धर्मराजांनी डायरी (रजिस्टर) पाहून सांगितले की उद्या याचा मृत्यु होईल. तिन्ही देवतांनी म्हटले की तुम्ही या मुलाचे आयुष्य वाढवून द्या. धर्मराजांनी सांगितले, हे शक्य नाही. तिघांनीहीम्हटले की आम्ही काही सारखे सारखे तुमच्याकडे येत नाही. आज अब्रूचा प्रश्न उभा ठाकला आहे. आम्ही आलेल्यांची इज्जत तरी ठेवा तेंव्हा धर्मराजाने सांगितले की एक क्षण सुध्दा वाढवू शकत नाही, जर तुम्ही तुमचे स्वत:चे आयुष्य त्यांना दिले तर मी त्याचे आयुष्य त्यांना दिले तर मी त्याचे आयुष्य वाढवू शकतो. आमची अब्रू वाचवा. धर्मराज म्हणाले एक क्षणही वाढवता किंवा घटवता येत नाही.

हे ऐकून सगळ्यांची हवा टाईट झाली. त्यावेळेस म्हणायला लागले की हे फक्त तो परमेश्वर च करू शकतो. तिथून ताबडतोब चालू लागले आणि गरूड़ाला म्हणाले की कोणि समर्थ शक्ति असेल तर तू याचे आयुष्य वाढवून दाखव. गरूड़ाने कबीर जीशी ध्यानाद्वारे (टेलीफोनद्वारे) सम्पर्क साधला. परमेश्वर कबीर जींनी ध्यान द्वारे सांगितले की आपण याच्यासाठी मानसरोवरावरून जल घेऊन या, तेथे एक श्रवण नावाचा भक्त भेटेल त्याला मी सगळे समजावले आहे, आपण अमृत घेऊन या.

गरूड़जींनी आज्ञेनुसार तसेच केले. अमृत आणून त्या मुलाला पाजले. त्या बालकाजवळ मी गेलो. गरूड़ाने त्याला समजावले की अमृत हे एक निमित्त आहे. ते स्वतः परमेश्वर आहेत. त्यांनी पाणी मन्त्रित करून दिले होते. मुला, तू दीक्षा घे. या अमृताने दहा दिवस जीवित राहशील. बालकाने माझ्याकडून दीक्षा घेतली. जेव्हा १५ दिवस होऊनदेखिल तो बालक जिवंत राहिला, तेव्हा गरूड़ाने ब्रह्मा, विष्णु आणि शिव जी या तिघांनाही सांगितले की तो

**बालक अजून जीवित आहे. माझ्या गुरूजींकडून त्याने दीक्षा घेतली आहे. त्यांनी त्या मुलाला पूर्ण आयुष्य जगण्याचा आशीर्वाद दिला. ब्रह्मा–विष्णु–महेश तिघेही पुन्हा एकदा धर्मराजा कडे गरुडाला सोबत घेऊन गेले. तिन्ही देवतांनी धर्मराजाला विचारले की तो बालक अजून कसा जीवित आहे, तो तर मरायला पाहिजे होता. धर्मराजाने त्याचे खाते पाहिले तर त्याचे दीर्घ आयुष्य लिहिलेले होते. धर्मराजाने म्हटले की हे सर्व वरूनच होते. असे कधी कधी होते. त्या परमात्माची लीला कोणाला ओळखू येणार आहे?**

**तिन्ही देवतांना आश्चर्य वाटले, परंतु अहंकारामुळे प्रत्यक्ष अनुभव येऊन देखिल सत्य मानायला तयार नाहींत. आपला अहम भाव त्यागला नाहीं. गरूड़ाचा अटळ विश्वास बसला.**

कबीर, राज तजना सहज है, सहज त्रिया का नेह।
मान बड़ाई ईर्ष्या, दुर्लभ तजना येह।।

**शब्दार्थ :– अध्यात्मिक ज्ञानाच्या अभावामुळे मानव काही असाध्य वाईट गोष्टी घरी आणतात जसे मान–बढाई, ईर्षा. मान–बढाई चा अर्थ आहे कि पद किंवा धनाच्या अहंकाराने सन्मानित व्यक्ती. हे दोन्ही (सम्मान च्या कारणाने मोठेपण तसेच मान–बढाई तथा ईर्षा) अशी वाईट आहे कि, याच्या अभिमानाने आंधळा होऊन यास सोडत नाही. राज सोडू शकतो. स्त्री ला सोडू शकतो परंतु या दोघांना सोडणे कठीण आहे.**

**या गरूड़ बोधाच्या शेवटी वासुकी नाग कन्या प्रकरण चुकीच्या पद्धतीने लिहिले आहे. यामध्ये गरूड़ाला गुरूपदावर रेखाटले आहे. ते तसे नाहीं आहे. जे काही झाले, ते सर्व परमेश्वर कबीर जींनी केले आहे.**

## ''आता गरूड़ बोधामधून काही अमृतवाणी पाहूया''

### धर्मदास वचन

धर्मदास बीनती करै, सुनहु जगत आधार।
गरूड़ बोध भेद सब, अब कहो तत्त्व विचार।।

**शब्दार्थ :– धर्मादासाने परमेश्वर कबिरजींना गरुड देवता विषयी ज्ञान माहिती करून घेण्याचा इच्छाने निवेदन केले कि हे संसार धारण करणारा परमात्मा मला गरुड देव पक्षी च्या विषयी संपूर्ण ज्ञान सांगण्याची कृपा करावी.**

### सत्गुरु वचन (कबीर वचन)

प्रथम गरूड़ सों भैंट जब भयऊ। सत साहब मैं बोल सुनाऊ।
धर्मदास सुनो कहु बुझाई। जेही विधि गरूड़ को समझाई।।

**शब्दार्थ :– कबीर परमेश्वराजींने धर्मदासास सांगितले कि जेव्हा मी प्रथम वेळी गरुडास भेटलो तेव्हा मी सत साहेब बोलले. हे धर्मदास! ऐक ज्या पद्धतीने गरुडास समजावले तीच विधी सांगतो.**

### गरूड़ वचन

सुना बचन सत साहब जबही। गरूड़ प्रणाम किया तबही।।
शीश नीवाय तिन पूछा चाहये। हो तुम कौन कहाँ से आये।।

**शब्दार्थ :– जेव्हा गरुड पक्षाने सत साहेब वचन ऐकले, त्याच वेळी प्रणाम केला, डोके खाली वाकवून विचारले आपण कोण आहात? कोठून आले आहात?**

### ज्ञानी (कबीर) वचन

कहा कबीर है नाम हमारा। तत्त्वज्ञान देने आए संसारा।।
सत्यपुरूष है कुल का दाता। हम वाका सब भेद बताता।।
सत्यलोक से हम चलि आए। जीव छुड़ावन जग में प्रकटाए।।

**शब्दार्थ :– कबीरजींनी म्हटले कि मी गरुडास सांगितले कि माझे नाव कबीर आहे. संपूर्ण विश्वास तत्वज्ञान म्हणजे यथार्थ अध्यात्म ज्ञान देण्यास आलो आहे. मी सत्यलोक म्हणजे सनातन परम धाम मधून चालून आलो आहे. कालाच्या जाळ्यातून जीवांना सोडवण्यासाठी प्रकट झालो आहे. सत्य पुरुष कुळाचा मालक आहे. सर्वाचे पोषण करणारा आहे. सर्वांचा दाता आहे. मी त्याचा संपूर्ण भेद सांगू शकतो.**

### गरूड़ वचन

सुनत बचन अचम्भो माना। सत्य पुरूष है कौन भगवाना।।
प्रत्यक्षदेव श्री विष्णु कहावै। दश औतार धरि धरि जावै।।

**शब्दार्थ :– कबीर जींनी म्हटले कि गरुडाने सत्य साहेब ऐकले तर आश्चर्यचकित झाला व विचारले कि हे कोण परमात्मा आहेत? आधात्मिक ज्ञानाने स्पष्ट आहे कि विष्णू परमात्मा आहेत. तेच १० अवतार धारण करून पृथ्वीवर येतात.**

### ज्ञानी (कबीर) बचन

तब हम कहया सुनो गरूड़ सुजाना। परम पुरूष है पुरूष पुराना।।(आदि का)
वह कबहु ना मरता भाई। वह गर्भ से देह धरता नाहीं।।
कोटि मरे विष्णु भगवाना। क्या गरूड़ तुम नहीं जाना।।
जाका ज्ञान बेद बतलावैं। वेद ज्ञान कोई समझ न पावैं।।
जिसने कीन्हा सकल बिस्तारा। ब्रह्मा, विष्णु, महादेव का सिरजनहारा।।
जुनी संकट वह नहीं आवे। वह तो साहेब अक्षय कहावै।।

**शब्दार्थ :– कबीर जींनी म्हटले कि हे सज्ञन गरुड! ऐक हे सत्य पुरुष म्हणजे परम पुरुष आदी परमात्मा आहेत म्हणजे कायमस्वरूपी भगवान आहेत. तो कधीच मरत नाही व गर्भातून जन्म घेत नाही. हे गरुड! काय आपणास माहित नाही कि करोडो विष्णू मेले आहेत. ज्या परम अक्षर पुरुषाचे ज्ञान वेदात सांगितले आहे. त्या वेदाच्या ज्ञानास व्यवस्थित कोणी समजू शकले नाही. ज्याने सर्व ब्रह्मांडाचा विस्तार केला आहे. ज्याने ब्रह्मा, विष्णू तसेच शिवची उत्पत्ती केली आहे. तो परमात्मा चौर्यांशी लाख जन्माच्या संकटात येत नाही. त्याला तर अविनाशी म्हटले जाते.**

### गरूड़ वचन

राम रूप धरि विष्णु आया। जिन लंका का मारा राया।।
पूर्ण ब्रह्म है विष्णु अविनाशी। है बन्दी छोड़ सब सुख राशी।।
तेतीस कोटि देवतन की बन्द छुड़ाई। पूर्ण प्रभु हैं राम राई।।

**शब्दार्थ :– गरुडाने म्हटले कि विष्णू ने रामाचा अवतार धारण करून श्रीलंका च्या राजा रावणास मारले. श्री विष्णू जी अविनाशी पूर्ण ब्रह्म आहेत. तेहतीस करोड देवतांना राजा रावणाच्या कैदेतून सोडवले. ते सर्व सुखांची खाण बंदी छोड आहेत. श्री राम राजा पूर्ण परमात्मा आहेत.**

**ज्ञानी (कबीर) वचन**

तुम गरूड़ कैसे कहो अविनाशी। सत्य पुरूष बिन कटै ना काल की फांसी।।
जा दिन लंक में करी चढ़ाई। नाग फांस में बंधे रघुराई।।
सेना सहित राम बंधाई। तब तुम नाग जा मारे भाई।।
तब तेरे विष्णु बन्दन से छूटे। याकु पूजै भाग जाके फूटे।।
कबीर ऐसी माया अटपटी, सब घट आन अड़ी।
किस-किस कूं समझाऊँ, कूऐ भांग पड़ी।।

**शब्दार्थ :- कबीर जींनी म्हटले कि गरुड देव! आपण श्री विष्णुजींना कसे अविनाशी म्हणता? सत्यपुरूषा शिवाय काल ची फाशी म्हणजे कर्म बंधन समाप्त होऊ शकत नाही. हे गरुड आठव, ज्या वेळी श्री रामचंद्राने श्रीलंका वर आक्रमण केले होते. युद्धाच्या वेळी श्री राम तसेच त्याची सर्व सेना नागाने बांधली होती. तेव्हा तू श्रीराम तसेच सर्व सेनेचा नागफास कापून मुक्त केले होते. तेव्हा तुझे विष्णू बंधन मधून सुटले होते. श्री राम व सेनेसाठी आपण बंदीछोड झालात. जो श्री विष्णूस इष्ट रुपात पुजतो. त्याचे भाग्य फुटले आहे म्हणजे खराब नशिबाचा आहे. कबीर जींने दुखी मनाने म्हटले कि काल ब्रह्मने आपल्या मायाद्वारे सर्व प्राण्यांचा घट म्हणजे हृदय अज्ञानतेने भरले आहे. कोणाकोनास सांगू येथे तर अशी समस्या आहे जसे कोणीतरी विहारीच्या पाण्यात एक क्विंटल भांग कुटून मिसळली आहे. जो देखील व्यक्ती त्या विहारीतील पाणी पेयील त्यास देखील नशा होईल. जेवढे देखील व्यक्ती ती भांग पिऊन नशेमध्ये असतात त्या सर्वांची लटपट चाल, तोतरे बोलणे असते. हीच दशा काल ब्रह्मद्वारा भ्रमित प्राण्यांची आहे. ते सर्व म्हणत आहेत कि श्री विष्णू तथा श्री शिव, श्री ब्रह्मा अविनाशी प्रभू आहेत. सर्वांची उत्पत्ती, स्थिती तसेच संहारकर्ता आहेत. या तिघांव्यतिरिक्त अन्य कोणी परमात्मा नाही.**

**गरूड़ वचन**

ज्ञानी गरूड़ है दास तुम्हारा। तुम बिन नहीं जीव निस्तारा।।
इतना कह गरूड़ चरण लिपटाया। शरण लेवों अविगत राया।।
कबहु ना छोडूँ तुम्हारा शरणा। तुम साहब हो तारण तरणा।।
पत्थर बुद्धि पर पड़े है ज्ञानी। हो तुम पूर्ण ब्रह्म लिया हम जानी।।

**शब्दार्थ :- गरुडाने कबिरजींना म्हटले कि हे विद्वान कबीर जी! मी गरुड आपला गुलाम आहे. आपल्या शिवाय जीवांचे कल्याण संभव नाही. कबीराने धर्मादास जींना सांगितले कि एवढी गोष्ट सांगून गरुडाने माझे चरण पकडले आणि म्हटला, हे परमेश्वर! मला शरणात घे. मी कधीच आपली शरण सोडणार नाही. आपण वास्तवात तरण-तारण म्हणजे पूर्ण मोक्ष करणारे आहात. हे ज्ञानी कबीर जी! आम्हा जीवांच्या बुद्धीवर अज्ञानाची दगडी पडली आहेत. आता मला ज्ञान झाले कि आपणच पूर्ण ब्रह्म आहात.**

**ज्ञानी (कबीर) वचन**

तब हम गरूड़ कुं पाँच नाम सुनाया। तब वाकुं संशय आया।।
यह तो पूजा देवतन की दाता। या से कैसे मोक्ष विधाता।।
तुमतो कहो दूसरा अविनाशी। वा से कटे काल की फांसी।।
नायब से कैसे साहेब डरही। कैसे मैं भवसागर तिरही।।

शब्दार्थ :- कबीर परमेश्वरजींने धर्मादासास सांगितले कि गरुडाच्या प्रार्थनेने मी त्यास पाच नामांचा दीक्षा मंत्र दिला जे शरीरात बनलेल्या कमळांमधील प्रकट देवता व दुर्गा च्या साधनेचा आहे. तेव्हा गरुडाला शंका झाली कि हे प्रभू! आपण तर हे मंत्र देवतांच्या पूजाचे दिले आहेत. आपण तर सांगितले कि यांच्यापेक्षा वास्तविक अविनाशी पुरुष दुसरा आहे. तो कालाच्या बंदानातून मुक्ती देतो. या देवतांच्या पूजेने कसा पूर्ण मोक्ष होऊ शकेल? हे तर नायब म्हणजे छोटे देव आहेत. यांचा साहेब म्हणजे मालक काल प्रभू आहे. नायब म्हणजे छोट्या देवता पासून साहेब म्हणजे मालक कसे भय मानतील म्हणजे या देवतांच्या भक्ति ने कालाच्या जाळ्यातून कसा सुटकारा होईल?

**ज्ञानी (कबीर) वचन**

साधना को पूजा मत जानो। साधना कूं मजदूरी मानो।।
जो कोऊ आम्र फल खानो चाहै। पहले बहुते मेहनत करावै।।
धन होवै फल आम्र खावै। आम्र फल इष्ट कहावै।।
पूजा इष्ट पूज्य की कहिए। ऐसे मेहनत साधना लहिए।।
यह सुन गरूड़ भयो आनन्दा। संशय सूल कियो निकन्दा।।

भावार्थ :- गरूड़ देव परमेश्वर कबीर जींना म्हटले की हे परमेश्वर! आपण तर याच देवतांचे नाम मंत्र दिले आहेत. तीच यांची पूजा आहे. तुम्ही सांगितले की हे तर केवळ १६ कलांनी युक्त प्रभु आहेत. काल एक हजार कलांनी युक्त प्रभु आहे. पूर्ण ब्रह्म असंख्य कलांचा परमेश्वर आहे. आपण सृष्टि रचनेत असेही सांगितले आहे की कालाने आपल्याला थांबविले आहे. ब्रह्म, विष्णु, शिव जी या तिन्ही देवता काल ब्रह्मच्या आधीन आहेत. हे परमेश्वर! कनिष्ठाचे साहेब कसे ऐकणार? म्हणजेच ब्रह्मा, विष्णु, शिव जी हे तर केवळ काल ब्रह्मचे नायब आहेत. ज्याप्रमाणे नायब तहसीलदार म्हणजे कनिष्ठ तहसीलदार असतो भावार्थ हाच आहे की हे काल ब्रह्मचे नायब आहेत. आपण त्याची भक्ति सांगितली आहे. त्यांचे मंत्रजप दिले आहेत. हे कनिष्ठ आपल्या वरिष्ठा (काल ब्रह्म) पासून आम्हाला कसे सोड़वू शकणार? तेव्हा परमेश्वर कबीर जींनी पूजा आणि साधना यामधील भेद सांगितला की जर कोणाला आंबा खाण्याची इच्छा झाली असेल, तर त्याच्यासाठी आंबा हे पूज्य आहे. त्या पूज्य वस्तुला प्राप्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला साधना म्हंटले जाते. ज्याप्रमाणे धन कमावण्यासाठी मेहनत करावी लागते व त्या धनाचेच मोल घेऊन आंबे खाल्ले जातात. त्याच प्रकारे पूर्ण परमात्मा हाच आपला इष्ट देव म्हणजेच पूज्य देव आहे. ज्या देवतांच्या मंत्राचा जप म्हणजे मेहनत (मजदूरी) आहे, ज्या नामजपाची कमाई म्हणून भक्ति धन प्राप्त झाले, ते काल ब्रह्मत सोडून कर्जमुक्त होऊन आपल्या इष्ट म्हणजे पूज्य देव कबीर देव (कविर्देव) यांना प्राप्त करायचे आहे. ही गोष्ट ऐकून गरूड़ जी अतिप्रसन्न झाले आणि गुरूच्या पूर्ण गुरू असण्याची देखिल खात्री मिळाली की पूर्ण गुरूच शंकांचे निरसन करू शकतो आणि दीक्षा प्राप्त केली. गरूड़ाला त्रेतायुगात शरण घेतले होते. श्री विष्णुजीचे वाहन असल्या कारणाने आणि सारखा सारखा त्यांचाच महिमा ऐकल्यामुळे आणि श्री विष्णुजीचे काही चमत्कार पाहून गरूड़ाची गुरूजींवरील श्रद्धा कमी झाली होती. परंतु गुरूद्रोही झाला नव्हता. आता कोणत्या जन्मात मानव शरीर प्राप्त करेल, तेव्हा परमेश्वर कबीर जी गरूड़ाच्या आत्म्याला आपल्या शरण घेऊन मुक्त करतील दीक्षा पश्चात् गरूड़ाने ब्रह्मा, विष्णु आणि शिवजीशी ज्ञान चर्चा करण्याचा विचार केला. गरूड़ तिथून निघून ब्रह्मा जी कडे गेले व त्यांच्याशी ज्ञान चर्चा केली.

## ''गरूड़ वचन ब्रह्मा के प्रति''

ब्रह्मा कहा तुम कैसे आये। कहो गरूड़ मोहे अर्थाय।।
तब हम कहा सुनों निरंजन पूता। आया तुम्हें जगावन सूता।।
जन्म–मरण एक झंझट भारी। पूर्ण मोक्ष कराओ त्रिपुरारी।।

**शब्दार्थ :– परमेश्वर कबिरजींची दीक्षा घेतल्यानंतर संसाराच्या उत्पत्तीची कथा ऐकल्यानंतर गरुडास पूर्ण विश्वास झाला कि जे ज्ञान पुराण व वेदांमध्ये आहे ते ज्ञान कबीर जींच्या ज्ञानाशी मिळते आहे तर जे अन्य ज्ञान आहे, ते चुकीचे असू शकत नाही. सृष्टी च्या उत्पत्तीचे ज्ञान उत्पत्तीकर्ता म्हणजे परमेश्वराव्यतिरिक्त कोणीच सांगू शकत नाही. हे ऋषी नाहीत परमेश्वर आहेत. हा विचार करून गरुड जी श्री ब्रह्माच्या लोकात गेले कारण ब्रह्मास वेदांचा ज्ञाता मानत असत. ब्रह्मा ने गरुडाच्या येण्याचे कारण विचारले कि सांग गरुड कसे येणे केले? गरुड ने कारण सांगताना म्हटले कि हे ज्योती निरंजन पुत्र म्हणजे ब्रह्मा! ऐका माझ्या येण्याचे कारण, मी आपणास अज्ञान अंधकारात झोपलेल्यास तत्वज्ञानाद्वारा जागा करण्यास म्हणजे सावध करण्यास आलो आहे. जन्म मरणचे भारी संकट आहे. आपण आपला पूर्ण मोक्ष करा.**

## ''ब्रह्मा वचन''

हमरा कोई नहीं जन्म दाता। केवल एक हमारी माता।।
पिता हमारा निराकर जानी। हम हैं पूर्ण सारंगपाणी।।
हमरा मरण कबहु नहीं होवै। कौन अज्ञान में पक्षि सोवै।।
तबही ब्रह्मा विमान मंगावा। विष्णु, ब्रह्मा को तुरंत बुलावा।।
गए विमान दोनों पासा। पल में आन विराजे पासा।।
इन्द्र कुबेर वरूण बुलाए। तेतिस करोड़ देवता आए।।
आए ऋषि मुनी और नाथा। सिद्ध साधक सब आ जाता।।
ब्रह्मा कहा गरूड़ नीन्द मैं बोलै। कोरी झूठ कुफर बहु तोलै।।
कह कोई और है सिरजनहारा। जन्म–मरण बतावै हमारा।।
ताते मैं यह मजलिस जोड़ी। गरूड़ के मन क्या बातां दौड़ी।।
ऋषि मुनि अनुभव बताता। ब्रह्मा, विष्णु, शिव विधाता।।
निर्गुण सरगुण येही बन जावै। कबहु नहीं मरण मैं आवै।।

**शब्दार्थ :– ब्रह्मा ने म्हटले कि हे गरुड! आमचा जन्म मृत्यू होत नाही. आमचे कोणी माता–पिता नाहीत, आमची केवळ एकच माता आहे. आमचा पिता निराकार आहे. आम्हीच पूर्ण परमात्मा आहे. (सारंग म्हणजे धनुष्य, पाणी म्हणजे हात, हातात धनुष्य ठेवणाऱ्यास काल लोकातील प्राणी परमात्मा म्हणतात.) हे पक्षी गरुड! तू अज्ञान निद्रा मध्ये झोपला आहे. ऐक! आमचा जन्म–मृत्यू कधीच होत नाही. तेव्हा ब्रह्मा ने विमान मागवले व चालकास सांगितले कि विष्णू आणि शिवास घेऊन या. विमान क्षणात दोघांना घेऊन आला. यांच्याबरोबर तेहतीस करोड देवता तसेच देवतांचे राजा इंद्र तसेच धनाचे देवता कुबेर, पाण्याचे देवता वरुणास बोलावले. आठ्यांशी हजार ऋषिजन, नौनाथ, चौर्यांशी सिद्ध सर्वाना बोलावले गेले. पूर्ण सभा लागली. ब्रह्मा ने म्हटले कि गरुड अशा गोष्टी करत आहे जसे कोणी झोपेत बडबडत आहे. सर्व काही खोटे सांगत आहे. म्हणत आहे कि तुम्ही ब्रह्मा, विष्णू तसेच शिव यांचा जन्म मृत्यू होतो. तुमच्याव्यतिरिक्त अन्य कोणी सृष्टी ची रचना करणारा परमात्मा आहे. याकरिता आम्ही हि सभा बोलावली आहे कि गरुडाच्या मनात या कशा गोष्टी येत आहेत?**

**ब्रह्मा जी सांगत राहिले कि सर्व ऋषी व मुनी (साधक) आपला अनुभव सांगतात कि ब्रह्मा, विष्णू तसेच शिव जगताचे उत्पतीकर्ता परमात्मा आहेत. हेच निर्गुण तसेच सगुण बनून लीला करतात. यांचा कधीच मृत्यू होत नाही.**

**''विष्णु वचन''**

पक्षीराज यह क्या मन में आई। पाप लगै बना आलोचक भाई।।
हमसे और कौन बडेरा दाता। हमहै कर्ता और चौथी माता।।
तुमरी मति अज्ञान हरलीनि। हम हैं पूर्ण करतार तीनी।।

**शब्दार्थ : – विष्णू ने म्हटले कि हे पक्षीचे राजा गरुड! तुझ्या मनात हि चुकीची गोष्ट कशी आली कि आमचा जन्म–मृत्यू होतो. आपण तर निंदेस पात्र बनले आहात. आम्हपेक्षा मोठा कोणता परमात्मा आहे? आम्ही तिघे तसेच माता दुर्गा या संसाराची कर्ता आहे. तुझी बुद्धी अज्ञानाने संपवली आहे. आम्हा व्यतिरिक्त अन्य कोणी सृष्टीचा उत्पत्तीकर्ता सांगत आहे. आम्ही तिघे पूर्ण करतार म्हणजे पूर्ण परमात्मा आहोत. सृष्टीचे उत्पत्तीकर्ता आहोत.**

**''महादेव वचन''**

कह महादेव पक्षी है भोला। ह्रदय ज्ञान इन नहीं तोला।।
ब्रह्मा बनावै विष्णु पालै। हम सबका का करते कालै।।
और बता गरूड़ अज्ञानी। ऋषि बतावै तुम नहीं मानी।।
चलो माता से पूछै बाता। निर्णय करो कौन है विधाता।।
सबने कहा सही है बानी। निर्णय करेगी माता रानी।।
सब उठ गए माता पासा। आपन समस्या करी प्रकाशा।।

**शब्दार्थ :– महादेव म्हणजे शिव जी म्हणाले कि हा पक्षी भोळा आहे. याने आपल्या ज्ञानाची पडताळणी न करताच बोलत आहे. ब्रह्मा जीवांची उत्पत्ती करत आहे, विष्णू पालन करत आहे. मी संहार करत आहे. हे अज्ञानी गरुड! तू सांग अजून कोण समर्थ प्रभू आहे. श्री शिवजीने उपस्थित सभेत म्हटले कि चला माता दुर्गा कडून जाणूयात कि पूर्ण परमात्मा कोण आहे, निर्णय करून सांगा. शिवजीच्या सूचनेला सर्वांनी अनुमोदन दिले. म्हटले कि आपली गोष्ट बरोबर आहे. मातारानी निर्णय करतील. सभेतील सर्व उठून माता देवी जवळ गेले व आपली समस्या सांगितली.**

**''माता वचन''**

कहा माता गरूड़ बताओ।
और कर्ता है कौन समझाओ।।

**शब्दार्थ : माता देवी ने गरुडास प्रश्न केला कि तूच सांग संसाराचा विधाता म्हणजे उत्पत्ती करणारा यांच्या पेक्षा वेगळा कोन आहे?**

**''गरूड़ वचन''**

मात तुम जानत हो सारी। सच्च बता कहे न्याकारी।।
सभा में झूठी बात बनावै। वाका वंश समूला जावै।।
मैं सुना और आँखों देखा। करता अविगत अलग विशेषा।।
जहाँ से जन्म हुआ तुम्हारा। वह है सबका सरजनहारा।।
वेद जाका नित गुण गावैं। केवल वही एक अमर बतावै।।

मरहें ब्रह्मा विष्णु नरेशा। मर हैं सब शंकर शेषा।।
अमरपुरूष सत पुर रहता। अपने मुख सत्य ज्ञान वह कहता।।
वेद कहे वह पृथ्वी पर आवै। भूले जीवन को ज्ञान बतलावै।।
क्या ये झूठे शास्त्रा सारे। तुम व्यर्थ बन बैठे सिरजनहारे।।
मान बड़ाई छोड़ो भाई। ताकि भक्ति करे अमरापुर जाई।।
माता कहना साची बाता। बताओ देवी है कौन विधाता।।

**शब्दार्थ :- गरुडाने म्हटले कि हे माता! आपणस सर्व ज्ञान आहे. न्यायाधीशास पाहिजे कि त्याने सत्य सांगितले पाहिजे. जो न्यायकर्ता सभेत खोटे बोलतो तर परमात्माचे विधान आहे कि त्याचा वंश नष्ट होतो. गरुडाने पुढे म्हटले कि हे माता! ज्या परमेश्वराने आपली देखील उत्पत्ती केली आहे. तो सर्वांचा उत्पत्ती कर्ता आहे. मी डोळ्यांनी पाहिले व तत्वदर्शी कडून ऐकले आहे. तो कर्ता दिव्या अविगत विशेष आहे. तो भिन्न आहे. (अविगत चा अर्थ ज्याचा भेद गुप्त आहे) वेदांमध्ये त्याची महिमा अधिक सांगितलेली आहे. वेदांमध्ये सांगितले आहे कि केवळ तोच एक अविनाशी सांगितला आहे. ब्रह्मा, विष्णू तसेच शिव ची मृत्यू होईल. अविनाशी परमात्मा तर सतलोक (ऋतधामा) मध्ये राहतो. तो पृथ्वी वर प्रकट होऊन यथार्थ अध्यात्मिक ज्ञान आपल्या मुखाने बोललेल्या वाणीमध्ये सांगतात. अज्ञानामुळे सत्य भक्ति च्या मार्गावरून भटकलेल्या चांगल्या साधकांना सत्य मार्गाचे ज्ञान करवतो. हे सर्व वेदामध्ये प्रमाण आहे. काय हे सर्व शास्त्र खोटे आहेत? हे तिन्ही देवतांनो! आपण फुकट मध्ये सिरजनहार बनून बसले आहात. हे भाऊ (ब्रह्मा-विष्णू-शिव) मान-बढाई त्यागून आपल्या जीवाचे कल्याण करा. त्या पूर्ण परमात्मा ची भक्ति करा. गरुडाने माते कडे तोंड करून प्रार्थना केली कि हे माता! सत्य सांगा, कौन आहे संसार चा उत्पत्तीकर्ता?**

**''माता (दुर्गा) वचन''**

माता कह सुनो रे पूता। तुम जोगी तीनों अवधूता।।
भक्ति करी ना मालिक पाए। अपने को तुम अमर बताए।।
वह कर्ता है सबसे न्यारा। हम तुम सबका सिरजनहारा।।
गरूड़ कहत है सच्ची बानी। ऐसे बचन कहा माता रानी।।
सब उठ गए अपने अस्थाना। साच बचन काहु नहीं माना।।

**शब्दार्थ :- माता देवी दुर्गा ने ब्रह्मा, विष्णू, शिव यांना म्हटले कि हे मुलांनो! ऐका! तुम्ही तिघेही स्वयं साधक आहात. सत्य भक्ति केली नाही. स्वत:स अमर सांगत आहात कारण तुम्हास परमात्मा मिळाला नाही. तो सृष्टीचा उत्पत्तीकर्ता तर सर्वांपेक्षा वेगळा आहे. त्यानेच तुमच्या व आमच्या जीवांच्या आत्म्याची उत्पत्ती केली आहे. माता जेव्हा हि गोष्ट सांगितली तेव्हा सभेतील सर्व सदस्य व ब्रह्मा, विष्णू, महेश आपल्या आपल्या ठिकाणी निघून गेले, परंतु माताच्या गोष्टीला देखील खरे नाही मानले.**

**''गरूड़ वचन''**

ब्रह्मा विष्णु मोहे बुलाया। महादेव भी वहाँ बैठ पाया।।
तीनों कहे कोई दो प्रमाणा। तब हम तोहे साचा जाना।।
मैं कहा गुंगा गुड़ खावै। दुजे को स्वाद क्या बतलावै।।
मैं जात हूँ सतगुरू पासा। ला प्रमाण करू भ्रम विनाशा।।
त्रिदेव कहें लो परीक्षा हमारी। पूर्ण करें तेरी आशा सारी।।

हमही मारें हमही बचावैं। हम रहत सदा निर्दावैं।।
गरूड़ कहा हम करें परीक्षा। तुम पूर्ण तो लू तुम्हारी दीक्षा।।
उड़ा वहाँ से गुरू पासे आया। सब वृन्तात कह सुनाया।।

**शब्दार्थ :– गरुडजींना श्री ब्रह्मा जी, श्री विष्णू जी तसेच श्री शिव जी ने आपल्याजवळ श्री विष्णू लोकात बोलावले आणि म्हटले कि हे गरुड! तुम्ही कोणते तरी प्रमाण द्या कि आमच्या वर कोणी समर्थ शक्ती आहे, कोणता तरी अनुभव सांगा. तेव्हा आम्ही आपल्या गोष्टीला खरे समजू. गरुडाने उत्तर दिले कि जसे मुका व्यक्ती गुळ खाऊन दुसऱ्यांना त्याचा स्वाद नाही सांगू शकत. तो त्याचा आनंद स्वत:च अनुभवतो. प्रसन्न दिसतो. याप्रकारे मी माझ्या अनुभवास आपल्यासंगे वाटू शकत नाही. मी सतगुरु कडून सत्य अध्यात्मिक ज्ञान ऐकले आहे तसेच पूर्ण परमात्मांना डोळ्याने पाहिले आहे. आपणास तर गुरुच परमात्माचे दर्शन घडवू शकतात. मी माझ्या सदगुरुजवळ जातो. आपणास विश्वास करण्यासाठी काही प्रमाण घेऊन येईल. ज्यामुळे आपल्या शंकेचे समाधान होईल. तिन्ही देवता म्हणाले तू आमची परीक्षा घेऊन पहा. आम्ही तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण करू. आम्हीच उत्पन्न करतो. आम्हीच पालन करतो. आम्हीच मारतो. आम्हीच मृत्युपासून वाचवतो. आम्ही तिघेही पूर्ण स्वतंत्र आहोत. आम्ही जे पाहिजे ते करू शकतो. गरुड जीने म्हटले कि मी आपली परीक्षा घेईल. जर आपण पूर्ण परमात्मा सिद्ध झाले तर मी आपला शिष्य बनेल. गरुड तेथून उडून सतगुरु कबिरजीजवळ आला. कबीर जी त्यावेळी जोगजित नावाने प्रकट होते. जोगाजितजींना (कबीर जी) सर्व वृतांत सांगितला.**

**''सत्गुरु (कबीर) वचन''**

गरूड़ सुनो बंग देश को जाओ। बालक मरेगा कहो उसे बचाओ।।
दिन तीन की आयु शेषा। करो जीवित ब्रह्मा विष्णु महेशा।।
फिर हम पास आना भाई। हम बालक को देवैं जिवाई।।
बंग देश में गरूड़ गयो, बालक लिया साथ।
त्रिादेवा से अर्ज करी, जीवन दे बालक करो सुनाथ।।

**शब्दार्थ :– कबीर जींने म्हटले कि हे गरुड! आपण बंग देश (वर्तमानात बांगलादेश) मध्ये जावे. तेथे एका बालकाची तीन दिवसाचे आयुष्य शिल्लक आहे. त्याचा मृत्यू होईल. त्या बालकास घेऊन ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या जवळ जावे. त्यांना सांगणे कि या बालकास जिवंत करा. त्यांच्याकडून जिवंत नाही होणार. परत माझ्याजवळ त्या बालकास घेऊन या. मी जिवंत करेल. गरुडजीने आपल्या गुरुच्या आदेशानुसार बंग देशातून बालकास बरोबर घेऊन तिन्ही देवतांच्या जवळ गेले आणि प्रार्थना केली कि या मुलाचे आयुष्य वाढवून जीवन दान द्या तेव्हा मी मानेल कि आपण समर्थ परमात्मा आहात.**

**''त्रिदेव वचन''**

धर्मराज पर है लेखा सारा। बासे जाने सब विचारा।।
गरूड़ और बालक सारे। गए धर्मराज दरबारे।।
धर्मराज से आयु जानी। दिन तीन शेष बखानी।।
याकी आयु बढ़ै नाहीं। मृत्यु अति नियड़े आयी।।
त्रिादेव कहँ आए राखो लाजा। हम क्या मुख दिखावैं धर्मराजा।।
धर्म कह आपन आयु दे भाई। तो बालक की आयु बढ़ जाई।।

चले तीनों न नहीं पार बसाई। बने बैठे थे समर्थ राई।।
सुन गरूड़ यह सत्य है भाई। आई मृत्यु न टाली जाई।।

**शब्दार्थ :- तिन्ही देवताने म्हटले कि धर्मराजाकडे सर्व जीवांचा जन्म-मृत्यूचा लेखा आहे. हे माहित केले कि ३ दिवसाचे आयुष्य शिल्लक आहे. त्याच्याशी बोलूयात म्हणून गरुड, मुलगा तसेच तिन्ही देवता धर्मराज (काल ब्रह्मा चा न्यायाधीश) च्या कार्यालयात गेले आणि मुलाचे आयुष्य किती शिल्लक आहे हे माहित केले तेव्हा तीन दिवसाचे आयुष्य शिल्लक मिळाले. धर्मराजाने सांगितले कि याचा मृत्यू अत्यंत जवळ आहे. आयुष्य वाढू शकत नाही. तिन्ही देवताने धर्मराजास म्हटले कि हे धर्मराज! आम्ही आपल्या दरबारात आलो आहे. आमची इज्जत राखा. या बालकाचे आयुष्य वाढवा. या संसारात कशी इज्जत मिळेल? धर्मराज ने म्हटले कि आपल्यापैकी कोणी आपले आयुष्य दिले तर आपला मृत्यू होईल, मुलाचे आयुष्य वाढेल. गरुडाने सांगितले कि हि गोष्ट ऐकताच तिन्ही उठून निघून गेले जे स्व:त समर्थ बनून बसले होते. तिन्ही हे सांगून गेले कि हे गरुड! हे सत्य आहे कि ज्याचा मृत्यू येतो त्यास टाळले जाऊ शकत नाही.**

**गरूड़ वचन**

समर्थ में गुण ऐसा बताया। आयु बढ़ावै और अमर करवाया।।
अब मैं जाऊँ समर्थ पासा। बालक बचने की पूरी आशा।।
गया गरूड़ कबीर की शरणा। दया करो हो साहब जरणा(विश्वास)।।

**शब्दार्थ :- गरुडजींने म्हटले आहे कि समर्थाने हि शक्ती सांगितली आहे कि साधकाचे आयुष्य वाढवतो तसेच जन्म मृत्यूस कायमचे संपवून अमर करतो. आता मी समर्थ परमेश्वराजवळ जातो. मुलाचा मृत्यू टाळण्याची पूर्ण आशा आहे. हे बोलून गरुडाने बालकास त्याच्या घरी सोडले आणि कबीर परमेश्वराजवळ गेले आणि म्हटले कि हे परमात्मा! मुलास जिवंत करण्याची द्या करा म्हणजे जनतेस आपल्या सामर्थ्यावर विश्वास होईल.**

**''कबीर साहब वचन''**

सुनो गरूड़ एक अमर बानी। यह अमृत ले बालक पिलानी।।
जीवै बालक उमर बढ़ जावै। जग बिचरे बालक निर्दावै।।
बालक लाना मेरे पासा। नाम दान कर काल विनाशा।।
जैसा कहा गरूड़ ने कीन्हा। बालक कूं जा अमृत दीना।।
ले बालक तुरंत ही आए। सतगुरू से दीक्षा पाए।।
आशीर्वाद दिया सतगुरू स्वामी। दया करि प्रभु अंतर्यामी।।
बदला धर्मराज का लेखा। ब्रह्मा विष्णु शिव आँखों देखा।।
गए फिर धर्मराज दरबारा। लेखा फिर दिखाऊ तुम्हारा।।
धर्मराज जब खाता खोला। अचर्ज देख मुख से बोला।।
परमेश्वर का यह खेल निराला। उसका क्या करत है काला।।
वो समर्थ राखनहारा। वाने लेख बदल दिया सारा।।
सौ वर्ष यह बालक जीवै। भक्ति ज्ञान सुधा रस पीवै।।
यह भी लेख इसी के माहीं। आँखों देखो झूठी नाहीं।।
देखा लेखा तीनों देवा। अचर्ज हुआ कहूँ क्या भेवा।।
बोले ब्रह्मा विष्णु महेशा। परम पुरूष है कोई विशेषा।।

जो चाहे वह मालिक करसी। वाकी शरण फिर कैसे मरसी।।
पक्षीराज तुम साचे पाये। नाहक हम मगज पचाऐ।।
करो तुम जो मान मन तेरा। तुम्हरा गरूड़ भाग बड़ेरा।।
पूर्ण ब्रह्म अविनाशी दाता। सच्च में है कोई और विधाता।।
इतना कह गए अपने धामा। गरूड़ और बालक करि प्रणामा।।
भक्ति करी बालक चित लाई। गरूड़ अरू बालक भये गुरू भाई।।
धर्मदास यह गरूड़ को बोधा। एक-एक वचन कहा मैं सोधा।।

**शब्दार्थ :- कबीर परमेश्वरजींने आपल्या करमंडल (तांब्या) काही जल गरुडास दिले आणि म्हटले कि हे अमृत जल आहे. यास मुलाला पाज. यास पिल्यानंतर त्याची दीक्षा घेण्याची इच्छा बनेल. कालाचा दबाव बाजूला होईल. परत त्या मुलास माझ्याकडे आणून दीक्षा देऊन घे. त्याचा येणारा काल (मृत्यू) समाप्त होऊन जाईल. सतगुरुच्या आदेशाचे पालन गरुडाने केले. मुलास अमृत पाजले. त्यामुळे त्याची दीक्षा घेण्याची प्रबळ इच्छा झाली. गरुडाने मुलास सतगुरुजवळ आणले आणि दीक्षा दिली. परमात्मा ने मुलास आशीर्वाद देऊन कृपा केली. त्याच वेळी धर्मराजचा लेखा बदलला गेला. यास तिन्ही देवतांनी धर्मराज च्या दरबारात जाऊन डोळ्यांनी पाहिले. धर्मराज ने त्यास वाचून दाखवले कि हा मनुष्य शरीरधारी जीव १०० वर्षापर्यंत जीवित राहील तसेच भक्ति करेन. हि पूर्ण परमात्माकडून आयुष्य वाढविण्यात आले आहे. धर्मराज ने वाचले तसेच ब्रह्मा, विष्णू, शिव ने डोळ्यांनी पाहिले. हे पाहून त्यांना आश्चर्य झाले कि हे झालेच कसे? धर्मराजनी हे पाहून आश्चर्यचकित होऊन म्हटले कि परमेश्वराची लिला अद्भुत आहे. त्याचा काल म्हणजे काल ब्रह्म काय करू शकतो? काल ब्रह्म द्वारा निर्धारित मृत्यू परमेश्वराच्या आदेशाने समाप्त होऊन जातो. तो अन्य समर्थ जीवांचा रक्षक आहे. त्याने माझ्या पुस्तकातील जुने लेख बदलले. हा मुलगा १०० वर्षापर्यंत जिवंत राहील तसेच भक्ति करेल. हे देखील याच्यात लिहिले आहे. मी खोटे नाही बोलत, आपण स्व:त पहा. डोळ्यांनी पाहून ब्रह्मा जी, विष्णु जी तसेच शिव जी ने म्हटले कि हि आश्चर्याची गोष्ट आहे. वास्तवात कोणी परम पुरुष अन्य आहे. तो जे पाहिजे ते करू शकतो. जो त्याच्या शरण मध्ये गेला तो कसा मरू शकतो? हे पक्षीराजा गरुड! तुझी गोष्ट खरी आहे. आम्ही तर फुकट मध्ये आपापसात वाद-विवाद केला. तुम्ही करा जे तुमचे मन म्हणेल. हे गरुड! तुमचे भाग्य चांगले आहे. एवढे बोलून तिघेही आपल्या आपल्या ठिकाणी निघून गेले. गरुड तसेच मुलाने त्यांना तसेच धर्मराजास प्रणाम केला.**

कबीर जींने धर्मदास जींना सांगितले कि या प्रकारे तो मुलगा तसेच गरुड दोघेही गुरु भाऊ बनले. हे धर्मदास! हि आहे गरुडास शरण मध्ये घेण्याची कथा म्हणजे गरुड बोध.

❖ श्री हनुमानजीचे गुरू जी कोण होते? आपण ''कबीर सागर'' मधील ''हनुमान बोध'' अध्यायाचा सारांश वाचवा :-

## अध्याय ''हनुमान बोध'' चा सारांश

कबीर सागर च्या पृष्ठ ११३ वर १२ वां अध्याय ''हनुमान बोध'' आहे.

कबीर सागरच्या या अध्यायात पवनसुत हनुमानजींनी शरण येण्याचे प्रकरण आहे. धर्मदास जींनी विचारले की हे परमेश्वर कबीर बन्दी छोड़ जी! आपण पवित्र आत्मा पवनपुत्र हनुमानजींना कधी भेटले आहात काय?

उत्तर (परमेश्वर कबीर जींचे) = होय.

प्रश्न (धर्मदासजीचे) :– हे प्रभु! त्यांनी आपले ज्ञान स्वीकारले काय? ते माझ्यासारखेच श्रीराम उर्फ विष्णुजींवर अतूट श्रद्धा ठेवणारे आहेत. ते तुम्हाला शरण येणे म्हणजे सूर्योदय पश्चिमेला होण्यासारखे आहे.

उत्तर (परमेश्वर कबीर जीचे) :– परमेश्वर कबीर जींनी धर्मदासांना पवनपुत्र हनुमानजीवर कृपा करण्याचा वृत्तांत सांगितला. आता आपण यापुढे सरलार्थकर्ता (रामपाल दास) यांचेकडून हनुमानजीवर परमेश्वर कबीर जींनी कशी कृपा केली ती गोष्ट वाचावी. रामायणाचे संक्षिप्त वर्णन :–

रामायण ग्रन्थात हे प्रकरण येते. एक बाली नावाचा राजा होता. त्याच्या भावाचे नाव सुग्रीव होते. काही कारणाने बालीने आपला भाऊ सुग्रीव याला आपल्या राज्यातून बाहेर काढले. त्याच्या पत्नीला आपली पत्नी बनवून आपल्या ताब्यात ठेवले. सुग्रीव दूर देशात उदास मनाने भ्रमण करत होते. हनुमान जी राम–राम जप म्हणत एका पहाड़ावर बसलेले दिसले. दोघांमध्ये मैत्री झाली. सुग्रीवाने आपले दुःख हनुमानजींना कथन केले. हनुमानजींनी शरणागत सुग्रीवाला सहाय करण्याचे वचन दिले. सुग्रीवाने हनुमानजींना सांगितले की बालीमध्ये अशी सिद्धि आहे की कोणी जर त्याच्याशी युद्ध करत असेल तर समोरच्याची अर्धी शक्ति बालीमध्ये प्रवेश करते. ही गोष्ट ऐकून हनुमान जी देखिल शान्त राहिले. युद्ध करण्याचा विचार त्यागला. त्याच वेळेस राजा दशरथजीचे पुत्र रामचन्द्र यांचा वनवास सुरु होता. त्यांची पत्नी सीता जी आणि भाऊ लक्ष्मण हे देखिल वनात त्यांच्या सोबत आले होते. श्रीलंकेचा राजा रावणाची बहीण शूर्पणखाने लक्ष्मणाला पाहिले आणि त्याच्याशी विवाह करण्याचा प्रस्ताव ठेवला. लक्ष्मणाने म्हटले की माझा विवाह आधीच झाला आहे. (लक्ष्मणाच्या पत्नीचे नाव उर्मिला होते.) शुर्पणखाने वारंवार विवाह करण्याचा आग्रह केल्यावर शेषनाग अवतार लक्ष्मणाने क्रोधाने तिचे नाक कापले. शुर्पणखाने आपल्या केलेली दुर्दशेचा वृत्तांत आपल्या भावाला म्हणजेच रावणाला ऐकवला आणि पूर्ण पता सांगितला. रावणाने सूड घेण्यासाठी रामाची पत्नी सीता हिचे अपहरण करण्याची योजना आखली. साधु वेश घेऊन आपला मामा मारीच यांच्या मदतीने रावणाने सीताजीचे अपहरण केले.

सीताजींच्या शोधार्थ श्री राम जी आणि श्री लक्ष्मण जी सर्वत्र फिरत होते. त्याच वेळेस त्यांना श्री हनुमान जी आणि श्री सुग्रीव जी भेटले. आपसात परिचय झाला. सुग्रीवाने श्री रामांना आपले दुःख सांगितले. श्री रामचन्द्रजींनी अशी अट ठेवली की जर मी तुमचे राज्य तुम्हाला परत मिळवून दिले, तर तुम्ही सीतेचा शोध आणि तिला परत आणण्यासाठी मला सहकार्य करायचे. हे आपसात ठरले. श्री रामचन्द्रजींनी वृक्षाचा आसरा घेऊन बालीला युद्ध करून मारले व सुग्रीवाला राजसिंहासनावर बसविले. सुग्रीवाने आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले. सीताजीचा शोध घेण्यासाठी चारही दिशांनी शोधणारे पाठवली. जटायु पक्षाने श्री रामांना सांगितले की सीता मातेला लंकेश्वर रावण पळवून घेऊन गेला आहे. मी त्याच्या तावडीतून मातेची सुटका करण्याचा प्रयत्न केला, पण त्याने माझे पंख छाटले. रावणाशी वाटाघाटी करून सीतेला परत आणण्यासाठी श्री रामजींनी हनुमानजींना राजदूत केले. श्री रामचन्द्रजींनी श्री हनुमानजीवर सीतेने विश्वास ठेवण्यासाठी श्रीराम लिहिलेली आपली अंगठी दिली. सीतेने ती अँगठी पाहिल्यावर तिची खात्री पटली असती की मला भेटायला आलेला श्री रामांनीच पाठविला आहे. हनुमानजींनी श्री रामांची आंगठी घेऊन आकाश मार्गाने उड़ून श्रीलंकेस गेले. रावणाचा एक नौ लखा बगिचा होता. तिथे रावणाने सीताजींना कैद करून ठेवले होते. हनुमानजींनी सीता मातेला अँगठी देऊन आपली ओळख पटविली. तो राक्षस रावण ज्या यातना देत होता, ते सर्व सीताजींनी हनुमानजींना सांगितले. सीताजींनी आपले कंगन

हातातून काढून हनुमानजींना दिले व म्हटले की दादा! हे कंगन तुम्ही श्री रामजींना दाखवले तर त्यांची खात्री पटेल की तुम्ही सीतामातेला शोधून आला आहात. हनुमान जी सोबत येण्यास सीताजींनी नकार दिला. त्या म्हणाल्या की मी तुमच्यासोबत येणार नाही. हनुमानजींनी फळे खाण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा सीता म्हणाली दादा! जे फळ झाडावरून पडले असेल, ते खाऊ शकता. मला फळ तोडून खायची परवानगी नाही. या गोष्टीने क्षुब्ध होऊन हनुमानजींनी आधी ते झाड पाडले. नंतर पिकलेली फळे खाल्ली. मग तो वृक्ष उखडून समुद्रात फेकला. अशी हनुमानजींनी रावणाची नौ लखा बाग उजाड़ करत वृक्ष समुद्रात फेकले. लंकेचा राजा रावणाने हनुमानाच्या शेपटीवर कपड़े-रूई बांधून आग लावली होती. हनुमानजींनी आपल्या शेपटीला लावलेल्या आगीनेच रावणाचे लंकेला आग लावली.

त्यानंतर आकाश मार्गाने उड्न समुद्र पार करून एक पहाड़ावर उतरले. सकाळची वेळ होती. पहाड़ावरील तलाव पवित्र पाण्याने भरला होता. जवळपासच फळांनी लद्लेल्या वृक्षांची बाग होती. हनुमानजींना भूक लागली होती. स्नान करण्याचा विचार केला. कंगन एक दगडावर ठेवले. स्नान करताना देखिल हनुमानजीचा एक डोळा त्या कंगनावर होता. एक माकड आले. त्याने कंगन उचलले आणि चालू लागला. हनुमान जी काळजीत पडले की त्या माकडाने ते कंगन समुद्रात फेकले, तर माझे परिश्रम सगळे वाया जातील. आता तर लंकेत जाण्याचा मार्ग देखिल बंद झाला आहे. अशा विचित्र काळजीत हनुमान जी माकडाच्या मागेमागे जाऊ लागले. पाहता पाहता माकडाने ते कंगन एका ऋषिच्या कुटिच्या बाहेर ठेवलेल्या एका मडक्यात ते टाकले आणि पुढे पळून गेला. हनुमानजींना हायसे वाटले.

कलशात वाकून कंगन काढायला गेले तर त्याच्यासारखेच अनेक कंगन त्या कलशात होते. आता हनुमान जी समोर पुन्हा समस्या उभी राहिली. कंगन हातात घेऊन पाहिले, काहीच फरक नव्हता. आपले कंगन नेमके कोणते आहे? मी एखादे चुकीचे कंगन घेऊन जायचो आणि श्री राम म्हणायचे, हे कंगन सीतेचे नाहीत, म्हणजे माझा प्रयत्न व्यर्थ जाईल. समोरच एक ऋषि हनुमानजींची दुविधा पाहून हसत होते. कुटिच्या बाहेर बसले होते. ऋषि जी म्हणाले, यावे पवनपुत्रा! कसल्या समस्येत आहात? हनुमानजींनी म्हटले की ऋषिजी! श्री रामचन्द्रजींच्या पत्नीला लंकेचा राजा रावण अपहरण करून घेऊन गेला आहे. मी ते शोधून काढले आहे. ऋषि जी म्हणाले, कोणत्या क्रमांकाच्या रामचंन्द्राबाबत तुम्ही बोलताय? हनुमानजींना आश्चर्य वाटले, हे ऋषि आपल्या शुद्धीत आहेत की त्यांनी भाँग प्याली आहे? हनुमानजींनी विचारले, हे ऋषिजी! राम अनेक आहेत काय? ऋषि जी म्हणाले, हो, अनेक होऊन गेलेत आणि पुढे देखिल होतील आणि जातील. हनुमानजींना ऋषिचे वागणे योग्य वाटले नाही. परंतु ऋषिजीशी विवाद करून फायदा नाही हेही जाणले. ऋषिजींनी विचारले, आपण फळ खावे.जेवण बनवतो, भोजन करा. थकलेले दिसताय, आराम करा.

हनुमानजींनी म्हटले, ऋषिजी! माझी झोप मनशांती हरपली आहे. मला सीता मातेने कंगन दिले होते. त्या कंगनाशिवाय सीतेचा शोध लागला आहे यावर श्री रामचन्द्रजीचा विश्वास बसणार नाहीं. ते कंगन दगडावर ठेऊन मी स्नान करत होतो. माकडाने ते उचलून या कलशात टाकले आहे. खरे कंगन कोणते आहे, हे आता मला ओळखू येत नाही. मला तर सगळे एक सारखेच दिसताहेत.

ऋषि रूपात बसलेले परमेश्वर कबीर जी म्हणाले, हे पवनपुत्र! आपण कोणतेही एक कंगन घेऊन जा, काहीच फरक नाही आहे आणि सांगितले की जितके कंगन यात पडली आहेत, तितक्या वेळेस दशरथ पुत्र श्री रामांना बनवास आणि सीता हरण आणि हनुमाना

कडून शोध झाला आहे. हनुमानजींनी म्हटले, ऋषिजी! आपले म्हणणे मान्य. पण एक सांगा की प्रत्येक वेळेस सीता हरण, हनुमानाने शोधून कंगन आणणे आणि माकडाने ते कलशात टाकले जात असेल तर कंगन तर इथेच राहिले, मग हनुमान दरवेळेस काय घेऊन जातात? ऋषिमुनी जी म्हणाले की मी या कलशाला असा आशीर्वाद दिला आहे की जी वस्तु याच्यात पडेल, तशा तसेच्या तसे दोन दिसतील. असे म्हणून ऋषिजींनी एक मातीची वाटी कलशात टाकले. तर आणखी एक तशीच वाटी बनली. ऋषि मुनीन्द्र जी म्हणाले, हे हनुमानजी! आपण एक कंगन घेऊन जा, कोणताही त्रास होणार नाही. हनुमान जी जवळ दुसरा कोणताच पर्याय नसल्यामुळे त्या कलशातून त्यांनी एक कंगन घेऊन निघाले.

श्री रामचन्द्रजींना हनुमानजींनी सीताजींची खूण असेले कंगन दिले आणि माता सीतेने ज्या गोष्टी त्यांना सांगितल्या होत्या, त्या सर्व कथन केल्या. श्री रामचन्द्र जी कंगन पाहून भावूक झाले. हनुमानजींना छातीशी धरले आणि म्हणाले, हे संतजन! मी आपले हे उपकार कसे चुकवणार? आपला जीव धोक्यात घालून एक कर्मकठीण कार्य आपण केले आहे. हे कंगन सीतेचेच आहे. आता सभा घेऊन पुढचा कार्यक्रम तयार करूया. समुद्रावर सेतू बांधण्याबाबत विचार करण्यात आला. नल-नीलच्या हातात ऋषि मुनीन्द्रजींच्या आशीर्वादाची शक्ति होती की त्यांनी आपल्या हातांनी पाण्यात कोणतीही वस्तु टाकल्यास ती न बुडता तरंगत होती. दगड, काश्याची भांडी, असे काहीही पाण्यात टाकले तर ते पाण्यावर तारांगायचे. त्यावेळेस नल-नील यांना अहंकार होऊन आपल्या गुरू ऋषि मुनीन्द्र यांचे नाव घेतले नाही. त्यामुळे त्यांची ही शक्ती संपली.रामचन्द्र जी आणि हनुमान सहित सर्व उपस्थित योद्धे महादुःखी झाले. तीन दिवस पर्यंत श्री राम गुडघ्या एवढ्या पाण्यात उभे राहून समुद्राला रस्ता देण्याची प्रार्थना करत होते, परंतु समुद्र एक कणभर मागे हटत नव्हता. तेव्हा श्री रामांनी लक्ष्मणाला म्हटले की माझा अग्निबाण काढ, समुद्राला फूँकून टाकतो. लातों के भूत बातों से नहीं मानते. त्याच वेळेस समुद्र विप्र रूप धारण करून श्री रामांच्या समक्ष हात जोडून उभा राहिला आणि म्हटले की भगवन! माझ्यात संसार वसलेले आहे. आपण पापात भागीदार होऊ नका. आपण असे करा की सापही मरेल आणि लाठी देखिल तुटणार नाही.

आपल्या सेनेत नल-नील नावाचे दोन सैनिक आहेत. त्यांना त्यांच्या गुरूजीचा आशीर्वाद आहे. त्यांच्या हातचे दगडदेखिल माझ्यावर तरंगतात. तेव्हा नल-नील यांना दगड टाकून पाहण्यास सांगितल्यावर त्यांनी गुरूंचे स्मरण न करता आपला महिमा दाखविण्यासाठी तसे दगड टाकले. त्यामुळे ऋषि मुनीन्द्रजींनी त्यांची शक्ती काढून घेतली. दगड बुडाले. समुद्राने त्यांची चूक सांगितल्यावर नल-नील यांनी आपल्या गुरूजीचे स्मरण केले.

श्री रामचन्द्रजींना देखिल जाणवले की जर गुरू आपल्या शिष्यांना शक्ति देऊ शकतो तर माझ्या कार्यात देखिल मला साहाय्य करू शकतात. श्री रामचन्द्रजीं हे श्री विष्णुजीचे अवतार होते. श्री विष्णु काल निरंजनाचे पुत्र आहेत. ज्या वेळेस परमेश्वर कबीर जी प्रथम मृत्युलोकात आले होते, तेव्हा ज्योति निरंजनने आधी तर त्यांच्याशी भांडण केले होते आणि नंतर काही चालले नाही, तेव्हा त्यांच्या चरणी लोटांगण घेऊन क्षमा याचना केली आणि काही आशीर्वाद देखिल घेतले. त्यापैकी एक असाही होता की माझा अंश विष्णु त्रेतायुगात रामचंन्द्र नावाने राजा दशरथाच्या घरी जन्म घेईल, त्याला वनवास होईल. त्याच्या सोबत त्याची पत्नी सीता देखिल असेल. तिला एक राक्षस उचलून लंका नगरीत घेऊन जाईल. तेव्हा रामचंन्द्र समुद्रावर सेतू बनवू इच्छील पण बांधू शकणार नाही. तुम्ही तो सेतू बनवावा. दूसरा आशीर्वाद घेतला होता की द्वापार युगात हाच कृष्ण रूपात जन्मेल. मृत्युनंतर तो जगन्नाथ नावाने पुरी

नगरी समुद्र किनाऱ्यावर मंदिर बनवेल. समुद्र ते होऊ देणार नाही. आपण त्या मंदिराचे समुद्रा पासून रक्षण करा. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की मी हि कार्ये करीन. त्याच वचनाचे पालन करण्यासाठी ऋषि मुनीन्द्र रूपात परमेश्वर कबीर जी सेतुबांधावर प्रकट झाले आणि येतायेता पर्वताच्या चारही बाजूंना आपल्या सोट्याने रेषा आखून आले.

नल-नील यांनी लांबूनच आपल्या गुरूजींना ओळखले आणि म्हटले, आमचे गुरूजी आले आहेत. श्री रामचन्द्रजींनी आपली समस्या सांगितली आणि विनम्र भावाने आपल्या कार्यसिद्धिसाठी आशीर्वाद मागीतला. परमेश्वर म्हणाले, नल-नील यांनी चूक केली आणि त्यामुळेच त्यांची शक्ति क्षीण झाली आहे. मी समोरच्या पर्वतावर चारही बाजूंनी रेषा ओढली आहे. त्याच्या आतमधील सर्व दगड लाकडापेक्षा हलके केले आहेत. ते बुडणार नाहीत. हनुमान जी रामभक्त होते. त्यांनी त्या दगडांवर राम-राम लिहिले आणि ते उचलून पाण्यात टाकले तर बुडाले नाहीत. नल-नील शिल्पकार म्हणजेच निपुण राज-मिस्त्री देखिल होते. त्यामुळेच नल आणि नील यांनी दगडांना तासून एकमेकांमध्ये अडकवून जोडले होते. आधी श्री रामांकडून दगड तरंगले नाहीत. नल-नील देखिल अयशस्वी ठरले. हनुमान उभ्याउभ्या राम-राम करूनच दगड टाकत होते व ते तरावेत अशीच त्यांची इच्छा होती. परंतु सर्व व्यर्थ. ऋषि मुनीन्द्र जी (कबीर जी) नी दगड हलके केले होते. त्यामुळे दगड समुद्रात बुडाले नव्हते. हनुमान जी तर आपले राम-राम जप करण्यासाठी दगडांवर रामराम लिहित होते. ते तर जिथे बसायचे तिथे तिथल्या झाडारोपांवर देखिल राम-राम लिहित असत. हनुमान जी तर दशरथपुत्र श्री रामचन्द्रजींना ओळखतदेखिल नव्हते. त्याच्या आधीपासून राम-राम जप करत आहेत. आपण लोकवेद म्हणजेच दन्तकथेत ऐकत आलो आहोत की नल-नील यांनी दगड तारले होते त्यामुळेच सेतू बांधला गेला. कोणी म्हणतात की हनुमानजींनी दगडांवर राम-राम लिहिल्यामुळे दगड तारले होते. असे पण ऐकले होते की श्री रामांनी दगड तारले होते. याचे कारण असे होते की दगड तारण्याची जी चर्चा झाली होती आणि मुनीन्द्र ऋषिजींनी म्हटले होते की मी पर्वताचे दगड हलके केले आहेत. ही चर्चा फक्त २०-३० लोकांच्या समोरच झाली होती. युद्धासाठी आलेल्या उर्वरित करोड़ों व्यक्ति तर आज्ञा मिळाल्याबरोबर दगड आणायला लागले होते. त्यांनी हेच पाहिले की हनुमान जी राम-राम लिहित आहेत. बाकीचे ते दगड उचलत होते. पुढे नल-नील दगडांनी सेतू बनवत होते. श्री रामचन्द्र जी नल-नील यांना शाबासकी देत होते. बाकीच्या उपस्थित लोकांनी एकमेकांना सांगितले की हनुमानजींनी दगडांवर राम-राम लिहिल्यामुळेच दगड पाण्यावर तरंगत आहेत. काहींना वाटले की नल-नील यांच्या हातांच्या करामतीमुळे दगड पाण्यावर तरंगत आहेत. अशा प्रकारे ही चुकीची समजूत म्हणजेच भ्रम पसरवला गेला. सेतू बनवून युद्धाला लागले. बहुतेक तर मारले गेले. जगले वाचलेले आपापल्या घरी गेले. त्यांनी आपापल्या शहर आणि गावात अशी सगळी चुकीची माहिती पसरवली तीच आजपर्यंत खरी समजली जाते. खरी गोष्ट तर या सेवकाने (रामपाल दास) सांगितली तशी झाली आहे. युद्ध झाले. श्री रामांच्या सैन्यावर नागफांस शस्त्र सोड़ले होते. त्यामुळे श्रीराम, हनुमान, जाम्बवंत, सुग्रीव, अंगद यासहित सर्व सेना नागांद्वारे (सापांनी)बांधून बंदी करून टाकली. सर्प भोवती गुंडाळले होते. हात देखिल शरीरा सोबतच जखडले होते. एखादा शेतकरी उसांचीमोळी बांधतो त्याप्रमाणे. सर्वजण निष्क्रिय झाले होते. तेव्हा गरूडाला बोलावले. गरूड़ाने सर्व नाग कापुन काढले. तेव्हा सर्व सेना आणि श्री राम बंधनमुक्त झाले.

लक्ष्मणाला बाण लागल्यामुळे मूर्छा आली होती. (कोमात गेले होते) तेव्हा हनुमान जी लंकेतून वैद्य घेऊन आले. वैद्य म्हटले की द्रोणागिरी पर्वतावर संजीवनी बूटी आहे. त्याची

ओळख अशी की ती रात्री काजव्यासारखी चमकते. सूर्योदयाच्या आधी ती जड़ी आणली,तरच लक्ष्मण जीवित होऊ शकतो, उशीर झाल्यास मृत्यु निश्चित आहे. हनुमानजींना हे कार्य श्री रामजींनी सोपविले. म्हणाले की बजरंग बली! तुमच्या शिवाय हे कार्य असम्भव आहे. आज्ञा मिळताच हनुमान जी आकाश मार्गाने उडत तिथे गेले. द्रोणागिरीवर राक्षसांनी आपल्या मायेने सगळ्या इतर नकली जड़ी–बूटयांमध्ये चमक भरली. वैद्याने सांगितले होते की ती अतिशय कमी प्रमाणात असते. दिवसा तर ओळखू देखिल येत नाही. कारण तिच्या आसपास तशाच औषधि वनस्पती उगवतात. हनुमानजींना हे कळायला वेळ लागला नाही. त्यांनी द्रोणागिरी पर्वतच उचलला आणि आकाशमार्गे निघाले. हनुमानजींनी लक्ष्मण आणि श्री राम यांनी आपल्या भावाची भरताची शक्तीविषयी सांगितलेली गोष्ट खटकत होती. ते म्हणायचे की जर आज भरत असता, तर तो एकटाच रावण आणि त्याच्या लाख पुत्र आणि सवा लाख नातवंडांना यमलोकी पाठवण्यास समर्थ होता. हनुमानजींच्या मनात आले की जाताजाता भरताची परीक्षा घेऊन मग पुढे जातो. भरताला हे माहित होते की रावण आणि राम युद्ध सुरु आहे. आकाशमार्गाने पर्वतासहित हनुमानजींना जाताना पाहून त्यांना वाटले की कोणीतरी राक्षस जात आहे. तो तर खूपच नुकसान करू शकतो. भरतजींनी बाण चालवला. हनुमानजींनी बाण लागण्याचा बहाणा करून हे राम–हे राम करत धरतीवर पडले. पर्वताला जमिनीवर ठेऊन दिले.

राम शब्द ऐकून हा तर कोणीतरी आपल्याच पक्षाचा आहे, हे भरताला समजायला वेळ लागला नाही. निकट जाऊन विचारले, आपण कोण आहात? कुठे जात आहात? पर्वत का उचलला आहे? माझे नाव भरत आहे. मी श्री राम व लक्ष्मण यांचा भाऊ आहे. हनुमानजींनी सांगितले की माझे नाव हनुमान आहे. राम–रावण युद्ध सुरु आहे. आपल्या भावाला लक्ष्मणाला बाण लागल्यामुळे मूर्छा आली आहे. वैद्यानी द्रोणागिरीवर उपचाराचे औषध असल्याचे सांगितले आहे. मला ओळखता आली नाही म्हणून हा पर्वतच घेऊन चाललो आहे. सूर्योदय होण्याच्या आधी पोहोचायचे आहे. अन्यथा लक्ष्मणाचा मृत्यु होईल. आपण कसलाही विचार न करता मारलेला बाण मला लागला, आता मी कसा काय वेळेवर पोहोचणार. सूर्योदया नंतर लक्ष्मण या जगात राहणार नाही. भरताने बाण मारण्याचे कारण सांगितले आणि म्हटले, हे अंजनीलाल! चिंता करू नका. आपण द्रोणागिरी उचला आणि बाणाच्या अग्रभागी बसा. आपल्या दोन्ही पायांवर पुढेमागे करून उभे राहा. मी बाणाद्वारे आपलयाला पर्वतासहित आपल्याही आधी लंकेत पाठवून देईन.

हनुमानजींना आपल्या शक्तिवर अतिशय अहंकार होता. जमीनीवर ठेवलेल्या बाणावर दोन्ही पाय ठेवून पर्वत हातावर उचलून हनुमान जी उभे राहिले. भरतजींनी बाणाला हनुमान जी आणि पर्वतासहित पृथ्वीवरून उचलून धनुष्याच्या प्रत्यंचेवर चढ़विण्यासाठी आपल्या छातीच्या बरोबरीने आणून सोडायला लागले तर हनुमानजींना आश्चर्य वाटले की माझा आणि द्रोणागिरीचा भार असा उचलला आहे जणू फक्त बाणच उचलावा. हनुमानजींनी म्हटले. हे दशरथलाल! मी तर आपली परीक्षा घेत होतो. मी व्यवस्थित आहे. मी स्वतःउड़ून वेळेआधी पोहोचून जाईन. आपले दोघेही भाऊ आपली प्रशंसा करीत असत की जर भरत असता तर एकटाच रावण आणि रावणाच्या सैन्यासाठी पुरेसा होता. माझा त्या गोष्टींवर विश्वासच बसायचा नाही. आज आपल्या डोळ्यांनी पाहतो आहे. आपण खरेच शूरवीर आणि बलवान आहात. आपण माझेदेखिल गर्वहरण केलेत. असे म्हणून हनुमान जी त्या बाणावरच उडी मारून आकाशात उडाले. त्यावेळेस बाण जरा देखिल हलला नाही.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जर कोणी वजन उचलत असेल तर तो एका किंवा

दोन्ही हातांनी पकडतो. परंतु तेच वजन जर कुठल्या काठीने उचलू पाहिलं, तर कदापि उचलू शकणार नाही. काठीने थोड़ाबहुत वजन उचलता येईल. भरतजींनी महाबली हनुमान जी आणि द्रोणागिरीला धरतीपासून ५० फुट वर उचलले होते. त्रेतायुगात मनुष्याची ऊँची जवळपास ७० किंवा ८० फुट असायची. ही काही सामान्य गोष्ट नाहीं आहे. कोणी कुठल्याही माणसाला काठीने उचलून पाहावे, कसे वाटेल? लक्ष्मणाला वैद्यानी संजीवनी औषधि पाजून बरे केले. युद्ध झाले. रावण मारला गेला. रावणाने प्रभु शिवजींची भक्ति केली होती. आपली दाही शिरे कापुन ती त्याने शिवजींना भेंट दिली होती. शिवजींनी दहा वेळा ती त्याला परत केली होती आणि आशीर्वाद दिला होता की दहा वेळा तुझे शीर कापल्यानंतर तुझा मृत्यु होईल. रावणाची शिरे दाही वेळा कापली गेली. नंतर नाभिमध्ये बाण लागून तेथील अमृत नष्ट झाल्यामुळे रावणाचा वध झाला होता. दहा वेळा शिरे कापली गेली, दहा वेळा जोडली गेली. मग रावणाच्या नाभीत अमृत आहे असे बिभीषणाने सांगितल्यावरून रामचंन्द्रानी देखिल रावणाच्या नाभित बाण मारण्याचे पुरेपूर प्रयत्न केले होते. परंतु रावणाचे लक्षदेखिल तिथेच केंद्रित झाले होते की नाभिवर बाण लागू नये. रामचंन्द्रजींनी परमात्माचे स्मरण केले की या राक्षसाला मारा. माझी मदत करा. हे महादेव! हे देवाधिदेव! हे महाप्रभु! माझी मदत करा. आपली कन्या (सीता) महायातना भोगते आहे. आपली अपत्ये असलेल्या तेतीस करोड़ देवतांना देखिल या राक्षसाने कारागृहात टाकले आहे. परमेश्वर कबीर जींनी त्याच वेळी गुप्त रूपात रामचंन्द्राच्या हातांवर आपले सूक्ष्म हात ठेवून बाण रावणाच्या नाभित मारला, तेव्हा रावण मेला.

{परमेश्वर कबीर जींच्या प्राप्ति पश्चात् संत गरीबदास जी (गाव–छुड़ानी जिल्हा–झज्जर, हरियाणा प्रान्त) यांनी परमेश्वर कबीर जीचा महिमा सांगितला आहे. कबीर जी सांगतात की :–

कबीर, कह मेरे हंस को, दुःख ना दीजे कोय।
संत दुःखाए मैं दुःखी, मेरा आपा भी दुःखी होय।।
पहुँचुँगा छन एक मैं, जन अपने के हेत।
तेतीस कोटि की बंध छुटाई, रावण मारा खेत।।
जो मेरे संत को दुःखी करैं, वाका खोऊँ वंश।
हिरणाकुश उदर विदारिया, मैं ही मारा कंस।।
राम–कृष्ण कबीर के शहजादे, भक्ति हेत भये प्यादे।।}

शब्दार्थ :– संत गरिबदास जींने सांगितले कि श्री रामचंद्र जी व श्रीकृष्णजींची मदत त्यांच्या चांगल्या कर्मानुसार कबिर्जीनी केली होती कारण श्रीराम तसेच श्रीकृष्ण जी त्याच सम्राट कबीराचे शहजादे म्हणजे राजकुमार आहेत अर्थात परमात्मा कबीर जींचे सर्व जीव आहेत आणि राम–कृष्ण म्हणजे विष्णू तर चांगला आत्मा आहे. त्यांची रक्षा देखील तेच परमेश्वर कबीर जी करतात. ते लोकांना सावध करतात कि माझ्या साधकास कोणतेच कष्ट देऊ नका. भक्ताच्या कष्टातून मी दुखी होतो. मी माझ्या भक्ताची रक्षा करण्यासाठी एका क्षणात म्हणजे एका सेकंदात पोहोचेल. याच मुळे जेव्हा श्री रामचंद्र कडून रावण मरत नव्हता तेव्हा गुप्त स्वरुपात रामाचा हाथ पकडून रावणाच्या बेंबी मध्ये बाण मारला ज्यामुळे रावणाचा मृत्यू झाला. रामाच्या सेनेला बळ दिले, उत्साह दिला. याच प्रकारे कृष्णाची मदत करून कंसाच मीच मारले. जो माझ्या भक्तास त्रास देईल त्याच्या कुळाचा नाश करेन म्हणजे खानदान संपवून टाकेन.

लंकेचे राज्य रावणाचा धाकटा भाऊ विभीषणाला सोपविले. श्रीरामांनी सीतेची अग्नि

परीक्षा घेतली. जर रावणाने सीतेच्या पावित्र्याचा भंग केला असेल तर सीता अग्निमध्ये जळून मरून जाईल. जर सीता पवित्र असेल तर अग्नित जळणार नाही. सीता जी अग्निपरीक्षेत तावून सुलाखून निघाल्या. उपस्थित लाखों माणसांनी सीता मातेचा जयजयकार केला. सीता सती पदवीला प्राप्त झाली. रावणाचा वध अश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या दहाव्या दिवशी झाला होता.

रावण वधानंतर २० दिवसांनी १४ वर्ष वनवासाचा कालावधि पूर्ण करून श्रीराम, लक्ष्मण आणि सीता पुष्पक विमानात बसून अयोध्या नगरीत परत आले. त्या दिवशी कार्तिक महिन्यातील अमावस्या होती. त्या काळ्या अमावस्येला प्रत्येकाने आपल्या घरात आणि वर गच्चीमध्ये गाईच्या तुपाचे दिवे पेटवून श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांच्या आगमनाचा आनंद साजरा केला. भरताने आपल्या भावाला श्री रामचन्द्रजींना राज्य परत केले. एक दिवस सीतेने श्री रामचन्द्रजींना म्हटले की मी युद्धात लढलेल्या योद्ध्यांना बक्षीस देऊ इच्छिते. बक्षीस म्हणून सीताजींनी हनुमानजींना आपल्या गळ्यातील अस्सल मोत्याचा हार काढून भेट दिला. आणि म्हटले, हे हनुमान! हे अमूल्य बक्षीस मी तुम्हाला देते आहे. हे अतिशय सांभाळून ठेवा. हनुमानजींनी त्या हारातील एक एक मोती तोडले आणि नंतर फोडले आणि नंतर जमीनीवर फेकून दिले. सीताजींना हनुमानजींची ही वर्तणूक आवडली नाही. क्रोधाने म्हटल्या अरे मूर्खा! हे तू काय केलेस? अशा अमूल्य हाराचा असा सर्वनाश केलास. तू वानर तो वानरच! माझ्या डोळ्यासमोरून निघून जा. त्यावेळेस रामचन्द्र जी देखिल सीताजींच्या सोबतच सिंहासनावर बसले होते. त्यांना देखिल हनुमानाचे हे वागणे फारसे पसंत पडले नाही, पण ते गप्प राहीले. हनुमानजींनी म्हटले, माताजी! ज्या वस्तुत राम-नाम लिहिलेले नाहीं, ते माझ्या दृष्टीने निरुपयोगी आहे. मी मोती फोडून बघीतले आहेत. त्यात राम-नाम नाहीं. म्हणून माझ्या दृष्टीने निरुपयोगी आहेत. सीताजींनी विचारले, तुमच्या शरीरात राम-नाम लिहिले आहे काय? मग हे शरीर तरी कशाला बाळगले आहे, तेही फाडून फेकून द्या. त्याचवेळी हनुमानजींनी आपली छाती फाडून दाखवली. त्यात राम-राम लिहिले होते. हनुमान जी त्याच वेळेस अयोध्या नगरीचा त्याग करून अन्यत्र गेले.

श्री रामचन्द्र जी आपल्या अयोध्या नगरीतील जनतेचे दु:ख/समस्या जाणून घेण्यासाठी गुप्त रूपात रात्रीच्या वेळेस वेश बदलून फिरत असत. काही वर्षानंतर एक दिवस राजा रामचन्द्र जी रात्री अयोध्येच्या रस्त्यांवरून फिरत होते. एका घरातून मोठ मोठ्याने बोलण्याचा आवाज येत होता. राजा रामचन्द्रजींनी निकट जाऊन ती चर्चा ऐकली. एका धोब्याची पत्नी भांडण करून घरातून निघून गेली होती. ती आपल्या बहिणीच्या घरी दोन तीन दिवस राहिली, आणि घरी परत आली. धोबी तिला मारहाण करत होता. म्हणत होता की तू माझ्या घरातून निघून जा. तू दोन रात्री बाहेर राहून आली आहेस. मी तुला माझ्या घरात ठेवणार नाही. तू कलंकीत आहेस. ती म्हणत होती, देवाची शपथ सांगते. राजा रामाची शपथ घेऊन सांगते की मी पवित्र आहे. तुम्ही मारले म्हणून रागाने मी माझ्या बहिणीच्या घरी गेले होते. मी निर्दोष आहे. धोबी म्हटला की मी दशरथ पुत्र रामचन्द्र नाहीं आहे, रावणासोबत अनेक वर्ष राहिलेल्या आपल्या कलंकीत पत्नीला घरी आणून ठेवायला. अयोध्या नगरीमधले सगळे लोक याचीच चर्चा करत आहेत. ज्याची पत्नी अपवित्र झाली आहे, त्याचे हे काय जगणे आहे? राजा रामाने धोब्याच्या तोंडून ही गोष्ट ऐकली आणि त्यांच्या कानात जणू कोणी गरम तेल ओतल्यासारखी त्यांना वेदना झाली.

दुसऱ्याच दिवशी रामचन्द्रजींनी सभा बोलावली आणि नगरात सुरु असलेल्या चर्चेविषयी सभेत सांगून म्हटले की जर मी सीतेला घराबाहेर काढले, तरच ही चर्चा बंद होईल. त्याचवेळेस

सीताजींना देखिल सभेत बोलावले गेले आणि घरातून निघून जाण्यास त्यांना सांगितले. कारण देखिल सांगितले. सीताजींनी नम्रतेने म्हटले की की हे स्वामी! आपणच माझी अग्निपरीक्षा देखिल घेतली. मी देखिल माझ्या आत्म्याला स्मरून सांगते, रावणाने माझ्यासोबत कोणताही अतिप्रसंग केला नाही. कारण की त्याला एक ऋषिने शाप दिला होता की जर तू कोणत्या परस्त्रीवर बलात्कार करशील, तर त्याच क्षणी तुझा मृत्यु होईल. जर परस्त्रीच्या सहमतिने मिलन केल्यास असे होणार नाही. त्यामुळेच रावण मला स्पर्शही करू शकला नाही. हे प्रभु! मी गर्भवती आहे. अशा स्थितित मी कुठे जाणार? रावणासारख्या व्यक्तिंची कमतरता नाही आहे. रामचन्द्र जी आदेश देऊन सभा सोडून निघून गेले. जाता जाता म्हणाले की मी निंदापात्र होऊ इच्छित नाहीं. माझ्या वंशावर हे लांच्छन लागेल. सीताजींना तर धरणीकंपच झाल्यासारखे झाले. सगळीकडून अंधारून आल्यासारखे वाटले. जगातील काही दिवसच शिल्लक असल्यासारखे वाटले.

सीता अयोध्या सोडून बाहेर पडली मागे वळून वळून आपल्या रामाला आणि त्याच्या महालांना बघण्याचा प्रयत्न करीत होती. दूर जंगलात जाऊन वाल्मीकी ऋषिजींच्या कुटिच्या निकट थकून चक्कर येऊन पडल्या, मूर्च्छित झाल्या. ऋषि वाल्मीकी स्नान करण्यासाठी ते आश्रमातून निघाले, तर समोरच एक युवती गर्भावस्थेत मूर्च्छित पड़लेली पाहून तिच्या निकट आले. आपल्या आश्रमातून औषध आणले. सीताजींच्या तोंडात घातले. उन्हाळ्याचे दिवस होते. थंड पाणी तोंडावर शिंपडले. त्यामुळे सीता जी सावध झाल्या आणि बसल्या. ऋषिनी नाव आणि गांव विचारले, तर सांगितले की खाली पृथ्वी, वर आकाश एवढेच सांगितले. पुढे काहीही सांगायला नकार दिला. ऋषि दयाळू होते. म्हणाले, मुली जग तर स्वार्थीच आहे. धन्यवाद दे त्या परमात्माला, तू माझ्या आश्रमात आली आहेस. बेटी मला आपला पिता समज आणि माझ्याजवळच इथे राहा. सीता जी वाल्मीकी ऋषिजींच्या या आश्रमात राहू लागल्या. ऋषिनी देखिल विषय पुढे वाढवला नाही. परमेश्वर कबीर जी त्रोतायुगात ऋषि मुनीन्द्रजींच्या रूपात लीला करायला आले होते. हनुमानजींना भेटले. सतसाहेब म्हटले. हनुमानजींनी राम-राम म्हटले आणि उभे होऊन ऋषिजीचा सत्कार केला आणि एका दगडावर स्वतः बसले व दूसऱ्यावर ऋषिजींना बसण्याचा आग्रह केला. दोघांनीही स्थान ग्रहण केले. हनुमान जी ऋषिजींना ओळखण्याचा प्रयत्न करीत होते. ऋषिजींनी म्हटले, कसला विचार करताय, हनुमान? मी तोच ऋषि आहे, माझ्या आश्रमात वानराने सीताजीचे कंगन घड़्यात टाकले होते. त्यामध्ये त्याच्यासारखेच अन्य कंगन देखिल होते. हे हनुमान! ते कंगन कसे होते? हनुमानजींना लक्षात यायल वेळा लागला नाहीं आणि मग ऋषिजींना त्यांनी प्रणाम केला. हे ऋषिजी! आपले कसे काय येणे झाले? परमेश्वर कबीर जींनी (मुनीन्द्र ऋषि रूपात होते) म्हटले, हे पवन पुत्र! मी आपल्याला भक्तिज्ञान करवून द्यायला आलो आहे. आपण ज्या दशरथ पुत्र रामचन्द्राची पूर्ण परमात्मा मानून पूजा करत आहात, त्यात आपली फसगत होते आहे. जो जन्मतो मरतो आहे, तो पूर्ण परमात्मा होऊच शकत नाहीं. पूर्ण परमात्मा तर अविनाशी आहे. हनुमान जी म्हणाले, हे ऋषिवर! मला आपल्या शब्दांनी दु:ख होते आहे. माझ्या भावना दुखावतात. आपण अन्य विषयावर चर्चा करू. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की जर एखादी व्यक्ति चुकीच्या रस्त्याने जात असेल, दरोडेखोरांच्या मुक्कामी चाललेला रस्ता बरोबर आहे असे मानून तो त्या रस्त्याने जात असेल आणि जर कोण्या सज्जन पुरूषाने त्याला सांगितले की ज्या रस्त्यावरून तू जातो आहेस, त्यावर तुझ्या जीवाला आणि चीजवस्तूला धोका आहे, कारण त्यावर पुढे दरोडेखोर बसलेले आहेत. ते आधी मारून टाकतात आणि नंतर आपली चीजवस्तू लुटतात.

जर ती व्यक्ति असे म्हणाली की आपन माझ्या भावना दुखावता आहात, तर ते कितपत खरे किंवा योग्य आहे? हनुमान जी गप्प राहिले, परंतु स्मित करून जणू त्यांना सांगत होते, आपण सत्य सांगता आहात. हनुमानजींच्या चेहऱ्यावर शान्तिचे चिन्ह पाहून परमेश्वर म्हणाले की श्री रामचन्द्र जी, श्री विष्णुजीचे अवतारआहेत. श्री विष्णु जी, श्री ब्रह्मा जी आणि श्री शिव जी यांचे काल ब्रह्म हे पिता आहेत. यांनाच ज्योति निरंजन देखिल म्हणतात. कालाला त्याच्या काही चुकीमुळे शाप मिळाला आहे की एक लाख मानव शरीरधारी प्राणि दररोज तो खाईल. सवा लाख दररोज उत्पन्न करेल. त्यामुळे त्याने आपल्या तिन्ही पुत्रांना एक-एक विभागाचा प्रमुख नेमले आहे श्री ब्रह्मा जी रजोगुणी आहेत. त्यांच्या प्रभावाने सर्व प्राणी प्रेरित होऊन अपत्याची उत्पत्ति करतात. त्यामुळेच ब्रह्माजींना चुकीने उत्पत्तिकर्ता मानले आहे. उत्पत्तिकर्ता तर पूर्ण परमात्मा आहेत.

कालाने आपल्या दूसऱ्या पुत्राला श्री विष्णुजींना कर्मानुसार पालन करण्याचा विभाग दिला आहे. विष्णु सत्वगुणी आहेत. कालाने आपल्या तिसऱ्या पुत्राला श्री शिवजींना तमोगुणी असल्यामुळे या एक लाख मानव शरीरधारी जीवांना मारून त्यांच्याकडे पाठविण्याचा विभाग दिला आहे. ते स्वतः अव्यक्त (गुप्त) रहातात. आपण पाहतोच आहोत, इथे कोणताही जीव अमर नाहीं, देवता देखिल मरत आहेत. ब्रह्मा, विष्णु, शिव देखिल जन्मतात मरतात. जे पूर्ण आयुष्य जगतात. वृद्धावस्थादेखिल सगळ्यांना येते. एक लोक असा आहे जिथे वृद्धावस्था आणि मरण नाहीं. तिथे कोणीहि रावण कोणाच्याही पत्नीचे अपहरण करत नाहीं. तुमच्या डोळ्यासमोर लंकेत झालेल्या राम-रावण युद्धात किती व्यक्ति आणि अन्य प्राणी मारले गेले. एका सीतेला सोड़विण्यासाठी. आपण श्री रामचन्द्रजीसाठी आपल्या प्राणाची बाजी लावून लंका जाळली. रावणाचा भाऊ म्हणजे पाताळातील राजा अहिरावण हा राम आणि लक्ष्मण यांचे अपहरण करण्यासाठी गेला. त्यांना बळी देणार होता. आपण तिथे गेलात आणि त्या दोघांना जीवित परत आणले. आपणच सांगा, ते परमात्मा आहेत तर मग ज्या वेळेस नाग फांस शस्त्र सोड़ल्यावर सर्पानी श्री राम व लक्ष्मण आणि आपण आणि सर्व सेना बांधून टाकली होती. सर्पानी आपल्या सर्वांना जखड़ले होते. आपला सगळ्यांचा निरुपाय होता. काही वेळातच रावणाच्या सेनेने सहजगत्या आपणा सर्वांची कत्तल केली असती. त्या वेळेस गरूड़ाला बोलाविले, त्याने सर्व नाग कापून काढले. मग आपण आणि रामचन्द्र बंधनमुक्त झालात. जर परमात्मा इतके विवश असतील की आपलेच बंधन तोडू शकत नाहीत, तर मग त्याच्या पुजाऱ्याचे काय होईल. विचार करा.

काटे बंधत विपत में, कठिन कियो संग्राम।
चिन्हो रे नर प्राणियो, गरूड़ बड़ो के राम।।

**शब्दार्थ :- या वाणीचा शब्दार्थ वरती दिला आहे.**

**हनुमानजींनी म्हटले ऋषिजी! समुद्रावर सेतू बांधणे हे सामान्य माणसाचे काम आहे काय? हे परमात्माशिवाय बांधता येत नाही.**

समन्दर पांटि लंका गयो, सीता को भरतार।
अगस्त ऋषि सातों पीये, इनमें कौन करतार।।

**शब्दार्थ :- जर तुम्ही समुद्रावर सेतु बांधणाऱ्या श्री रामचन्द्रजींना परमात्मा मानत असाल, तर अगस्त ऋषिंनी सात सागरांना गिळंकृत केले होते. यांच्यामध्ये कोण आहे परमात्मा?**

ऋषि मुनीन्द्रजींनी विचारले की तुम्ही विसरलात काय? एक ऋषि आले होते. त्यांनी एक पर्वतावरील दगड आपल्या कडील काठीने रेषा ओढून हलके केले होते. तेव्हा दगड तरले होते, सेतू बनला होता. रामचन्द्र तर तीन दिवस रस्ता मागत होते. समुद्रानेच सांगितले होते नल–नील विषयी. हनुमानजींनी म्हटले की ते तर विश्वकर्मा जी होते आणि श्री रामचन्द्रजींनी बोलावल्यावरून ते वेश बदलून आले होते. परमेश्वर कबीर जींनी म्हटले की विश्वकर्मा जी तर सेतू निर्माण करू शकतात, पण पाण्यावर दगड तरंगवू शकत नाहीत. नल–नील यांच्या हातात शक्ति होती. त्यांच्या हाताने टाकलेली वस्तू पाण्यावर तरंगायची. त्या दिवशी त्यांच्यामध्ये अहंकार उत्पन्न झाला आणि त्यांची शक्ति समाप्त झाली. तो आशीर्वाद मीच दिला होता. हनुमानजींनी म्हटले, आपण ऋषि मुनीन्द्र जी आहात काय? परमेश्वर जी म्हणाले, होय! मुनीन्द्रजींनी म्हटले की आपण आपल्या प्राणांची पर्वा न करता रामजीसाठी काय काय नाहीं केले? जेव्हा सीताजींनी तुमची निंदा केली आणि घर सोडायला सांगितले, त्या वेळेस श्रीराम तिथेच बसलेले होते. एक शब्दानेही त्यांनी म्हटले नाहीं की सीता, असे करू नको. पवनसुताला आतमध्ये हे सर्व पटत होते, पण तोंडाने म्हणत होते की ऋषिजी! कोणाची निंदा करू नये. मुनीन्द्रजींनी म्हटले की सत्य बोलणे म्हणजे निंदा नव्हे. जर श्री रामचंद्र आणि सीता यांच्यामध्ये माणुसकी असती, तर त्यांनी जन्मभर आपले कृतज्ञ राहून त्यांच्या चरणांशी ठेवायला पाहिजे होते. तुम्ही तर त्यांच्या शिवाय जगण्याचा विचारदेखिल करत नाही. आणि ऐका! आपल्याशी ते जसे वागले, त्याचे फळदेखिल सीता आणि रामचंद्र यांना मिळाले आहे. काही वर्षाच्या नंतर सीतेला श्री रामांनी घराच्या बाहेर काढले. त्या वेळेस त्या गरोदर होत्या हे ऐकून हनुमंताच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले आणि त्यांनी ऋषिजींच्या चरणांवर लोळण घेतली. काही बोलले नाहीत. अयोध्यावासियांनी दोन वर्ष दिपावली आणि दसरा साजरा केला होता. त्यानंतर बंद केले कारण ज्या स्त्रीसाठी रावण मारला, ती आज पुन्हा किती रावणांच्या यातना सहन करणार दीपमाला हे आनंदाचे प्रतीक आहे. जेव्हा राजा आणि राणी वेगवेगळे झाले, तेव्हा दीपावली ना राजाला साजरी करावीशी वाटली ना प्रजेला. म्हणून दीपावली साजरी करणे त्याच वेळेस बंद झाले होते. जे दोन वर्ष साजरे केले होते, त्याच आधारावर भोळीभाबडी जनता हा सण साजरा करते आहे.

अशा प्रकारे दसरा आणि रावण दहनाची परंपरा चालत आली आहे. जर एखाद्या घरात सैनिकाचा/युवकाचा मृत्यु झाला, तर ते कुटुंब आणि नातलग कोणताच सण साजरा करीत नाहीत.

हनुमानफ्जींनी म्हटले, प्रभु! परमात्माची चर्चा करा. परमेश्वर कबीर जींनी सृष्टि रचना ऐकवली. सत्यकथा श्रवण केल्यावर हनुमानजींना गहिवरून आले. सत्यलोक पाहण्याची इच्छा व्यक्त केली. परमेश्वर आकाशात उड़ाले. हनुमान जी बघत होते. काही काल अंतर्धान पावले. हनुमानजींना काळजी लागून राहिली की आता हे ऋषि आपल्याला कसे भेटणार? तेवढ्यात आकाशात विशेष प्रकाश दिसु लागला. हनुमानजींना दिव्य दृष्टि देऊन सतलोक दाखवला. ऋषि मुनीन्द्र जी सिंहासनावर बसलेले दिसले. त्यांच्या शरीराचा प्रकाश सर्वाधिक होता. डोक्यावर मुकुट आणि राजांसारखे छत्र होते. काही वेळ हे दृश्य दाखवून दिव्य दृष्टि समाप्त केली. मुनीन्द्र जी खाली आले. हनुमानजींना उमगले की हे भगवंत आहेत. सत्यलोक हे सुखाचे स्थान आहे. परमेश्वर कबीर जी कडून दीक्षा घेतली. आपले जीवन धन्य केले. मुक्तिचे अधिकारी झाले. अशा प्रकारे पवित्र आत्मा परमार्थी स्वभाव हनुमानजींना परमेश्वर कबीर जींनी अनुग्रहीत केले. परमार्थी आत्म्याला संसार आणि कालाचे स्वामी भलेही परोपकाराचे

फळ देत नसतील, परंतु परमेश्वर अशा आत्म्यांवर अवश्य कृपा करतात. कारण असे आत्मेच परम भक्त होऊन भक्ति करतात. आणि मोक्ष प्राप्त करतत. जे प्रापंचिक लोक परमार्थीची फसवणूक करतात ते आजीवन यातनामय जीवन व्यतीत करत असतात.

श्री रामचंन्द्रजींना अंतसमयी आपल्याच पुत्रांकडून म्हणजेच लव आणि कुश यांच्याकडून पराजय स्वीकारावा लागला. सीताजींना श्रीरामचंद्राचे दर्शन घेणे सुध्दा योग्य वाटले नाही. पाहता पाहता पृथ्वीत सामावून गेल्या. या अति दु:खाने श्री रामचंन्द्रजींनी अयोध्येजवळून वाहणाऱ्या शरयु नदीत उडी मारून जलसमाधी घेऊन आपले जीवन संपविले. परमार्थी हनुमानजींना निस्वार्थपणे दु:खी लोकांना मदत करण्याचे फळ मिळाले. परमात्मा स्वतः आले, मोक्षाचा मार्ग सांगितला जीवाचे कल्याण झाले. हनुमान जी परत मानव जीवन प्राप्त करतील. तेंव्हा परमेश्वर कबीर जी त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांना मुक्त करतील. त्या आत्म्यात सत्य भक्तिचे बीज पेरले गेले आहे.

## आम्ही कालाच्या जाळ्यात कसे अडकलो?

याचे उत्तर कृपया वाचा ''सृष्टि रचना'' अध्यायात याच पुस्तकात पुस्तकात पृष्ठ २३१ ते २८१ आहे.

## ''परमेश्वर कबीर जींची कालासोबत चर्चा''

आता आपण काल ब्रह्म लोकात राहतो आहोत. आत्म्यावर स्थूल इत्यादी शरीरे चढ़वून कालाने जीव बनविले. त्याने जीव भ्रमित झाला आहे. जे पूर्ण परमात्मा आत्म्याचे जनक आहेत, त्यालाच विस्मृतीत टाकले आहे. स्वतःला परमात्मा सिद्ध केलला आहे. हे परमात्माचे अंश जीवात्म्याला त्रास देतात. जेणेकरून परमात्मा दु:खी व्हावे. हेच मनरूपाने प्रत्येक आत्म्यासोबत असतात. चूक करवतात. शिक्षा जीवात्मा भोगतो. दारू इत्यादीची व्यसने लावणे, बलात्कार (Rape) करवणे आणि अन्य पाप करवणे हे मनाच्या प्रेरणेने काल करवतो आहे. जेव्हा आपण लेखक (संत रामपाल) यांच्याकडून दीक्षा घ्याल, तेव्हाच हा सरळ चालेल कारण, जीवात्म्यासोबत परमात्माची शक्ति राहणार आहे. आत्म्याला तत्वज्ञानाने विवेक होतो. परमात्माच्या शक्तिमुळेच आत्मा दृढ़ होतो. काल ब्रह्म केवळ कबीर परमात्मा यांनाच घाबरतो. संत गरीबदासजींनी म्हटले आहे :-

काल डरै करतार से, जय-जय-जय जगदीश।
जौरा जोड़ी झाड़ता, पग रज डारे शीश।।
गरीब, काल जो पीसे पीसना, जौरा है पनिहार।
ये दो असल मजदूर हैं, सतगुरू कबीर के दरबार।।

भावार्थ स्पष्ट आहे. परमात्मा कबीर जी आपल्या आत्म्याला कालाच्या जाळ्यातून बाहेर काढण्याचे प्रयत्न करत आहेत. काल ब्रह्म अडकावण्याचे प्रयत्न करत असतो. पुढील प्रकरणात प्रत्यक्ष प्रमाण आहे.

जेव्हा परमेश्वराने (कबीर साहेब) सर्व ब्रह्मांडांची रचना केली आणि आपल्या लोकी (सत्लोक) विश्राम करू लागले, त्यानंतर आपण सर्व जण काल च्या ब्रह्मांडामध्ये राहून आपले कर्मदंड भोगू लागलो आणि अत्यंत दु:खी झालो, सुख व शांतीच्या शोधामध्ये भटकू लागलो. आपल्याला आपले निजघर सत्लोकाची आठवण येऊ लागली. तसेच तेथे जाण्यासाठी भक्ती करण्यास आपण सुरवात केली. कोणी चारही वेदांचे पाठांतर केले, तर कोणी उग्र तप

करू लागले, हवन, यज्ञ, ध्यान, समाधी आदी साधना आपण सुरू केल्या; परंतु आपल्या निजघरी-सत्लोकी जाऊ शकलो नाही. कारण या साधना करून आपणाला त्या पुढच्या जन्मात चांगले समृद्ध जीवन प्राप्त झाले. (राजा-महाराजा, मोठा व्यापारी, अधिकारी, देव-महादेव, स्वर्ग, महास्वर्ग आदी) आणि नंतर पुन्हा आपण ८४ लाख योनींमधील कर्मे भोगू लागलो. अत्यंत कष्टामध्ये राहू लागलो आणि परमपिता परमेश्वराची प्रार्थना करू लागलो की 'हे दयाळू परमात्मा! आम्हास निजधामाचा रस्ता दाखवा. आम्ही अंतःकरणापासून आपली भक्ती करत आहोत. आपण आम्हाला दर्शन का देत नाही?'

कबीर साहेब हा वृत्तांत धर्मदास जींना सांगताना म्हणाले की हे धर्मदास, या जीवांची हाक ऐकून मी आपल्या सत्लोकातून सहजदासाचे रूप घेऊन काल लोकामध्ये आलो. तेव्हा २१ ब्रह्मांडामध्ये जेथे काल चे निजघर आहे, तेथे पोहोचलो. तेथे तप्त शिलेवर जीवांना भाजून त्यांच्या सूक्ष्म शरीरातील गंध मळ (घाण) काढला जात होता. मी तेथे पोहोचल्यानंतर त्या जीवात्म्यांचे जळणे समाप्त झाले. मला बघून त्यांनी विचारले, हे पुरुष! आपण कोण आहात? आपल्या निव्वळ दर्शनानेच आम्हाला मोठ्या सुख व शांतीचा आभास होत आहे. मी म्हणालो, ''मी पूर्ण ब्रह्म (पारब्रह्म) परमेश्वर कबीर आहे. आपण सर्व जीव माझ्या लोकातून (सत्लोक) येऊन काल ब्रह्मच्या लोकामध्ये फसलेले आहात. हा काल दररोज एक लक्ष मानवाच्या सूक्ष्म शरीराचा गंध (मळ) काढून खातो आणि नंतर नाना प्रकारच्या योनींमध्ये दंड भोगण्यासाठी सोडतो.'' तेव्हा हे जीवात्मे म्हणू लागले की हे दयाळू परमेश्वर, आम्हाला या काल च्या तुरुंगातून मुक्त करा. मी (कबीर साहेब) सांगितले की ही ब्रह्मांडे काल ने तीन वेळा भक्ती करून माझ्यापासून प्राप्त केलेली आहेत. येथील ज्या सर्व वस्तूंचा तुम्ही वापर करत आहात, त्या सर्व काल च्या (ब्रह्म) आहेत आणि तुम्ही सर्व जण आपल्या इच्छेने येथे फिरण्यासाठी आला आहात.

त्यामुळे आता तुमच्यावर काल ब्रह्मचे फार मोठे ऋण झाले आहे आणि ते ऋण माझ्या खऱ्या नामाचा जप केल्याशिवाय उतरू शकणार नाही. जोपर्यंत या ऋणातून आपण मुक्त होत नाही, तोपर्यंत काल ब्रह्मच्या तुरुंगातून बाहेर जाऊ शकत नाही. यासाठी तुम्हाला माझ्याकडून नामोपदेश घेऊन भक्ती करावी लागेल. त्यानंतरच मी तुम्हाला मुक्त करून सत्लोकी, तुमच्या निजधामी घेऊन जाईन. आमचा हा संवाद चालू होता, तेवढ्यात तेथे काल ब्रह्म प्रगट झाला आणि त्याने अत्यंत क्रोधित होऊन माझ्यावर हल्ला केला. मी माझ्या शब्दशक्तीने त्याला बेशुद्ध केले. काही वेळानंतर तो शुद्धीवर आला आणि माझ्या चरणी पडून क्षमायाचना करू लागला. तो म्हणू लागला की आपण माझ्यापेक्षा मोठे आहात. माझ्यावर दया करा आणि कृपया आपण माझ्या लोकामध्ये का आला आहात, हे सांगा. मी काल पुरुषाला म्हणालो , ''काही जीवात्म्यांची भक्ती करून आपल्या निजधामी-सत्लोकी परत जाण्याची इच्छा आहे. त्यांना सत्भक्तिमार्ग मिळत नाही. त्यामुळे ते भक्ती केल्यानंतरही याच लोकामध्ये (काल लोक) राहतात. मी त्यांना सत्भक्तीचा मार्ग सांगण्यासाठी आणि तू काल आहेस, दररोज तू एक लाख जीवांचा आहार करतोस व सव्वा लाख जीवांची उत्पत्ती करतोस. तसेच तू येथे भगवान बनून बसलेला आहेस, हा तुझा रहस्यभेद करण्यासाठी आलो आहे. मी जीवात्म्यांना सांगेन की तुम्ही ज्याची भक्ती करता तो भगवान नाही, तर काल आहे. ''हे ऐकताच काल पुरुष म्हणाला, ''जर सर्व जीवात्मे परत सत्लोकी गेले तर माझ्या आहाराचे काय होईल? मी भुकेने व्याकूळ होऊन मरून जाईन. माझी आपल्या चरणी प्रार्थना आहे की तीन युगांमध्ये थोडेच जीवात्मे घेऊन जावे आणि मी काल (निरंजन)आहे, सर्वांना खाणारा आहे, हे माझे रहस्य सर्वांना समजू

**देऊ नये. जेव्हा कलयुग येईल, तेव्हा आपणास वाटेल तितक्या जीवात्म्यांना आपण घेऊन जावे.''काल ने माझ्याकडून (कबीर साहेब) हे वचन प्राप्त करून घेतले. कबीर साहेबांनी धर्मदास जींना पुढे सांगितले की सत्युग, त्रेतायुग आणि द्वापरयुगामध्येही मी आलो होतो आणि बऱ्याच जीवांना सत्लोकी घेऊन गेलो; परंतु त्याचे रहस्य सांगितले नाही. आता मी कलियुगामध्ये आलेलो आहे आणि काल बरोबर माझा संवादही झालेला आहे. काल ब्रह्म मला म्हणाला आहे की आता तुम्ही कितीही शक्ती पणाला लावली, तरी आपले म्हणणे कोणीही ऐकणार नाही. प्रथम सांगायचे तर मी जीवांना भक्तीच्या लायकच सोडलेले नाही. बिडी, सिगारेट, मद्यपान, मांसाहार आदी दुर्व्यसने लावून त्यांची वृत्ती बिघडवलेली आहे. नाना प्रकारच्या पाखंड पूजांमध्ये जीवात्म्यांना गुंतवून ठेवलेले आहे. दुसरी गोष्ट अशी की जेव्हा आपण आपले ज्ञान देऊन त्यांना आपल्या सत्लोकी परत जाल, तेव्हा मी माझे दूत पाठवून आपल्या भक्तिपंथास मिळतेजुळते बारा पंथ चालवून जीवात्म्यांना भ्रमिष्ट करून टाकेन. ते सत्लोकीची महिमा गातील, आपले ज्ञान देतील; परंतु नामजप मात्र फक्त माझाच करतील. परिणामस्वरूपी ते माझेच भोजन बनतील. हे ऐकून कबीर साहेब जी म्हणाले, ''तू तुझ्यापरीने प्रयत्न कर. मी सत्मार्ग सांगून परत जाईन आणि जे माझे ज्ञान ऐकतील ते तुझ्या फसव्या जाळ्यात कधीही अडकणार नाहीत.''**

**सद्गुरू कबीर साहेब जी म्हणाले, ''हे निरंजन, जर मी मनात आणले, तर तुझा हा सर्व खेळ क्षणात समाप्त करू शकतो; परंतु असे केल्यास माझ्याकडून वचनभंग होईल, याचा विचार करून मी माझ्या प्रिय हंसात्म्यांना यथार्थ ज्ञान देऊन, 'शब्दा'चे बळ प्रदान करून सत्लोकी घेऊन जाईन.''पुढे त्यांनी सांगितले की :-**

सुनो धर्मराया, हम शंखों हंसा पद परसाया।
जिन लीन्हा हमरा प्रवाना, सो हंसा हम किए अमाना।।

**(पवित्र कबीर सागर पुस्तकामध्ये जीवांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी आणि आपली भूक शमवण्यासाठी नाना तऱ्हेच्या युक्त्यांचे वर्णन केलेले आहे.)**

द्वादस पंथ करूं मैं साजा, नाम तुम्हारा ले करूं अवाजा।
द्वादस यम संसार पठहो, नाम तुम्हारे पंथ चलैहो।।
प्रथम दूत मम प्रगटे जाई, पीछे अंश तुम्हारा आई।।
यही विधि जीवनको भ्रमाऊं, पुरुष नाम जीवन समझाऊं।।
द्वादस पंथ नाम जो लैहे, सो हमरे मुख आन समै है।।
कहा तुम्हारा जीव नहीं माने, हमारी ओर होय बाद बखानै।।
मैं दृढ़ फंदा रची बनाई, जामें जीव रहे उरझाई।।
देवल देव पाषान पूजाई, तीर्थ व्रत जप-तप मन लाई।।
यज्ञ होम अरू नेम अचारा, और अनेक फंद में डारा।।
जो ज्ञानी जाओ संसारा, जीव न मानै कहा तुम्हारा।।

**(सद्गुरू वचन)**

ज्ञानी कहे सुनो अन्याई, काटो फंद जीव ले जाई।।
जेतिक फंद तुम रचे विचारी, सत्य शबद तै सबै बिंडारी।।
जौन जीव हम शब्द दृढावै, फंद तुम्हारा सकल मुकावै।।
चौका कर प्रवाना पाई, पुरुष नाम तिहि देऊं चिन्हाई।।

ताके निकट काल नहीं आवै, संधि देखी ताकहं सिर नावै।।

या विश्लेषणावरून हे सिद्ध होते की सद्यःस्थितीत जे अनेक पंथ अस्तित्वात आहेत, त्यातील ज्यांच्याजवळ सद्गुरू कबीर साहेबजींनी सांगितलेला सत्यभक्तिमार्ग नाही, ते सर्व काल पासून प्रेरित आहेत. त्यामुळे बुद्धिमान व्यक्तिंनी पूर्ण विचाराअंती भक्तिमार्ग स्वीकारावा; कारण मनुष्य जन्म अनमोल आहे. हा जन्म वारंवार प्राप्त होत नाही. कबीर साहेब म्हणतात कीः–

कबीर मानुष जन्म दुर्लभ है, मिले न बारम्बार।
तरूवर से पत्ता टूट गिरे, बहुर न लगता डारि।।

## काल निरंजनाने कबीर जींकडून तीन युगांमध्ये कमी जीव घेऊन जाण्याचे वचन घेतो.

(विस्तृत व संपुर्ण वर्णन)

प्रश्न :– कबीर जींच्या नावाने चालू असलेल्या १२ पंथांचे खरे प्रमुख कोण आहेत? आणि तेरावा पंथ कोण चालविणार?

उत्तर :– कबीर सागराचे संशोधक स्वामी युगलानन्दजींनी (बिहारी) खंत व्यक्त केली आहे की वेळोवेळी कबीर जींच्या ग्रन्थांमध्ये विपरीत बदल करून त्यांची दुर्दशा करुन टाकली आहे.

उदाहरण :– परमेश्वर कबीर जीचा जोगजीतच्या रूपात काल ब्रह्म सोबत विवाद झाला होता. तो सुक्ष्मवेद बोध पृष्ठ ११७ ते १२२ पर्यंत आणि अनुराग सागर ६० ते ६७ पर्यंत आहे.

परमेश्वर कबीर जी आपल्या पुत्राच्या जोगजीतच्या रूपात कालाच्या प्रथम ब्रह्माण्डात प्रकट झाले. ते एकविसावे ब्रह्माण्ड आहे. तिथे तप्त शिळा बनली आहे. काल ब्रह्मने जोगजीतशी भांडण केले. मग पश्चात्ताप होऊन लोटांगण घालून क्षमा याचना केली आणि प्रतिज्ञा करवून काही सवलती मागितल्या.

१. तिन्ही युगात (सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग) थोड़े जीव भवसागराच्या पार करणे.

२. जोर–जबरदस्ती करून जीव माझ्या लोकातून नेणार नाही.

३. तुम्ही तुमचे ज्ञान समजवा. जो तुमचे ज्ञान मान्य करील, तो तुमचा आणि जो माझे ज्ञान मान्य करेल, तो माझा.

४. कलयुगात आधी माझा दूत प्रकट होईल नंतर तुमचा दूत जाईल.

५. त्रेतायुगात समुद्रावर सेतू बांधावा. त्यावेळी माझा पुत्र विष्णु रामचंद्राच्या रूपात लंकेचा राजा रावण याच्याशी युद्ध करेल. समुद्र रस्ता देणार नाहीं.

६. द्वापर युगात बौद्ध शरीर त्याग करून जाईन. राजा इन्द्रदमन माझ्या नावाने (जगन्नाथ नावाने) समुद्र कीनारी माझ्या आज्ञेने मंदिर बनवेल. त्यात समुद्र बाधा आणेल. आपण ते मंदिर सुरक्षित ठेवा. परमात्माने सर्व मागण्या मान्य केल्या आणि वचनबद्ध झाले. तेव्हा काल ब्रह्म हसला आणि त्याने म्हटले की हे जोगजीत! आपण जगतात जावे. ज्या वेळेस कलयुग येईल, त्या वेळेस मी आपल्या १२ दूतांना (नकली सतगुरु) संसारात पाठवीन. जेव्हा कलयुगाची ५५०५ वर्ष पूर्ण होतील,तोपर्यंत माझे दूत तुमच्या नावावर(कबीर जींच्या नावावर) १२ कबीर पंथ चालवतील. कबीर जींनी जोगजीत रूपात काल ब्रह्मला म्हटले होते की कलयुगात माझे नाव कबीर होईल आणि मी कबीर नावाने पंथ चालविन त्यामुळे काल ज्योति

निरंजनाने म्हटले होते की तुम्ही कबीर नावाने एक पंथ चालवल्यास मी (काल) कबीराच्या नावाने १२ पंथ चालवीन. सर्व मानवजातीला भ्रमित करून आपल्या जाळ्यात अडकवून ठेवीन. त्या व्यतिरिक्त सतलोक, सच्चखण्ड यांच्या गोष्टी करणारे अनेक पंथ चालविन आणि सत्य साधना त्यांच्या जवळ असणार नाही. त्यामुळे ते सत्यलोकीच्या आशेने चुकीच्या नावांचे जप करतील आणि माझ्याच जाळ्यात अडकून राहतील.

काल ब्रह्मने विचारले होते की आपण कोणत्या वर्षी कलयुगात आपला सत्य कबीर पंथ चालविणार आहात? कबीर जींनी म्हटले होते की ज्या वेळेस कलयुगाची ५५०५ (पाच हजार पाचशे पाच) वर्ष पूर्ण होतील, तेव्हा मी आपला तेरावा यथार्थ कबीर पंथ चालविन.

कालाने म्हटले की त्या वेळेच्या आधीच मी संपूर्ण पृथ्वीवर शास्त्रविधिचा त्याग करून मनाला वाटेल तसे आचरण करवून शास्त्राविरूद्ध ज्ञान सांगून खोट्या नामस्मरण आणि चुकीच्या साधनेचा अभ्यास होत राहील याची काळजी घेईन. जेव्हा तुमचा तेरावा अवतार येऊन सत्य कबीर पंथ चालवेल, त्या वेळेस त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. उलट त्यांच्याशी भांडण करतील. कबीर जींना माहित होते की जेंव्हा कलयुगाची ५५०५ वर्ष पूर्ण होतील, तेव्हा (सन् १९९७ मध्ये) शिक्षणात क्रांति केली जाईल. मानव अक्षर ज्ञानयुक्त करण्यात येईल. त्यावेळी माझा सेवक सर्व धार्मिक ग्रन्थ नीट समजून घेऊन मानव समाजाला प्रमाणासहीत समजावून सांगेल समाजाशी चर्चा करेल. सर्व प्रमाणे डोळ्याने बघून शिक्षित झालेला मानव सत्याची ओळख होऊन त्वरित माझ्या तेराव्या पंथाची दीक्षा घेईल आणि संपूर्ण विश्वात माझ्याकडून सांगितलेले भक्ति विधि आणि तत्त्वज्ञानाचा हृदयापासून स्वीकार करून भक्ति करतील. त्यावेळी पुनःसत्ययुगाससारखे वातावरण होईल. आपसातील रागद्वेष, चोरी-चापटी लूट-मार कोणी करणार नाही. कोणीहि धन साठवून ठेवणार नाहीत. भक्तिला अधिक महत्त्व दिले जाईल. ज्या प्रमाणे त्या वेळेस ज्या माणसाकडे अधिक धन असेल, मोठा व्यवसाय असेल, मोठमोठ्या हवेल्या बांधणाऱ्या लोकांना मोठे समजण्याची पद्धत होती. त्याऐवजी १३व्या पंथाचा प्रारंभ झाल्यानंतर त्यांना मुर्ख मानले जाईल. जे भक्ति करतील साधे घर बांधून राहतील त्यांना मोठे व महान सन्माननीय व्यक्ति समजले जाईल.

## ''प्रमाण म्हणून पवित्र कबीर सागर मधील वेगवेगळ्या अध्यायांमधील अमृत वचने''

### ''कबीर जी आणि ज्योति निरंजन यांची चर्चा''

**अनुराग सागरच्या पृष्ठ ६२ वरून :-**

**''धर्मराय (ज्योति निरंजन) वचन''**

धर्मराय अस विनती ठानी। मैं सेवक द्वितीया न जानी।।१
ज्ञानी बिनती एक हमारा। सो न करहू जिह से हो मोर बिगारा।।२
पुरूष दीन्ह जस मोकहं राजु। तुम भी देहहु तो होवे मम काजु।।३
अब मैं वचन तुम्हरो मानी। लीजो हंसा हम सो ज्ञानी।।४

**पृष्ठ ६३ ची अनुराग सागरातील वचने :-**

दयावन्त तुम साहेब दाता। ऐतिक कृपा करो हो ताता।।५
पुरूष शाप मोकहं दीन्हा। लख जीव नित ग्रासन कीन्हा।।६

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागर मधील वचने :-**

जो जीव सकल लोक तव आवै। कैसे क्षुधा मोर मिटावै।।७
जैसे पुरूष कृपा मोपे कीन्हा। भौसागर का राज मोहे दीन्हा।।८
तुम भी कृपा मोपर करहु। जो माँगे सो मोहे देहो बरहु।।९
सतयुग, त्रोता, द्वापर मांहीं। तीनों युग जीव थोड़े जाहीं।।१०
चौथा युग जब कलयुग आवै। तब तव शण जीव बहु जावै।।११

**पृष्ठ ६५ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचन पंक्ति नं ३ से :-**

प्रथम दूत मम प्रकटै जाई। पीछे अंश तुम्हारा आई।।१२

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचने पंक्ति नं ६ :-**

ऐसा वचन हरि मोहे दीजै। तब संसार गवन तव कीजै।।

**''जोगजीत वचन=ज्ञानी बचन''**

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचने पंक्ति नं ७ :-**

अरे काल तुम परपंच पसारा। तीनों युग जीवन दुख डारा।।१४
बीनती तोरी लीन्ह मैं जानि। मोकहं ठगा काल अभिमानी।।१५
जस बीनती तू मोसन कीन्ही। सो अब बख्स तोहे दीन्ही।।१६
चौथा युग जब कलयुग आवै। तब हम अपना अंश पठावैं।।१७

**''धर्मराय (काल) वचन''**

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागर मधील वचन, वरील वचन पंक्ति नं १७ :-**

हे साहिब तुम पंथ चलाऊ। जीव उबार लोक लै जाऊ।।१८

**पृष्ठ ६६ वरील अनुराग सागराची वाणी, वरील वचन पंक्ति नं ८, ९, १६ ते २१ :-**

सन्धि छाप (सार शब्द) मोहे दिजे ज्ञानी। जैसे देवोंगे हंस सहदानी।।१९
जो जन मोकूं संधि (सार शब्द) बतावै। ताके निकट काल नहीं आवै।।२०
कहै धर्मराय जाओ संसारा। आनहु जीव नाम आधारा।।२१
जो हंसा तुम्हरे गुण गावै। ताहि निकट हम नहीं जावैं।।२२
जो कोई लेहै शरण तुम्हारी। मम सिर पग दै होवै पारी।।२३
हम तो तुम संग कीन्ह ढ़िठाई। तात जान किन्ही लडकाइ।।२४
कोटिन अवगुन बालक करही। पिता एक चित नहीं धरही।।२५
जो पिता बालक कूं देहै निकारी। तब को रक्षा करै हमारी।।२६
सारनाम देखो जेहि साथा। ताहि हंस मैं नीवाऊँ माथा।।२७

**''ज्ञानी (कबीर) वचन''**

**अनुराग सागर पृष्ठ ६६ :-**

जो तोहि देहुं संधि बताई। तो तूं जीवन को हइहो दुखदाई।।२८
तुम परपंच जान हम पावा। काल चलै नहीं तुम्हरा दावा।।२९
धर्मराय तोहि प्रकट भाखा। गुप्त अंक बीरा हम राखा।।३०
जो कोई लेई नाम हमारा। ताहि छोड़ तुम हो जाना नियारा।।३१
जो तुम मोर हंस को रोको भाई। तो तुम काल रहन नहीं पाई।।३२

**''धर्मराय (काल निरंजन) बचन''**

**पृष्ठ ६२ आणि ६३ मधील अनुराग सागरतील वचने :-**

बेसक जाओ ज्ञानी संसारा। जीव न मानै कहा तुम्हारा।।३३
कहा तुम्हारा जीव ना मानै। हमरी और होय बाद बखानै।।३४
दृढ़ फंदा मैं रचा बनाई। जामें सकल जीव उरझाई।।३५
वेद-शास्त्र समर्ति गुणगाना। पुत्र मेरे तीन प्रधाना।।३६
तीनहू बहु बाजी रचि राखा। हमरी महिमा ज्ञान मुख भाखा।।३७
देवल देव पाषाण पुजाई। तीर्थ व्रत जप तप मन लाई।।३८
पूजा विश्व देव अराधी। यह मति जीवों को राखा बाँधि।।३९
जग (यज्ञ) होम और नेम आचारा। और अनेक फंद मैं डारा।।४०

**''ज्ञानी (कबीर) वचन''**

हमने कहा सुनो अन्याई। काटों फंद जीव ले जांई।।४१
जेते फंद तुम रचे विचारी। सत्य शब्द ते सबै विडारी।।४२
जौन जीव हम शब्द दृढ़ावैं। फंद तुम्हारा सकल मुक्तावैं।।४३
जबही जीव चिन्ही ज्ञान हमारा। तजही भ्रम सब तोर पसारा।।४४
सत्यनाम जीवन समझावैं। हंस उभार लोक लै जावै।।४५
पुरूष सुमिरन सार बीरा, नाम अविचल जनावहूँ।
शीश तुम्हारे पाँव देके, हंस लोक पठावहूँ।।४६
ताके निकट काल नहीं आवै। संधि देख ताको सिर नावै।।४८
(संधि = सत्यनाम+सारनाम)

**''धर्मराय (काल) वचन''**

पंथ एक तुम आप चलऊ। जीवन को सतलोक लै जाऊ।।४९
द्वादश पंथ करूँ मैं साजा। नाम तुम्हारा ले करों आवाजा।।५०
द्वादश यम संसार पठाऊँ। नाम कबीर ले पंथ चलाऊँ।।५१
प्रथम दूत मेरे प्रगटै जाई। पीछे अंश तुम्हारा आई।।५२
यहि विधि जीवन को भ्रमाऊँ। आपन नाम पुरूष का बताऊँ।।५३
द्वादश पंथ नाम जो लैहि। हमरे मुख में आन समैहि।।५४

**शब्दार्थ :- वाणी क्रं १ ते ५४ चा शब्दार्थ वरती दिला आहे.**

**ज्ञानी (कबीर) वचन चैपाई**

**अध्याय ''स्वसमवेद बोध'' पृष्ठ १२१ :-**

अरे काल परपंच पसारा। तीनों युग जीवन दुख आधारा।।५५
बीनती तोरी लीन मैं मानी। मोकहं ठगे काल अभिमानी।।५६
चौथा युग जब कलयुग आई। तब हम अपना अंश पठाई।।५७
काल फंद छूटै नर लोई। सकल सृष्टि परवानिक (दीक्षित) होई।।५८
घर-घर देखो बोध (ज्ञान) बिचारा (चर्चा)। सत्यनाम सब ठोर उचारा।।५९
पाँच हजार पाँच सौ पाँचा। तब यह वचन होयगा साचा।।६०
कलयुग बीत जाए जब ऐता। सब जीव परम पुरूष पद चेता।।६१

**भावार्थ :- (वाणी सँख्या ५५ से ६१ तक) परमेश्वर कबीर जींनी म्हटले की हे काल!**

तू विशाल प्रपंच रचला आहेस. तिन्ही युगात (सतयुग, त्रोता, द्वापर) तू जीवाना अपार यातना देशील. जसे तू म्हणत होतास. तू मला केलेली विनंती मान्य केली. तू मला फसवले आहेस. परतुं जेव्हा चौथे युग म्हणजेच कलयुग येईल, तेव्हा मी माझा अंश म्हणजे कृपा पात्र आत्मा धाडीन. हे काल! तुझ्या नावाने तयार झालेले सर्व फंद म्हणजे अज्ञानाधारीत चुकीचे ज्ञान व साधनेला सत्य शब्द आणि सत्य ज्ञानाने समाप्त करेल. त्या वेळेस सारे विश्व प्रवानिक म्हणजेच त्या माझ्या संताकडून दीक्षा घेईल. त्या वेळ पर्यंत म्हणजे जोपर्यंत कलयुग पाच हजार पाचशे पाच पूर्ण होत नाही, तोवर सत्यनाम, मूलनाम (सार शब्द) आणि मूल ज्ञान (तत्त्वज्ञान) प्रकट करायचे नाहीं. परंतु कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष पूर्ण झाल्यावर घराघरात माझ्या अध्यात्मिक ज्ञानाची चर्चाच होत राहील आणि सत्यनाम, सार शब्द सर्व अनुग्रहीतांना देण्यात येतील. हे जे मी सांगतो आहे, ते माझे शब्द कलयुगाची ५५०५ (पाच हजार पाचशे पाच वर्ष) पूर्ण झाल्यावर सिद्ध होतील. जेव्हा कलयुगाची इतकी वर्ष पूर्ण होतील, तेव्हा सर्व मानव प्राणी परम पुरुष म्हणजेच सत्य पुरूषाच्या पदाला म्हणजेच त्या परम पदा विषयी जाणकार होतील. याविषयी गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्त्वदर्शी संत प्राप्त झाल्यानंतर साधक फिरून मृत्युलोकात परत जाणार नाही. ज्या परमात्माने संसार रूपी वृक्षाचा विस्तार केला आहे म्हणजेच ज्या परमात्माने सृष्टिची रचना केली आहे, त्याच परमात्माची भक्ति करा.

उपरोक्त वचनाचा भावार्थ आहे असा की त्यावेळेस त्या परमात्माच्या पदाविषयी (सत्यलोक) सर्वांना पूर्ण ज्ञान होईल

**स्वसमवेद बोध पृष्ठ १७० :-**

**अथ स्वसम वेद स्फुटवार्ता–चैपाई**

एक लाख और असि हजारा। पीर पैगंबर और अवतारा।।६२
सो सब आही निरंजन वंशा। तन धरी–धरी करैं निज पिता प्रशंसा।।६३
दश अवतार निरंजन के रे। राम कृष्ण सब आहीं बडेरे।।६४
इनसे बड़ा ज्योति निरंजन सोई। यामें फेर बदल नहीं कोई।।६५

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जी सांगतात की बाबा आदम पासून हजरत मुहम्मदा पर्यंत एक लाख ऐंशी हजार (१८००००) पैगंबर आणि दहा अवतार हिंदू मानत आहेत, हे सर्व कालाने पाठविले आहेत. या दहा अवतारात राम आणि कृष्ण प्रमुख आहेत. हे सगळे कालाचा महिमा सांगून सर्व जीवंना भ्रमित करून कालाची साधना दृढ़ केले गले. ज्योति निरंजन काल (ब्रह्म) या सगळ्यांचा काळाची आहे.**

**स्वसमवेद बोध पृष्ठ १७१(१५१५) :-**

**सत्य कबीर वचन**

**दोहे:-** पाँच हजार अरू पाँच सौ पाँच जब कलयुग बीत जाय।
महापुरूष फरमान तब, जग तारन कूं आय।।६६
हिन्दु तुर्क आदि सबै, जेते जीव जहान।
सत्य नाम की साख गही, पावैं पद निर्वान।।६७
यथा सरितगण आप ही, मिलैं सिन्धु मैं धाय।
सत्य सुकृत के मध्य तिमि, सब ही पंथ समाय।।६८
जब लग पूर्ण होय नहीं, ठीक का तिथि बार।
कपट–चातुरी तबहि लौं, स्वसम बेद निरधार।।६९

सबही नारी–नर शुद्ध तब, जब ठीक का दिन आवंत।
कपट चातुरी छोड़ि के, शरण कबीर गहंत।।७०
एक अनेक ह्वै गए, पुनः अनेक हों एक।
हंस चलै सतलोक सब, सत्यनाम की टेक।।७१
घर घर बोध विचार हो, दुर्मति दूर बहाय।
कलयुग में सब एक होई, बरतें सहज सुभाय।।७२
कहाँ उग्र कहाँ शुद्र हो, हरै सबकी भव पीर(पीड़)।।७३
सो समान समदृष्टि है, समर्थ सत्य कबीर।।७४

**भावार्थ :– परमेश्वर कबीर जी सांगतात की हे धर्मदास! मी ज्योति निरंजन म्हणजेच काल ब्रह्मला देखिल म्हटले होते आता तुम्हाला सुध्दा सांगतो आहे.**

**सुक्ष्मवेद बोधाच्या वचन क्रमांक ६६ से ७४ चा सरलार्थ :– ज्या वेळेस कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष संपतील, तेव्हा एक महापुरूष विश्वाला पैलतीरी नेण्यासाठी येईल. हिन्दु, मुसलमान इत्यादी जितके पंथ तोपर्यंत असतील, आणि जेव्हढे जीव जगामध्ये असतील ते सर्व मानव शरीर प्राप्त करून त्या महापुरूषाकडून सत्यनाम घेऊन सत्यनामाच्या शक्तिने मोक्ष प्राप्त करतील. तो महापुरूष जो सत्य कबीर पंथ चालवेल, त्या तेराव्या पंथात सर्व पंथ स्वतःहून अशा तीव्र गतिने सामावून जातील, जणू निरनिराळ्या नद्या आपोआप अनिर्बंध वाहत समुद्राला येऊन मिळाव्यात. त्यांना कोणीही थांबवू शकत नाही. असे त्या तेराव्या पंथात सगळे पंथ सत्वर विलीन होऊन एक पंथ तयार होईल. परंतु जोपर्यंत योग्य वेळ येत नाही, तोवर म्हणजेच कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मी जो हा ज्ञान सुक्ष्मवेद सांगतो आहे, आणि आपण लिहित आहात, तो निराधार वाटेल.**

**ज्या वेळेस ती ठरलेली योग्य वेळ येईल, त्या वेळेस स्त्री–पुरूष उच्च विचार आणि शुद्ध आचरण करून कपट, फुकटच्या हुशारीचा त्याग करून मला (कबीर जींना) शरण येतील. परमात्माकडून लाभ घेण्यासाठी एका मानव धर्मापासून अनेक पंथ(धार्मिक समुदाय) बनले आहेत. ते सर्व पुनः एकत्रित होतील. सगळे हंस (निर्विकार भक्त) आत्मे सत्य नामाच्या शक्तिने सतलोकी जातील. माझ्या अध्यात्म ज्ञानाची चर्चा घरोघरी होईल. त्यामुळे सगळ्यांची दुर्बुद्धी संपून जाईल. कलयुगात पुन्हा एक होऊन सहज वर्तणूक करतील म्हणजेच शांततापूर्वक जीवन जगतील. तिथे अतिरेकी म्हणजेच मग तो दरोडेखोर, लुटारू, कसाई असो किंवा शुद्र,किंवा अन्य हीन गोष्टी करणारा नीच असला तरी समजला जाईल. परमात्मा सत्य भक्ति करणाऱ्याचे भवसागर म्हणजेच प्रापंचिक कष्ट हरण म्हणजेच दूर करेल. सत्य साधनेने सर्वांचे भवसागर म्हणजेच प्रापंचिक कष्ट संपतील आणि त्या १३ व्या (तेराव्या) पंथाचा प्रवर्तक सर्वांना समान दृष्टिने पाहिल म्हणजेच लहान मोठा असा भेदभाव करणार नाहीं. तो समर्थ सत्य कबीरच असेल. माझे संत मलाच समज, माझेच स्वरुप समज. (मम् संत मुझे जान मेरा ही स्वरूपम्)**

**प्रश्न :– तो तेरावा पंथ कोणता आहे, त्याचा प्रवर्तक कोण आहे?**

**उत्तर :– तो तेरावा पंथ यथार्थ सत कबीर पंथ आहे. त्याचे प्रवर्तक स्वतःपरमेश्वर कबीर जी आहेत. वर्तमानात त्याचा संचालक त्यांचा सेवक स्वामी रामदेवानंद जी महाराजांचा पुत्र रामपाल दास आहे. (अध्यात्मिक दृष्टिने गुरूजींना पिता म्हटले जाते. कारण ते आत्म्याचे पोषण करत असतात.)**

**प्रमाण :– तसे तर संत धर्मदास जींच्या वंश परंपरेतील महंतांशी संबंधित श्रद्धाळूंनी**

अज्ञानामुळे तेरावा पंथ आणि संचालक धर्मदास जींच्या परिवारातील धारकांना सिद्ध करण्याची कुचेष्टा केली आहे. परंतु हत्तीचे वस्त्र रेड्यावर टाकून कोणी म्हटले की बघा हे रेड्याचे वस्त्र आहे. बुद्धिमान असलेल्यांना त्वरित समजते की हे रेड्याचे वस्त्र नाही आहे. हे तर रेड्यापेक्षाही विशाल अशा प्राण्याचे आहे. भले ही ते हे सांगू शकणार नाहीत की हे हत्तीचे आहेत.

उदाहरण :– पवित्र कबीर सागराच्या ''कबीर चरित्र बोध'' अध्यायाच्या पृष्ठ १८३४–१८३५ वर लिहिले आहे.

## तेरा गाड्या भरून कागद लिहिणे

एकदा दिल्लीच्या एका बादशाहाने म्हटले की कबीर जी १३ (तेरा) गाड्या भरून लिहिलेले कागद अडीच दिवसात म्हणजेच ६० तासात पाठवले, तर ते परमात्मा आहेत असे मी मान्य करेन. परमेश्वर कबीर जींनी आपली काठी त्या १३ (तेरा) गाड्या भरून असलेल्या कागदावरून फिरवली. त्याच वेळेस सर्व कागदांवर अमृतवाणी संपुर्ण अध्यात्मिक ज्ञान लिहिले गेले. राजाचा तर विश्वास बसला, परंतु आपल्या धर्मातील (मुसलमान) लोकांच्या दबावाखाली त्यांनी सर्व ग्रंथ दिल्लीमध्ये जमीनीत पुरून टाकले. कबीर सागरच्या कबीर चरित्र बोध अध्याय ग्रंथात पृष्ठ १८३४–१८३५ वर चुकीचे लिहिले आहे की जेव्हा मुक्तामणि साहेबाची वेळ होईल, आणि त्यांचा झेंडा दिल्ली नगरीवर फडकेल, तेव्हा ती सगळी पुस्तकें जमिनीतून काढली जातील. त्यामुळे मुक्तामणि अवतार (धर्मदासांच्या) वंशाचा तेराव्या पीढ़ीमधील होईल.

विवेचन :– वरील लेखात भेसळ अशा प्रकारे केली आहे की वर्तमानात धर्मदास जींच्या वंशाची गादी दामाखेड़ा जिल्हा–रायगढ़ प्रान्त–छत्तीसगढ़ येथे आहे. त्या गादीवर १४वें (चौदावे) वंश गुरू श्री प्रकाशमुनि साहेब विराजमान आहेत. तेरावें वंश गुरू श्री गृन्धमुनि नाम साहेब होते, ज्यांनी चालू सन् २०१३ च्या आधी १५ वर्ष १९९८ मध्ये शरीर त्यागले होते. जर गादीच्या तेराव्या वंश गुरूच्या बाबतीत लिहिले असते, तर त्यांनी काढून घेऊन आपला झेंडा दिल्लीत फडकाविला असता. असे झाले नाही, त्यामुळे तो तेरावा पंथ धर्मदास जींच्या वंश परंपरेत नाहीं.

नंतर ''कबीर चरित्रा बोधच्या'' पृष्ठ १८७० वर कबीर सागर मध्ये १२ (बारह) पंथांची नावे लिहिली आहेत. जे कालाने (ज्योति निरंजन) कबीर जींच्या नावाने नकली पंथ चालविण्याबाबत म्हटले होते. त्यामध्ये सर्व प्रथम नारायण दास लिहिले आहे. बारावा पंथ गरीब दास यांचा लिहिला आहे. वास्तवात प्रथम चुड़ामणि जी आहेत. जाणून–बूजून काट–छाट केली आहे.

त्यांना आठवत असेल की परमेश्वर कबीर जींनी नारायण दास जींना तर शिष्य कधी केलेच नव्हते. नारायण दास तर श्री कृष्णजीचे पुजारी होते. त्यांनी तर आपल्या छोटया भावाला चुड़ामणिजींना प्रखर विरोध केला होता. त्यामुळे श्री चुड़ामणि जी कुदुर्मालला निघून गेले होते. नंतर बाँधवगढ़ नगर नष्ट झाले होते. कबीर चरित्र बोध मध्ये पृष्ठ १८७० वर बारा पंथांच्या प्रवर्तकांची नावे लिहिली आहेत. त्यामध्ये पहिले नाव चुकीचे लिहिले आहे. बाकीची बरोबर आहेत. ती खालीलप्रमाणे लिहिली आहेत :–

१. नारायण दासजीचा पंथ २. यागौ दास (जागु दास) जीचा पंथ ३. सूरतगोपाल पंथ ४. मूल निरंजन पंथ ५. टकसारी पंथ ६. भगवान दासजीचा पंथ ७. सतनामी पंथ ८. कमालीये (कमालजीचा) पंथ ९. राम कबीर पंथ १०. प्रेम धाम (परम धाम) वाणी पंथ ११.

**जीवा दास पंथ १२. गरीबदास पंथ.**

**मग ''कबीर बानी'' अध्यायाच्या पृष्ठ १३४ वर कबीर सागर मध्ये लिहिले आहे :-**

**''वंश प्रकार''**

प्रथम वंश उत्तम **(हा चुड़ामणि जी विषयी सांगतो.)**

दूसरा वंश अहंकारी **(यागौ यानि जागु दासजीचा आहे)**

तीसरा वंश प्रचंड **(हा सूरत गोपालजीचा आहे.)**

चौथा वंश बीरहे **(हा मूल निरंजन पंथ आहे.)**

पाचवें वंश निन्द्रा **(हा टकसारी पंथ आहे.)**

सहावा वंश उदास **(हा भगवान दास जी चा पंथ आहे.)**

सातवा वंश ज्ञान चतुराई **(हा सतनामी पंथ आहे.)**

आठवा वंश द्वादश पंथ विरोध **(हा कमालजीचा कमालीय पंथ आहे.)**

नौवें वंश पंथ पूजा **(हा राम कबीर पंथ आहे.)**

दहावा वंश प्रकाश **(हा परम धाम वाणी पंथ आहे.)**

अकरावा वंश प्रकट पसारा **(हा जीवा पंथ आहे.)**

बारहवें वंश प्रकट होय उजियारा **(हा संत गरीबदास जी गाँव-छुड़ानी जिला-झज्जर, प्रान्त-हरियाणा येथील पंथ आहे. यांनी परमेश्वर कबीरजीशी भेट झाल्यानंतर त्यांचा महिमा आणि यथार्थ ज्ञान सांगितले व त्यामुळे परमेश्वर कबीर जींच्या कार्यावर काही प्रकाश पडला.)**

तेरहवें वंश मिटे सकल अंधियारा **{हा यथार्थ कबीर पंथ आहे व सन् १९९४ पासून प्रारंभ झाला आहे व तो माझ्याकडून (रामपाल दास) संचालित आहे.}**

**दामाखेड़यातील धर्मदास जींच्या वंशातील गादीवाल्यांनी वास्तवातील भेद लपवण्याचा प्रयत्न केला तर आहे, पण खऱ्याला कोणी आतापर्यंत कोणी लपवू शकलेला नाही.**

**कबीर सागरच्या ''कबीर वाणी'' अध्यायात पृष्ठ १३६ वर :-**

**द्वादश पंथ चलो सो भेद**

द्वादश पंथ काल फुरमाना। भूले जीव न जाय ठिकाना।।
तातें आगम कह हम राखा। वंश हमारा चुड़ामणि शाखा।।
प्रथम जग में जागु भ्रमावै। बिना भेद वह ग्रन्थ चुरावै।।
दूसर सुरति गोपाल होई। अक्षर जो जोग दृढ़ावै सोई।।

**(विवेचन :- इथे प्रथम जागु दास सांगितले आहे, परंतु वचनावरून स्पष्ट होते आहे की चुड़ामणि प्रथम वंश आहे. दूसरा जागु दास. हेच प्रमाण ''कबीर चरित्र बोध'' पृष्ठ १८७० मध्ये आहे. दूसरा जागु दास आहे. ''स्वसमवेद बोध'' अध्यायाच्या पृष्ठ १५५ (१४९९) वर देखिल दूसरा जागु असे लिहिले आहे. इथे प्रथम लिहिले आहे. इथे प्रथम चुड़ामणि लिहिणे योग्य आहे.)**

तीसरा मूल निरंजन बानी। लोक वेद की निर्णय ठानी।।

**(हा चौथा लिहिला पाहिजे.)**

चौथे पंथ टकसार (टकसारी) भेद लौ आवै। नीर पवन को संधि बतावै।।

**(हा पाचवां लिहिला पाहिजे.)**

पाँचवां पंथ बीज को लेखा। लोक प्रलोक कहै हम में देखा।।

**(हा भगवान दासचा पंथ आहे तो सहावा लिहिला पाहिजे.)**

छटा पंथ सत्यनामी प्रकाशा। घट के माहीं मार्ग निवासा।।

**(हा सातवा पंथ लिहिला पाहिजे.)**

सातवां जीव पंथ ले बोलै बानी। भयो प्रतीत मर्म नहीं जानी।।

**(हा आठवां कमाल जी चा पंथ आहे.)**

आठवां राम कबीर कहावै। सतगुरू भ्रम लै जीव दृढ़ावै।।

**(प्रत्यक्षात हा नववा पंथ आहे.)**

नौमें ज्ञान की कला दिखावै। भई प्रतीत जीव सुख पावै।।

**(प्रत्यक्षात हा अकरावा जीवा पंथ आहे. इथे नौमा हे चुकेचे लिहिले आहे.)**

दसवें भेद परम धाम की बानी। साख हमारी निर्णय ठानी।।

**(इथे बरोबर लिहिले आहे, परंतु अकरावा नाहीं लिहिले जरी प्रथम चुड़ामणिजींना आहे असे समजले म्हणजे क्रम बरोबर लागतो. प्रत्यक्षात प्रथम चुड़ामणिजीआहेत. त्यानंतर बारावे पंथ गरीबदास जींच्या पंथाच्या वर्णनास प्रारंभ होतो. हे सांकेतिक आहे. संत गरीबदासजीचा जन्म वि. संवत् १७७४ (सतराशे चौऱ्याहत्तर) मध्ये झाला होता. इथे चुकून सतराशे पंचाहत्तर लिहिली आहे. (ही छापण्यातील चूक आहे.)**

संवत् सतरह सौ पचहत्तर (१७७५) होई। ता दिन प्रेम प्रकटें जग सोई।।
आज्ञा रहै ब्रह्म बोध लावै। कोली चमार सबके घर खावै।।
साखि हमारी ले जीव समझावै। असंख्य जन्म ठौर नहीं पावै।।
बारहवें (बारवै) पंथ प्रगट होवै बानी। शब्द हमारै की निर्णय ठानी।।
अस्थिर घर का मर्म नहीं पावै। ये बार (बारह) पंथ हमी (कबीर जी) को ध्यावैं।।
बारहें पंथ हमहि (कबीर जी ही) चलि आवैं। सब पंथ मिटा एक ही पंथ चलावैं।।
प्रथम चरण कलजुग निरयाना (निर्वाण)। तब मगहर मांडो मैदाना।।

**भावार्थ :- इथे बारावां पंथ संत गरीबदासजीचा हे स्पष्ट आहे कारण संत गरीबदास जींना परमेश्वर कबीर जी भेटले होते. आणि त्यांना संपूर्ण ज्ञान योग कबीर जींनी उघड करून दाखविला होता. तेव्हा संत गरीबदास जींनी परमेश्वर कबीर जींच्या महिम्याची वाणी सांगितली, व ती ग्रंथ रूपात वर्तमानात छापली आहे. विचार करायचा आहे. संत गरीबदास जींच्या पंथापर्यंत १२ (बारा) पंथ होऊन गेले आहेत. असेही लिहिले आहे की भले संत गरीबदास जींनी माझ्या महिम्याची साखी-शब्द-चैपाई लिहिलेले असोत, परंतु ते बाराव्या पंथाचे अनुयायी आपापल्या बुद्धिनुसार वचनांचा अर्थ लावतील, परंतु व्यवस्थित न समजल्यामुळे संत गरीबदास जी पर्यंतच्या पंथाचे अनुयाई म्हणजेच हे बारा पंथ माझी वचने व्यवस्थित समजू शकणार नाहीत. त्यामुळे असंख्य जन्मांपर्यंत सतलोकातील अमर धाम स्थान प्राप्त करू शकणार नाहीत. हे बाराही पंथ कबीर जींच्या नावने पंथ चालवतील आणि माझ्या नावाने प्रसिद्धी प्राप्त करतील, परंतु हे बाराच्या बारा पंथांचे अनुयाई अस्थिर म्हणजे स्थाई स्थान (सत्यलोक) प्राप्त करू शकणार नाहीं. पुढे म्हणतात की पुढे बाराव्या पंथात (संत गरीबदासजीचा पंथ) आम्ही म्हणजे स्वतः कबीर जीच येतील, तेव्हा सर्व पंथ विसर्जित करून एक पंथ**

**चालवतील. कलयुगाचा तो प्रथम चरण होईल, ज्या वेळेस मी (कबीर जी) संवत् १५७५ (ई. सन् १५१८) मगहर नगर (उत्तर प्रदेश) मधून निर्वाण प्राप्त करीन म्हणजेच काही लीला करून सतलोकी जाईन.**

**परमेश्वर कबीर जींनी कलयुग तीन चरणात विभागले आहे. ज्यात परमेश्वर लीला करून गेले आहेत, तो प्रथम चरण आहे. जेव्हा कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष होतील, तेव्हा मधला कालावधी सुरु होतो. अंतिम चरणात सगळे कृतघ्न होतील, कोणी भक्ति करणार नाहीं.**

**माझा म्हणजेच दास (रामपाल दास) उगम संत गरीबदासांच्या बाराव्या पंथातून झाला आहे. तो तेरावा पंथ आता सुरु आहे. परमेश्वर कबीर जींनी चालवून घेतला आहे. गुरू महाराज स्वामी रामदेवानंदजीचा आशीर्वाद आहे. तो सफल होईल आणि पूर्ण विश्व परमेश्वर कबीर जींची भक्ति करेल.**

**संत गरीबदास जींना परमेश्वर कबीर जी सतगुरुरूपात भेटले होते. परमात्मा तर कबीर आहेतच. ते आपले ज्ञान सांगण्यास स्वतः पृथ्वीवर आणि अन्य लोकात प्रकट होत आहेत. संत गरीबदास जींनी असुर निकंदन रमैणी मध्ये म्हटले आहे की** ''सतगुरू दिल्ली मंडल आयसी। सूती धरती सूम जगायसी। दिल्ली के तख्त छत्रा फेर भी फिराय सी चौंसठ योगनि मंगल गायसी।'' **संत गरीबदासजीचे सतगुरु ''परमेश्वर कबीर बन्दी छोड़ जी'' होते.**

**परमेश्वर कबीरजींनी कबीर सागरच्या ''कबीर वाणी'' अध्यायात पृष्ठ १३६ आणि १३७ पर म्हटले आहे की बारावा (१२वां) पंथ संत गरीबदास जी कडून चालविला जाईल.**

संवत् सतरह सौ पचहत्तर (१७७५) होई। जा दिन प्रेम प्रकटै जग सोई।।
साखि हमारी ले जीव समझावै। असंख्यों जन्म ठौर नहीं पावै।।
बारहवें पंथ प्रगट हो बानी। शब्द हमारे की निर्णय ठानी।।
अस्थिर घर का मर्म ना पावैं। ये बारा (बारह) पंथ हमही को ध्यावैं।।
बारहवें पंथ हम ही चलि आवैं। सब पंथ मिटा एक पंथ चलावैं।।

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जींनी स्पष्ट केले आहे की १२वें (बाराव्या) पंथापर्यंतचे अनुयाई माझ्या महिम्याची गाथा जी मी (परमेश्वर कबीर जींनी) स्वतःसांगितली आहे व ती कबीर सागर, कबीर साखी, कबीर बीजक, कबीर शब्दावली इत्यादी ग्रंथांत लिहिली आहे. त्यांना आणि जे माझ्या कृपेने गरीबदास जी कडून सांगितल्या गेलेल्या वचनामधील गूढ़ रहस्ये व्यवस्थितपणे समजून न घेता स्वतःचे चुकीचे निष्कर्ष काढून आपल्या अनुयायांना समजावतील, परंतु सत्याचा परिचय न झाल्यामुळे असंख्य जन्म स्थाई स्थान म्हणजेच सनातन परम धाम (सत्यलोक) प्राप्त करू शकणार नाहीं. मग मी (परमेश्वर कबीर जी) त्या गरीबदासांच्या पंथात येऊन कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष पूर्ण झाल्यावर यथार्थ सत कबीर पंथ चालवला जाईल. त्यावेळेस तत्त्वज्ञानाची घरोघरी चर्चा होईल. तत्त्वज्ञान समजून सर्व विश्वातील माणसे माझी भक्ति करतील. सर्वजण उत्तम आचरण करून शांततेने रहातील. यावरून सिद्ध आहे की तेरावा पंथ हा यथार्थ कबीर पंथ आहे, तो आता मी (रामपाल दास) सेवकाकडून चालविला जातो आहे. कृपा परमेश्वर कबीर जींची आहे. जेव्हा परमेश्वर कबीर जी तोताद्रि स्थानी ब्राह्मणांच्या भोजन प्रसादात रेड्याकडून वेद-मंत्र म्हणून घेतात. तर मग ते स्वतःदेखिल म्हणू शकतात. समर्थाचे सामर्थ्य यातच असते की तो पाहिजे ज्याच्याकडून आपल्या महिम्याचा अनुभव देऊ शकतात. म्हणूनच बहुधा परमेश्वर कबीर जींनी आपल्या कृपेने मज दास (रामपाल दास) कडून हा १३ वां (तेरावा) पंथ चालविला आहे.**

## कलयुग वर्तमानात किती कालावधी पूर्ण केला आहे?

हिन्दु धर्मात आदि शंकराचार्यजीचे विशेष स्थान आहे. दूसऱ्या शब्दात सांगायचे, तर ते हिंदु धर्माचे सरंक्षक आणि संजीवनदाते देखिल आदि शंकराचार्य आहेत. त्यांच्या नंतर जो प्रचार त्यांच्या शिष्यांनी केला, त्यामुळे हिंदु देवतांच्या पूजेत क्रान्ति झाली आहे. त्यांचे ईष्ट देव श्री शंकर भगवान आहेत. त्यांची पूज्य देवी पार्वती जी आहेत. त्यासोबत श्री विष्णु जी आणि अन्य देवतांचे देखिल ते पुजारी आहेत. विशेष करून ''पंच देव पूजेचा'' नियम असा आहे :- १. श्री ब्रह्मा जी, २. श्री विष्णु जी, ३. श्री शिव जी, ४. श्री पारासर ऋषि जी, ५. श्री कृष्ण द्वैपायन उर्फ श्री वेद व्यास जी पूज्य आहेत.

''जीवनी आदि शंकराचार्य'' पुस्तकामध्ये लिहिले आहे की आदि शंकराचार्यजीचा जन्म ५०८ वर्ष ईशा पूर्वी झाला होता.

नंतर ''हिमालय तीर्थ'' या पुस्तकात आदि शंकराचार्यांच्या जन्मापूर्वी भविष्यवाणी केली होती. त्यात म्हटले आहे की आदि शंकराचार्यजीचा जन्म कलयुगाची तीन हजार वर्ष गेल्यानंतर होईल.

आता गणिती पद्धतीने हे तपासून पाहूयात. आत्ता म्हणजे २०१२ मध्ये कलयुग किती पूर्ण झाले आहे?

आदि शंकराचार्यजीचा जन्म ईसवी सनापूर्वी ५०८ वर्षी झाला होता.

इसवी सन येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून सुरु झाले म्हणजे त्याची २०१२ वर्ष पूर्ण झाली आहेत.

शंकराचार्य जी जन्मून किती वर्षे झाली =२०१२+५०८=२५२० वर्ष.

वरच्या अनुसार हिशोब केल्यास शंकराचार्यजीचा जन्म कलयुगाची ३००० वर्ष लोटल्यावर झाला आहे.

एकूण वर्ष २०१२ पर्यंत कलयुग किती लोटले आहे =३०००+२५२०=५५२० वर्ष.
आता पाहूयात कलयुगाची ५५०५ वर्ष कोणत्या वर्षी पूर्ण होतात =

५५२०-५५०५ म्हणजे २०१२ वर्षापूर्वी १५ वर्ष.

२०१२-१५ = १९९७ ईस. मध्ये कलयुगाची ५५०५ वर्ष पूर्ण होतात. संवत प्रमाणे हिशोब केल्यास स्वदेशी वर्ष फाल्गुन महीन्यात म्हणजे फेबृवारी-मार्च मध्ये पूर्ण होते.

त्यामुळे श्रीमद्भगवत गीता ५१५१ वर्षा पूर्वी सांगितली गेली, असे सर्व संतजन जे समजतात ते चुकीचे आहे.

## ''गुरू विना मोक्ष नाहीं''

प्रश्न :- गुरूशिवाय भक्ति करता येत नाहीं काय?

उत्तर :- भक्ति करता येते, परन्तु प्रयत्न व्यर्थ असतो.

प्रश्न :- कारण सांगावे?

उत्तर :- परमात्माचा नियम आहे, सूक्ष्मवेदात म्हटले आहे :-

कबीर, गुरू बिन माला फेरते, गुरू बिन देते दान।
गुरू बिन दोंनो निष्फल है, पूछो वेद पुराण।।

कबीर, राम कृष्ण से कौन बड़ा, उन्हों भी गुरू कीन्ह।
तीन लोक के वे धनी, गुरू आगे आधीन।।
कबीर, राम कृष्ण बड़े तिन्हूं पुर राजा। तिन गुरू बन्द कीन्ह निज काजा।।

**भावार्थ :- गुरू दिक्षा घेतल्याशिवाय आपण नामजपाच्या कितीही माळा ओढल्या, आणि दानधर्म केला तरी दोन्ही व्यर्थ आहेत. जर आपल्याला शंका असेल तर आपल्या वेद आणि पुराणांमध्ये असलेली प्रमाणे पहावीत.**

**श्रीमद् भगवत गीता हे चारही वेदांचा सारांश आहे. गीता अध्याय २ श्लोक ७ मध्ये अर्जुनाने म्हटले की हे श्रीकृष्ण! मी आपला शिष्य आहे, आपल्याला शरण आलो आहे. गीता अध्याय ४ श्लोक ३ मध्ये श्री कृष्ण जी मध्ये प्रवेश करून काल ब्रह्मने अर्जुनाला म्हटले की तू माझा भक्त आहेस. पुराणांमध्ये प्रमाण आहे की श्री रामचन्द्रजींनी ऋषि वशिष्ठ जी कडून नामदीक्षा घेतली होती आणि आपले घरातील व राजकारभारातील-कामकाज गुरू वशिष्ठांकडून मार्गदर्शन घेऊन करत असत. श्री कृष्णजींनी संदीपनि ऋषि जी कडून अक्षर ज्ञान प्राप्त केले आणि श्री कृष्णजीचे आध्यात्मिक गुरू श्री दुर्वासा ऋषि जी होते.**

**परमेश्वर कबीर जी आम्हाला समजावत आहेत की आपण श्री राम आणि श्री कृष्ण जी पेक्षा कोणालाच महान म्हणजेच समर्थ समजत नाहीं. ते तिन्ही लोकांचे स्वामी होते तरीही त्यांनी देखिल गुरू करून आपली भक्ति केली, व मानव जीवन सार्थक केले. त्यावरून सहज हे ज्ञान झाले पाहिजे की इतर लोक जरी गुरूशिवाय भक्ति करीत असली, तरी ते कितपत बरोबर आहे? म्हणजेच व्यर्थ आहे.**

**❖ गुरूशिवाय लोकवेदानुसार पाहून ऐकून केलेल्या भक्तिला भक्ति म्हणतात. लोकवेद म्हणजे कुठल्याही क्षेत्रातील तत्वज्ञानाच्या विपरीत प्रचलित असलेले भक्तिचे ज्ञान. लोकवेदाच्या आधारे हा सेवक (संत रामपाल दास) श्री हनुमान जी, बाबाश्याम जी, श्री राम, श्री कृष्ण, श्री शिव जी इत्यादी देव-देवतांची भक्ति करत होता. मंगळवारी हनुमानजींची भक्ति व उपास, बुन्दीचा प्रसाद वाटणे, स्वतः साजूक तुपातील गव्हाचा चुरमा खात असे, श्री हनुमानजींना डालडा वनस्पति घीपासून बनविलेल्या बुन्दीचा प्रसाद चढवत होता. हरे राम, हरे कृष्ण,कृष्ण-कृष्ण हरे-हरे मंत्रजप करत होता. कोणीतरी सांगितले:-**

ओम् नाम सबसे बड़ा, इससे बड़ा न कोय।
ॐ नाम का जाप करे, तो शुद्ध आत्मा होय।।

**या कारणाने ओम् नामाचा जप सुरू केला ओम् नमो शिवायः, या शिवनामाच्या मंत्रचा जप करत होतो. ओम् भगवते वासुदेवायःनमः, हा विष्णुजींच्या मंत्रचा जप करत होतो. तीर्थक्षेत्री जाणे, दानधर्म करणे, तिथे स्नान करणे, हे देखिल लोकवेदाच्या आधारे करायला जात होतो.**

**जसे घरात प्राप्त होणाऱ्या सुखांना मी माझ्या उपरोक्त भक्तिचे फलित मनात यतो. तसेच वर्गात उत्तीर्ण होणे, विवाह होणे, मुलामुलींचा जन्म होणे, नोकरी लागणे ही सर्व सुखे उपरोक्त साधनेचे फलित समजत होतो. परमेश्वर कबीर जींनी सूक्ष्म वेदात म्हटले आहे :-**

कबीर, पीछे लाग्या जाऊं था, मैं लोक वेद के साथ।
रास्ते में सतगुरू मिले, दीपक दीन्हा हाथ।।

**भावार्थ आहे की साधक लोकवेद म्हणजेच दन्तकथेच्या आधारावर भक्ति करत होता.**

शास्त्राविरूद्ध असलेल्या साधना मार्गावर तो वाटचाल करीत होता. त्या मार्गावरच म्हणजेच भक्ति मार्गावर एक दिवस तत्वदर्शी संत भेटले. त्यांनी शास्त्राविधिनुसार व शास्त्राने प्रमाणित केलेला साधना रूपी दीपक त्याला दिला म्हणजेच सत्य व शास्त्रानुकूल साधनेचे ज्ञान झाल्यास त्याचे जीवन नष्ट होण्यापासून बचावले. सतगुरुंच्या द्वारे सांगितलेल्या तत्वज्ञानाच्या प्रकाशात कळले की मी चुकीची भक्ति करत होतो. श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३– २४ मध्ये म्हटले आहे की शास्त्रविधिचा त्याग करून जो साधक मनाला वाटेल त्याप्रमाणे मनमाणी आचरण करतात. त्यामुळे त्यांना ना सुख ना सिद्धि ना गति, काहीच प्राप्त होत नाही आहे म्हणजेच मोक्षाची प्राप्ति होत नाही आहे म्हणजेच त्यांची साधना व्यर्थ आहे. पुढे गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये म्हटले आहे, हे अर्जुन! यामधून तुझ्यासाठी कर्तव्य आणि अकर्तव्य यांची कोणती व्यवस्था आहे, याची शास्त्रातच प्रमाणे आहेत.

जी उपरोक्त साधना हा सेवक (संत रामपाल दास) करीत होता आणि पूर्ण हिन्दू समाज करत आहे, ती सगळी गीता–वेदांमध्ये वर्णन केल्यानुसार नसल्यामुळे शास्त्राच्या विरूद्ध असलेली साधना आहे आणि म्हणून व्यर्थ आहे.

कबीर, गुरू बिन काहु न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भुस छडे.मूढ़ किसाना।
कबीर, गुरू बिन वेद पढै.जो प्राणी, समझै न सार रहे अज्ञानी।।

म्हणून गुरूजींकडून वेद शास्त्रांचे ज्ञान करून घेतले पाहिजे, ज्यायोगे खऱ्या भक्तिला शास्त्रानुकूल साधना करून मानव जीवन सफल होईल.

## ''पूर्ण गुरूच्या शब्दांच्या शक्तिने भक्ति होत असते''

उदाहरण:– गुरूजीकडून अनुग्रह घेऊन भक्ति करणे लाभदायक आहे. गुरू बिना भक्ति करण्याने काहीही लाभ होणार नाहीं.

उदाहरण :–

❖ एका राजाची राणी अतिशय धार्मिक होती. तिने परमेश्वर कबीर जी कडून गुरू दीक्षा घेतली होती. ती दररोज गुरूचे दर्शन घेण्यास जात असे. राजाला काही ते आवडत नव्हते. परंतु तो आपल्या पत्नीला तिथे जाण्यापासून थांबवू शकत नव्हता. कारण, एक तर ती त्या मोठ्या शक्तिशाली राजाची मुलगी होती आणि दूसरे म्हणजे तो आपल्या पत्नीला प्रसन्न पाहू इच्छित होता.

एक दिवस राजाने आपल्या पत्नीला म्हटले की तुम्ही नाराज होणार नसाल तर एक गोष्ट सांगू? राणीने म्हटले सांगा. राजाने म्हटले की तुम्ही आपल्या गुरूकडे जाता, भक्ति तर गुरूशिवाय देखिल होऊ शकते. राणीने म्हटले की गुरू जी सांगतात की गुरूशिवाय भक्ति करणे व्यर्थ आहे. राजाने म्हटले की मी तुझ्यासोबत येऊन उद्या तुझ्या गुरूजींना भेटतो, आणि त्यांना ही गोष्ट स्पष्टपणे विचारील.

राजाने संतजींना प्रश्न केला की आपण लोकांना मूर्ख बनवत आहात की गुरूशिवाय भक्ति होत नाहीं, का भक्ति सफल होत नाही? नाममंत्र जप केल्याने भक्ति सफल होते आहे. एकमेकांना विचारून जप केला तरी पुरेसे आहे. संतांनी म्हटले राजन्! आपले म्हणणे बरोबर आहे. मी आपल्या राज दरबारात येऊन तिथेच आपल्या प्रश्नाचे उत्तर देईन. एका निश्चित दिवशी संत जी राजाच्या दरबारात गेले. राजा सिंहासनावर विराजमान झाला होता, आस–पास सर्व शिपाई उभे होते. संतांना बसण्यासाठी वेगळी खुर्ची ठेवली होती. संतांनी जाताच राजाकडे

**बोट दाखवून आजूबाजूला उभ्या शिपायांना राजाला अटक करण्यास सांगितले. शिपाई जागचे हलले देखिल नाहीत. संतांनी लागोपाठ तीन वेळा त्याला अटक करा असे पुन्हापुन्हा आदेश दिले, परन्तु राजाच्या शिपायांनी त्याला अटक केली नाही.**

**राजाला संतांचा राग आला की त्याचे राज्य बळकावण्यासाठी ते दृष्ट त्यांच्या पत्नीला त्यांच्या विरुध्द भडकवून देत होता. राजाने एकदा शिपायांना म्हटले की यांना अटक करा. त्या वेळेस त्याचा संकेत संतजींकडे होता. जसा आदेश दिला, तसे शिपायांनी संतजींना अटक केली.**

**संतजींनी म्हटले की हे राजन्! आपण घरी बोलाविलेल्या संताचा अनादर करत आहात, हे योग्य नाही. राजाने म्हटले आपण इथे काय बकवास करत होतात? मला अटक करण्याचे आदेश देत होतात. संतजींनी म्हटले गुरूची दीक्षा घेऊन भक्ति करणे कसे लाभदायक आहे या आपल्या प्रश्नाचे मी उत्तर देत होतो. मला सोडा, तर मी आपल्याला उत्तर देतो. राजाने शिपायांना त्यांना सोडायला सांगितले. शिपायांनी संतजींना सोडले. संतजींनी म्हटले की हे राजाजी! मी हेच वाक्य म्हटले होते, याला अटक करा. शिपाई जागचे हलले देखिल नाहीत. आपणदेखिल तेच वाक्य म्हटलेत, तेव्हा शिपायांनी मला त्वरित अटक केली. आपल्या शब्दात राज्याची ताकद आहे. माझ्या शब्दात आध्यात्मिक शक्ति आहे. आपण तोच नामजप म्हणून कोणाला भक्ति करण्यास सांगाल, तर तो मंत्र काहीच कामाचा नाही. पण मी तोच नाममंत्र जप करण्यास सांगितला,तर त्वरित प्रभाव पडून तो क्रियाशील होईल. त्यामुळे पूर्ण संतांकडून दीक्षा घेतल्यास साधकामध्ये आध्यात्मिक प्रक्रिया त्वरित प्रारंभ होत असते. त्याच्या आत्म्यातून भक्तिचा अंकुर उमलतो. सूक्ष्म वेदात म्हटले आहे की :-**

सतगुरू पशु मानुष करि डारै, सिद्धि देय कर ब्रह्म बिचारें।

**भावार्थ :- सतगुरु आधी मनुष्याला सत्संग ऐकवून प्रामाणिक माणूस करतात. सर्व दोषांपासून मुक्त करतात. मग आपल्या भक्तिच्या सिद्धी म्हणजेच शक्तिने शिष्याच्या अन्तःकरणात शब्दाने प्रवेश करून ब्रह्म म्हणजेच परमात्माची साधना करण्याचा विचार प्रबळ करतात. त्यामुळे साधकाची भक्तिची आवड दिवसंदिवस वाढत जाते. मग तो देवता होतो. कबीर जींनी म्हटले आहे की :-**

कबीर, बलिहारी गुरू आपना, घड़ी-घड़ी सौ-सौ बार।
मानुष से देवता किया, करत ना लाई बार।।

**म्हणूनच म्हटले आहे की :-**

कबीर, गुरू बिन माला फेरते, गुरू बिन देते दान।
गुरू बिन दोनों निष्फल हैं, चाहे पूछो बेद पुराण।।
योग, यज्ञ तप दान करावै, गुरू विमुख फल कभी नहीं पावै।।

**भावार्थ :- गुरूशिवाय नामजपाच्या माळा फिरवतात किंवा दान देतात, पण ते व्यर्थ आहे. याचे वेदात आणि पुराणांमध्ये देखिल प्रमाण आहे. नंतर अन्तिम चरणाचा भावार्थ असा आहे की जरी दीक्षा घेऊन नंतर गुरूना सोडून त्याच मंत्राचा जप केल्यास आणि यज्ञ, हवन, दानदेखिल करत असल्यास ते देखिल व्यर्थ आहे. त्याने काहीही लाभ होणार नाहीं.**

कबीर, तांते सतगुरू शरणा लीजै, कपट भाव सब दूर करिजै।

**अन्य प्रमाण:-**

कबीर, गर्भयोगेश्वर गुरू बिना, करते हरि की सेव।

कहैं कबीर बैकुंठ से, फेर दिया सुखदेव।।
राजा जनक गुरू किया, फिर किन्ही हर की सेव।
कहैं कबीर बैंकुठ में, चले गए सुखदेव।।

**भावार्थ :– ऋषि वेदव्यासजीचे पुत्र सुखदेव जी आपल्या पूर्वजन्मातील भक्तिच्या जोरावर उड़त स्वर्गात जात असत. एक दिवस ते श्री विष्णुजींच्या लोकात असलेल्या स्वर्गात प्रवेश करू लागले. तेथील कर्मचाऱ्याने ऋषि सुखदेवजींना स्वर्गाच्या द्वारावर विचारले की ऋषि जी आपल्या पुज्य गुरूजीचे नाव सांगा. सुखदेव जी म्हणाले की गुरूची काय आवश्यकता आहे? अन्य गुरू धारण करून इथे आले आहेत. माझ्या स्वतःमध्ये इतकी शक्ति आहे की मी गुरूशिवायचं आलो आहे. द्वारपालाने सांगितले ऋषि जी हे आपल्या पूर्व जन्मीच्या साठलेल्या भक्तिची शक्ति आहे. जर पुन्हा गुरू धारण करूनभक्ति केली नाहीं तर पूर्वीची भक्ति काही दिवसच चालेल. आपले मानव जीवन नष्ट होईल.**

**उदाहरण म्हणून :– वर्तमानात इन्वर्टरच्या बैट्रीला चार्जर लावून चार्ज करून ठेवले आहे. जरी चार्जर बाजूला केला तरी देखिल इन्वर्टर आपले कार्य करत राहील कारण त्यामध्ये ऊर्जा साठली आहे. काही वेळानंतर ते सगळे काम करायचे थांबवतात. न ट्यूब लागते, न पँखा चालतो. त्याला पुन्हा चार्ज करणे अनिवार्य आहे. त्यासाठी चार्जर पाहिजे. चार्जरला गुरू समजा, विजेला परमेश्वर समजा.**

**ऋषि सुखदेवांना आपल्या सिद्धिचा अहंकार होता. त्यांनी ऐकले नाही. ही गोष्ट भगवान विष्णु जी पर्यंत गेली. श्री विष्णुजींनी देखिल तेच सांगितले की ऋषि जी पहिले आपण गुरूना शरण जा. मग इथे या. सुखदेवजींनी म्हटले, भगवान! पृथ्वीलोका वर माझ्या सारखे कोणीच नाहीं आहे, न कोणी रीतीने वागणारा गुरू आहे. कृपया आपणच सांगा की मी कोणाला गुरू करू? श्री विष्णुजींनी सांगितले की आपण राजा जनकाना गुरू करावे. असे म्हणून श्री विष्णु जी आपल्या महालात निघून गेले. सुखदेव ऋषि परत पृथ्वीवर आले. राजा जनकांची दीक्षा घेऊन त्यांनी सांगितलेल्या भक्ति मंत्रांचा जप केला, तेव्हा ऋषि सुखदेवजींना स्वर्गात राहण्याची परवानगी मिळाली. म्हणूनच गुरू करून भक्ति करण्यानेच सफलता शक्य आहे. गुरूशिवाय भक्ति, दान, इत्यादी करणे व्यर्थ आहे.**

**❖ गुरू पूर्ण असावा, नकली गुरू पासून काहीही लाभ होत नाहीं.**

**प्रश्न :– पूर्ण गुरू कसा ओळखावा? आम्ही ज्या कोणत्या संतांचे ज्ञान श्रवण करतो, ते पूर्ण सतगुरु आहेत असे वाटते.**

**उत्तर :– सूक्ष्मवेदात गुरूची लक्षण सांगितली आहेत :–**

गरीब, सतगुरू के लक्षण कहूँ, मधुरे बैन विनोद।
चार वेद छः शास्त्रा, कह अठारह बोध।।

**संत गरीबदास जी (गाव–छुड़ानी जिल्हा–झज्जर, हरियाणा) यांना परमेश्वर कबीर जी भेटले होते. त्यांच्या आत्म्याला आपल्या सत्यलोकी (सनातन परम धाम) घेऊन गेले होते. सर्व लोकांचे अवलोकन करवून परत पृथ्वी वर सोडले होते. त्यांना संपुर्ण आध्यात्म ज्ञान सांगितले होते. त्यांचा ज्ञानयोग परमेश्वर कबीर जींनी खुला केला होता. त्याच्याच आधारे संत गरीबदास जींनी गुरूची लक्षणे सांगितली आहेत. ती म्हणजे जो पूर्ण गुरू म्हणजेच सतगुरु होईल, तो असे ज्ञान सांगतो की त्याच्या वचनांनी आत्मा आनंदित होतो. व ऐकायला अतिशय मधुर वाटतात. कारण ते सत्यावर आधारित असतात. कारण सतगुरु चारही वेद**

आणि सर्व शास्त्रांचे ज्ञान विस्तारपूर्वक सांगत असतात.

हेच प्रमाण परमेश्वर कबीर जींनी सूक्ष्मवेदा मध्ये कबीर सागराच्या ''जीव धर्म बोध'' अध्यायात पृष्ठ १९६० वर दिले आहे :-

गुरू के लक्षण चार बखाना, प्रथम वेद शास्त्रा को ज्ञाना।।
दुजे हरि भक्ति मन कर्म बानि, तीजे समदृष्टि करि जानी।।
चौथे वेद विधि सब कर्मा, ये चार गुरू गुण जानों मर्मा।।

सरलार्थ :- परमेश्वर कबीर जनी म्हटले आहे की जो सच्चा गुरू होईल, त्याची चार मुख्य लक्षणे आहेत :-

१. प्रथम म्हणजे सर्व वेद आणि शास्त्रांची त्यांना उत्तम जाण असते.

२. दूसरे म्हणजे ते स्वतःदेखिल मन-कर्म-वचनाने भक्ति करतात म्हणजेच त्यांच्या कथनी आणि करणीमध्ये काहीही फरक नसतो.

३. तीसरे लक्षण असे आहे की ते सर्व अनुयायांशी समान भावाने वागतात, भेदभाव करीत नाहीत.

४. चौथे लक्षण असे आहे की ते सर्व भक्ति कर्म वेद (चार वेद आहेत ते तर सर्व जाणतात १. ऋग्वेद, २. यजुर्वेद, ३. सामवेद, ४. अथर्ववेद आणि पाचवां वेद सूक्ष्मवेद आहे) तर अशा सर्व वेदांच्या अनुसार करतात आणि करवतात.

❖ वेदांमध्ये (चारही वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) केवळ ॐ हे एकच नाम जप करण्याचे आहे.

प्रमाण = यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ आणि १७ मध्ये आहे.

मंत्र १५ मध्ये म्हटले आहे की ओम् (ॐ) नामाचे स्मरण काम करता-करता करा, विशेष तळमळीने करा, मनुष्य जीवनाचे परम कर्तव्य समजून स्मरण करा, ॐ मंत्राचा जप मृत्युपर्यन्त केल्याने इतके अमरत्व प्राप्त होते,जेवढे ॐ जपाने प्राप्त होईल.(यजुर्वेद ४०/१५)

❖ यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १७ मध्ये वेद ज्ञानाचा दाता ब्रह्मच आहे. म्हटले आहे की जो पूर्ण परमात्मा आहे, तो तर परोक्ष (अदृश्य लपून बसलेला म्हणजेच अव्यक्त आहे) आह. तो सर्वांच्या दृष्टिला दिसत नाही. (त्याची माहिती यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० मध्ये अशी सांगितली आहे की त्याचे यथार्थ ज्ञान फक्त तत्वदर्शी संतच जाणतात व त्यांच्याकडूनच ते श्रवण करावे). नंतर यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १७ मध्ये पुढे म्हटले आहे की (अहम् खम् ब्रह्म) मी ब्रह्म आहे. माझे ओम् (ॐ) हेच नामस्मरण आहे. मी वर दिव्य आकाश रूपी ब्रह्म लोकात राहतो. (यजुर्वेद ४०/१७)

हेच प्रमाण श्री देवी महापुराण :- (गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित, सचित्र मोठा टाईप केवल हिन्दी) सातव्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर श्री देवीजींनी राजा हिमालयाला सांगितले की राजन्! आपण जर आत्म-कल्याण करून घेऊ इच्छित असाल, तर माझ्या भक्तिसहित सर्व गोष्टी सोडा फक्त ॐ नामाचा जप करा, ब्रह्म प्राप्तिचे उद्दिष्ट ठेवा. त्यामुळे आपण ब्रह्मास प्राप्त व्हाल, ते ब्रह्म ब्रह्मलोक रूपी दिव्य आकाशात राहते. यावरून स्पष्ट झाले की वेदात केवळ एकच ओम (ॐ) नाम जपच आहे. वेदांचा सारांश असलेल्या श्रीमद् भगवत गीतात अध्याय ८ श्लोक १३ मध्ये म्हटले आहे :-

ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्याहरन् माम् अनुस्मरन्।

य: प्रयाति त्वजन् देहम् स: याति परमाम् गतिम्।।

अनुवाद :- गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की माझे ब्रह्माचे केवळ ओम् = (ॐ) हेच एक अक्षर आहे , याचे उच्चारण-स्मरण करत जो साधक शरीर त्यागतो, तो मृत्यु पश्चात त्या (ॐ) नामाच्या स्मरणाने मिळणाऱ्या परम गतिला म्हणजेच ब्रह्म लोकास प्राप्त होतो.

श्रीमद्भगवतगीता आणि वेदांमध्ये याच्या शिवाय म्हणजेच ''ओम'' = ॐ च्या व्यतिरिक्त कोणतेच नाम ब्रह्म साधना म्हणून नाहीं आहे.

यावरून हे प्रमाणित झाले ॐ = ओम् नामाचा जप शास्त्रानुसार आहे.

❖ गीता ज्ञान दात्याने स्पष्ट केले आहे की अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. पुढेही होतील. माझी उत्पत्ति ऋषि आणि देवतागण जाणत नाहींत.

(गीता अध्याय/श्लोक-२/१२, ४/५, १०/२)

यावरून हे सिद्ध झाले की गीता ज्ञान दाता ब्रह्म नश्वर आहे आणि जन्मतो आणि मरतो त्याची पुजा करणारे सुध्दा जन्म-मरणाच्या चक्रात फिरत राहतील. म्हणूनच गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्म लोकी गेलेले साधकदेखिल पुनर्जन्मात राहत आहेत. म्हणूनच गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये म्हटले आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या परमात्माला शरण जा, त्या परमात्माच्या कृपेनेच तू परमशान्ति आणि सनातन परम धाम म्हणजेच सत्यलोकास प्राप्त होशील.

❖ नंतर गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जेव्हा तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान प्राप्त होईल, तेव्हा त्यांच्या सांगण्यानुसार साधना करून तत पश्चात् परमात्माच्या त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे, जिथे पोहोचल्यानंतर साधक परत फिरून या मृत्युलोकात येत नाहीत. फक्त त्याच परमात्माची पूजा करा.

गीता अध्याय ७ श्लोक २९ में गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे :-

जरा मरण मोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये।
ते तत् ब्रह्म विदु: कृतस्नम् अध्यात्मम् कर्म च अधिलम्।।

भावार्थ :- गीता ज्ञान दाता सांगतात की जो माझ्या सांगितलेल्या ज्ञानावर आश्रीत होऊन आश्रयाने म्हणजेच मी सांगितल्यानुसार तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान जाणून घेत आहेत, जे जरा म्हणजेच वृद्धावस्था आणि मृत्युच्या यातनापासून मोक्ष प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. जगातील कोणत्याही कीमती वस्तुची इच्छा भक्तिचे प्रतिफळ म्हणून करीत नाहीत तेच (तत् ब्रह्म विदु:) त्या ब्रह्माला व संपूर्ण आध्यात्माला आणि सर्व कर्मांना जाणतात.

❖ अर्जुनाने गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये विचारले की तत् ब्रह्म म्हणजे काय आहे? त्याचे उत्तर गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ च्याच श्लोक ३ मध्ये दिले आहे. म्हटले आहे की ते परम अक्षर ब्रह्म आहे.

❖ गीता अध्याय ८ श्लोक ५ आणि ७ मध्ये तर गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति करण्यास सांगितले आहे आणि असे विश्वास दिले आहे की माझ्या भक्तिने मला प्राप्त होईल, माझ्या भक्तिने जन्म-मरण, कर्म चक्र सुरूच राहील, युद्धदेखिल करावे लागेल, परमशान्ति नाहीं होउ शकणार.

❖ नंतर गीता ज्ञान दात्याने लगेच गीता अध्याय ८ श्लोक ८, ९, १० मध्ये म्हटले

आहे की ''तत् ब्रह्म'' म्हणजेच ''परम अक्षर ब्रह्म'' ची भक्ति करणारा त्याच सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच माझ्या दूसऱ्या दिव्य परमात्माला प्राप्त होईल.

❖ अशा प्रकारे परम अक्षर ब्रह्मचा महिमा गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितला आहे. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत, एक क्षर पुरूष जो गीता ज्ञान दाता आहे व ज्याची २१ ब्रह्मण्ड क्षेत्र आहेत. हा गीता ज्ञान दाता ब्रह्म आहे.

दूसरा अक्षर पुरूष सांगितला आहे ज्याचे ७ (सात) शंख ब्रह्माण्डाचे क्षेत्र आहे. हे दोघेही नश्वर सांगितले आहेत. यांच्या लोकातील सर्व जीव देखिल नश्वर असल्याचे सांगितले आहे.

**गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितले आहे की :-**

उत्तम पुरूष: तू अन्य: परमात्मा इति उदाहृत:
य: लोक त्रयम् आविश्य विभर्ति अव्यय: ईश्वर:

अनुवाद :- उत्तम पुरूष = पुरूषोत्तम म्हणजेच परम अक्षर ब्रह्म हे वर वर्णन केल्यानुसार क्षर पुरूष आणि अक्षर पुरूषापासून अन्य म्हणजेच जो परमात्मा म्हटला जातो तो आहे. तो तिन्ही लोक {क्षर पुरूषाचे २१ ब्रह्माण्डांच्या क्षेत्राचे लोक, दूसऱ्या अक्षर पुरूषाच्या सात (७) शंख ब्रह्माण्डांचा लोक, तीसरा वरचे चार लोक (सत्यलोक, अलख लोक, अगम लोक आणि अनामी लोक) अशा प्रकारे बनलेल्या तिन्ही लोकात} प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो आहे, आणि तोच वास्तविक अविनाशी परमेश्वर आहे.

❖ गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये या परम अक्षर ब्रह्मची प्राप्ति करण्याचे मंत्र सांगितले आहेत :-

ॐ तत् सत् इति निर्देश: ब्रह्मण: त्रिविध: स्मृत:।
ब्राह्मणा: तेन वेदा: यज्ञा: च विहिता पुरा।।

ब्रह्मणः = सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्मच्या भक्तिची साधनेचे म्हणजेच परमात्माच्या त्या परमपदाला प्राप्त होण्याचे मंत्र सांगितले आहेत, व तिथे गेल्यावर साधक पुन्हा फिरून मृत्युलोकात कधीच येत नाहीत. जिथे ते परम शान्तिला प्राप्त होतात.जे सनातन परम धाम आहे.

ॐ = ''ब्रह्म'' म्हणजेच ''क्षर पुरूषाचा'' मंत्र आहे जो प्रत्यक्ष आहे.

तत् = हा ''अक्षर पुरूषा'' चा जप मंत्र आहे. हा मंत्र सांकेतिक आहे, वास्तविक मंत्र सूक्ष्मवेदात सांगितला आहे. हा मंत्र दीक्षा देण्याच्या वेळेस दीक्षार्थीला उघड करून सांगितला जातो. अन्य कोणालाही सांगितला जात नाही.

सत् = हा ''परम अक्षर पुरूषा'' च्या साधनेचा मंत्र आहे. हा मंत्र देखिल सांकेतिक आहे. हा मंत्र दीक्षा देण्याच्या वेळेस दीक्षार्थीला उघड करून सांगितला जातो. यथार्थ मंत्र सूक्ष्मवेदात लिहिला आहे. हेच प्रमाण सामवेदाच्या मंत्र संख्या ८२२ मध्ये सुद्धा आहे. तीन नामांचा जप करण्याने पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. :-

संख्या नं. ८२२ सामवेद उतार्चिक अध्याय ३ खण्ड नं. ५ श्लोक नं. ८ (संत रामपालदास यांचेकडून भाषा-भाष्य) :-

मनीषिभि: पवते पूर्व्य: कविर्नृभिर्यत: परि कोशां असिष्यदत्।

त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्याय वर्धयन्।।८।।

मनीषिभिः–पवते–पूर्व्यः–कविर्–नृभिः–यतः–परि–कोशान्–असिष्यदत्घत्रि–तस्य–
नाम–जनयन्–मधु–क्षरनः–न–इन्द्रस्य–वायुम्–सख्याय–वर्धयन्।

शब्दार्थ–(पूर्व्यः) सनातन म्हणजेच सर्वात प्रथम प्रकट (कविर नृभिः) परमेश्वर कबीर मानव रूप धारण करून म्हणजेच गुरु रूपात प्रकट होऊन (मनीषिभिः) बुद्धिमान भक्तांना (त्रि) तीन (नाम) मंत्रांचा म्हणजेच नाम उपदेश देऊन (पवते) पापरहित म्हणजेच पवित्र करून (जनयन्) जन्म व (क्षरनः) मृत्यु (न) रहित करत आहेत आणि (तस्य) त्यांचे (वायुम्) प्राण म्हणजेच जीवन–श्वास जे संस्कारामुळे मोजलेले असतात, त्यांना (कोशान्) आपल्या साठ्यातील (सख्याय) मित्रत्वाच्या आधाराने (परि) पूर्ण रूपात (वर्धयन्) वाढवत आहेत. (यतः) त्यामुळेच (इन्द्रस्य) **परमात्मा**च्या (मधु) वास्तविक आनंदाला (असिष्यदत्) आपल्या आशीर्वाद प्रसादाने प्राप्त करवतो आहे.

**भावार्थ :– या मंत्रात स्पष्ट केले आहे की पूर्ण परमात्मा कविर म्हणजेच कबीर मानव शरीरात गुरु रूपात प्रकट होऊन प्रभु प्रेमीयांना तीन नाम जप देऊन खरी भक्ति करवतो आहे आणि त्या मित्र भक्तांना पवित्र करून आपल्या आशीर्वादाने पूर्ण परमात्मा म्हणजेच आपल्या प्राप्तिचा मार्ग सांगून पूर्ण सुख प्राप्त करवतो आहे. साधकाचे आयुष्य वाढवतो आहे. हेच प्रमाण गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये आहे की ओम्–तत्–सत् इति निर्देशः ब्रह्मणः त्रिविद्य स्मृतः भावार्थ आहे की पूर्ण परमात्माला प्राप्त करण्यासाठी ॐ (१) तत् (२)सत् (३) हा मंत्र जप स्मरण करण्याची आज्ञा आहे. हे नाम तत्वदर्शी संतांकडून प्राप्त करूनघ्या. तत्वदर्शी संताविषयी गीता अध्याय ४ श्लोक नं. ३४ मध्ये म्हटले आहे आणि गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. १ व ४ मध्ये तत्वदर्शी संतांची ओळख सांगून म्हटले आहे की तत्वदर्शी संताकडून तत्वज्ञान जाणून त्यानंतर त्या परमपद परमात्माचा शोध घेतला पाहिजे. जिथे गेल्यानंतर साधक फिरून परत मृत्युलोकात येत नाही म्हणजेच पूर्ण मुक्त होऊन जातात. त्याच पूर्ण परमात्माने संसाराची रचना केली आहे.**

**विशेष :– उपरोक्त विवरणामुळे हे स्पष्ट झाले की पवित्र चार वेदही साक्षी आहेत की पूर्ण परमात्माच पूजा करण्यायोग्य आहेत व त्यांचे वास्तविक नाव कविर्देव (कबीर परमेश्वर) आहे आणि तीन मंत्रांचा नाम जप केल्यानेच पूर्ण मोक्ष होत असतो.**

**या तीन मंत्रांचा जप करण्याचे प्रमाण चारही वेदांचा सारांश असलेल्या श्रीमद्भगवत गीतात आहे की त्याने असे स्थान प्राप्त होते आहे, जिथे पोहोचल्यावर साधक कधीही मृत्युलोकात परत येत नाही. जे सनातन परम धाम आहे, तिथे गेल्यानंतर परम शान्ति प्राप्त होते आहे.**

**वेद व गीतात या तीन अमूल्य नाममंत्रांचा अस्पष्ट म्हणजेच सांकेतिक आहे. त्यामुळे चारही वेद व गीतानुसार साधना करण्याने ते स्थान व परमात्मा प्राप्त होऊ शकणार नाही. त्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ३२ आणि ३४ मध्ये गीता ज्ञान दात्याने स्पष्ट केले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानाचे यथार्थ ज्ञान (ब्रह्मणः मुखे) सच्चिदानन्द घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्म आपल्या मुख–कमलाच्या वाणीने बोलून सांगितले आहे. त्याला सच्चिदानन्द घन ब्रह्मची वाणी म्हटले जाते, त्याला तत्वज्ञान आणि सूक्ष्म वेद देखिल म्हटले जाते. त्यांना जाणल्यावर सर्व पापांपासून मुक्ती मिळते. ज्यामध्ये संपुर्ण भक्ति मंत्र आणि विधि सांगितला आहे. (गीता अध्याय ४ श्लोक ३२)**

**❖ गीता अध्याय ४ श्लोक ३४ = ते तत्वज्ञान तू तत्वदर्शी संतांपाशी जाऊन समजून**

घे. त्यांना साष्टांग दण्डवत् प्रणाम करून, कपट सोडून नम्रतापूर्वक प्रश्न केल्यास ते परमात्मा तत्वाला पूर्णपणे जाणणारे ज्ञानी महात्मा तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील. (गीता अध्याय ४ श्लोक ३४)

साधकहो! तत्वदर्शी संत हा सेवक (संत रामपाल दास) आहे ते तत्वज्ञान माझ्याजवळ आहे माझ्या व्यतिरिक्त वर्तमानात कोणाकडेच नाहीं. जगाची लोकसंख्या जवळपास ७ अब्ज आहे. या अब्जावधीमध्ये माझ्या व्यतिरिक्त कोणीहि हे ज्ञान जाणत नाही.

गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ पर्यंत गीता ज्ञान दात्याने तिन्ही गुणांची (रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी आणि तमगुण शिव जी) भक्ति करणारे १. राक्षस स्वभाव धारण केलेले, २. मनुष्यांमधील नीच, ३. दूषित कर्म करणारे, ४. मूर्ख माझी भक्ति देखिल करत नाहींत.

पुढे गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ७ श्लोक १६ ते १८ पर्यंत आपली साधना करणाऱ्यांची स्थिति सांगितली आहे की माझी भक्ति चार प्रकारची माणसे करतात (१. आर्त, २. अथार्थी, ३. जिज्ञासु, ४. ज्ञानी) यामध्ये केवळ ज्ञानी साधक श्रेष्ठ सांगितला आहे, परंतु तोदेखिल तत्वज्ञान नसल्याने माझ्या म्हणजेच ब्रह्मच्या अनुत्तम् म्हणजेच नीच गतित राहिला आहे.

❖ गीता अध्याय ७ श्लाके १९ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की माझी पूजा देखिल जन्म-जन्मान्तराच्या शेवटच्या जन्मात कोणी ज्ञानी आत्मा व्यवस्थित करतो. अन्यथा बाकी उपासना मध्ये लोक अडकून असतात. हे सांगणारा महात्मा तर खूपच दुर्लभ आहे. की केवळ वासुदेव म्हणजेच सर्वगतम् ब्रह्मच सर्व काही आहे. त्याच्याच भक्तिने परम शान्ति प्राप्त होते. त्याच्याच भक्तिने सनातन परम धाम प्राप्त होते. त्याच्याच भक्तिने ते परमपद प्राप्त होते जिथे गेल्यावर साधक फिरून मृत्युलोकात येत नाही. तेच परम अक्षर ब्रह्म सर्वांचा उत्पत्तिकर्ता आहे, तेच प्रपंच रूपी वृक्षाचे मूळ आहे व तोच तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो. तोच पापनाशक आहे. तोच पूर्ण मोक्षदायक आहे, त्याचीच भक्ति केली पाहिजे.

प्रिय साधकहो! तो तत्वदर्शी संत वर्तमानात हा सेवक (संत रामपाल दास) आहे. माझ्याजवळ संपूर्ण वेद-शास्त्रांचे ज्ञान आहे. भगवान वासुदेवांच्या भक्तिचे संपुर्ण मंत्र आहेत.

आता ''वासुदेवाची'' परिभाषा सांगत आहेत. :-

## ''वासुदेवाची परिभाषा''

गीता अध्याय ३ श्लोक १४-१५ मध्ये म्हटले आहे की सगळे प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात. अधिक माहिती आपणास आधी दिली आहे, तिथून वाचावी. इथे फक्त याच विषयाचा विचार करू.

पुढे म्हटले आहे की ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूषाची उत्पत्ति अविनाशी परमात्मापासून झाली आहे. ज्याविषय गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितले आहे. त्यावरून सिद्ध होते की ''सर्वगतम् ब्रह्म'' = सर्वव्यापी परम अक्षर ब्रह्म म्हणजेच वासुदेव सदैवच यज्ञांमध्ये प्रतिष्ठित आहेत.

विचार करा :- सर्वगतम् ब्रह्म चा अर्थ आहे सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा.

(गीता अध्याय ३ श्लोक १५)

१. श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी या तिन्ही देवता एका ब्रह्माण्डात बनलेल्या तिन्ही लोकांमध्ये (स्वर्ग लोक, पृथ्वी लोक, पाताल लोक) फक्त एकेका विभागाच्या

म्हणजेच गुणाच्या मुख्य आहेत. त्या सर्वगतम् ब्रह्म म्हणजेच सर्वव्यापी परमात्मा=वासुदेव नाहीत.

२. ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूष :- हे केवळ २१ ब्रह्माण्डांचे देव आहेत. हे देखिल सर्वव्यापी म्हणजेच वासुदेव नाहीत

३. अक्षर पुरूष :- हे केवळ ७ शंख ब्रह्माण्डांचे देव आहेत. हे देखिल सर्वव्यापी म्हणजेच वासुदेव नाहीत

४. परम अक्षर ब्रह्म :- हे सर्व ब्रह्माण्डांचे स्वामी आहेत. सर्वांचे धारण-पोषण करणारे आहेत. ते वासुदेव आहेत.

विशेष :- अधिक माहितीसाठी याच पुस्तकातील ''सृष्टि रचना'' अध्याय वाचावा.

❖ जसे आपल्याला आधीच सांगितले आहे की परम अक्षर बह्म स्वत: पृथ्वीवर प्रकट होऊन पुण्यात्म्यांना भेटून तत्वज्ञान सांगत असतात. त्याच नियमानुसार तेच परमात्मा संत गरीबदास जींना (गाव=छुड़ानी, जिल्हा-झज्जर, प्रांत-हरियाणा) येथे सन् १७२७ मध्ये भेटले होते. एका जिवंत महात्म्याच्या वेशभूषेत होते. गरीबदास जींच्या आत्म्याला त्या सनातन परम धामी घेऊन गेले होते. मग वरील सर्व ब्रह्माण्ड आणि देवांची स्थिति दाखवून तत्वज्ञाशी परीचित करून परत शरीरात स्थित केले होते. त्यावेळेस संत गरीबदासजीचे वय १० वर्ष होते. त्या दिवशी संत गरीबदास जींना मृत समजून चितेवर ठेऊन अन्तिम संस्कारांची तयारी करत होते. त्याच वेळेस त्यांच्या आत्म्याने शरीरात प्रवेश केला होता. जीवित झाल्यावर सर्व कुटुंबातील लोकांच्या आनंदाला उधाण आले होते. त्यानंतर संत गरीबदास जींनी एका अमूल्य ग्रंथाची रचना केली. त्यामध्ये स्वताच्या डोळ्यांनी अनुभवलेले व स्वतः परमात्माने सांगितलेले ज्ञान सांगितले. ते गोपाल दास नामक दादू पंथी साधुने लिहून घेतले होते. ते वर्तमानात छापून घेतले आहे.

❖ पंजाब प्रान्ताच्या लुधियाना शहराजवळ एक वासीयर गाव आहे. तिथे एक देवभक्त व्यक्ति रामराय उर्फ झूमकरा राहत होता. त्याने संत गरीबदासजीचा महिमा ऐकला, तर दर्शनार्थ छुड़ानी गावी आला. संत गरीबदास जींनी हे ज्ञान ऐकवले व ते या सेवकाला (संत रामपाल दास) संत गरीबदास यांच्याकडून प्राप्त झाले आहे. ते आपल्याला या व अन्य पुस्तकांमधून ऐकवले आहे.

त्या रामरायाने प्रश्न केला की हे महात्माजी! हे ज्ञान तर आजपर्यंत कोणीच सांगितले नाही. संत गरीबदास जींनी त्यांच्या वाणीद्वारे सांगितले.

कोट्यों मध्य कोई नहीं राई झूमकरा।
अरबों में कोई गरक सुनो राई झूमकरा।।

अनुवाद व भावार्थ :- संत गरीबदास जींनी सांगितले की हे ज्ञान करोड़ोंमध्येच नव्हे, तर अब्जावधीमध्ये एखाद्याला प्राप्त आहे. ते संत सर्व ज्ञानसंम्पन्न संपुर्ण साधनामंत्रांनी युक्त म्हणजेच परिपूर्ण असतात. प्रिय साधकहो! वर्तमानात ते संत, बरवाला जिल्हा हिसार मध्ये आहेत. ज्ञान समजून लाभ करून घ्या.

प्रश्न :- प्राचीन काळापासून चालत आलेली भक्ति साधना आपण चूक कशी काय म्हणता? ज्याप्रमाणे तप सर्व ऋषिजन करत असत, आम्ही सर्व हिन्दू समाजात पाहत आहोत -सगळे हरे कृष्णा, हरे राम, राधे-राधे श्याम मिला दे, ओम नमः शिवाय, ओम नमो भगवते वासुदेवायः नमः, जय सियाराम, राधे श्याम, ओम तत् सत्, यामधून कोणत्याही एक मंत्राचा

जप करत आहेत. वर्तमानात देखिल करत आहेत. श्री रामचंन्द्र जी, श्री कृष्ण जी यांना आम्ही पूर्ण परमात्मा मानतो. म्हणून यांचे नामस्मरण जपतो आहोत. आपण हे नामजपाचे मंत्र व्यर्थ असल्याचे सांगता याचे स्पष्टीकरण द्या.

उत्तर :- प्राचीन काळी जरी ही साधना होती आणि हे मंत्र होते तर श्रीमद्‌भगवत गीताच्या अध्याय ४ श्लोक १-२ मध्ये गीता ज्ञान दात्याने असे म्हटले नसते की हा योग म्हणजेच भक्ति विधि मी गीता ज्ञानात सांगतो आहे, ते आता जवळपास लुप्त झाले आहे, नष्ट झाले आहे. हे ज्ञान आणि भक्ति मी सूर्यदेवाला सांगितली होती, मग सूर्यदेवाने मनुला, मनुने आपल्या पुत्राला म्हणजे इक्ष्वाकुला सांगितली आणि मग काही राज ऋषिंनी ती जाणली. ही द्वापाराच्या बरीच आधी लुप्त झाली होती आणि मनु, इक्ष्वाकु इत्यादी सर्व सत्ययुगाच्या प्रथम चरणात होऊन गेले होते. जरी आपण राजा दशरथाचे पुत्र श्री रामचंन्द्र जी आणि श्री वासुदेवपुत्र श्री कृष्ण यांन पूर्ण परमात्मा मानत असलात, व त्यामुळेच त्यांच्या नामाचा हरे राम, हरे कृष्ण, जप करत आहात आणि त्यालाच मोक्ष मानत आहात,तर श्रीमद्भगवत गीतात वर्णन केल्यानुसार यथार्थ प्राचीन योग म्हणजेच भक्तिच्या विधिच्या विपरीत असल्यामुळे व्यर्थ आहेत. शास्त्रविधिचा त्याग करून मनमानीने आचरण झाले. त्यामुळेच उपरोक्त प्रश्नात लिहिलेले मंत्रदेखिल शास्त्रप्रमाणित नसल्यामुळे व्यर्थ आहेत. गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की जे पुरूष शास्त्राविधि त्यागून मनमानी आचरण करत आहेत त्यांना न सुख न सिद्धि न सदगति प्राप्त होत नाही म्हणजेच साधना व्यर्थ झाली. (गीता अध्याय १६ श्लोक २३)

❖ गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये म्हटले आहे. की त्यामुळे अर्जुन तुझ्यासाठीच्या कर्तव्य आणि अकर्तव्याच्या व्यवस्थेत शास्त्रेच प्रमाण आहेत. भावार्थ आहे की जी भक्ति विधि प्रमाणित शास्त्रात (चार वेद = ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद आणि त्या चारही वेदांचा सारांश श्री मद्भगवत गीता आणि परमात्माने स्वतःच्या मुखाने सांगितलेला सूक्ष्मवेद हेच भक्तिचे ज्ञान आणि समाधान करण्याची प्रमाणित शास्त्रे आहेत) वर्णन केल्यानुसार नसेल, तर ती शास्त्राविरूद्ध साधना आहे. म्हणूनच भक्तिची कोणती कर्मे करावीत व करू नयेत यासाठी शास्त्राचाच आधार घ्या. शास्त्रात वर्णन केल्यानुसार भक्ति विधि स्वीकारा आणि बाकी सर्व सोडा.

❖ श्री रामजीचा जन्म त्रोतायुगाच्या अन्तिम चरणात झाला होता. श्री कृष्णजीचा जन्म द्वापरयुगाच्या अन्तिम चरणात झाला होता. सत्ययुगापासूनच मानव भक्ति करतो आहे. त्यावेळा कुठे कोण राम होते? तुम्ही म्हणाल की श्री विष्णु जी तर सत्ययुगाच्या आधीपासून आहेत. आणि श्री राम, श्री कृष्णदेखिल स्वतः विष्णुजीच होते. सत्ययुगामधील प्रमाण आहे की महर्षि बाल्मिकी जी राम-राम नाम जपत असत,त्यांनी कधी विष्णु-विष्णु नाहीं जपले. यावरून सिद्ध होते की श्री विष्णु जी, श्री राम, श्री कृष्ण जी यांच्या पेक्षा कोणी वेगळाच ''राम'' म्हणजेच ''परमात्मा'' आहे, त्याच म्हणजेच गीता अध्याय ७ श्लोक २९ मधील रामाचा जप केला पाहिजे. ज्याविषयीम्हटले आहे की तत् ब्रह्म जाणणारे केवळ जरा म्हणजेच वृद्धावस्था आणि मृत्यु पासून सुटका करून घेण्यासाठीच भक्ति करत आहेत. अर्जुनाने गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये प्रश्न केला आहे की ते तत् ब्रह्म काय आहे?

गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ श्लोक ३ मध्ये उत्तर दिले की तोच ''परम अक्षर ब्रह्म''आहे. गीता अध्याय ८ च्याच श्लोक ५, ७ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति करण्यास सांगितले आहे व त्याचा जपमंत्र गीता अध्याय ८ च्याच श्लोक १३ मध्ये सांगितला आहे. (ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्यवहारन् माम् अनुस्मरन्.......)

❖ गीता अध्याय ८ श्लोक ८,९,१०, मध्ये गीता ज्ञान दात्याने आपल्याला अन्य तत् ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्माची भक्ति करण्याससांगितले आहे, त्याच्या भक्तिचा नामजप मंत्र गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सांगितला आहे.

ॐ तत् सत् इति निर्देश: ब्रह्मण: त्रिविध: स्मरत:।
ब्राह्मणा: तेन वेदा: च यज्ञा: च विहिता: पुरा।।

सरलार्थ :- ब्रह्मणः = सच्चिदानन्द घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्माच्या भक्तिचा ॐ, तत्, सत् मंत्राच्या स्मरणाचा (निर्देशः) आदेश आहे. जो (त्रिविधः) तीन प्रकारांनी (स्मतः) स्मरण करण्यास सांगितले आहे (ब्राह्मणाः) विद्वान् म्हणजेच तत्वदर्शी संत (तेन)त्याच (वेदाः) ज्ञानाच्या आधारे भक्ति करत होते. (च) आणि (यज्ञाः) धार्मिक यज्ञांचे अनुष्ठान (च) आणि अन्य भक्ति कर्म (पुरा) सृष्टिच्या आदि म्हणजेच प्रारंभी (विहिता) केले जात असत.

श्रीमद् भगवत गीतावरून सिद्ध झाले की गीता ज्ञान दात्यापेक्षा कोणी पूर्ण परमात्मा आहे व तो श्री विष्णु जी, श्री ब्रह्मा जी आणि श्री शिव जी यांच्यापेक्षा देखिल भिन्न आहे. ज्याविषयी गीता अध्याय १५ श्लोक १,४,१७ मध्ये आणि गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आणि अनेक ठिकाणी गीतात म्हटले आहे, ते पूर्ण परमात्मा आहेत. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत. दोघेही नश्वर सांगितले आहेत. त्यांचे अन्तर्गत जितके प्राणीआहेत, तेदेखिल नश्वर आहेत. (१) (क्षर पुरूष आहे, तो केवळ एकवीस ब्रह्माण्डांचा प्रभु आहे, (२) अक्षर पुरूष हा ७ शंख ब्रह्माण्डांचा प्रभु आहे. हे दोघेही पूर्ण परमात्मा नाहीत. (गीता अध्याय १५ श्लोक १६)

❖ गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की उत्तमः पुरूषः तू: अन्यः म्हणजेच पुरूषोतम तर कोणी वर वर्णन केल्यानुसार दोन्ही पुरूषांपेक्षा (क्षर पुरूष आणि अक्षर पुरूष) भिन्न आहे व त्यालाच (परमात्मा इति उदाहृतः) परमात्मा म्हटले गेले आहे. (यः लोकत्रयम्) तो तिन्ही लोकांमध्ये (आविश्य विभर्ति)प्रवेश करून धारण-पोषण करतो आहे, (अव्ययः ईश्वरः) अविनाशी परमेश्वर आहे. (गीता अध्याय १५ श्लोक १७)

❖ पूर्ण परमात्मा परम अक्षर बह्म् आहे हे सिद्ध झाले. त्याच्या भक्तिचा मंत्र ॐ, तत्,सत् आहे. हेही सिद्ध झाले. ओम, तत्, सत्, हे जे तीन मन्त्र आहेत, ते उपरोक्त तिन्ही प्रभुंचे (ॐ = क्षर पुरूष म्हणजेच क्षर ब्रह्म गीता ज्ञान दात्याचा, तत् = हा सांकेतिक आहे. याचे याच पुस्तकात पूर्वी विवरण केले आहे, ते वाचवे. हा तत् नाम जाप = अक्षर पुरूषाचा आहे) सत् = हा देखिल सांकेतिक आहे, अधिक खुलासा याच पुस्तकातील आधीच्या प्रकरणात केला आहे, तो वाचावा. हा सत् मंत्र परम अक्षर ब्रह्मचा आहे. श्रीमद्गवत गीतात पूर्ण मोक्षप्राप्तिसाठी सांकेतिक मंत्र आहेत. जे आजपर्यंत (सन् २०१२ पर्यंत) कोणीही हे स्पष्ट केलेले नाही. आपण जो हरि ओम, तत् सत् जप करत आहात, तोदेखिल व्यर्थ आहे कारण आपणास तत् आणि सत् च्या वास्तविक मंत्रांचे ज्ञानच नाहीं आहे.

उदाहरण :- एका धनीक व्यक्तिनेआपले धन आपल्या घरात एक खड्डा खोदून त्यात गाडून टाकले. ती जागा केवळ त्या धनीक व्यक्तिलाच माहित होती. त्या धनीक व्यक्तिने एक वहीत सांकेतिक भाषेत ते स्थान लिहिले होते. धनीक व्यक्तिचा अचानक मृत्यु झाला. पित्याचे संस्कार करून ज्या वहीत धन कुठे आहे ते लिहिल्याचे सांगितले होते, ती वही मुलांनी उचलली. ती वही वडिलांनी कधीच कोणाला दाखवली नव्हती.

धनीक व्यक्तिच्या घरासमोर अंगण होते, त्या अंगणाच्या कोपऱ्यात एक मन्दिर बांधले

होते. वहीत (पैड) लिहिले होते की पौर्णिमेच्या चांदण्या रात्री २ वाजता सगळे धन मंदिराच्या कळसात गाडून ठेवले आहे. मुलांनी मन्दिराचा कळस रात्रि २ वाजता फोडून धन शोधले, परंतु काहीच मिळाले नाही. मुलांना अतिशय दुःख झाले. एक दिवस त्यांच्या वडिलांचे मित्र दूसऱ्या गावाहून त्यांच्या समाचारासाठी आले होते. मुलांनी सांगितलेल्या जागेवर धन न मिळाल्यामुळे काळजी व्यक्त केली. त्या धनीकाच्या मित्राने ती वही मागितली आणि व्याख्या वाचली व सांगितले की मन्दिराचा कळस पुनः जसा होता तसाच बांधून काढा. मग एखाद्या दिवशी मी येईन तेव्हा धन ठेवण्याचे स्थान सांगीन. तो मित्र पौर्णिमेच्या आदल्या दिवशी आला. रात्रिच्या दोन वाजण्याच्या सुमारास ज्या जागी मन्दिराच्या कळसांच्या खाली चंद्राच्या प्रकाशाची सावली पडली होती, तिथे खोदले असता, सगळे वहीत लिहिलेले धन मिळाले. मुले खुश होऊन श्रीमंत झाली.

आपण जो हरि ॐ तत् सत् चा जप करत आहात, आपण मंदिराचा कळस खोदत आहात, पण हाती काहीच लागणार नाही. ते सर्व मंत्र माझ्याजवळ (संत रामपाल दास) आहेत. ते ग्रहण करून भक्तिने धनी आणि सुखी व्हा.

प्रश्न :- राधा जी गांव बरसाना (उत्तर प्रदेश) गावाजवळ वृन्दावनमध्ये राहणारी होती. तिथली माणसे ''राधे-राधे'' नाम जपत आहेत. सकाळी सकाळी किंवा कधीही आपसात भेटले, तर ते राम-राम नाहीं म्हणत, तर म्हणतात, काका राधे-राधे. काका म्हणतात की बेटा राधे-राधे. ते काय मूर्ख आहेत काय?

उत्तर :- तत्वज्ञानाच्या अभावी लोकवेदाला सत्य ज्ञान समजून हा शास्त्राविरूद्ध मंत्रांचा जप सुरु आहे. तसे आपल्याला आधीच स्पष्ट केले आहे की गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की जे शास्त्राविधि त्यागुन मनमानी आचरण करत आहेत म्हणजेच जे नाम जप शास्त्रामध्ये नाहीत, त्यांचा जप करत आहेत, त्यांना न सुख न सिद्धि प्राप्त होते न त्यांना गती मिळते म्हणजेच त्याची जप साधना व्यर्थ आहे. त्यामुळे ए अर्जुन तुझ्यासाठी कर्तव्य आणि अकर्तव्य यांची व्यवस्था मध्ये शास्त्रासाठी प्रमाण आहे. हे आधीच सांगितले आहे. आता प्रश्न आहे की काका पुतणे राधे-राधे शब्दाचा का उच्चार करत आहेत? तुम्हाला माहित आहे की राधा जी कोण होत्या? राधा भगवान श्री कृष्णजींची प्रेमिका होती. त्यावेळेस बरसाना गावातील लोक राधाजींना कुलटा, बदचलन, निर्लज आदि-विशेषणे लावत असत. म्हणत की ही दूसऱ्या गावातील नंद बाबाच्या मुलाला भेटण्यासाठी लपूनछपून जात असते. तिला आपल्या घरी येऊ देऊ नका. मुलींवर विपरीत परिणाम होईल. श्रीमान् जी! आता त्याच बरसाना मधील लोक राधेसाठी स्वतः (स्त्री-पुरूष, युवति) म्हणत आहेत की राधे-राधे श्याम मिला दे आमची भेट घडव. ज्याप्रमाणे आपल्याला आधीच्या प्रश्नात सांगितले होते की आम्ही या नामाचा देखिल जप करत आहोत. आता न राधा जी आहेत आणि न श्री कृष्ण जी. तापात भ्रम झालेल्या रोग्याप्रमाणे राधे-राधे श्याम मिला दे असे आता बड़बड़त आहेत. अशीच स्थिती अन्य मंत्रांची आहे. जे आपण आधीच्या प्रश्नात सांगितले होते ते जाणा. तेदेखिल शास्त्र प्रमाणित नसल्यामुळे व्यर्थ आहेत.

❖ आता या प्रश्नाचे उत्तर सांगतो की काकाही म्हणतो आहे राधे-राधे, पुतण्या देखिल म्हणतो आहे राधे-राधे. तुम्हालाही माहित आहे की राधा जी श्री कृष्णजींची प्रेमिका होती. तुम्हाला हेही माहित आहे की जेव्हा रुख्मिणीला श्रीकृष्ण जी रथात पळवून घेऊन जायला लागले, तेव्हा तिचा भाऊ आपल्या बहिणीला सोडविण्यासाठी घोड्यावर स्वार होऊन

त्यांच्या मागे धावला होता. श्री कृष्णजींनी आधी त्याला मस्त पिटले. मग रथाच्या मागे बांधून फरफटत नेले होते. रूकमणी जी देखिल श्री कृष्णजीच्याच प्रेमिका होत्या. त्यांचे मध्ये रुख्मिणीजीचा भाऊ आला होता. त्याची काय दशा केली होती. श्री कृष्णजींनी रुख्मिणीच्या विनंतीवरून त्यांच्या भावाला जीवदान दिले. जर आज भगवान श्रीकृष्ण वर्तमानात असते, राधाजि देखिल असत्या, आणि बरसाना गावातले काका पुतणे आपसात 'राधे-राधे' असे बोलले असते, तर श्रीकृष्णजींना ते आवडले असते काय? कधीच नाही. काका पुतण्यांना दोघांनाही रथाला बांधून फरफटत नेले असते. जर आपण कोणाच्या प्रेमिकेचे नाव घेऊन बडबड केलीत तर त्या प्रेमिकाला काय वाटेल? जर बलदंड असेल तर तोंड फोडेल, किरकोळ असेल तर रडत बसेल. तिच्या जिवाला लागेल. ती खुश होईल काय? नाहीं त्यामुळे ही नामे शास्त्र प्रमाणित नाहीत. त्यांचा जप व्यर्थ आहे. शास्त्र प्रमाणित नाम माझ्याजवळ आहे. या आणि आपले कल्याण करवून घ्या.

प्रश्न :- आपण (पूर्ण गुरूची ओळख काय आहे?) या प्रश्नाच्या उत्तरात एके ठिकाणी लिहिले आहे. की प्रमाणित झाले की ओम् (ॐ) नामाचा जप शास्त्र प्रमाणित आहे. (काल ब्रह्मची पूजा केली पाहिजे की नाही?) या प्रश्नांच्या उत्तरात बहुतांशी ऋषिची पूजा ही शास्त्राविधिच्या विपरीत मनमानी आचरण असल्याचे म्हटले आहे, जे ॐ (ओम्) मंत्राचा जप करत होते.

उत्तर :- ते ऋषि जी ओम् (ॐ) नामाच्या जपासोबत हठयोगाने घोर तपदेखिल करत असत. त्यामुळे त्यांची साधना शास्त्राविरूद्ध असल्याचे म्हटले आहे. ओम् (ॐ) नामाचा जप शास्त्र प्रमाणित तर आहे, परंतु मोक्षदायक नाही. त्यामुळे अनुत्तम गति (मुक्ति मिळत नाही) प्राप्त होते आहे. त्यामुळे त्या ऋषिंचा पूजा विधि शास्त्राविरूद्ध आहे. वेद आणि गीतात त्या परम परमात्माची भक्ति करण्यास सांगितले आहे. त्याची भक्ति न करतां मनमानी पूजा करणे शास्त्राविरूद्ध आहे.

प्रश्न :- महर्षि बाल्मिकी जी तर सत्ययुगात होऊन गेले, तेही राम-राम जपत असत. हा मंत्रदेखिल शास्त्र प्रमाणित नाही काय?

उत्तर :- आधीच सांगितले आहे की गीता अध्याय ४ श्लोक १-२ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की हे ज्ञान मी सूर्याला ऐकवले होते. त्याने ते आपल्या पुत्राला म्हणजेच मनुजींना सांगितले. नंतर काही राजऋषिना देखिल प्राप्त झाले. सत्ययुगाच्या प्रारंभीच हे सर्व सूर्य, मनु व राजर्षि झाले आहेत. त्यांच्यानंतर हे ज्ञान नष्ट झाले होते. महर्षि बाल्मिकीजींना सप्त ऋषि भेटले होते. त्यांनी तप करून काही सिद्धि प्राप्त केल्या होत्या. तोच हठयोग करण्याचा तपविधि महर्षि बाल्मिकीजींना त्यांनी सांगितला. त्या हठ योगाचे तप महर्षि बाल्मिकीजींनी तन-मनाने श्रद्धापूर्वक केले होते. काही कालावधीनंतर शरीराच्या वरच्या भागातून (डोके) आवाज ऐकू आला, तो राम-राम असा होता. त्याच शब्दाचे उच्चारण महर्षि बाल्मिकी जी तपाच्या दरम्यान करू लागले. ऐकणाऱ्याला ते मरा, मरा म्हणताहेत असे वाटले. वास्तविक ते राम-रामच उच्चारण करत होते. त्यांना तपस्येचे फळ मिळाले व त्यांच्यामध्ये सिद्धि प्रविष्ट झाल्या. त्यांना दिव्य दृष्टी प्राप्त झाली. त्यामुळे त्यांनी श्री रामचन्द्रजींच्या जन्मापूर्वी हजारों वर्षे अगोदरच रामायण म्हणजेच श्री रामचन्द्रजींच्या जीवनातील सर्व घटना लिहिल्या होत्या ग्रंथाचे नाव आहे बाल्मिकी रामायण व तो संस्कृत भाषेत लिहिला गेला. राम-राम असा जप करून कोणताही आध्यात्मिक लाभ होत नाहीं. परंतु परमात्मा बोधक शब्द असल्याने उच्चारण करण्याने परमात्माचा विसर पडत नाही. म्हणूनच राम-नामाचे उच्चारण

करण्याची पद्धत प्राचीन कालापासून हिन्दू धर्मात प्रचलित आहे. जसे स्वामी रामानन्द जी राम-राम शब्दानेच सम्बोधित करत असत. त्यांचे शिष्यदेखिल एकमेकांना राम-राम म्हणूच सम्बोधित असत. परंतु जप मंत्र ''ॐ'' हाच होता. त्याचप्रमाणे आम्ही कबीर पंथी ''सत साहेब'' म्हणतो. आमचा जप मंत्र वेगळा आहे. त्याच्याच आधाराने परमात्मापर्यंत पोहोचता येते. सूक्ष्म वेदात म्हटले आहे :-

सतगुरू मिले तो इच्छा मेटै, पद मिल पदै समाना।
चल हंसा उस लोक पठाऊँ, जो अजर अमर अस्थाना।
चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी।
दास गरीब अभय पद परसै, मिलै राम अविनाशी।।

## गीतानुसार ''भक्ति कोणत्या प्रभुची करावी''

**सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-**

''भजन करो उस रब का, जो दाता है कुल सब का''

श्रीमद्भगवत् गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ आणि १६-१७ मध्ये म्हटले आहे की हा प्रपंच म्हणजे एखाद्या पिंपळाच्या वृक्षासारखा आहे. जो संत या प्रपंचरूपी पिंपळ वृक्षाच्या मूळापासून तीनों गुण रूपी फांद्यांपर्यंतचे सर्वांग वेगवेगळे सांगू शकतो, (सः वेद वित्) तो वेदाचे तात्पर्य जाणतो म्हणजेच तो तत्वदर्शी संत आहे.

आपल्या द्वारे रचित सृष्टिचे ज्ञान आणि वास्तविक आध्यात्म ज्ञान परमात्मा स्वतः पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुख कमलातून सांगतआहेत. प्रमाणासाठी खालील वेद मंत्र वाचावेत. या मंत्रांची फोटोकॉपी कृपया ''गीता तेरा ज्ञान अमृत'' पुस्तकात पहावी आर्यसमाजाचे प्रवर्तक महर्षि दयानंद आणि त्यांच्या अनुयायांनी त्यांचा अनुवाद केला आहे. त्यातील त्रुटि लेखकाने (संत रामपाल दास) शुद्ध केल्या आहेत.

ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ८६ मंत्र २६-२७, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ८२ मंत्र १-२, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ९६ मंत्र १६ ते २०, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ९४ मंत्र १, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ९५ मंत्र २, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ५४ मंत्र ३, ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त २० मंत्र १ मध्ये प्रमाण आहे की जो सर्व ब्रह्मण्डांचा रचनाकार व पालनकर्ता परमात्मा आहे. ते सर्व भुवनांच्या वरच्या लोकात बसले आहेत. (ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ५४ मंत्र ३) ते परमात्मा तिथून गति घेऊन म्हणजेच सशरीर चालुन इथे पृथ्वीवर येतात, भक्तांवरील संकटांचा नाश करतात. त्यांचे नांव कविर्देव म्हणजेच परमेश्वर कबीर आहे. ते इथे पुण्यात्म्यांना भेटतात. त्यांना तत्वज्ञान आपल्या मुख कमलातून सांगतात. ते परमात्मा वरच्या लोकात बसले आहेत. (ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ८६ मंत्र २६-२७ व मण्डल ८२ मंत्र १-२ आणि मण्डल नं. ९ सूक्त २० मंत्र १)

परमात्मा पृथ्वीवर कविप्रमाणे आचरण करत हिंडत-फिरत असतात. (ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ९४ मंत्र १)

परमात्मा आपल्या मुखातून वाणीने बोलून साधकांना भक्ति करण्याची प्रेरणा देत असतात. परमात्मा भक्तिच्या गुप्त मंत्रांनां प्रकट करतात. (ऋग्वेद मण्डल नं. ९ सूक्त ९५ मंत्र २)

परमात्मा तत्वज्ञानाला (कबीर वाणी) द्वारे लोकोक्ति, दोहे, चौपाई, द्वारे सांगतात. तो कविर्देव (कबीर परमेश्वर) आहे. परमेश्वर कबीर संत रूपात प्रकट होत असतात. त्या परमात्माकडून

ऋषि किंवा संतांकडून रचलेल्या असँख्य वाणीने जे तत्वज्ञान सांगतो, ते त्याच्या अनुयायांसाठी अमृततुल्य आनंददायक अनुभव असतो.

तो भगवंत प्रसिद्ध कविंमध्ये देखिल एक प्रसिद्ध कविची पदवी प्राप्त करतात. त्यांना कवि म्हणतात. परंतु ते परमात्मा असतात. ते परमात्मा तिसऱ्या मुक्ति धामी (सत्यलोक) विराजमान आहेत. ज्याप्रकारे मनुष्य निरनिराळी वस्त्रे धारण करतो, त्याचप्रमाणे तो परमात्मा भिन्न-भिन्न रूपात पृथ्वीवर प्रकट होत असतात. उपरोक्त ऋग्वेदाच्या मंत्रांवरून हे स्पष्ट आहे की परमात्मा आपल्या अमर धामातून चालून पृथ्वीवर प्रकट होत असतात. ते पुण्यात्म्यांना भेटतात. ते तत्वदर्शी संताची भूमिका निभावून तत्वज्ञान दोहे, चौपाई, वाणी द्वारे सांगतात. त्या परमात्माने सन् १३९८ ते १५१८ पर्यंत १२० वर्ष पृथ्वीवर भारतवर्षामधील पवित्र धरतीवर काशी शहरी विणकराचे (धाणक) रुप धारण करून तत्वज्ञान सांगितले होते.

कबीर, अक्षर पुरूष एक पेड़ है, क्षर पुरूष वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं, पात रूप संसार।।

**विशेष :- कबीर वाणी पुस्तकात एक वचन असेही लिहिले आहे :-**

कबीर, अक्षर पुरूष वृक्ष का तना है, क्षर पुरूष है डार।
त्रायदेव शाखा भए, पात जानों संसार।।

सरलार्थ :- वृक्षाचा जो भाग पृथ्वीवर बाहेर दिसतो, त्याची माहिती देताना सांगितले आहे की वृक्षाच्या खोडाला ''अक्षर पुरूष'' समजावे. त्या खोडातून वरच्या बाजूला एक जाडसर फांदी फुटते, त्यामधून एका फांदीला ''क्षर पुरूष'' समजावे. मग त्या फांदीतून मग तीन फांद्या निघतात. त्या तीन देवता :- (रजोगुण-ब्रह्म जी, सत्वगुण-विष्णु जी आणि तमोगुण- शिव जी) समजावे आणि त्या फांद्यांवर असलेली पाने म्हणजे जीव-जन्तु समजावे.

परमेश्वर कबीर जींनी तत्वज्ञानात सगळे ज्ञान सांगितले आहे. गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये देखिल म्हटले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांची माहिती (ब्रह्मणःमुखे) सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्मने आपल्या मुख कमलातून बोललेली वाणी विस्तार पूर्वक सांगितली आहे, तेच तत्वज्ञान आहे.

गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये म्हटले आहे की जे तत्वज्ञान परमात्मा स्वतः सांगत आहेत. त्यांना त्यांचे कृपापात्र संतच समजू शकतात. ते तत्वज्ञान तू तत्वदर्शी संतांकडे जाऊन समजून घे. त्यांना दंडवत् प्रणाम (पृथ्वीवर पोटावर पडून प्रणाम) करून, नम्रतापूर्वक प्रश्न करण्याने ते तत्वदर्शी संत तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

परमात्माने हे तत्वज्ञान स्वतः पृथ्वीवर प्रकट होऊन सांगितले होते. गीता अध्याय १५ श्लोक १ मध्ये तत्वदर्शी संताची ओळख सांगितली आहे की जो संत संसाररूपी वृक्षाच्या मूळापासून सर्व अंगांने जाणतो, तो तत्वदर्शी संत आहे.

❖ आता संसाररूपी वृक्षाचे सर्वांग जाणून घेऊया :-

१. मूळे (जड़) :- हे परम अक्षर ब्रह्म आहे जो सर्वांचे मालक आहेत. सगळ्यांना उत्पन्न करतो, सर्वांचे भरण-पोषण करतो व त्याची माहिती गीता अध्याय ८ श्लोक १ चे प्रश्नाचे उत्तर गीता अध्याय ८ च्याच श्लोक ३, ८, ९, व १० आणि २०, २१, २२ मध्ये दिले आहे. त्याचेच वर्णन गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये आहे. ज्याप्रमाणे गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत. :- एक ''क्षर पुरूष'' दूसरा ''अक्षर पुरूष'', हे

दोघेही आणि त्यांच्या अन्तर्गत जितके शरीरधारी प्राणीआहेत, ते सर्व नश्वर आहेत. कोणाचाच जीव आत्मा मरत नाहीं.

गीता अध्याय १५ च्याच श्लोक १७ मध्ये म्हटले आहे की (उत्तम पुरूषः) म्हणजेच पुरूषोत्तम तर (अन्यः) दुसराच आहे. ज्याला (परमात्मा इति उदाहृतः) परमात्मा म्हटले जाते. (यः लोकत्रयम्) तो तिन्ही लोकात (अविश्य विभर्ती) प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो आहे. (अव्ययः ईश्वरः) तो अविनाशी परमेश्वर आहे, तो परम अक्षर ब्रह्म संसाररूपी वृक्षाचा मूल (जड़) रूप परमात्मा आहे. हा तोच परमात्मा आहे. ज्याच्या विषयी संत गरीबदास जींनी म्हटले आहे :-

''भजन करो उस रब का, जो दाता है कुल सब का''

तो असँख्य ब्रह्माण्डांचा स्वामी आहे. तो क्षर पुरूष आणि अक्षर पुरूष यांचादेखिल स्वामी व उत्पत्तिकर्ता आहे.

२. अक्षर पुरूष :- हे संसार रूपीवृक्षाचे खोड समजावे. तो सात (७) शंख ब्रह्माण्डांचा स्वामी आहे, नश्वर आहे.


३. क्षर पुरूष :- हा गीता ज्ञान दाता आहे, त्याला क्षर ब्रह्मदेखिल म्हणतात. हा केवळ २१ ब्रह्माण्डांचा स्वामी, नश्वर आहे.

४. तीन देवता (रजोगुण ब्रह्मा, सत्वगुण विष्णु आणि तमोगुण शिव) तीन शाखा :- हे एका ब्रह्माण्डापासून बनलेल्या तीन लोकांचे (पृथ्वी लोक, पाताल लोक आणि स्वर्ग लोक) एक-एक विभागाचे मंत्री आहेत, स्वामी आहेत.

जसे = रजोगुण विभागाचे श्री ब्रह्मा जी स्वामी आहेत, ज्याच्या प्रभावाने सर्व प्राणी सन्तानोत्पत्ति करत आहेत. सत्वगुण विभागाचे श्री विष्णु जी स्वामी आहेत ज्यामुळे एकेमेकांवरील ममत्व टिकून राहते, कर्मानुसार सर्वांना फळ देत आहेत. तमोगुण विभागाचे श्री शिव जी स्वामी आहेत, ज्यामुळे सर्वांचा अंत होतो. आहे आणि पातरूपात विश्वातले प्राणी समजावे. हे आहे विश्वरूपी वृक्षाच्या सर्वांगाची वेगवेगळी माहिती. हे ज्ञान स्वतः परमेश्वर कबीर जींनी आपल्या मुख कमला मधून सांगितली आहे. हे सर्व कबीर वाणी, कबीर बीजक, कबीर शब्दावली आणि कबीर सागर मध्ये श्री धनी धर्मदास (बाँधवगढ़ वाले) यांच्याकडून लिहिली गेली आहे. त्या परमात्माने असेही सांगितले आहे की वर्तमानात हे फक्त या सेवकाला (संत रामपाल दास) समजले आहे. ही कृपा परमेश्वर कबीर जींचीच आहे की संपुर्ण आध्यात्म ज्ञान मला प्राप्त आहे.

गीता अध्याय १५ श्लोक १ अनुसार तत्वदर्शी संताची ओळखीवरून देखिल सिद्ध झाले की हा सेवक (संत रामपाल दास) तो तत्वदर्शी संत आहे.

गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ आणि १६ ते १७ चे सांराश रूप चित्र.




वरती मुळ खाली शाखा वाला उलटा लटकलेल्या संसार रुपी वृक्षाचे चित्र

**पुन : विषयाचा विचार करू की** ''भजन करो उस रब का,जो दाता है कुल सब का।''

आतापर्यंत हेच सांगितले कि भक्ति केली पाहिजे, पण आता कोणाची करावी? हे स्पष्ट करत आहेत. १. श्री ब्रह्माजी-रजोगुणाची किंवा, २. श्री विष्णुजी-सत्वगुणाची किंवा, ३. श्री शिव जी रूपी तमोगुणाची या तीन शाखांची किंवा ४. क्षर पुरूष गीता ज्ञान दातांच्या फांदीची किंवा, ५. अक्षर पुरूष खोडाची की ६. परम अक्षर पुरूष = मूळाची.

उदाहरण :- आपण रोपवाटिकेतून आंब्याचे रोप आणतो. ते आपल्या शेतात किंवा घराच्या अंगणात लावतो. ते कसे लावतो?

जमीनीत खड्डा खोदतो. रोपाचे मूळ खड्ड्यात ठेऊन ते मातीने झाकतो. मग रोपाच्या मुळाला (जड़ों) पाण्याने सिंचतो.खत टाकतो म्हणजेच रोपाच्या मुळांची पूजा करतो. मुळामधून खाद्य खोडाकडे नेते आणि खोड आपले खाद्य ठेऊन घेते आणि उर्वरित खाद्य पुढे फांदीकडे पाठविते. फांदी आपले खाद्य ठेऊन घेते आणि उर्वरित खाद्य पुढे शाखांकडे पाठविते. अशा प्रकारे फांद्या उर्वरित खाद्य पानांपर्यंत पोहोचवतात. अशा प्रकारे ते रोप झाड होऊन फळे देते.


सगळे साधक अतिशय सुज्ञ आहेत! आम्ही कोणत्या परमात्माची पूजा केली पाहिजे हे ते समजून गेले असतील?


सुक्ष्मवेदात परमेश्वर कबीर जी सांगतात की :-

कबीर, एकै साधै सब सधै, सब साधै सब जाय।
माली सींचै मूल कूँ, फूलै फलै अघाय।।

एका मूळ स्वामीची पूजा केल्यास सर्व देवतांची पूजा केल्यासारखेच असून ते शास्त्रानुकूल आहे. जे तिन्ही देवतांपैकी एक किंवा दोन (श्री विष्णु-सत्वगुण आणि श्री शिव तमोगुण) देवतांची पूजा करतात. या तिघांचीही पूजा ईष्ट रूपात करतात. तर गीता अध्याय १३ श्लोक १० मध्ये वर्णन केल्यानुसार अव्यभिचारिणी भक्ति नस्ल्यामुळे व्यर्थ आहे. ज्याप्रमाणे जी कोणतीही स्त्री आपल्या पति व्यतिरिक्त अन्य पुरूषांशी शारीरिक सम्बन्ध करत नाहीं, ती अव्यभिचारिणी स्त्री आहे व जी अनेक पुरूषांशी शारीरिक संबंध करते, ती व्यभिचारिणी असल्यामुळे समाजात निन्दनीय असते. तिच्या पतीच्या मनातून ती उतरते.

शास्त्रानुकूल साधना म्हणजेच सरळ थेट लावलले बीजाचीच भक्तिरूप असलेल्या रोपाचे चित्र याच पुस्तकाच्या पृष्ठ २११ वर व शास्त्राविरूद्ध साधना म्हणजेच उलट्या लावलल्या भक्तिरूपी रोपाचे चित्र पृष्ठ २१२ वर पाहावे.


गीता अध्याय नं. १५
श्लोक नं. १ व २ तसेच
१६-१७ चा आशय
ब्रह्मा (रजगुण)
शिव (तमगुण)
विष्णु (सतगुण)
कबीर – अक्षर पुरुष एक पेड़ है,
निरंजन वाकी डार ।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार ।।
फांदी
फांदी = [ क्षर ब्रह्म अर्थात
क्षर पुरुष (कालब्रह्म) ]
कबीर – हम ही अलख अल्लाह हैं
मूल रुप करतार।
अनन्त कोटि ब्रह्मण्ड का,
मैं ही सिरजनहार।।
खोड
(अक्षर पुरुष परब्रह्म)
कबीर साहेब
(मूळ जड)
शात्रानुकूल साधना
अर्थात सरळ पेरलेले भक्ती रुपी रोपटे


गीता अध्याय नं. १५
श्लोक नं. १ ते ४ तसेच
१६ व १७ चा आशय
पूर्ण ब्रह्म कबीर साहेब
जड़
कबीर – अक्षर पुरुष एक पेड़ है,
निरंजन वाकी डार ।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार ।।
कबीर – हम ही अलख अल्लाह हैं
मूल रुप करतार।
अनन्त कोटि ब्रह्मण्ड का,
मैं ही सिरजनहार।।
खोड
अक्षर ब्रह्म अर्थात
अक्षर पुरुष (परब्रह्म)
फांदी
(क्षर पुरुष)
(शाखा)
विष्णु (सतगुण)
शिव (तमगुण)
ब्रह्मा (रजगुण)
शास्त्रविरुद्ध साधना
अर्थात उलटे पेरलेले भक्ती रुपी रोपटे

एका मूळ परमात्माची भक्ति करण्याने साधकाचे आत्म–कल्याण शक्य आहे. हे उपरोक्त प्रमाणांवरून स्पष्ट झाले.

अन्य प्रमाण :– गीता अध्याय ३ श्लोक १० ते १५ मध्ये याच उपरोक्त भक्तिचा पुरस्कार केला आहे.

❖ गीता अध्याय ३ श्लोक १० = प्रजापतिने म्हणजेच कुळाच्या स्वामीने सृष्टिच्या सुरवातीला यज्ञासहित म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांच्या ज्ञानासहित प्रजेची उत्पत्ती करून आदेश दिला होता की आपण सर्व धार्मिक अनुष्ठानांद्वारे वृद्धि प्राप्त करून घ्यावी. हे यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठान आपल्याला इच्छित प्रसाद प्रदान करणार आहेत. (गीता अध्याय ३ श्लोक १०)

❖ या शास्त्रानुकूल धार्मिक अनुष्ठानांच्या द्वारे देवतांना (संसार रूपी रोपाच्या फांद्या) उन्नत करा म्हणजेच पूर्ण परमात्माला (मूल मालिक) ईष्ट समजून साधना करण्याने शाखा आपोआप प्रगती करत राहतात. हे आधीच स्पष्ट झाले आहे. मग त्या देवता (फांद्या मोठ्या होऊन फळे देतील) तुम्हा लोकांना उन्नत करतील म्हणजेच जेंव्हा आम्ही शास्त्रानुकूल साधना करू तेव्हा आमच्या भक्तिने जी कर्मे बनंतिल कर्मांचे फळ या तिन्ही देवता (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी रूपी फांद्या च देतील. अशा प्रकारे एकमेकांना उन्नत करत तुमचे कल्याण होईल आणि यामुळे दूसऱ्या परमात्माला प्राप्त व्हाल. (हे ज्ञान गीता ज्ञान दाता सांगत आहेत) (गीता अध्याय ३ श्लोक ११)

❖ शास्त्रानुकुल केलेले यज्ञ म्हणजेच अनुष्ठानांद्वारे पुरस्कृत झालेल्या देवता म्हणजेच संसाररूपी रोपाच्या फांद्या तुम्हा लोकांना न मागताच इच्छित प्रसाद निश्चितच देत राहतील. ज्याप्रमाणे रोपाच्या मुळाला सिंचून रोपाचे झाड होते व फांद्या फळांनी लगडतात मग त्या वृक्षाच्या शाखा आपल्याला दरवर्षी फळे देतील म्हणजे आपण केलेल्या शास्त्रानुकूल भक्ति कर्माची फळे साठत जातात, ते याच देवता आपल्याला देत राहतील, मग आपण मागा किंवा मागू नका. जर त्या देवतांकडून दिलेल्या आपल्या कर्माचे संस्काराचे पुण्य पुनःधर्मार्थ वापरले गेले नाही, तर तो साधक भक्तीचा चोर असतो. भविष्यात पुण्यहिन होऊन त्याला हानि सहन करावी लागते.(गीता अध्याय ३ श्लोक १२)

❖ यज्ञातून उरलेले अन्न खाणारे संतजन सर्व पापांपासून मुक्त होतात. भावार्थ हाच आहे की तत्वदर्शी संत सर्व प्रथम परम अक्षर ब्रह्मला प्रसाद नैवेद्य दाखवून मग उरलेले भोजन सर्व भक्तांमध्ये वितरित करतात. ते संत सर्व भक्ति मंत्रदेखिल शास्त्रानुकूल देतात हीच सत्य साधनेची खुण आहे. त्यामुळे साधक सर्व पापांमधून मुक्त होऊन सत्यलोकात जातो आणि जे पापी लोक शास्त्राविधिनुसार धार्मिक क्रिया करत नाहींत किंवा धर्म करत नाहींत, केवळ आपल्या शरीराचे पोषण करण्यासाठीच अन्न शिजवतात, ते तर पापच सेवन करत आहेत. (गीता अध्याय ३ श्लोक १३)

❖ सगळे प्राणी अन्नापासूनच उत्पन्न होतात म्हणजेच अन्न सेवन केल्यानेच शरीरात संतानोत्पत्तिचा पदार्थ तयार होतो.ज्यायोगे सर्व प्राण्यांची उत्पत्ति होत असते. अन्नाची उत्पत्ति वृष्टितून होत असते. पाउस शास्त्रविधिनुसार केलेल्या यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानानेच होत असतो. यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठान शास्त्रात वर्णन केल्यानुसार विधि केले जातात. कर्म ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूषापासून उत्पन्न झाल्याचे जाणा कारण आपण ब्रह्म (काल) लोकात आलो आहोत. तेव्हा आपल्याला कर्म करूनच सर प्राप्त होत असते. जेव्हा आपण सत्यलोकात

होतो, तेव्हा काहीही कर्म न करता सर्व प्राप्त होते. त्यामुळेच म्हटले आहे की कर्म हे ब्रह्मपासून (काल) उत्पन्न झाल्याचे जाणा आणि ब्रह्मची (काल) उत्पत्ति अविनाशी परमात्मापासून झाली. (याचे वर्णन गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये आहे आणि सृष्टि रचना अध्यायात वाचावे.) यावरून सिद्ध होते आहे की (सर्वगतम् ब्रह्म) सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा म्हणजेच परम अक्षर ब्रह्म हे नेहमीच यज्ञात म्हणजेच धार्मिक अनुष्ठानात (प्रतिष्ठितम्) प्रतिष्ठित आहे म्हणजेच सर्व धार्मिक क्रियांमध्ये परम अक्षर ब्रह्म ईष्ट रूपात पूज्य आहे. (गीता अध्याय ३ श्लोक १४-१५)

परम अक्षर ब्रह्म गीता ज्ञान दात्याहून अन्य आहे.

गीता ज्ञान दात्याने स्वतःगीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये म्हटले आहे की हे भारत तू सर्वभावाने त्या परमात्माला म्हणजेच परम अक्षर ब्रह्मला शरण जा, त्या परमात्माच्या कृपेनेच तू परम शान्ति आणि शाश्वत स्थान म्हणजेच सनातन परम धामाला प्राप्त होशील.

❖ गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की तत्वदर्शी संत भेटल्यानंतर तत्वज्ञान रूपी शस्त्राद्वारे अज्ञान दूर करून परमात्माचं त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यावर साधक फिरून परत कधीही मृत्युलोकात जन्म घेत नाहीं म्हणजेच त्यांना सनातन परम धाम प्राप्त होते, जिथे परमशान्ति आहे,काहीही कष्ट नाहीं आहे, तिथे मृत्यु नसतो, तिथे वृद्धावस्था नसते, कोणत्याही पदार्थाचा अभाव नसतो. ज्या परमात्मापासून संसाररूपी वृक्षाचा प्रवृति विस्तार झाला आहे त्याच परमात्माची भक्ति केली पाहिजे.

❖ गीता अध्याय १३ श्लोक १७ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की ते परब्रह्म म्हणजेच माझ्याहून वेगळा परमात्मा, वेगळ्या शब्दात सांगायचे तर परम अक्षर ब्रह्म (जे ज्योतीची ज्योती व मायेच्या पासून अत्यंत दूर व्यापून असल्याचे सांगितले जाते. गीता अध्याय ८ श्लोक ३ मध्ये सांगितले आहे.) बोधरूप (जानने योग्य) परमात्मा तत्वज्ञानाने प्राप्त करण्यायोग्य आहे आणि सर्वांच्या हृदयात विशेष रूपाने स्थित आहे. (गीता अध्याय १३ श्लोक १७)

विचार करा :- ज्या तत्वज्ञानाने परम अक्षर ब्रह्म प्राप्त होत आहे, त्याला सूक्ष्म वेद देखिल म्हणतात. त्याचे ज्ञान गीता ज्ञान दात्याकडे नाहीं. त्यामुळे गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ४ श्लोक ३२ आणि ३४ मध्ये सांगितले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांचे विस्तारपूर्वक ज्ञान स्वतः(ब्रह्मणः मुखे) सच्चिदानन्द घन ब्रह्म परमात्मा म्हणजेच परम अक्षर ब्रह्म आपल्या मुख कमलाने सांगत आहेत, ज्याला सच्चिदानन्द घन ब्रह्माची वाणी असे म्हटले जाते. त्यालाच तत्वज्ञान म्हणतात. ते जाणून साधक सर्व पापातून मुक्त होतात. (गीता अध्याय ४ श्लोक ३२)

❖ साधकांना विनंती आहे की गीता अध्याय ४ श्लोक ३२ च्या मूळ पाठात ''ब्रह्मणः'' शब्द आहे. गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित गीता किंवा अन्य ठिकाणांहून प्रकाशित गीतात अनुवादकानी ब्रह्मणः शब्दाचा अर्थ ''वेद'' असा केला आहे, तो चुकीचा आहे.

गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये देखिल ''ब्रह्मणः'' शब्द आहे, त्याचा अर्थ अनुवादकांनी सच्चिदानन्द घन ब्रह्म असा ठीक केला आहे. त्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये ''ब्रह्मणः मुखे'' याचा अर्थ सच्चिदानन्द घन ब्रह्मच्या मुख कमलाने उच्चरित वाणी असा करणे उचित आहे.

गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जे तत्वज्ञान

परमात्माने आपल्या मुख कमलाने सांगितले आहे, ते तू तत्वदर्शी संतांकडून समजून घे, त्यांना साष्टांग दण्डवत् प्रणाम करून, नम्रतापूर्वक प्रश्न केल्यास ते परमात्म तत्वाला चांगल्या प्रकारे जाणणारे तत्वदर्शी महात्मा तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

प्रभु प्रेमी साधकहो यावरून सिद्ध झाले की ज्या तत्वज्ञानामुळे परम अक्षर परमात्मा प्राप्त होतो, ते गीता ग्रन्थांत नाहीं आहे. गीता चार वेदांचे (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) संक्षिप्त रूप आहे, त्यांचा सारांश आहे. त्यावरून सिद्ध झाले की सूक्ष्मवेदातील तत्वज्ञान कोणत्याही प्रचलित सद्ग्रन्थांत नाहीं. ते ज्ञान माझ्या (संत रामपाल दास) जवळ आहे , विश्वात कोणाकडेही नाहीं.

प्रश्न :– श्री ब्रह्मा जी रजोगुण, श्री विष्णु जी सतगुण आणि श्री शिव जी तमोगुण देखिल ईष्टरूपात पूज्य नाहीत काय? हिन्दू धर्मात याच देवतांची पूजा केली जात आहे. हिन्दू धर्मगुरू, शंकराचार्य आणि अन्य यांचीच पूजा म्हणजे ईष्टरूपाची पूजा समजून करण्यास सांगत आहेत. ते स्वतःदेखिल तसेच करीत आहेत. आपण सांगता ते अविश्वसनीय वाटते. आपण गीतातून प्रमाणित करू शकता काय?

उत्तर :– हिंन्दू धर्माच्या धर्मगुरुना आपल्या सद्ग्रन्थांचे ही ज्ञान नाहीं. ज्याप्रमाणे अक्षर ज्ञान देणाऱ्या अध्यापकाला आपल्या पाठ्यक्रमातील पुस्तकांच्या उल्लेखाचे ज्ञान नाहीं तो अध्यापक विद्यार्थ्यांसाठी हानिकारक असतो. तो शिक्षकच व्यवस्थित नाही. हिंन्दू धर्माच्या धर्मगुरूंची तशी स्थिती आहे.

प्रमाण :– श्रीमद्भगवत गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की तिन्ही गुणांनी (रजगुण श्री ब्रह्मा जी कडून उत्पत्ति, सतगुण श्री विष्णु जी कडून स्थिति आणि तमोगुणी श्री शिवजीकडून संहार) जे होत असते, त्याचे निमित्त मी आहे, परंतु त्यांच्यात मी आणि ते माझ्यात नाहीत. (गीता अध्याय ७ श्लोक १२)

आधी हे प्रमाणित करतात की रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमगुण शिव आहे:–

१. मार्कण्डेय पुराण (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित केवल हिन्दी सचित्र मोटा टाईप) च्या पृष्ठ १२३ वर लिहिले आहे की ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे ब्रह्मच्या प्रधान शक्ति आहेत. हेच तीन गुण आहेत, तेच या तीन देवता आहेत.

२. श्री देवी पुराणाच्या (श्री खेमचन्द श्री कृष्णचन्द वैंकेटेश्वर प्रैस मुम्बई द्वारा प्रकाशित) तिसऱ्या स्कंदाच्या अध्याय ५ श्लोक ८ मध्ये म्हटले आहे :–

यदा दयादर्मना सदा अम्बिके कथम् अहमं विहितः तमोगुणः
कमलजः रजगुणः कथम् विहितः च श्री हरिः सतगुणः (देवी पुराण३/५/८)

अनुवाद :– परमेश्वर शिव आपल्या दुर्गा मातेला प्रश्न विचारत आहेत की हे माते! जर आपण आमच्यावर दयायुक्त आहात तर मला म्हणजेच तमोगुणाला का उत्पन्न केले? कमळापासून उत्पन्न ब्रह्माजींना रजोगुण आणि श्री विष्णुजींना सत्वगुण का केले?

❖ यावरून प्रमाणित झाले की १. पाहिजे तर रजोगुण म्हणा किंवा ब्रह्मा जी म्हणा २. पाहिजे तर सतगुण म्हणा किंवा विष्णु जी म्हणा, ३. पाहिजे तर तमोगुण म्हणा किंवा शिव जी म्हणा.

गीता अध्याय ७ श्लोक १२ चा भावार्थ :–गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे. प्रमाण गीता अध्याय ११ श्लोक ३१–३२, अध्याय ११ श्लोक ३१ मध्ये अर्जुनाने विचारले–हे

महानुभाव! आपण कोण आहात? श्री कृष्ण जी व अर्जुन एकमेकांचे नात्याने मेव्हणे होते. श्री कृष्णजींची बहिण सुभद्रेचा विवाह अर्जुनाशी झाला होता. विचार करा की जर गीता ज्ञान दाता श्री कृष्ण असते, तर अर्जुनाला हे विचारण्याची वेळच आली नसती की आपण कोण आहात? मेव्हणे एकमेकांना ओळखणार नाहीत काय? वास्तवात श्री कृष्णजींच्या शरीरात प्रेतवत् प्रवेश करून काल ब्रह्म गीता ज्ञान सांगत होता. (अधिक प्रमाणासाठी ''गीता तेरा ज्ञान अमृत'', ''गहरी नजर गीता में'', ''ज्ञान गंगा'', ''आध्यात्मिक ज्ञान गंगा'' ही पुस्तके वाचावीत आणि सत्संगाची **D.V.D.** बघावी की श्रीमद्भगवत गीताचे ज्ञान कोणी सांगितले होते. हे सर्व आमचे **Website - www.jagatgururampalji.org** वर निशुल्क उपलब्ध आहे. ते निःशुल्क डाउनलोड करता येते. **Youtube** वर देखिल आपण शोधू शकता. **(Satsang Barwala Ashram** किंवा **Sant Rampal Ji)** गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे. हे गीता अध्याय ११ श्लोक ३२ मध्ये स्वतः म्हणत आहे की मी काल आहे. आता प्रवृत झालो आहे म्हणजेच आता प्रकट झालो आहे. जर श्री कृष्ण जी गीता ज्ञान सांगत असते, तर मी आता आलो आहे. असे म्हणाले नसते कारण श्री कृष्ण जी तर आधीपासूनच तिथे विराजमान होते. श्री कृष्णजींनी यापूर्वी कधीही म्हटलेले नाहीं की मी काल आहे, किंवा नंतर देखिल सर्वांचा नाश करणारा काल आहे.असे नंतरही म्हटलेले नाही. कौरवांच्या सभेत आपले विराट रूपदेखिल दाखवले होते. विराट रूप भक्ति युक्त प्रत्येक आत्माचा असतो. त्याचे प्रकटन कोणीतरी एखादाच करू शकतो. हे भक्तिच्या शक्तिनुसार होत असते.

गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ११ श्लोक ४७ मध्ये म्हटले आहे की अर्जुन! माझे विराट रूप तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणीही पाहिलेले नाही. साधकांना विनंती आहे की श्री कृष्णजींनी तर आपले विराट रूप आधीच कौरवांच्या सभेतच दाखविले होते. व तिथे उपस्थित शेकडो कौरवांच्या सहित हजारोनी पहिले होते. जर श्री कृष्ण जी गीता ज्ञान सांगत असते, तर माझे विराट रूप तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणीही पाहिलेले नाहीच असे कदापि म्हटले नसते. यावरून स्पष्ट आहे की गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये त्यालाच क्षर पुरूष म्हटले आहे. ज्याने गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये म्हटले आहे की :-

''ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्यवहारन् माम् अनुस्मरन्
य: प्रयाति त्यजन् देहम् स: याति परमाम् गतिम्''

सरलार्थ :- गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की (माम् ब्रह्म) मज ब्रह्मचे (ओम् इति एकाक्षरम्) हे एक ॐ अक्षर आहे. (व्यवहारन्) उच्चारण करून (अनुस्मरन्) स्मरण करत (यः प्रयाति त्यजन् देहम्) जो साधक शरीर त्यागून जात आहे, (सः याति परमाम् गतिम्) तो ॐ नामाने असणाऱ्या परम गतिला प्राप्त होतो. हेच आणखी स्पष्ट करतो.

श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोटा टाईप केवळ हिन्दी, गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित) सातव्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर प्रकरण अशा प्रकारे आहे :-

श्री देवी जी राजा हिमालयाला ब्रह्म ज्ञानोपदेश देत आहे. म्हटले की हे राजन्! तू ओम् (ॐ) नामाचा जप कर ज्यायोगे ब्रह्मची प्राप्ति होते. हा ॐ नाम ब्रह्म जप मंत्र आहे आणि सर्व पूजा सोडून केवळ एक ॐ नामाचा जप कर, ब्रह्म प्राप्तिचे उद्दिष्ट ठेव. तुझे कल्याण होवो. याने ब्रह्मला प्राप्त होशील. ते ब्रह्म दिव्य आकाश रूपी ब्रह्म लोकात रहातात. या देवी महापुराणावरून स्पष्ट झाले की ओम् (ॐ) ब्रह्मचा नाम जप आहे.

अन्य प्रमाण :- श्री शिव महापुराणाच्या (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित सचित्र

मोटा टाईप) विध्वेश्वर संहितेच्या पृष्ठ २३ ते २५ वर प्रकरण अशा प्रकारे आहे.

एकदा श्री ब्रह्मा जी रजोगुण आणि विष्णु जी सतगुण यांच्या मध्ये युद्ध झाले. कारण असे झाले की श्री ब्रह्माजींनी श्री विष्णुजींच्या निवासी जाऊन असे म्हटले की अरे अभिमानी! मी आल्यावर तू उठून माझा सत्कार सुध्दा केला नाही. मुलगा असून पित्याचा आदर करत नाहीस. मी सर्व जगताची उत्पत्ति करणारा सर्वांचा पिता आहे. हे शब्द ऐकून श्री विष्णुजींना मनातून खूप राग आला, परंतु वरवर हसून म्हटले की ये पुत्रा,मी तुझा पिता आहे. माझ्या नाभि कमलातून तुझी उत्पत्ती झाली आहे. या गोष्टीवर दोघेही शस्त्र उचलून एकमेकांशी युद्ध करू लागले. त्याच वेळेस काल ब्रह्मने त्या दोघांमध्ये एक तेजोमय स्तंभ उभा केला. त्यामुळे दोघांनी युद्ध करणे थांबविले. त्याच वेळेस काल ब्रह्मने आपल्या पुत्राचे शिवाचे रूप बनविले आणि आपली पत्नी दुर्गा हिला पार्वती बनवून त्यांचेजवळ प्रकट झाले. त्या दोघांना म्हणाले की इथला ईश्वर कोण आहे, याचे तुम्हाला दोघांनाही ज्ञान नाही आहे. मी ब्रह्म आहे. हे विश्व माझे आहे, हे विष्णु आणि ब्रह्मा! तुम्ही दोघांनी तप करून माझ्याकडून एक-एक कृत्य प्राप्त केले आहेत. ब्रह्माला सृष्टिच्या उत्पत्तिचे आणि विष्णुला स्थितिचे. मुलांनो ऐका! अशाच प्रकारे महेश आणि रूद्राला देखिल मी एक-एक कृत्य संहार आणि तिरोभाव दिले आहेत. पुढे म्हटले आहे की ओम् (ॐ) हा माझा एक अक्षरी मंत्र जप आहे. हा पाच अवयवांचा (अ, उ, य, नाद आणि बिन्दु) मिळून एक ''ॐ'' अक्षर मंत्र बनला आहे. साधकांना हे स्पष्ट झाले की ''ॐ'' हा ब्रह्मचा एक अक्षर जप मंत्र आहे. हे ही स्पष्ट झाले की काल ब्रह्म श्री ब्रह्मा,श्री विष्णु आणि श्री महेश यांच्यापेक्षा अन्य आहे आणि ब्रह्मा जी, विष्णु जी आणि शिव जी हे तिघेही काल ब्रह्मचे पुत्र आहेत.

अन्य प्रमाण :- श्री शिव महापुराणमध्ये (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित, सचित्र मोटा टाईप) मध्ये रूद्र संहितेच्या पृष्ठ ११० वर लिहिले आहे की रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव तिन्ही देवतांचे गुण आहेत. मी या सर्वांच्या पेक्षा भिन्न आहे.

या सर्व प्रमाणांवरून स्पष्ट झाले की गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे, त्याला शाप आहे की हा दररोज एक लाख मानव शरीरधारी प्राणी खाईल आणि सवा लाख रोज उत्पन्न करेल.

यामुळे त्याने आपल्या तिन्ही पुत्रांना एक-एक गुणयुक्त करून ठेवले आहे. यांच्या शरीरातून निघणाऱ्या गुणांच्या सूक्ष्म प्रभावाने प्रत्येक प्राण्याला विवश करून कार्य करवून घेतो. ज्याप्रमाणे स्वयंपाकघरात मिरच्यांमुळे ठसका लागतो, शिंक येते. त्या शिन्कांना आपण थांबवू शकत नाही. स्थूल रूपाने मिरची स्वयंपाकघरात असते. परंतु तिच्यातून निघणाऱ्या गुणांमुळे लांबवर खोलीत बसलेले लोक प्रभावित होतात.

त्याच प्रकारे तिन्ही देवता (श्री ब्रह्मा जी,श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) आपल्या आपल्या लोकी राहत आहेत. परन्तु त्यांच्या शरीरातून निघणाऱ्या गुणांचा सूक्ष्म प्रभाव तिन्ही लोकातील (स्वर्ग लोक, पाताल लोक, पृथ्वी लोक) प्राण्यांना प्रभावित करत आहे. त्यामुळे काल ब्रह्मसाठी एक लाख माणसांचा आहार तयार होतो आहे. त्यामुळे गीता अध्याय ७ श्लोक १२ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की :-

❖ तिन्ही गुणांमुळे जे काही होत आहे, त्याचे निमित कारण मीच आहे. जसे रजोगुण ब्रह्मा जी पासून उत्पत्ति, सत्वगुण विष्णु जी पासून स्थिति आणि तमोगुण शिव जी पासून संहार होतो आहे. हे सर्व माझ्यासाठीच यांच्याकडून होत आहे असे जाणा, परन्तु ते माझ्यात आणि मी त्यांच्यात नाहीं कारण काल ब्रह्म या तिन्ही देवतांपेक्षा भिन्न आहे. (गीता

अध्याय ७ श्लोक १२)

❖ सारे विश्व याच तीन गुणांवर (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) मोहित आहे. तिथपर्यंतच त्या विश्वाचे ज्ञान आहे. या तिन्ही देवतांच्या पलीकडे मला आणि (अव्ययम्) या अविनाशी परमात्माला जाणत नाहीं. (गीता अध्याय ७ श्लोक १३)

❖ कारण ही अलौकीक त्रिगुणमयी असलेले माझी माया (म्हणजेच माझ्या पुत्रांकडून पसरविण्यात आलेले मायाजाल) मोठी कठीण आहे, निक्कमी आहे. जे साधक केवळ माझेच (काल ब्रह्म)भजन करतात, ते या मायेचे (ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या भक्तिने होणाऱ्या लाभापेक्षा अधिक लाभ ब्रह्म भक्तित आहे. म्हणून म्हटले आहे की जे या तिघांकडून मिळणाऱ्या लाभांचा त्याग करून काल ब्रह्मची साधना करत आहेत, ते यांचे उल्लंघन करून म्हणजेच यांच्या साधनेचा त्याग करतात) उल्लंघन करून जात आहेत. (गीता अध्याय ७ श्लोक १४)

❖ गीता अध्याय ७ श्लोक १५ मध्ये म्हटले आहे की :– तिन्ही गुणरूपी (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) मायाजाला कडून ज्यांचे ज्ञान हरण झाले आहे म्हणजेच जे साधक या तिन्ही देवतांच्या पेक्षा भिन्न देव जाणतच नाहीत. त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या नाममात्र लाभालाच मोक्ष मानून तिथेच अडकून पडतात. त्यांचीच उपासना करत राहतात. अशा व्यक्ति असुर स्वभाव धारण करून असलेले मनुष्यांमध्ये नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख जन मज काल ब्रह्मची भक्ति करत नाहीत. (गीता अध्याय ७ श्लोक १५)

गीता अध्याय १४ श्लोक १९ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे. की ज्यावेळेस द्रष्टा म्हणजेच तत्वज्ञान श्रवण करणारा आणि तिन्ही गुणांची (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) ईष्ट रूपात पूजा करणारा आपली जुनी धारणा बदलत नाही म्हणजेच या तिघांच्या व्यतिरिक्त कोणालाच कर्ता मानत नाहीं आणि या तिघांच्याही पलीकडील पूर्ण परमात्माचे ज्ञानदेखिल प्राप्त करून घेतो, तो माझ्या जाळ्यात राहतो आहे. (गीता अध्याय १४ श्लोक १९)

गीता अध्याय १४ श्लोक २० मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की देहधारी मनुष्य या तिघांचेही उल्लंघन करून म्हणजेच या तिघांच्याही पूजेचा त्याग करून जन्म–मरण आणि वृद्धावस्था आणि अन्य सर्व दुःखांपासून मुक्त होउन परमानन्द म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये वर्णन केल्यानुसार परम शान्ति आणि सनातन परम धामी प्राप्त होतो.

सारांश :– तिन्ही देवतांची (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) पूजा करणाऱ्या राक्षस स्वभाव धारण केलेल्या माणसांना नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख म्हटले आहे. भावार्थ असा की यांची पूजा केली नाही पाहिजे.

कारण :– १. हिरण्यकश्यपूने श्री ब्रह्मा जी म्हणजेच रजोगुणाची पूजा केली होती, आपल्या मुलाचा प्रल्हादाचा शत्रु बनला, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला.

२. रावणाने श्री शिव जी म्हणजेच तमोगुणाची पूजा केली होती, जगतजननी सीतेला पळवून पत्नी बनविण्याचा प्रयत्न केला, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला. भस्मासुराने देखिल शिवजींची म्हणजेच तमोगुणाची पूजा केली होती, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला.

३. श्री विष्णुजींची पूजा करणाऱ्यांना वैष्णव म्हणतात. एकदा हरिद्वार येथे एक कुम्भ पर्व सुरु होते. त्या पर्वात स्नान करण्यासाठी सर्व संत (गिरी, पुरी, नाथ, नागा) आले होते.

नागा श्री शिव जी म्हणजेच तमोगुणाचे पुजारी असतात. आणि वैष्णव श्री विष्णुजींचे म्हणजे सतगुणाचे पुजारी असतात. सगळे हरिद्वार मध्ये हर की पैड़ी वर स्नान करण्याची तयारी करू लागले व संख्या जवळपास २० हजारहोती. काही वेळानंतर तितक्याच संख्येने वैष्णव साधु हर की पैड़िवर आले. वैष्णव साधुंनी नागा साधंना म्हटले की आम्ही श्रेष्ठ आहोत. आम्ही आधी स्नान करणार. याच गोष्टीवरून भांडण झाले. तलवार, कटारी, सुऱ्या घेऊन लढू लागले. दोन्हीकडील जवळपास तिन्ही गुणांचे उपासक २५ हजार साधु मरण पावले.

म्हणूनच गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये तिन्ही गुणांच्या (रजोगुण ब्रह्मा, सत्वगुण विष्णु आणि तमोगुण शिव जी) उपासकांना राक्षस स्वभाव धारण केलेले मनुष्यातील नीच व दूषित कर्म करणारे मूर्ख म्हटले आहे.

यावरून सिद्ध झाले की रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिवजींची भक्ति करणारे मूर्ख, राक्षस, मनुष्यातील नीच व दूषित कर्म करणारे मूर्ख आहेत म्हणजेच यांची पूजा करण्यास श्रीमद्भगवत गीतात मनाई केली आहे, म्हणून यांची ईष्ट रूपात पूजा करणे व्यर्थ आहे.

## ''पूजा आणि साधना मधील फरक''

प्रश्न :– काल ब्रह्मची पूजा केली पाहिजे की नाहीं? गीतातील प्रमाण सांगावे.

उत्तर :– नाहीं केली पाहिजे. आधी आपल्याला पूजा आणि साधना यामधील भेद सांगतो.

भक्ति म्हणजेच पूजा :– जसे आम्हाला हे माहिती आहे की पृथ्वीच्या पोटात गोडे थंड पाणी आहे. ते आपण कसे काय प्राप्त करणार? त्यासाठी कुपनलिका खोदून त्यातून लोखंडाचा पाईप टाकून त्यावर हातपंप बसवतात, तेंव्हा ते थंड पाणी आपल्याला प्राप्त होते.

आपले पूज्य पाणी आहे, ते प्राप्त करण्यासाठी वापरायची उपकरणे आणि प्रयत्न म्हणजे साधना जाणावी. जर आपण उपकरणांची पूजा करत बसलो, तर पाणी मिळणार नाहीं, उपकरणे वापरून पूज्य वस्तु प्राप्त होते.

अन्य उदाहरण :– जशी पतिव्रता स्त्री कुटुंबातील सर्वांचा सन्मान करते, सासू-सासऱ्याना आईवडिलांसारखे, नणदेला छोट्या–मोठय बहिणीप्रमाणे, मोठ्या–छोट्या दिराला भावाप्रमाणे, मोठ्या–छोट्या जावांना बहिणीप्रमाणे वागवते, परंतु ती पूजा आपल्या पतिचीच करते. जेव्हा ते वेगळे होतात, तेव्हा आपल्या वाट्याच्या सर्व वस्तु उचलुन आपल्या पतिच्या घरी घेऊन जाते.

अन्य उदाहरण :– जशी आपली आंबे खाण्याची इच्छा होते, आपल्यासाठी आंबा पूज्य आहे. ते प्राप्त करण्यासाठी पैसे लागतात. पैसे साठविण्यासाठी मजूरी/नोकरी/शेती-बाड़ी करावी लागते, तेव्हा आंब्याचे फळ प्राप्त होते. त्यामुळे आंबा पूज्य आहे आणि अन्य क्रिया ही साधना आहे. साध्य वस्तु प्राप्त करण्यासाठी साधना करावी लागते. साधना भिन्न आहे, पूजा म्हणजेच भक्ति भिन्न आहे, हे स्पष्ट झाले.

प्रश्न चालला आहे की ब्रह्मची पूजा करावी की नाही. उत्तरात म्हटले आहे की केली नाही पाहिजे. आता श्रीमद् भगवत गीतातील प्रमाण दाखवतो.

गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये तर गीता ज्ञान दात्याने सांगितले आहे की तिन्ही गुणांची (रजोगुण श्री ब्रह्मा जी, सत्वगुण श्री विष्णु जी आणि तमोगुण श्री शिव जी) भक्ति व्यर्थ आहे. नंतर गीता अध्याय ७ के श्लोक १६–१७–१८ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने

आपल्या भक्तिने प्राप्त होणाऱ्या गतिला म्हणजेच मोक्षाला अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे. असे सांगितले आहे की माझी भक्ति चार प्रकारच्या व्यक्ति करतात.

१. अर्थार्थी :– धन लाभासाठी वेदानुसार अनुष्ठान करणारे.

२. आर्त :– संकट निवारणासाठी वेदानुसार अनुष्ठान करणारे.

३. जिज्ञासु :– परमात्मा विषयी जाणून घेण्यासाठी इच्छुक.

(ज्ञान ग्रहण करून स्वतः वक्ता बनणारे)

या तिन्ही प्रकारच्या ब्रह्म पुजारींना व्यर्थ असल्याचे म्हटले आहे.

४. ज्ञानी :– ज्ञानी जाणून असतो की मनुष्य जन्म अतिशय दुर्लभ आहे. मनुष्य जीवन प्राप्त करून आत्म–कल्याण करवून घेतले पाहिजे. त्यांना हेही ज्ञान होऊन जाते की अन्य देवतांची पूजा करून मोक्ष लाभ होणार नाहीं. त्यासाठी एका परमात्माची अनन्य भक्ति मनापासून केल्यास पूर्ण मोक्ष संभव आहे. त्यांना तत्वदर्शी संत न भेटल्यामुळे त्यांनी जसे वेद जाणले, त्याच आधारे ब्रह्मला एक समर्थ परमात्मा मानून यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ मधून ओम् नाम घेऊन भक्ति केली, परन्तु पूर्ण मोक्ष नाहीं झाला. ओम् (ॐ) हे नाम ब्रह्म साधनेचे आहे, त्याने ब्रह्मलोक प्राप्त होतो. जे की आधीच प्रमाणित केले आहे. गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्मलोक प्रर्यंत सगळे लोक पुनरावर्ती आहेत म्हणजेच ब्रह्मलोकी गेलेले साधक देखिल पुनः फिरून विश्वातील जन्म–मृत्युच्या चक्रात पडून फिरत राहतात.

काल ब्रह्मची साधना केल्याने गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगितलेला तत्वज्ञानाने अज्ञान दूर करून परमात्माच्या त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यानंतर साधक फिरून संसारात कधी परत येत नाहीं.

❖ गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की हे ज्ञानी आत्मा (जे चौथ्या क्रमांकाचे ब्रह्म साधक म्हटले जातात ते) उदार म्हणजेच प्रामाणिक आहे ते परंतु तत्वज्ञानाच्या अभावाने माझ्या अनुत्तम् गतितच स्थित राहिले. गीता ज्ञान दात्याने त्याच्या साधनाने प्राप्त होणाऱ्या गतिला देखिल अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे, म्हणून ब्रह्म पूजा करणे देखिल उचित नाहीं.

कारण :– एक चुणक नामक ऋषि ज्ञानी आत्मा होते. त्यांनी ओम् (ॐ) नाम जप आणि हठयोग हजारों वर्ष केला. त्यामुळे त्यांना सिद्धि प्राप्त झाल्या. ब्रह्मची साधना करण्याने जन्म–मृत्यु, स्वर्ग–नरक हे चक्र सदा सुरूच राहील कारण गीता अध्याय २ श्लोक १२ व गीता अध्याय ४ श्लोक ५ व गीता अध्याय १० श्लोक २ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. तुला माहित नाहीत, मी जाणतो. तू आणि मी आणि हे सर्व राजे लोक आधीही जन्मले होते, पुढेही जन्मतील. आपण आताच जन्मलो आहोत असे अजिबात समजू नकोस. माझी उत्पत्ति महर्षिजन आणि या देवता जाणत नाहींत कारण हे सर्व माझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत.

यावरून स्वसिद्ध आहे की जर गीता ज्ञान दाता ब्रह्म देखिल जन्म–मरणाच्या अधीन आहे, तर मग याचे पुजारी अमर कसे असू शकतील? त्यावरून हे सिद्ध झाले की ब्रह्मची उपासना करून कोणीही साधक मोक्ष होत नाही, गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगितलेला तो मोक्ष प्राप्त होणार नाही. या श्लोकांमध्ये गीता ज्ञान दात्याने असा स्पष्ट निर्देश दिला आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या परम अक्षर ब्रह्मला

शरण जा. त्या परमात्माच्या कृपेनेच तू परमशान्ति आणि सनातन परमधाम म्हणजेच सत्यलोक प्राप्त होशील. तत्वज्ञान समजून त्यानंतर अज्ञान दूर करून परमात्माच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यानंतर साधक फिरून संसारात कधी परत येत नाहीं. विचार करा की गीता ज्ञानदाता स्व:ता जन्मतो आणि मरतो म्हणून त्याच्या साधनाने प्राप्त होणाऱ्या गतिला देखिल अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे.

आता चुणक ऋषिचा कथा प्रसंग पुढे सांगतात :- चुणक ऋषिनी ॐ (ओम्) नाम जप आणि हठ योग केला. वेदात (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद) सांगितलेल्या भक्तिने परमात्माची प्राप्ति होत नाहीं. याचे प्रमाण गीता अध्याय ११ श्लोक ४७-४८ मध्ये आहे. गीता ज्ञान दाता ब्रह्म सांगतात की हे अर्जुन! मज काल ब्रह्मचे हे विराट रूप आहे. माझ्या या रूपाचे दर्शन तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणालाच झालेले नाही. मी तुझ्यावर अनुग्रह करून हे रूप दाखविले आहे. माझ्या या रूपाचे दर्शन म्हणजेच ब्रह्म प्राप्ति ही न वेदात वर्णन केल्यानुसार विधिवत म्हणजेच ॐ नाम जपाने, ना तपाने, न हवन इत्यादी यज्ञांनी होते म्हणजेच वेदात वर्णन केल्यानुसार विधिने ब्रह्म प्राप्ति होत नाही. चुणकांसारखे ऋषिदेखिल ब्रह्मला निराकार म्हणत राहिल्याचे हेच कारण होते. चुणक ऋषिना सिद्धि प्राप्त झाल्या. त्यामुळे त्यांना जगामध्ये कीर्ती प्राप्त झाली. सिद्धि प्राप्त साधक कोणाला श्राप देउन, तर कोणाला आशीर्वाद देऊन तर कोणावर सिद्धितून प्राप्त मंत्रांचा प्रयोग करून आपल्या वर्षानुवर्षांच्या साधनेचा व भक्तिचा नाश करतात. आणि जगात त्यांची स्तुती व प्रशंसा होऊन स्वतः परमात्मा होऊन राहतात.

एक मानधाता चक्रवर्ती राजा होता. त्याचे संपूर्ण पृथ्वीवर राज्य होते. सर्व राजे आपल्या अधीन आहेत की कोणाला स्वतंत्र होण्याची इच्छा आहे, हे त्याने एकदा तपासण्याचे ठरविले. म्हणून राजाने आपल्या खाजगी घोड़याच्या गळ्यात एक चिठ्ठी बांधली की ज्या राजाला मानधाता राजाचे मांडलिकत्व मान्य नसेल, त्याने या घोड्याला पकडून युद्धासाठी तयार राहावे. राजाकडे ७२ अक्षौणी सेना आहे. त्या घोडयासोबत शेकडो सैनिकदेखिल गेले. सगळी पृथ्वी पालथी घातली. कोणत्याही राजाने त्या घोड़याला पकड़ले नाहीं. यावरून स्पष्ट झाले की सगळ्या पृथ्वीवरील छोटया राजानी चक्रवर्ती शासक म्हणून मानधाता राजाच्या आधीन असल्याचे मान्य केले. घोड़या सोबत असलेले सर्व सैनिक आनंदाने परतत होते. रस्त्यात ऋषि चुणकांची कुटि होती. चुणक ऋषिनी घोड़्यांवर स्वार सैनिकांना विचरले की हे सैनिकांनो! कुठे गेला होतात? या घोड़यावरील स्वार कुठे गेला? सैनिकांनी ऋषिजींना सर्व गोष्ट सांगितली. ऋषिनी म्हटले कोणत्याच राजाने मानधाता राजाचे युद्धाचे आव्हान स्वीकारले नाहीं? सैनिक म्हणाले की आमच्या राजाशी युद्ध करू शकेल असा कोणी आहे का ज्याच्या बाहुमध्ये एवढी शक्ती आहे किंवा असा कोणी आईचे दुध प्यायलेला लाल आहे? राजा जवळ ७२ अक्षौणी म्हणजेच ७२ करोड़ सैन्य आहे. युद्ध करण्याची कोणी हिम्मत केलीच, तर त्याला मुळापासून उखडून फेकू. काल ब्रह्मचे पुजारी असलेल्या ऋषि चुणकांनी म्हटले की हे सैनिकहो! आपल्या राजाचे युद्धाचे आव्हान मी स्वीकारले आहे. हा घोड़ा बांधा माझ्या कुटिमधील वृक्षाला. सैनिक म्हणाले की हे कंगाल माणसा! खाण्यासाठी तुझ्याकडे दाणा नाही. राजा मानधाताशी तू काय युद्ध करणार? गुपचूप आपली भक्ति कर, कशाला नको ती शहामत ओढवून घेतो आहेस? ऋषिनी म्हटले, जे काय होईल ते बघू. जा, सांगा तुमच्या राजाला की तुमचे युद्धाचे आव्हान चुणक ऋषिने स्वीकारले आहे. राजाला समजले तेव्हा त्याने विचार केला की आज एका कंगाल माथेफिरू ऋषिला हिम्मत झाली आहे, उद्या अन्य कोणाची हिम्मत होईल. वाईट गोष्ट सुरवातीलाच संपवली पाहिजे. जनतेला भयभीत करण्यासाठी एका व्यक्तिला

मारण्यासाठी राजाचे ७२ करोड़ सैन्य चार तुकड्यांमध्ये विभागले गेले. एक १८ करोड़ सैनिकांची पहिली तुकडी ऋषिशी युद्ध करण्यास पाठविली गेली. काल ब्रह्मचे पुजारी चुणक ऋषिनी सिद्धि शक्तिने चार पुतळ्या बनविलया म्हणजेच चार परमाणु बॉम्ब तयार केले. एक पुतळी सोडली, तिने १८ करोड़ सेनेचा वध केला. राजा ने दूसरी तूकड़ी पाठविली. ऋषिजींनी दूसरी पुतळी सोडली. अशा प्रकारे राजा मानधाताच्या ७२ अक्षौणी सेनेचा नाश काल ब्रह्मचे पुजारी चुणकांनी केला.

विचार करा :- ऋषि-महर्षिनी राजाच्या मध्ये टांग टाकून त्याची अडवणूक करून नये. कारण असे आहे की ऋषिजनांनी हजारों वर्ष ॐ नामाचा जप परमात्मा प्राप्त करण्यासाठी केला. परमात्मा प्राप्त झाला नाहीं कारण गीता अध्याय ११ श्लोक ४७-४८ मध्ये लिहिले आहे की वेदांत (चारों वेदों ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) वर्णन केल्यानुसार भक्ति केल्याने ब्रह्म प्राप्ति होत नाहीं. म्हणूनच या ऋषिंना सिद्धि प्राप्त होतात. अज्ञानामुळे त्याच भूल-भूलैय्याला हे भक्तिचे फळ समजून बसले. त्यामुळे भक्ति करून देखिल जिथे गेल्यानंतर पुनः जन्म होत नाहीं असे पद प्राप्त करू शकले नाहीत कारण त्यांना कोणी तत्वदर्शी संत भेटलेच नाहींत. सूक्ष्म वेदात म्हटले आहे की :-

कबीर, गुरू बिन काहू न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भुस छड़े मूढ़ किसाना।
गुरू बिन वेद पढ़े जो प्राणी, समझे न सार रहे अज्ञानी।।
गरीब, बहतर क्षौणी खा गया, चुणक ऋषिश्वर एक।
देह धारें जौरा फिरें, सबही काल के भेष।।

भावार्थ :- तत्वदर्शी संत गुरू न भेटल्यामुळे साधक जी साधना करतात, ती शास्त्र विधिनुसार न होता. मनमानी आचरण होते ज्याचा साधकाला काहीच लाभ होत नाहीं. गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये प्रमाण आहे की हे भारत! जो साधक शास्त्र विधिला सोडून मनमानी आचरण करतो आहे, त्याला ना सुख, ना सिद्धि आणि ना त्याची गति प्राप्त होते म्हणजेच मोक्ष प्राप्त होत नाही. त्यामुळे कोणती साधना करावी आणि करू नये यासाठी तुझ्यासमोर शास्त्रेच प्रमाण आहे.

गुरूशिवाय म्हणजेच तत्वदर्शी संतांच्या शिवाय तुम्ही चारही वेद वाचा किंवा पाठ केले ज्याप्रमाणे पूर्वीचे ब्राम्हण वेद मंत्र लक्षात ठेवत असत. चारही वेदांचे मंत्र पाठ करणाऱ्यांना चतुर्वेदी म्हणत असत. तीन वेदांचे मंत्र पाठ करणाऱ्यांना त्रिवेदी म्हणत असत. परंतु त्यांना वेदांमधील गूढ़ रहस्यांचे ज्ञान नस्ल्यामुळे ते ऋषिजन वेदांचे पाठांतर करूनही अज्ञानीच राहिले. सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

''पीठ मनुखा दाख लदी है, ऊँट खात बबूल।''

भावार्थ असा की पूर्वी वाळवंटातून मनुका व द्राक्षे ऊँटाच्या पाठीवर लादून नेल्या जात असत. ऊँटाच्या पाठीवर तर इतक्या स्वादिष्ट मनुका व द्राक्षे लादलेल्या असायच्या आणि स्वतः मात्र बाभळीच्या झाडाच्या काटयामधून तोंड घालून बाभळीची पाने खात असे. ज्ञानाशिवाय सर्व ऋषि चारही वेद रूपी मनुका व द्राक्षे लादून फिरत असत आणि पूजा करत काल ब्रह्मरूपी बाभळीची; त्यामुळे त्यांना ना सनातन परम धाम ना परम शांति, काहीच प्राप्त झाले नाही. मग सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

बनजारे के बैल ज्यों, फिरा देश-विदेश।
खाण्ड छोड़ भुष खात है, बिन सतगुरू उपदेश।।

भावार्थ आहे की पूर्वी व्यापारी लोक बैलांवर गाढवासारखी पोती ठेऊन त्यात गुळ भरून घेऊन गावोगाव जायचे. बैलाच्या पाठीवर गुळाची पोती आहेत, ते स्वतः बैल भूस खात असे. त्याप्रमाणे गुरू कडून तत्वज्ञान न मिळाल्याने ऋषिजन वेदरूपी गुळ (साखर) कण्ठस्थ तर करत असत, परंतु त्यांना समजून न घेता साधना मात्र वेदाच्या विरूद्ध करत असत,

उदाहरण म्हणून :-

श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोटा टाईप केवल हिन्दी गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित) ५व्या स्कंदात पृष्ठ ४१४ वर लिहिले आहे :- वेद व्यास जींनी म्हटले की सत्ययुगात वेदांचे पूर्ण ज्ञान असलेले विद्धान ब्राह्मण होते. ते देवी म्हणजेच श्री दुर्गा जींची पूजा करत असत. प्रत्येक गावात श्री देवीजींचे मंदिर बांधण्याची त्यांची प्रबल इच्छा होती.

साधकांनी विचार करावा :-

चारही वेदांमध्ये आणि याच वेदांच्या सारांश श्रीमद् भगवत गीतात कुठेही देवीची पूजा करण्याचा निर्देश नाहीं आहे तर सत्ययुगातील ब्राह्मण कसले वेदांचे विद्वान असणार आहेत? याच श्री देवी पुराणाच्या ७ व्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर श्री देवीजींनी राजा हिमालयास म्हटले होते की तू माझी पूजा देखिल सोडून दे. जर ब्रह्म प्राप्तिची इच्छा असेल, तर सगळयाचा त्याग करून फक्त ओम् (ॐ) मंत्राचा जप कर. हा ब्रह्मचा मंत्र आहे. त्यायोगे ब्रह्मला प्राप्त होशील. ते ब्रह्म ब्रह्मलोक रूपी दिव्य आकाशात स्थित आहे. साधकांना सहजच समजले असेल की जर सत्ययुगातील ब्राह्मणांचे हे ज्ञान आणि साधना असेल तर वर्तमानातील ब्राह्मणांचे ज्ञान काय असेल? याच श्री देवी पुराणाच्या ५व्या स्कन्दातील पृष्ठ ४१४ वर हेही लिहिले आहे की सत्ययुगात जे राक्षस समजले जात, ते कलयुगात ब्राह्मण समजले जात आहेत. ब्राह्मण म्हणजे कोणती विशेष जाति नाहीं आहे. जो परमात्मा म्हणजेच ब्रह्मच्या प्राप्तिसाठी प्रयत्नशील आहे, त्यालाच ब्राह्मण म्हणतात, मग तो कुठल्याही जातिचा का असेना. वर्तमानात परंपरागत ब्राह्मण कमी आहेत. संतरूपाने ब्रह्मज्ञान देणारे अधिक आहेत. जे ब्राह्मण म्हणजेच मार्गदर्शक गुरू म्हणवतात ते तत्वज्ञानहीन आहेत. त्यामुळेच म्हटले आहे की तत्वदर्शी गुरू शिवाय कोणालाच वेदांच्या गूढ़ रहस्यांचे ज्ञान झाले नाहीं. त्यामुळे वेद कंठस्थ करत असत परंतु साधना मात्र वेदांच्या विरूद्ध करत असत. वेद व गीतात तिन्ही देवतांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) पूजा निषिद्ध आहे. सर्व ज्ञानहीन संतांनी याच तिन्ही तीनों देवतांवर हिन्दू समाजला केन्द्रित करून ठेवले आहे. आणि हिंदूदेखिल श्री देवी दुर्गा आणि विष्णु जी, शिव जी यांची भक्ति करत आहेत. हे लोकवेदातील (दंत कथा) ज्ञान आधीपासूनच चालत आलेले आहे व तेच आज माझ्या समोर भिंत म्हणून उभे आहे. मी शास्त्रोक्त ज्ञान सांगतो, प्रोजैक्टरवर दाखवतो. परंतु आधीच्याच अज्ञानाला सत्य समजणाऱ्याना डोळ्याने सत्य पाहूनदेखिल विश्वास बसत नाहीं. विरोध करतात तुरुंगात पाठवितात.

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

गरीब, वेद पढ़ैं पर भेद न जानें, बाँचैं पुराण अठारह।<br>
पत्थर की पूजा करें, बिसरे सिरजनहारा।।

भावार्थ असा की वेद आणि अठरा पुराणे वाचतात आणि मूर्तिची पूजा करतात. वेदोक्त असलेल्या सर्वसृजनहार परम अक्षर ब्रह्मला विसरले आहेत. अन्य देवांची पूजा करून त्या परम शक्ति आणि सनातन परम धाम म्हणजेच परमात्माच्या त्या परमपदा पासून वंचित रहात आहेत. हे गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे.

सूक्ष्मवेदात लिहिले आहे की :-

गुरूवां गाम बिगाड़े संतो, गुरूवां गाम बिगाड़े।
ऐसे कर्म जीव के ला दिए, फिर झड़ैं नहीं झाड़े।।

भावार्थ आहे की वेद ज्ञानहीन व तत्वज्ञानाचा परीचय नसलेल्या गुरूंनी गावोगावी शास्त्राविरूद्ध ज्ञान व भक्तिचे अज्ञान सांगून त्यांना इतके भ्रमित केले की आता ते समजावून देखिल शास्त्राविरूद्ध असलेल्या साधनेचा त्याग करण्यास तयार होत नाहीत.

गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये लिहिले आहे की शास्त्र विधि त्यागून मनमानी आचरण करण्याने ना सिद्धि ना सुख ना गति काहीच प्राप्त होत नाही म्हणजेच व्यर्थ साधना आहे.

दूसरीकडे आपण चुणक ऋषिंच्या कथेत पहिले की ऋषि चुणकांना सिद्धि प्राप्त होत्या. साधकांनी हे समजून घेतले पाहिजे की सिद्धि हे भक्तिचे भुस्याप्रमाणे आहे, ज्याप्रमाणे घवाचा भूसा (तूड़ा) असतो, ज्यात अनेक तुसे असतात. पशुने खाल्ल्यावर तोंडात जखमा होतात. चुणक ऋषिना या सिद्धि काल ब्रह्मच्या भक्तिमुळे प्राप्त झाल्या होत्या.

ज्या सिद्धी शास्त्रविधिनुसार भक्ति करण्याने प्राप्त होतात, त्याना गव्हाची तुसे (भूसा) समजून पशुंच्या खाण्यासाठी सुगम आणि उपयोगी असल्याचे समजावे. भावार्थ असा आहे की शास्त्रविधिनुसार साधना न केल्याने ज्या सिद्धि प्राप्त होतात त्या साधकाला नष्ट करतात. कारण अज्ञानातून ऋषिजन त्यांचा प्रयोग करून कोणाचे तरी नुकसान करतात. कोणाला आशीर्वाद देऊन आपल्या भक्तिची शक्ति जी ओम (ॐ) नामाच्या जपामुळे होते ते संपवून पुन्हा खाक होतात.

जसे चुणक यांनी मानधाता चक्रवर्ती राजाच्या ७२ करोड़ सेनेचा नाश करून आपल्या भक्तिच्या सिद्धिदेखिल घालवून बसले. सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

गरीब, बहतर क्षौणी क्षय करी, चुणक ऋषिश्वर एक।
देह धारें जौरा (मृत्यु) फिरैं, सब ही काल के भेष।।

भावार्थ :- ऋषिमध्ये सर्वश्रेष्ठ ऋषि चुणकांनी ७२ करोड़ सेनेचा नाश केला. दिसायला हे महात्मा दिसतात, पण जरा यांच्या जवळ गेले की हे सापासारखे निघतात. थोड्याच्या गोष्टीवर शाप द्यायचा, कुणाशी विनाकारण वाद करायचा हे यांच्यासाठी नेहमीचे गोष्ट असते.

## ''ऋषि दुर्वासांची कारगुजारी''

❖ एक दुर्वास नामक काल ब्रह्मचे पुजारी (ब्रह्म साधक) होते. ते रस्त्याने चालले होते. रस्त्यामध्ये एक अप्सरा (स्वर्गातील स्त्री) सुंदर मोत्यांची माळ घालून उभी होती. दुर्वासा ऋषिनी म्हटले की ही माळ मला दे. देवपरीला माहित होते की हे ऋषि तर सर्पासारखे आहेत, जर नाही म्हटले, तर शाप देतात. त्या अप्सरेने लगेच ती माळ गळ्यातून काढली आणि आदरपूर्वक ऋषिना सोपविली. दुर्वासा ऋषिनी ती माळ डोक्यावरील केसांच्या बांधलेल्या खोप्यावर लावली व चालले होते. समोरून स्वर्गाचा राजा इन्द्र आपल्या ऐरावत हत्तीवर बसून येत होता. त्याच्या पुढे अप्सरा आणि गंधर्वजन वाजत गाजत चालले होते, आणि करोड़ो देवी-देवता देखिल सोबत सन्मानाने चालले होते. दुर्वासा ऋषिनी माळ आपल्या डोक्यावरुन उचलून इन्द्राकडे फेकली इंन्द्राने ती माळ हत्तीच्या मस्तकावर ठेवली. हत्तीने ती माळ आपल्या सोंडेने उचलून जमीनीवर फेकली. जर इन्द्राच्या एखाद्या भक्ताने किंवा देवाने फुलांची माळ भेंट दिली तर इंन्द्र हत्तीवर बसला असेल तर ती हत्तीच्या मस्तकावर ठेवत असे. हत्ती ती

उचलून खाली फेकत असे. त्याच पद्धतीला अनुसरून हत्तीने ती माळ जमिनीवर फेकली.

या गोष्टीचा दुर्वासा ऋषिना अतिशय राग आला आणि ते म्हणाले की हे इन्द्र! तुला तुझ्या राज्याचा अहंकार झाला आहे. मी दिलेल्या माळेचा तू अनादर केला आहेस. मी तुला शाप देतो की तुझे राज्य नष्ट होईल. देवराज इन्द्र एकदम घाबरले आणि म्हणाले हे विप्र! मी आपल्या माळेचे आदरपूर्वक ग्रहण करून हत्तीवर ठेवली होती. हत्तीने त्याच्या औपचारिकतेनुसार खाली फेकली. मला क्षमा करा. वारंवार हात जोडून आणि हत्तीवरून खाली उतरून साष्टांग नमस्कार घालून इन्द्राने क्षमायाचना केली परंतु दुर्वासा ऋषी माणले नाही आणि म्हटले की जे मी म्हटले ते होणारच. ते परत फिरवता येणार नाही. काही वेळातच इन्द्राचा सर्वनाश झाला आणि स्वर्ग उजाड़ झाला.

❖ एकदा ऋषि दुर्वासा जी द्वारका नगरीजवळील वनात काही वेळासाठी थांबले होते. द्वारकावासियांना दुर्वासा जी आपल्या नगरी जवळ असल्याचे समजले. ते त्रिकाळदर्शी महात्मा आहेत, सिद्धियुक्त ऋषि आहेत. द्वारकावासी श्री कृष्णापेक्षा कोणालाही अधिक शाक्तिशाली मानत नसत. श्री कृष्णाचा पुत्र श्री प्रद्यूमन याच्यासहित अनेक यादवांनी विचार केला दुर्वास जी त्रिकाळदर्शी आहेत, आपल्या मनात आहे, ते सांगतात, अन्तर्यामी आहेत, असे ऐकले आहे, तर आपण त्यांची परीक्षा घेऊया. असा विचार करून प्रद्यूमनाला गर्भवती स्त्रीचे सोंग बनवून दहा–बारा व्यक्ति सोबत निघाल्या. एका माणसाला पति बनवले. दुर्वास जी कडे जाऊन म्हटले की हे ऋषिवर! या स्त्रीवर परमात्माने अनेक दिवसांनी कृपा केली आहे. ती गरोदर राहिली आहे आणि हा हिचा पती आहे. त्यांना अतिशय उत्सुकता लागली आहे की गर्भ मुलाचा आहे की कन्येचा? आपण तर अन्तर्यामी आहात. कृपया सांगा? त्यांनी प्रद्यूमनाच्या पोटवर एक छोटी कढ़ई बांधून ठेवली होती, त्यावर कापूस आणि जुनी वस्त्रे बांधून गर्भ बनविला होता आणि वर स्त्री वस्त्र परिधान केले होते. दुर्वासा ऋषिजींनी दिव्य दृष्टिने पाहून जाणले की हे आपली खिल्ली उडवत आहेत. दुर्वास जींनी म्हटले की या गर्भाने यादव कुलाचा नाश होईल, असे म्हणून ते क्रोधित झाले. सर्वजण तिथून निधून गेले.

नगरात ही गोष्ट वाऱ्यासारखी पसरली की दुर्वासा ऋषिजींनी यादवांचा नाश होईल असा शाप दिला आहे. त्यांना खात्री होती की सर्वशक्तिमान परमेश्वर अखिल ब्रह्मांण्डाचे नायक श्री कृष्ण आपल्या पाठीशी आहेत. दुर्वासांच्या शापाचा आपल्यावर काहीच प्रभाव पडणार नाही. तरीदेखिल काही सुज्ञ यादव एकत्रीत श्री कृष्णजीकडे गेले आणि दुर्वासा ऋषिची मुलांनी केलेली गम्मत आणि दुर्वासा ऋषिकडून मिळालेल्या शापाचा वृत्तांत सांगितला. सर्व ऐकून श्री कृष्णजींनी थोडा वेळ विचार करून म्हटले की त्या मुलांना घेऊन दुर्वास जी कडे जा आणि क्षमायाचना करा. दुर्वास जींकडे गेले, क्षमा याचना केली, परंतु दुर्वासानी म्हटले की मी जे बोललो ते परत घेतायेत नाही.

सर्वजण परत श्री कृष्णजीकडे आले आणि सर्व काय घडले ते सांगितले. द्वारकेत कोणी स्वयंपाकपण केला नाही. सर्व नगर चिन्ताक्रांत झाले. श्री कृष्णजींनी म्हटले की काळजी कशाला करता? जो वस्तु गर्भरूपात प्रयोग केली होती, त्यानेच तर आपला विनाश होणार असल्याचे सांगितले आहे. असे करा, कपड़े आणि कापूस जाळून आणि लोखंडाच्या कढ़ई दगडावर घासून प्रभास क्षेत्रात (यमुना नदीच्या कीनाऱ्यावर असलेल्या एका जागेचे नाव आहे. यमुना नदीत टाकून द्या. तिथेच बसून घासा आणि तोच चुरा आणि कपड्याची राख नदीत विसर्जन करा. न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी. जर गर्भाच्या वस्तुच राहणार नाहींत तर आपला विनाश कसा होईल? ही गोष्ट द्वारिकावासियांना पटली आणि ते स्वतःला संकटमुक्त

झाल्याचे समजू लागले. श्री कृष्णजींच्या आदेशा प्रमाणे सर्व केले गेले. कढ़ईची एक कडा संपूर्ण घासली गेली नाही. ती तशीच यमुना नदीत फेकली. एका मासोळीने तो चमकीला खाद्य पदार्थ समजून खाऊन घेतला. त्या मासोळीला बालीया नावाचा एका भिल्लाने पकड़ले. जेंव्हा मासा चिरला तेव्हा त्यातून निघालेल्या धातूची तपासणी केली, आणि आपल्या बाणांच्या पुढल्या भागात विषयुक्त करून लावले व ते काळजीपूर्वक ठेऊन दिले. कढ़ईच्या लोखंडाचा चूरा पाण्यात टाकला होता, ते लांब कटेरी गवताच्या स्वरुपात यमुना नदीच्या कीनारी उगवले.

काही कालावधीनंतर द्वारका नगरीत गोंधळ माजला. छोटया–छोट्या बाबींवरून एक दुसऱ्याला ठार मारू लागला. आपसातील वैर–विरोध वाढले. नगरातील लोकांची ही दशा पाहून नगरातील मान्यवर व्यक्ति परमेश्वर श्री कृष्णजीकडे गेल्या आणि नगरात जे काही होत होते, ते सांगितले आणि त्याचे कारण आणि त्यावरील उपाय श्री कृष्णजींना विचारला. कारण श्री कृष्ण जी यादव आणि पाण्डवांचे आध्यात्मिक गुरू होते. संकटाचे निवारण गुरूदेवांकडूनच करविले जाते. श्री कृष्णजींनी कारण सांगितले की दुर्वास ऋषिच्या शापाचे हे फळ आहे. उपाय एवढाच आहे की सर्व यादव पुरुषांनी मग भलेही तो आज जन्मलेला मुलगा का असेना, सर्वांनी प्रभास क्षेत्रात जिथे त्या कढ़ईचा चुरा टाकला होता, तिथे जाऊन यमुना नदीत स्नान केल्यास सर्व श्रापमुक्त व्हाल. सर्व द्वारिकावासियांनी श्री कृष्णजींच्या आदेशाचे पालन केले. सर्व यादव पुरुष प्रभास क्षेत्रात श्रापमुक्त होण्यासाठी स्नान करण्यास गेले. दुर्वासा ऋषिच्या श्रापामुळे सर्व यादव आपला समूह बनवून एकत्र झाले. आधी स्नान केल्यास श्रापमुक्त झाल्यानंतर आपसातील मतभेद दूर होण्याची शक्यता आहे. परंतु असे काहीच झाले नाही. आधी सर्वांनी स्नान केले, मग आपसात शिव्यागाळी सुरू झाली. मग तेच गवत काढून एकमेकांना मारायला लागले. जे गवत लोखंडाच्या कढ़ईच्या चूर्णापसून उगवले होते, ते तलवारीसारखे काम करू लागले. गवत फेकून मारताच शीर धड़ापासून वेगळी झाली. अशा प्रकारे सर्व यादव आपसात लढून मृत्यु पावले. दोन–चारशे वाचले होते. त्याच वेळी श्री कृष्णजीदेखिल तिथे पोहोचले. त्यांनी देखिल ते गवत उपटले. त्याचे लोखंडी मुसळ झाले. वाचलेल्या आपल्या कुलातील व्यक्तिंचा स्वतः श्री कृष्णजींनी वध केला.

त्यानंतर श्री कृष्ण जी एका वृक्षाखाली विश्रांती घेत होते. तेवढ्यात दैवयोगाने ज्या बालीया नावाचा भिल्लाने त्या लोखंडाच्या कढ़ईचे विषयुक्त बाण बनवले होते, ते घेऊन बालिया शिकारीच्या शोधार्थ श्रीकृष्ण विश्रांती घेत असलेल्या त्या जागी आला. श्री कृष्णजीचा उजव्या पायाचा तळपायावर पदम चिन्ह होते आणि तो चम चमकत होता. वृक्षाच्या फांद्या खालपर्यंत आल्या होत्या. त्यांच्या जंजाळात पद्मासनातील तळव्याची चमक स्पष्ट दिसत नव्हती. बालीया भिल्लाला वाटले की हे चमकणारे हरणाचे डोळे वाटत आहेत. म्हणून त्याने हरणाला मारण्याच्या उद्देशाने बाण चालवला. जेंव्हा बाण श्री कृष्णजींना लागला, तेव्हा श्रीकृष्णजींच्या तोंडून म्हटले मेलो मेलो! असे उद्गार निघाले. बालीया भिल्लाला लक्षात आले की बाण कोणत्यातरी व्यक्तिला लागला आहे. तिथे धावत गेला आणि पाहिले तर द्वारिकाधीश तिथे दुखत असल्यामुळे तड़फडत होते. बालीयाने म्हटले की हे महाराज! माझ्याकडून चुकून बाण चालवला गेला. आपल्या पायांमधील चमकिला मी हरणाचा डोळा समजून बाण मारला माझ्याकडून चूक झाली आहे, मला क्षमा करा महाराज! श्री कृष्णजींनी म्हटले की तुझ्याकडून कोणतीही चूक झालेली नाही. हा तर तुझा आणि माझा मागल्या जन्मातील हिशोब आहे. तो मी चुकता केला आहे. तू त्रोतायुगात सुग्रीवाचा भाऊ बाली होतास, मी दशरथ पुत्र रामचंन्द्र होतो. मीदेखिल तुला वृक्षाआडून कपटाने बाण मारला होता. ती अदला–बदल पूर्ण झाली

आहे.

अशा प्रकारे दुर्वासा ऋषिच्या श्रापामुळे सर्व यादव कुलाचा नाश झाला. वर्तमानात जे यादव आहेत ते त्यावेळेस मातांच्या गर्भात होते व नंतर उत्पन्न झाले, त्यांचे वंशज आहेत.

सूक्ष्मवेदात लिहिले आहे :-

गरीब, दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच।
छप्पन करोड़ यादव कटे, मची रूधिर की कीच।।

सरलार्थ :- दुर्वासानी मुलांची गम्मत इतक्या गांभीर्याने घेतली की त्यांच्या कुलाचा नाश करण्याचा श्राप दिला. त्या नीच दुर्वासाने याचाही विचार केला नाही की यामुळे काय अनर्थ होणार आहे? खास असे काहीच नव्हते, नीच दुर्वासा ऋषिनी इतके अत्याचार केले की छप्पन करोड़ यादव मृत्युमुखी पडले आणि तिथे रक्त वाहिल्याने चिखल झाला.

त्याच प्रकारे चुणक ऋषिनी उगाच भांडण उकरून काढून मानधाता राजाच्या ७२ करोड़ सेनेचा नाश केला.

❖ एक कपिल नामक ऋषि होते. त्यांना भगवान विष्णुच्या २४ अवतारांपैकी एक अवतार समजले जाते. ते तपस्या करत होते.

एक सगड़ नामक राजा होता. त्याला ६० हजार पुत्र होते. कोण्या ऋषिनी सांगितले की जर एक तलाव, एक विहीर, एक बगीचा बनविला, तर त्याचे फळ एक अश्वमेघ यज्ञापेक्षा सरस असते. राजा सगड़च्या मुलांनी हे काम सुरु केले. सुज्ञ लोकांनी त्यांना म्हटले की आपण जरा असे जागोजागी तलाव, विहिरी, बगीचे बनवू लागलात, तर पृथ्वीवर अन्न उत्पन्न करण्यासाठी जागाच उरणार नाही. कोण्या राजाने विरोध केला, तेव्हा त्याच्याशी युद्ध करून तो मोडून काढला. त्या राजा सगड़ाच्या मुलांनी आपल्यासोबत एक घोडा घेतला. त्याच्या गळ्यात एक चिट्ठी लिहून बांधली की जर कोणाचा आमच्या कामाला विरोध असेल तर त्याने या घोड्याला पकडावे आणि आमच्याशी युद्ध करायला तयार राहावे. त्या माथेफिरूंना कोण थांबवणार? पृथ्वी देवी भगवान विष्णु जी जवळ गेल्या एका गाईचे रूप धारण करून म्हटले की हे भगवान! पृथ्वीवर एक सगड़ राजा आहे. त्याचे ६० हजार पुत्र आहेत. त्यांना अशी सनक सुटली आहे की ते मलाच खंदत सुटले आहेत. तिथे लोकांना खायला अन्नदेखिल उगवू शकत नाही आहे. परमेश्वर विष्णुनी सांगितले, तुम्ही जा.आता ते काही करणार नाहीत. भगवान विष्णुनी देवराज इन्द्राला बोलावले आणि समजावले की राजा सघड़ाचे ६० हजार पुत्र यज्ञ करताहेत. जर त्यांचे १०० यज्ञ पूर्ण झाले, तर तुझे सिंहासन त्यांना द्यावे लागेल. काही करता येणे शक्य असेल तर वेळेतच कर. इंन्द्राने हलकारे म्हणजेच आपले नौकर पाठविले आणि त्यांना सगळे समजावले. रात्रीच्या वेळी राजा सगडाचे पुत्र झोपले होते. घोड़ा वृक्षाला बांधलेला होता. त्या देवराज इद्राच्या दूतांनी घोडा सोडून कपिल तपस्वी मुनींच्या मांडीवर बांधला. कपिल ऋषि अनेक वर्ष तपस्या करत होते. त्यामुळे त्यांचे शरीर अस्थिपिंजर झाले होते. त्यांनी पद्मासन घातले होते. पाय बारीक होते. ज्याप्रमाणे वृक्षाच्या मुळाची माती पावसांच्या पाण्याने वाहून जाते आणि मुळांमध्ये ६-७ इच अन्तर पडते, तसे कपिल ऋषिजीचे पाय झाले होते. इंन्द्राच्या दूतांनी घोड्याला ऋषीच्या पायाच्या मांडीजवळ दोरीने बांधले होते.

राजाच्या मुलांनी सकाळी उठून पाहिले, तर घोड़ा नव्हता. त्याला शोधण्याच्या तयारीने ६० हजार मुलांचे कळपच्या कळप बाहेर पडले. घोड़याच्या पावलांच्या चिन्हांच्या मागावरून कपिल मुनिंच्या आश्रमात पोहोचले. घोड़याला बांधलेले पाहून सगड़ राजाच्या मुलांनी ऋषिच्या

पोटात भाले खुपसले. कपिल ऋषिच्या पापण्या इतक्या वाढून जमिनीला टेकल्या होत्या. ऋषिना त्रास झाला तसे रागाने पापण्या उचलल्या तसे डोळ्यातून अग्नि बाण सुटले. ६० हजार सगड़ पुत्रांच्या सेनेची जणू गादी तयार झाली म्हणजेच ६० हजार सगड़पुत्र मृत्यु पावले.

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :–

६० हजार सगड़ के होते, कपिल मुनिश्वर खाए।
जै परमेश्वर की करें भक्ति, तो अजर–अमर हो जाए।।
७२ क्षौणी खा गया, चुणक ऋषिश्वर एक।
देह धारें जौरा फिरैं, सभी काल के भेष।।
दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच।
५६ करोड़ यादव कटे, मची रूधिर की कीच।।

भावार्थ :– कपिल मुनि जी, चुणक मुनि जी आणि दुर्वासा मुनि जी जगात किती प्रसिद्ध आहेत. हे सगळे काल ब्रह्मची भक्ति करणारे वेषधारी ऋषि आहेत. हे चालते–फिरते मृत्यु होते. मनुष्य रूपातील चालती–फिरती घाल आहेत. (घाल = एक मातीचे छोटे मडके जे तांत्रिक विद्येने आकाशात उड़वून शत्रूवर सोडले जाते. त्याने अतिशय हानी होते.) भोळे लोक चुकीने यांना महात्मा मानतात.

हे सर्व ज्ञानी आत्मे उदार ह्रदयी होते.यांनी परमात्माच्या प्राप्तिसाठी व आपले कल्याण करवून घेण्यासाठी तन–मन–धन अर्पित केले होते. परंतु तत्वदर्शी संत न भेटल्याने त्यांनी काल ब्रह्मला एक समर्थ प्रभु समजून चूक केली होती आणि ओम् (ॐ) नाम जप करून आणि अधिक हठयोग समाधि द्वारे त्याचीच साधना केली. त्यामुळे परमात्माची प्राप्ति झाली नाहीच, उलट हानिच होते कारण ही साधनाच शास्त्राविरूद्ध आहे.

गीता अध्याय १६ श्लोक २३–२४ मध्ये म्हटले आहे की शास्त्रविधिचा त्याग करून जे मनमानी आचरण करत आहेत, त्यांची साधना व्यर्थ आहे. ते उदार ह्रदयी आत्मे याच कारणाने काल ब्रह्मच्या अनुत्तम गतित राहिले.

गीता अध्याय १७ श्लोक ५–६ म्हटले आहे की :–

❖ जो मनुष्य शास्त्र विधि शिवाय केवळ मनाने कल्पित घोर तप करतात आणि दंभ अहंकार युक्त, कामना आसक्ति अभिमान युक्त आहेत. (गीता अध्याय १७ श्लोक ५)

❖ शरीरात स्थित सर्व कमलांमध्ये देव शक्ति आणि पूर्ण परमात्मा आणि मला देखिल कृश करणाऱ्या म्हणजेच कष्ट देणाऱ्या अज्ञानि लोकांना तू असुर स्वभावाचे जाण. (गीता अध्याय १७ श्लोक ६)

❖ हेच प्रमाण गीता अध्याय १६ श्लोक १७ ते २० मध्ये आहे.

❖ ते स्वतःला श्रेष्ठ समजणारे गर्विष्ठ पुरूष धन आणि सन्मानाच्या गर्वाने केवळ नाममात्र यज्ञांच्याद्वारे पाखण्ड करून शास्त्रविधि नसलेले पूजन करतात. (गीता अध्याय १६ श्लोक १७)

❖ अहंकार, ताकद, गर्व, कामना, क्रोध इत्यादीच्या अधीन असलेले व दूसऱ्यांची निन्दा करणारे पुरूष आपल्या आणि दूसऱ्यांच्या शरीरात स्थित माझा द्वेष करणारे असतात. (गीता अध्याय १६ श्लोक १८)

❖ त्या द्वेष करणाऱ्या पापाचारी क्रूरकर्मी शब्दाने करोंडो व्यक्तिंची हत्या करणाऱ्या

नराधमांची म्हणजेच नीच मनुष्यांना मी मृत्युलोकात वारंवार आसुरी म्हणजेच राक्षसी योनितच टाकतो. (गीता अध्याय १६ श्लोक १९) सूक्ष्मवेदात देखिल यांना नीच म्हटले आहे :-

दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच।
५६ करोड़ यादव कटे, मची रूधीर की कीच।।

❖ हे अर्जुन! ते मूर्ख मला प्राप्त न करून घेता जन्मोजन्मी आसुरी योनित प्राप्त होत आहेत. त्यामुळे त्यांना अति नीच गति प्राप्त होते आहे म्हणजेच घोर नरकात जाऊन पडतात. (गीता अध्याय १७ श्लोक २०)

उपरोक्त प्रमाणांवरून सिद्ध झाले की गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपल्या साधनेने प्राप्त होणाऱ्या गतिला देखिल म्हणूनच अनुत्तम म्हणजेच निकृष्ट सांगितले आहे. म्हटले आहे की :-

❖ गीता अध्याय ७ श्लोक १८ = गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जे चवथ्या प्रकारचे ज्ञानी साधक आहेत, ते सगळे उदार अवश्य आहेत कारण परमात्माला प्राप्त करण्यासाठी आपले शरीर नष्ट होण्याची देखिल काळजी केली नाही आणि हजारों वर्ष भूकेल्या-तहानलेल्या अवस्थेत साधनारत राहिले, परंतु तत्वदर्शी संत न भेटल्यामुळे ते सगळे माझ्या अनुत्तम म्हणजेच निकृष्ट गतिला म्हणजेच ब्रह्म साधनेने न होणाऱ्या मोक्षस्थितीत जे वरील ऋषिंचे झाले, त्याच स्थितीत राहिले म्हणजेच जन्म-मरण, चौरयांशी लाख योनिंच्या चक्रात फिरत राहिले. (गीता अध्याय ७ श्लोक १८)

❖ निष्कर्ष :- चुणक ऋषि, दुर्वासा ऋषि आणि कपिल ऋषिनी जो ओम् (ॐ) नाम जप केला, त्या भक्तिचे फलस्वरूप ते काही कालासाठी ब्रह्म लोकात जातील. तिथे भक्ति संपवून परत पृथ्वीवर राजा होतील कारण सूक्ष्मवेदात लिहिले आहे :-

तप से राज, राज मध मानम्, जन्म तीसरे शुकर स्वानम्।

मग कुत्रा, गाढव होतील, नरकात जातील. जेव्हा कुत्रा होतील, तेव्हा यांच्या डोक्यात किडे पडतील. ज्या व्यक्ति यांच्या श्रापाने मरण पावल्या होत्या, त्याचे पाप यांना भोगावे लागेल. कीड़े यांचे मास तुकड्या तुकड्याने खातील. त्यामुळे गीतातदेखिल अशा साधकां विषयी जे सांगितले आहे, ते आपण वर वाचले आहे.

## ❖ उपरोक्त कथांचा सारांश :-

१. ब्रह्म साधना अनुत्तम (निकृष्ट) आहे.

२. तीन तापांना श्री कृष्ण जी देखिल संपवू शकले नाहीत. श्राप देणे हे त्या तीन तापांमध्येच (दैविक ताप) येतो. दुर्वासांच्या श्रापाचे स्वतः श्री कृष्णासहित सर्व यादव देखिल बळी ठरले.

३. श्री कृष्णजींनी श्रापमुक्त होण्यासाठी यमुनेत स्नान करण्यास सांगितले. परंतु त्याने श्राप नष्ट झाला नाही. यादवांचा नाश व्हाचा तो झालाच. विचार करा :- जे अन्य संत किंवा ब्राह्मण अशा स्नान किंवा तीर्थाची वारी करण्याने संकटमुक्त करण्याचे आश्वासन देतात, ते कितपत उपयोगी आहे? अर्थातच व्यर्थ आहेत कारण जर भगवान त्रिलोकीनाथांनी सांगितलेल्या यमुना स्नानाच्या उपायाचा काही उपयोग होत नसेल, तर अन्य अर्धवट ब्राह्मण व गुरूनी सांगितलेल्या स्नान इत्यादी-इत्यादी उपायांचा काहीही उपयोग होणार नाही.

४. आधी श्री कृष्णजींनी दुर्वासांच्या श्रापा पासून बचाव करण्याचा उपाय सांगितला

होता. ती कढ़ई घासून तिचे चूर्ण बनवून प्रभास क्षेत्री यमुना नदीत टाकण्यास सांगितले. न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी. बांबू तर राहिलाच, ५६ करोड़ यादवांची देखिल बासरी वाजली?

सज्जनहो! वर्तमानात मानव बुद्धिमान आहे, शिक्षित आहे. माझ्या कडून (संत रामपाल दास) सांगितलेल्या ज्ञानाचा शास्त्राशी मेळ घाला मग भक्ति करून पहा, काय चमत्कार होतो ते!

❖ विवेचन पुढे नेऊया :-

१. तिन्ही गुणांची (रजोगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी आणि तमोगुण शिव जी) भक्ति करने व्यर्थ आहे हे सिद्ध झाले.

२. गीता ज्ञान दाता ब्रह्मची भक्ति स्वतः गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये अनुत्तम सांगितली आहे. त्यांनी गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये त्या परमात्माला म्हणजेच परम अक्षर ब्रह्मला शरण जाण्यास सांगितले आहे. असेही सांगितले आहे की त्या परमात्माच्या कृपेनेच तू परम शान्ति आणि सनातन परम धामी प्राप्त होशील.

३. गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ मध्ये संसाररूपी वृक्षाचे वर्णन आहे आणि तत्वदर्शी संताची ओळख देखिल सांगितली आहे. संसार रूपी वृक्षाचे सर्व हिस्से, मुळे, कोण परमेश्वर आहे? खोड कोण प्रभु, फांद्यांचा प्रभु कोण आहे, फांद्या म्हणजे कोणत्या देवात आहेत, पात रूप संसार सांगितले आहे.

त्याच अध्याय १५ श्लोक १६ मध्ये स्पष्ट केले आहे की :-

१. क्षर पुरूष (हा २१ ब्रह्माण्डांचा स्वामी आहे) :- याला ब्रह्म,काल ब्रह्म,ज्योति निरंजन देखिल म्हटले जाते. हा नश्वर आहे. आपण याच्या लोकात वास्तव्यास आहोत. या लोकातून मुक्तता करून घेऊन आपल्याला परमात्मा कबीर जींच्या जवळ सत्यलोकात जायचे आहे.

२. अक्षर पुरूष :- हा ७ संख ब्रह्माण्डांचा स्वामी आहे, तो देखिल नश्वर आहे. आपण याच्या ७ संख ब्रह्माण्डां मधून सत्यलोकात जायचे आहे. त्यामुळे याचा टोल टैक्स द्यायचाच आहे. आपला याच्याशी एवढाच संबंध आहे.

❖ गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये म्हटले आहे की :-

उत्तमः पुरूषः तू अन्यः परमात्मा इति उदाहृतः।
यः लोक त्रायम् आविश्य विभर्ति अव्ययः ईश्वरः।।

सरलार्थ :- गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये सांगितलेले दोन पुरूष, एक क्षर पुरूष व दूसरा अक्षर पुरूष आहेत. या दोघांपेक्षा अन्य आहे तो उत्तम पुरूष म्हणजेच पुरूषोत्तम, त्यालाच परमात्मा म्हणतात. जो तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो. तो खरे तर अविनाशी परमात्मा आहे. (गीता अध्याय १५ श्लोक १७) गीता अध्याय ३ श्लोक १४-१५ मध्ये देखिल स्पष्ट केले आहे की सर्वगतम् ब्रह्म म्हणजेच सर्वव्यापी परमात्मा, जो सचिदानन्द घन ब्रह्म आहे, त्याला वासुदेव देखिल म्हणतात. ज्या विषयी गीता अध्याय ७ श्लोक १९ मध्ये म्हटले आहे तोच सदा यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांमध्ये प्रतिष्ठित आहे म्हणजेच ईष्ट रूपात पूज्य आहे.

पूर्ण गुरुकडून दीक्षा घेऊन मर्यादेत राहून भक्ति करा. अशा प्रकारे जगण्याच्या मार्गावर वाटचाल करून प्रपंचात सुखी जीवन जगावे आणि मोक्ष रूपी मार्ग प्राप्त करा.

# ''सृष्टि रचना''
## (सुक्ष्म वेदानुसार संक्षिप्त रुपात सृष्टिरचनेचे वर्णन)

सर्व प्रभुप्रेमी आत्म्यांना हे सृष्टिरचनेचे सत्यज्ञान पहिल्यांदा वाचताना असे वाटेल,की जणू काही ही दंतकथाच आहे; परंतु सर्वधर्मांतील पवित्र सद्ग्रंथांमधील प्रमाणासहित पुरावे वाचनात येतील, तेव्हा तुम्हाला आश्चर्याचा धक्काच बसेल आणि म्हणाल, की हे वास्तव सत्य अमृतज्ञान आजतागायत कोठे लपलेले होते? कृपया धैर्य व गांभीर्याने हे वाचा आणि या अमृतज्ञानाचे जतन करा. याचा आपल्या पुढील पिढ्यांन् पिढ्यांना लाभ होईल. हे पवित्र आत्म्यांनो, कृपया सत्यनारायणाने (अविनाशी प्रभु /सत्पुरुष) रचलेल्या सृष्टिचे वास्तविक ज्ञान वाचा–

१. **पूर्ण ब्रह्म :–** या सृष्टिरचनेतील सत्पुरुष–सत्लोकीचा स्वामी (प्रभु) अलखपुरुष– अलखलोकीचा स्वामी (प्रभु), अगमपुरुष–अगमलोकीचा स्वामी (प्रभु) तसेच अनामीपुरुष– अनामीलोकीचा स्वामी (प्रभु) हे सर्व एकच असून हेच पूर्ण ब्रह्म आहेत, जे वास्तविक अविनाशी प्रभू आहेत. ते भिन्नभिन्न रूपे धारण करून आपल्या चारही लोकांमध्ये नित्य वास्तव्य करतात. त्यांच्या अंतर्गत असंख्य ब्रह्मांडे येतात.

२. परब्रह्म :– हे केवळ 'सात संख' ब्रह्मांडांचे स्वामी आहेत. यांना अक्षरब्रह्म असेही संबोधले जाते; परंतु हे आणि त्यांची सात संख ब्रह्मांडे वास्तविक अविनाशी नाहीत.

३. ब्रह्म :– हे केवळ २१ ब्रह्मांडांचे स्वामी (प्रभु) आहेत. यांना क्षर पुरुष, ज्योति निरंजन, काल आदी उपमांद्वारे ओळखले जाते. यांची २१ ब्रह्मांडे व ते स्वत: (बह्म, काल भगवान) नाशवान आहेत.

(वरील तिन्ही प्रभुंचे प्रमाण याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये आहे)

४. ब्रह्मा :– ब्रह्मा हे वर उल्लेख आलेल्या ब्रह्मचा (काल) ज्येष्ठ पुत्र असून, मधला पुत्र विष्णू व अंतिम पुत्र शंकर (शिव) आहेत. हे तिघेही ब्रह्मचे (काल) पुत्र असून, प्रत्येक जण एकेक विभागाचे (गुणाचे) स्वामी (प्रभु) आहेत. तसेच तेसुद्धा नाशवान आहेत. अधिक माहितीसाठी खाली दिलेली सृष्टिरचना कृपया वाचावी.

{कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) ने सुक्ष्म वेद अर्थात कबिर्बाणी मध्ये आपल्या द्वारा रचलेल्या सृष्टिचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे जे खाली लिहले आहे.}

सर्वप्रथम 'अनामी' (अनामय) लोक होते. हे केवळ एकच स्थान होते. त्याला 'अकह लोक' असेही म्हटले जाते. पूर्ण परमात्मा या अनामी लोकामध्ये एकटेच वास्तव्य करत होते. त्या परमात्याचे नाव कविर्देव अर्थात कबीर परमेश्वर असे आहे. समस्त विश्वातील सर्व जीवात्मे त्या पूर्ण ब्रह्मच्या (पूर्णधनी) तेजःपुंज शरीरामध्येच सामावलेले होते. याच कविर्देवांचे उपमात्मक (पदवीसंबंधीचे नाव) अनामी पुरुष असे आहे. (पुरुष या शब्दाचा अर्थ 'प्रभु' असा होतो. त्या प्रभुने स्वत:च्याच स्वरूपाप्रमाणे मनुष्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे मानवालाही पुरुष असे संबोधले जाते.) या अनामी पुरुषाच्या एक रोम कूपाचा प्रकाश संख सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.


**विशेष :–** देशाच्या आदरणीय प्रधानमंत्र्यांचे (देहाचे) नाव काही अन्य असते आणि पदवीच्या (पदाचे उपमात्मक) नावावरून त्यांना 'प्रधानमंत्री' असे संबोधले जाते. कित्येक वेळा प्रधानमंत्री आपल्याजवळ काही प्रमुख खातीसुद्धा ठेवतात. ते ज्या खात्याच्या दस्तऐवजांवर

# परमेश्वर कबीर साहेबांचे असंख्य ब्रह्मण्डाचे लघु चित्र

अनामी लोक : या लोकामध्ये कबीर साहेब अनामी पुरुष रुपामध्ये राहतात. येथे एकटे आहेत.

अगम लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अगम पुरुष रुपामध्ये राहतात.

अलख लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अलख पुरुष रुपामध्ये राहतात.



स्वाक्षरी करतात, तेव्हा ते त्याच खात्याचे पद लिहतात. गृहमंत्रालयाच्या कागदपत्रांवर सही करताना ते गृहमंत्री असेच लिहितात. त्या त्या पदानुसार एकाच व्यक्तीच्या स्वाक्षरीची शक्ती कमी–अधिक होत जाते, त्याप्रमाणे कबीर परमेश्वरांच्या (कविर्देव) तेजामध्येही (प्रकाशामध्ये) अंतर पडत जाते.

अगदी अशाच प्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी आणखी तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक, सत्लोक) रचना शब्दाद्वारे (वचन) केलेली आहे. हेच पूर्ण ब्रह्म परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकी प्रगट झाले. तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकीचेही स्वामी आहेत. तेथे त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव अगमपुरुष अर्थात अगमप्रभू असे आहे. याच प्रभुंचे मानवसदृश शरीर अत्यंत तेजोमय आहे, ज्यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश 'खरब' (अब्ज/अरबापेक्षाही अधिक) सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण परमात्मा कविर्देव (कविर्देव = कबीर परमेश्वर) अलखलोकी प्रकट झाले. तेथे उपमात्मक नाव (पदवीचे नाम) अलखपुरुष असे याच परमेश्वरांचे आहे. या पूर्ण प्रभूंचे मानवसदृश शरीर तेजोमय (स्वर्ज्योति) स्वयंप्रकाशित आहे. त्यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा प्रकाश 'अरब' सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण प्रभू सत्लोकी प्रकट झाले. तसेच सत्लोकीचेही तेच अधिपती आहेत. त्यामुळेच त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव–सत्पुरुष (अविनाशी प्रभु) असे आहे. अकालमूर्ती, शब्दस्वरूपी राम, पूर्ण ब्रह्म, परम अक्षरब्रह्म आदी त्यांची नावे आहेत. याच सत्पुरुष कविर्देवांचे (कबीर प्रभु) मानवसदृश शरीर तेजोमय आहे. यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्य, तसेच तितक्याच चंद्रांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच कविर्देव (कबीर प्रभु) सत्पुरुष रूपामध्ये प्रगट झाले आणि सत्लोकी विराजमान होऊन प्रथम तेथे अन्य रचना केल्या.

त्यांनी एका शब्दापासून (वचनाने) सोळा द्वीपांची रचना केली. नंतर सोळा शब्दांपासून सोळा पुत्रांची उत्पत्ती केली. अमृताने भरलेल्या एका मानसरोवराची रचना केली. सोळा पुत्रांची नावे अशी :– (१) ''कुर्म'', (२) ''ज्ञानी'', (३) ''विवेक'', (४) ''तेज'', (५) ''सहज'', (६) ''संतोष'', (७) ''सुरति'', (८) ''आनंद'', (९) ''क्षमा'', (१०) ''निष्काम'', (११) ''जलरंगी'', (१२) ''अचिंत'', (१३) ''प्रेम'', (१४) ''दयाल'', (१५) ''धैर्य'', (१६) ''योग संतायन अर्थात योगजित''.

सत्पुरुष कविर्देव यांनी आपला पुत्र अचिंत याच्याकडे सत्यलोकीच्या अन्य रचनांचा भार सोपवला आणि शक्ति प्रदान केली. अचिंतने शब्दापासून अक्षर पुरुषाची (परब्रह्म) उत्पत्ती केली आणि आपणास मदत करण्यास सांगितले. अक्षरपुरुष मानसरोवरावर स्नान करण्यासाठी गेला असता तेथील दिव्य अनुभूतीच्या आनंदात झोपी गेला. बराच वेळ तो बाहेर आला नाही. हे पाहून अचिंताने कविर्देवांकडे त्यासंबंधी प्रार्थना केली. अक्षर पुरुषाला निद्रेतून जागवण्यासाठी कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) त्याच मानसरोवरामधील थोडे अमृतजल घेऊन एक अंडे निर्माण केले आणि त्या अंड्यामध्ये एक आत्मा प्रवेशित करून ते अंडे मानसरोवराच्या अमृतजलामध्ये सोडले. अंड्याच्या गडगडाटाने अक्षर पुरुषाचा निद्राभंग झाला. जागे होऊन त्याने अंड्याकडे क्रोधाने पाहिले असता त्या अंड्याचे तडकून दोन भाग झाले.त्यामधून ज्योति निरंजन (क्षर पुरुष) बाहेर पडला, जो पुढे 'काल' असा संबोधला गेला आहे. याचे वास्तविक नाव 'कैल' असे

**आहे. त्यावेळी सत्पुरुषांनी (कविर्देव) आकाशवाणी केली, की तुम्ही दोघे अचिंताच्या द्वीपामध्ये वास्तव्य करा. ही आज्ञा झाल्यानंतर अक्षर पुरुष आणि क्षरपुरुष (कैल) दोघेही अचिंतच्या द्वीपामध्ये वास्तव्य करू लागले. (पुत्रांमध्ये पुन्हा प्रभुतेची लालसा उत्पन्न होऊ नये म्हणून पुत्रांची मूर्खता त्यांनाच दर्शवून दिली. कारण समर्थांशिवाय कार्य सफल होत नाही.) नंतर पूर्ण धनी कविर्देवांनी सर्व रचना स्वत: केली. आपल्या शब्दशक्तीने एक 'राजेश्वरी' (राष्ट्री) शक्ती उत्पन्न केली. तिच्याद्वारे सर्व ब्रह्मांडांची स्थापना केली. या शक्तीलाच पराशक्ती परानंदनी असेसुद्धा म्हटले जाते. कविर्देवांनी सर्व आत्म्यांना आपल्यामधूनच आपल्या वचनशक्तीद्वारे आपल्याच मानव शरीरसारखे उत्पन्न केले. प्रत्येक हंस आत्म्याची परमात्म्याच्या शरीरासारखी रचना केली, ज्याचे तेज सोळा सूर्यांइतके प्रकाशित मानवसदृशच आहे; परंतु परमेश्वराच्या शरीराच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्यापेक्षाही अधिक आहे. बऱ्याच कालावधीनंतर क्षर पुरुषाने (ज्योति निरंजन) विचार केला, की आपण तिघेही (अचिंत, अक्षर पुरुष व क्षर पुरुष) एकाच द्वीपामध्ये वास्तव्य करतो, तर दुसरे प्रत्येकी वेगवेगळ्या स्वतंत्र द्वीपामध्ये वास्तव्य करत आहेत. मीसुद्धा साधना करून स्वतंत्र द्वीप प्राप्त करून घेईन. हा विचार करून क्षर पुरुषाने एका पायावर उभे राहून सत्तर युगे तप केले.**

## ''जीवात्मे कालच्या महाभयंकर जाळ्यात कसे फसले?''

**विशेष :- जेव्हा ब्रह्म (ज्योति निरंजन) ७० युगे एका पायावर उभे राहून तप करत होता, तेव्हा ज्योति निरंजनच्या एकवीस ब्रम्ह्मांडांमध्ये वास्तव्य करणारे सर्व आत्मे काल ब्रह्मच्या साधनेवर (तप) आसक्त झाले आणि ह्दयापासुन त्याला पसंत करू लागले. यामुळे मूळ सुखदायी प्रभु कबीर साहेबांपासून (कविर्देव) ते विमुख होत गेले. त्यामुळे सर्व आत्मे पतिव्रता पदापासून (एकनिष्ठतेपासून) परावृत्त झाले. त्यावेळी पूर्ण प्रभु कविर्देवांनी (कबीर साहेब) वारंवार सावध करूनही आपली क्षर पुरुषावरील (काल ब्रह्म) आसक्ती ढळली नाही.** {आजही हाच प्रभाव या कालसृष्टित दिसून येत आहे. अभिनेता किंवा अभिनेत्री रोजगाराच्या दृष्टीने चित्रपटात अभिनय करत असतात आणि तरुणवर्ग त्यांच्या खोट्या अभिनयामुळे त्यांच्याकडे आकृष्ट होतो. कितीही प्रयत्न केला तरी ते त्यापासून परावृत्त होत नाहीत. एखादा अभिनेता किंवा अभिनेत्री जवळच्या एखाद्या शहरामध्ये आले, तर त्यांना निव्वळ बघण्यासाठी हा तरुणवर्ग गर्दी करतो. त्याच्याशी अभिनेत्याचे काहीही देणे-घेणे नसते. केवळ पैसा कमावणे हाच त्याचा उद्देश असतो. तो अभिनेता काम करून आपला उद्देश साध्य करतो आणि इकडे हे तरुण त्यांना फक्त बघण्यासाठी आपला वेळ आणि पैसा वाया घालवत बसतात. आई-वडिलांनी कितीही समजावून सांगितले, तरी त्यांना काहीही फरक पडत नाही. माता-पित्यांना काहीही कळू न देता गुपचूप ते तिकडे जातात, हे कळूनसुद्धा येत नाही. अगदी अशाच प्रकारे सर्व आत्मे काल ब्रह्मवर आसक्त झाले आहेत. त्यामुळे आपण परमात्म्याच्या (कविर्देव) प्रेमाला पारखे झालो आहोत.}

**तुला काय पाहिजे आहे सांग, असे पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीर प्रभु) क्षर पुरुषाला (काल ब्रह्म) विचारले, तेव्हा तो म्हणाला, की पिताजी, हे स्थान माझ्यासाठी कमी पडत आहे. कृपया मला स्वतंत्र द्वीप प्रदान करावे. त्यावेळी हक्का कबीरांनी (सत्कबीर) त्याला २१ ब्रह्मांडे प्रदान केली. काही कालावधीनंतर ज्योति निरंजनाला (काल) असे वाटायला लागले, की या रिक्त २१ ब्रह्मांडांत काही तरी रचना करायला पाहिजे. ही रिकामी बह्मांडे (प्लॉट) काय कामाची? यासाठी त्याने पुन्हा ७० युगे एका पायावर उभे राहून तप केले आणि परमात्मा कविर्देवांकडे (कबीर प्रभु) रचना सामग्रीची याचना केली. सत्पुरुष कविर्देवांनी त्याला त्रिगुण**

आणि पंचतत्त्वे प्रदान केली. त्यांच्या सहाय्याने ब्रह्मने (ज्योति निरंजन) आपल्या २१ ब्रह्मांडांमध्ये काही रचना केल्या. नंतर त्याला वाटले, की या विशाल ब्रह्मांडांमध्ये काही जीव असणे गरजेचे आहे. आपले एकट्याचे मन येथे रमत नाही. याचा विचार करून ब्रह्मने (ज्योति निरंजन) पुन्हा ६४ युगे तप केले. पूर्ण परमात्मा कबीरदेवांनी विचारल्यावर म्हणाला, की पिताजी, मला काही जीवात्मे पाहिजे आहेत. माझ्या एकट्याचे येथे मन लागत नाही. तेव्हा सत्पुरुष कविर्ग्नी (कबीर परमेश्वर) म्हणाले, की हे ब्रह्मा, तुझ्या तपाचे फळ म्हणून मी तुला आणखी ब्रह्मांडे देऊ शकतो, परंतु कोणत्याही जप-तपाच्या साधनेचे फळ म्हणून माझे आत्मे कदापि देणार नाहीत. पण जर कोणास (आत्म्यास) स्वेच्छेने तुझ्याबरोबर जायचे असेल, ते जाऊ शकतील. युवा कविरांचे (समर्थ कबीर साहेब) शब्द ऐकताच ज्योति निरंजन आपल्याजवळ (आत्म्यांच्या समीप) आला. आपण सर्व आत्मे पहिल्यापासून त्याच्यावर आसक्त झालेलो होतो. तो जवळ येताच, त्याला चारी बाजूंनी घेरून उभे राहिलो. ज्योति निरंजनाने सांगितले, की, मी पित्याकडून तपबळावर दुसरी स्वतंत्र २१ ब्रह्मांडे प्राप्त केलेली आहेत. तेथे नाना प्रकारची रमणीय स्थळे निर्माण केली आहेत. तुम्ही माझ्याबरोबर येणार काय? आज २१ ब्रह्मांडांतील आपण दु:खी, कष्टी आत्मे आहोत ते सर्व त्यावेळी म्हणाले, की जर पिताजींची आज्ञा असेल, तर आम्ही तयार आहोत. क्षर ब्रह्म (काल निरंजन) लगेच पूर्ण ब्रह्म महान-कविर् (समर्थ कबीर प्रभु) यांच्याकडे गेला आणि सर्व वार्ता ऐकवली. कविर्देव (कबीर परमेश्वर) म्हणाले, की माझ्या समक्ष स्वीकृती देणाऱ्यांनाच (हंस आत्म्यांना) मी आज्ञा देईन. क्षर पुरुष व परम अक्षर पुरुष (कविरमितौजा=कविर अमित औजा म्हणजे ज्याची शक्ती चा कोणताही अंत नाही, ते कबीर) दोघेही आम्हा सर्व हंसात्म्यांजवळ आले. सत्कविर्देव म्हणाले, की जे हंसात्मे ब्रह्मसोबत (काल निरंजन) जाऊ इच्छितात, त्यांनी हात वर करून स्वीकृती द्यावी. आपल्या परमपित्यासमोर एकाही हंसात्म्याची तसे करण्याची हिंमत झाली नाही. कोणीही जाण्याची स्वीकृती दिली नाही. बराच वेळ एकदम शांतता पसरली. त्यानंतर एक हंसात्मा धाडस करून म्हणाला, की पिताजी, मी ब्रह्मसोबत जाऊ इच्छितो. त्याची स्वीकृती पाहून एक-एक करत आपण सर्व आत्म्यांनी (जे आज काल ब्रह्मच्या २१ ब्रह्मांडांमध्ये कैद आहेत.) स्वीकृती दिली. परमेश्वर कबीर साहेब ज्योति निरंजनाला म्हणाले, की तू तुझ्या स्थानी जा. ज्यांनी तुझ्याबरोबर येण्याची स्वीकृती दिली आहे, त्या सर्व हंसाम्यांना मी तुझ्याकडे पाठवून देईन. ज्योति निरंजन २१ ब्रह्मांडांत निघून गेला. या वेळेपर्यंत ही सर्व २१ ब्रह्मांडे सत्लोकामध्येच समाविष्ट होती. तेथे आपणा सर्वांना जन्म-मरण, रोग, परिश्रम इत्यादी काहीही नव्हते. सर्वकाही विनासायास मूळ मालक पूर्ण ब्रह्म कविर्देव पुरवत होते. येथे या २१ ब्रह्मांडांत येऊन मूळ मालक सत्पुरुष कविर्देवांनी वेळोवेळी सावध करूनही आपल्या चुकीने क्षरपुरुषावर (ज्योति निरंजनावर) मोहित होऊन शाश्वत कविर्देवांच्या (कबीर साहेबांच्या) पवित्र पतिव्रता धर्माचा आपणाला विसर पडला आणि त्यात आपले पतन झाले आहे. (जे या ब्रह्मांडातील देव, यक्ष, गंधर्व, मानव, पित्र, भूत, पशुपक्षी या सर्व ८४ लक्ष योनींतील आत्मे) त्या सत्लोक धामापासून दूर गेल्याने कालच्या कैदेत कष्टी झालेले आहेत. हेच सत्य ज्ञान आपणाला समजले नसल्यामुळे आपण भावनेच्या भवसागरात करोडो युगांपासून गटांगळ्या खात आहोत.

त्यानंतर पूर्ण ब्रह्मनी (कबीर साहेब) सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंस आत्म्याला मुलगीचे (स्त्री) रूप दिले; परंतु तिच्यात स्त्री इद्रियाची रचना केली नाही. तिला शब्दशक्ती व तीन गुण प्रदान केले. सर्व आत्म्यांना (ज्यांनी ज्योति निरंजनसोबत जाण्यास सहमती दिली होती) त्या कन्येच्या शरीरात प्रवेशित केले. त्या कन्येचे नाव 'आष्ट्रा' (आदिमाया/प्रकृतिदेवी/दुर्गा) असे

पडले. परमात्मा कबीरदेव तिला म्हणाले, की पुत्री, मी तुला शब्दशक्ती प्रदान केली आहे. ब्रह्म (काल) जेवढे जीव मागेल, तेवढे तू मी तुला दिलेल्या शब्दशक्तीद्वारे उत्पन्न करून देत जा. पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीरसाहेब) आपला पुत्र सहजदास याच्यासोबत प्रकृतीला क्षरपुरुषाकडे पोहोचवले. सहजदासजींनी ज्योति निरंजनाला सांगितले, की हे निरंजन, परमपित्याने या तुझ्या भगिनीच्या (बहिणीच्या) देहातून तुझ्याबरोबर येण्यास स्वीकृती दिलेले सर्व हंस आत्मे समाविष्ट केले आहेत आणि तिला दिलेल्या शब्दशक्तिद्वारे ती तुला जितके जीव पाहिजे असतील, तितके उत्पन्न करून देईल. हे सर्व सांगितल्यावर सहजदास परत आपल्या द्वीपामध्ये गेला.

तरुण असल्यामुळे त्या कन्येचे रंगरूप खुलून आले होते. त्यामुळे ब्रह्ममध्ये (निरंजन) विषय वासना उत्पन्न झाली. तेव्हा दुर्गादेवी (प्रकृति) त्याला म्हणाली, की हे ज्योति निरंजन, मला परमपित्यांनी (कविर्देव) शब्दशक्ती प्रदान केलेली आहे. तू जेवढे प्राणी मागशील, तेवढे मी शब्दशक्तीने उत्पन्न करून देईन. तूसुद्धा त्याच पित्याच्या शब्दशक्तीने अंड्यातून उत्पन्न झालेला आहेस आणि मी तुझ्यानंतर उत्पन्न जरी झाले असले, तरी मीसुद्धा त्याच परमपित्याच्या वचन (शब्द) शक्तीनेच उत्पन्न झालेली आहे. त्यामुळे तू माझा मोठा भाऊ आहेस. भाऊ-बहिणीच्या नात्याच्या मर्यादेविरुद्धचा हा योग (कर्म) महापापाचे कारण बनेल; परंतु ज्योति निरंजनाने प्रकृतिदेवीची एकही प्रार्थना ऐकली नाही. त्याने तिची विनंती ऐकली नाही. त्यावेळी प्रकृतिदेवीने अब्रुरक्षणासाठी दुसरा कोणताही पर्याय नसल्यामुळे सूक्ष्मरूप धारण केले आणि निरंजनाच्या उघड्या तोंडातून त्याच्या पोटात प्रवेश केला आणि पूर्ण ब्रह्म कविर्देवांना आपल्या रक्षेसाठी अंतर्साद घालून याचना केली. त्याच वेळी कविर्देव आपला पुत्र योगजित अर्थात योगसंतायन याचे रूप धारण करून प्रकट झाले आणि आपल्या कन्येला ब्रह्मच्या उदरातून बाहेर काढले. त्यावेळी त्यांनी ज्योति निरंजनाला सांगितले, की हे ज्योति निरंजना, आजपासून तुला 'काल' या नावाने संबोधले जाईल आणि तू क्षर पुरुष होशील म्हणजेच तुझे जन्म-मृत्यू होत राहतील. तसेच या तुझ्या दुष्टपणाचे फळ म्हणून तू दररोज एक लाख मानव देहधारी प्राण्यांचा आहार करशील व सव्वा लक्ष नव्याने उत्पन्न करशील. तुम्हा दोघांनाही या २१ ब्रह्मांडांसह सत्लोकामधून बाहेर काढून टाकले जाईल. त्यांनी एवढे सांगितल्यावर ती २१ ब्रह्मांडे विमानासारख्या गतीने सहजदासाच्या द्वीपाजवळून जात बाजूला गेली. सत्लोकापासून (सत्धाम) १६ संख कोस (एक कोस म्हणजे सुमारे तीन किलोमीटर) अंतरावर येऊन स्थिर झाली.


विशेष विवरण :- आतापर्यंत या सृष्टिरचनेमध्ये तीन शक्तींचे विवरण आलेले आहे.

१. पूर्ण ब्रह्म :- यांना इतर उपमात्मक नावांनीही ओळखले जाते. सत्पुरुष, अकालपुरुष, शब्दस्वरूपी राम, परम अक्षर ब्रह्म किंवा परम अक्षर पुरुष आदी नावांनी यांना संबोधले जाते. हे पूर्ण ब्रह्म असंख्य ब्रह्मांडांचे स्वामी आहेत, तसेच ते वास्तवामध्ये अविनाशी आहेत.

२. परब्रह्म :- यांना अक्षरपुरुष नावानेही संबोधले जाते. वास्तवात हे अविनाशी नाहीत. केवळ सात संख बह्मांडांचे ते स्वामी आहेत.

३. ब्रह्म :- हा केवळ २१ ब्रह्मांडाचा मालक असून, याला ज्योतिनिरंजन, काल, कैल, क्षर पुरुष, धर्मराय आदी नावांनी संबोधले जाते. तो २१ ब्रह्मांडामध्ये अव्यक्त रूपात राहतो. आता यापुढे याच ब्रह्मच्या सृष्टितील एका ब्रह्मांडाची ओळख करून दिली जाईल ज्यामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि शिवशंकर ही आणखी नावे तुमच्या वाचनात येतील.

# एक ब्रह्मण्ड चे लघु चित्र



## ''ब्रह्म आणि ब्रह्मा यांच्यातील फरक''

एका ब्रह्मांडातील सर्वोपरी (सर्वात वरच्या) स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष, ज्योति निरंजन) स्वत: तीन गुप्त स्थानांची रचना करून तेथे तो ब्रह्मा, विष्णू व शिव या रूपांत वास्तव्य करतो. तसेच आपली पत्नी प्रकृति (दुर्गा) हिच्या सहयोगाने तीन पुत्रांची उत्पत्ती करत असतो. त्यांची नावे ब्रह्मा, विष्णू व शिव अशीच ठेवतो. त्यातील ब्रह्मचा (काल) मुलगा 'ब्रह्मा' केवळ एकाच ब्रह्मांडातील तीन लोकांमधील (पृथ्वीलोक, स्वर्गलोक, पाताळलोक) रजोगुण विभागाचा मंत्री (स्वामी) आहे. त्यांना त्रिलोकीचे ब्रह्मा म्हटले जाते. तसेच ज्योति निरंजन (काल) जो ब्रह्मलोकी 'ब्रह्मा' रूपामध्ये वास्तव्य करतो, त्यालाच महाब्रह्मा आणि ब्रह्मलोकीचा ब्रह्मा म्हटले जाते.

त्याच बह्मला (काल) सदाशिव, महाशिव, महाविष्णू अशा नावांनी सुद्धा संबोधले जाते.

श्री विष्णु पुराणात प्रमाण : चौथा अंश अध्याय १ पान संख्या २३०-२३१ वर श्री ब्रह्मा म्हणतात की, ज्या अमर सर्वांचा विधाता परमेश्वराविषयी सुरुवात, शेवट, मध्य, स्वरुप, स्वभाव व सार आम्ही समजु शकत नाही. (श्लोक ८३)

परिस्थिनुसार जो पुरुष माझे रुप धारण करुन संसाराची रचना करतात. रुद्राचे रुप धारण करुन संपुर्ण विश्वाचा नाश करतो व संपुर्ण जगतात अनंत रुप धारण करुन राहतात. (श्लोक ८६)

## ''श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी यांची उत्पत्ती''

एकवीस ब्रह्मांडांसह आल्यानंतर काल (ब्रह्म) प्रकृतिदेवीला (दुर्गा) म्हणाला, की आता माझे कोण व काय वाकडे करणार आहे? माझ्या जे मनात येईल ते मी करू शकतो. यावर देवीने (दुर्गा) प्रार्थना केली, की तुम्ही जरा तरी लाजलज्जा बाळगा. पूर्ण परमात्मा कविर्देवांच्या शब्दशक्तीने तुमची व माझीही उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. त्यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या वेळेला त्याच पूर्ण परमात्याने मला तुमच्या उदरातून (पोटातून) निष्कासित केले (बाहेर काढले). त्यामुळे मी तुमची मुलगी आहे आणि तुम्ही माझे पिता आहात. या पवित्र नात्यांना छेद दिल्यामुळे महापाप घडेल. कविर्देवांनी प्रदान केलेल्या शब्दशक्तीने (वचनशक्ती) जेवढे जीव तुम्ही मागाल, तेवढे मी उत्पन्न करून देईन; पण ज्योतिनिरंजनाने तिची एकही विनंती ऐकली नाही. मला जी शिक्षा मिळणार होती, ती मिळाली आहे. त्यामुळे मला सत्लोकातून हद्दपारही केलेले आहे. आता मी येथे मनमानी करणार, असे म्हणून प्रकृतिदेवीशी (दुर्गा, माया, आष्ट्रा.) जबरदस्तीने विवाह केला आणि तीन पुत्रांची (रजोगुणयुक्त - ब्रह्मा, सत्गुणयुक्त-विष्णू आणि तमोगुणयुक्त-शिवशंकर) उत्पत्ती केली; परंतु या तिन्ही पुत्रांना तरुण होईपर्यंत दुर्गामातेद्वारे अचेत (बेशुद्ध) करून ठेवले. तरुणावस्थेत आल्यानंतर श्री ब्रह्मांना कमळाच्या कोमल पुष्पावर, श्री विष्णूंना शेषनागाच्या शय्येवर आणि श्री शिवांना कैलास पर्वतावर सचेत करून एकत्र आणले. त्यानंतर प्रकृतीद्वारे (दुर्गा) या तिघांचा विवाह करून एकाच ब्रह्मांडातील तीन लोकांमधील (स्वर्ग, मृत्यू, पाताळ) एक-एक विभागाचे मंत्री म्हणून नियुक्त केले. श्री ब्रह्मा रजोगुण विभागाचे, विष्णू सत्गुण विभागाचे आणि शिवशंकर तमोगुण विभागाचे मंत्री (प्रभू) करून स्वत: मात्र (काल) गुप्त रूपात (महाब्रह्मा, महाविष्णू आणि महाशिव) मुख्यमंत्रिपदाचे समायोजन करतो. तसेच ब्रह्मने (काल) एका ब्रह्मांडामध्ये बह्मलोकाची रचना करून त्यामध्ये तीन गुप्तस्थानांची निर्मिती केली आहे.

त्यापैकी एक रजोगुणप्रधान आहे. तेथे हा ब्रह्म (काल) स्वतः महाब्रह्मा (मुख्यमंत्री) रूपामध्ये वास्तव्य करतो आणि आपली पत्नी दुर्गा हिला महासावित्री रूपामध्ये ठेवतो. या स्थानावर या दोघांपासून जो पुत्र उत्पन्न होतो, तोही रजोगुणी प्रभावयुक्त असतो. दुसरे स्थान सत्‌गुणप्रधान बनविलेले आहे. या स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष) स्वतः महाविष्णू रूप धारण करून वास्तव्य करतो आणि तेथेही आपली पत्नी दुर्गा हिला महालक्ष्मी रूपात ठेवतो. त्यांच्यापासून ज्या पुत्राची उत्पत्ती होते, त्याचे विष्णू असे नाव ठेवले जाते. हा विष्णू सत्‌गणप्रधान स्थानी उत्पन्न झाल्यामुळे तोही सत्‌गुणयुक्त असतो. तिसऱ्या स्थानी कालने (बह्म) तमोगुणप्रधान क्षेत्राची रचना केली आहे. तेथे तो स्वत: सदाशिव रूप धारण करून पत्नी दुर्गा हिला महापार्वती रूपामध्ये ठेवतो. यांच्यापासून जो पुत्र निर्माण होतो, तो तमोगुणी असतो आणि त्याचे नाव शिव असे ठेवले जाते. (याच्या प्रमाणासाठी गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित हिंदी अनुवादकर्ता श्री. हनुमान प्रसाद पोद्दार यांच्या पवित्र श्री शिव महापुराण, रुद्रसंहितेच्या सहाव्या, सातव्या व नवव्या अध्यायातील पान नं.१०० व अनुवादकर्ता श्री. हनुमानप्रसाद पोद्दार–चिमणलाल गोस्वामी यांच्या पवित्र श्रीमद् देवी भागवत महापुराणातील तिसऱ्या स्कंदामधील पान नं. ११४ ते १२३ पर्यंत पाहा.) पुढे या तिन्ही पुत्रांना गाफिल (धोक्यात) ठेवून कालाला मिळालेल्या शापाप्रमाणे दररोज एक लाख जीवांचा आहार करण्यासाठी आणि सव्वा लाख जीव नव्याने उत्पन्न करण्यासाठी श्री ब्रह्माद्वारे जीवांची उत्पत्ती, श्री विष्णूद्वारे मायाममतेच्या जाळ्यात ठेवून काल जाळ्यामध्ये फसवून ठेवतो आणि श्री शिवाद्वारे संहार करतो. कारण काल ब्रह्मला शापामुळे एक लाख मानव देहधारी प्राण्यांच्या सूक्ष्मशरीरापासून मळ काढून आहार करायचा असतो. त्यासाठी २१ व्या ब्रह्मांडामध्ये जेथे काल पुरुष राहतो, तेथे धगधगणारी तप्त शिला (जसा चुलीवर मोठा तवा) असून त्यावर मानव सूक्ष्मदेहधारी जीव भाजून, वितळवून त्यावरील गंध, मळ याचा काल (ज्योति निरंजन) आहार करतो. त्यावेळी जीव मरत नाही; परंतु त्याला अत्यंत असहाय कष्ट, यातना सहन कराव्या लागतात. त्यानंतर पुढे ज्या–त्या जीवाच्या कर्माधारावर काल ब्रह्म आत्म्याला दुसरे शरीर (८४ लक्ष योनी) प्रदान करतो. एखाद्या घरात तीन खोल्या असतील आणि पहिल्या खोलीत अश्लील चित्रे लावलेली असतील, तर तेथे मलिन, अपवित्र विचार मनात येतील. दुसऱ्या खोलीत साधुसंतांची चित्रे लावलेली असतील, तर तेथे मनामध्ये सद्‌विचार उमटतील आणि प्रभुचिंतनही होत राहील. तिसऱ्या दालनात देशभक्त आणि शहीद हुतात्म्यांच्या प्रतिमा लावलेल्या असतील, तर तेथे जहाल, रक्त गरम करणारे विचार उत्पन्न होतील. अगदी अशाचप्रकारे ब्रह्मने (काल) जाणूनबुजून विचार करून या तीन गुणांनीयुक्त स्थानांची रचना केलेली आहे.

## ''काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित''

त्रिगुण :– रजोगुण (ब्रह्माजी), सत्‌गुण (विष्णूजी), तमोगुण (शिवजी) हे त्रिगुण आहेत. हे तिन्ही गुण ब्रह्म (काल) आणि प्रकृती (दुर्गा) यांच्यापासून उत्पन्न झालेले आहेत. तसेच हे तिन्ही नाशवान आहेत.

१) प्रमाण :– श्री. हनुमान प्रसाद पोद्दार यांनी संपादित केलेल्या व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्री शिवमहापुराण'मधील पान नं.११०, ९ वा अध्याय, रुद्रसंहिता : अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि शिव या तीन देवांमध्ये गुण आहेत; परंतु शिव (ब्रह्म–काल) सांबसदाशिव गुणातीत म्हटला गेला आहे.

२) प्रमाण :– श्री. हनुमान प्रसाद पोद्दार चिमनलाल गोस्वामी यांनी संपादित केलेल्या

व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्रीमद देवी भागवतपुराण'मधील ३ ऱ्या स्कंदातील ५ व्या अध्यायातील पान नं.१२३ वर भगवान विष्णूंनी दुर्गादेवीची स्तुती केली, की मी (विष्णू), ब्रह्मा, तसेच शंकर तुमच्याच कृपेने विद्यमान आहे. आम्हा तिघांचा अविर्भाव (जन्म), तसेच तिरोभाव (मृत्यु) होतो. आम्ही तिघे नित्य (अविनाशी) नाही. तूच नित्य आहेस, जगज्ननी प्रकृति आणि सनातनदेवी आहेस. भगवान शंकर म्हणतात, की जर भगवान ब्रह्मा, तसेच भगवान विष्णू तुझ्यापासून उत्पन्न झाले आहेत तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेला मी, तमोगुणी लीला करणारा शंकर काय, तुझी संतान (पुत्र) नाही का झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस. या संसाराच्या सृष्टि-स्थिती-संहारामध्ये तुझेच गुण सदासर्वदा आहेत. याच तिन्ही गुणांपासून उत्पन्न मी (शंकर), ब्रह्मा, विष्णु नियमानुसार कार्यतत्पर असतो.

हे विवरण केवळ हिंदीमध्ये अनुवादित आहे ज्यामध्ये काही तथ्ये लपवलेली आहेत, त्या 'श्री देवी श्रीमदेवीभागवत महापुराणा'मधील आहे. त्यासाठी हेच प्रमाण (गोपनीय) श्रीमद देवी भागवत महापुराण सभाषाटिकम् समहात्यम्, खेमराज श्री कृष्णदास प्रकाशन, मुंबई यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेल्या पुस्तकात आहे. ३ ऱ्या स्कंदातील ४ थ्या अध्यायातील ४२ वा श्लोक, पृष्ठ नं. १०.

ब्रह्मा : अहम् ईश्वर : फिल ते प्रभावात्सर्वे वयं जनि युता न यदा तू नित्या:,
के अन्ये,सुरा: शतमुख प्रमुखा: च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृति: पुराणा (४२)।

**अनुवाद : हे माते! ब्रह्मा, मी (विष्णू), तसेच शिव तुझ्याच प्रभावाने जन्मवान आहोत, पण आम्ही नित्य नाही. अर्थात, आम्ही अविनाशी नाही. मग अन्य इंद्रादी व दुसऱ्या देवता कशा काय नित्य असतील? तूच अविनाशी आहेस, प्रकृती तसेच सनातनी देवी आहेस. (४२)**

**५ व्या अध्यायातील ८ वा श्लोक,पृष्ठ नं. ११-१२**

यदि दयार्द्रमना न सदांऽबिके कथमहं विहित:च तमोगुण:
कमलजश्च रजोगुण संभव: सुविहित: किमु सत्वगुणों हरि:। (८)

**अनुवाद :- भगवान शंकर म्हणाले, की हे माते! जर आमच्यावर तुम्ही दयायुक्त अहात, तर मला तमोगुणी का बनविले? कमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मास रजोगुणी का बनविले आणि विष्णूस सत्‌गुणी का बनविले? अर्थात, आमच्या त्रिगुणमयी प्रभावामुळे जीवांना जन्म-मरणरूपी दुष्कर्मांमध्ये का अडकवलेस? (८)**

**श्लोक १२ :-** रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे (१२)

**अनुवाद :- ''आपला पतिपुरुष अर्थात काल भगवानसोबत सदा तू भोगविलास करत असतेस. तुझी गती कोणीही जाणू शकत नाही. (१२)**

**निष्कर्ष :- या प्रमाणांवरून हे सिद्ध होते, की रजोगुण-ब्रह्मा, सत्‌गुण-विष्णू, तसेच तमोगुण-शिव हे तिघेही नाशवान आहेत. दुर्गेचा पती ब्रह्म (काल) हा तिच्याशी भोगविलास करतो.**

# ‘‘ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा‘‘

## सुक्ष्म वेदानुसार उर्वरीत स्रुष्टीरचना........

रजोगुण–ब्रह्मा, सत्गुण–विष्णू व तमोगुण–शंकर या तिन्ही पुत्रांच्या उत्पत्तीनंतर पत्नी दुर्गा (प्रकृती) हिला ब्रह्म (काल) म्हणाला, की भविष्यामध्ये मी कोणालाही माझ्या वास्तविक रूपामध्ये दर्शन देणार नाही. त्यामुळे मी अव्यक्त मानला जाईन. तू माझे हे रहस्य कोणालाही सांगू नकोस. मी गुप्त राहणार आहे. यावर दुर्गा म्हणाली, की आपण आपल्या पुत्रांनाही दर्शन देणार नाही का? ब्रह्म म्हणाला, की मी आपल्या पुत्रांना, तसेच इतर कोणालाही कोणतीही साधना केली तरी दर्शन देणार नाही आणि हा माझा अटळ निर्णय आहे. तेव्हा दुर्गा म्हणाली, की ज्यामुळे आपल्या पुत्रांपासूनसुद्धा लपून राहावे लागेल, तो तुमचा निर्णय योग्य नाही. यावर काळ (ब्रह्म) म्हणाला, की दुर्गा, ही माझी विवशता आहे. मला एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करण्याचा शाप लागलेला आहे. जर माझ्या पुत्रांना (ब्रह्मा, विष्णू, महेश) हे समजले, तर ते उत्पत्ती, स्थिती आणि संहार ही कार्ये करणार नाहीत. यासाठीच या माझ्या अनुत्तम निर्णयात कोणताही बदल होणार नाही. जेव्हा हे तिघेही बाल्यावस्थेत थोडे मोठे होतील, तेव्हा त्यांना अचेत (चेतनाहीन) कर. त्यांना माझ्याविषयी काहीच सांगू नकोस, नाहीतर मी तुलाही दंड देईन. कालच्या या भीतीने दुर्गा वास्तविकता सांगत नाही. म्हणूनच गीतेच्या सातव्या अध्यायातील २४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की हा बुद्धिहीन जनसमुदाय मला, अव्यक्त मनुष्य रूपामध्ये आलेला अर्थात ‘कृष्ण’ असे मानतात.

(अबुद्धयः) बुद्धि हीन (मम्) माझ्या अनुत्तम अर्थात अश्रेष्ठ नीच (अव्ययम्) अविनाशी (परमभावम्) विशेष भावास (अजानन्तः) न जानता (माम् अव्यक्तम्) मला अव्यक्ताला (व्यक्तिम्) मनुष्य रूपामध्ये (आपन्नम्) आलेला (मन्यन्ते) मानतात अर्थात मी कृष्ण नाही. **(गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक)**

गीतेच्या ११ व्या अध्यायातील ४७ व ४८ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे, की है माझे वास्तविक ’काल’ रूप आहे. याचे दर्शन अर्थात ब्रह्मप्राप्ती वेदांमध्ये वर्णन केलेल्या विधीने, जपाने, तपाने अथवा अन्य कोणत्याही क्रियेने होऊ शकणार नाही.

जेव्हा तिन्ही बालक युवाअवस्थेत आले, त्यावेळी, माता भवानी (प्रकृती, अष्टांगी) म्हणाली, की तुम्ही सागरमंथन करा. पहिल्या वेळी सागरमंथन केले, तेव्हा चारही वेद निर्माण झाले. (ज्योति निरंजनाने आपल्या श्वासाद्वारे चार वेद उत्पन्न केले आणि त्यांना गुप्तवाणीद्वारे सागरात राहण्याची आज्ञा दिली होती.) ते वेद ब्रह्माने घेतले. सागरमंथनातून ज्या वस्तू बाहेर पडल्या, त्या घेऊन तिघे जेव्हा माता दुर्गाकडे आले, तेव्हा ते म्हणाले, की हे चारही वेद ब्रह्मा स्वतःकडे ठेवू दे व वाचू दे.

टीप :– वास्तविक पूर्ण ब्रह्मंनी (कबीर साहेबांनी) ब्रह्मला अर्थात काळला पाच वेद प्रदान केले होते; परंतु ब्रह्मने केवळ चार वेदच प्रकट केले. पाचवा वेद लपवून ठेवला (गुप्त राखला). हा पाचवा वेद (सूक्ष्मवेद) स्वत: परमेश्वरांनी प्रगट होऊन ‘कविर्गिभीः’ म्हणजेच कर्विवाणीद्वारे (कबीर वाणी) लोकोक्ती व दोहे या माध्यमांतून प्रगट केलेला आहे.

दुसऱ्या वेळी जेव्हा सागरमंथन केले, तेव्हा त्यातून तीन कन्या प्राप्त झाल्या. मातेने त्या कन्या तिघांमध्ये (ब्रह्मा, विष्णू, महेश) वाटून दिल्या. प्रकृतिने (दुर्गाने) आपलीच अन्य तीन रूपे (सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती) धारण करून समुद्रात लपवलेली होती. तीच रूपे सागर मंथनावेळी बाहेर आली. तीच प्रकृती तीन रूपांत प्रगट झाली, तसेच भगवान ब्रह्मांना सावित्री,

**भगवान विष्णूंना लक्ष्मी आणि भगवान शंकरांना पार्वती अशा पत्नी रूपात प्रदान केली. तिघांनी भोगविलास करून सुर आणि आसुर दोघांनाही उत्पन्न केले.**

**{जेव्हा तिसऱ्या वेळी सागरमंथन केले, तेव्हा चौदा रत्ने ब्रह्माला, अमृत विष्णू आणि देवतांना, मद्य (दारू) आसुरांना दिले, तसेच विष परमार्थ शिवने आपल्या कंठामध्ये स्थिर केले. ही तर फार नंतरची गोष्ट आहे.} जेव्हा ब्रह्मा वेदांचे वाचन करू लागले, तेव्हा त्यांना समजले, की सर्व ब्रह्मांडांचा रचनाकार, सृजनहार, कुळाचा स्वामी, मालक पुरुष (प्रभु) हा तर कोणी वेगळाच आहे. तेव्हा ब्रह्माने विष्णू व शंकरांना सांगितले, की वेदांमध्ये वर्णन आले आहे, की सृष्टीचा सृजनहार (रचनाकार) कोणी वेगळाच आहे; परंतु वेद म्हणतात, की याचे रहस्य आपणालासुद्धा माहीत नाही. यासाठी संकेत दिला आहे, की फक्त कोणत्या तरी तत्त्वदर्शी संताला विचारा. तेव्हा ब्रह्मा आपली माता प्रकृतिकडे आले आणि सर्व वृत्तांत सांगितला. माता प्रकृती नेहमी म्हणत असे, की माझ्याशिवाय आणखी कोणीही नाही. मीच कर्ता धरता आहे. मीच सर्वशक्तिमान आहे. त्यावेळी ब्रह्मा प्रकृतिदेवीस म्हणाले, की हे वेद ईश्वरकृत आहेत, हे असत्य असूच शकणार नाहीत. यावर दुर्गादेवीने सांगितले, की तुझे पिता तुला कधीच दर्शन देणार नाहीत. त्यांनी तशी शपथ घेतली आहे. हे ऐकून ब्रह्मा म्हणाले, की माते, आता आपल्या बोलण्यावर माझा विश्वासच बसत नाही. मी त्या पुरुषाचा (प्रभु) ठावठिकाणा शोधूनच काढेन. दुर्गा म्हणाली, की जर त्याने तुला दर्शन दिले नाही, तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाले, की असे झाले तर मी माझे तोंडसुद्धा तुला दाखविणार नाही. दुसरीकडे ज्योति निरंजनाने शपथ घेतली आहे, की मी कोणालाही दर्शन देणार नाही म्हणजेच एकवीस ब्रह्मांडांमध्ये कधीही आपल्या वास्तविक रूपामध्ये, आकारामध्ये येणार नाही.**

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक**

अव्यक्तम्, व्यक्तिम, आपन्नम्, मन्यन्ते, माम्, अबुद्धयः।
परम्, भावम्, अजानन्तः, मम, अव्ययम्, अनुत्तमम् ।।२४।।

अनुवाद : (अबुद्धयः) बुद्धिहीन लोक (मम्) माझ्या (अनुत्तमम्) अश्रेष्ठ (अव्ययम्) अटळ (परम्) परम (भावम्) भावास (अजानन्तः) न जाणता (अव्यक्तम्) अदृश्यमान (माम्) मला काळला (व्यक्तिम्) आकार रूपामध्ये कृष्णावतार (आपन्नम्) झालेला आहे (मन्यन्ते) असे मानतात.

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील २५ वा श्लोक**

न अहम्, प्रकाशः सर्वस्य, योगमायासमावृतः।
मूढः अयम्, न अभिजानाति, लोकः, माम, अजम्, अव्ययम् ।।२५।।

अनुवाद : ''(अहम्) मी (योगमाया समावृत्तः) योगमायेने लपलेला (सर्वस्य) सर्वांच्या (प्रकाशः) प्रत्यक्ष (न) येत नाही. अर्थात, अदृश्य राहतो. यामुळे (अजम्) जन्म न घेणाऱ्या (अव्ययम्) अविनाशी अटळ भावास (अयम्) हे (मूढः) अज्ञानी (लोकः) जनसमुदाय संसार (माम्) मला (न्) न (अभिजानाति) जाणता म्हणजेच मला अवतार रूपामध्ये आलो आहे असे समजतात; कारण ब्रह्म आपल्या शब्दशक्तीने आपली नाना रूपे धारण करत असतो. तो दुर्गादेवीचा पती असल्यामुळेच या मंत्रामध्ये म्हटले आहे, की मी श्रीकृष्ण, राम आदींसारखा दुर्गेपासून जन्म घेत नाही.

## ''आपला पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी ब्रह्माचे प्रयत्न''

त्यावेळी माया (त्रिदेवजननी दुर्गा) ब्रह्माला म्हणाली, की अलखनिरंजन तुझे पिता आहेत; परंतु ते तुला दर्शन देणार नाहीत. ब्रह्मा म्हणाला, की मी त्यांचे दर्शन घेऊनच परत येईन. माता म्हणाली, की जर तुला त्यांचे दर्शन झाले नाही तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाला मी शपथ घेतो की, असे झाले तर मी तुझ्यासमोर येणार नाही. (तोंड दाखविणार नाही.) हे बोलुन ब्रह्मा व्याकुळ होऊन उत्तर दिशेला चालु लागला जेथे भयानक अंधार आहे. तेथे ब्रह्माने चार युगे ध्यान लावले परंतु त्याला काहीच प्राप्त झाले नाही. त्यावेळी कालने आकाशवाणी केली, की जिवांची उत्पती का नाही केली? भवानी म्हणाली, की आपला ज्येष्ठ पुत्र ब्रह्मा हट्ट धरून आपल्या शोधार्थ गेलेला आहे. ब्रह्माशिवाय सर्व कार्य अशक्यच आहे. ब्रह्मने (काळ) सांगितले, की त्याला परत बोलवून घे. मी त्याला दर्शन देणार नाही. तेव्हा दुर्गादेवीने (प्रकृती) आपल्या शब्द शक्तीने 'गायत्री' नावाची कन्या उत्पन्न केली आणि तिला ब्रह्माला परत घेऊन येण्यास सांगितले. गायत्री ब्रह्माजवळ गेली; परंतु ब्रह्मा समाधी अवस्थेत होते. येथे कोणीतरी आलेले आहे, याचा त्यांना कोणताही आभास झाला नाही. तेव्हा आदिमायेने (प्रकृती) ध्यानाद्वारे गायत्रीस सांगितले, की ब्रह्माच्या चरणांना स्पर्श कर. त्याप्रमाणे गायत्रीने आचरण केले. चरणांना स्पर्श होताच ब्रह्मांचा ध्यान भंग झाला आणि क्रोधित होऊन ते म्हणाले, की माझा ध्यानभंग करणारी तू कोण पापीणी आहेस? मी तुला शाप देतो. यावर गायत्री म्हणाली, की यात माझा काही दोष नाही. शाप देण्यापूर्वी माझी बाजू ऐकून घ्या. तुमच्याशिवाय जीवांची उत्पत्ती होऊ शकत नसल्यामुळे मला तुमच्या मातेने तुम्हाला परत घेऊन येण्यास पाठविले आहे. ब्रह्मा म्हणाले, की मला अजूनही पित्याचे दर्शन झालेले नाही; मग मी परत कसा जाऊ? मी जर असाच परत गेलो तर माझी नाचक्की होईल. जर मला माझ्या पित्याचे (ज्योति निरंजन) दर्शन झालेले आहे आणि ते मी माझ्या डोळ्यांनी बघितले आहे, असे तू माझ्या मातेला सांगणार असशील, तरच मी तुझ्यासमवेत येईन. तेव्हा गायत्री ब्रह्मांना म्हणाली, की जर तुम्ही माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असाल तरच मी तुमची खोटी साक्ष देईन. ब्रह्माने विचार केला, की आपल्याला पित्याचे दर्शन तर झालेलेच नाही. आपण जर असेच मातेसमोर गेलो, तर आपण कोणतीही प्रतिक्रिया देऊ शकणार नाही. त्यामुळे दुसरा कोणताही पर्याय नाही हे पाहून ब्रह्माने गायत्रीच्या विनंतीस मान्यता दिली.

गायत्री म्हणाली, की आपण आणखी एक साक्षीदार तयार केला तर? ब्रह्मालाही तिचा विचार पटला. तेव्हा गायत्रीने आपल्या शब्द शक्तीद्वारे एक कन्या (पुहपवती) उत्पन्न केली. ते दोघे तिला म्हणाले, की ब्रह्माला पित्याचे दर्शन झालेले आहे, अशी तूसुद्धा खोटी साक्ष दे. पुहपवती म्हणाली, की मी का खोटी साक्ष देऊ? जर ब्रह्मा माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असेल तरच मी खोटी साक्ष देईन. ब्रह्मा याला तयार होईना, तेव्हा गायत्रीने याशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही, अशी त्याची समजूत घातली आणि ब्रह्माने त्याला मान्यता दिली. नंतर तिघे मिळून माता आदिमायेजवळ (प्रकृती) आले. दोन्ही देवींनी या अटी एवढ्यासाठीच घातल्या होत्या, की जर ब्रह्माने मातेसमक्ष आपण खोटी साक्ष देत आहे असे सांगितले तर माता आपणाला शाप देईल. यासाठीच त्यालाही दोषी बनविले होते.

(येथे गरीबदासजी महाराज म्हणतात, की ''दास गरीब यह चूक धुरों धुर'')

# ''माता (दुर्गा) कडून ब्रह्माला शाप''

ब्रह्मा, गायत्री व पुहपवती माता प्रकृती/दुर्गाकडे आले. मातेने ब्रह्माला विचारले, की तुला तुझ्या पित्याचे दर्शन झाले? त्यावेळी ते तिघेही म्हणाले, की होय, आम्ही आमच्या डोळ्यांनी पित्यांचे दर्शन घेतले. याचा माता भवानीला (प्रकृति) संशय आला. ब्रह्मने (काल) तर तिला सांगितले होते, की तो कोणालाही दर्शन देणार नाही आणि हे म्हणत आहेत, की दर्शन झाले.याचा ती विचार करू लागली. शेवटी अष्टांगीने ध्यान लावले आणि ज्योति निरंजनाला (काल) विचारले, की हे तिघे बोलतात ते खरे आहे काय? ज्योति निरंजन म्हणाला, की ते तिघे जण खोटे बोलत आहेत. तेव्हा माता भवानी म्हणाली, की तुम्ही तिघेही खोटे बोलत आहात. त्यावेळी यांना कोणतेही दर्शन झालेले नाही, अशी आकाशवाणी झाली. ते ऐकून ब्रह्मा व्याकुळतेने म्हणाला, की माते, मी शपथ घेऊन पित्याच्या शोधार्थ गेलो होतो; परंतु मला पित्याचे दर्शन झाले नाही. त्यामुळे मला तुझ्यासमोर यायची लाज वाटत होती म्हणून आम्ही खोटे बोललो. तेव्हा माता दुर्गा म्हणाली, की आता मी तुम्हास शाप देते.

ब्रह्माला दिलेला शाप :- ''तुझी या जगात पूजा होणार नाही. पुढे तुझे वंशज पाखंड करतील. खोट्या गोष्टींची रचना करून जगाला फसवतील. तुझे वंशज वरून कर्मकांड करताना दिसतील; पण त्यांच्या मनामध्ये अनेक विकार असतील. कथा, पुराणे वाचून दाखवतील. स्वत:ला सद्ग्रंथांमध्ये वास्तविकता काय आहे, याचे ज्ञान नसताना मानसन्मान आणि धनप्राप्तीसाठी गुरू बनून अनुयायांना (शिष्यांना) लोकवेद (शास्त्रविरुद्धच्या दंतकथा) ऐकवतील. देवदेवतांची पूजा करून आणि करवून घेऊन, दुसऱ्यांची निंदा करून स्वत: कष्टावर कष्ट झेलत बसतील. जे त्यांचे अनुयायी-शिष्य होतील, त्यांना ते परमार्थ सांगणार नाहीत. दक्षिणेसाठी जगाला चुकीच्या मार्गाने फिरवतील. स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानतील आणि दुसऱ्यांना कमी लेखतील. जेव्हा मातेच्या मुखातून हे सर्व ऐकले, तेव्हा ब्रह्मा मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळला आणि दीर्घ काळानंतर शुद्धीवर आला.

**गायत्रीला शाप** :- अनेक सांड तुझे पती होतील. तू मृत्युलोक मध्ये गाय बनशिल.

**पुहपवतिला शाप :-** गलिच्छ, उकिरड्याच्या ठिकाणी तुझी जागा असेल. तुझ्या फुलांचा कोणत्याही पूजेसाठी वापर केला जाणार नाही. तुझ्या या खोट्या साक्षीमुळे तुला नरक भोगावा लागेल. तुझे नाव केवडा केतकी असेल. (हरियाणामध्ये त्याला 'कुसोंधी' असे म्हटले जाते. ते गलिच्छ जागी, उकिरड्यावर उगवते.)

या प्रकारे त्या तिघांना असे शाप दिल्यानंतर माता भवानीला अत्यंत पश्चात्ताप झाला. {अशाप्रकारे जीवात्मा कोणताही विचार करता मनाच्या (काल निरंजन) प्रभावाने चुकीचे कार्य करतो. परंतु जेव्हा आत्म्याच्या (सतपुरुषाचा अंश) प्रभावाने सत्यज्ञान होते, तेव्हा मग पश्चात्ताप सहन करावा लागतो. माता-पिता आपल्या मुलाच्या लहानशा चुकीसाठी त्याला रागाने बोलतात आणि नंतर मात्र त्यांना अत्यंत पश्चात्ताप होतो. हीच प्रक्रिया मनाच्या (कालनिरंजन) प्रभावाने सर्व जीवांमध्ये कार्यरत आहे.) येथे आणखी एक बाब विशेष आहे की निरंजनाने देखिल (काल, ब्रह्म) कायदा केला आहे की जर कोणी जीवाने दुर्बल जीवाला त्रास दिला, तर त्याला त्याची परतफेड नक्कीच करावी लागते. जेव्हा आदिभवानीने (प्रकृति, अष्टांगी) ब्रह्मा, गायत्री व पुहपवती यांना शाप दिला, तेव्हा अलख निरंजनही (ब्रह्म-काल) म्हणाला की हे भवानी (प्रकृति/अष्टांगी), तू हे उचित, बरोबर केले नाहीस. यासाठी आता मी (निरंजन) तुलाही शाप देतो की द्वापारयुगामध्ये तुझे पाच पती होतील. (द्रौपदी ही आदिमायेचा अवतार

झालेली आहे.) जेव्हा अशी आकाशवाणी ऐकली, तेव्हा आदिमाया म्हणाली की हे ज्योति निरंजन काहीही झाले तरी मी तुलाच वश आहे. त्यामुळे तुला जे वाटेल ते तू कर.

{सृष्टिरचनेमध्ये दुर्गाच्या अन्य नावांना वारंवार लिहण्याचा उद्देश आहे कि, पुराण गीता तसेच वेदांमध्ये प्रमाण पाहते वेळेस भ्रम उत्पन्न होउ नये. जसे गीता अध्याय १४ श्लोक ३-४ मध्ये काल ब्रह्म ने म्हटले आहे कि प्रकृति तर गर्भ धारण करणारी सर्व जिवांची माता आहे. मि तीच्या गर्भात बिज स्थापन करणारा पिता आहे. श्लोक १५ मध्ये म्हटले आहे कि प्रकृति पासुन उत्पन्न तिन्ही गुण जिवात्मांना कर्माच्या बंधनात बांधतात. -(लेख समाप्त). या प्रकरणात प्रकृति तर दुर्गा आहे तसेच तिन्ही गुणांचे तिन्ही देवता म्हणजेच रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु तसेच तमगुण शिव चे सांकेतीक नाव आहे.}

## ''विष्णूचे आपले पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे''

त्यानंतर दुर्गेने (प्रकृति) विष्णूला सांगितले, की पुत्रा, तूसुद्धा आपल्या पित्याचा शोध घे. तेव्हा विष्णू आपले पिता ब्रह्मचा (काल) शोध घेत पाताळ लोकी पोहोचला, जेथे शेषनाग होता. विष्णू आपल्या हद्दीत आल्याचे पाहून शेषनागाने क्रोधित होऊन विष्णूच्या शरीरावर विषाचा फुत्कार मारला. त्याच्या प्रभावाने विष्णूजींचा रंग (वर्ण) सावळा झाला. तेव्हा या नागाला चांगलाच धडा शिकवायला पाहिजे, असे विष्णूच्या मनात आले. हे जेव्हा ज्योति निरंजनाने पाहिले, तेव्हा त्याला वाटले, की आता विष्णूला शांत करायला पाहिजे आणि आकाशवाणी झाली, की हे विष्णू, आता तू तुझ्या मातेकडे जा आणि जे काही घडले आहे, त्याचे सत्यकथन कर, तसेच जो त्रास तुला शेष नागा पासून झालेला आहे, त्याचा प्रतिशोध तू द्वापार युगामध्ये घे. द्वापार युगामध्ये तू कृष्ण अवतार धारण करशील आणि कालिदहात (काली डोहात) कालिंद्री (कालिया) नावाने शेषनागाचा अवतार होईल.

ऊँच होई के नीच सतावै, ताकर ओएल (बदला) मोही सों पावे।
जो जीव देई पीर पुनी काँहु, हम पुनि ओएल दिवावें ताहूँ।।

तेव्हा विष्णू मातेकडे (दुर्गामाता) आले आणि त्यांनी मला पित्याचे दर्शन झालेले नाही, असे सत्य सांगितले. यावर आदिमाता (प्रकृति) अत्यंत प्रसन्न झाली आणि म्हणाली, की पुत्रा, तू सत्यवादी आहेस. आता मी आपल्या शक्तीने तुला तुझ्या पित्याशी भेट घालून देते. तसेच तूझ्या मनातील संशय नष्ट करते.

''कबीर, देख पुत्र तो हि पिता भीटाऊँ तौरे मन का धोखा मिटाऊँ।
मन स्वरूप कर्ता कह जानों, मन ते दुजा और न मानो।
स्वर्ग पाताल दौर मन केरा, मन अस्थीर मन अहै अनेरा।
निरंकार मनही को कहिए, मन की आस निश दिन रहिए।
देख हूँ पलटि सुन्य मह ज्योति, जहाँ पर झिलमिल झालर होती।।''

अशा प्रकारे मातेने (अष्टांगी, प्रकृति) विष्णूला सांगितले, की 'मन' हाच जगाचा कर्ता आहे. हाच ज्योति निरंजन आहे. ध्यानामध्ये ज्या हजार ज्योती नजरेस पडतात, तेच त्याचे रूप आहे. जो शंख, घंटा इत्यादींचा आवाज ऐकू येतो, तो महास्वर्गामध्ये निरंजनाचाच वाजत आहे. मातेने (अष्टांगी, प्रकृति) पुढे सांगितले, की पुत्रा, तू सर्व देवतांचा शिरोमणी आहेस. तुझी प्रत्येक कामना आणि कार्य मी पूर्ण करेन. सर्व जगतामध्ये तुझी पूजा होईल. याचे कारण तू जे

काय आहे, ते सर्व सत्य सांगितले आहेस. कालच्या (ज्योति निरंजन) या ब्रह्मांडातील प्राण्यांना एक विशेष सवय आहे, की ते फक्त आपली व्यर्थ महिमा गातात. जसे दुर्गा विष्णूला म्हणत आहे, की तुझी जगामध्ये पूजा होईल. मी तुला तुझ्या पित्याचे दर्शन घडवेन. दुर्गा मातेने केवळ प्रकाश दाखवून विष्णूवर कृपा केले. श्री विष्णूही परमात्म्याचा केवळ प्रकाश दिसतो. परमात्मा निराकार आहे, अशी प्रभुची स्थिती आपल्या अनुयायांना समजावून सांगू लागले. त्यानंतर आदिभवानी रुद्राकडे (महेश) जाऊन म्हणाली, की महेश, तू सुद्धा आपल्या पित्याचा शोध घे. तुझ्या दोन्ही बंधूंना तुझ्या पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यांना जे काही द्यायचे ते मी दिले आहे, तेव्हा आता तुला काय पाहिजे असेल ते माग. यावर महेश (शंकर) म्हणाले, की हे जननी, माझ्या दोन्ही ज्येष्ठ बंधूंना पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यामुळे मी माझा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. कृपया मला असा वर प्रदान कर, की मी अमर (मृत्युंजय) होईन. माता प्रकृती म्हणाली, की पुत्रा, हे मी करू शकत नाही, परंतु मी एक युक्ती सांगू शकते, ज्यामुळे तुझे आयुष्य सर्वांपेक्षा जास्त होईल. ती युक्ती म्हणजे विधियोग आहे. (त्यामुळेच महादेव अधिकाधिक काल समाधी मध्ये राहतात.) अशाप्रकारे आदिमाया प्रकृतीने तिन्ही पुत्रांना सृष्टि रचनेच्या विभागांची वाटणी केली.

भगवान ब्रह्मांना काल लोकी ८४ लक्ष वस्त्रांची (शरीरे) रचना करण्याचे म्हणजेच रजोगुणाने प्रभावित करून संतान उत्पत्तीसाठी विवश करून जीव उत्पन्न करण्याचा विभाग प्रदान केला गेला. भगवान विष्णूंकडे उत्पन्न झालेल्या जीवांचे पालनपोषण करणे व मोह–ममता उत्पन्न करण्याची स्थिती कायम ठेवण्याचा विभाग प्रदान केला गेला.

भगवानशिव शंकरांकडे (महादेव) पिता ज्योति निरंजनास एक लक्ष मानव देहधारी जीव प्रतिदिन आहार करण्याचा शाप लागलेला असल्यामुळे संहार करण्याचा विभाग प्रदान केला.

येथे मनामध्ये एक प्रश्न उत्पन्न होतो, की ब्रह्मा, विष्णू आणि शंकर यांच्यापासून उत्पत्ती, स्थिती आणि संहार कशाप्रकारे होतो? ते तिघेही आपापल्या लोकामध्ये वास्तव्य करत असतात. जसे आजकाल संचारप्रणाली चालवण्यासाठी अवकाशात उपग्रह सोडले जातात आणि त्याद्वारे खाली पृथ्वीवर दूरदर्शन, इतर सेवा आदी संचारप्रणाली चालविली जाते, अगदी त्याचप्रकारे हे तिन्ही देव जेथे वास्तव्य करत असतील, तेथून त्यांच्या शरीरातून निघणारे सूक्ष्म गुणांचे तरंग तिन्ही लोकांमध्ये आपोआप प्रत्येक प्राण्यावर कायम प्रभाव ठेवतात.

हे विवरण एका ब्रह्मांडामधील ब्रह्मच्या (काल) रचनेचे आहे. क्षर पुरुषाची (काल) अशी एकवीस ब्रह्मांडे आहेत.


परंतु, क्षर पुरुष (काल) स्वतः व्यक्त म्हणजेच वास्तविक शरीर रूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. त्याच्या प्राप्तीसाठी तीन देवांनाही (ब्रह्मा, विष्णू, शिव) वेदांमध्ये वर्णन आलेल्या विधीनुसार खडतर साधना करूनही ब्रह्मचे (काल) दर्शन झालेले नाही. तत्पश्चात ऋषींनी वेदांचे पठन केले. त्यात लिहिले आहे, की 'अग्रेः तनूर् असि' (पवित्र यजुर्वेदाच्या पहिल्या अध्यातील १५ वा मंत्र). परमेश्वर सशरीर आहे, तसेच पवित्र यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील पहिल्या मंत्रामध्ये वर्णन आहे, की 'अग्ने: तनुर् असि विष्णवे त्वा सोमस्य तनूर् असि.' या मंत्रांमध्ये वेद दोन वेळा साक्ष देत आहे, की सर्वव्यापक, सर्वांचा पालनकर्ता, सत्पुरुष सशरीर आहे. पवित्र यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील ८ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे, की (कविर् मनिषी) ज्या परमेश्वराची सर्व प्राण्यांना अतिआस्था (इच्छा) आहे, ते 'कविर्' अर्थात कबीर आहेत. त्यांचे शरीर नाडीविना– नाडीरहित (अस्नाविरम्) आहे, ते (शुक्रम्) वीर्यापासून उत्पन्न झालेल्या,

पंचतत्त्वांनी बनलेल्या भौतिक कायारहित (अकायम्) आहेत. ते सर्वांचे स्वामी 'सर्वोपरि' (सर्वांत वर) सत्यलोकामध्ये विराजमान आहेत. त्या परमेश्वराचे शरीर तेजःपुंज व (स्वर्ज्योति) स्वयंप्रकाशित आहे, जे शब्दरूप अर्थात अविनाशी आहे. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर) जे सर्व ब्रह्मांडांची रचना करणारे (व्यदधाता) सर्व बह्मांडांचे रचनाहार (स्वयम्भू:) स्वयं प्रगट होणारे (यथा तश्य अर्थान्) वास्तवामध्ये (शाश्वत्) अविनाशी आहेत (गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्येही प्रमाण आहे.) भावार्थ असा, की पूर्ण ब्रह्मच्या शरीराचे नाव 'कबीर' (कविर्देव) आहे. त्या परमेश्वराचे शरीर नूर (तेज) तत्त्वाने बनलेले आहे. परमात्म्याचे शरीर अतिसूक्ष्म आहे आणि ते त्याच साधकाला दिसते, ज्याची दिव्य दृष्टी उघडलेली आहे. अशाप्रकारे जीवाचेही सूक्ष्म शरीर आहे, ज्यावर पाच तत्त्वांचे वेष्टन (आवरण) आहे म्हणजेच पंचतत्त्वांची काया चढलेली आहे आणि ते माता-पिता यांच्या संयोगाने (शुक्रम्) वीर्याने बनलेले आहे. शरीराचा त्याग केल्यानंतरही जीवाचे सूक्ष्म शरीर सोबतच राहते. ते शरीर त्याच साधकाला दृष्टीस पडते, ज्याची दिव्यदृष्टी उघडलेली आहे. परमात्मा व जीव यांची स्थिती अशाप्रकारेच समजून घ्यावी. वेदामध्ये 'ओऽम' नामाच्या स्मरणाचे प्रमाण आहे, ते केवळ ब्रह्म साधना आहे. या उद्देशाने 'ओऽम' नामाच्या जपास पूर्ण ब्रह्मचे मानून ऋषींनी हजारो वर्षे हठयोग (समाधी लावून) करून प्रभूच्या प्राप्तीची चेष्टा (प्रयत्न) केली. त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या, परंतु प्रभूचे दर्शन झाले नाही. याच सिद्धिरूपी खेळण्याने खेळून ऋषीसुद्धा जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये (८४ लक्ष योनींमध्ये) अडकले. त्यांना जे अनुभव आले, त्यानुसार त्यांनी आपल्या शास्त्रामध्ये परमात्याचे निराकार असे वर्णन केले आहे. ब्रह्मने (काळ) शपथ घेतली आहे, की मी आपल्या वास्तविक रूपामध्ये कोणालाही दर्शन देणार नाही. मला सर्व जण अव्यक्त समजतील. (अव्यक्तचा भावार्थ आहे, की कोणी आकार स्वरूपात आहे, परंतु व्यक्तिगत रूपाने स्थूल रूपामध्ये दर्शन देत नाही. आकाशामध्ये ढग जमा झाल्यावर दिवसाही सूर्य अदृश्य होतो म्हणजेच आपणाला तो दिसत नाही, परंतु वास्तवामध्ये तो ढगांच्या पलीकडे जसा आहे तसाच आहे. या अवस्थेला अव्यक्त असे म्हणतात). (प्रमाणासाठी गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ व २५ वा श्लोक आणि ११ व्या अध्यायातील ४८ व ३२ वा श्लोक)


पवित्र गीताचे ज्ञान देणारा ब्रह्म (काल) श्रीकृष्णाच्या शरीरात प्रेतवत प्रवेश करून म्हणत आहे, की हे अर्जुना, मी मोठा झालेला काल आहे आणि सर्वांना खाण्यासाठी आलो आहे. (गीतेच्या अकराव्या अध्यायातील ३२ वा श्लोक). हे माझे वास्तविक रूप आहे. हे रूप तुझ्याव्यतिरिक्त पूर्वी कोणी पाहिलेले नाही आणि तुझ्यानंतर इथून पुढे कोणी पाहू सुद्धा शकणार नाही. अर्थात वेदांमध्ये वर्णन असलेल्या यज्ञ-तप-जप, तसेच ओऽम नाम आदी विधींनीही माझ्या या वास्तविक स्वरूपाचे दर्शन होऊ शकणार नाही. (गीतेच्या अकराव्या अध्यायातील ४८ वा श्लोक). मी कृष्ण नाही. हे मूर्ख लोक मला अव्यक्तास कृष्ण रूपामध्ये व्यक्त (मनुष्यरूप) मानत आहेत, कारण ते माझ्या नीच (अनुचित) नियमांपासून अपरिचित आहेत. मी कधीही माझ्या या वास्तविक काल रूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. मी आपल्या योगमायेद्वारे गुप्त (लपून) राहतो. (गीता अध्याय ११ चा श्लोक २४-२५) विचार करा :- आपण लपून राहणाऱ्या विधानाला स्वतः अश्रेष्ठ (अनुत्तम) का म्हणत आहेत?

जर पिता आपल्या मुलांना दर्शन देत नसेल, तर त्याच्यात कोणती तरी कमतरता आहे. तो सुविधाही प्रदान करतो पण गुप्तही राहतो. कालला (ब्रह्म) शापामुळे एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करावा लागतो, तसेच प्रतिदिन २५ टक्के जे अधिक उत्पन्न होतात, त्यांची स्थिती सुरळीत राखण्यासाठी, तसेच कर्मभोगाचा दंड देण्यासाठी ८४ लक्ष योनींची रचना

# ब्रह्म लोकाचे लघु चित्र



# ज्योति निरंजन (काल) ब्रह्म चे लोक (२१ ब्रह्मण्ड) चे लघु चित्र



केलेली आहे. जर सर्वांसमक्ष येऊन एखाद्याची मुलगी, मुलगा, पत्नी, आई-वडील यांना तो भक्षण करू लागला, तर सर्वांना ब्रह्मची घृणा वाटू लागेल. तसेच जेव्हा कधी पूर्ण परमात्मा कविर्देव (कविरग्नि, कबीर परमेश्वर) स्वतः येतील किंवा आपला कोणी संदेशवाहक (दूत) पाठवतील, तेव्हा सर्व प्राणी सत्यभक्ती करून कालच्या जाळ्यातून निघून जातील. त्यामुळे हे आत्मे सत्लोकी जाऊ नयेत म्हणून कालब्रह्म फसवून, धोका देऊन येथे मृत्युलोकात ठेवतो.

त्यामुळे गीताच्या ७ व्या अध्यायातील १८, २४ व २५ व्या श्लोकांमध्ये त्याने आपल्या साधनेपासून मिळणारी मुक्ती (गती) ही (अनुत्तमाम्) 'अति अश्रेष्ठ' अगदी हीन दर्जाची आहे असे म्हटले आहे. तसेच त्याने आपल्या विधानालाही (नियम) अश्रेष्ठ (अनुत्तम) म्हटले आहे.

प्रत्येक बह्मांडामध्ये कालने एका महास्वर्गाची निर्मिती केली आहे. त्या महास्वर्गामध्ये एका स्थानी प्रकृतिद्वारे (दुर्गा/आदिमाया) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी नकली सत्लोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना केलेली आहे. कबीर साहेबांचा एक शब्द आहे, की 'कर नैनों दीदार महल में प्यारा है' मध्ये वाणी आहे, की 'काया भेद किया निरवारा, यह सब रचना पिण्ड मंझारा है। माया अविगत जाल पसारा, सो कारीगार भारा है। आदिमाया किन्ही चतुराई, झुठी बाजी पिण्ड दिखाई, अविगत रचना रचि अण्ड माहि वाका प्रतिबिम्ब डारा है।'

एका ब्रह्मांडामध्ये श्री ब्रह्माजींचा लोक, श्री विष्णूजींचा लोक आणि श्री शिवजींचा लोक अशी अन्य लोकांचीही रचना आहे. तेथे विराजित होऊन हे तिन्ही प्रभू खालील तीन लोकांत (स्वर्गलोक म्हणजेच इंद्रलोक, पृथ्वीलोक आणि पाताळलोक) प्रत्येकी एकेक विभागाचे स्वामी बनून प्रभुत्व करतात आणि आपल्या पित्याच्या (काल) आहारासाठी मानव प्राण्यांची उत्पत्ती, स्थिती आणि संहार यांचा कार्यभार सांभाळतात. या तिन्ही प्रभूंचाही जन्म व मृत्यू होत असतो. जेव्हा त्यांचा मृत्यू होतो, तेव्हा काल त्यांनाही भक्षण करतो. याच ब्रह्मांडामध्ये (यालाच 'अंडे' असेसुद्धा म्हटले जाते. कारण ब्रह्मांडाची रचना अंडाकार आहे. याला 'पिंड' असेही संबोधले जाते; कारण शरीरामध्ये (पिंड) एका ब्रह्मांडाची रचना कमळांमध्ये टीव्हीसारखी (संदेश लहरी) पाहिली जाते.) एक मानसरोवर आणि धर्मरायाचाही (न्यायाधीश) लोक आहे, तसेच जसे प्रत्येक देशाचे राजदूत भवन असते, अशा एका गुप्त स्थानी पूर्ण परमात्मा अन्य रूप धारण करून वास्तव्य करतात. तेथे कोणीही जाऊ शकत नाही. ज्यांची सत्लोकीची भक्ती अपूर्ण राहिलेली आहे, ते आत्मे तेथे राहतात. जेव्हा भक्तियुग येतो त्यावेळी कबीर परमेश्वर आपल्याकडुन आपला प्रतिनिधी म्हणजे पूर्ण संत सद्गुरू या पृथ्वीवर पाठवितात या पुण्यात्म्यांना पृथ्वीवर मानव शरीर प्राप्त होते आणि ते शीघ्रतेने सत्यभक्तीस लागतात व त्यांना पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. या स्थानावरून ते परत मृत्युलोकी येत नाहीत. या स्थानी वास्तव्य करणाऱ्या हंस आत्म्यांची निजभक्तीची कमाई खर्च होत नाही. परमात्म्याच्या भंडारातून त्यांना सर्व सुविधा उपलब्ध होत असतात. ब्रह्मच्या (काल) उपासकांची मात्र भक्तीची कमाई स्वर्ग-महास्वर्ग यांमध्ये समाप्त होते; कारण या काल लोकामध्ये (ब्रह्मलोक), तसेच परब्रह्म लोकामध्ये प्राण्यांना आपण केलेल्या कर्मांचे फळ तेवढेच मिळते.

क्षर पुरुषाने (ब्रह्म) आपल्या वीस ब्रह्मांडांचे चार महाब्रह्मांडांमध्ये विभाजन केलेले आहे. प्रत्येक महाब्रह्मांडामध्ये पाच ब्रह्मांडांचा एक समूह बनविला आहे. तसेच ते चारी बाजूंनी अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. याप्रमाणे चारही महाब्रह्मांडांनाही अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. राहिलेल्या एकविसाव्या ब्रह्मांडाची रचना एका महाब्रह्मांडाएवढे क्षेत्र घेऊन

केलेली आहे. या एकविसाव्या ब्रह्मांडामध्ये प्रवेश होताच, पुढे तीन रस्ते बनविले आहेत. या ब्रह्मांडामध्येही डाव्या बाजूला नकली सत्लोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना आदिमायेद्वारे (दुर्गा) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी निर्माण केली आहे. उजव्या बाजूला बारा सर्वश्रेष्ठ ब्रह्म साधकांना (भक्तांना) हा ब्रह्म ठेवतो. नंतर प्रत्येक युगामध्ये त्यांना आपला संदेश वाहक (संत, सद्गुरू) बनवून पृथ्वीवर पाठवितो. ते पृथ्वीवर शास्त्रविधिरहित साधना व ज्ञान सांगतात आणि स्वत:ही भक्तिहीन होतात आणि आपल्याबरोबर ते अनुयायांनाही कालच्या जाळ्यामध्ये फसवतात. त्यानंतर ते गुरू व त्यांचे शिष्य दोघेही नरकामध्ये जातात. त्यानंतर पुढे एक मोठे कुलूप आहे. तो रस्ता कालच्या (ब्रह्म) निजलोकी जातो. तेथे हा ब्रह्म (काल) आपल्या वास्तविक मानवसदृश कालरूपामध्ये वास्तव्य करत असतो. या स्थानावर एका दगडापासून बनलेला तवा (तप्तशिला) असतो, जो नेहमी लोहारा सारखा रसरसलेला असतो. ज्यावर एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचे सूक्ष्म शरीर भाजून त्यातून विकारी घाण काढुन तो प्रतिदिन खातो. त्यावेळी सर्व प्राण्यांना अत्यंत पीडा सहन कराव्या लागतात आणि तेथे हाहाकार माजतो. काही कालावधीनंतर ते जीव बेशुद्ध होतात; परंतु त्यांचा मृत्यू होत नाही. नंतर धर्मरायाच्या लोकामध्ये गेल्यावर कर्माधारावर त्यांना अन्य जन्म प्राप्त होतो. त्यांचा जन्म-मृत्यूचा फेरा सतत चालू राहतो. समोर लावलेले कुलूप ब्रह्म (काल) केवळ ज्यांचा आहार करायचा आहे, त्या प्राण्यांसाठी काही क्षण उघडतो. असे जरी असले, तरी पूर्ण परमात्म्याच्या सत्यनाम व सारनामाने हे कुलूप आपोआप उघडले जाते. असे हे कालचे जाळे (महाभयंकर चक्रव्यूह) स्वतः पूर्ण परमात्मा कबीर साहेबांनी आपला भक्त धर्मदासजी यांना समजावून सांगितले.

## ''परब्रह्मच्या सात संख ब्रह्मांडांची स्थापना''

कबीर परमेश्वरांनी (कविर्देव) पुढे सांगितले आहे, की परब्रह्मने (अक्षर पुरुष) कार्यात चूक केली आहे व तो मानसरोवरामध्ये झोपला, तसेच जेव्हा परमेश्वराने (मी अर्थात कबीर साहेबांनी) या सरोवरामध्ये अंड सोडले, तेव्हा अक्षर पुरुषाने (परब्रह्म) त्या अंड्याकडे क्रोधाने बघितले. या दोन्ही अपराधांमुळे त्यालाही सात संख ब्रह्मांडांसह सत्लोकातून बाहेर निष्कासित केले. दुसरे कारण म्हणजे अक्षर पुरुष (परब्रह्म) आपला साक्षीदार, सोबती ब्रह्मपासून (क्षरपुरुष) वेगळा झाल्यामुळे व्याकुळ होऊन परमपिता कविर्देवांना (कबीर परमेश्वर) विसरला आणि केवळ ब्रह्मच्याच आठवणीत गुंतला. तसेच त्याला असेही वाटले, की क्षर पुरुष (ब्रह्म) तर तिकडे आनंदात राहत असणार आणि आपणच पाठीमागे राहिलो. तसेच परब्रह्मसोबत जे सात संख ब्रह्मांडांमध्ये अन्य काही आत्मे जन्म-मृत्यूचा कर्मदंड भोगत आहेत, जे ब्रह्मबरोबर (काळ) एकवीस ब्रह्मांडांमध्ये फसलेले आहेत आणि पूर्ण परमात्म्याचे त्यांना विस्मरण झाले आहे, त्या हंसात्म्यापासून वेगळे (ताटातूट) झाल्याच्या दु:खात (आठवणीत) तो बुडाला. परमेश्वर कविर्देवांनी वारंवार समजावून सांगूनही त्यांच्याबद्दलची त्याची आस्था कमी झाली नाही. परब्रह्मने (अक्षर पुरुष) स्वतंत्र स्थान प्राप्त करणेच योग्य होईल, असा विचार करून राज्यप्राप्तीच्या इच्छेने सारनामाचा जप सुरू केला. अशाप्रकारे अन्य आत्म्यांनी (जे परब्रह्मच्या सात संख्य ब्रह्मांडांमध्ये फसलेले आहेत.) विचार केला, की जे आत्मे ब्रह्मसोबत गेले आहेत ते तेथे मौजमजा करणार आणि आपण मात्र येथे मागे राहिलो. परब्रह्मच्या मनाची अशी धारणा झाली, की क्षर पुरुष स्वतंत्र होऊन अत्यंत सुखी असेल. हा विचार करून त्याने अंतरात्म्यापासून भिन्न स्थान प्राप्त करण्याचे ठरविले. परब्रह्मने (अक्षर पुरुष) हठयोग केला

नाही; परंतु स्वतंत्र राज्यप्राप्तीसाठी सहजतेने ध्यानयोग विशेष तळमळतेने करू लागला. स्वतंत्र स्थान प्राप्त करण्यासाठी तो वेड्यासारखा विचार करू लागला. त्याने अन्नपाण्याचा त्याग केला. अन्य काही आत्मे त्याच्या वैराग्यावर आसक्त झाले आणि तो त्यांना आवडू लागला. पूर्ण प्रभूंनी (कबीर साहेब) विचारल्यावर परब्रह्मने स्वतंत्र स्थानाची मागणी केली, तसेच काही हंसात्म्यांना आपल्याबरोबर नेण्याची इच्छा व्यक्त केली. ज्या आत्म्यांची तुझ्याबरोबर जाण्याची इच्छा असेल, त्यांना पाठवून देतो, असे कविर्देवांनी सांगितले. जे कोण आत्मे परब्रह्मसोबत जाऊ इच्छितात, त्यांनी आपली सहमती व्यक्त करावी, असे पूर्ण प्रभूंनी विचारले. बऱ्याच कालावधीनंतर एका हंसाने स्वीकृती दिली. नंतर त्याच्यापाठोपाठ एकेक करत त्या सर्वच आत्म्यांनी सहमती व्यक्त केली. सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंसात्म्याला परमात्म्याने स्त्री रूप दिले आणि तिचे नाव 'ईश्वरी माया' (प्रकृति सुरती) असे ठेवले. बाकीच्या आत्म्यांना त्या ईश्वरी मायेमध्ये प्रवेशित केले आणि अचिंत्यद्वारे अक्षर पुरुषाकडे (परब्रह्म) पाठविले. (पतिव्रता पदापासून (निष्ठा) ढळल्याची त्यांना शिक्षा मिळाली.)

अनेक युगे ईश्वरी माया व परब्रह्म दोघेही सात संख ब्रह्मांडांमध्ये एकत्र राहिले. त्या काळात परब्रह्मने कोणतेही गैरवर्तन केले नाही. त्याने ईश्वरी मायेच्या स्वच्छेने तिचा अंगीकार केला आणि आपल्या शब्दशक्तीने नखांनी स्त्री इन्द्रीय (योनी) बनवली व ईश्वरी देवीच्या सहमतीने संतान उत्पत्ती केली. यामुळेच परब्रह्मच्या लोकातील (सात संख ब्रह्मांडांतील) प्राण्यांना तप्तशिलेवरील भयंकर कष्ट नाहीत. तसेच तेथे ब्रह्मलोकीच्या देवांपेक्षाही पशुपक्षीसुद्धा अधिक चारित्र्यसंपन्न आहेत. तेथील प्राण्यांचे आयुष्यसुद्धा दीर्घ आहे; परंतु जन्म-मृत्यूच्या कर्मधारावर कर्मदंड आणि परिश्रम करूनच उदरपूर्ती होते. स्वर्ग आणि नरकही असेच बनलेले आहेत. परब्रह्मला (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्मांडे त्याच्या सारनामाच्या इच्छारूपी भक्तिध्यान अर्थात सहज समाधी विधीद्वारे मिळवलेल्या कमाईचे प्रतिफल म्हणून प्रदान केलेली आहेत आणि सत्यलोकापेक्षा भिन्न स्थानावर गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार अदृश्य कवचामध्ये) कविर्देवांनी बंदिस्त करून सात संख ब्रह्मांडांसह अक्षर ब्रह्म व ईश्वरी माया यांना सत्यलोकातून निष्कासित केले आहे.

सत्यलोक आदीमध्ये जी असंख्य ब्रह्मांडे आहेत त्यांचे, ब्रह्मची २१ ब्रह्मांडे आणि परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे या सर्वांचे प्रभू (स्वामी, मालक) पूर्ण ब्रह्म (सत्पुरुष) आहेत. अर्थात, परमेश्वर कविर्देव (कबीरसाहेब) हे सर्व कुळाचे स्वामी (प्रभु) आहेत.

श्री ब्रह्मा, श्री विष्णू आणि श्री शिव यांच्याकडे चार-चार भुजा (हात) आणि सोळा कला आहेत, तर प्रकृतिदेवीकडे (दुर्गा) आठ भुजा (हात) आणि ६४ कला आहेत. ब्रह्मकडे (क्षरपुरुष) एक हजार भुजा आणि एक हजार कला आहेत. तसेच तो २१ ब्रह्मांडांचा प्रभू आहे. परब्रह्मकडे (अक्षरपुरुष) दहा हजार भुजा आणि दहा हजार कला आहेत. तसेच तो सात संख ब्रह्मांडांचा प्रभू आहे; पूर्ण ब्रह्म (कविर्देव, परम अक्षर पुरुष म्हणजेच सत्पुरुष) यांच्याकडे असंख्य भुजा व असंख्य कला आहेत आणि ते ब्रह्मची २१ ब्रह्मांडे, परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे यांच्यासह असंख्य ब्रह्मांडांचे प्रभू (स्वामी) आहेत. प्रत्येक प्रभू आपल्या सर्व भुजा एकत्र घेऊन (गुप्त ठेवून) केवळ दोन भुजासुद्धा ठेवू शकतात किंवा जेव्हा वाटेल तेव्हा सर्व भुजा प्रगट करू शकतात. जसे फिरता कॅमेरा बाहेर लावला आणि टीव्ही आत ठेवल्यावर बाहेरचे सर्व दृश्य टीव्हीवर दिसते, तसेच दुसरा टीव्ही बाहेर ठेवला आणि आतमध्ये कॅमेरा स्थिर करून ठेवल्यावर टीव्हीवर केवळ आत चाललेल्या घडामोडीच दिसतात. त्यामुळे सर्व कर्मचारी खबरदारी घेत असतात, तसे पूर्ण परमात्मा परब्रह्मच्या प्रत्येक ब्रह्मांडामध्ये वेगळे स्थान निर्माण करून अन्य

**रूपामध्ये गुप्त वास्तव्य करतात.**

**अशाप्रकारे पूर्ण परमात्म्याने आपल्या सत्‌लोकी विराजमान होऊन सर्वांवर नियंत्रण ठेवले आहे. जसा सूर्य दूर असूनही अन्य लोकांवर त्याचा प्रभाव आहे, तसे प्रत्येक ब्रह्मांडामध्ये सद्‌गुरू कविर्देव हजर असतात.**

## ''पवित्र अथर्ववेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील पहिला मंत्र :-**

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद वि सीमतः सुरुचो वेन आवः।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमसतश्च वि वः ।।१।।

ब्रह्म-ज-ज्ञानम्-प्रथमम्-पुरस्तात्-विसिमतः-सुरुचः-वेनः-आवः- सः-बुध्न्याः- उपमा-अस्य-विष्ठाः- सतः-च- योनिम्-असतः- च-वि वः

अनुवाद : (प्रथमम्) प्राचीन अर्थात् सनातन (ब्रह्म) परमात्म्याने (ज) प्रगट होऊन (ज्ञानम्) आपल्या ज्ञानाने पूर्ण विचारपूर्वक (पुरस्तात्) शिखरामधील अर्थात सत्‌लोक आदींना (सुरुचः) स्वेच्छेने अत्यंत तत्परतेने स्वयंप्रकाशित (विसिमतः) सीमारहित म्हणजेच विशाल सीमा असणाऱ्या भिन्न लोकांना/खंडांना त्या (वेनः) विणकाराने (निर्माता) धाग्यांनी म्हणजेच वस्त्रासारखे विणून (आवः) सुरक्षित केले आहे (च) आणि (सः) तो पूर्ण ब्रह्मच सर्व रचना करतो. (अस्य) यासाठी त्या (बुध्न्याः) मूळ स्वामीने (योनिम्) मूळस्थान सत्यलोकाची रचना केली आहे. (अस्य) त्याच्या/सत्‌लोकांच्या (उपमा) सदृश अर्थात मिळतेजुळते (सतः) अक्षरपुरुष म्हणजेच परब्रह्मचा लोक/खंड काही प्रमाणात स्थायी (च) आणि (असतः) क्षरपुरुषाचे अस्थायी लोक इत्यादी (वि वः) वेगवेगळे आवास स्थान (विष्ठाः) स्थापित केले.

**भावार्थ : पवित्र वेद सांगणारा ब्रह्म (काल) म्हणत आहे, की सनातन परमेश्वराने स्वतः अनामय (अनामी) लोकातून सत्यलोकी प्रगट होऊन आपल्या ज्ञानाने पूर्ण विचाराअंती वस्त्रासारखी रचना करून वरील सत्‌लोक इत्यादींना सीमारहित स्वयंप्रकाशित अजर-अमर म्हणजेच अविनाशी स्थिर केले आणि खालील परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे व ब्रह्मची (ज्योतिनिरंजन) २१ ब्रह्मांडे व त्यामधील लहानातील लहान (सूक्ष्मातील सूक्ष्म) रचना त्या परमात्म्याने अस्थायी स्वरूपात केली आहे.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील दुसरा मंत्र :-**

इयं पित्र्या राष्ट्र्येत्वग्रे प्रथमाय जनुषे भुवनेष्ठाः।
तस्मा एतं सुरुचं ह्वारमह्यं घर्मं श्रीणन्तु प्रथमाय धास्यवे ।।२।।

इयम्-पित्र्या-राष्ट्रि-एतु-अग्रे-प्रथमाय-जनुषे-भुवनेष्ठाः-तस्मा-एतम्-सुरुचम्-हवारमह्यम्-धर्मम्-श्रीणान्तु-प्रथमाय-धास्यवे

अनुवाद : (इयम्) याच (पित्र्या) जगत्पित्या परमेश्वराने (एतु) या (अग्रे) सर्वोत्तम (प्रथमाय) सर्वांत पहिली माया परानंदनी (राष्ट्रि) राजेश्वरी शक्ती म्हणजेच पराशक्ती, जिला आकर्षण शक्ती असेही संबोधले जाते (जनुषे ) उत्पन्न करून (भुवनेष्ठाः) लोक/स्थान/खंड स्थापन केले (तस्मा) त्याच परमेश्वराने (सुरुचम्) मोठ्या प्रसंतेने, आनंदाने स्वइच्छेने (एतम्) या (प्रथमाय) प्रथम उत्पत्ती झालेल्या शक्ती म्हणजेच पराशक्तीद्वारे (हवारमह्यम्) एक दुसऱ्यांच्या वियोगाला/एकापासून दुसऱ्याच्या वियोगास थांबविण्याचा म्हणजेच आकर्षण शक्तीच्या (श्रीणान्तु) गुरुत्वाकर्षणाला परमात्म्याने नित्य राहण्याचा आदेश दिला, जो कधीही समाप्त न होणाऱ्या (धर्मम्) स्वभावाला

(धारयवे) धारण करून धाग्यांनी वस्त्रासारखे विणून स्थिर केले आहे.

**भावार्थ :– जगत्पित्या परमेश्वराने आपल्या शब्दशक्तीने राष्ट्री म्हणजेच सर्वांत प्रथम माया राजेश्वरी उत्पन्न केली आणि त्या पराशक्तीद्वारे एक दुसऱ्यांना आकर्षण शक्तीने (गुरुत्वाकर्षण) एकत्र ठेवणाऱ्या (थांबविणाऱ्या) व कधीही समाप्त न होणाऱ्या गुणाने या सर्व ब्रह्मांडांची स्थापना केली.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ३ रा मंत्र :–**

प्र यो जज्ञे विद्वानस्य बन्धुर्विश्वा देवानां जनिमा विवक्ति।
ब्रह्म ब्रह्मण उज्जभार मध्यान्नीचैरुच्चैः स्वधा अभि प्र तस्थौ ।।३।।

प्र–यः–जज्ञे–विद्वानस्य–बन्धुः–विश्वा–देवानाम्– जनिमा– विवक्ति–बह्मः– ब्रह्मणः–उज्जभार–मध्यात्–निचैः–उच्चैः–स्वधा–अभिः–प्रतस्थौ।

अनुवाद : (प्र) सर्वप्रथम (देवानाम्) देवता व ब्रह्मांडे यांच्या (जज्ञे) उत्पत्तीच्या ज्ञानाला (विद्वानस्य) जिज्ञासू भक्ताचा (यः) जो (बन्धुः) वास्तविक साथी/सोबती म्हणजेच पूर्ण परमात्माच आपल्या निजसेवकाला (जनिमा) आपल्याद्वारे सृजन/उत्पन्न केलेल्या (विवक्ति) स्वतःच योग्यप्रकारे विस्तारपूर्वक सांगतात, की (ब्रह्मणः) पूर्ण परमात्म्याने (मध्यात्) आपल्या माध्यमातून म्हणजेच शब्दशक्तीने (ब्रह्मः) ब्रह्म–क्षरपुरुष म्हणजेच कालला (उज्जभार) उत्पन्न करून (विश्वा) सर्व संसारास म्हणजेच सर्व लोकांस/धामांस (उच्चैः) वरील सत्यलोक इत्यादी (निचैः) खालील परब्रह्म व ब्रह्म यांची सर्व ब्रह्मांडे (स्वधा) आपल्या धारण केलेल्या (अभिः) आकर्षण शक्तीने (प्रतस्थौ) दोन्हींना चांगल्या प्रकारे स्थिर केले.

**भावार्थ :– पूर्ण परमात्मा आपण रचलेल्या सृष्टीचे ज्ञान आणि सर्व आत्म्यांच्या उत्पत्तीचे ज्ञान आपल्या निजदासाला स्वतः योग्य आणि विस्तारपूर्वक सांगत आहेत, की पूर्ण परमात्म्याने आपल्या माध्यमातून म्हणजेच शरीरातून आपल्या शब्द शक्तीद्वारे ब्रह्मची (क्षर पुरुष/काल) उत्पत्ती केली आणि सर्व ब्रह्मांडांच्या वर सत्लोक, अलखलोक, अगमलोक, अनामीलोक आदी व खाली परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि ब्रह्मची २१ ब्रह्मांडे यांना आपण धारण केलेल्या आकर्षण शक्तीद्वारे स्थिर केलेले आहे.**

**ज्या प्रकारे पूर्ण परमात्मा कबीर परमेश्वर (कविर्देव) यांनी आपल्या निजसेवक अर्थात सखा श्री धर्मदासजी, आदरणीय गरीबदासजी आदींना आपल्याद्वारे रचल्या गेलेल्या सृष्टीचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे, तसे हा वेदमंत्रसुद्धा त्याचेच समर्थन करत आहे.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ४ था मंत्र :–**

स हि दिवः स पृथिव्या ऋतस्था मही क्षेमं रोदसी अस्कभायत्।
महान् मही अस्कभायद् वि जातो द्यां सद्म पार्थिवं च रजः ।।४।।

हि–दिवः–स–पृथिव्या–ऋतस्था–मही–क्षेमम्–रोदसी–अकस्भायत्–महान्–मही–अस्कभायद्–विजातः–धाम्–सदम्–पार्थिवम्–च–रजः।

भाषांतर :– (स) त्याच सर्वशक्तिमान परमात्म्याने (हि) निःसंदेह (दिवः) वरील चारही दिव्य लोकांस–सत्यलोक, अलखलोक, अगमलोक तथा अनामी अर्थत अकहलोक या दिव्य गुणांनी युक्त लोकांस (ऋतस्था) सत्य, स्थिर म्हणजेच अजर–अमर रूपाद्वारे स्थिर केले, (स) त्यांच्यासारखे (पृथिव्या) खाली पृथ्वीवरील सर्व लोक– परब्रह्मची सात संख आणि ब्रह्म/कालची २१ ब्रह्मांडे (मही) पृथ्वी तत्त्वाने (क्षेमम्) सुरक्षितपणे (अस्कभायत्) स्थिर केले. (रोदसी) आकाश तत्त्व व पृथ्वी तत्त्व

या दोन्ही तत्त्वांच्या वरील आणि खालील ब्रह्मांडांना (जसे आकाश एक सूक्ष्म तत्त्व आहे, आकाशाचा गुण 'शब्द' आहे. पूर्ण परमात्म्याने वरील लोक (खंड) शब्दरूपाने रचले जे तेजःपुंजाने बनलेले आहेत, तर खालील परब्रह्मचे (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्मांडे व ब्रह्मच्या (क्षर पुरुष) २१ ब्रह्मांडंची रचना पृथ्वी तत्त्वाने अस्थायी केली आहे.) (महान्) पूर्ण परमात्म्याने (पार्थिवम्) पृथ्वीचे (वि) वेगवेगळे (धाम्) लोक (च) आणि (सदम्) आवासस्थान (मही) पृथ्वी तत्त्वाने (रजः) प्रत्येक ब्रह्मांडामध्ये लहान-लहान लोकांची/धामांची (जातः) रचना करून (अस्कभायत्) स्थिर केले.

**भावार्थ :- वरील चारही लोक-सत्यलोक, अलखलोक, अगमलोक, अनामी म्हणजेच अकहलोक हे तर अजर-अमर स्थायी म्हणजेच अविनाशी रचलेले आहेत आणि खालील ब्रह्म व परब्रह्मच्या लोकांची (धामांची) अस्थायी रचना करून, तसेच अन्य लहान-लहान लोकही त्या परमेश्वराने रचून स्थिर केले.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ५ वा मंत्र :-**

स बुध्न्यादाष्ट्र जनुषो भ्यग्रं बृहस्पतिर्देवता तस्य सम्राट ।
अहर्यच्छुक्रं ज्योतिषो जनिष्टाथ द्युमन्तो वि वसन्तु विप्राः ।।५।।

स-बुध्न्यात्-आष्ट्र-जुनषेः-अभि-अग्रम्-बृहस्पतिः-देवता-तस्य-सम्राट-अहः-यत्-शुक्रम्-ज्योतिषः-जनिष्ट-अथ-द्युमन्तः-वि-वसन्तु-विप्राः।

अनुवाद : (सः) त्या (बुध्न्यात्) मूळ मालक/स्वामीपासून (अभि-अग्रम) सर्वप्रथम स्थानावर (आष्ट्र) अष्टंगी माया-दुर्गा म्हणजेच प्रकृतिदेवी (जनुषेः) उत्पन्न झाली. कारण खालील परब्रह्म व ब्रह्मच्या लोकांचे प्रथमस्थान सत्लोक आहे. याला तिसरे धाम असेसुद्धा संबोधले जाते. (तस्य) या दुर्गादेवीचेही स्वामी हेच (सम्राट) राजाधिराज (बृहस्पतिः) सर्वश्रेष्ठ पती व जगद्गुरू (देवता) परमेश्वर आहेत. (यत्) ज्यांच्यापासून (अहः) सर्वांचा वियोग झाला (अथ) त्यानंतर (ज्योतिषः) ज्योतिरूप निरंजन म्हणजेच काळच्या (शुक्रम्) वीर्य अर्थात बीजशक्तीने (जनिष्ट) दुर्गेच्या उदरातून उत्पन्न होऊन (विप्राः) भक्त आत्मे (वि) वेगळे/स्वतंत्रपणे (द्युमन्तः) मनुष्यलोक आणि स्वर्गलोकामध्ये ज्योतिनिरंजनाच्या आदेशानुसार (वसन्तु) दुर्गा म्हणाली, की 'निवास करा.' अर्थात, ते निवास करू लागले.

**भावार्थ :- पूर्ण परमात्म्याने वरील चारही लोकांमधील जे खालील सर्वप्रथम म्हणजेच सत्यलोकामध्ये आष्ट्रा म्हणजेच अष्टंगीची (प्रकृतिदेवी/दुर्गा) उत्पत्ती केली. हे परमात्मा, राजाधिराज, जगद्गुरू, पूर्ण परमेश्वर (सत्पुरुष) आहेत, ज्यांपासून सर्वांचा वियोग झालेला आहे. नंतर सर्व प्राणी ज्योति निरंजनाच्या (काल) बीजापासून (वीर्य) दुर्गादेवीच्या (आष्ट्रा) गर्भातून उत्पन्न होऊन स्वर्गलोक व पृथ्वीलोकावर निवास करू लागले.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ६ वा मंत्र :-**

नूनं तदस्य काव्यो हिनोति महो देवस्य पूर्व्यस्य धाम।
एष जज्ञे बहुभिः साकमित्था पूर्वे अर्धे विषिते ससन् नु।।६।।

नूनम्-तत्-अस्य-काव्यः-महः-देवस्य-पूर्व्यस्य-धाम-हितोनि-पूर्वे-विषिते-एष-जज्ञे-बहुभिः-साकम्-इत्था-अर्धे-ससन्-नु।

अनुवाद : (नूनम्) निःसंदेह (तत्) ते पूर्ण परमेश्वर म्हणजेच तत् ब्रह्मच (अस्य) या (काव्यः) भक्त आत्म्यास, जो पूर्ण परमेश्वराची भक्ती विधिवत करतो परत (महः) सर्वशक्तिमान (देवस्य) परमेश्वराच्या (पूर्व्यस्य) पूर्वीच्या (धाम) लोकामध्ये म्हणजेच सत्यलोकी (हिनोति) पाठवितो.

(पूर्वे) पूर्वीचे (विषिते) विशेष प्रेमी भक्ताने (एष) या परमेश्वराला व (जज्ञे) सृष्टी उत्पत्तीच्या ज्ञानाला जाणून घेऊन (बहुभि:) अत्यंत आनंद (साकम्) सहित (अर्धे) अर्धी (ससत्) निद्रा घेत (इत्था) विधिवत अशाप्रकारे (नु) खऱ्या आत्म्याने/हृदयाने स्तृती करतो.

**भावार्थ :– तेच पूर्ण परमेश्वर सत्यसाधना करणाऱ्या साधकाला त्या पूर्वीच्या स्थानी (सत्यलोक/सत्लोक) घेऊन जातात, ज्या स्थानावरून वियोग होऊन ते आलेले होते. तेथे त्या वास्तविक सुखदायी प्रभूला प्राप्त केल्यानंतर साधक आनंदाने आत्मविभोर होऊन सद्गदित होऊन अंत:करणाने स्तुती करतो, की हे परमात्म्या, असंख्य जन्म भरकटलेल्यांना हे वास्तविक स्थान प्राप्त झाले. याचे प्रमाण ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ व्या मंत्रामध्येही आहे.**

**आदरणीय गरीबदासजींना अशाप्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) स्वतः सत्यभक्ती प्रदान करून सत्यलोकी घेऊन गेले होते, तेव्हा आपल्या अमृतवाणीमध्ये आदरणीय गरीबदासजी महाराज म्हणतात, की :–**

'गरीब, अजब नगर में ले गए, हमकुँ सतगुरू आन।
झिलके बिम्ब अगाध गति, सुते चादर तान।।'

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ७ वा मंत्र :–**

यो थर्वाणं पित्तरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्।
त्वं विश्वेषां जनिता यथास: कविर्देवो न दभायत् स्वधावान्।।७।।

य:–अथर्वाणम्–पित्तरम्–देवबन्धुम्–बृहस्पतिम्–नमसा–अव–च–गच्छात्–त्वम्–विश्वेषाम्–जनिता–यथा–स:–कविर्देव:–न–दभायत्–स्वधावान्

अनुवाद :– (य:) जे (अथर्वाणम्) अचल अर्थात अविनाशी (पित्तरम्) जगत्पिता (देवबन्धुम्) भक्तांचे वास्तविक सोबती म्हणजेच आत्म्याचे आधार (बृहस्पतिम्) जगद्गुरू (च) आणि (नमसा) विनम्र पुजारी म्हणजेच विधिवत साधकाला (अव) सुरक्षेसह (गच्छात) सत्लोकी जाणाऱ्यांना सत्लोकी घेऊन जाणारे (विश्वेषाम्) सर्व ब्रह्मांडांची (जनिता) रचना करणारे जगदंबा म्हणजेच मातेच्या गुणांनीही युक्त (न दभायत्) काल सारखा धोका न देणाऱ्या (स्वधावान्) स्वभावाचे म्हणजेच गुणांचे (यथा) त्याच प्रकारचे/जसेच्या जसे (त्वम्) तुम्ही (कविर्देव:/कविर् देव:) कविर्देव आहात. भाषाभिन्नत्वामुळे यांनाच कबीर परमेश्वर असेही संबोधले जाते.

**भावार्थ :– या मंत्राने हेसुद्धा स्पष्ट केले आहे, की त्या परमेश्वराचे नाव कविर्देव म्हणजेच कबीर परमेश्वर आहे, ज्यांनी सर्व रचना केलेली आहे.**

**जे परमेश्वर अचल म्हणजेच वास्तवामध्ये अविनाशी (गीतेच्या पंधराव्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्येही प्रमाण आहे.) जगद्गुरू, आत्माधार, जे पूर्ण मुक्त होऊन सत्यलोकी गेलेले आहेत, त्यांना सत्लोकी घेऊन जाणारे, सर्व ब्रह्मांडांचे रचनाकार, काल सारखा (ब्रह्म) धोका न देणारे, जसे आहेत तसे, तेच स्वतः कविर्देव अर्थात कबीर प्रभु आहेत. हेच परमेश्वर सर्व ब्रह्मांडांना व प्राण्यांना आपल्या शब्दशक्तीद्वारे उत्पन्न करतात म्हणूनच त्यांना (जनिता) मातासुद्धा संबोधले जाते. (पित्तरम) पिता आणि (बन्धु) भाऊसुद्धा वास्तवामध्ये हेच आहेत. तसेच (देव) परमेश्वरही हेच आहेत. त्यामुळे याच कविर्देवांची (कबीर परमेश्वर) स्तुती केली जाते.** 'त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधु च सखा त्वमेव, त्वमेव विद्या च द्रविणम् त्वमेव, त्वमेव सर्व मम् देव देव।' **या परमेश्वराच्या महिमेचे पवित्र ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील २४ व्या सुक्तामध्ये विस्तृत विवरण आहे.**

# ''पवित्र ऋग्वेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील पहिला मंत्र :–**

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्।
स भूमिं विश्वतों वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम्।।१।।

सहस्रशिर्षा–पुरुषः–सहस्राक्षः–सहस्रपात्–स–भूमिम्–विश्वतः–वृत्वा– अत्यातिष्ठत्–दशंगुलम्।

अनुवाद :– (पुरुषः) विराटरूपी काल भगवान म्हणजेच क्षर पुरुष (सहस्रशिर्षा) हजार शिरे/मस्तके असणारा, (सहस्राक्षः) हजार डोळे असणारा (सहस्रपात्) हजार पाय असणारा, (स) तो काल (भूमिम्) पृथ्वीसारख्या २१ ब्रह्मांडांना (विश्वतः) सर्व दिशांनी/बाजूंनी (दशंगुलम्) दहाही अगुंष्टांनी/बोटांनी म्हणजेच पूर्ण रूपाने ताब्यात घेऊन (वृत्वा) वर्तुळाकार परिघात घेरून (अत्यातिष्ठत) यापेक्षा श्रेष्ठ म्हणजे आपल्या काल लोकामधील सर्वांत वेगळ्या अनोख्या २१ व्या ब्रह्मांडामध्ये वास्तव्य करतो, राहतो.

**भावार्थ :– या मंत्रामध्ये विराटचे (काल ब्रह्म) वर्णन आले आहे (गीतेच्या दहाव्या व अकराव्या अध्यायांमध्येही याच काल–ब्रह्मचे असेच वर्णन आहे. ११ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये अर्जुनाने म्हटले आहे, की हे सहस्रबाहू म्हणजेच हजार भुजा असणारे तुम्ही आपल्या चतुर्भुज रूपामध्ये दर्शन द्या.)**

**ज्याचे हजार हात–पाय, हजार डोळे. कान आदी आहेत, तो विराटरूप काल प्रभु आपल्या आधीन सर्व प्राण्यांना पूर्णपणे वश करून म्हणजे वीस ब्रह्मांडांना गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार कवचामध्ये) थांबवून स्वतः यांच्यापेक्षा वरील (वेगळ्या) २१ व्या ब्रह्मांडामध्ये बसलेला आहे.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील २ रा मंत्र :–**

पुरुष एवेंद सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम्।
उजामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति।।२।।

पुरुष–एव–इदम्–सर्वम्–यत्–भूतम्–यत्–च–भाव्यम्–उत्–अमृतत्वस्य–इशानः–यत्–अन्नेन–अतिरोहति।

अनुवाद : (एव) अशाप्रकारे काही योग्यप्रकारचा (पुरुष) भगवान आहे, तो अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म आहे. (च) आणि (इदम्) हा (यत) जो (भूतम्) उत्पन्न झालेला आहे, (यत्) जो (भूतम्) भविष्यामध्ये उत्पन्न होईल (सर्वम्) सर्व (यत्) प्रयत्नांनी म्हणजेच कष्टाद्वारे (अन्नेन) अन्नातून (अतिरोहति) विकसित होतो. हा अक्षर पुरुषसुद्धा (उत) संदेहयुक्त (अमृतत्वस्य) मोक्षाचा (इशानः) स्वामी आहे. अर्थात, भगवान म्हणून अक्षर पुरुषही काहीअंशी योग्य आहे; परंतु पूर्ण मोक्षदायक नाही.

**भावार्थ :– या मंत्रामध्ये परब्रह्मचे (अक्षर पुरुष) विवरण आले आहे, ज्याच्यात भगवानांची काही अंशी लक्षणे आहेत; परंतु याच्या भक्तीने पूर्ण मोक्ष मिळत नाही. यामुळे त्याला संदेहयुक्त मुक्तिदाता संबोधले जाते. याला काही प्रभुचे गुणयुक्त असल्याचे यासाठी म्हटले आहे, कारण हा काल सारखा तप्तशिलेवर सूक्ष्मदेह भाजून खात नाही; परंतु या परब्रह्मच्या लोकीही प्राण्यांना परिश्रम करून कर्माधारावरच फळ प्राप्त होते आणि अन्नापासूनच सर्व प्राण्यांचे शरीर विकसित होते. जन्म व मृत्यूचा कालावधी जरी काल पेक्षा (क्षर पुरुष) अधिक असला तरीही उत्पत्ती, प्रलय आणि चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधील यातना भोगाव्याच**

**लागतात.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ३ रा मंत्र :**

एतावानस्य महिमातो ज्यायाँश्च पुरुषः।
पादो स्य विश्वा भूतनि त्रिपादस्यामृतं दिवि ।।३।।

एतावान्–अस्य–महिमा–अतः–ज्यायान्–च–पुरुषः–पादः–अस्य–विश्वा–भूतानि–त्रि–पाद्–अस्य–अमृतम्–दिवि ।

अनुवाद :– (अस्य) या अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्मची तर (एतावान्) एवढीच (महिमा) प्रभुता आहे (च) आणि (पुरुषः) तो परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्णब्रह्म परमेश्वर तर (अतः) याच्यापेक्षाही (ज्यायान्) कितीतरी मोठा/श्रेष्ठ आहे. (विश्वा) समस्त (भूतानि) क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष, तसेच यांच्या लोकांमधील/सत्यधामांमधील जेवढेही प्राणी आहेत, ते (अस्य) या पूर्ण परमात्मा परम अक्षर पुरुषाचा (पादः) एकच पाय आहे. अर्थात, ते एक अंशमात्र आहेत. (अस्य) या पूर्ण परमेश्वराचे (त्रि) तीन (दिवि) दिव्यलोक जसे सत्यलोक, अलखलोक, अगम लोक (अमृतम्) अविनाशी (पाद्) दुसरा पाय आहे. अर्थात, जे काही सर्व ब्रह्मांडांमध्ये उत्पन्न होते, ते सत्यपुरुष पूर्ण परमात्म्याचाच अंश किंवा अंग आहे.

**भावार्थ :– या दुसऱ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या अक्षर पुरुषाची (परब्रह्म) एवढीच महिमा आहे आणि ते पूर्णपुरुष कविर्देव तर याच्यापेक्षा कितीतरी पटीने विशाल/श्रेष्ठ आहेत म्हणजेच सर्व शक्तिमान आहेत. सर्व ब्रह्मांडे त्यांच्याच अंशावर तग धरून आहेत. या मंत्रामध्ये तीन लोकांचे (धामांचे) वर्णन एवढ्यासाठीच आले आहे, की चौथे अनामी (अनामय) लोक अन्य रचनेच्या पूर्वीचे आहे. याच तीन प्रभूंचे (क्षर पुरुष, अक्षर पुरुष आणि या दोघांपेक्षा वेगळा परम अक्षर पुरुष) विवरण (गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ वा श्लोक) मध्ये आले आहे. {याचे प्रमाण आदरणीय गरीब दास साहेबजी सांगतात की :–**

'गरीब जाके अर्ध रुम पर सकल पसारा, ऐसा पूर्ण ब्रह्म हमारा ।।'
'गरीब, अनंत कोटि ब्रह्मांड का, एक रति नहीं भार।
सतगुरु पुरुष कबीर है कुल के सृजनहार ।।'

**याचेच प्रमाण आदरणीय दादू साहेबजी सांगत आहेत, की :–**

''जिन मोकुं निज नाम दिया, सोई सतगुरु हमार।
दादू दूसरा कोए नही, कबीर सृजनहार।।''

**याचेच प्रमाण आदरणीय नानक साहेबजी देत आहेत, की :–**

''यक अर्ज गुएतम पेश पेरा तो दर कून करतार।
हक्का कबीर करीम तू, बेएब परवरदिगार।।'

**(श्री गुरु ग्रंथ साहेब मधील पान नं. ७२१, महला १, राग तिलंग)**

**कून करतार याचा अर्थ असा आहे, की सगळ्याचे रचनकार म्हणजेच शब्दशक्तीद्वारे रचना करणारे शब्दस्वरूपी प्रभू, हक्का कबीरचा अर्थ आहे सत् कबीर, करीमचा अर्थ दयाळू, आणि परवरदिगारचा अर्थ परमात्मा असा आहे.}**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ४ था मंत्र :**

त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादो स्येहाभवत्पुनः।
ततो विष्व ङ्व्यक्रामत्साशनानशने अभि ।।४।।

त्रि–पाद–ऊर्ध्वः–उदैत्–पुरुषः–पादः–अस्य–इह–अभवत्–पूनः–ततः–विश्वङ्–व्यक्रामत्–सः–अशनानशने–अभि।

अनुवाद :– (पुरुषः) हा परम अक्षर ब्रह्म अर्थात अविनाशी परमात्मा (ऊर्ध्वः) वर (त्रि) तीन लोक–सत्यलोक, अलखलोक, अगमलोक रूपी (पाद) पाय म्हणजेच वरील भागामध्ये (उदैत्) प्रगट होतो म्हणजे विराजमान आहे. (अस्य) याच परमेश्वर पूर्ण ब्रह्मचा (पादः) एक पाय म्हणजे एक हिस्सा जगत्‌रूप (पुनर्) पुन्हा (इह) येथे (अभवत्) प्रगट होतो. (ततः) त्यामुळे (सः) तो अविनाशी पूर्ण परमात्मा (अशानानशने) जीवात्म्यांचे सूक्ष्म शरीर खाणाऱ्या काल च्या म्हणजेच क्षर पुरुषाच्या आणि न खाणाऱ्या पर ब्रह्म म्हणजेच अक्षर पुरुषाच्याही (अभि) वर (विश्वङ्) सर्वत्र (व्यक्रामत्) व्याप्त आहे म्हणजेच त्यांची प्रभुता सर्व ब्रह्मांडांवर आणि सर्व प्रभूंवर आहे. ते कुळाचे/सर्वांचे स्वामी, मालक आहेत, जे आपल्या शक्तीने सर्वांच्या वर विस्तारलेले आहेत.

**भावार्थ :– हेच सर्व सृष्टीचे रचनाकार प्रभू आपल्या रचनेच्या वरील भागामध्ये तीन स्थानांमध्ये (सत्‌लोक, अलखलोक, अगमलोक) तीन रूपांमध्ये स्वतः प्रगट होतात म्हणजेच स्वतः विराजमान आहेत. येथे अनामीलोकाचे वर्णन एवढ्यासाठीच आलेले नाही, कारण अनामीलोकांमध्ये कोणतीही रचना नाही आणि अलख लोक (अनामय) शेष रचनेच्या पूर्वीचे आहे. नंतर म्हटले आहे, की त्या परमात्म्याच्या सत्‌लोकापासून विलग होऊन खालील ब्रह्म तथा परब्रह्मचे लोक उत्पन्न होतात आणि तोच पूर्ण परमात्मा खाणारा ब्रह्म अर्थात काल पेक्षा (कारण ब्रह्म/काल विराट शापामुळे एक लक्ष मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करतो.) आणि भक्षण न करणाऱ्या परब्रह्म अर्थात अक्षर पुरुष (परब्रह्म प्राण्यांचा आहार करत नाही, परंतु जन्म–मृत्यू, कर्मदंड जसे आहे तसेच राहते.) यांच्याही वर सर्वत्र विस्तारलेला आहे. या पूर्ण परमात्म्याची प्रभुता सर्वांच्यापेक्षा वर प्रस्थापित आहे. कबीर परमेश्वरच कुळाचे/सर्वांचे स्वामी आहेत. त्यांनी आपल्या शक्तीद्वारे सर्वांच्यापेक्षा वर विस्तार केला आहे. जसा सूर्य आपला प्रकाश सर्वांवर पसरवून प्रभावित करतो, तशी पूर्ण परमात्म्याने आपल्या शक्तिरूपी क्षमता (रेंज) सर्व ब्रह्मांडांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रस्थापित केलेली आहे. मोबाईल फोनचा टॉवर एका स्थानी असूनही आपली शक्ती अर्थात मोबाईल फोनची रेंज (क्षमता) चारही दिशांना पसरवून प्रस्थापित करतो, तशी पूर्ण प्रभूंनी आपली निराकार शक्ती सर्वव्यापक केलेली आहे. त्याद्वारे पूर्ण परमात्मा सर्व ब्रह्मांडांवर एक स्थानावर विराजित होऊन नियंत्रण ठेवतो.**

**याचे प्रमाण आदरणीय गरीबदासजी महाराज (अमृतवाणी राग कल्याण) देतात.**

'तीन चरण चिन्तामणी साहेब, शेष बदन पर छाए।
माता, पिता, कुलन न बंधु, ना किन्हें जननी जाये।।'

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ५ वा मंत्र :**

तस्माद्विराळजायत विराजो अधि पुरुषः।
स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः।।५।।

तस्मात्–विराट्–अजायत–विराजः–अधि–पुरुषः–स–जातः–अत्यरिच्यत–पश्चात्–भूमिम्–अथः– पूरः।

अनुवाद :– (तस्मात्) त्यानंतर त्या परमेश्वर सत्यपुरुषाच्या शब्दशक्तीने (विराट्) विराट म्हणजे ब्रह्म/क्षर पुरुष/काल (अजायत) उत्पन्न झालेला आहे. (पश्चात्) त्यानंतर (विराजः) विराट पुरुष अर्थात काल भगवानहून (अधि) अधिक विशाल (पुरुषः) परमेश्वराने (भूमिम्) पृथ्वीवरील लोक, काल ब्रह्म आणि परब्रह्म यांच्या लोकांची (अत्यरिच्यत) चांगल्या/योग्यप्रकारे रचना केली. (अथः) नंतर (पुरः) अन्य लहान–लहान लोक (स) त्या पूर्ण परमेश्वरानेच (जातः) उत्पन्न केले

म्हणजेच स्थापित केले.

**भावार्थ :- या ४ थ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक आणि सत्‌लोक) रचना केल्यानंतर पूर्ण परमात्म्याने ज्योति निरंजनची (ब्रह्म/काल) उत्पत्ती केली. अर्थात, त्याच सर्वशक्तिमान परमात्मा पूर्णब्रह्म कविर्देवांपासून (कबीर प्रभू) विराट म्हणजेच ब्रह्मची (काल) उत्पत्ती झाली. याचे प्रमाण गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील पंधराव्या श्लोकामध्येही आहे, की अक्षर पुरुष म्हणजेच अविनाशी प्रभूंपासून ब्रह्म उत्पन्न झाला आहे. अथर्ववेदाच्या ४ थ्या कांडातील पहिल्या अनुवाकमधील ३ ऱ्या सुक्तामध्येही याचे प्रमाण आहे, की पूर्ण ब्रह्मपासून ब्रह्मची उत्पत्ती झाली आणि त्याच पूर्ण ब्रह्मने इतर (भूमिम्) लहान-मोठ्या सर्व लोकांची रचना केली आहे. ते पूर्ण ब्रह्म या विराट भगवान अर्थात ब्रह्म/काल पेक्षाही विशाल आहेत. अर्थात, कालचेही स्वामी, मालक तेच आहेत.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १५ वा मंत्र :**

सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः।
देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ।।१५।।
सप्त-अस्य-आसन्-परिधयः-त्रिसप्त-समिधः-
कृताः-देवा-यत्-यज्ञम्-तन्वानाः-अबध्नन्-पुरुषम्-पशुम्।

अनुवाद :- (सप्त) परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि (त्रिसप्त) काल ब्रह्मची २१ ब्रह्मांडे (समिधः) कर्मदंड दुःखरूपी अग्नीने दुःखी (कृताः) करणाऱ्या (परिधयः) वर्तृळाकार परीघरूपी सीमेमध्ये (आसन) विद्यमान आहेत. (यत्) जो (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याची (यज्ञम्) विधिवत धार्मिक कर्म म्हणजेच पूजा करतो (पशुम) बळी द्यायच्या पशुरूपी कालच्या जाळ्यामधील कर्मबंधनामध्ये बांधलेल्या (देवा) त्या भक्तात्म्यांना (तन्वांनाः) कालद्वारे रचलेल्या, फेकलेल्या पापकर्मबंधन जाळ्यातून (अबध्नन) मुक्त करतात. येथे अर्थातच बंधनातून सुटका करणारे म्हणजेच बंदी छोड आहेत.

**भावार्थ :- परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि ब्रह्मची (काल) २१ ब्रह्मांडे वर्तुळाकार सीमेमध्ये बंद असून, पापकर्माच्या अग्नीमध्ये जळत राहणाऱ्या प्राण्यांना पूर्ण परमात्मा वास्तविक पूजाविधी सांगून योग्य उपासना करवून घेतो. त्यामुळे बळी दिल्या जाणाऱ्या पशुसारख्या जन्म-मृत्यूच्या जाळ्यामध्ये अडकलेल्या, कालच्या (ब्रह्म) आहारासाठी तप्तशिलेच्या कष्टांनी पीडित भक्तात्म्यांना कालचे कर्मबंधनाचे फेकलेले जाळे तोडून बंधनरहित करतात म्हणजेच बंध सोडणारे (बंधनातून मुक्त करणारे) बंदी छोड आहेत. याचे प्रमाण पवित्र यजुर्वेदाच्या पाचव्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये आहे, की** कविरंघारिरसि (कविर्) कबीर परमेश्वर (अंध) पापाचे (अरि) शत्रू (असि) आहेत म्हणजेच पापविनाशक कबीर परमात्मा आहेत. बम्भारिरसि (बम्भारि) बंधनाचा शत्रू म्हणजे बंदी छोड कबीर परमेश्वर (असि) आहेत.

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ वा मंत्र :**

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवा ।।१६।।

यज्ञेन-यज्ञम्-अ-यजन्त-देवाः-तानि-धर्माणि-प्रथमानि-आसन्-ते-ह-नाकम्-महिमानः-सचन्त-यत्र-पूर्वे-साध्याः-सन्ति देवाः।

अनुवाद :- जे (देवाः) निर्विकार, देवस्वरूप भक्तात्मे (अयज्ञम्) अपुऱ्या/अपूर्ण, अयोग्य

धार्मिक पूजेच्या स्थानी/बदल्यात (यज्ञेन) सत्यभक्ती धार्मिक कर्माधारावर (यजन्त) पूजा करतात (तानि) ते (धर्माणि) धार्मिक शक्तिसंपन्न (प्रथमानि) मुख्य म्हणजेच उत्तम (आसन्) आहेत. (ते ह) तेच वास्तविक (महिमान:) महान भक्ती–शक्तियुक्त होऊन (साध्या:) सफल भक्तजन (नाकम्) पूर्ण सूखदायक परमेश्वराला (सचन्त) भक्तीमुळे म्हणजे सत्भक्तीच्या कमाईने प्राप्त होतात. ते तेथे जातात, (यत्र) जेथे (पूर्वे) पूर्वीच्या सृष्टीतील (देवा:) पापरहित, देवस्वरूप भक्त आत्मे (सन्ति) वास्तव्य करत आहेत.

**भावार्थ :– जे निर्विकार (ज्यांनी मांस, तंबाखू, मद्य यांचा त्याग केलेला आहे आणि इतरही दुष्कर्मे करत नाहीत ते) देवस्वरूप भक्त आत्मे शास्त्रविधिरहित पूजेचा त्याग करून शास्त्रानुकूल साधना करतात, ते भक्तीच्या कमाईने धनी होऊन कालच्या ऋणातून मुक्त होऊन आपल्या सत्यभक्तीच्या कमाईमुळे त्या सर्वसुखदायी परमात्म्याला प्राप्त करतात म्हणजेच सत्यलोकामध्ये जातात, जेथे सर्वप्रथम रचलेल्या सृष्टीतील देवस्वरूप अर्थात पापरहित हंसात्मे वास्तव्य करतात.**

**ज्याप्रमाणे काही आत्मे कालच्या (ब्रह्म) जाळ्यामध्ये फसून येथे आले, काही परब्रह्मसोबत सात संख ब्रह्मांडांमध्ये आले. तरीही ज्या असंख्य आत्म्यांचा आपल्या पूर्ण परमात्म्यावर अटळ विश्वास राहिला, जे पतिव्रता पदापासून (निष्ठेपासून) दूर झाले नाहीत, ते सर्व पुण्यात्मे तेथेच राहिले. त्यामुळेच पवित्र वेदांमध्येही सत्य सांगितल्याचे येथे वर्णन आले आहे. याच प्रमाणाचे गीतेच्या ८ व्या अध्यायातील ८ व्या ते १० व्या श्लोकांमध्ये वर्णन आले आहे, की जे साधक पूर्ण परमात्याची सत्साधना शास्त्रविधीनुसार करतात, ते भक्तीच्या कमाईच्या बळावर त्या पूर्ण परमात्म्यास प्राप्त होतात म्हणजेच त्यांच्याजवळ (सत्लोकी) जातात. यावरून हे सिद्ध होते, की तीन प्रभू आहेत–ब्रह्म, परब्रह्म, आणि पूर्ण ब्रह्म. यांनाच १) ब्रह्म–ईश– क्षर पुरुष २) परब्रह्म–अक्षर पुरुष/अक्षर ब्रह्म ३) पूर्ण ब्रह्म–परम अक्षर ब्रह्म–परमेश्वर–सत्पुरुष आदी पर्यायी शब्दांनी ओळखले जाते.**

**हे प्रमाण ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ९६ व्या सुक्तामधील १७ ते २० या मंत्रांमध्ये स्पष्ट केले आहे, की परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) शिशुरूप (लहान बालकाचे) धारण करून प्रगट होतात आणि आपले निर्मळ पवित्र ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान (कविगीर्भि:) कबीरवाणीद्वारे आपल्या अनुयायांना वर्णन करून सांगतात. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर) ब्रह्मच्या (क्षर पुरुष) धामापेक्षा आणि परब्रह्मच्या (अक्षर पुरुष) धामापेक्षा भिन्न जे तिसरे ऋतधाम (सत्लोक) आहे, तेथे आकारामध्ये विराजमान आहेत. तसेच सत्लोकापेक्षा चौथा अनामीलोक आहे, तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अनामी पुरुष रूपामध्ये मनुष्यसदृश आकारामध्ये विराजमान आहेत.**

# ''पवित्र श्रीमददेवी महापुराणामध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण''

''ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचे आई व वडिल''

**(दुर्गा और ब्रह्म (काल) यांच्या योगातून ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचा जन्म)**

पवित्र श्रीमद देवी महापुराणाचा ३ रा स्कंद अध्याय १-३ (गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता : श्री. हनुमानप्रसाद पोद्दार तथा चिमनलाल गोस्वामीजी पान नं.११४ पासून)

पान नं. ११४ ते ११८ पर्यंत विवरण आले आहे, की कित्येक आचार्यांनी (ऋषिंनी) भवानीदेवीस संपूर्ण मनोरथ पूर्ण करणारी असे संबोधले आहे. तिला 'प्रकृति' असे म्हटले जाते. तसेच ब्रह्मसोबत (काल) तिचे अभेद संबंध आहेत, (ज्याप्रमाणे पत्नीस अर्धांगिनीही म्हटले जाते. अर्थात, दुर्गा ब्रह्मची (काल) पत्नी आहे.) एका ब्रह्मांडाच्या सृष्टिरचनेविषयी राजा परीक्षिताने श्री व्यासजींना विचारले, त्यावेळी व्यासजी म्हणाले, की राजन, मी श्री नारदजींना या प्रश्नाचे उत्तर स्वत:च विचारले होते, तेव्हा श्री नारदजी म्हटले होते, की मी आपले (माझे) पिता श्री ब्रह्माजींना हाच प्रश्न विचारला होता, की या ब्रह्मांडाची रचना आपण केली, श्री विष्णूजींनी अथवा शिवजींनी केली? याबाबत जे काही सत्य असेल ते सांगण्याची कृपा करावी. तेव्हा माझे पूज्य पिता श्री ब्रह्माजी म्हणाले होते, की बाळ नारद, मी स्वत: कमळावर बसलेलो होतो. मला ज्ञान नाही, या अथांग जलामध्ये मी कसा उत्पन्न झालो, हे मलासुद्धा माहीत नाही. एक हजार वर्षांपर्यंत मी पृथ्वीचे निरीक्षण करत राहिलो; पण मला या पाण्याचा अंत सापडला नाही. त्यानंतर 'तप करा' अशी आकाशवाणी झाली. मी एक हजार वर्षे तप केले. तत्पश्चात सृष्टिरचनेची आकाशवाणी झाली. इतक्यात मधू आणि कैटभ नावाचे दोन राक्षस आले आणि त्यांना घाबरून मी कमळाच्या देठाला पकडून खाली उतरलो. तेथे भगवान विष्णूजी शेषशय्येवर चेतनाहीन होऊन पडलेले होते. त्यांच्यामधून एक स्त्री (प्रेतवत प्रविष्ट झालेली दुर्गा) बाहेर पडली. ती आकाशामध्ये आभूषणे परिधान केलेली दिसू लागली. त्यावेळी भगवान विष्णू शुद्धीवर आले. तेथे मी आणि विष्णूजी दोघे होतो. एवढ्यात शंकरजीही तेथे आले. देवीने आम्हाला विमानामध्ये बसविले आणि ब्रह्मलोकी घेऊन गेली. तेथे आणखी एकेक ब्रह्मा, विष्णू आणि शिव दिसले. त्यानंतर आणखी एक देवी दिसली. तिला पाहून विष्णूजींनी विवेकपूर्वक खालीलप्रमाणे वर्णन केले. (ब्रह्मने (काल) भगवान विष्णूंना चेतना प्रदान केली आणि त्यांना आपल्या बाल्यावस्थेतील आठवणी जागृत झाल्या. त्यांनी आम्हाला बाल्यावस्थेतील कहाणी (वस्तुस्थिती) ऐकवली.)

पान नं. ११९-१२० वर :- भगवान विष्णूजी हे श्री ब्रह्माजी आणि श्री शिवजींना म्हणाले, की ही आम्हा तिघांचीही माता आहे. हीच जगज्ञननी प्रकृतिदेवी आहे. मी या देवीला जेव्हा मी एक लहान बालक होतो, तेव्हा पाहिले होते. हीच मला पाळण्यामध्ये झोके देत होती.

३ रा स्कंद पान नं. १२३ वर :- श्री विष्णूजी श्री दुर्गादेवीची स्तुती करून म्हणाले, की तू शुद्धस्वरूप आहेस. हा सर्व संसार तुझ्यापासूनच उद्भासित (निर्माण) होत आहे. मी (विष्णू), ब्रह्मा आणि शंकर आम्ही सर्व तुझ्या कृपेनेच विद्यमान आहोत. आमचा अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होत असतो. अर्थात, आम्ही तिन्ही देव नाशवान आहोत. केवळ तूच एक नित्य (अविनाशी) आहेस, जगज्ञननी आहेस, प्रकृतिदेवी आहेस.

भगवान शंकर म्हणाले, की देवी, जर महाभाग विष्णू तुझ्यापासून प्रगट (उत्पन्न) झाले

आहेत, तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेले ब्रह्माही तुझेच बालक आहे आणि या दोघांनंतर उत्पन्न झालेला मी तमोगुणी लीला करणारा शंकर काय तुझी संतान (पुत्र) नाही झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस.

विचार करा :- या विवरणावरून असे सिद्ध होते, की श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी नाशवान आहेत. मृत्युंजय (अजर-अमर) व सर्वेश्वर नाहीत आणि ते दुर्गादेवीचे (प्रकृती) पुत्र आहेत व ब्रह्म (काल-सदाशिव) यांचा पिता आहे.

३ ऱ्या स्कंदातील पान नं. १२५ वर ब्रह्माजींनी हे माते, वेदांमध्ये जे ब्रह्म म्हटले आहे ते आपणच आहात की अन्य कोणी प्रभू आहेत, असे विचारल्यावर दुर्गा म्हणाली, की मी आणि ब्रह्म एकच आहे. नंतर याच स्कंदाच्या पान नं. १२९ वर म्हटले आहे, की आता माझे कार्य सिद्ध करण्यासाठी तुम्ही तिघे विमानात बसून लगेच या. कोणतेही कठीण कार्य उपस्थित झाले आणि तुम्ही माझे स्मरण केले, तर मी तुमच्यासमोर प्रगट होईन. हे देवतांनो, तुम्ही माझे (दुर्गादेवीचे) आणि ब्रह्मचे ध्यान सदोदित केले पाहिजे. आमच्या दोघांचे स्मरण करत राहिलात तर तुमचे कोणतेही कार्य सिद्ध होण्यात किंचितही संदेह नाही.

या व्याख्यांवरून असे स्वसिद्ध होते, की दुर्गा (प्रकृती) आणि ब्रह्म (काल) हे तिन्ही देवतांचे माता-पिता आहेत. तसेच ब्रह्मा, विष्णू व शिव हे नाशवान आहेत व पूर्ण शक्तियुक्त नाहीत.

तिन्ही देवतांचा (श्री ब्रह्मा, श्री विष्णू, श्री शिव) विवाह दुर्गादेवीने (प्रकृतिदेवी) केला. (तिसऱ्या स्कंदातील पान नं. १२८ व १२९).

गीतेच्या ७ व्या अध्यायातील १२ वा श्लोक :

ये, च, एव, सात्विका: भावा:, राजसाः, तामसा:, च, ये,
मत:, एव, इति, तान्, विद्धि, न, तु, अहम्, तेषु, ते मयि।।

**अनुवाद :-** (च)आणि (एव) सुद्धा (ये) जो (सात्विका:) सत्त्वगुण विष्णूजींचा स्थिती (भावा:) भाव आहे आणि (ये) जो (राजसा:) रजोगुण ब्रह्माजींचा उत्पत्ती (च) आणि (तामसा:) तमोगुण शिवचा संहार हा आहे. (तान्) ते सर्व तू (मत:, एव) माझ्याद्वारे सुनियोजित नियमानुसार होणारे आहेत. (इति) असे (विद्धि) जाण, (तु) परंतु वास्तविक (तेषु) त्यांच्यामध्ये (अहम्) मी आणि (ते) ते (मयि) माझ्यामध्ये (न) नाहीत.

## ''पवित्र शिव महापुराणामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''
## (काल ब्रह्म व दुर्गा यांच्यापासून विष्णू, ब्रह्मा, व शिव यांची उत्पत्ती)

याचे प्रमाण 'पवित्र श्री शिवपुराण' गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता श्री. हनुमान प्रसाद पोद्दार, यातील ६ वा अध्याय– 'रुद्रसंहिता'मधील पान नं. १०० वर म्हटले आहे, की जो मूर्तिरहित परब्रह्म आहे, त्याचीच मूर्ती भगवान सदाशिव आहे. त्यांच्या शरीरातून एक शक्ति प्रकट झाली ती शक्ति अंबिका, दुर्गा (प्रकृति), त्रिदेवजननी (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांना उत्पन्न करणारी माता) संबोधली गेली. तिला आठ भुजा आहेत. सदाशिव जे आहेत, त्यांना शिव, शंभू आणि महेश्वरसुद्धा म्हटले जाते. (पान नं. १०१ वर) ते आपल्या सर्व देहभर भस्म लावतात. त्या कालरूपी ब्रह्मने एक शिवलोक नामक क्षेत्राची निर्मिती केली. नंतर दोघांपासून एक पुत्र उत्पन्न झाला. त्याचे नाव विष्णू ठेवले. (पान नं. १०२)

पुढे रुद्रसंहितेच्या ७ व्या अध्यायातील पान नं. १०३ वर ब्रह्माजींनी म्हटले आहे, की माझी उत्पत्तीसुद्धा भगवान सदाशिव (ब्रह्म काल) आणि प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून झाली. त्यानंतर मला बेशुद्ध केले गेले.

त्यानंतर रुद्रसंहितेच्या ९ व्या अध्यायातील पान नं. ११० वर म्हटले आहे, की अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि रुद्र या तीन देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (काल ब्रह्म) गुणातित मानला गेला आहे.

येथे चार बाबी सिद्ध होतात– (१) सदाशिव (काल ब्रह्म) व प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून तीन देवांची (ब्रह्मा, विष्णू, महेश) उत्पत्ती झालेली आहे. (२) तिन्ही भगवानांची (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी) माता दुर्गाजी आहे. (३) या तिघांचा पिता ज्योति निरंजन (काल ब्रह्म) आहे. (४) हेच तिन्ही प्रभु रजोगुणी–ब्रह्माजी, सत्गुणी–विष्णूजी आणि तमोगुणी–शिवजी आहेत.

## ''पवित्र श्रीमद्भगवत गीतेमधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १४ व्या अध्यायातील ३ ऱ्या ते ५ व्या श्लोकांमध्ये आहे. ब्रह्म (काल) म्हणत आहे, की, प्रकृति (दुर्गा) तर माझी पत्नी आहे. मी ब्रह्म (काल) तिचा (दुर्गा) पती आहे. आम्हा दोघांपासून सर्व प्राण्यांसहित तीन गुणांची (रजोगुण–ब्रह्माजी, सत्गुण–विष्णूजी, तमोगुण–शिवजी) उत्पत्ती झाली. मी (ब्रह्म) सर्व प्राण्यांचा पिता आहे आणि प्रकृति (दुर्गा) त्यांची माता आहे. मी तिच्या (दुर्गा) उदरामध्ये बीज स्थापन करतो, ज्यामुळे सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते. प्रक्रुती (दुर्गा) मातेपासुन उत्पन्न झालेले तिन गुण (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमगुण शिव) हे सर्वांना कर्माच्या आधारावर शरिरात बांधुन ठेवतात. याचे प्रमाण अध्याय १५ श्लोक १ ते ४ तसेच १६, १७ मध्ये देखिल आहे.

**गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. १**

उर्ध्वमूलम्, अध:शाखम्, अश्वत्थम्, प्राहु:, अव्ययम्,
छन्दांसि, यस्य, पर्णानि, य:, तम्, वेद, स:, वेदवित्।।

अनुवाद :– (उर्ध्वमूलम्) वरती मूळवाले पूर्ण परमात्मा आदिपुरुष (अध: शाखम्) खालच्या बाजूला शाखा असणारा (अव्ययम्) अविनाशी (अश्वत्थम्) अमर असा पिंपळाचा मजबूत असा वृक्ष आहे. (यस्य) या वृक्षाच्या (छन्दांसि) लहान–लहान भागांना फांद्या (पर्णानि) पाने (प्राहु:) म्हटले आहे. (तम्) त्या संसाररूपी वृक्षाला (य:) जे (वेद) सर्वांगांसहित जाणतात, (स:) ते ( वेदवित्) पूर्ण

ज्ञानी म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.

**गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. २**

अधः, च, ऊर्ध्वम्, प्रसृताः, तस्य, शाखाः, गुणप्रवृद्धाः,
विषयप्रवालाः, अधः,च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके।।

अनुवाद :- (तस्य) त्या वृक्षाच्या (अधः) खाली (च) आणि (ऊर्ध्वम्) वर (गुणप्रवृद्धाः) तिन्ही गुण ब्रह्मा-रजोगुण, विष्णू-सत्गुण, शिव-तमोगुण रूपी (प्रसृता) पसरलेल्या (विषयप्रवालाः) विकार-काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी (शाखाः) शाखा/फांद्या ब्रह्मा, विष्णू, शिव (कर्मानुबन्धीनि) जीवांना कर्मामध्ये बांधणारी (अपि) सुद्धा (मूलानि) मुळे मुख्य कारण आहे (च) आणि (मनुष्यलोके) मनुष्यलोक-स्वर्ग-नरकलोक, पृथ्वीलोक यामध्ये (अधः) खाली नरक, चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये (ऊर्ध्वम्) वर स्वर्गलोक आदीमध्ये (अनुसन्ततानि) व्यवस्थित केलेले आहेत.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक**

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्तः, न, च, आदिः, न, च,
सम्प्रतिष्ठा, अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा।।

अनुवाद : (अस्य) या रचनेची (न) नाही (आदि) सुरवात (च) आणि (न) नाही (अन्तः) शेवट आहे (न) नाही (तथा) तसे (रूपम) स्वरूप (उपलभ्यते) प्राप्त होते (च) आणि (इह) येथे विचार काळद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीताज्ञानाची पूर्ण माहिती (ज्ञान) मलाही (न) नाही. (सम्प्रतिष्ठा) कारण सर्व ब्रह्मांडांची रचना चांगल्या/योग्यप्रकारे स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. (एतम्) या (सुविरुढमलूम्) चांगल्याप्रकारे स्थायी/नित्य स्थिती असणारा (अश्वत्थम्) मजबूत स्वरूपाचा (असंङ्गशस्त्रेण) पूर्ण ज्ञानरूपी (दृढेन) दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून (छित्वा) छाटून/कापून म्हणजेच निरंजनाच्या भक्तीला क्षणिक अर्थात क्षणभंगूर जाणून ब्रह्मा, विष्णू, शिव, ब्रह्म आणि परब्रह्मच्या पुढे/वरील पूर्ण ब्रह्मचा शोध घेतला पाहिजे.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक**

ततः पदम्, तत्, परिमार्गितयम्, यस्मिन्, गताः, न, निवर्तन्ति, भूयः,
तम्, एव्, च, आद्यम्, पुरुषम्, प्रपद्ये, यतः, प्रवृतिः, प्रसृता, पुराणी।।

अनुवाद :- जेव्हा तत्त्वदर्शी संत भेटतील, (ततः) त्यानंतर (तत्) त्या परमात्याच्या (पदम्) पदस्थानाचा म्हणजेच सत्लोकाचा (परिमार्गितव्यम्) पूर्णपणे समजून शुद्ध अंतःकरणाने शोध घेतला पाहिजे. (यस्मिन) जेथे (गताः) गेलेले साधक (भूयः) पुन्हा (न निवर्तन्ति) परतून या संसारामध्ये येत नाहीत. (च) आणि (यतः) ज्या परमात्म्या-परम अक्षर ब्रह्मपासून (पुराणी) आदि/सुरवातीची (प्रवृतिः) रचना-सृष्टी (प्रसृता) उत्पन्न झालेली आहे. (तम्) अज्ञात (आद्यम्) आदियम म्हणजेच मी काळनिरंजन (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याला (एव) च (प्रपद्ये) मी शरण आहे आणि त्याचीच पूजा करतो.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

द्वौ, इमौ, पुरुषौ, लोके, क्षरः, च, अक्षरः, एव, च,
क्षरः, सर्वाणि, भूतानि, कूटस्थः, अक्षरः, उच्यते।।

अनुवाद :- (लोके) या संसारामध्ये (द्वौ) दोन प्रकारचे (क्षरः) नाशवान (च) आणि (अक्षरः) अविनाशी (पुरुषौ) भगवान आहेत. (एव) अशाप्रकारे (इमौ) या दोन्ही प्रभूंच्या लोकी (सर्वाणि)

संपूर्ण (भूतानि) प्राण्यांचे शरीर तर (क्षरः) नाशवान (च) आणि (कूटस्थः) जीवात्मा (अक्षरः) अविनाशी (उच्यते) आहे असे म्हटले जाते.


**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १७ वा श्लोक**

उत्तम; पुरुषः, तु, अन्य; परमात्मा, इति, उदाहृतः,
यः, लोकत्रयम्, आविश्य, बिभर्ति, अव्ययः, ईश्वरः ।।

अनुवाद : (उत्तमः) उत्तम (पुरुषः) प्रभू (तु) तर (अन्यः) या दोन प्रभूंपेक्षा (क्षरपुरुष आणि अक्षरपुरुष) अन्यच आहे. (इति) वास्तवामध्ये ते (परमात्मा) परमात्मा (उदाहृतः) म्हटले जातात, (यः) जे (लोकत्रयम्) तीनही लोकांमध्ये (आविश्य) प्रवेश करून (बिभर्ति) सर्वांचे पालनपोषण करतात आणि (अव्ययः) अविनाशी, (ईश्वरः) प्रभूंमध्ये श्रेष्ठ म्हणजेच समर्थ प्रभू आहेत.

**भावार्थ :– गीता ज्ञानदात्या प्रभुने केवळ एवढेच सांगितले आहे, की हा संसार उलट्या लटकलेल्या वृक्षासारखा आहे. वर जे मूळ आहे, ते पूर्ण परमात्मा आहे. खालील फांद्या (शाखा) आणि इतर विभाग आहेत. या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे भिन्न–भिन्न विवरण जो संत जाणतो, त्यांना तत्त्वदर्शी संत म्हणतात. यांच्याविषयी गीतेच्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये वर्णन आलेले आहे. गीतेच्या १५ व्या अध्यायातील २ऱ्या व ३ऱ्या श्लोकांमध्ये केवळ एवढेच सांगितले आहे, की त्रिगुणरूपी शाखा आहेत. येथे विचारकाळात म्हणजेच गीतेमध्ये गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे, की मी तुला पूर्ण माहिती (ज्ञान) देऊ शकत नाही; कारण मलाही या संसाराच्या रचनेचा आदि (सुरुवात) व अंत यांचे ज्ञान नाही. त्यासाठी गीतेच्या चौथ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की कोणी तत्त्वदर्शी संताकडून त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान जाणा. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकामध्ये त्या तत्त्वदर्शी संताची ओळख सांगितली आहे, की ते या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे ज्ञान देतील. याबाबत त्यांनाच विचारा. गीताच्या पंधराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की त्या तत्त्वदर्शी संताच्या प्राप्ती नंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे म्हणजेच त्या तत्त्वदर्शी संतांच्या सांगण्यानुसारच साधना केली पाहिजे, ज्यामुळे पूर्ण मोक्ष (अनादि मोक्ष) प्राप्त होतो. गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट केले आहे, की तीन प्रभु आहेत–एक क्षरपुरुष (ब्रह्म/काल), दुसरा अक्षर पुरुष (परब्रह्म) आणि तिसरा परम अक्षर पुरुष (पूर्ण ब्रह्म). क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष वास्तविक अविनाशी नाहीत. ते अविनाशी परमात्मा तर या दोघांपेक्षा वेगळेच आहेत. तेच परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४थ्या आणि १६ व १७ व्या श्लोकांमध्ये हे प्रमाणित होते, की उलटे लटकलेल्या संसाररूपी वृक्षाचे मूळ म्हणजेच ते परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्ण ब्रह्म आहेत, ज्यांद्वारे संपूर्ण वृक्षाचे पालनपोषण होते आणि वृक्षाचा जो भाग (पृथ्वीच्या बाहेर) जमिनीलगत दिसतो म्हणजेच खोड जे आहे, त्याला अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म समजावे. त्या खोडापासून पुढे आणखी एक मोठी फांदी निघते तिला ब्रह्म म्हणजेच क्षर पुरुष समजावे. त्या फांदीपासून अन्य तीन लहान शाखा निघतात, त्यांना ब्रह्मा, विष्णू आणि शिव असे समजावे. तसेच त्या लहान शाखांपासून पुढे जी पाने दिसतात, त्यांना सांसारिक प्राणी असे समजावे. गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट झाले आहे, की क्षर पुरुष (ब्रह्म) आणि अक्षर पुरुष (परब्रह्म), तसेच या दोघांच्या लोकी जितके प्राणी आहेत, त्यांचे स्थूल शरीर नाशवान आहे आणि जीवात्मा अविनाशी आहे म्हणजेच हे**




वरती मुळ खाली शाखा वाला उलटा लटकलेल्या
संसार रुपी वृक्षाचे चित्र

**दोन्ही प्रभू व त्यांच्या अंतर्गत असणारे प्राणी नाशवान आहेत. जरी अक्षर पुरुषाला (परब्रह्म) अविनाशी म्हटले आहे, तरी वास्तवामध्ये अविनाशी परमात्मा या दोघांपेक्षा वेगळाच आहे. ते वास्तविक परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात. या विवरणामध्ये तीन प्रभुंचे भिन्न-भिन्न विवरण दिलेले आहे.**

## ''पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

**सृष्टिरचनेचे प्रमाण पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमध्ये आहे.**

**कुर्आन शरीफमध्ये पवित्र बायबलमधीलही ज्ञान आहे. त्यामुळे या दोन्ही पवित्र सद्ग्रंथांमध्ये सृष्टीचा रचनाकार कोण आणि कसा आहे आणि त्यांचे वास्तविक नाव काय आहे, याचे मिळतेजुळते प्रमाण आलेले आहे.**

**पवित्र बायबल ( उत्पत्ती ग्रंथाच्या पान नं. २ वर, अ. १:२०-२:५ वर)**

सहावा दिवस :- प्राणी आणि मनुष्य :

अन्य प्राण्यांची रचना केल्यानंतर (२६) परमेश्वराने म्हटले आहे, की मी मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे, आपल्यासारखे बनविले आहे. तो सर्व प्राण्यांना नियंत्रणाखाली (ताब्यात) ठेवेल २७). तेव्हा परमेश्वराने मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे उत्पन्न केले आणि नर आणि नारी बनवून मनुष्यांची सृष्टी निर्माण केली.

२९. प्रभूने मनुष्याला आहारासाठी, जितकी बीज असणारी लहान रोपे आणि बीज असणारी फळे आहेत, ते सर्व प्रदान केले. (मांस खाण्यास सांगितलेले नाही.)

सातवा दिवस :- विश्रामाचा दिवस :-

परमेश्वराने सहा दिवसांमध्ये सर्व सृष्टीची उत्पत्ती केली आणि सातव्या दिवशी विश्रांती घेतली.

**पवित्र बायबलनेही सिद्ध केले आहे, की परमात्मा मानवसदृश शरीरामध्ये आहे आणि त्याने सहा दिवसांत सर्व सृष्टीची रचना केली आणि नंतर विश्रांती घेतली.**

**पवित्र कुर्आन शरीफ (सुरत फुर्कानि २५, आयत नं. ५२, ५८, ५९)**

आयत ५२ :- फला तुतिअल्-काफिरन्- व जहिद्हुम बिही जिहादन् कबीरा (कबीरन्) ।।५२।।

याचा भावार्थ असा आहे, की हजरत मुहम्मदजींचा खुदा (प्रभू) म्हणत आहे, की हे पैगंबर! तुम्ही काफिरांचे (जे एका प्रभूच्या भक्तीचा त्याग करून अन्य देवी-देवतांची आणि मूर्ती आदींची पूजा करतात) म्हणणे मानू नका, कारण ते लोक कबीरांना पूर्ण परमात्मा मानत नाहीत. तुम्ही मी दिलेल्या या कुर्आनाच्या ज्ञानाच्या आधारावर कबीरच पूर्ण प्रभू आहेत यावर निश्चयी राहा आणि त्या कबीर अल्लाहसाठी संघर्ष करावा (मारामारी/युद्ध नाही) म्हणजेच ठाम राहा.

आयत ५८ :- व तवक्कल् अलल्-हय्यिल्लजी ला यमूतु व सब्बिह् बिहम्दिही व कफा बिही बिजुनूबि अिबादिही खबीरा (कबीरा) ।।५८।।

**भावार्थ :- हजरत मुहम्मदजी ज्यांना आपले प्रभू मानत आहेत, ते अल्लाह (प्रभू) दुसऱ्या कोणत्या तरी पूर्ण प्रभुंकडे संकेत करत आहे, की हे पैगंबर, त्या कबीर परमात्म्यावर विश्वास ठेव, जे तुला जिवंत महात्म्याच्या रूपामध्ये येऊन भेटले होते. त्यांचा कधीही मृत्यू होत नाही म्हणजेच वास्तवामध्ये ते अविनाशी आहेत. स्तुतीसह त्यांच्या पाकी (पवित्र महिमेचे) गुणगान कर. ते कबीर अल्लाह (कविर्देव) पूजनीय आहेत आणि आपल्या उपासकांच्या (साधक)**

**सर्व पापांचा विनाश करणारे आहेत.**

आयत ५९ :– अल्ल्जी खलकस्समावाति वल्अर्ज व मा बैनहुमा फी सित्तति अय्यामिन् सुम्मस्तवा अलल्अर्शि अर्रह्मानु फस्अल् बिही खबीरन् (कबीरन्) ।।५९।।

**भावार्थ :– हजरत मुहम्मदजी यांना कुर्आन शरीफ सांगणारा प्रभु (अल्लाह) म्हणत आहे, की ते कबीरप्रभुच आहेत, ज्यांनी जमीन आणि आकाश यांच्यामध्ये जे विद्यमान आहे, अशा सर्व सृष्टीची रचना सहा दिवसांमध्ये केली आणि सातव्या दिवशी आपल्या सत्यलोकामधील सिंहासनावर जाऊन विराजमान झाले. त्यांच्याविषयीची माहिती कोण्या (बाखबर) तत्त्वदर्शी संताला विचारा.**

**त्या पूर्ण परमात्म्याची प्राप्ती कशी होईल आणि त्यासंबंधीचे वास्तविक ज्ञान कोण्या तत्त्वदर्शी संताला (बाखबर) विचारा, याबाबत मला काहीही माहिती नाही.**

**या दोन्ही पवित्र धर्मांच्या (ईसाई आणि मुस्लिम) पवित्र शास्त्रांनी एकच प्रमाणित केले आहे, की, सर्व सृष्टिचा रचनाकार, सर्व पापविनाशक, सर्वशक्तिमान, अविनाशी परमात्मा मानवसदृश शरीराच्या आकारामध्ये असून ते सत्यलोकी वास्तव्य करतात. त्यांचे नाव कबीर आहे आणि त्यांनाच अल्लाहु अकबिरूसुद्धा म्हटले जाते.**

**आदरणीय धर्मदासजींनी पूज्य कबीर प्रभुंना विचारले, की हे सर्वशक्तिमान, आजपर्यंत हे तत्त्वज्ञान कोणीही सांगितले नाही. वेदांचे मर्म जाणणाऱ्या ज्ञानींनीही हे सांगितले नाही. यावरून हे सिद्ध झाले आहे, की चारही पवित्र वेद आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ आदी) असत्य आहेत. त्यावेळी पूर्ण परमात्मा म्हणाले, की :–**

'कबीर, बेद कतेब झूठे नहीं भाई, झूठे है जो समझे नाहिं।'

**याचा भावार्थ असा आहे, की चारही पवित्र वेद (ऋग्वेद–अथर्ववेद–यजुर्वेद–सामवेद) आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ–जबूर–तौरात–इंजिल) असत्य/अयोग्य नाहीत; परंतु ज्यांना ते समजलेले नाहीत, ते अज्ञानी/खोटे आहेत.**

## ''पूज्य कबीर परमेश्वर (कविर् देव) यांच्या अमृतवाणीमधील सृष्टि रचना''

**विशेष :– ही अमृतवाणी १४०३ पासून {जेव्हा पूज्य कविर्देव (कबीर परमेश्वर) लीला करत पाच वर्षांचे झाले} ते १५१८ च्या {जेव्हा कविर्देव (कबीर परमेश्वर 'मगहर' स्थानातून सशरीर सतलोकी गेले} दरम्यान सुमारे सहाशे वर्षांपूर्वी परमूज्य कबीर परमेश्वरजींनी (कविर्देव) आपले निजसेवक (दास भक्त) आदरणीय धर्मदास साहेबजींना ऐकवली होती आणि धनी धर्मदास साहेबजींनी लिपीबद्ध केली होती. परंतु त्यावेळीच्या पवित्र हिन्दू आणि पवित्र मुस्लिम धर्मातील अज्ञानी गुरू (नीम–हकीम) म्हणाले की हा धाणक (विणकर) कबीर खोटारडा आहे. कोणत्याही सद्ग्रंथामध्ये श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांच्या माता–पित्यांचे नाव नाही. हे तिन्ही प्रभु अविनाशी आहेत. त्यांचा जन्म–मृत्यू होत नाही. पवित्र वेद, पवित्र कुर्आन शरीफ आदींमध्ये कबीर परमेश्वरांचे प्रमाण आहे आणि परमात्म्याचे निराकार असे वर्णन केलेले आहे. आम्ही दररोज या सदग्रंथांचे वाचन करतो. भोळ्या आत्म्यांनी त्या विलक्षणी (चतुर) अज्ञानी गुरूंवर विश्वास ठेवला की खरोखरच हा कबीर धाणक (विणकर) अशिक्षित आहे आणि आपले गुरुजी ज्ञानी आहेत. ते सांगतात ते सत्यच असणार. आज कबीर साहेबांनी सांगितलेली तीच वस्तुस्थिती, सत्य प्रकाशामध्ये येत आहे आणि याला आपले सर्व पवित्र धर्मांचे**

**पवित्र सद्ग्रंथ साक्षी आहेत. यावरून असे सिद्ध होते की पूर्ण परमात्मा, सृष्टिचे रचनाकार, कुलस्वामी आणि सर्वज्ञ कविर्देव (कबीर परमेश्वर) हेच आहेत, जे काशीमध्ये (बनारस) कमळाच्या फुलावर प्रगट झाले आणि १२० वर्षांपर्यंत वास्तविक तेजोमय शरीरावर मानवसदृश कमी तेजाचे शरीर धारण करून राहिले. आपण रचलेल्या सृष्टिचे यथायोग्य (वास्तविक ज्ञान) देऊन सशरीर सतलोकी गेले.**

**कृपया वाचकांनी खालील परमेश्वर कबीर साहेब कडून उच्चारित अमृतवाणी वाचा:-**

धर्मदास यह जग बौराना। कोई न जाने पद निरवाना ।।१।।
यहि कारन मैं कथा पसारा । जगसे कहियो राम नियारा ।।
यही ज्ञान जग जीव सुनाओ । सब जीवों का भरम नशाओ ।।२।।
भरम गये जग वेद पुराना । आदि राम का का भेद न जाना ।।३।।
राम राम सब जगत बखाने । आदि राम कोई बिरला जाने ।।४।।
ज्ञानी सुने सो हिरदै लगाई । मूर्ख सुने सो गम्य ना पाई ।।५।।
अब मैं तुमसे कहूँ चिताई । त्रिदेवन की उत्पत्ति भाई ।।६।।
कुछ संक्षेप कहूँ गौहराई। सब संशय तुम्हरे मिट जाई ।।७।।
माँ अष्टंगी पिता निरंजन। वे जम दारुण वंशन अंजन ।।८।।
पहिले कीन्ह निरंजन राई । पीछे से माया उपजाई ।।९।।
माया रूप देख अति शोभा । देव निरंजन तन मन लोभा ।।१०।।
कामदेव धर्मराय सत्ताये। देवी को तुरतही धर खाये ।।११।।
पेट से देवी करी पुकारा। साहब मेरा करो उबारा ।।१२।।
टेर सुनी तब हम तहाँ आये। अष्टंगी को बंद छुड़ाये ।।१३।।
सतलोक में कीन्हा दुराचारि, काल निरंजन दिन्हा निकारि ।।१४।।
माया समेत दिया भगाई, सोलह संख कोस दूरी पर आई ।।१५।।
अष्टंगी और काल अब दोई, मंद कर्म से गए बिगोई ।।१६।।
धर्मराय को हिकमत कीन्हा। नख रेखा से भगकर लीन्हा।।१७।।
धर्मराय किन्हाँ भोग विलासा। माया को रही तब आसा ।।१८।।
तीन पुत्र अष्टंगी जाये । ब्रह्मा विष्णु शिव नाम धराये ।।१९।।
तीन देव विस्तार चलाये। इनमें यह जग धोखा खाये ।।२०।।
पुरुष गम्य कैसे को पावै। काल निरंजन जग भरमावै ।।२१।।
तीन लोक अपने सुत दीन्हा। सुन्न निरंजन बासा लीन्हा ।।२२।।
अलख निरंजन सुन्न ठिकाना। ब्रह्मा विष्णु शिव भेद न जाना ।।२३।।
तीन देव सो उनको धावें। निरंजन का वे पार ना पावें ।।२४।।
अलख निरंजन बड़ा बटपारा। तीन लोक जिव कीन्ह अहारा ।।२५।।
ब्रह्मा विष्णु शिव नहीं बचाये। सकल खाय पुन धूर उड़ाये ।।२६।।
तिनके सुत हैं तीनों देवा। आंधर जीव करत हैं सेवा ।।२७।।
अकाल पुरुष काहू नहिं चीन्हां । काल पाय सबही गह लीन्हां ।।२८।।
ब्रह्म काल सकल जग जाने । आदि ब्रह्म को ना पहिचाने।।२९।।
तीनों देव और औतारा। ताको भजे सकल संसारा ।।३०।।
तीनों गुण का यह विस्तारा। धर्मदास मैं कहों पुकारा ।।३१।।
गुण तीनों की भक्ति में, भूल परो संसार ।३२।।

कहै कबीर निज नाम बिन, कैसे उतरैं पार ।।३३।।

**या अमृतवाणीमध्ये परमेश्वर कबीर साहेब जी आपले निजसेवक श्री धर्मदास साहेबजींना सांगत आहेत की धर्मदास हा सर्व संसार तत्त्वज्ञानाच्या अभावाने विचलित (भटकत/भ्रमित) झालेला आहे. कोणालाही पूर्ण मोक्षाचा मार्ग तसेच पूर्ण सृष्टि रचनेचे ज्ञान नाही. यासाठी मी स्वतः रचलेल्या सृष्टि ची कथा ऐकवत आहे. बुद्धिमान व्यक्तींना तर हे ज्ञान लगेच समजेल. परंतु जे सर्व निष्कर्ष पाहूनही मानणार नाहीत, विश्वास ठेवणार नाहीत, ते अज्ञानी प्राणी कालाच्या प्रभावाखाली आलेले आहेत. ते भक्तियोग्य नाहीत. आता मी सांगतो, की, या तिन्ही भगवानांची (ब्रह्मा जी, विष्णु जी आणि शिव जी) उत्पत्ती कशी झाली? त्यांची माता तर अष्टांगी (दुर्गा) आहे आणि पिता ज्योति निरंजन (ब्रह्म, काल) आहे. प्रथम अंड्यातून ब्रह्मची उत्पत्ती झाली. त्यानंतर दुर्गा देवीची उत्पत्ती झाली. दुर्गाच्या रूपावर आसक्त होऊन काल (ब्रह्म) गैरवर्तन करू लागला, तेव्हा दुर्गा देवीने (प्रकृति) त्याच्या उदरामध्ये आसरा घेतला. त्यावेळी जेथे ज्योति निरंजन (काल) होता, तेथे मी गेलो आणि भवानीला ब्रह्मच्या (काल) उदरातून बाहेर काढून २१ ब्रह्माण्डांसह १६ संख कोस दूर पाठवले. ज्योति निरंजनाने (धर्मराय) प्रकृति देवीशी (दुर्गा) भोगविलास केला. या दोघांच्या संयोगातून तिन्ही गुणांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी) उत्पत्ती झाली. याच तीन गुणांची (रजगुण-ब्रह्मा जी, सतगुण-विष्णु जी, तमगुण-शिव जी) साधना करून सर्व प्राणी कालच्या जाळ्यामध्ये फसलेले आहेत. जोपर्यंत वास्तविक मंत्र मिळत नाही, तोपर्यंत त्यांना पूर्ण मोक्ष कसा मिळेल?**

विशेष :- वाचकहो विचार करा- श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांची स्थिती अविनाशी सांगितली होती. सर्व हिन्दू समाज आजतागायत या तिन्ही परमात्म्यांना अजर, अमर व जन्म-मृत्यूरहित मानत राहिला आहे. परंतु वास्तविक हे तीनही भगवान नाशवान आहेत. यांचा पिता कालरुपी ब्रह्म आणि माता व दुर्गा (प्रकृति/अष्टांगी) आहे. आपण पूर्व प्रमाणांमध्ये वाचलेले आहे, तेच ज्ञान आपल्या शास्त्रांमध्येही विद्यमान आहे. परंतु हिन्दू समाजातील कलयुग गुरू, ऋषि आणि संतांना याचे ज्ञान नाही. ज्या अध्यापकाला पाठ्यक्रम माहीत नाही, तो अध्यापक योग्य नाही (विद्वान नाही). तो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा शत्रू आहे. त्याप्रमाणे ज्या गुरूंना अजूनही श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी आणि श्री शिव जी यांचे माता-पिता कोण आहेत, हे माहीत नाही, ते गुरू, ऋषि, संत ज्ञानहीन आहेत. त्यांनी सर्व भक्त समाजाला शास्त्राविरुद्ध ज्ञान (लोकवेद अर्थात दंतकथा) ऐकवून अज्ञानाने परिपूर्ण करून टाकले. शास्त्रविधीविरुद्ध भक्तिसाधना करवून घेऊन त्यांना परमात्म्याच्या वास्तविक लाभापासून (पूर्ण मोक्ष) वंचित ठेवले. सर्वांचे मानव जीवन व्यर्थ घालविले आहे. जो शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण, पूजा करतो त्याला कोणताही लाभ प्राप्त होत नाही, याचे प्रमाण श्रीमद् भगवत गीता च्या १६ व्या अध्यायामध्ये २३ व २४ व्या श्लोकांमध्ये आले आहे. पूर्ण परमात्मा कबीरजींनी सन १४०३ पासूनच सर्व शास्त्रयुक्त ज्ञान आपल्या अमृतवाणीमध्ये (कबीर वाणी) सांगण्यास प्रारंभ केला होता. परंतु त्या वेळच्या अज्ञानी गुरूंनी हे ज्ञान भक्त समाजापर्यंत जाऊ दिले नाही. यावरून हे स्पष्ट होते की कविर्देव (कबीर प्रभु) तत्त्वदर्शी संताच्या रूपामध्ये स्वतः पूर्ण परमात्माच आलेले होते.

## ''आदरणीय गरीब दास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण''

### आदि रमैणी (सदग्रन्थ पृष्ठ नं. ६९० ते ६९२ पर्यंत)

आदि रमैणी अदली सारा। जा दिन होते धुंधुंकारा ।।१।।
सतपुरुष कीन्हा प्रकाशा। हम होते तखत कबीर खवासा ।।२।।
मन मोहिनी सिरजी माया । सतपुरुष एक ख्याल बनाया ।।३।।
धर्मराय सिरजे दरबानी। चौसठ जुगतप सेवा ठांनी ।।४।।
पुरुष पृथिवी जाकूं दीन्ही। राज करो देवा आधीनी ।।५।।
ब्रह्मण्ड इकीस राज तुम्ह दीन्हा। मन की इच्छा सब जुग लीन्हा ।।६।।
माया मूल रूप एक छाजा। मोहि लिये जिनहूँ धर्मराजा ।।७।।
धर्म का मन चंचल चित धार्या। मन माया का रूप बिचारा ।।८।।
चंचल चेरी चपल चिरागा। या के परसे सरबस जागा ।।९।।
धर्मराय कीया मन का भागी। विषय वासना संग से जागी ।।१०।।
आदि पुरुष अदली अनरागी। धर्मराय दिया दिल सें त्यागी ।।११।।
पुरुष लोक सें दीया ढहाही। अगम दीप चलि आये भाई ।।१२।।
सहज दास जिस दीप रहंता। कारण कौंन कौंन कुल पंथा ।।१३।।
धर्मराय बोले दरबानी । सुनो सहज दास ब्रह्मज्ञानी ।।१४।।
चौसठ जुग हम सेवा कीन्ही। पुरुष पृथिवी हम कूं दीन्ही ।।१५।।
चंचल रूप भया मन बौरा। मनमोहिनी ठगिया भौंरा ।।१६।।
सतपुरुष के ना मन भाये। पुरुष लोक से हम चलि आये ।।१७।।
अगर दीप सुनत बड़भागी। सहज दास मेटो मन पागी ।।१८।।
बोले सहजदास दिल दानी । हम तो चाकर सत सहदानी ।।१९।।
सतपुरुष सें अरज गुजारूं। जब तुम्हारा बिवाण उतारूं ।।२०।।
सहज दास को कीया पीयाना। सत्यलोक लीया प्रवाना ।।२१।।
सतपुरुष साहिब सरबंगी। अविगत अदली अचल अभंगी ।।२२।।
धर्मराय तुम्हरा दरबानी। अगर दीप चलि गये प्रानी ।।२३।।
कौंन हुकम करी अरज अवाजा। कहां पठावौ उस धर्मराजा ।।२४।।
भई अवाज अदली एक साचा। विषय लोक जा तीन्यूं बाचा ।।२५।।
सहज विमाँन चले अधिकाई। छिन में अगर दीप चलि आई ।।२६।।
हमतो अरज करी अनरागी। तुम्ह विषय लोक जावो बड़भागी ।।२७।।
धर्मराय के चले विमाना। मानसरोवर आये प्राना ।।२८।।
मानसरोवर रहन न पाये। दरै कबीरा थांना लाये ।।२९।।
बंकनाल की विषमी बाटी। तहां कबीरा रोकी घाटी ।।३०।।
इन पाँचों मिलि जगत बंधाना। लख चौरासी जीव संताना ।।३१।।
ब्रह्मा विष्णु महेश्वर माया। धर्मराय का राज पठाया ।।३२।।
यौह खोखा पुर झूठी बाजी । भिसति बैकुण्ठ दगासी साजी ।।३३।।
कृतिम जीव भुलानें भाई । निज घर की तो खबरि न पाई ।।३४।।
सवा लाख उजपें नित हंसा । एक लाख विनशें नित अंसा ।।३५।।
उपति खपति प्रलय फेरी । हर्ष शोक जौंरा जम जेरी ।।३६।।
पाँचों तत्त्व हैं प्रलय माँही। सत्त्वगुण रजगुण तमगुण झांई ।।३७।।

आठों अंग मिली है माया । पिण्ड ब्रह्मण्ड सकल भरमाया ।।३८।।
या में सुरति शब्द की डोरी । पिण्ड ब्रह्मण्ड लगी है खोरी ।।३९।।
श्वासा पारस मन गह राखो। खोल्हि कपाट अमीरस चाखो ।।४०।।
सुनाऊं हंस शब्द सुन दासा। अगम दीप है अग है बासा ।।४१।।
भवसागर जम दण्ड जमाना। धर्मराय का है तलबांना ।।४२।।
पाँचों ऊपर पद की नगरी। बाट बिहंगम बंकी डगरी ।।४३।।
हमरा धर्मदाय सों दावा। भवसागर में जीव भरमावा ।।४४।।
हम तो कहैं अगम की बानी। जहाँ अविगत अदली आप बिनानी ।।४५।।
बंदी छोड हमारा नामं । अजर अमर है अस्थीर ठामं ।।४६।।
जुगन जुगन हम कहते आये। जम जौंरा सें हंस छुटाये ।।४७।।
जो कोई मानें शब्द हमारा। भवसागर नहीं भरमें धारा ।।४८।।
या में सुरति शब्द का लेखा । तन अंदर मन कहो कीन्ही देखा ।।४९।।
दास गरीब अगम की बानी। खोजा हंसा शब्द सहदानी ।।५०।।

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे कि आदरणीय गरीब दास साहेब जी म्हणत आहेत की सर्वप्रथम येथे केवळ अंधकार होता आणि पूर्ण परमात्मा कबीर साहेब जी सत्यलोकामध्ये तख्तावर (सिंहासन) विराजमान होते. आम्ही तेथे सेवक होतो. परमात्म्याने ज्योनिरंजनाची उत्पत्ती केली. नंतर त्याच्या तपाचे प्रतिफळ म्हणून २१ ब्रह्माण्डे त्याला प्रदान केली. त्यानंतर मायेची (प्रकृति) उत्पत्ती केली. तरुण दुर्गादेवीच्या (प्रकृति) रूपावर मोहित होऊन ज्योति निरंजनने (ब्रह्म) दुर्गा देवीशी (प्रकृति) गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्याला (काल) त्याची शिक्षा प्राप्त झाली. त्याला सत्यलोकातून हद्दपार करून (निष्कासित) शाप देण्यात आला की तो दररोज एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करेल आणि सव्वा लाख मानव शरीरधारी प्राण्यांची उत्पत्ती करेल. त्यामुळे येथील सर्व प्राणी जन्म-मृत्यूचे कष्ट सहन करत आहेत. जर कोणी पूर्ण परमात्म्याचे वास्तविक शब्द (सत्य, खरे नाम, जप मंत्र) माझ्याकडून (रामपालजी महराज) प्राप्त करेल, त्याची या कालच्या बंधनातून सुटका होईल. माझे नाव बंदी छोड आहे. आदरणीय गरीब दास साहेब जी आपले गुरू व प्रभु कबीर परमात्मा यांच्या आधारावर म्हणत आहेत की खरा मंत्र म्हणजेच सत्यनाम आणि सारनामाची प्राप्ती करा. त्यामुळे पूर्ण मोक्ष मिळेल, नाही तर खोटा नामोपदेश देणाऱ्या संत आणि महंतांच्या मधूर बोलण्याला फसून शास्त्रविधिरहित साधना करून कालच्या जाळ्यामध्येच अडकून पडाल. आणि कष्टावर कष्ट सहन करत बसाल.**

**गरीब दास जी महाराजांची वाणी हंस परमहंस ची कथा ची वाणी नं. ३७-४३ मध्ये म्हटले आहे :-**

माया आदि निरंजन भाई, अपने जाये आपै खाई।
ब्रह्मा बिष्णु महेश्वर चेला, ओम् सोहं का है खेला।।३७।।
शिखर शुन्य में धर्म अन्यायी, जिन शक्ति डायन महल पठाई।
लाख ग्रासै नित उठि दूती, माया आदि तख्त की कूती।।३८।।
सवा लाख घड़ियें, नित भांडे, हंसा उत्पत्ति प्रलय डांडे।
ये तीनौं चेला बट पारी, सिरजे पुरुषा सिरजी नारी।।३९।।
खोखापुर में जीव भुलाये, स्वप्ना बहिश्त बैकुण्ठ बनाये।
यौह हरहट का कूवा लोई, या गल बंध्या है सब कोई।।४०।।

कीड़ी कुंजर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।
अरब अलिल इन्द्र हुए हैं भाई, हरहट डोरि बंधे सब आई।।४१।।
शेष महेश अरू गणेश तांई, हरहट डोरि बंध सब आंई।
शुक्रादिक ब्रह्मादिक देवा, हरहट डोरि बंधे सब खेवा।
कोटिक कर्ता फिरता देख्या, हरहट डोरि कहूं सुनि लेखा।।४२।।
चतुर्भुजी भगवान कहावैं, हरहट डोरि बंधे सब आवै।
योह है खोखा पुर का कूवा, यामें पर्‌या सो निश्चय मूवा।।४३।।

**ज्योति निरंजन (कालबली) च्या वश होऊन या तिन्ही देवता (रजगुण–ब्रह्मा, सतगुण–विष्णु, तमगुण–शिव) आपली महिमा दाखवून जीवांना स्वर्ग नरक तसेच भवसागरात (चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये) फिरत राहतात. ज्योति निरंजन आपल्या मायेने नागिनी सारखे जीवांना पैदा करतो आणि पुन्हा मारतो. जशी नागीण आपली कुंडली बनविते आणि त्या कुंडलीमध्ये अंडी घालते. त्यानंतर ती त्या अंड्यांवर आपला फणा मारते. त्यामुळे अंडी फुटतात आणि त्यातून पिल्ली बाहेर पडतात. त्यांना नागीण भक्षण करते. अंडी भरपूर असल्यामुळे फणा मारताना कित्येक अंडी फुटतात. जी अंडी फुटतात, त्यातून नागिणीची पिल्ली बाहेर निघतात. जे पिल्लू कुंडलीच्या (नागिणीच्या शेपटीचा घेरा) बाहेर पडते ते वाचते. अन्यथा कुंडलीमधील पिलांना नागीण सोडत नाही. जेवढी पिल्ली कुंडलीत असतील, त्या सर्वांना ती खाते. जो साधक ब्रह्म (काल ब्रह्म म्हणजे ज्योति निरंजन, देवी दुर्गा तसेच ब्रह्मा, विष्णु, शिव तसेच अन्य देवतांपर्यंतची भक्ति करतात, ते काल ब्रह्म रुपी नागिणीच्या घेऱ्यात म्हणजे जन्म–मरणाच्या चक्रामध्ये काल लोकामध्ये राहुन जातात ज्यांना काल ज्योति निरंजन खातो.)**

माया काली नागिनी, अपने जाये खात। कुण्डली में छोड़ै नहीं, सौ बातों की बात ।।

**अशाप्रकारे हे कालबलीचे जाळे आहे. निरंजनपर्यंतची भक्ति पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊन केली, तरीही निरंजनाच्या कुंडलीतून (२१ ब्रह्माण्डे) बाहेर जाता येत नाही. स्वतः ब्रह्मा, विष्णु, महेश, आदिमाया शेरावाली हे देखिल निरंजनाच्या कुंडलीतच आहेत. ते बिचारे अवतार धारण करून येतात आणि जन्म–मृत्यूचे फेरे घेत राहतात. म्हणूनच ध्रुव, प्रल्हाद व शुक्रदेव ऋषिंनी 'सोहं' मंत्राचा जप करूनही ते मुक्त होऊ शकले नाहीत. कारण श्री विष्णु पुराणाच्या प्रथम अंशाचे अध्याय १२ चे श्लोक ९३ मध्ये पृष्ठ ५१ वर लिहले आहे कि ध्रुव केवळ एक कल्प अर्थात एक हजार चतुर्युगापर्यंतच मुकत आहे. यामुळे ते काललोकीच राहिले. 'ॐ नमः भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करणारे भक्त देखिल कृष्णापर्यंत पोहोचण्याची भक्ती करत आहेत. ते देखिल ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामधून सुटू शकणार नाहीत. हे सर्व परमपूज्य कबीर साहेब जी व आदरणीय गरीबदास साहेब जी महाराज यांच्या वाणीमध्ये प्रत्यक्ष प्रमाणित आहे.**

अनन्त कोटि अवतार हैं, माया के गोविन्द । कर्ता हो हो अवतरे, बहुर पड़े जग फंध ।।

**सतपुरुष कबीर साहेबजींच्या भक्तीनेच जीव मुक्त होऊ शकतो.**


**जोपर्यंत जीव सतलोकी परत जाणार नाही, तोपर्यंत काललोकी असेच कर्म करत राहील आणि नामस्मरण व दानधर्माच्या पूण्याची कमाई स्वर्गरूपी हॉटेलमध्ये उधळून पुन्हा कर्माधारावर ८४ लक्ष प्राण्यांच्या शरीरामध्ये जन्म–मृत्यू रूपी कष्ट सहन कराव्या लागणाऱ्या काललोकी फेऱ्या मारत बसेल. मायेपासून (दुर्गा) उत्पत्ती होऊन करोडो गोविंद (ब्रह्मा–विष्णु–शिव) मेलेले आहेत. भगवानांचा अवतार बनुन आले होते.**

**पुन्हा कर्म बंधनात बांधुन कर्मांना भोगुन चौऱ्याऐंशी लाख योनिंमध्ये गेले. जसे भगवान**

**विष्णुजींना देवर्षी नारदांनी शाप दिला होता. ते श्री रामचंद्र रूपामध्ये अयोध्येत आले. पुन्हा श्री राम जी रुपात बालीचा वध केला होता. या कर्माचा दंड भोगण्यासाठी श्री कृष्णजींच्या रूपात जन्म झाला. पुन्हा बालीचा आत्मा शिकारी बनला आणि आपला पूर्वजन्मीचा प्रतिशोध घेतला. श्री कृष्णजींच्या पायामध्ये विषयुक्त बाण मारून वध केला. महाराज गरीब दास जी आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत की :**

ब्रह्मा विष्णु महेश्वर माया, और धर्मराय कहिये।
इन पाँचो मिल परपंच बनाया, वाणी हमरी लहिये ।।
इन पाँचो मिल जीव अटकाये, जुगन–जुगन हम आन छुटाये।
बन्दी छोड़ हमारा नामं, अजर अमर है अस्थिर ठामं ।।
पीर पैगम्बर कुतुब औलिया, सुर नर मुनिजन ज्ञानी।
येता को तो राह न पाया, जम के बंधे प्राणी ।।
धर्मराय की धूमा–धामी, जम पर जंग चलाऊँ।
जोरा को तो जान न दूगां, बांध अदल घर ल्याऊँ ।।
काल अकाल दोहूँ को मोसूं, महाकाल सिर मूंडू।
मैं तो तख्त हजूरी हुकमी, चोर खोज कूं ढूंढू ।।
मूला माया मग में बैठी, हंसा चुन–चुन खाई।
ज्योति स्वरूपी भया निरंजन, मैं ही कर्ता भाई ।।
संहस अठासी दीप मुनीश्वर, बंधे मुला डोरी।
ऐत्यां में जम का तलबाना, चलिए पुरुष कीशोरी ।।
मूला का तो माथा दागूं, सतकी मोहर करूंगा ।।
पुरुष दीप कूं हंस चलाऊँ, दरा न रोकन दूंगा ।।
हम तो बन्दी छोड़ कहावां, धर्मराय है चकवै।
सतलोक की सकल सुनावां, वाणी हमरी अखवै ।।
नौ लख पट्टन ऊपर खेलूं, साहदरे कूं रोकूं।
द्वादस कोटि कटक सब काटूं, हंस पठाऊँ मोखूं ।।
चौदह भुवन गमन है मेरा, जल थल में सरबंगी।
खालिक खलक खलक में खालिक, अविगत अचल अभंगी ।।
अगर अलील चक्र है मेरा, जित से हम चल आए।
पाँचों पर प्रवाना मेरा, बंधि छुटावन धाये ।।
जहाँ ओंकार निरंजन नाहीं, ब्रह्मा, विष्णु वेद नहीं जाहीं।
जहाँ करता नहीं काल भगवाना, काया माया पिण्ड न प्राणा ।।
पाँच तत्त्व तीनों गुण नाहीं, जोरा काल दीप नहीं जाहीं।
अमर करूं सतलोक पठाँऊ, तातैं बन्दी छोड़ कहाऊँ ।।

**कबीर परमेश्वरांची (कविर्देव) महिमा गात आदरणीय गरीबदास साहेब जी म्हणत आहेत की आमचे प्रभू कविर् (कविर्देव) बंदी छोड आहेत. बंदी छोड याचा भावार्थ आहे कालच्या कारागृहातून सुटका करणारे. कालब्रह्मच्या २१ ब्रह्माण्डांमध्ये सर्व प्राणी हातून पाप घडल्यामुळे कालचे बंदी बनले आहेत. पूर्ण परमात्मा कबीर साहेब (कविर्देव) पापांचा विनाश करतात. ब्रह्म, परब्रह्म, ब्रह्मा, विष्णु, शिव किंवा इतर कोणीही पापांचा विनाश करू शकत नाही. जसे आपले कर्म असेल, त्याप्रमाणे ते आपणाला केवळ फळ देतात. यासाठी यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील**




योह हरहट का कुआँ लोई, या गल बंध्या है सब कोई।
कीड़ी कुंजर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।।

काल लोका मध्ये जन्म–मरण रुपी हरहट (चक्र)

३२ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे की 'कविरंघारिरसि' = (कविर्) कविर्देव (कबीर परमेश्वर) (अंघ अरि) पापांचे शत्रू आहेत. 'बम्भारिरसि' = (बम्भारि:) बंधनांचे (अरि) शत्रू म्हणजेच 'बंदी छोड' आहेत.

या पाच जणांच्या (ब्रह्मा, विष्णु, महेश, माया आणि धर्मराय) वर जे सतपुरुष परमात्मा (कविर्देव) आहेत. जे सतलोक चा मालिक आहे. बाकीचे सर्व परब्रह्म, ब्रह्म आणि ब्रह्मा, विष्णु, शिव जी व आदिमाया हे नाशवान परमात्मा आहेत. महाप्रलयामध्ये हे सर्व आणि त्यांचे लोक पूर्णपणे नष्ट होतील. सर्वसामान्य जीवांपेक्षा कितीतरी हजार पटीने अधिक यांचे आयुष्य आहे. परंतु जी वेळ ठरलेली आहे, ती एक दिवस नक्कीच पूर्ण होते आणि त्यांना नष्ट व्हावे लागते. याबाबत आदरणीय गरीब दास जी महाराज म्हणतात की :-

शिव ब्रह्मा का राज, इन्द्र गिनती कहां। चार मुक्ति वैकुंण्ठ समझ, येता लह्या।।
संख जुगन की जुनी, उम्र बड़ धारिया। जा जननी कुर्बान, सु कागज पारिया।।
येती उम्र बुलंद मरैगा अंत रे। सतगुरू लगे न कान, न भैंटे संत रे ।।

जरी संख युगांचे दीर्घ आयुष्य प्राप्त झाले, तरी ते एक ना एक दिवस नक्कीच समाप्त होतील. जर सतपुरुष परमात्मा (कविर्देव) कबीर साहेबांचे अनुयायी (नुमाँयदे) पूर्ण संत (गुरू), जे तीन नामांचा मंत्र (ज्यामध्ये ओऽम्+तत्+सत् हे सांकेतिक आहेत.) प्रदान करतात आणि ज्यांना पूर्ण संतांकडून नामोपदेश करण्याचा आदेश आहे, त्यांच्याकडून उपदेश घेऊन नामस्मरणाची पुण्यकमाई केली, तर आपण सत्यलोकीचे अधिकारी हंस होऊ शकतो. सत्यसाधनेशिवाय अतिदीर्घ आयुष्य काहीही कामाचे नाही. कारण या निरंजन लोकी केवळ दु:ख आणि दु:खच आहे.

कबीर, जीवना तो थोड़ा ही भला, जै सत सुमरन होय। लाख वर्ष का जीवना, लेखै धरै ना कोय।।

❖ जर सत्य साधना केली गेली तर कमी आयुष्य चांगले आहे. जर सतपुरुषाची साधना केली नाही तसेच काल ब्रह्मची व देवी व देवतांची पुजा करुन व प्राणायाम इत्यादी करुन दिर्घ आयुष्य जगणाऱ्यांचा लेखाजोखा (Account) मोक्षमार्गामध्ये केला जाणार नाही. येवढे मोठे आयुष्य (जेवढे शंकरजींचे आहे) मिळाले तरी देखिल एक दिवस मृत्यु अवश्य होईल. भक्ति चुकीची आहे. यामुळे जन्म तसेच मृत्युचे चक्र कायम राहिल. अशा आयुष्याचे काय औचित्य आहे.

कबीर साहेब आपली (पूर्णब्रह्म) माहिती स्वतः सांगतात,की या परमात्म्यांच्याही वर असंख्य भुजा असलेला परमात्मा सतपुरुष आहे, जो सत्यलोकामध्ये (सच्च खण्ड/सतधाम) वास्तव्य करतो आणि त्यांच्या अखत्यारित सर्व लोक (ब्रह्मची (काल) २१ ब्रह्माण्डे व ब्रह्मा, विष्णु, शिव-शक्ती (दुर्गा) यांचे लोक आणि परब्रह्मचे सात संख ब्रह्माण्डे व इतर सर्व ब्रह्माण्डे) येतात आणि तेथे जे पूर्ण सतगुरूंकडूनच प्राप्त होते, त्या सत्यनाम-सारनामाचा जप करूनच जाता येते. सच्च खण्डामध्ये (सतलोक) जो आत्मा जातो, त्याचा पुनर्जन्म होत नाही. सतपुरुष (पूर्णब्रह्म) कबीर साहेबच (कविर्देव) इतर लोकांमध्येही विराजमान आहेत. अलखलोकी अलखपुरुष, अगमलोकी अगमपुरुष, तसेच अकहलोकी अनामीपुरुष अशा रूपांमध्ये ते विराजमान आहेत. ही तर त्यांची केवळ उपमात्मक नावे आहेत. परंतु या परमेश्वराचे, पूर्ण पुरुषाचे वास्तविक नाव कविर्देव (भाषा भिन्नतेमुळे कबीर साहेबही म्हटले जाते.) असे आहे.

## ''आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टि रचनेचा संकेत''

**श्री नानक साहेबजींची अमृतवाणी, महला १, राग बिलावलू, अंश १ (गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. ८३९)**

आपे सचु कीआ कर जोड़ि । अंडज फोडि जोडि विछोड़ ।।
धरती आकाश कीए बैसण कउ थाउ। राति दिनंतु कीए भउ–भाउ।।
जिन कीए करि वेखणहारा। (३)
त्रितीआ ब्रह्मा–बिसतु–महेसा। देवीदेव उपाए वेसा ।। (४)
पउण पाणी अगनी बिसराउ। ताही निरंजन साचो नाउ।।
तिसु महि मनुआ रहिआ लिव लाई । प्रणवति नानकु कालु न खाई ।।(१०)

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे, की खऱ्या परमात्म्यांनी (सत्पुरुष) स्वतःच आपल्या हातांनी सर्व सृष्टीची रचना केलेली आहे. त्यांनीच अंडे बनविले आणि नंतर ते फोडले व त्यातूनच ज्योतिनिरंजन बाहेर पडला. त्याच पूर्ण परमात्म्याने सर्व प्राण्यांच्या वास्तव्यासाठी धरती, आकाश, पवन, जल, अग्नी ही पंचतत्त्वे निर्माण केली. आपण स्वतः रचलेल्या सृष्टिचे ते स्वतःच साक्षी आहेत. याबाबत दुसरा कोणीही योग्य माहिती देऊ शकत नाही. त्यानंतर अंडे फुटून बाहेर पडलेल्या ज्योति निरंजनानंतर श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांची उत्पत्ती झाली, तसेच अन्य देवी–देवता आणि अगणित (असंख्य) जीवांची उत्पत्ती झाली. त्यानंतर अन्य देवांचे जीवनचरित्र आणि अन्य ऋषींच्या अनुभवांतून सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे निर्माण झाली. पूर्ण परमात्म्याच्या खऱ्या नामाची (सत्यनामाची) साधना अनन्यभावे केल्यानेच व गुरुमर्यादेमध्ये राहणाऱ्यांना (प्रणवति) काल खात (भक्षण) नाही, असे श्री नानकजी सांगत आहेत.**

**राग मारू (अंश) अमृतवाणी महला १. (गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. १०३७)**

सुनहु ब्रह्मा, बिसनु, महेसु उपाए। सुने वरते जुग सबाए।।
इसु पद बिचारे सो जनु पुरा। तिस मिलिए भरमु चुकाइदा।।(३)
साम वेदु, रुगु जुजरु अथरबणु । ब्रह्ममें मुख माइआ है त्रैगुण।।
ता की कीमत कहि न सकै। को तिउ बोले जिउ बुलाईदा ।।(९)

**या अमृतवाणीचा सारांश असा आहे, की अंड्याचे दोन भाग होऊन कोण निघाले, त्याने नंतर ब्रह्मलोकीच्या सुन्न म्हणजेच गुप्तस्थानी ब्रह्मा, विष्णू आणि शिवजी यांची उत्पत्ती कशी केली, तसेच ज्याने ब्रह्मच्या (काल) मुखातून चार वेदांचे (पवित्र ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद) यांचे उच्चारण करून घेतले, तो परमात्मा कोण आहे, तो पूर्ण परमात्मा त्याला जसे हवे तसेच प्रत्येक प्राण्याला बोलायला लावतो, या सर्वाबाबत तो संतच पूर्ण सृष्टिरचना ऐकवेल आणि सांगेल. हे सर्व ज्ञान पूर्णपणे सांगणारा संत मिळाला/भेटला, तर त्याच्याजवळ जा. ते सर्व शंकांचे पूर्णपणे निरसन करतात आणि तेच पूर्ण संत म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.**

**श्री गुरु ग्रंथसाहेबच्या पान क्र. ९२९ वरील अमृतवाणी श्री नानक साहेबजींची राग रामकली महला १ दखणी ओअंकार.**

ओअंकारि ब्रह्मा उतपति। ओअंकारू कीआ जिनि चित। ओअंकारि सैल जुग भए । ओअंकारि बेद निरमए। ओअंकारि सबदि उधरे । ओंअकारि गुरुमुखि तरे। ओनम अखर सुणहू बीचारु। ओनम अखरु त्रिभवण सारु।

या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की ओंकार म्हणजेच ज्योति निरंजनापासून (काल) ब्रह्माजींची उत्पत्ती झाली. कित्येक युगे भक्ती करून ओंकाराने (ब्रह्म/काल) जे ब्रह्माजींना प्राप्त झाले, त्या वेदांची उत्पत्ती केली. त्रिलोकीच्या भक्तीचा केवळ एक 'ओऽम्' या मंत्राचा जप करण्यास सांगितले आहे. या 'ओऽम' शब्दाचा पूर्ण संतांकडूनच उपदेश घेऊन म्हणजेच गुरू करून जप केल्यानेच उद्धार होतो.

विशेष :- श्री नानक साहेबजींनी तीन मंत्रांचे (ओ३म् + तत् + सत्) ठिकठिकाणी रहस्यात्मक विश्लेषण केले आहे. ते केवळ पूर्ण संत (तत्त्वदर्शी संतच) समजू शकतात आणि तिन्ही मंत्रांच्या जपाचा उपदेश समजावून सांगू शकतात.

(पान क्र. १०३८) उत्तम सतिगुरु पुरुष निराले, सबदि रते हरि रस मतवाले।
रिधि, बुधि, सिधि, गिआन गुरु ते पाइए, पुरे भाग मिलाईदा।।१५।।
सतिगुरु ते पाए बीचारा, सुन समाधि सचे घरबारा ।
नानक निरमल नादु सबद धुनि, सचु रामैं नामि समाइदा ।।१७।।

या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे, की वास्तविक ज्ञान देणारे सद्गुरू तर वेगळेच आहेत. ते केवळ नामजप करण्यासच सांगतात. अन्य हठयोग साधना ते सांगत नाहीत. जर आपणाला धन-दौलत, पद, बुद्धी अथवा भक्ती शक्तीसुद्धा हवी असेल, तर त्या भक्तिमार्गाचे सर्व ज्ञान पूर्ण संतच प्रदान करेल. असे पूर्ण संत मोठ्या भाग्यानेच लाभतात. वर आकाशामध्ये (सुन्न) आपले वास्तविक घराची (सत्लोक) परमेश्वराने रचना केलेली आहे, असे विश्लेषण तेच पूर्ण संत करतील.

त्यामध्ये एका वास्तविक सारनामाची धून (आवाज) उमटत आहे. त्या आनंदात अविनाशी परमेश्वराचा सारशब्द सामावला जातो म्हणजेच त्या वास्तविक सुखदायी स्थानी आपला अधिवास होऊ शकतो. अन्य नाम जपा पासून आणि अज्ञानी गुरूं पासून होऊ शकत नाही.

आंशिक अमृतवाणी महला पहला (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ३५९ व ३६०)

सिव नगरी महि आसणि बैसउ कलप त्यागी वादं।(१)
सिंडी सबद सदा धुनि सोहै अहिनिसि पुरै नादं। (२)
हरि कीरति रह रासि हमारी गुरु मुख पंथ अतीत (३)
सगली जोति हमारी संमिआ नाना वरण अनेकं ।
कह नानक सुणि भरथरी जोगी पारब्रह्म लिव एकं।।(४)

भावार्थ :- या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की हे भरथरी योगीजी, आपली साधना भगवान शिवापर्यंत आहे. त्यामुळे आपल्याला शिवनगरीमध्ये (लोक) स्थान प्राप्त झालेले आहे आणि शरीरामध्ये जे 'सिंगी' शब्द आदी होत आहे, तो याच कमळांचा आहे आणि टेलिव्हिजनसारखा प्रत्येक देवाच्या लोकी शरीरामध्ये ऐकू येत आहे.

आम्ही तर एक परमात्मा पारब्रह्म म्हणजेच सर्वांच्या पलीकडे जो पूर्ण परमात्मा आहे, त्या परमात्म्याशी अनन्यभावे एकरूप होतो.

आम्ही बाह्य शरीरावर वरवरचा दिखावा (भस्म लावणे, हातामध्येकाठी घेणे) असे काहीही करत नाही. मी तर सर्व प्राण्यांना त्या एका पूर्ण परमात्म्याची संतान समजतो. सर्व काही त्याच शक्तीने चलायमान आहे. आमचा भाव तर सद्गुरूंकडून खरे नाम (सत्यनाम)

**प्राप्त करून त्याचा जप करण्याचा आहे आणि क्षमा करणे हा आमचा धर्म (बाणा) आहे. मी तर पूर्ण परमात्म्याचा उपासक आहे आणि पूर्ण सद्‌गुरूंचा भक्तिमार्ग यापेक्षा वेगळाच आहे.**

**अमृतवाणी राग आसा महला १ (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ४२०)**

।। आसा महला १।। जिनी नामु विसारिआ दूजै भरमि भुलाई। मुलू छोड़ि डाली लगे किआ पावहि छाई।।१।। साहिबु मेरा एकु है अवरू नहीं भाई। किरपा ते सुखु पाइआ साचे परथाई ।।३।। गुर की सेवा सो करे जिसु आपि कराए। नानक सिरु दे छुटीऐ दरगह पति पाए।।८।।१८।।

**भावार्थ : श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की जे पूर्ण परमात्म्याचे वास्तविक नाम विसरून अन्य भगवानांच्या नामांचा जप करून भ्रमित झालेले आहेत, ते मूळ (पूर्ण परमात्मा) सोडून फांद्यावरच (त्रिगुणरूपी - रजोगुण-ब्रह्मा, सत्‌गुण-विष्णू, तमोगुण-शिवजी) सिंचन (पूजा) करत आहेत. या साधनेने कोणतेच सुख प्राप्त होऊ शकत नाही म्हणजेच रोपटे सुकले, वाळून गेले तर आपण त्याच्या सावलीमध्ये बसू शकणार नाही. भावार्थ असा आहे, की शास्त्रविधिरहित साधना केल्याने सर्वकाही व्यर्थच आहे. त्यातून कोणताही लाभ मिळणार नाही. याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्येही आहे. या पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मनमानी साधनेचा त्याग करून पूर्ण सद्‌गुरुदेवांना समर्पण केल्याने आणि खऱ्या नामाचा (सत्यनामाचा) जप केल्यानेच मोक्ष संभव आहे, नाही तर मृत्यूनंतर नरकमध्ये जावे लागेल.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. ८४३-८४४)**

।। बिलावलु महला १।। मैं मन चाहु घणा साचि विगासी राम। मोही प्रेम पिरे प्रभु अबिनासी राम ।। अविगतो हरि नाथु नाथह तिसै भावै सो थीऐ। किरपालु सदा दइआलु दाता जीआ अंदरि तूं जीए। मैं आधारु तेरा तू खसमु मेरा मै ताणु तकीआ तेरओ। साचि सूचा सदा नानक गुरसबदि झगरु निबेरओ ।।४।।२।।

**या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की अविनाशी पूर्ण परमात्मा तर नाथांचेही नाथ आहेत म्हणजेच देवांचेही देव आहेत. (सर्व प्रभुंचे श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी आणि ब्रह्म व परब्रह्म यांचेही नाथ आहेत, स्वामी आहेत.) मी तर खरे नाम (सत्यनाम) ह्रदयामध्ये सामावून घेतले आहे. हे परमात्मा! सर्व प्राणिमात्रांच्या जीवनाचा आधारसुद्धा आपणच आहात. मी आपलाच आश्रित आहे. आपणच माझे स्वामी (मालक) आहात. आपणच गुरु रूपामध्ये येऊन सत्यभक्तिचे निर्णायक ज्ञान देऊन सर्व वादविवाद नष्ट केले आहेत आणि सर्व शंकांचे समाधान केले आहे.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ७२१, राग तिलंग, महला १)**

'यक अर्ज गुफतम् पेश तो दर कून करतार।
हक्का कबीर करीम तू बेअब परवरदिगार।
नानक बुगोयद जन तुरा तेरे चाकरां पाखाक।'

**या अमृतवाणीमधून स्पष्ट केलेले आहे, की हे (हक्का कबीर) आपण सत्‌कबीर (कून करतार) शब्दशक्तीद्वारे रचना करणारे, शब्दस्वरूपी प्रभु म्हणजेच सर्व सृष्टीचे रचनाकार आहात. आपणच वास्तविक निर्विकार (परवरदिगार), सर्वांचे पालनकर्ता, दयाळू प्रभु आहात. मी आपल्या दासांचाही दास आहे.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. २४, राग सीरी महला १)**

तेरा एक नाम तारे संसार, मैं ऐहो आस ऐहो आधार।
नानक नीच कहैं बिचार, धाणक रूप रहा करतार।।

**या अमृतवाणीमध्ये प्रमाणित केले आहे, की जे काशीमध्ये धाणक (विणकर) रूपात आहेत, तेच (करतार) कुळाचे सृजनहार (निर्माता) आहेत. अतिभावूक होऊन श्री नानकसाहेबजी म्हणत आहेत, की मी सत्य सांगत आहे, की धाणक (विणकर) म्हणजेच कबीर जुलाहाच (विणकरच) पूर्ण ब्रह्म (सत्पुरुष) आहेत.**

**विशेष :- या प्रमाणांच्या सांकेतिक ज्ञानावरून सृष्टिरचना कशी झाली, हे स्पष्ट होते. आता मात्र पूर्ण परमात्म्याची प्राप्ति केली पाहिजे आणि हे पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊनच शक्य आहे.**

## ''अन्य संतांद्वारे सृष्टिरचनेची दंतकथा''

**अन्य संतांनी जे सृष्टिरचनेचे ज्ञान सांगितले आहे ते कसे आहे, ते कृपया वाचा. सृष्टिरचनेच्या विषयाबाबत राधास्वामी पंथातील संतांचे व धन-धन सद्गुरू पंथाच्या संतांचे विचार :-**

**पवित्र पुस्तक जीवनचरित्र परम संत बाबा जयमल सिंहजी महाराज पान नं. १०२ व १०३ वरून 'सृष्टि की रचना' (सावन कृपाल पब्लिकेशन, दिल्ली)**

''पहले सत्पुरुष निराकार था, फिर इजहार (आकार) में आया तो ऊपर के तीन निर्मल मण्डल (सत्लोक-अलखलोक, अगमलोक) बन गया तथा प्रकाश तथा मंडलों का नाद (धुनि) बन गया।''

**पवित्र पुस्तक सारवचन (नसर) प्रकाशक :- राधास्वामी सत्संग सभा, दयालबाग, आगरा, 'सृष्टि की रचना' पृष्ठ ८ :-**

''प्रथम धूंधूकार था। उसमें पुरुष सुन्न समाध में थे। जब कुछ रचना नहीं हुई थी। फिर जब मौज हुई तब शब्द प्रकट हुआ और उससे सब रचना हुई, पहले सतलोक और फिर सतपुरुष की कला से तीन लोक और सबविस्तार हुआ।''

**हे ज्ञान तर असे आहे, की कोणी एक तरुण नोकरीच्या मुलाखतीसाठी गेला. त्याला अधिकाऱ्याने विचारले, की आपण महाभारत वाचले आहे का? तरुणाने उत्तर दिले, की ते तोंडपाठ आहे. अधिकारी म्हणाला, की पाच पांडवांची नावे सांग. तरुण म्हणाला, की एक भीम होता, एक त्याचा मोठा बंधू (भाऊ) होता, एक त्याचा छोटा भाऊ होता, आणखी एक होता आणि आणखी एकाचे नाव मी विसरलो आहे. या सृष्टिरचनेचे ज्ञान तर असेच आहे.**

**सत्पुरुष व सत्लोकाची महिमा सांगणारे व पाच नावे (ओंकार-ज्योति निरंजन-रंरकार-सोहं-सत्यनाम) प्रदान करणारे व तीन नावे (अकालमूर्ती-सत्पुरुष-शब्दस्वरूपी राम) देणाऱ्या संतांनी रचलेल्या पुस्तकांमधील काही निष्कर्ष :**

**संतमत प्रकाश भाग ३ पान ७६ वर लिहिलेले आहे, की सच्चखण्ड किंवा सत्नाम चौथा लोक (धाम) आहे. येथे सत्नामाला स्थान असे संबोधलेले आहे. नंतर या पवित्र पुस्तकाच्या पान नं. ७९ वर लिहिलेले आहे, की एक राम नावाचा दशरथाचा मुलगा, दुसरा राम मन, तिसरा राम ब्रह्म, चौथा राम सत्नाम आणि हाच खरा राम आहे. नंतर पवित्र पुस्तक 'संतमत प्रकाश'च्या पहिल्या भागातील पान नं.१७ वर लिहिलेले आहे, की ते सत्लोक आहे, त्यालाच सत्नाम म्हटले जाते. पवित्र पुस्तक 'सारवचन नसर यानि वार्तिक' च्या पान नं. तीनवर**

लिहिलेले आहे, की आता असे समजले पाहिजे, की राधा स्वामी पद सर्वांत वरचे (उंच/श्रेष्ठ) स्थान आहे, ज्याला संतांनी सत्लोक आणि सच्चखंड आणि सारशब्द आणि सत्शब्द आणि सत्नाम आणि सत्पुरुष म्हटले जाते. आग्रा येथून प्रकाशित पवित्र पुस्तक सार वचन (नसर) यात वार्तिक पान नं. तीनवर लिहिलेले आहे, की आता समजले पाहिजे, की राधा स्वामी पद सर्वांत उंच मुक्कामी आहे. त्याला संतांनी सत्लोक, सच्चखंड आणि सारशब्द, सत्शब्द आणि सत्नाम आणि सत्पुरुष असे सांगून प्रमाणित केले आहे. ''पवित्र पुस्तक सार वचन (नसर) आग्रा येथून प्रकाशित पान नं. चारवरही हे वर्णन जसेच्या तसे आहे. पवित्र पुस्तक 'सच्चखण्ड की सडक'च्या पान नं. २२६ वर वर्णन आहे, की संतांचा देश सच्चखण्ड किंवा सत्लोक आहे, त्यालाच सत्नाम, सत्शब्द, सारशब्द असे म्हटले जाते.''

विशेष :- या व्याख्या अशा वाटतात, की जसे कोणी जीवनामध्ये शहर पाहिलेले नाही, मोटार, पेट्रोल, ड्रायव्हरचे ज्ञान नाही, की ड्रायव्हर कोणाला म्हणतात आणि ती व्यक्ती अन्य सहकाऱ्यांना सांगत आहे, की मी शहरामध्ये जातो, मोटारीमध्ये बसून फिरण्याचा आनंद घेतो. यावर त्याच्या मित्रांनी त्याला विचारले, की मोटार कशी होती? पेट्रोल कसे होते आणि ड्रायव्हर कसा होता? शहर कसे होते? यावर त्याने उत्तर दिले, की शहर म्हणा नाही तर मोटार म्हणा, सगळ्या गोष्टी एकच. शहर हेच मोटार आहे आणि पेट्रोलसुद्धा मोटारच म्हणतात. ड्रायव्हरसुद्धा मोटारीलाच म्हणतात. रस्त्यालासुद्धा मोटारच म्हणतात.

आता विचार करा :- सत्पुरुष तर पूर्ण परमात्मा आहेत. सत्नाम हे दोन मंत्रांचे नाव आहे, ज्यामध्ये एक ओ३म + तत् सांकेतिक आहे आणि त्यानंतर सारनाम साधकाला पूर्ण गुरुंकडून दिले जाते. हे सत्नाम आणि सारनाम दोन्ही स्मरण करण्याची (जपाची) नावे आहेत. सत्लोक हे असे स्थान आहे, जेथे सत्पुरुष वास्तव्य करतात. पुण्यात्मांनो, आता तुम्ही स्वत:च नर्णय करा, की यातील सत्य काय आणि असत्य काय आहे?

❑❑❑

# ''भक्ति मर्यादा''

# ''नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक माहिती''

१. पूर्ण गुरूंची ओळख :-

आजच्या कलियुगात पूर्ण गुरू कोण, हे ओळखणे हा भक्त समाजापुढे एक कठीण प्रश्न आहे. परंतु याचे थोडक्यात आणि अत्यंत सोपे उत्तर आहे, की जे गुरू शास्त्रांच्या अनुसार भक्ती करतात व आपल्या अनुयायांकडून करवून घेतात, तेच पूर्ण संत आहेत. कारण कबीर साहेबांची वाणी, नानक साहेबांची वाणी, वेद, गीता, पुराण, कुर्आन, पवित्र बायबल आदी भक्तिमार्गाचे संविधान म्हणजेच पवित्र धार्मिक शास्त्रच आहेत. जो संत शास्त्रानुसार भक्तिसाधना सांगतो, त्यानुसारच भक्त समाजाला मार्गदर्शन करतो, तोच पूर्ण संत आहे आणि जो शास्त्रांविरुद्ध साधना करवून घेतो, तो भक्त समाजाचा घोर शत्रू आहे. तो या अनमोल मनुष्य जन्माशी वाईटरीत्या खेळत आहे. अशा गुरू किंवा संताला भगवानाच्या दरबारामध्ये घोर नरकात उलटे लटकवले जाईल.

उदाहरण द्यायचे झाले तर एखाद्या अध्यापकाचे देता येईल. जो अध्यापक विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमाच्या बाहेरचेच शिक्षण देत असेल, तर तो त्या विद्यार्थ्यांचा शत्रूच म्हणावा लागेल.

भगवत गीतेच्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,<br>मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः ।।

**अनुवाद :-** मायाद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य नीच दूषित कर्म करणारे मूर्ख माझी पूजा करत नाहीत म्हणजेच ते तीन गुणांची (रजोगुणी-ब्रह्मा, सत्गुणी-विष्णू, तमोगुणी-शिव) साधना करत बसतात. यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील १० वा श्लोक (संत रामपालदासद्वारे भाषा-भाष्य)

अन्यदेवा हुः सम्भवादन्यदाहुरसम्भवात्, इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ।।१०।।

**अनुवाद :** सामान्यतः परमात्म्याविषयी निराकार म्हणजेच कधीही न जन्म घेणारा (अजन्मा) म्हटले जाते. काही जण आकारामध्ये म्हणजेच जन्म घेऊन अवतार रूपामध्ये येणारा म्हणतात. जे नित्य म्हणजेच पूर्णज्ञानी चांगल्याप्रकारे सांगतात, तेच योग्यप्रकारे समरूप अर्थात यथार्थ रूपामध्ये भिन्न भिन्न रूपाने प्रत्यक्ष ज्ञान देतात.

गीतेच्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक

तत्, विद्धि, प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया, उपदेक्ष्यन्ति, ते, ज्ञानम्, ज्ञानिनः, तत्वदर्शिनः ।।

**अनुवाद :** त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान व त्यासंबंधीच्या प्रश्नांचे समाधान करू शकणाऱ्या संतांना नतमस्तक होऊन दंडवत घातल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि निष्कपटपणे सरलतापूर्वक प्रश्न केल्याने परमात्मतत्त्व पूर्णपणे जाणणारे ज्ञानी महात्मा तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील, हे तू पूर्णपणे समजून घे.

२. नशिल्या (उत्तेजक, उन्मादक) वस्तूंचे सेवन निषिद्ध :-

हुक्का, मद्य (दारू), बीअर, तंबाखू, बिडी, सिगारेट, गुटखा, अफू, गांजा, मांस, अंडी आदी नशिल्या वस्तूंचे सेवन तर दूरच, अशा नशिल्या उत्तेजक वस्तू कोणाला आणूनसुद्धा द्यायच्या नाहीत. बंदी छोड गरीबदासजी महाराज या सर्व अमली वस्तूंना अत्यंत वाईट असे

**सांगताना आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत की:-**

सुरापान मद्य मांसाहारी, गमन करै भोगैं पर नारी। सतर जन्म कटत है शीशं, साक्षी साहिब है जगदीशं।।
परद्वारा स्त्री का खोलै, सतर जन्म अंधा हावै डोलै। मदिरा पीवै कड़वा पानी, सत्तर जन्म श्वान के जानी।।
गरीब, हुक्का हरदम पिवते, लाल मिलावैं धूर। इसमें संशय है नहीं, जन्म पिछले सूर।।१।।
गरीब, सो नारी जारी करै, सुरा पान सौ बार। एक चिलम हुक्का भरै, डुबै काली धार।।२।।
गरीब, सूर गऊ कुं खात है, भक्ति बिहुनें राड। भांग तम्बाखू खा गए, सो चाबत है हाड।।३।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, सुरा पान सैं हेत। गौस्त मट्टी खाय कर, जंगली बनें प्रेत।।४।।
गरीब, पान तम्बाखू चाब हीं, नास नाक में देत। सो तो इरानै गए, ज्यूं भड़भूजे का रेत।।५।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, गोस्त गला कबाब। मोर मृग कूं भखत है, देगें कहां जवाब।।६।।

**३. तीर्थस्थानांना जाणे निषिद्ध :- कोणत्याही प्रकारचे व्रतवैकल्य करायचे नाही. कोणत्याही तीर्थयात्रेस जायचे नाही. गंगास्नान वगैरेसारखे कोणतेही स्नान करायचे नाही. कोणत्याही धार्मिक स्थळावर स्नानासाठी किंवा दर्शनासाठी जायचे नाही, कोणत्याही मंदिरामध्ये देव आहे असे समजून मंदिर व तीर्थस्थानी पूजा व भक्तीच्या भावाने जायचे नाही. पुजाऱ्यांनी मंदिरामध्ये बांधून ठेवावा असा देव कोणतेही जनावर नाही. तो तर कणाकणांत व्यापलेला आहे. या सर्व साधना शास्त्रांविरुद्ध आहेत.**

**जरा विचार करून पाहा, की ही सर्व तीर्थस्थळे (जगन्नाथ मंदिर, बद्रिनाथ, हरिद्वार, मक्का-मदिना, अमरनाथ, वैष्णोदेवी, वृंदावन, मथुरा, बरसाना, अयोध्येचे राम मंदिर, काशीधाम, छुडानीधाम आदी) मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च व इष्ट धाम आदी स्थळांवर एकेकाळी कोणी संत राहत होते? तेथे त्यांनी भक्तिसाधना केली, आपले भक्तिरूपी धन जमवले आणि शरीराचा त्याग करून आपल्या ईष्ट देवांच्या लोकी निघून गेले. त्यानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्या ठिकाणी कोणी मंदिर, कोणी मशीद, कोणी गुरुद्वार, कोणी चर्च, तर कोणी धर्मशाळा इत्यादींची रचना केली. भक्तिसाधना करणाऱ्यांची कायम स्मृती राहील आणि सर्वसामन्यांना जसे या महान आत्म्यांनी कर्म केलेले आहे, तसे आपणसुद्धा करायला हवे याचे प्रमाण मिळत राहील हाच त्यामागील उद्देश आहे. ही सर्वच धार्मिक स्थळे आपल्या सर्वांना हाच संदेश देतात, की जशी भक्तिसाधना या प्रसिद्ध संतांनी केलेली आहे, तशीच आपणही केली पाहिजे. त्यासाठी आपण अशाप्रकारे साधना करणाऱ्या व सांगणाऱ्या संतांचा शोध घ्या व नंतर ते जसे सांगतील तसेच आचरण करा. नंतर मात्र अशा स्थानांचीच सर्व जण पूजा करू लागले. हे पूर्णपणे व्यर्थ आणि शास्त्रांविरुद्ध आहे.**

**ही सर्व स्थाने तर अशा स्थानासारखी आहेत, जेथे एखाद्या हलवायाने भट्टी बनवून जिलेबी, लाडू, मिठाई आदी पदार्थ बनवून स्वतः, आपल्या नातेवाइकांना, मित्रांना खाऊ घातले आहेत आणि निघून गेला आहे. आता त्या स्थानावर हलवाईही नाही आणि मिठाईसुद्धा नाही. तेथे उरली आहे ती केवळ भट्टी. ती भट्टी आपणाला मिठाई बनवायला शिकवू शकत नाही, की मिठाईने आपले पोटही भरू शकत नाही. आता एखादा म्हणाला, की चला रे, मी तुम्हाला ती भट्टी दाखवून आणतो जेथे एका हलवायाने कधी काळी मिठाई बनवलेली होती. चला जाऊन येऊ या. तेथे जाऊन आपण भट्टी बघितली आणि सात प्रदक्षिणाही घातल्या. काय हो, आपल्याला मिठाई मिळाली का? आपल्याला मिठाई बनविण्याची प्रक्रिया सांगणारा हलवाई तेथे भेटला का? नाही. मग यासाठी आपणाला तसाच हलवाई शोधावा लागेल, जो अगोदर आपणाला मिठाई खाऊ घालेल आणि ती बनविण्याची प्रक्रियाही सांगेल. त्यानंतर मात्र तो हलवाई जे सांगेल, तेच करावे लागेल, अन्य नाही.**

**अगदी अशाचप्रकारे तीर्थस्थानी पूजा करत व्यर्थ वाऱ्या घालण्यापेक्षा जे शास्त्रानुसार पूर्ण परमात्मा कबीर साहेबांची भक्ती करतात व सांगतात, अशा संतांचा शोध घ्यावा. ते जसे सांगतील अगदी तसेच करावे. आपल्या मनाप्रमाणे काहीही करू नये.**

**'सामवेद' संख्या नं. १४०० उतार्चिक अध्याय नं. १२, खंड नं. ३, श्लोक नं. ५ (संत रामपाल दास द्वारे भाषा-भाष्य):-**

भद्रा वस्त्रा समन्या३वसानो महान् कविर्निवचनानि शंसन्।
आ वच्यस्व चम्बोः पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ।।५।।

**अनुवाद :- चतुर व्यक्तींनी आपल्या वचनाद्वारे पूर्ण परमात्म्यांच्या (पूर्ण ब्रह्म) पूजेचा सत्यमार्ग न बघता, अमृतस्थानी असलेली उपासना सोडून सामान्य उपासना (भूत-पिशाच्च, पूजा, श्राद्ध घालणे, तीन गुणांची पूजा (रजोगुणी-ब्रह्मा, सत्गुणी-विष्णू, तमोगुणी-शंकर), तसेच ब्रह्म-कालची पूजा, मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च, तीर्थस्थानी जाणे, उपवास आदी उपासना) करणे म्हणजेच जखमेतून किंवा फोडातून निघणाऱ्या पूसमान घाणीचे आदरयुक्त आचमन (ग्रहण) केल्यासारखेच असते. याच कारणास्तव परमसुखदायक पूर्ण ब्रह्म कबीर साहेब सशरीर साधारण वेशभूषेमध्ये ('वस्त्र' याचा अर्थ 'वेशभूषा' असा आहे. संतांच्या भाषेत याला 'चोला'सुद्धा (शरीर) म्हटले जाते. एखाद्या संताने शरीराचा त्याग केला, तर महात्मा चोला (शरीर) सोडून गेले, असे म्हटले जाते.) सत्लोकीच्या शरीरासारखे दुसरे कमी तेजःपुंज असणारे शरीर धारण करून सर्वसामान्य व्यक्तीसारखे जीवन जगून काही दिवस या संसारामध्ये राहून आपल्या शब्द-साखी यांच्या माध्यमातून इतरांना ज्ञात नसलेल्या सत्यज्ञानाचा उलगडा करतात आणि पूर्ण परमात्म्याचे लपलेले वास्तविक सत्यज्ञान आणि भक्ती जागृत करतात.**

**गीतेच्या १६ व्या अध्यायातील २३ वा श्लोक**

यः, शास्त्रविधिम्, उत्सृज्य, वर्तते, कामकारतः, न, सः,
सिध्दिम्, अवाप्नोति, न, सुखम्, न, पराम्, गतिम्।।

**अनुवाद :- जी व्यक्ती शास्त्रविधींचा त्याग करून आपल्या इच्छेने मन मानेल तसे अयोग्य आचरण करते, त्याला कोणतीही सिद्धी प्राप्त होत नाही, परमगती मिळत नाही किंवा सुखही प्राप्त होत नाही.**

**गीतेच्या ६ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

न, अति, अश्नतः, तु, योगः, अस्ति, न, च, एकान्तम्,
अनश्नतः, न, च, अति, स्वप्नशीलस्य, जाग्रतः, न, एव, च, अर्जुन।।

**अनुवाद :- हे अर्जुना! हा योग अर्थात भक्ती अतिशय खाणाऱ्यांना किंवा काहीच न खाणाऱ्यांना, तसेच एकाच जागी बसून साधना करणाऱ्याला तथा तसेच खूप झोपणाऱ्याला किंवा नेहमी जागे राहणाऱ्या व्यक्तींनाही सिद्ध होत नाही.**

पूजैं देई धाम को, शीश हलावै जो। गरीबदास साची कहै, हद काफिर है सो।।
कबीर, गंगा काठै घर करै, पीवै निर्मल नीर। मुक्ति नहीं हरि नाम बिन, सत्गुरु कहैं कबीर।।
कबीर, तीर्थ कर-कर जग मूवा, उडै पानी न्हाय। राम ही नाम ना जपा, काल घसीटे जाय।।
गरीब, पीतल ही का थाल है, पीतल का लोटा। जड़ भूरत को पूजतें, आवैगा टोटा।।
गरीब, पीतल चमचा पूजिये, जो थाल परोसै। जड़ मूरत किस काम की, मति रहो भरोसै।।
कबीर, पर्वत पर्वत मैं फिर्या, कारण अपने राम। राम सरीखे जन मिले, जिन सारे सब काम।।

**४. पितरांची पूजा, श्राद्ध निषेध : कोणत्याही प्रकारची पितरपूजा, श्राद्ध घालणे असे कोणतेही विधी करायचे नाहीत. भगवान श्रीकृष्ण जींनीसुद्धा पितरांची व भूत-पिशाच्चांची पूजा करण्यास स्पष्टपणे मनाई केलेली आहे. गीतेच्या ९ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की :-**

यान्ति, देवव्रताः, देवान्, पितृऋन्, यान्ति, पितृव्रताः।
भूतानि, यान्ति, भूतेज्याः, मद्याजिनः, अपि, माम्।

**अनुवाद :- देवी-देवतांची पूजा करणारे देवी-देवतांना प्राप्त होतात, पितरांची पूजा करणारे पितरांना प्राप्त होतात, भूत-पिशाच्चांची पूजा करणारे भूत-पिशाच्चांना प्राप्त होतात आणि माझ्या मतानुसार माझी पूजा करणारे भक्त मलाच प्राप्त होतात.**

**बंदी छोड गरीबदासजी महाराज आणि कबीर साहेबजी महाराज सुद्धा म्हणतात, की :-**

''गरीब, भूत रमै सो भूत है, देव रमै सो देव।
राम रमै सो राम है, सुनो सकल सुर भेव।।''

**यासाठी त्याच (पूर्ण परमात्मा) परमेश्वराची भक्ती करा, ज्याच्याकडून पूर्ण मुक्ती मिळते. तो परमात्मा म्हणजे पूर्ण ब्रह्म सत्पुरुष (सत् कबीर) आहेत. याचे प्रमाण गीतेच्या १८ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये आहे. ।।६३।।**

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानवः ।।४६।।

**अनुवाद :- ज्या परमेश्वरापासून संपूर्ण प्राण्यांची उत्पत्ती झालेली आहे आणि समस्त विश्व ज्याने व्यापलेले आहे, त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांद्वारे पूजा करून मनुष्यास परमसिद्धी प्राप्त होते.**

**गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक**

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।६२।।

**अनुवाद :- हे भरतवंशोद्भव अर्जुना! तू सर्वस्व भावाने त्या ईश्वराला शरण जा. त्यांच्या कृपेने तुला परमशांती, (संसारापेक्षा सर्वथा वेगळी) आणि अविनाशी परमपद प्राप्त होईल.**

**सर्वस्व भावाचे तात्पर्य असे आहे, की कोणतीही अन्य पूजा न करता मन-कर्म-वचन यांनी एका ईश्वरावर श्रद्धा ठेवणे.**

**गीतेच्या ८ व्या अध्यायातील २२ वा श्लोक**

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यान्तः स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ।। २२।।

**अनुवाद :- हे पृथानंदन अर्जुना! सर्व प्राणी ज्याच्या अंतर्गत आहेत आणि ज्याने हा संपूर्ण संसार व्यापलेला आहे, तो परमपुरुष परमात्मा तर अनन्यभावे भक्ती केल्यानेच प्राप्त होणे संभव आहे.**

**अनन्यभावे भक्ती याचे तात्पर्य असे आहे, की एका परमेश्वराची (पूर्ण ब्रह्म) भक्ती करणे. दुसऱ्या देवी-देवता म्हणजेच त्रिगुणांची (रजोगुणी-ब्रह्मा, सतगुणी-विष्णू, तमोगुणी-शिव) भक्ती करू नये. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील १ ते ४ श्लोक :-**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १ ला श्लोक**

उर्ध्वमूलम्, अध:शाखम्, अश्वत्थम्, प्राहु:, अव्ययम्,
छन्दांसि, यस्य, पर्णानि, य:, तम्, वेद, स:, वेदवित्।।

**अनुवाद :- वरील बाजूला मूळ आणि खालील बाजूला फांद्या असलेला अविनाशी जो विस्तृत संसार रुपी पिंपळाचे वृक्ष आहे, जो घोड्यासारखा मजबूत असून ज्याचे छोटे-छोटे भाग म्हणजेच शाखा (फांद्या) व पाने असे विभाग म्हटले आहे, त्या संसाररूपी वृक्षाला जो अशाप्रकारे जाणतो, तो भक्त पूर्ण ज्ञानी आहे.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील २ रा श्लोक**

अध:, च, उर्ध्वम्, प्रसृता:, तस्य, शाखा:, गुणप्रवृध्दा:, विषयप्रवाला:,
अध:, च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके।।

**अनुवाद :- त्या वृक्षाची खाली आणि वर त्रिगुणरूपी (ब्रह्मा-रजोगुण, विष्णू-सत्गुण, शिव-तमोगुण) विस्तारलेल्या विकार-काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी कोवळ्या फांद्या आहेत, ब्रह्मा, विष्णू, शिव जीवांना कर्मामध्ये बांधणारी ही मुळे अर्थात मूळ कारण आहेत. तसेच मनुष्यलोक, स्वर्ग, नरक हे तिन्ही लोक पृथ्वी लोकात खाली (८४ लक्ष योनींमध्ये) आणि वर स्थित केलेले आहेत.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक**

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्त:, न, च, आदि:, न, च,
सम्प्रतिष्ठा, अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा।।

**अनुवाद :- (अस्य) या रचनेची (न) नाही (आदि) सुरवात (च) आणि (न) नाही (अन्त:) शेवट आहे (न) नाही (तथा) तसे (रूपम) स्वरूप (उपलभ्यते) प्राप्त होते (च) आणि (इह) येथे विचार कालद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीताज्ञानाची पूर्ण माहिती (ज्ञान) मलाही (न) नाही. (सम्प्रतिष्ठा) कारण सर्व ब्रह्मांडांची रचना चांगल्या/योग्यप्रकारे स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. (एतम्) या (सुविरुढमलूम्) चांगल्याप्रकारे स्थायी/नित्य स्थिती असणारा (अश्वत्थम्) मजबूत स्वरूपाचा (असंड्गशस्त्रेण) पूर्ण ज्ञानरूपी (दृढेन) दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून (छित्वा) छाटून/कापून म्हणजेच निरंजनाच्या भक्तीला क्षणिक अर्थात क्षणभंगूर जाणून ब्रह्मा, विष्णू, शिव, ब्रह्म आणि परब्रह्मच्या पुढे/वरील पूर्ण ब्रह्मचा शोध घेतला पाहिजे.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक**

तत: पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूय:।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यत: प्रतृत्ति प्रसृता पुराणी।।४।।

**अनुवाद :- त्यानंतर त्या परमपद परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे. ज्यांना प्राप्त झालेले मानव परत या नाशवान संसारामध्ये येत नाहीत आणि ज्यांच्यापासून अनादिकाळापासून चालत आलेली ही सृष्टी विस्तारलेली आहे, त्या आदिपुरुष परमात्म्यालाच मी शरण आहे.**

**अशाप्रकारेच स्वत: भगवान श्रीकृष्णाने देवी-देवतांचा राजा इंद्र याच्या पूजेचासुद्धा त्याग करून त्या परमात्म्याची भक्ती करण्याचीच प्रेरणा दिलेली होती, ज्यामुळे त्यांनी गोवर्धन पर्वत उचलून इंद्राच्या कोपापासून व्रजवासीयांचे (गोकुळ) रक्षण केले.**

गरीब, इन्द्र चढ़ा ब्रज डुबोवन, भीगा भीत न लेव।
इन्द्र कढाई होत जगत में, पूजा खा गए देव।।
कबीर, इस संसार को, समझाऊँ कै बार।
पूँछ जो पकड़ै भेढ की, उतरा चाहै पार।।

**५. गुरुआज्ञेचे पालन :– गुरुदेवजींच्या आज्ञेशिवाय घरामध्ये कोणत्याही प्रकारचे धार्मिक अनुष्ठान करू नये. याबाबत बंदी छोड आपल्या वाणीमध्ये म्हणतात, की :–**

''गुरु बिन यज्ञ हवन जो करही, मिथ्या जावे कबहु नहीं फलहीं।''
कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।
गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुराण।।

**६. समाधी पूजन निषिद्ध :– आपल्या शेतामधील समाधी किंवा कोणत्याही खेड्यामधील एखाद्या स्थानांवरील समाधी अथवा अन्य देवतांच्या समाधीची पूजा करू नये. समाधी कोणाचीही असो, अजिबात तिची पूजा करायची नाही. इतर कोणत्याही उपासना करू नये. त्रिगुणांचीदेखील (ब्रह्मा, विष्णू, महेश) पूजा करायची नाही. केवळ सद्गुरुजींनी सांगितल्याप्रमाणेच आचरण करायचे आहे.**

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक**

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,
मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः।।

**अनुवाद :– मायेद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य, नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख, माझी पूजा करत नाहीत. ते तिन्ही गुणांचीच (रजोगुण–ब्रह्मा, सत्गुण–विष्णू, तमोगुण–शिव) साधना करत बसतात.**

कबीर, माई मसानी शेढ शीतला, भैरव भूत हनुमंत।
परमात्मा उनसे दूर है, जो इनको पूजंत।।
कबीर, सौ वर्ष तो गुरु की सेवा, एक दिन आन उपासी।
वो अपराधी आत्मा, परै काल की फांसी।।
गुरु को तजै भजै जो आना। ता पसुवा को फोकट ज्ञाना।।

**७. कबीरसाहेब संकटमोचन आहेत :– कर्मभोगाचा त्रास झाल्यास, संकट आल्यानंतर कोणत्याही अन्य इष्ट देवतांची किंवा समाधींची पूजा कधीच करायची नाही. कोणत्याही प्रकारचे अन्य वाचन, पारायणे, व्रत करायचे नाही आणि कोणत्याही मांत्रिकास दाखवायचे नाही. केवळ बंदी छोड कबीरसाहेबांची पूजा करायची आहे, जे सर्व दुःखहरण करणारे संकटमोचन आहेत.**

**'सामवेद' संख्या नं. ८२२ उतार्चिक अध्याय ३ खंड नं. ५, श्लोक नं. ८,(संत रामपालदासद्वारा भाषा–भाष्य)**

मनीषिभिः पवते पूर्व्यः कविर्नृभिर्यतः परि कोशां असिष्यदत्।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्याय वर्धयन्।। ८।।

**अनुवाद :– सनातन अर्थात अविनाशी कबीर परमेश्वर हृदयापासून इच्छिणाऱ्या, श्रद्धेने भक्ती करणाऱ्या भक्तात्म्यास तीन मंत्रांचा उपदेश देऊन पवित्र करतात आणि जन्म–मृत्यूपासून सुटका करतात, तसेच त्याचे प्राण म्हणजेच जीवन श्वासांना संस्कारवश रूपाने वाढवितात. त्या रूपाने परमेश्वरा पासून मिळणारा वास्तविक आनंद आपल्या आशीर्वाद प्रसादाने प्राप्त करतात.**

कबीर, देवी देव ठाढे भये, हमको ठौर बताओ।
जो मुझ (कबीर) को पुजैं नहीं, उनको लूटो खाओ।
कबीर, काल जो पीसैं पीसना, जोरा है पनिहार।
ये दो असल मजूर हैं, सतगुरु के दरबार।

**८. अनावश्यक दान निषेध :- कोठेही आणि कोणालाही दान रूपामध्ये काहीही द्यायचे नाही. पैसे, कपडे असे काहीही द्यायचे नाही. जर कोणी दान रूपामध्ये काही मागत असेल, तर त्याला भोजन (अन्नदान) खाऊ घालावे. चहा, दूध, लस्सी, पाणी प्यायला द्या, परंतु वस्तुरूपात काहीही द्यायचे नाही. कदाचित तो भिक्षुक त्या पैशांचा दुरुपयोगही करेल. एखाद्या व्यक्तीकडे भिकाऱ्याने त्याची लहान बाळे उपचाराविना तडफडत आहेत, असे खोटे सांगून काही पैसे मागितले आणि भिकाऱ्याची कथा ऐकून भावनावश होऊन त्या व्यक्तीने भिकाऱ्याला शंभर रुपये दिले. तो भिकारी पूर्वी बाटलीचा पाव भाग दारू पीत होता आणि पैसे मिळाल्यावर त्या दिवशी अर्धी बाटली दारू प्यायला आणि त्याने आपल्या पत्नीला मारहाण केली. त्याच्या पत्नीने बाळासह आत्महत्या केली. येथे तुम्ही केलेले दान त्या परिवाराच्या विनाशाचे कारण बनले. जर अशा एखाद्या दु:खी व्यक्तीला मदत करण्याची तुमची इच्छा असेल, तर त्याच्या बाळाला डॉक्टरांकडे नेऊन औषधे द्या; पण पैसे कधीही देऊ नका.**

कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।।
गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुरान।।

**९. उष्टे खाणे निषिद्ध :- ज्या व्यक्ती मद्य, मांस, तंबाखू, अंडे, बीअर, अफीम, गांजा आदींचे सेवन करतात, त्यांचे उष्टे अन्न कधीही खाऊ नये.**

**१०. देहांतानंतरचे (सत्यलोक गमन) क्रियाकर्म निषिद्ध :- जर परिवारातील कोणाचा मृत्यू झाला तर त्यास अग्नि कोणीही देवु शकतो, अग्नि देते वेळेस मंगलाचरण केले पाहिजे. तेथे फुले वगैरे काही उचलाचे नाही. जर ती जागा साफ' करणे गरजेचे असेल तर आपण स्वत: उचलुन वाहत्या पाण्यामधे टाकु शकता. त्यावेळेस मंगलाचरण करावे. पिंडदान, तेरावा, सहामाही, वर्षश्राध्द असे काहीही करु नये. सर्व नातेवाइक व भाउबंधांसाठी दुख: व्यक़्त करण्यासाठी एक दिवस निवडावा. त्या दिवशी दररोज करण्याचा नित्यनियम लावावा. मृत्यु झालेल्या व्यक़्तिच्या नावाने काही दान धर्म करायचा असेल तर गुरुजींची आज्ञा घेउन बंदी छोड गरीबदास महाराजांचा अमृत'यी वाणीचा अख़ंड पाठ करावा. जर पाठ करण्याची आज्ञा न मिळाल्यास घरामध्ये चार किंवा सात दिवसाची अखंड देशी तुपामध्ये ज्योत लावावी. दिवसातुन ४ वेळ प्रथम मंत्र जप करावा व त्यातील ३ किंवा १ मंत्राचा दान संकल्प करावा. जसे योग्य समजाल तसे १ ते ३ दिवस मंत्र जाप करावा व मंत्र दान संकल्प करावा दररोज हे लक्षात ठेवुन ज्योती, आरती व मंत्र करावा.**

कबीर, साथी हमारे चले गए, हम भी चालन हार।
कोए कागज में बाकी रह रही, ताते लाग रही वार।।
कबीर, देह पडी तो क्या हुआ, झूठा सभी पटीट।
पक्षी उड्या आकाश कूं, चलता कर गया बीट।।

## ‘‘कर्म काण्डा विषयी सत्य कथा‘‘

माझे (संत रामपाल दास यांचे) पूज्य गुरुदेव स्वामी रामदेवानंदजी महाराज यांना सोळाव्या वर्षी एका महात्म्याचा सत्संग ऐकून वैराग्य प्राप्त झाले. एक दिवस ते शेतामध्ये गेले होते. जवळच एक जंगल होते. त्या जंगलामध्ये जाऊन त्यांनी एका मृत जनावराच्या हाडांजवळ आपले कपडे फाडून फेकले आणि ते महात्माजींसोबत निघून गेले.

घरातील व्यक्तींनी जेव्हा त्यांचा शोध घेतला, तेव्हा त्यांना जंगलामध्ये हाडांजवळ त्यांचे फाटलेले कपडे दिसले. घरच्यांना वाटले, की एखाद्या जंगली प्राण्याने त्यांना खाल्ले असावे. त्यांनी ती कपडे आणि हाडे उचलून घरी आणली आणि अंतिम संस्कार केले. त्यानंतर दहावा, तेरावा, वर्षश्राद्ध घालण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी श्राद्ध घालणे सुरूच झाले.

जेव्हा माझे पूज्य गुरुदेव अत्यंत वृद्ध झाले, तेव्हा एकदा त्यांच्या स्वत:च्या घरी गेले. त्यावेळी त्यांच्या घरच्यांना समजले, की ते जिवंत आहेत आणि घर सोडून निघून गेलेले होते. घरच्यांनी सांगितले, की जेव्हा तुम्ही घर सोडून गेला, तेव्हा तुमचा फार शोध घेण्यात आला. शेवटी जंगलामध्ये तुमचे कपडे मिळाले. त्या कपड्यांजवळ काही हाडेही पडलेली दिसली, तेव्हा आम्हाला वाटले, की एखाद्या हिंस्र प्राण्याने तुम्हाला खाऊन टाकले असेल. आम्ही ते कपडे आणि हाडे घरी आणून अंतिम संस्कार केला.

नंतर मी (संत रामपाल दास) माझ्या पूज्य गुरुदेवांच्या लहान बंधूंच्या पत्नीला विचारले, की जेव्हा आमचे पूज्य गुरुदेव घर सोडून निघून गेले, त्यानंतर तुम्ही त्यांच्या माघारी काय केले? तिने सांगितले, की जेव्हा विवाह होऊन मी या घरी आले, तेव्हा त्यांचे श्राद्ध घातले होते. त्यानंतर मी माझ्या स्वत:च्या हातांनी त्यांचे सुमारे सत्तर वेळा श्राद्ध घातले आहे. तिने पुढे सांगितले, की जेव्हा घरामध्ये एखादे नुकसान व्हायचे, म्हणजे म्हशीने दूध न देणे, म्हशीचे सड खराब होणे किंवा अन्य काही तरी नुकसान, त्यावेळी आम्ही एखाद्या शहाण्या मांत्रिकाकडे जायचो. तो म्हणायचा, की तुमच्या घरी कोणाचा तरी निःसंतान, लग्न न होता मृत्यू झालेला आहे. तेच तुम्हाला दु:खी करत आहे. त्यावेळी आम्ही त्या मांत्रिकाला वस्त्रे, धन इत्यादी द्यायचो.

यावर मी (रामपाल दास) म्हणालो, की हे तर जगाचा उद्धार करत आहेत. हे कुठे कोणाला काय दु:ख देत होते? ते तर आता सुखदाता आहेत. आता तर ते आपल्यासमोरच आहेत. आता तर श्राद्ध घालणे इत्यादी व्यर्थ साधना बंद करा. तेव्हा त्या म्हणाल्या, की ही तर आमची जुनी परंपरा आहे. हे कसे काय सोडू? याचा अर्थ असा, की ‘‘आपण आपल्या जुन्या रीती–परंपरांमध्ये इतके लीन झालेलो आहोत’’ की प्रत्यक्ष प्रमाण असूनही त्या अयोग्य परंपरा आपण सोडू शकत नाही. यावरून हे सिद्ध होते, की श्राद्ध घालणे, पितरपूजा करणे इत्यादी सर्व व्यर्थ आहे.

११. आपत्य जन्मानंतर शास्त्राविरुद्ध पूजा निषिद्ध :– घरामध्ये बाळाचा जन्म झाल्यानंतर पाचवी, सहावी म्हणजेच त्या त्या दिवशी जो विधी केला जातो, तो करू नये. सुतक पाळून दररोजची पूजा, भक्ती, आरती, गावरान तुपाचा दीवा प्रज्वलन करणे इत्यादी बंद करू नये. ते नेहमीप्रमाणे चालू ठेवावे.

या संदर्भात एक संक्षिप्त कथा सांगतो–एका व्यक्तीला लग्नानंतर दहा वर्षांनी पुत्र झाला. पुत्रजन्माचा त्याने मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा केला. आजूबाजूच्या वीस–पंचवीस गावांना भोजनासाठी आमंत्रण दिले गेले. गाणे–बजावणे झाले. अर्थात, त्याने भरपूर पैसा खर्च

**केला. त्यानंतर वर्षभरातच त्याच्या मुलाचा मृत्यू झाला. त्यामुळे ते कुटुंब डोके आपटून घेत रडत बसले आहे आणि आपल्या दुर्भाग्याला दोष देत आहे. म्हणूनच कबीरसाहेब आपणाला सांगतात, की–**

कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल। आना जाना लग रहा, ज्यों कीडी का नाल।।
कबीर, पतझड़ आवत देख कर, बन रोवै मन माहिं। ऊंची डाली पात थे, अब पीले हो हो जाहिं।।
कबीर, पात झडतां यूं कहै, सुन भई तरुवर राय। अब के बिछुडे नहीं मिला, न जाने कहां गिरेंगे जाय।।
कबीर, तरूवर कहता पात से, सुनों पात एक बात। यहाँ की याहे रीति है, एक आवत एक जात।।

**१२. धार्मिकस्थळी जावळ काढणे निषिद्ध :– लहान बालकांचे कोणत्याही धार्मिकस्थळी जाऊन जावळ काढू नये. जेव्हा जेव्हा केस वाढतील, तेव्हा ते कापा आणि फेकून द्या. एका मंदिरामध्ये एक प्रसंग पाहिला– श्रद्धाळू भक्त आपल्या मुलाचे किंवा मुलीचे जावळ काढण्यासाठी आले. तेथे हजर असलेल्या न्हाव्याने बाहेरच्यापेक्षा तिप्पट दराने केस कापले आणि त्या माता–पित्यांना दिले. त्यांनी श्रद्धेने ते मंदिरामध्ये अर्पण केले. पुजाऱ्याने ते केस एका पिशवीमध्ये टाकून ठेवले आणि रात्री दूर एकांतस्थानी फेकून दिले. ही केवळ नाटकबाजी आहे. मग जाऊळ काढण्यापेक्षा नेहमीप्रमाणे केस कापून स्वत: बाहेर का फेकून देऊ नयेत? परमात्मा नामजपाने प्रसन्न होतो, पाखंडीपणाने नाही.**

**१३. नामजपाने सुखप्राप्ती :– नामोपदेश केवळ दु:खनिवारणाच्या दृष्टिकोनातून घेऊ नये, तर ते आत्मकल्याणासाठी घ्यावे. त्यानंतर नामजपाच्या प्रभावाने एकेक करत सर्व सुख आपोआपच प्राप्त होते.**

कबीर,सुमिरण से सुख होत है, सुमिरण से दु:ख जाए।
कहैं कबीर सुमिरण किए, सांई माहिं समाय।।

**१४. व्यभिचार निषिद्ध :– परस्त्रीकडे माता–कन्या–बहीण या दृष्टीने पाहावे. व्यभिचार महापाप आहे. जसे,**

''गरीब, पर द्वारा स्त्री का खोलै। सत्तर जन्म अन्धा हो डोलै।।''
सुरापान मद्य मांसाहारी। गवन करें भोगैं पर नारी।।
सत्तर जन्म कटत हैं शीशं। साक्षी साहिब है जगदीशं।।
पर नारी ना परसियों, मानो वचन हमार।भवन चर्तुदश तास सिर, त्रिलोकी का भार।।
पर नारी ना परसियो, सुनो शब्द सलतंत।धर्मराय के खंभ से, अर्धमुखी लटकंत।।

**१५. निंदा करणे व ऐकणे निषिद्ध :– चुकूनही आपल्या गुरूंची निंदा करू नये व ऐकू नये. ऐकू नये म्हणजे जर कोणी आपल्या गुरूंविषयी मिथ्या, अयोग्य गोष्टी सांगत असतील तर आपण त्यांच्याबरोबर भांडायचे नाही किंवा मारामारी करायची नाही, तर ते कसलाही विचार न करता बोलत आहेत, खोटे (अयोग्य) बोलत आहेत, असे समजायचे.**

'गुरु की निंदा सुनै जो काना। ताको निश्चय नरक निदाना।।
अपने मुख निंदा जो करहीं। शुकर श्वान गर्भ में परहीं।।'

**भले समोरची व्यक्ती कितीही सामान्य असू दे, तुम्ही निंदा तर कोणाचीच करायची नाही आणि ऐकायची देखील नाही. याबाबत कबीरसाहेब म्हणतात, की :–**

''तिनका कबहू न निन्दीये, जो पांव तले हो।
कबहु उठ आखिन पड़े, पीर घनेरी हो।।''

**१६. सद्गुरू दर्शनाची महिमा :– वेळ मिळेल तेव्हा सत्संग ऐकायला जायचा प्रयत्न केला पाहिजे. गुरूंचे मार्गदर्शन व सत्संग या दोन गोष्टी भक्तांच्या दृष्टीने जणू पर्वणीच आहेत. सत्संगामध्ये नखरे (मान, प्रतिष्ठा, बढाई, दिखाऊगिरी) करण्यासाठी येऊ नये. स्वत:ला एक आजारी रोगी समजून यावे. आजारी व्यक्ती कितीही श्रीमंत असो, उच्च पदवीधर असो, जेव्हा रुग्णालयात जाते, तेव्हा त्या व्यक्तीचा उद्देश केवळ रोगमुक्त होणे हाच असतो. जेथे डॉक्टर बसायला सांगतील, तेथे ती व्यक्ती बसते, झोपायला सांगितल्यावर झोपते, उठायला सांगितले की उठते, बाहेर जायला सांगितले, तर बाहेर जाते. बाहेर गेल्यानंतर लगेच आत यायला सांगितले, तर ती व्यक्ती लगेच आत येते. आगदी याच भावाने तुम्ही जर सत्संगाला येत असाल, तरच त्याचा लाभ प्राप्त होईल, अन्यथा आपले तेथे जाणे पूर्ण निष्फळ ठरेल. सत्संगामध्ये जेथे बसण्यास मिळेल तेथे बसावे, खायला–प्यायला जे अन्नपाणी मिळेल, ते परमात्मा कबीर साहेबजींच्या कृपेचा प्रसाद समजून प्रसन्न चित्ताने सेवन करावे.**

कबीर, संत मिलन कूं चालिए, तज माया अभिमान।
जो जो कदम आगे रखे, वो ही यज्ञ समान।।
कबीर, संत मिलन कूं जाईए, दिन में कई–कई बार।
आसोज के मेह ज्यों, घना करे उपकार।।
कबीर, दर्शन साधु का, परमात्मा आवै याद।
लेखे में वोहे घड़ी, बाकी के दिन बाद।।
कबीर, दर्शन साधु का, मुख पर बसै सुहाग।
दर्श उन्हीं को होत हैं, जिनके पूर्ण भाग।।

**१७. गुरुमहिमा :– जर एकाद्या ठिकाणी पाठ किंवा सत्संग सुरू असेल अथवा तुम्ही गुरूंच्या दर्शनासाठी गेला असाल, तर सर्वप्रथम गुरुजींना साष्टांग दंडवत (आठ अंगांनी, पूर्ण अधोमुखी झोपून) घालावा. त्यानंतर संत ग्रंथसाहेब व प्रतिमा जशा की कबीर साहेबांची प्रतिमा, गरीबदासजी महाराजांची, स्वामी रामदेवानंदजी व गुरुजी (रामपालजी) यांच्या प्रतिमांना (मूर्ती) दंडवत घालावा, ज्यामुळे आपल्या मनात त्या प्रकारचे भावनिर्माण होतील. मूर्तिपूजा करायची नाही. केवळ प्रणाम करणे हा प्रकार कोणत्याही पूजेत मोडत नाही, तर तो भक्तांच्या मनात श्रद्धा दृढ करण्यासाठी सहयोगी ठरतो. पूजा तर केवळ जे मुक्ती देणार आहेत, त्या गुरू व नाममंत्राची करायची आहे.**

कबीर,गुरु गोविन्द दोऊ खड़े,काके लागुं पाय।
बलिहारी गुरु आपने, जिन गोविन्द दियो मिलाय।।
कबीर, गुरु बडें है गोविन्द से, मन में देख विचार।
हरि सुमरे सो रह गए, गुरु भजे होय पार।।
कबीर, हरि के रुठतां, गुरु की शरण में जाय।
कबीर गुरु जै रुठजां, हरि नहीं होत सहाय।।
कबीर, सात समुन्द्र की मसि करुं, लेखनि करुं बनिराय।
धरती का कागज करुं, तो गुरु गुन लिखा न जाय।।'

**१८. मांसभक्षण निषिद्ध :– अंडी व मांस भक्षण आणि जीव हिंसा करायची नाही. ते महापाप आहे. याबाबत कबीरसाहेबजी महाराज व गरीबदासजी महाराज यांनी सांगितले आहे:–**

कबीर, जीव हने हिंसा करे, प्रकट पाप सिर होय।

निगम पुनि ऐसे पाप तें, भिस्त गया नहिं कोय।।१।।
कबीर, तिलभर मछली खायके, कोटि गऊ दे दान।
काशी करौंत ले मरे, तो भी नरक निदान।।२।।
कबीर, बकरी पाती खात है, ताकी काढी खाल।
जो बकरी को खात है, तिनका कौन हवाल।।३।।
कबीर, गला काटि कलमा भरे, कीया कहै हलाल।
साहब लेखा मांगसी, तब होसी कौन हवाल।।४।।
कबीर, दिनको रोजा रहत हैं, रात हनत हैं गाय।
यह खून वह वंदगी, कहुं क्यों खुशी खुदाय।।५।।
कबीर, कबिरा तेई पीर हैं, जो जानै पर पीर।
जो पर पीर न जानि है, सो काफिर बेपीर।।६।।
कबीर, खूब खाना है खीचडी, मांही परी टुक लौन।।
मांस पराया खायकै, गला कटावै कौन।।७।।
कबीर, मुसलमान मारैं करदसो, हिंदू मारैं तरवार।
कहै कबीर दोनूं मिलि, जैहैं यमके द्वार।।८।।
कबीर, मांस अहारी मानव, प्रत्यक्ष राक्षस जानि।
ताकी संगति मति करै, होइ भक्ति में हानि।।९।।
कबीर, मांस खाय ते ढेड सब, मद पीवैं सो नीच।
कुलकी दुरमति पर हरै, राम कहै सो ऊँच।।१०।।
कबीर, मांस मछलिया खात है, सुरापान से हेत।
ते नर नरकै जाहिंगे, माता पिता समेत।।११।।
गरीब, जीव हिंसा जो करते हैं, या आगे क्या पाप।
कंटक जुनी जिहान में, सिंह भेड़िया और सांप।।
झोटे बकरे मुरगे ताई। लेखा सब ही लेत गुसाई।।
मृग मोर मारे महमंता। अचरा चर है जीव अनंता।।
जिह्वा स्वाद हिते प्राना। नीमा नाश गया हम जाना।
तीतर लवा बुटेरी चिडिया। खूनी मारे बडे अगड़िया।।
अदले बदले लेखे लेखा। समझ देख सुन ज्ञान विवेका।।
गरीब, शब्द हमारा मानियो, और सुनते हो नर नारि।
जीव दया बिन कुफर है, चले जमाना हारि।।

**अजाणतेपणाने हिंसा घडली, तर त्याचे पाप लागत नाही. याबाबत बंदी छोड कबीरसाहेब म्हणतात, की :–**

''इच्छा कर मारै नहीं, बिन इच्छा मर जाए।
कहैं कबीर तास का, पाप नहीं लगाए।।''

**१९. गुरुद्रोह्यांचा संपर्क निषिद्ध :– जर एखाद्या भक्ताने सद्गुरुजींशी द्रोह (गुरुजींशी विमुख होणे) केला, तर तो महापापाचा भागीदार बनतो. जर एखाद्याला तो मार्ग चांगला वाटला नाही, तर तो आपला गुरू बदलू शकतो, पण जर तो पूर्व गुरूंशी वैर धरत असेल किंवा निंदा करत असेल तर तो गुरुद्रोही म्हटला जातो. अशा व्यक्तीशी भक्तीची चर्चा करण्यात जो उपदेशी असेल त्याला दोष लागतो. त्याची भक्ती समाप्त होते.**

गरीब, गुरु द्रोही की पैड़ पर,जे पग आवै बीर।
चौरासी निश्चय पड़ै, सतगुरु कहैं कबीर।।
कबीर, जान बुझ साची तजै, करै झूठे से नेह।
जाकी संगत हे प्रभु, स्वपन में भी ना देह।।

**अर्थात गुरुद्रोहीजवळ जाणारा भक्तिहीन होऊन नरकात जातो व ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामध्ये अडकतो.**

**२०. जुगार,मटका निषिद्ध :- जुगार, पत्ते, मटका हे कधीही खेळू नये. याबाबत कबीरसाहेबजी म्हणतात, की :-**

'कबीर, मांस भखै और मद पिये, धन वेश्या सों खाय। जूआ खेलि चोरी करै, अंत समूला जाय।।'

**२१. नाचगाणे निषिद्ध :- कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी नाचणे व अश्लील गाणी गाणे आदी भक्तिभावाच्या विरुद्ध आहे. एकदा एक विधवा आनंदाच्या प्रसंगी आपल्या नातेवाइकांच्या घरी गेली होती. सर्व जण आनंदाने नाचत होते, गाणी म्हणत होते, परंतु ती भगिनी मात्र एका बाजूला बसून प्रभु चिंतनात व्यग्र झाली होती. तिचे नातेवाईक तिला विचारू लागले, की तुम्ही असे निराश होऊन का बसला आहात? तुम्हीसुद्धा आमच्याबरोबर नाचा, गाणी म्हणा व आनंद साजरा करा. ती भगिनी म्हणाली, की या विधवेला एकच पुत्र होता आणि आता तोही देवाघरी गेला. आता कसला आनंद उरलाय माझ्यासाठी? अगदी अशीच स्थिती या कालच्या मृत्युलोकामध्ये प्रत्येक व्यक्तीची आहे. गुरुनानक देवजी आपल्या वाणीमध्ये म्हणतात, की :-**

ना जाने काल की कर डारै, किस विधि ढल पासा वे।
जिन्हादे सिर ते मौत खुड़ादी, उन्हानूं केडा हांसा वे।।
साध मिलें साडी शादी(खुशी) होंदी, बिछड दां दिल गिरि(दुःख) वे।
अखदे नानक सुनो जिहाना, मुश्किल हाल फकीरी वे।।

**तसेच कबीर साहेबजी महाराजसुद्धा म्हणतात, की :-**

कबीर, झूठे सुख को सुख कहै, मान रहा मन मोद।
सकल चबीना काल का, कुछ मुख में कुछ गोद।।
कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल।
आवण जाणा लग रहा, ज्यों कीड़ी का नाल।।

**विशेष :- स्त्री आणि पुरुष दोन्हीही परमात्म्याच्या प्राप्तीचे अधिकारी आहेत. स्त्रियांनीही मासिक धर्माच्या (Menses) दिवसांमध्येही आपली दैनंदिन पूजा, ज्योत लावणे इत्यादी बंद करू नये किंवा एखाद्याच्या देहांताच्या अथवा जन्माच्या वेळीही दैनिक पूजाकर्म बंद करू नये.**

**टीप : जे भक्तजन या एकवीस सूत्रीय आदेशांचे पालन करणार नाहीत, त्यांचे नाम समाप्त होऊन जाईल. जरी अजाणते पणाने एखादी चूक झाली असेल, तर तिला माफी मिळते; पण जर जाणूनबुजून चूक केलेली असेल, तर तो भक्त नामरहित होतो. यावर उपाय हाच आहे, की गुरुदेवजींकडे क्षमा मागून पुन्हा नामोपदेश घ्यावा लागेल.**

**लेखक**
**संत रामपाल दास महाराज**
**सतलोक आश्रम, बरवाला**
**जिला-हिसार, हरियाणा (भारत)**

## ''शास्त्रानुकूल भक्तिने भक्तांचे झालेले लाभ''
## ''उध्वस्त परिवार एकत्र झाला''

मी भक्त रमेश पित्याचे नांव श्री उमेद सिंह, गाव-पेटवाड़, तालुका हांसी, जिला हिसार येथे कारागृहास्मोरील एम्पलॉंईज कॉलोनी, मध्ये कुटुंबासोबत राहतो.

दीक्षा घेण्यापूर्वी आम्ही भूतांची पूजा करत होतो. आमच्या गावात बाबा सरियाला मान्यता होती व तिथे आम्ही दर महिन्याच्या पौर्णिमेला जोती पेटवण्यासाठी जात असू. आम्ही शुक्रवार, जन्माष्टमी, शिवरात्रीचे व्रतदेखिल करत होतो. पितरांना पिंड दान करून त्यांचे श्राद्धही करत होतो. तरीदेखिल आमचे घर बिल्कुल ओसाड झाले होते. जेंव्हा मी बारा वर्षांचा होतो, तेव्हा माझ्या वडिलांचा मृत्यु झाला. घरात तीन जण होते, तिघेही आपसात भांडत असत. तिघानाही भूत-प्रेतबाधेने दुःखी केले होते आणि तिघेही अतिशय आजारी असत. आधी डॉंक्टरांना दाखवले पण काहीच आराम मिळाला नाही. मग आम्ही मांत्रिकाकडे गेलो, कोणी म्हणायचा तुम्ही ५००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन. कोणी म्हणायचा तुम्ही १०००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन.

आम्ही बिलकुल उघडे पडलो होतो. परन्तु काहीही समाधान नव्हते. माझे नातेवाईक भक्त रघुबीर सिंह गाव कौंथ कलां, यांनी वारंवार सांगितल्यावर माझ्या आईने सन् १९९६ मध्ये संत रामपाल जी महाराजांची दीक्षा घेतली. माझ्या पत्नीला पाच वर्ष होऊन देखिल कोणतेही अपत्य झाले नव्हते. माझ्या आईने सांगितल्यावरून माझ्या पत्नीनेदेखिल संत रामपाल जी महाराजांकडून दीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यावर एका वर्षात माझ्या पत्नीने मुलाला जन्म दिला. माझा देवावरच विश्वास उडाला होता. त्यामुळेच मी दीक्षा घेतली नव्हती आणि आपल्या आई व पत्नीला देखिल संतजीकडे जाण्याची परवानगी देत नसे. माझा पंधरा दिवसांचा मुलगा खूप आजारी पडला. डॉक्टरांनी सांगितले की हा मुलगा सकाळ पर्यंतच जगेल, त्याला घेऊन जा. संध्याकाळी एका भक्ताने बन्दी छोड़ सतगुरु रामपाल जी महाराजांच्या विषयी सांगितले की ते जिंद येथे आले आहेत आणि ते पूर्ण संत आहेत. आम्ही डॉक्टर आणि मांत्रिकांच्या कडे जाऊन कंटाळलो होतो. माझा देवावरील विश्वासच उडाला होता. तरीही त्या भक्ताला मी नाही म्हटले. परंतु त्याने पुन्हा विनंती केली की ते स्वतः बन्दी छोड़ परमेश्वर च पृथ्वीवर आलेले आहेत. जर त्यांनी दया केली तर हा मुलगा वाचू शकतो. त्या भक्ताने इतका विश्वास दिल्यावर मी आपल्या आईला परवानगी दिली. माझी आई मुलाला घेऊन सतगुरु रामपाल जी महाराजांच्या चरणी ठेवले आणि रडतच विनंती केली की महाराज हा मुलगा मेलेलाच आहे. आता आपणच याला ठीक करू शकता. तेव्हा संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराजांनी सांगितले की परमेश्वर कबीर जींच्या कृपेने तो बरा होईल. दुसऱ्या दिवशी जो मुलगा मरायचा होता, तो बरा झाला.

आमचे उध्वस्त झालले घर संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराजांच्या कृपेने परत एकत्र आला. इतका चमत्कार पाहूनदेखिल पाप कर्मांमुळे मी त्यांची दीक्षा घेतली नाही आणि पूर्वीच्याच भुतांच्या पूजा करत राहिलो. आमच्या घरी संकटमोचक शास्त्रानुकूल भक्तिने भक्तांचे झालेले लाभ गरीबदास जी महाराजांच्या वचनांचा पाठ संत रामपाल जी महाराज करत असत आणि मी बाहेर जाउन दारू पीत असे. नंतर एक वर्षाने एक दिवस आमच्या घरी पाठ सुरु होता तेव्हा संध्याकाळी संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराजांनी सत्संग केला. तेव्हा मी सत्संग ऐकला आणि दीक्षा घेतली. नंतर आमच्या घरात दुःख नावाची चीजच उरली नाही.

माझ्या आईने कोणाच्या तरी सांगण्यावरून नामजप थांबविला. काही दिवसांच्या नंतर सन् २००० मध्ये माझ्या आईच्या पायात अचानक आग व्हायला लागली. डॉक्टरांना दाखविले, तेव्हा त्यांनी सांगितले की रक्ताचा कर्करोग आहे. ही दहा-पंधरा दिव्संच्यावर जगणार नाही. जर पीजीआय मध्ये चण्डीगढ़ला घेऊन गेलात तर तिथे दीड लाख रूपये खर्च येईल, दुखणेही कमी होईल पण तरीदेखिल त्या एक वर्षाच्या वर जगणार नाहीत. संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराजांनी सांगितले की तुमच्या माताजींनी नामजप बंद केला आहे. जसे विजेचे बिल न भरलयास ते जोडणी बंद करतात आणि मग वीज पुरवठा बंद होतो. तो पुन्हा नीट व्यवस्थित सुरु करावा लागतो. माझ्या आईने आपली चूक मान्य केली, क्षमा याचना केली. महाराजांनी परत दीक्षा दिली आणि डोक्यावर हात ठेवला. डोक्यावर हात ठेवताच पायात आग होणे आणि दुखणे बंद झाले. मग जवळपास दोन वर्षांच्या नंतर पाय बधीर होऊन हाडातून रक्त बाहेर येऊ लागले. डॉक्टरांनी औषध दिले आणि टांके देखिल घातले, परन्तु रक्त यायचे काही बंद होत नव्हते. मग डॉक्टरांनी परत तिच्या आजाराची तपासणी केली आणि सांगितले की यांना रक्ताचा कर्करोग आहे आणि आता तो सगळीकडे पसरला आहे. आता या बऱ्या होणे अवघड आहे. यांना घरी घेऊन जा. हे रक्त निघाल्याने दोन दिवसात मरण पावतील. मग दुसऱ्या दिवशी त्यांच्या लघवी आणि संडासच्या जागेतून देखिल रक्त यायल सुरवात झाली. तेव्हा मी सतगुरु रामपाल जी महाराजांना फोनवरून सांगितले की डॉक्टरांनी सांगितले आहे की या दोन दिवसांच्या सोबती आहेत. तेव्हा सतगुरु रामपाल जी महाराजांनी म्हटले की संकटमोचक जे करतील ते योग्यच असेल. मग दुसऱ्या दिवशी रात्री दोन वाजता यमदूत त्यांना घेण्यासाठी आले. माझ्या आईने म्हटले की तुझे वडील (ते दहा वर्षांपूर्वीच वारले होते) मला घ्यायला आले आहेत. असे म्हणत तो यमदूत माझ्या आईच्या शरीरात शिरला आणि म्हणू लागल की मी आज हिला घेऊनच जाणार. हिची वेळ झालेली आहे. मला चहा द्या. तेव्हा आम्ही त्याच्यासाठी चहा ठेवलाच होता, तेवढ्यात तो यमदूत म्हणू लागला की माहित नाहीं पण तुमच्या घरात कोणतीतरी मोठी शक्ती आहे, ती मला मारते आहे. मी इथे आणखी थांबू शकत नाही. मला लवकर चहा द्या. मी चाललो आणि गरम चहा पिऊन गेला. जातेवेळी म्हणू लागला की तुमच्या घरी पूर्ण परमात्मा आले आहेत. मी हिला नाही नेऊ शकत असे म्हणत निघून गेला. एक मिनटाने रक्त बिल्कुल बंद झाले, काळे झालेले जीभ आणि दात बिल्कुल साफ झाले आणि संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराजांच्या कृपेने ती आधीसारखीच बरी झाली. परमात्मा कबीर साहेबजींनी माझ्या आईचे आयुष्य पाच वर्षाने वाढविले. २४ जुलाई २००५ रोजी त्या सत्य भक्ति करून सतलोकी प्रस्थान कर्त्या झाल्या. संकटमोचक सतगुरु रामपाल जी महाराज की जय. । सत साहेब ।

## मूत्रपिंड बरे होणे आणि सैतानाला माणसात आणणे

मी भक्त जगदीश वडिलांचे नाव श्री प्रभुराम, गाव-पंजाब खोड़, दिल्ली-८१. डी. टी. सी. (दिल्ली ट्रांस्पोर्ट कॉर्पोरेशन) मध्ये मकैनिक आहे. दारूमुळे मी राक्षस वृत्तिचा माणूस झालो होतो. दारू पिणे, कोंबडी खाणे, सिगरेटी फुंकणे, हुक्का ओढणे हे माझे त्यावेळचे उद्योग.

मी नौकरीवरून संध्याकाळी जवळपास ७ किंवा ८ वाजता घरी यायचो. दारू जास्त झाली कि अनेकवेळा घरी यायला रात्रीचे ९ किंवा या १० देखिल वाजायचे. दारूच्या नशेत एखाद्या पिसाटासारखा झोकांड्या खात मी घरात शिरायचो. आत शिरताच पत्नी व मुलांना मारहाण करायचो, रोज घरात नुसता गोंधळ घालायचो. ज्या मुलांनि प्रेमाने मला बिलगले

पाहिजे, ती मला घाबरून पलंगाच्या खाली जाऊन बसत. आपले बाबा घरी येण्याची मुले आतुरतेने वाट पाहत असतात. त्यांना उत्सुकता असते, बाबांनी आपल्यासाठी काय आणले आहे याची. परन्तु मी खाण्यासाठी काही आणण्याऐवजी दारूच्या नशेत धुंद होऊन लाल झालेल्या डोळ्यांनी त्यांना मारायचो.

दूसरीकडे माझी धर्मपत्नी सुमित्रा देवीदेखिल आपल्या दुःखी जीवनासोबतच जीवघेण्या आजाराशी झुंझत होती. तिची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली होती. डॉक्टरांनी सांगितले होते की औषध घेत राहा. पण सहा महिन्यांच्या पेक्षा जास्त जगणार नाहीत. ऑल इंडिया मेडीकल आणि डॉ राम मनोहर लोहिया हॉस्पिटल दिल्ली कडून मूत्रपिंडे निकामी झाली असल्याचा रिपोर्ट मिळाला होता. आणि सहा महिन्यांच्या पेक्षा जास्त ती जगू शकणार नव्हती आणि ते देखिल अखेरपर्यंत औषधे घेत राहिल्यास. ज्या निष्पाप मुलांचा बाप दारू पितो आणि आई मृत्युशय्येवर आहे, त्याचं हाल काय वर्णावे? तर त्या मुलांना जेव्हा माहित झाले की त्यांची आई सहा महिन्यांच्या पेक्षा जास्त ती जगू शकणार नाही, तेव्हा आमचे कसे होणार म्हणून त्यांच्या डोळ्यातून सतत अश्रुधारा वाहू लागल्या. तीन मुलगे आणि एक मुलगी आपल्या आईजवळ जाऊन रडायला लागले आणि म्हटले की हे परमेश्वर! आमच्या आई सोबत आम्हाला सगळ्यांनाच तुझ्याकडे बोलावून घे. इथे आम्ही कोणाच्या आधाराने जगणार.

परमात्माने त्या मुलांची हाक ऐकली आणि आमच्याही शुभ कर्म करण्याचा कालावधी सुरु झाला. झाले असे की आमच्या शेजारी राहणाऱ्या भक्तमति निहालीदेवीनी आपल्या गुरुदेव संत रामपाल जी महाराजांच्या आज्ञेनुसार ३०-३१-१ जानेवरी १९९७ रोजी सतगुरु गरीबदास जी महाराजांच्या अमृतमयी वचनांचा तीन दिवस अखण्ड पाठ आपल्या घरी आयोजित केला. त्यामध्ये संत रामपाल जी महाराजांनी ३१ डीसेंबर १९९६ रोजी रात्री ९ ते ११ वाजे पर्यंत सत्संग केला. माझी धर्मपत्नी सुमित्रादेवीदेखिल शेजारी सत्संग श्रवण करण्यासाठी गेली. थोड़्या वेळानंतर मी (जगदीश) कामावरून घरी आलो घरी आल्यावर मुलांकडून समजले की आमची आई शेजारी निहालीदेवीच्या घरी सत्संग ऐकण्यासाठी गेली आहे. हे ऐकून मलाही अतिशय राग आला आणि म्हटले की कुठे पाखंडी लोकांमध्ये गेली आहे? मी आता तिला मारतच घरी आणतो. असा विचार करून मी भक्तमति निहाली देवीच्या घरी गेलो. मी दारूच्या नशेत होतो. जेव्हा मी निहाली माईच्या घरी गेलो, तेव्हा संत रामपाल जी महाराज सत्संग करत होते. भक्तजन मोठ्या संख्येने सत्संग ऐकत होते. त्या सगळ्यांना पाहून मी काही बोललो नाही आणि गुपचाप सर्वात मागे बसलो. मी सत्संग ऐकला. सत्संगात महाराजजींनी सांगितले की :-

शराब पीवैं कड़वा पानी, सत्तर जन्म श्वान के जानी।
गरीब, सो नारी जारी करैं, सुरापान सो बार।
एक चिलम हुक्का भरैं, डूबैं काली धार।।
कबीर, मानुष जन्म पाय कर, नहीं भजैं हरि नाम।
जैसे कुआ जल बिना, खुदवाया किस काम।।

महाराज जी नी सत्संग मध्ये सांगतले की मुलांना वडिलांनी छातीशी कवटाळायचे तिथे त्या दारुड्या बाबाला पाहून मुले पलंगाखाली लपतात. दारुडी व्यक्ति स्वतः दुःखी, धनहीन, समाजात अब्रू घालवलेला आणि कुटुंब आणि शेजारी-पाजारी नातेवाईक यांना त्रास देऊन त्यांचे शिव्याशाप घेत असतोच, पण त्याची पत्नी व मुलेदेखिल या व्यसनाचे शिकार

होतात. तसेच पत्नीचे माता–पिता, भाऊ–बहीण देखिल रात्रंदिवस काळजीतच असतात. सर्व पापाचा भार त्या नादान दारुड्या व्यक्तिच्या डोक्यावर येतो. प्रभु ने मनुष्यजन्म भक्ति करून आत्मकल्याणासाठी दिला आहे, तो दारूचे व्यसन करून नष्ट करता कामा नये. एखादा मुलगा शाळेत शिकत नाहीं, आवारा गर्दी करत हिंडतो. तो शिक्षणापासून वंचित रहातो. मग आयुष्यभर मजूरी करून जीवन निर्वाह करतो. मग त्याला आठवते की जर मी आवारा गर्दी न करता अभ्यास केला असता, तर आज अन्य विद्यार्थ्यांसारखा कोणीतरी मोठा अधिकारी असतो. परन्तु आता काय उपयोग, हा विचार त्याचवेळी करायला पाहिजे होता.

कबीर साहेब सांगतात की :–

अच्छे दिन पीछे गये, गुरु से किया न हेत।
अब पछतावा क्या करे, जब चिड़ियां चुग गई खेत।।

अशा प्रकारे जर मनुष्यजन्मात जो प्राणी प्रभुभक्ति करत नाहीं, तो पशु–पक्षांच्या योंनीला प्राप्त होतो. जो माणूस दारू पीतो आहे, तो दारूच्या नशेत जेवणाच्या भरल्या ताटाला लाथ मारतो आहे. भक्ति न केल्याने वेगवेगळ्या प्राण्यांच्या योनीत यातना भोगतो. कधी तो कुत्र्याची योनी धारण करतो. कुत्रा सगळी रात्र थंडीत कुडकुडत राहतो. वरून पाउस आणि थंडीमुळे यातना सोसतो. सकाळी भूक लागल्यावर कोणाच्या घरी स्वयंपाकघरात घुसण्याचा प्रयत्न करतो. घरातील माणसे काठी किंवा दगड मारतात. कुत्रा पुष्कळ वेळ ओरडत राहतो. मग दुसऱ्या घरात घुसतो. तिथे भाकर मिळेल की काठी हे माहित नाही. जर तिथेही नशिबात काठीच असेल, तर आता कुत्रा झालेला तो दारुड्या गावाच्या बाहेर जाऊन भूकेने व्याकूळ झाल्यामुळे माणसांची विष्ठा खातो. जर त्या नादानप्राण्याने मनुष्य शरीरात असतानास सत्संगात येऊन चांगले विचार ऐकले असते, वाईट सवयींचा त्याग करून आपले कल्याण करून घेतले असते आणि मुलांना उत्तम शिक्षण देऊन प्रभुजीनची दीक्षा प्रदान करवली असती, तर कायमचा सुखी झाला असता. दारूची धुंदी थोडाच वेळ असते. पण परमात्माच्या नामस्मरणाने मिळणारे सुख व आनंद नेहमीच सोबत असतो.

आदरणीय संत रामपाल जी महाराजांचा उपरोक्त सत्संग ऐकून माझी दारू खाडकन उतरली. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. घरी गेलो, झोप येत नव्हती. १ जानेवारी १९९७ रोजी दुपारी १.३० वाजता माझ्या पत्नीला सोबत घेऊन संत रामपाल जी महाराज यांच्याकडे गेलो आणि त्यांच्याकडून आत्म कल्याणासाठी उपदेश प्राप्त केला. त्यानंतर आजपर्यंत (२००५) दारू, तंम्बाखु आणि मांस यांना हात देखिल लावलेला नाही. माझ्या पत्नीने देखिल सतगुरु रामपाल जी कडुन नाम उपदेश घेतला. त्या दिवसापासून तिची तब्बेत उत्तम आहे. डॉक्टरांचे उपचाराचे व एक्स–रे इत्यादी रिपोर्ट आजही आमच्या घरी ठेवले आहेत. लोकांना ते मी दाखवतो.

माझी अशी विनंती आहे की आपणदेखिल प्रभुचरणी यावे. संतरूपातील परमात्माचे संदेशवाहक संत रामपाल जी महाराज यांना ओळखा. नाम उपदेश प्राप्त करून कृपया आपले कल्याण करून घ्यावे. सत साहेब.

भक्त जगदीश

## ''भूते आणि आजारांनी त्रासलेल्या कुटुंबाला सुखी केले''

भक्तमति अपलेश देवी श्री रामेहर यांची पत्नी श्री माँगेराम यांची कन्या, गाव–मिरच, तहसील चरखी दादरी, जिल्हा भिवानी (हरियाणा)

मी अपलेशदेवी आपल्या दुःखी जीवनाची एक झलक आपल्याला सांगते. मी आणि माझी मुले राहूल आणि ज्योति आहेत. पूर्वीचे वाईट दिवस आठवले तरी त्यांच्या अंगावर शहारे येतात. त्याचे वर्णन करताना मन विदीर्ण होते.

६ डिसेंबर १९९५ च्या रात्री गुंडांनी माझ्या पतीला ते कामावर असताना बेदम मारहाण करून ठारच मारले होते. परंतु या पूर्ण परमात्माने (कबीर साहिब) आमच्यावर कृपा केली आणि माझ्या पतिला जीवनदान दिले. यामुळेच आज सर्व सहकुटुंब संकटमोचक गुरु रामपाल जी महाराजांच्या दयेने पूर्ण परमात्माच्या चरणी स्थान मिळाले आहे. आमच्या कुटुंबात माझ्या पतिने स्वच्छ कपड़े घातले कि थोड्या वेळाने त्यांच्या अन्डर वेयरच्या वरील भागात जिथे रबर किंवा नाड़ी असते तिथे चारही बाजूंनी कपडे रक्ताने रंगून जात आणि मुलांच्या अंगावर सूज होऊन त्यातून रक्त बाहेर यायचे. आणि मी एक वर्षापासून हृदयविकाराने त्रस्त होते. त्यासाठी अनेक वर्षे औषधे खाल्ली. माझे पति दिल्ली पोलिस मध्ये आहेत. माझ्या सर्व शरीरावर फोड़–पुटकुळ्या यायच्या. घरच्या समस्यांमुळे माझे पति रामेहर यांचे मानसिक संतुलन बिघड़ले होते.

या समस्यांमुळे आम्ही सन् १९९५ ते जुलाई २००० पर्यंत एक डझनपेक्षाही अधिक लंगड़या, लोभी व हावरट गुरुंकडे गेलो आणि भारत वर्षातील सर्व तीर्थस्थाने म्हणजेच जमुना, गंगा, हरिद्वार, ज्वाला जी, चामुन्डा, चिन्तपूरनी, नगरकोट, बाला जी, मेहन्दीपुर व गुड़गावची माई आणि गौरख टीला राजस्थान यथे अशी अनेक तीर्थ स्थानी अनेकवेळा मुलांसहित गेलो परंतु काहीही फरक पडला नाही.

अशा प्रकारे आमच्या कुटुंबाची अशी स्थिती होती की आम्ही होळी व दिवाळीदेखिल मशिदीत बसून घालवत होतो.

आम्ही भाग्यवान आहोत, आम्हाला संत रामपाल जी महाराजांच्या कडून परमपूज्य परमेश्वर कबीर जींचे आशीर्वाद प्राप्त झाले. आता कुठे गेले ते कालाचे दूत आणि ते आजार ज्यासाठी ऑल इण्डिया हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु होते. सतगुरुदेवांच्या चरणधूळीपुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

२५ फरवरी २००१ रोजी एक कालाच्या पूजाऱ्याने फोन करून माझे नाव अपलेश आहे काय म्हणून विचारले. मी म्हटले की होय, आपण आधी आपले नाव सांगा. तेव्हा तो शहाणा मांत्रिक म्हणाला की हा बलवान कोण आहे, तो तुमचा कोण लागतो? मी म्हटले की तुम्ही कोण आहात, आपले नाव काय आणि हे सगळे आपण का विचारीत आहात? तेव्हा तो शहाणा मांत्रिक म्हटला की मुली, माझे नाव विचारू नकोस. मला ते सांगायचे नाही आणि मी हांसीहून बोलतो आहे. हा बलवान आणि त्याच्यासोबत आलेल्या एक माणसाने मला ३७०० रूपये तुमच्यावर करणी करण्यासाठी दिले होते. मी तुझा नंबरदेखिल बलवानकडून घेतला होता जेणेकरून तुम्हाला विचारू शकेल त्यांची दुर्गति झाली का नाही, याची मी चौकशी करू शकेन. माझ्याजवळ तुमचा फोन नंबरच नव्हता बलवाननेच दिला होता. जेव्हा ते कुकार्य मी रात्री केले. पण जसा झोपायला लागलो, तसे पांढऱ्या कपड़यातील ज्या गुरुची तुम्ही पूजा

**करता, ते दिसले व त्यांनी मला सांगितले की याचे परिणाम तुला भोगावे लागतील. हे कुटुंब सर्व शक्तिमान सर्व कष्ट हरण परम पूज्य परमेश्वर कबीर जींना शरण आहे. आपली ती काय औकात आहे? इथला धर्मराजदेखिल आता या कुटुंबाचे काहीही बिघडवू शकत नाहीं.**

गरीब, जम जौरा जासै डरै, मिटें कर्म के लेख।
अदली अदल कबीर हैं, कुल के सतगुरु एक।।

**परमपूज्य परमेश्वर कबीर जींना काल आणि कालाचे दूत आणि मृत्यु देखिल घाबरतो. ते परम प्रभु पाप कर्माचे प्रायश्चित्त देखिल संपवितात. त्यानंतर त्या मांत्रिकाने म्हटले की मुली, तुला एक गोष्ट सांगतो की तू ज्या देव पुरुषोत्तमाची पूजा करतेस, ते अतिशय प्रबल आहेत. मी गेली २५ वर्षापासून हे करणी करण्याचे काम करतो आहे. अनेक कुटुंबे मी उजाड़ केली आहेत. परन्तु आज प्रथमच अयशस्वी झालो. मुली, या शक्तिला सोडू नको, नाहीं तर मार खाशील. आपल्या विनाशासाठी बलवान इत्यादि फिरतच आहेत. मी म्हटले की आम्ही पूर्ण परमात्माची पूजा करत आहेत. बलवान माझ्या पतिचा मोठा भाऊ आहे, आमचा शत्रू झाला आहे.**

**आम्ही भाग्यवान आहोत की आमच्या मनात कोणतीही वस्तु किंवा कार्य आवश्यक वाटले, ते सतगुरुदेव, संत कबीर साहिब पूर्ण करतात. आज गुरु गोविन्द दोन्हो खड़े, हम कीसके लागे पाय। हम बलिहारी सतगुरुदेव रामपाल जी के चरणों में जिन्हें परमेश्वर दिया मिलाय।**

**हे बंधु भगिनीनो, आम्हा कुटुंबातर्फे आपणा सर्वांना विनंती आहे की जर आपणास सतलोक मार्ग, पूर्ण मोक्ष व सर्व सुख प्राप्त करायचे असल्यास आणि सांसारिक दुःखांपासून सोडवणूक पाहिजे असल्यास संकटमोचक संत रामपाल जी महाराजांकडून सतनाम प्राप्त करा आणि आपला अनमोल मनुष्य जन्म सफल करा.**

**।। सत साहिब ।।**

**भक्तमति अपलेश देवी**

## ''भक्त सतीशची आत्मकथा''

**मी भक्त सतीश दास १९३ सेक्टर ७, आर के पुरम नवी दिल्लीचा राहणारा आहे. वरील ओळी आमच्या जीवनाच्या चरित्रार्थ आहेत. कारण सतगुरु संकटमोचक रामपाल जी महाराजांचा डिसेंबर १९९७ मध्ये प्रीतमपुरा दिल्ली येथे सत्संग झाला होता. एका मित्राने सांगितले म्हणून सत्संग ऐकण्यास गेलो. परन्तु पारंपरिक पुजापाठ सोडून देण्याच्या गोष्टी ऐकल्यावर माझे मन तिथे लागले नाही. सतगुरु जी शास्त्रे वाचन करून समजावत होते तेव्हा मनात आले की ही पुस्तके आपण घरीच वाचावीत. अशा प्रकारे ज्योति निरंजनाने (काल) आमची बुद्धि स्थिर केली आणि आमचा भक्ति चैनल बंद केला. सतगुरु सांगतात कीः–**

गुरु बिन किन्हें न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भूस छड़े किसाना।
गुरु बिन भरम ना छूटें भाई, कोटि उपाय करो चतुराई।।

**अशा प्रकारे आमची बुद्धि स्थिर असल्याकारणाने आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टी करत घरी आलो. सन् १९९९ मध्ये माझी पत्नी श्रीमति मंजूला मस्तिष्क कर्करोग झाला. आम्ही सफदरजंग हॉस्पिटल मध्ये तपासणी व उपचारासाठी गेलो असता, हे माहित झाले. त्यानंतर तिला पंत हॉस्पिटल आणि A.I.I.M.S. नवी दिल्ली आणि त्यानंतर अपोलो हॉस्पिटल नवी दिल्लीमध्ये देखिल डॉक्टरांना दाखविले. सगळ्याच डॉक्टरांनी त्वरित शस्त्रक्रिया करण्याचा**

सल्ला दिला व सांगितले की शस्त्रक्रियेच्या दरम्यान हिच्या एका हाताला अर्धांगवायू होऊ शकतो. अपोलो हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी तर रिपोर्ट पाहिल्यावर इथपर्यंत सांगितले की हिचे दोन्ही डोळे अजून शाबूत कसे आहेत? आणि त्याच वेळेस नेत्रतज्ञांकडून चाचण्या करण्यास सांगितले. मी तेव्हाच सर्व तपासण्या केल्या. तेव्हा नेत्रतज्ञ व न्यूरोसर्जन दोघांनीही सल्ला दिला की दर पंधरा दिवसानी हिच्या डोळ्यांची तपासणी करून घ्या. कारण मस्तिष्क कर्करोग अशा जागी आहे की कधीही यांची दृष्टी जाऊ शकते. आम्ही दोघेही विकलांग, जागीच गठाळून गेलो. आणि हात व डोळे जाणार म्हटल्यावर वरचा श्वास वर आणि खालचा श्वास खाली अशी आमची गत झाली. पण काही पर्याय नसल्याचे लक्षात घेऊन शेवटी पंत हॉस्पीटल नवी दिल्लीमध्ये ऑप्रेशन करण्याचे ठरविले आणि डॉक्टरांच्या सांगण्यावरून INMAS हॉस्पीटल तिमारपुर दिल्ली येथे M.R.I आणि अन्य सगळ्या चाचण्यादेखिल करवून घेतल्या फक्त शस्त्रक्रियेची तारीख घ्यायची होती. आम्ही परम पूर्ण परमात्मा तत्वदर्शी संत रामपाल जी महाराजांच्या आधी ऐकलेल्या सत्संगातील खालील ओळी आठवल्या :-

जिन मिलते सुख उपजे, मिटें कोटि उपाध।
भुवन चतुर्दश ढूंढियों, परम स्नेही साध।।

आणि परमात्माने आमचा भक्ति चैनल सुरु केला आणि मनात अशी भावना उत्पन्न झाली की ऑप्रेशनच्या आधी दीक्षा घेऊन पाहूयात. मग आपल्या मित्रासोबत प्रीतमपुरा दिल्ली येथे जाऊन ४ फरवरी २००१ ला परम परमात्मा तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्याकडून नाम उपदेश घेतला. पूर्वीच्या सर्व पूजा सोडल्या. सतगुरुजींनी अखंड पाठ करण्याचा सल्ला देऊन म्हटले की परमात्माची इच्छा असल्यास ऑप्रेशन टळेल आणि सर्व ठीक होईल. आम्ही सतगुरुंची आज्ञानुसार घरी तीन दिवसांचा अखंड पाठ करवला आणि त्यानंतर डॉक्टरांकडे ऑप्रेशनची तारीख घेण्यासाठी पंत हॉस्पिटल नई दिल्ली येथे गेलो. जे डॉक्टर आधी ऑप्रेशनचा सल्ला देत होते, तेच डॉक्टर दूसरी एमआरआय पाहून म्हणू लागले की आता ऑप्रेशनची काहीच गरज नाही. तेव्हा सतगुरुच्या वचनाची आठवण झाली की :-

सतगुरु दाता हैं कलि माहिं, प्राण उधारण उतरे सांई।
सतगुरु दाता दीन दयालं, जम किंकर के तोड़ें जालं।।

आणि आम्ही सतगुरुंचे स्मरण करून जोरजोरात रडायला लागलो की हे परमेश्वर! आम्ही आपला महिमा कोणत्या शब्दात वर्णन करावा? अशा प्रकारे परम परमेश्वर कबीर साहेबांचे अवतार तत्वदर्शी संत रामपाल जी महाराजांच्या कृपेने आमचे ऑप्रेशन टळले आणि त्यानंतर आम्ही एक पैशाचेही औषध न घेता सुखमय जीवन जगत आहोत.

२० नोव्हेंबर २००४ च्या रात्री कालाच्या झपाट्यात माझी पत्नी मृतच झाली होती. परमात्माचे अमृत जल पाजल्यावर ती शुद्धीवर आली. मग आम्ही तिला सतगुरुजींकडे घेऊन गेलो तेव्हा सतगुरुजींनी सांगितले की आज हिचा मृत्यु अटळ होता. परमेश्वर कबीर जींनी तिचे आयुष्य वाढविले आहे आणि आता तिने भक्ति करायची आहे.

मग २२ नोव्हेंबर २००४ रोजी माझ्या पत्नीला सोनीपत येथील सत्संगातच अर्धांगवायूचा झटका आला आणि त्यामुळे तिच्या हातातील ताकद संपली आणि त्याचवेळी सतगुरुजीचा हात तिच्या हातात दिसू लागला आणि जवळपास पाच मिनिट दिसत होता. जेव्हा अर्धांगवायूचा प्रभाव संपला तेव्हा सतगुरुजीचा हात अदृश्य झाला आणि आजपर्यंत एकदम ठीक आहे.

परमेश्वर कबीरांचे अवतार असलेले सतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराजांनी

आम्हाला सिद्ध करून दाखविले की

गरीब जम जौरा जासे डरें, मिटें कर्म के अंक।
कागज कीरें दरगह दई, चौदह कोटि न चंप।।

भक्त सतीश मेहरा,
RLF-907/17, राज नगर–II, पालम कालोनी,
नई दिल्ली मो. 09718184704

## ''भक्त बहीद खान ची आत्मकथा''

बन्दी छोड़ कबीर साहेब की जय

बंदी छोड सतगुरु रामपाल जी महाराजांच्या चरणी कोटी–कोटी दंडवत् प्रणाम, मी बहीद् खान पुत्र मुन्शी खान गाव व तहसील – मेहगाव जिल्हा भिण्ड (मध्यप्रदेश) येथील राहणारा आहे. गेली ३ वर्षे अतिशय आजारी होतो. माझी दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली होती. मी २ वर्षे ग्वाल्हेरमध्ये मोठमोठ्या M.B.B.S डॉक्टरांकडून उपचार करवून घेतला पण काहीच परिणाम झाला नाही. त्यानंतर ग्वाल्हेरमधील डॉक्टरांनी मला दिल्ली A.I.M.S (ऑल इंडिया मेडिकल) मध्ये रेफर केले. सर्व तपासण्या करून त्या डॉक्टरांनी सांगितले की ३ बाटल्या रक्त पाहिजे. आधी आपले रक्त शुद्ध केले जाईल आणि मग आपल्या कुटुंबातील कोणालातरी आपले मूत्रपिंड काढून तुम्हाला दान करावे लागेल. शस्त्रक्रियेचा साधारण रु ४ लाख खर्च येईल. मी रक्कम देण्यास असमर्थ होतो. म्हणून दिल्लीहून परत आपल्या घरी आलो आणि असहाय स्थितीत मृत्युची वाट पाहू लागलो. कारण मी खाण्या–पिण्यास, हिंडण्या–फिरण्यास आणि उठण्या–बसण्यास असमर्थ होतो.

मग कोणाकडून तरी माहिती मिळाली की हरियाणामध्ये बरवाला जि हिसार येथे कोणी परमात्मा आलेले आहेत आणि ते असाध्य रोग परमात्माच्या भक्तिने बरे करतात. हे ऐकून २४/७/०९ रोजी मी आपल्या चरणी येऊन नाम दीक्षा घेतली. हे सतगुरु! नामस्मरण सुरु केल्यावर मला आराम वाटू लागला आणि हळूहळू एक महिन्यात मी आपल्या कृपेने खडखडीत बरा झालो. माझे सद्गुरु! माझ्या आजाराचे व चाचण्यांचे सर्व कागदोपत्री पुरावे व प्रमाण माझ्या जवळ आहेत. हे परम पिता परमेश्वर! आपण माझ्या आयुष्यात जे मला दिले आहे, ते मी आयुष्यभर फेडू शकणार नाही. हे सतगुरु! ''आपल्या या सेवकाला आपल्या चरणांशी जागा द्यावी.''

।।सत साहेब।।

आपला सेवक
भक्त बहीद खान पुत्र मुन्शी खान
गाव, मुक्कामपोस्ट व तहसील–मेहगाँव,
जिला–भिण्ड (मध्यप्रदेश)

## ''भक्तमति तारा कट्टा यांच्यावर असीम कृपा झाली ''

बंदी छोड सतगुरु रामपाल जी महाराजांच्या चरणी कोटि-कोटी दंण्डवत् प्रणाम मी तारा कट्टा जयपुर निवासी, संस्कृतमध्ये एम.ए. आहे. राजस्थान विद्यापीठातून बी. ए. संस्कृतमध्ये स्वर्णपदक प्राप्त केले आहे. मी सहा लेखकांच्या गीता, उपनिषद, पुराण व सगळी दर्शन शास्त्र व सर्व गुरुंची प्रवचने ऐकली परंतु समाधान झाले नाही. एकदा जयपुरमध्ये भास्कर भक्ति चॅनलवर सतगुरु रामपाल जी महाराजांचे कार्यक्रम पाहिले आणि ३० नोव्हेंबर २००३ रोजी नामदीक्षा घेतली. त्यावेळेस मी अनेक आजारांनी त्रस्त होते. मे १९९१ मध्ये मला एका बायोपसी टैस्टमधून कळले की मला अल्सरेटिव कोलायटिस (Ulcerative Colitis) नावाचा आजार झाला आहे. त्यामध्ये मोठ्या आतड्याला फोड येतात आणि संडास करताना रक्त येते. याविषयी डॉक्टरांनी सांगितले की याच्यावर कोणताही उपचार नाही. ३-६-२००२ पर्यंत आंतडयात अल्सर ७५ सेंटीमीटर पर्यंत वाढले. १०-४-०८ रोजी गुरुजींच्या सांगण्यावरून मी औषध बंद केले. यामधील ४ टेबलेट्स तर अशा होत्या ज्या डॉक्टरांनी जिवंत राहण्यासाठी आयुष्यभर खाव्या लागतील असे सांगितले होते. २३-४-०४ रोजी माझ्या Lungs (फुफुसात) संसर्ग झाला. जेव्हा मी डॉक्टरांकडे औषध घेण्यासाठी गेले, तेव्हा क्ष किरण रिपोर्ट पाहून डॉक्टर म्हणाले की आपल्याला असा आजार झाला असेल तर ताप येणे, वजन कमी होणे, व रक्ताची कमतरता असली पाहिजे. पण आपण तर एकदम तंदुरुस्त दिसता. मी म्हटले कि ही माझे सतगुरु रामपाल जी महाराजाची कृपा आहे कर्माचा मार माझ्यावर येऊ इच्छित आहे, पण माझे गुरुदेव कर्माच्या माराला ते प्रभावी होऊ देत नाहीत. अशा प्रकारे आपल्या भक्ताचे परमात्मा रक्षण करत आहेत. यामुळे डॉक्टरदेखिल खुप प्रभावित झाले.एकदा जानेवारी २००९ मध्ये प्रचारासाठी जायचे होते. रात्रभर रक्ताची पिचकारी सुरु होती. विचार केला मरायचेच आहे. तर प्रचार करत करतच मरण येऊ दे. तिसऱ्या दिवशी कुठलेही औषध न घेता खडखडीत बरी झाले. डॉक्टरांनी एकदा सांगितले की शरीर चालविण्यासाठी कोरटिसून सटीराइड (Cortisone Steroid) रोज घ्यावी लागेल. पण सतगुरु रामपाल जी महाराजांच्या सांगण्यावरून मी सर्व औषधे घेण्याचे थांबविले. मी एकही औषध घेत नाही आणि आता मी सतगुरु रामपाल जी महाराजांच्या दयेने बिलकुल स्वस्थ आहे. इतका दीर्घकाळ मागे लागलेला आजार गुरुदेवांना शरण आल्याबरोबर बिल्कुल नाहीसा झाला आहे. माझे सांगणे एवढेच की असे सत्यज्ञान व सत्य भक्ति मार्ग पृथ्वीवर कुठेही नाही. सतगुरु रामपाल जी महाराज साक्षात् पूर्ण परमात्मा आहेत.

।। सत साहेब ।।

सतगुरु के चरणों में दण्डवत् प्रणाम।

भक्तमति तारा कट्टा फोन नं. - ०९७७२३१२३३५

## ''गुरुकृपेचा महिमा''

मी त्रिलोक दास बैरागी गाव ढीमरखेड़ा जिल्हा-कटनी, मध्यप्रदेश येथे राहतो. मी दिनांक २७-०६-१० रोजी नाम दीक्षा घेतली नाम दीक्षा घेतली तेव्हा हि दीक्षा नसून अमृत प्राप्त केले आहे अशी मला काही कल्पना नव्हती. मी सांगतोय, ते तुम्हाला अतिशयोक्ति वाटेल. पण गुरुदेवांच्या पायाची शपथ घेऊन सांगतो. याच्यात मी सांगितलेले अनुभव घेतले आहेत किंवा माझ्यासमोर घडलेले आहेत. माझ्याबाबतीत असे चमत्कार होतील असे मला

स्वप्नातही वाटले नव्हते. नाम दीक्षा घेतल्यानंतर सहा महिन्यांनी माझा मुलगा आजारी पडला. पाच मुलींच्या पाठीवर झालेला हा मुलगा. त्याच्यावर उपचार तब्बल एक महिना एम.बी.बी.एस. डॉक्टरांकडून करवून घेतला, पण काहीही गुण आला नाही. अचानक माझ्या मुलाने एक दिवस सकाळी ०९:०० वाजता डोळे मिटले म्हणजे बेशुद्ध झाला. मी त्याला घेऊन उमरियापान येथे गेलो पण तिथे सर्व डॉक्टरांनी उपचार करण्यास असमर्थता दर्शविली. मग त्याला घेऊन सिहोरला गेलो, तिथेही एम.बी.बी.एस डॉक्टर आहेत. पण मुलाची स्थिती पाहून कोणीही इलाज करण्यास धजावत नव्हता. जणू ते मला सांगत होते की तुझा मुलगा मरण पावला आहे. मुलगा फक्त एक वर्षाचा होता. एक डॉक्टर धीर धरून म्हणाले की जर त्याला प्राणवायू मिळाला तर काही होऊ शकेल. मी ताबडतोब एक चारचाकी आरक्षित केली आणि जबलपुरकडे धाव घेतली. तिथे मुलांसाठीचे एक संशोधन केंद्र आहे. तिथल्या डॉक्टरांनी मुलाची स्थिती पाहून म्हटले की याची काही हालचालच नाहीये. कुठेही सुई लावली तरी काहीच जाणीव होत नाही.दाखल करून घ्यायचे म्हणजे जोखीमिचे आहे. मी त्यांना म्हणालो दाखल करून उपचार सुरु करा, बाकी सगळे परमात्मावर सोडा. डॉक्टरांनी म्हटले जर हा सहा तासांच्या आत शुद्धीवर आला तर कदाचित वाचेल, अन्यथा अवघड आहे. सकाळच्या नऊ पासून रात्रीचे ९ वाजले होते, पण मुलगा काही शुद्धीवर येत नव्हता. मुलाच्या आईने आणि मी रडत होतो. माझे लक्ष अचानक ''ज्ञान गंगा'' आणि ''भक्ति सौदागर को संदेश'' मध्ये लिहिलेल्या भक्ताला झालेल्या चमत्कारांकडे गेले. मी स्वतःला सावरले आणि स्वतःला गुरुचरणी समर्पित करून म्हटले गुरुजी माझ्या मुलाचे रक्षण करा माझ्या तुमच्या महिम्यावर असणाऱ्या विश्वासांची लाज राखा. जवळपास १२ वाजता जेव्हा डॉक्टर राउन्डसाठी आले तेव्हा विचारले, मुलाची स्थिती कशी आहे, मी म्हटले जशी सकाळी होती तशीच आहे. डॉक्टरांनी इंजेक्शन मागविले आणि मुलाच्या जांघेत टोचले. इंजेक्शन देताच मुलगा रडू लागला, जणू ते इंजेक्शन स्वतःगुरुजींनीच टोचले असावे. संपूर्ण वार्डात सर्वांना आनंद झाला डॉक्टरांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाले, आता तुझा मुलगा शुद्धीवर आला आहे. असे बेशुध्द झालेले मुले फार कमी शुध्दीवर येतात.

विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की इन्जैक्शनचा परिणाम तर दहा बीस मिनटांनी होतो. मुलगा इन्जैक्शनचं सूईच्या टोच्याने दुखूनच रडू लागला. यावरून स्पष्ट आहे की ही सगळी कमाल परमेश्वर कबीर जींची आहे.

''सतगुरु शरण में आने से आई टलै बला।
जै भाग्य में मृत्यु हो कांटे में टल जा''

गुरुजी सांगत आहेत की व्याकूळ होऊन मंत्रजप करण्याने चमत्कार झाला. मला आश्चर्य वाटले. मी रुग्णालयातच गुरुजींच्या चरणी वंदन केले आणि धन्यवाद देत रडत बाहेर पडलो. डॉक्टरांनी म्हटले की याला सलग आठ दिवस उपचारांची गरज आहे. चोवीस तासांचा पांच हजार खर्च होंता. मी डॉक्टरांना म्हटले मला सकाळी सोडा. डॉक्टरांनी म्हटले याला जर आपण घरी घेऊन गेलात, तर हा मुलगा हातचा जाऊ शकतो. कारण तो आताच शुद्धीवर आला आहे. मी म्हटले जे होईल ते पाहता येईल. बस मला तुम्ही सोडा. आज मुलगा सहा महिने झाले तरी तंदुरुस्त आहे. ताप एकदाही आलेला नाही. असा महिमा पाहून मी धन्य झालो. मला सायकल घेण्याचे देखिल धाडस होत नव्हते. कारण माझी कौटुंबिक स्थिति ठीक नव्हती. अचानक स्टेट बैंकेच्या व्यवस्थापकांनी विचारले आपण बँकेकडून कर्ज घ्याल काय? मी म्हटले मिळत असेल तर काय वाईट आहे. यामुळे माझी कौटुंबिक स्थिती सुधारेल. बँकेने

मला दीड लाख रूपये कर्ज दिले. सायकीलदेखिल खरेदी न करू शकणारा माणूस अचानक ५५००० रूपये किमतीची हीरो होण्डा गाड़ी घेऊन आला. आज मी रुबाबात माझ्या गाडीवर हिंडतो. शासकीय शाळेत शिपाई म्हणून काम करत होतो. नौकरीमध्ये मला १६ वर्ष झाली होती. पण माझी कौटुंबिक स्थिती काही सुधारत नव्हती. जबलपुर विभागात बढत्या झाल्या आणि मला एकट्याला बढती मिळून मी शिपायाचा कारकून झालो. सगळ्यांना खुर्ची देणारा माणूस स्वतः साहेब झाला आणि खुर्चीवर बसला. मला स्वप्नातही वाटले नव्हते एवढा माझा पगार वाढला. माझा छोटा भाऊ बी.एड. होऊन निराश घरी बसला होता. एक दिवस अचानक त्याला सल्लामसलतीसाठी बोलावल्याचे पत्र आले. त्याला खरे वाटले नाही कारण त्याला २९ अंक मिळाले होते आणि बी. एड. करण्यासाठी ३३ अंकांपेक्षा जास्त पाहिजेत, पण यावेळेस २८ अंक मिळालेल्यांना देखिल घेतले होते. त्यामुळे २९ अंक असल्याकारणाने त्याला संधी मिळाली आणि आज तो बी. एड. करतो आहे. हे चार चमत्कार असे झाले, ज्याचा कधी विचारही केला नव्हता. पण मग मला रामायणातील खालील ओळी आठवल्या की 'मात-पिता गुरु की वाणी, बिना विचार करो शुभ जानी'. हे सर्व चमत्कार एक वर्षाच्या आत झाले आहेत. प्रमाण म्हणून :-

१. - भारत हॉस्पिटल सेन्टरचे सर्व दस्तऐवज २. - गाड़ीचे सर्व कागदपत्र ३. - बढतीचा आदेश ४. - बी. एड. चे काउंसलिंग लेटर

हे सर्व चमत्कार नाम दीक्षा घेतल्यानंतर सहा महिन्यात झाले आहेत. पण फक्त नामस्मरण करून उपयोग नाही तर गुरुने सांगितलेल्या मार्गावर वाटचाल करावी लागते.

''हरि रूठै गुरु ठौर है, गुरु रूठै नहीं ठौर''

गुरुदेवजींच्या चरणी शिष्याचे अनुभव सादर समर्पित आहेत.

।।सत साहेब।।

भक्त त्रिलोक दास बैरागी
सहायक ग्रेड - ३
शासकिय उच्च माध्यमिक विद्यालय, मुरवारी
तहसील-ढीमरखेड़ा, जिला-कटनी (म.प्र.)

## ''११००० वोल्टेज तारेपासून सुटका''

मी भक्त सुरेश दास पिता श्री चाँद राम राहणार गांव धनाना, जिल्हा सोनीपत आणि आता शास्त्री नगर रोहतक (हरियाणा) येथे वास्तव्य. सतगुरु जी कडून दीक्षा घेण्याच्या आधी माझ्या घरची आर्थिक स्थिति अतिशय कमजोर होती. कुटुंबातील कोणी माणूस आजारी नाही असे कधीच झाले नाही. माझ्या पत्नीला भूत-प्रेत खूपच त्रास द्यायचे.इतक्या यातना असूनदेखिल आम्ही देवीदेवतांची खूप पूजा करायचो आणि माझी हनुमानजीवर खूप श्रद्धा होती. पण घरावर संकटांवर संकटे येतच होती. कुठल्याच कामात यश म्हणून मिळतच नव्हते. पूर्ण परमात्मा सतगुरु रामपाल जी महाराज जी माझ्या कुटुंबाचे असल्याने आम्ही त्यांना पूर्ण परमात्मा समजूच शकलो नाही आणि त्याचे दुष्परिणाम आम्हाला अनेक वर्ष भोगावे लागले. तेव्हा सिंहपुरा गांवातील रहिवासी भक्त विकासने मला सांगितले की तुमच्या घरातच पूर्ण परमात्मा जगतगुरु रामपाल जी महाराज आलेले आहेत आणि तुम्ही कुठे झोप काढत

आहात? तर मी म्हटले की कालाने आम्हाला इतक्या यातना दिला आहेत की आम्हाला तिथे जाण्यास वेळच मिळाला नाही. सगळा वेळ डॉक्टरांकडे जाण्यातच खर्च होतो. वर आर्थिक तंगीदेखिल खूप असते. त्या भक्ताने मला खूप समजावले आणि परम परमात्माची एवढी कृपा झाली की मी संत रामपाल जी महाराजांकडून दीक्षा घेण्यासाठी ऑक्टोबर २०१० मध्ये सतलोक आश्रम बरवाला, मध्ये पोहोचलो. नाम दीक्षा घेतल्यावर सतगुरुजींनी आपल्या दयाभावाचा माझ्यावर वर्षाव करून सुखाचा जो अनुभव दिला, त्याचे वर्णन तोंडाने करणे अवघड आहे.

माझ्या पत्नीला भूत-प्रेत त्रास देत होते. सतगुरु देवांच्या दयेने आता ती पूर्णतः बरी झाली आहे. ७ सप्टेंबर २०११ रो जी माझा १२ वर्ष वयाचा मुलगा मोहित माझ्या सांगण्यावरून मिस्त्रीला बोलावण्यास गेला होता. माझा मुलगा मिस्त्रीच्या घराच्या छतावर चढला आणि सज्ञात गेला. सज्ञावर ११००० (अकरा हजार) वोलटेजच्या विजेच्या तारा होत्या. मुलगा आणि तारा यात केवळ एक फुटाचे अंतर होते. तो जेव्हा तारांजवळ गेला तेव्हा तारांनी त्याला खेचून घेतले आणि मुलाच्या डोक्यावर तार चिकटली आणि एक इन्च खोल रुतून बसली. त्याचे तोंड जळून वीज सगळ्या शरीरातून पायाच्या अंगठ्याचे हाड तोडून बाहेर जाऊ लागली. त्याच वेळी सतगुरु रामपाल जी महाराज आकाश मार्गे आले आणि माझ्या मुलाला खूपच चमकदार (तेजोमय) शरीरासहित दिसले, जणू हजारों ट्यूबांचा प्रकाश असावा तसे. त्यांनी मुलाचे हात पकडून विजेपासून सोडवून सज्ञावर त्याला झोपविले. मग मुलाचे सतगुरुजीशी बरेच बोलणे झाले आणि जेव्हा सतगुरु जी जायला लागले तेव्हा मुलाने विचारले की गुरुजी तुम्ही कुठे जाता? तर गुरुजींनी म्हटले की तू घाबरू नकोस, मी तुझ्यासोबत आहे. त्यावेळी माझ्या मुलाची आई देखिल तिथे होती. तिने हे दृश्य आपल्या डोळ्यांनी पाहिले आणि ती अतिशय घाबरली. कारण मुलाच्या शरीरातून विजेचे लोळ निघत होते.

त्यानंतर आम्ही मुलाला पीजी आय रोहतक हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. तिथे देखिल मुलाला गुरुजी दिसले व माझ्या मुलाने म्हटले की गुरुजी माझ्यासोबत आहेत. तुम्ही घाबरू नका. जर आज आपण गुरुजींना शरण नसतो, तर माझा मुलगा आज काही मला जिवंत मिळाला नसता आणि माझ्या पत्नीला देखिल प्रेतांनी मारून टाकले असते. आम्ही उध्वस्त होण्यापासून वाचलो. ही सतगुरु रामपाल जी महाराजजींचीच दया आहे.

सर्व साधकांना माझी विनंती आहे की माझी सत्यकथा वाचून आपणदेखिल सतगुरु रामपाल जी महाराजजींना शरण येऊन वेळेच आपले कल्याण करून घ्यावे आणि प्रारब्धात लिहिलेल्या कर्मांमुळे ज्या घटना घडणारच असतात, त्यापासून पूर्णपणे आपला बचाव होईल. सतगुरु रामपाल जी महाराजांच्या सतसंग वचनांमध्ये असे ऐकले होते की बंदी छोड परम परमात्मा कबीर जी आपल्या सर्व पापांचा नाश करतात. याचेच प्रमाण ऋग्वेद मण्डल १० सुक्त १६१ मंत्र २ मध्ये आणि मण्डल ९ सुक्त ८० मंत्र २ मध्ये देखिल लिहिले आहे की जरी कोणत्या रोग्याची प्राणशक्ति क्षीण झाली असल्यास आणि त्याचे आयुष्यदेखिल शिल्लक नसल्यास त्याच्या प्राणांचे रक्षण पूर्ण परमेश्वर करतात आणि त्याला शंभर वर्षांचे आयुष्य प्रदान करून म्हणजेच त्याचे आयुष्य वाढवून साधकाला सर्व सुख प्रदान करतात.

सज्ञनांनों! सतगुरु रामपाल जी महाराजांनी आपल्या अमृत वचनांनी असेही सांगितले आहे की प्रत्येक प्राणी आपल्या केलेल्या कर्मानुसारच सुख व दुःख प्राप्त करत असतो. दुःख हे पाप कर्मांचे फळ आहे. आणि सुख हे पुण्य कर्मांचे फळ आहे. आतापर्यंत सर्व संत, आचार्य,

गुरु हेच म्हणत आले आहेत की जो प्रारब्ध कर्माचा भोग आहे. तो तर प्राण्याला भोगूनच संपवावा लागेल. हे सभ्य साधकहो! सतगुरु रामपाल जी महाराज म्हणतात की पाप कर्माने दुःख होते आहे. जर पाप कर्मांचाच नाश झाला तर दुःखाचा आपोआप अन्त होईल. जर भक्ति करता करता देखिल पाप कर्माचे फल (दुःख) भोगावेच लागत असेल,तर मग भक्तिची आवश्यकताच संपते. ७ सप्टेंबर २०११ रोजी आमच्या प्रारब्ध कर्माच्या पापामुळे माझा मुलगा मोहितचा मृत्यु होणार होता. आपले सतगुरु रामपाल जी महाराजजींच्या कृपेमुळे परम पुज्य कबीर परमेश्वर जींनी आमच्या पापांचा नाश केला. आणि माझ्या मुलाच्या जीवनाचे रक्षण करून त्याचे आयुष्य वाढविले. जर ७ सितम्बर २०११ रोजी प्रारब्ध कर्माच्या फलस्वरूप माझा मुलगा दगावला असता, तर आम्ही सर्व कुटुंबीयांनी भक्तिचा त्याग करून नास्तिक झालो असतो. कारण आम्हाला त्यावेळी परमात्माचे पूर्ण ज्ञान नव्हते. आता परमात्मावर अत्यधिक विश्वास निर्माण झाला आहे. फक्त परम पूज्य कबीर जीच परमात्मा आहेत यावरही विश्वास बसला. ते पापनाशक सर्वसुखदायक व पूर्णमोक्षदायक आहेत. आणि सतगुरु रामपाल जी महाराज त्यांनीच पाठविलेले त्याचेच अवतार आले आहेत. त्यामुळे आपलयाला पुन्हा विनंती आहे की कोणताही विलंब न करता सतलोक आश्रम बरवाला येथे पोहोचून उपदेश घेऊन स्वतःचे कल्याण करावे. आपल्याला विनंती करण्याचा माझा इतकाच उद्देश आहे. की माझ्यासारखे दुःखी खूप आहेत. माझी उपरोक्त आत्मकथा वाचून त्यावर विचार करून माझ्याप्रमाणेच आपल्यावरील संकटांचे निवारण करतील व आपल्याला सुखी करतील.

यह संसार समझदा नाहीं, कहंदा शाम दोपहरे नूं।
गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे (समय) नूं।।

**प्रार्थी भक्त सुरेश दास पुत्र श्री चाँद राम,**
**शास्त्री नगर, हिसारबाय पास, रोहतक**
**मोब नं. ०९८२९५८८६२८**

## ''भक्त दीपक दास यांच्या कुटुंबाची आत्म कथा''

।। बंदीछोड सतगुरु रामपाल जी महाराज जी यांची कृपा ।।

माझे नाव दीपक दास पिता श्री बलजीत सिंह, राहणार महलाना गांव जिल्हा सोनीपत आहे. आम्ही तीन पीढ़यांपासून राधास्वामी पंथ डेरा बाबा जैमल सिंह याचे अनुग्रहित होतो. सर्वात आधी माझ्या वडिलांच्या आईच्या आईने राधास्वामी पंथाचा उपदेश घेतला होता. त्यानंतर माझ्या वडिलांच्या आई वडिलांनी आणि नंतर माझ्या आई-वडिलांनी देखिल राधास्वामी पंथाचे संत गुरविन्द्र सिंह जी यांच्याकडून दीक्षा घेतली होती. आम्हीदेखिल गुरविन्द्र जी महाराजांना पूर्ण पुरूष समजत होतो आणि जगात प्रभु प्राप्तिसाठी हाच श्रेष्ट पंथ आहे असाच विचार करून या पंथावर पूर्ण श्रद्धा ठेवली होती. आणि त्यांचे विशाल मठ आणि विशाल समूहाला पाहून विशेष आकर्षीत होतो. आणि सेवा करण्यासाठी डेरा बाबा जैमल सिंह व्यास (पंजाब) मध्ये आणि छत्तरपुर पूसा रोड़ दिल्ली येथे देखिल जात असू. परंतु या पंथात एका विशिष्ट वयानंतर नामदीक्षा दिली जात असे त्यामुळे मी या पात्रतेसाठी अयोग्य होतो.

माझे आई-वडील ज्या दिवशी छत्तरपुरला नामदीक्षा घेण्यासाठी गेलेले होते, त्याच दिवशी माझ्या ५ वर्ष वयाच्या छोट्या भावाकडून शेजारच्या मुलाच्या डोळ्याला कुठलीतरी गोष्ट चुकून लागली. जेव्हा संध्याकाळी माझे आई-वडील नामदीक्षा घेऊन परत आले, तेव्हा

माझ्या भावाने शेजारच्या मुलाच्या डोळ्यात जाणूनबुजून जखम केली असे शेजाऱ्यांना वाटून आमचे त्यांच्याशी वितुष्ट आले आणि तेव्हापासून आमच्यावर जणू दु:खाचा डोंगरच कोसळला.

त्याच दरम्यान माझ्या वडिलांच्या वडिलांचे आजारपणामुळे निधन झाले होते. जेव्हा त्यांचे पार्थिव शरीर दूसऱ्या खोलीत ठेवले होते, त्यावेळी माझी १२ वर्षांपूर्वी निधन झालेली आजी, माझी आत्या प्रेमवतीमध्ये प्रेतासारखा प्रवेश करून म्हणाली (माझ्या आजीने देखिल राधास्वामी पंथाच्या प्राप्त पाच नामांची खूप जास्त साधना केली होती. ती नियमित तीन वाजता उठून व दिवसा देखिल भजन व सुमरन करण्यासाठी बसायची आणि राधास्वामी पंथाच्या सांगितलेल्या नाममंत्राचा जप व अभ्यास करत असायची) की आज तुझ्या आजोबांचा जीवनसंस्कार समाप्त झाला त्यामुळे मी तुम्हाला सांभाळायला आले आहे.माझ्या आजीला जिवंत असताना श्वासांच्या त्रासामुळे खोखलत असायचा. बारा वर्षानंतर देखिल ती तशीच खोकत होती. तेव्हा आम्ही विचारले की ''दादी जी तुम्ही तर खूपच दुःखी दिसत आहात. तुम्ही सत्लोकात गेला नाहीत काय?'' तेव्हा माझी आजी म्हणाली अरे, मी चुकीची साधना केल्यामुळे आपले अमूल्य मनुष्य जीवन व्यर्थ वाया घालविले आणि आता मृत्युनन्तर भूतयोनिच्या यातना भोगते आहे. मी कुठे सतलोकात गेलेलीच नाही. माझ्या आईला अतिशय आश्चर्य वाटून तिने विचारले आई! तुम्हाला तुमचे गुरु चरण सिंह जी महाराजांनी संभाळले नाही? तेव्हा माझ्या आजीने अत्यंत दुःखाने म्हटले की त्यांनी माझा कोणताही सांभाळ केला नाही आणि मी आजही अशीच दु:खी आहे.

त्या घटनेनंतर दोन वर्षांनी एक दिवस माझी दुसरी आत्या कमला देवीमध्ये माझे दादा जी प्रेतवत् प्रवेश करून म्हणाले की मी अतिशय दुःखी आहे आणि मला कोणतीही गती प्राप्त झाली नाही, मला स्नान करायचे आहे माझ्या आईला अतिशय दुःख वाटून तिने विचारले ''आपण तर सतलोकी गेला होतात, मग तिथे स्नानासाठी पाणीदेखिल नाही ''? पण आजोबांनी काहीही उत्तर दिले नाही. मग माझ्या आईने माझ्या आजोबांना (म्हणजेच ज्यांनी माझी आत्या कमला देवीमध्ये प्रेतवत् प्रवेश केला होता) तिला स्नान घालू लागली तेव्हा ते म्हणायला लागले की ''मुली, मी स्वत:च स्नान करतो.'' तेव्हा माझ्या आईने दादाजींना म्हणजे त्यांनी माझ्या आत्यामध्ये प्रवेश केला होता, म्हणून त्यांना आत्याचे कपडे घातले, तेव्हा माझे आजोबा म्हणाले ''माझे धोतर घेऊन ये, ते मी बांधीन.' माझ्या आईने त्यांना अशीच एक चादर दिली ती त्यांनी गुंडाळून घेतली. नंतर म्हटले की माझ्यासाठी चहा बनवा. आणि घाईघाईत चहा प्याले.'' मी विचारले दादाजी! तुम्ही सतलोकी गेला नाहीत का? तर त्यांनी म्हटले की बेटा, आज मी अनेक यातना सोसतो आहे.'' माझ्या आईने पुन्हा विचारले की आपण तर राधास्वामी हजूर चरण सिंह जी महाराजांचे अनुग्रहित होतात, त्यांची भक्ति देखिल करत होतात. त्यांनी तुम्हाला सांभाळले नाही? तेव्हा माझे आजोबा (ते माझी आत्या कमलादेवी मध्ये प्रेतवत् शिरले होते) म्हणाले की ''त्यांनी माझा कोणताही सांभाळ केला नाही आणि मी आजही असाच धक्के खात फिरतो आहे.''

त्याच दरम्यान माझे डोळे अतिशय अधू झालेले होते. आणि मला कमी दिसू लागले होते आणि चष्मा सारखा बदलावा लागत होता. मी अभ्यासासाठी माझ्या एका मित्राकडे जात असे. तिथे भक्त संतरामजींनी मला पूर्णब्रह्म अवतार सतगुरु रामपाल जी महाराजांचा महिमा सांगितला आणि म्हटले की तुम्ही सतगुरु रामपाल जी महाराजांची दीक्षा घ्या,आपले डोळे व्यवस्थित होतील आणि म्हटले की याच यातना आणि दुःखातून जीवांना बाहेर काढण्यासाठी परमेश्वर कबीर साहेब संतरूप धारण करून आले आहेत. मी म्हटले की ''माझ्या आईबाबांनी

राधास्वामी पंथाची नामदीक्षा घेतली आहे.''भक्त संतरामजींनी म्हटले की तो पंथ पूर्ण नाहीं, त्यांच्या भक्ति साधनेने सतलोक प्राप्ति होणार नाहीच, जीवनामध्ये कर्माचा मार टाळता येणार नाही, तो तर फक्त कबीर साहेबांचा पूर्ण संतच टाळू शकतो.

माझ्या वडिलांना श्वासाचा आजार होता. दहा पावले चालले तरी त्यांना दम लागून पुढे पाउल टाकता यायचे नाही. त्यांना दम लागायचा. उच्च आणि निम्न रक्तदाब होता. माझ्या वडिलांना निवडणुकीचे काम करताना हृदयविकाराचा त्रास झाला. पण सुदैवाने ते वाचले पण आम्ही सगळे विचार करत होतो की राधास्वामी पंथी संत गुरविन्द्रसिंह जी महाराजांनी हृदयविकारापासून त्यांना वाचविले. मोठीच कृपा केली.

पण त्यानंतर थंडीमध्ये प्रत्येक रात्री माझ्या वडिलांचा प्रत्येक श्वास तुटताना मी पाहिला आहे. बिल्कुल मृतप्राय व्हायचे. बसून रडण्याशिवाय आमच्या हातात काहीच नव्हते कारण औषधांचा देखिल कमाल डोस सुरु होता, डॉक्टर जितका औषधाचा जास्तीतजास्त डोस वाढवू शकत होते, तेवढा वाढवला होता. यापेक्षा जास्त ते वाढवू शकत नव्हते. माझी आई डेरे बाबा जैमल सिंह कडून आणलेला प्रसाद त्यांना द्यायची आणि राधास्वामी पंथी गुरूविन्द्र सिंह जी महाराजांच्या मूर्तिसमोर बसून प्रार्थना करून रडायची. त्याच वेळेस माझ्या छोट्या भावाला प्रेत प्रकोपाचा त्रास व्हायला लागला. तो रात्री चमकून उठायचा आणि म्हणायचा की ''कोणी तरी माझा पाय पकडून खेचतो आहे. आणि मला झोपू देत नाही.'' तो अतिशय आजारी राहू लागला. पूर्ण परमात्मा परमेश्वर कबीर जींच्या दयेने मज सेवकाला ८ ऑक्टोबर १९९८ रोजी सतगुरु रामपाल जी महाराजांची दीक्षा प्राप्त झाली. सतगुरु रामपाल जी महाराजजींच्या असीम कृपेने वीस दिवसात माझा चष्मा निघून गेला आणि मी औषध खाणे देखिल बंद केले. मला सतगुरु रामपाल जी महाराजांवर पूर्ण विश्वास बसला. भक्त संतरामजींनी देखिल घरी येऊन माझ्या आईवडिलांना समजाविले की आपण पूर्ण परमात्मा कबीर साहेबांचे शिष्य परम संत रामपाल जी महाराज यांची दीक्षा घ्या, आपल्या सर्व यातना निवारण होतील.

त्यानंतर मीदेखिल आपल्या आई वडिलांना समजावले, तेव्हा ते म्हणाले ''आपण आधी राधास्वामी होतो, आता संत रामपाल जी महाराजांचा नाम उपदेश घेतला, तर लोक काय म्हणतील.''? तेव्हा मी म्हटले की बाबा, जर एक डॉक्टर इलाज करू शकत नसेल तर आपण दुसरा डॉक्टर बदलत नाही का?'' खूप दु:खी होते. काही कालावधी नंतर परमेश्वर कबीर जींना शरण गेले आणि राधास्वामी पंथाच्या त्या पांच नामांचा त्याग करून, पूर्ण संत सतगुरु रामपाल जी महाराजांचा नाम उपदेश घेतला.

**सतगुरु कबीर साहेब जी म्हणतात** ''शरण पडे.को गुरू संभाले जान के बालक भोला रे'' सगळ्या कुटुंबाने नाम घेतल्यावर आमचे चांगले दिवस सुरु झाले. माझ्या भावाची प्रेतबाधा ठीक झाली, वडिलांचे स्वास्थ्य बिल्कुल ठीक झाले, आधी त्यांना दहा पावले टाकता येत नव्हती, ते आता एका माणसासोबत साखरेचे पोते उचलतात. आज आमचे सर्व कुटुंब पूर्ण परमात्मा अवतार सतगुरु रामपाल जी महाराजजींच्या दयेने पूर्ण सुखी आहेत.

परन्तु आमच्या आजी आजोबा व वडिलांच्या आईच्या आजींच्या मनुष्य जीवनाचे जे नुकसान झाले, त्याची भरपाई काही होणार नाही. जर एखाद्या माणसाचा जीव वाचवायचा असेल, तर लाखों आणि करोड़ों रूपये खर्च केले आणि त्याचा जीव वाचला तर खर्च झालेल्या पैशांचा कोणी विचार करत नाही. जीव तर वाचला, एवढाच विचार करतात. पण आज कितीही किंमत चुकवली तरी माझ्या आजी आजोबांच्या जीवनात केलेल्या शास्त्राविरूद्ध

साधनेमुळे (राधास्वामी पंथाकडून सांगितलेल्या पांच नामांची साधना) त्यांचे मानवी जीवन व्यर्थ गेले. (ते भूत आणि पितर योनित यातना भोगत आहेत), परत येऊ शकत नाहीत. नकली संत आणि पंथ सर्व समाजाशी हा घृणास्पद खेळ करत आले आहेत. कारण चौऱ्याऐंशी लाख योनि भोगल्यानंतर मिळणारे अमूल्य मनुष्य जीवन हे पूर्ण परमात्माला प्राप्त करण्याचे एकमात्र साधन असताना त्याला बरबाद करत आहेत. या महाक्षतिची पूर्तता कोणतीही किंमत देऊन चुकविता येणार नाही.

हे बंदीछोड सतपुरूष रूप सतगुरु रामपाल जी महाराज आपण मोठी दया करून आम्हा तुच्छ जीवांना आपले सत्य ज्ञान देऊन आपल्या शरण घेऊन बोलावले अन्यथा आम्ही पीढ़ी दर पीढ़ी प्राप्त झालेली या शास्त्राविरूद्धच्या साधनाने आपल्या मनुष्यजन्माची त्यातच समाप्ती करून भूत आणि पितरांच्या योनित जाऊन या शास्त्राविधियुक्त सतभक्ति पासून वंचित राहिलो असतो.

सर्व बुद्धिजीवी समाजाला विनंती आहे की अजूनही वेळ गेलेली नाही. हे सत्य ज्ञान समजून निष्पक्ष होऊन निर्णय करा. बंदीछोड सतगुरु रामपाल जी महाराजांच्या चरणी येऊन सतभक्ति प्राप्त करून आपल्या मनुष्य जीवनाचे कल्याण करवून घ्यावे.

।।सत साहेब।।

सतगुरु चरणांचा सेवक

भक्त दीपक दास

मो नं. - +९१९९९२६००८५३.

## परमात्माची असीम कृपा

बंदी छोड सतगुरु रामपाल जी महाराज की जय

यजुर्वेद अध्याय ८ मंत्र १३ मध्ये प्रमाण आहे की पूर्ण परमात्मा पापीपेक्षा ही पापी व्यक्तिंच्या संपूर्ण पापांचा नाश करून भयंकर रोगांपासून देखिल त्यांना मुक्त करतात. याचे मी जिवंत उदाहरण आहे.

मी केशव मैनाली वडिल श्री इन्द्र प्रसाद मैनाली गाव विकास समिति हरिऔन, जिल्हा सर्लाही, नेपाल येथील निवासी असून सध्या वर्तमानात काठमाण्डू जवळील भक्तपुर येथे घर बांधून राहतो आहे. मी चुरे भावर (नेपाल) नावाच्या राजकीय पक्षाचा अध्यक्ष व पूर्व सभासद आहे. माझा मोबाईल नं. +००९७७-९८४१८९२५८३ आहे. माझ्यावर सतगुरु रामपाल जी महाराजांनी चमत्कारी कृपा करून मला आणि माझ्या कुटुंबाला संपुर्ण दुःखांचा नाश करून सुखी बनविले आहे.

जगाच्या दृष्टीने मी एक सुखी आणि सम्मानित जीवन जगत होतो. परन्तु मी आजारांमुळे अतिशय त्रस्त व दुःखी होतो. मी मागील २० वर्षांपासून मुळव्याधीने बेजार होतो आणि शौच करताना अतिशय पीड़ा सहन करावी लागत असे. त्याचसोबत ८ वर्षांपासून दम्याने पीड़ित होते. राजकीय कार्यकर्ता असल्यामुळे अनेक लोकांना भेटावे लागायचे आणि नेहमी तोंडावर रुमाल किंवा हात ठेऊन बोलावे लागायचे. मी आपल्या रोगांच्या उपचारासाठी उत्तमोत्तम डॉक्टरांना दाखवले. परंतु काहीही फायदा झाला नाही. उलट मी धर्माच्या नावाखाली अज्ञानी संतांच्या नादी लागून आपल्या जीवनाची ६२ वर्षे वाया घालवली होती.

मला ही गोष्ट सतगुरु रामपाल जी महाराजजींचा नाम उपदेश घेतल्यानंतर माहित पडली. नेपाळचा संसद सभासद असल्यामुळे सरकारी खर्चाने मी जगातील कोणत्याही डॉक्टरकडून माझ्या रोगाचा उपचार करवून घेऊ शकलो असतो.परन्तु नेपाळच्या वैद्यकीय मंडळाने त्यासाठी शिफारस केली नाही कारण त्यांच्या म्हणण्यानुसार माझे रोग उपचारहीन होते आणि जगातील कोणीही डॉक्टर मला बरा करणे अशक्य होते. त्यामुळे मला तर असेच वाटत होते की जिवंत असेपर्यंत दुःख भोगावे लागणार आणि औषध खावे लागणार.

एक दिवस मी विचारमग्न बसलो असताना, मला माझ्या मित्राने, अनेक वर्षे सतगुरु रामपाल जी महाराजांचा शिष्य असलेल्या भक्त भोलादास जींनी माझे दुःख ऐकून, सतगुरुजीचा उपदेश घेतल्यास आपल्या दुःखांचा अवश्य नाश होईल असा विश्वास दिला. मी अनेक कथित मोठमोठ्या संतांच्या संगतीत राहून कंटाळलो होतो. त्या मित्राचे शब्द माझ्यासाठी अंधारातील एक दिव्याच्या प्रकाशा प्रमाणे माझ्या मनाला भावले. मी तिसऱ्याच दिवशी सतलोक आश्रम चण्डीगढ़ रोड बरवाला, जिला हिसार, हरियाणा (भारत) येथे पत्नीसोबत गेलो कारण ती देखिल गुडघ्याची हाडे झीजण्याच्या आजारामुळे त्रस्त होती. आणि तिच्या डोळ्यात काचबिन्दु नामक एक कोणताही उपचार नसलेला रोग होता. सोबत माझ्या छोटेया मुलाच्या पत्नीला देखिल आणले. मला रस्त्यात सतलोक आश्रमात जाणारे नेपाळमधील अनेक भक्तजन भेटले. त्यामुळे कोणताही त्रास न होता सतलोक आश्रमात पोहोचलो.

मला संत व महंतांचा स्वार्थ परिचित होता आणि सतगुरु रामपाल जी महाराजांचे पुस्तक वाचले किंवा प्रवचन ऐकले नव्हते. फक्त कोणी सांगितले म्हणूनच आलो होतो. त्यामुळे आल्याबरोबर नाम उपदेश घेण्यास राजी नव्हतो. माझ्या भाग्याने माझे येणेच सतसंग समागमाच्या वेळीच झाले आणि मला सतगुरुदेवांचा सतसंग श्रवण करण्यास मिळाला. जिथे माहित झाले की या जगातील सर्व धर्मगुरू, पंड़ित, पुरोहित आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी धर्माच्या नावाखाली लोकांना कालाच्या जाळ्यात अडकवून आम्हा भोळ्याभाबड्या आत्म्यांना नरकात पाठविण्याचा उद्योग करत होते. त्यांना कधीही खरा परमात्मा भेटलेला नाही किंवा त्याची सत्यभक्ति कशी करावी याचेही ज्ञान नाही आणि हे काम ते काही थोड्या रुपयांसाठी आणि समाजात सम्मान प्राप्त करण्यासाठी करत आहेत. परंतु तरीदेखिल मी दीक्षा घेण्यास राजी झालो नाही, मात्र माझी पत्नी त्यासाठी राजी झाली. कारण दीक्षा घेतल्याशिवाय गुरू दर्शन आणि गुरू आर्शीवाद मिळणे असंभव होते. कदाचित माझ्यातील राजकारणी असे करण्यास मला बाध्य करत होता कारण राजकारणात सहसा कोणावरही विश्वास न ठेवण्याची सवय नडत होती. तरीदेखिल आपसात सल्लामसलत करून आम्ही तिघांनी तारीख २ मे २०१२ रोजी दिक्षा घेतली आणि गुरूजींच्या दर्शनासाठी गेलो. तिथे दया सागर आमच्यावर कृपादृष्टी करण्यासाठी जणू उभेच होते. मी त्यांना जसे आपल्या रोगांबाबत सांगितले, तर सतगुरुदेव जी म्हणाले ''सगळे ठीक होईल'' असा आर्शीवाद माझ्या डोक्यावर हात ठेऊन दिला. आणि जणू माझ्या बाबतीत चमत्कार झाला. सकाळी शौचाला जाताना शौचालयात रक्त पडले आणि त्यानंतर मुळव्याध जणू संपलीच. दोन दिवस आश्रमात राहिल्यानंतर अस्थमा जवळपास ८० टक्के बरा झाला आणि आता पूर्ण बरा झाला आहे. महिना दोन महिन्याने एकदा कधीतरी खोकला येतो. पत्नीचा गुडघ्याचा रोग देखिल बरा झाला. काठमाण्डूला आल्यावर काठमाण्डूच्या त्याच रुग्णालयात तिच्या डोळ्यांची पुन्हा तपासणी केली. डॉक्टरदेखिल डोळ्यात काचबिंदू रोगाची कोणतीही लक्षणे नाहीत आणि डोळा पूर्णपणे बरा झालेला आहे हे पाहून अशर्यचकीत झाले.

माझ्या रोगमुक्तीचा चमत्कार कुटुंब, नातेवाईक, आणि शेजारी सगळीकडे पसरला. माझ्या कुटुंबातील अन्य लोक देखिल कोणत्या ना कोणत्या आजाराने त्रस्त होतेच. माझ्या डॉक्टर असलेल्या मोठ्या भावाला सगळे शरीर सुजण्याचा (Swelling) त्रास होता. माझ्या मुलीला दर महिन्याला मासिक धर्मामध्ये पोटात जबरदस्त दुखायचे. माझ्या दुसऱ्या व्यवसायाने वकील असलेल्या मुलीला सायटिका आणि घशाची हाडे घासण्याचा त्रास होता. ती जीवनात निराश झाली होती. माझ्या मेव्हण्यांना जलबिन्दुरोग झाला होता. सगळेच माझ्यावरील गुरुदेवांच्या कृपेमुळे चमत्कारा मुळे प्रभावित झाले होते. तोपर्यंत मी आश्रमाच्या नियम आणि भाक्तिभावाशी थोड़ा फार परिचित झालो होतो. मी सर्वांना ज्ञान गंगा पुस्तक व्यवस्थित वाचण्यास सांगितले.

पुढल्या वेळेस आश्रमात जाताना सर्वांना सोबत घेऊन गेलो. त्यांना दीक्षा घेण्याबाबत कोणताही संभ्रम नव्हता. सर्वांनी दीक्षा घेतली आणि विश्वासाने भक्ति केली. आज सगळेच रोगमुक्त होऊन सुखी जीवन जगत आहेत.

सतगुरु रामपाल जी महाराज पूर्ण परमात्माचे प्रतिरूप नाहीं तर ''पूर्ण परमात्माच'' आहेत. ते स्वतःला लपवून आपण ''पूर्ण परमात्माचे दास'' म्हणवतात. आणि धरतीवरील अडकलेल्या जीवांना बन्धनमुक्त करून सतलोकात घेऊन जाण्यासाठी आले आहेत. आमच्या सदग्रन्थांत प्रमाण आहे की जेव्हा कलयुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष संपतील तेव्हा तारणहार संत, जगाला तारण्यासाठी पृथ्वीवर येतात.

''कबीर, पाँच हजार अरू पाँच सौ पाँच जब कलयुग बीत जाए
महापुरूष फरमान तब जग तारण को आए''।।

सर्व प्रेमी साधक व भक्तांनो! ती वेळ आली आहे. पूर्ण संतदेखिल आले आहेत. आणि ज्ञान अमृताचा वर्षाव करत आहेत. वर्तमानात सगळ्या नकली संत महंतरूपी ठगांपासून स्वतःला वाचवा आणि लवकरात लवकर सतगुरुच्या चरणी येऊन निःशुल्क दीक्षा नाम उपदेश घेऊन आपले कल्याण करून घ्या आणि पूर्ण मोक्ष प्राप्त करा.

।। सत साहेब ।।

केशव प्रसाद मैनाली (दास),
काठमांण्डू (नेपाल)
फोन नं.- +००९७७-९८४१८९२५८३

❖❖❖

➢ सतलोक आश्रमाची अन्य पुस्तकें (आध्यात्मिक ज्ञान गंगा, ज्ञान गंगा, गहरी नजर गीता में, गीता तुझे ज्ञान अमृत, सृष्टि रचना संपुर्ण, मानवता का ऱ्हास आणि विकास इत्यादी) आमचे संकेतस्थळ www.jagatgururampalji.org वरून डाउनलोड करू शकता.